Linguistic (Telugu) Minority Institution
Padmashali Shikshan Sanstha's

A. R. Burla Mahila Mahavidyalaya, Solapur

C. S. No. 9705/9/A/2A, Raviwar Peth, Rajendra Chowk, Solapur – 413005 (P. O. Box No. 510)
NAAC Reaccredited – 2017 B++ Grade (CGPA 2.76)
Affiliated to P. A. H. Solapur University, Solapur
Website: www.arburla.org E-mail: arburla@gmail.com

2.6.2: Attainment of POs and COs are evaluated.

1. College Magazine (Padmapratima)
2. Prizes Awarded to the Students
3. Students Innovation (A Students Handmade SketchBook dedicated to Mother)
4. Competitions Conducted



भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अे.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

पद्मप्रतिमा

२०१७-१८

पद्मशाली शिक्षण संस्था

• पदाधिकारी व विश्वस्त मंडळ •

अध्यक्ष

श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी

उपाध्यक्ष

ॲड. श्री. श्रीनिवास अंबाजी क्यातम

सचिव

श्री. दशरथ नारायण गोप

सहसचिव

श्री. श्रीधर बुचय्या चिट्याल

खजिनदार

श्री. दिनेश भुमय्या यन्नम

विश्वस्त मंडळ

श्री. नागनाथ ईरय्या गंजी
श्री. गोवर्धन रायमल्लू कमटम
श्री. रामुलू राजय्या मच्छा
श्री. विजयकुमार अंबाजी गुल्लापल्ली
श्री. श्रीनिवास यल्लप्पा पोशम
सौ. संगीता यशवंत इंदापुरे
प्रा. श्री. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी
श्री. प्रसाद लक्ष्मीनारायण श्रीराम
श्री. गणेश नारायण बत्तीन
श्री. अशोक अंबाजी चिलका
श्री. मल्लिकार्जून मल्लेशम सरगम
श्री. रमेश नागनाथ केदारी
ॲड. श्री. श्रीनिवास शिवानंद कटकूर
श्री. नरेश राजय्या श्रीराम
श्रीमती सुलोचना व्यंकटेश गुंडू
श्री. चंद्रशेखर मल्लेशम वडनाल
श्री. नरसय्या रामदास इप्पाकायल
श्री. श्रीनिवास नरसय्या आकेन
श्री. व्यंकटेश लक्ष्मीनारायण आकेन
श्री. मधुकर लिंगराज कट्टा
श्री. रमेश श्रीहरी विडप
श्री. लक्ष्मीकांत अंबादास गड्डम
श्री. हरिष अविनाश कोंडा
श्री. लक्ष्मीनारायण ईरय्या कमटम
श्री. अरविंद गंगाधरपंत कुचन
श्री. अरविंद राजमल बोमड्याल
श्री. सुरेश जनार्दन बिटला

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

नॅक पुनर्मुल्यांकित 'B++' दर्जा

पद्मप्रतिमा

२०१७-१८

संपादक

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

कार्यकारी संपादक

डॉ. तुकाराम नारायण शिंदे

विभागीय संपादक

मराठी विभाग - डॉ. संजय लांडगे

हिंदी विभाग - डॉ. प्राजक्ता जोशी

इंग्रजी विभाग - डॉ. ॲनी जॉन

जाहिरात विभाग

डॉ. शिवानंद भांजे डॉ. शिरीष भोसले

सीए प्रा. श्रीनिवास गुंडेली

कार्यालयीन व्यवहार

श्री. व्यंकटेश गाजूल

पद्मप्रतिमा
२०१७-१८

- **अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय**
  सिटी सर्व्हे क्र. ९७०५/९ अ, /२ अ,
  राजेंद्र चौक, रविवार पेठ, सोलापूर
  सोलापूर. - ४१३ ००५.
  दूरध्वनी : ०२१७ - २७४३९०८

- **मुखपृष्ठ**
  रामगोपाल (गोपी) म्याकल

- **ग्राफिक्स डिझाईन व मुद्रक**
  ओम प्रिंटींग अॅन्ड ग्राफीस्
  (रामगोपाल (गोपी) म्याकल)
  साखर पेठ, नीलकंठेश्वर मंदिराजवळ,
  सोलापूर. मोबा.: ९९२२०२६९६५

- **मांडणी व सजावट**
  डॉ. टी. एन. शिंदे

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,
अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
यांनी हे पत्र खाजगी वितरणासाठी प्रकाशित केले आहे.

या अंकातील मजकूरांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

कुलगुरु

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

डॉ. एन. एन. मालदार

महाविद्यालयाच्या २८ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे
प्रमुख पाहुणे - प्रसिध्द कवी व गीतकार श्री. अरुण म्हात्रे व
महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या समवेत महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद

महाविद्यालयाच्या २८ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे
प्रमुख पाहुणे प्रसिध्द कवी व गीतकार - श्री. अरुण म्हात्रे व महाविद्यालायाचे
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या समवेत महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचारी

प्राचार्यांचे मनोगत...

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या द्रष्ट्या मंडळीनी महिलांना उच्च शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने महाविदयालय सुरु केले. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार आणि सर्व विश्वस्त यांचे नेहमीच उत्तम सहकार्य लाभत असते,त्यांची महाविदयालयाच्या विकासासाठी सतत धडपड असते. यामुळेच यंदाच्या वर्षी महाविदयालयाची स्वतंत्र वास्तू उभारली.या वास्तूमध्ये विदयार्थींनींचा अध्ययन करण्यातील उत्साह आणि आनंद पाहताना समाधान वाटते. विदयार्थींनीमधील हा उत्साह मग तो उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग असो वा महाविदयालयातील इतर सर्व विभागाचे उपक्रम असो त्यामधून दिसून आला.यंदाच्या वर्षी नॅक समितीकडून महाविदयालयाचे पुनर्मूल्यांकन झाले. नॅक समितीमधील सदस्यांनीही विदयार्थींनीमधील या उत्साहाची योग्य ती दखल घेतली. विदयार्थींनींच्या या उत्साहामुळे महाविदयालयाच्या समृध्दीत आणखी भर पडली आणि महाविदयालय आणखी एका उंचीवर पोहोचले. याचे प्रमाण म्हणजेच नॅक समितीकडून महाविदयालयास मिळालेली **B++** श्रेणी होय. विदयार्थींनीमधील या उत्साहाचेच प्रतिबिंब यावर्षीच्या अंकात उमटले आहे.

महाविदयालयातील पद्मप्रतिमा या वार्षिक अंकासाठी कार्यकारी संपादक डॉ.टी.एन.शिंदे,विभागीय संपादक डॉ.प्राजक्ता जोशी, डॉ.संजय लांडगे आणि डॉ.ॲनी जॉन यांनी परिश्रम घेतले.यामुळेच यंदाचा पद्मप्रतिमा हा वार्षिक अंक सुरेख व देखणा झाला आहे आणि तो वाचकांच्या हाती देताना नक्कीच आनंद होत आहे.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयांचे पुनर्मुल्यांकनासाठी आलेल्या 'नॅक' समिती चेअरमन माजी कुलगुरू डॉ. थंगामुथु व सदस्य डॉ. झीनत अरा व प्रो. अध्या सक्सेना यांच्या हस्ते 'नॅक' समितीचा अहवाल स्विकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व समन्वयक डॉ. अॅनी जॉन....

अे. आर. बुर्ला महिला महविद्यालयाच्या २८ व्या वार्षिक पारितोषक वितरण समारंभाप्रसंगी कु. शिवबाई हेगडे ह्या विद्यार्थिनीला 'मिस बुर्ला' पुरस्कार प्रदान करताना प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी व गीतकार श्री. अरुण म्हात्रे व उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष-अॅड. श्री. श्रीनिवास क्यातम, सहसचिव - श्री. श्रीधर चिटपात, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त अॅड. श्रीनिवास कटकूर व डॉ. अॅनी जॉन....

अे.आर.बुर्ला महिला महविद्यालयात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या सहकार्याने आयोजित रोजगार मेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित मान्यवर...

अे.आर.बुर्ला महिला महविद्यालयात शहर वाहतुक शाखा पोलीस आयुक्तालय सोलापूर यांच्या सहकार्याने पोलीस रेजिंग -२०१८ या उपक्रमांतर्गत वाहतुक नियम व जनजागृती या विषयावर मार्गदर्शन करताना पोलीस निरिक्षक श्री. श्रीधर काणे व व्यासपीठावर उपस्थिती डॉ. शिवानंद भाजे, डॉ. प्राजक्ता जोशी, पोलीस निरिक्षक - श्री. सुनिल जाधव, डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लाडगे व डॉ. आर. के. वडजे....

अे. आर. बुर्ला महाविद्यालयात अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी त्यांच्या प्रतिमेचे पुजन करताना डे. सकाळचे मुख्य उपसंपादक श्री. रजनिश जोशी व उपस्थित संस्थेचे अध्यक्ष- श्री. पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष-अॅड. श्री.श्रीनिवास क्यातम, सहसचिव - श्री. श्रीधर चिटपात, खजिनदार - श्री. दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त - श्री. श्रीनिवास पोशम, श्री. लक्ष्मीनारायण कमटम, श्री. प्रसाद श्रीराम, श्री. श्रीनिवास आकेन, श्री. हरिष कोंडा व डॉ. शिरीष भोसले

अे. आर. बुर्ला महाविद्यालयात आयोजित सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या ९३ व्या अधिवेशन प्रसंगी '' काळा पैसा : विमुद्रीकरण आणि चलन व्यवस्था '' या विषयावर आपले विचार मांडताना मा. श्री. अजित अभ्यंकर व व्यासपीठावर बसलेले प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. संतोष कदम, प्रा. उत्तमराव हुंडेकर, डॉ. आर. के. पाटील व उपस्थित मान्यवर...

• शैक्षणिक व सांस्कृतिक विभागातील गुणवंत विद्यार्थीनी •

बी. कॉम. भाग-१ मध्ये प्रथम

कु. प्रियंका बडगंची

बी. कॉम. भाग-२ मध्ये प्रथम

कु. स्नेहा पोला

बी. कॉम.पदवी मध्ये प्रथम

कु. स्नेहा वडतिले

बी. ए. भाग - १ मध्ये प्रथम

कु. संजना सरवदे

बी.ए. भाग २ मध्ये प्रथम

कु. ऋतुजा पवार

बी.ए. पदवी मध्ये प्रथम

कु. रईसा पठाण

सोलापूर विद्यापीठ
अविष्कार संशोधन स्पर्धेत
द्वितीय क्रमांक

कु. खानसा मुचाले
बी. ए. भाग - ३

उत्कृष्ट ग्रंथालय वाचक

कु. सावित्री कदम
बी. ए. भाग - ३

विद्यार्थीनी प्रतिनिधी

कु. सोनाली पवार
बी. कॉम. भाग -३

रा. से. यो. उत्कृष्ट स्वयंसेविका

कु. मंजुषा गंपले
बी. कॉम. भाग - २

रा. से. यो. उत्कृष्ट शिबीरार्थी

कु. पूजा बोल्लू
बी. कॉम. भाग -३

गांधी विचार संस्कार परीक्षेत
सोलापूर जिल्ह्यात प्रथम

कु. दीपिका गोसकी
बी. कॉम. भाग -१

• जिमखाना विभागातील यशस्वी विद्यार्थींनी •

राष्ट्रीय खेळाडू - हॅन्डबॉल

कु. अंबिका पेंटा
बी.ए. भाग-३
राष्ट्रीय खेळाडू - क्रिकेट

राष्ट्रीय खेळाडू - बेस बॉल, क्रिकेट

कु. तुलसी जाधव
बी. कॉम. भाग -२
राष्ट्रीय खेळाडू - योगासन

मिस बुर्ला
राष्ट्रीय खेळाडू - बेस बॉल, क्रिकेट

कु. शिवबाई हेगडे
बी. कॉम. भाग -२
राष्ट्रीय खेळाडू - योगनासन

राष्ट्रीय खेळाडू - जलतरणपटू, सॉफ्टबॉल

कु. सोनम काशीद
बी. ए. भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - बेसबॉल, क्रिकेट

राष्ट्रीय खेळाडू - योगासन

कु. पौर्णिमा पुकाळे
बी. कॉम. भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - योगासन

कु. गायत्री गादेकर
बी. कॉम. भाग-२
राष्ट्रीय खेळाडू - जलतरणपटू

कु. राजश्री रच्चा
बी. कॉम. भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - जलतरणपटू

कु. भावना संभारम
बी. कॉम. भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - तलवार बाजी

कु. काजल इंब्रापुरे
बी. कॉम. भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - तलवार बाजी

कु. गौरी पासकंटी
बी.कॉम.भाग - २
राष्ट्रीय खेळाडू - योगासन, जलतरण

कु. सोनाली मुनगापाटील
बी. ए. भाग - १
राष्ट्रीय खेळाडू - तलवार बाजी

कु. आरती मित्रा
बी. कॉम. भाग - १
विद्यापीठ खेळाडू - जलतरण

कु. सौंदर्या मच्छा
बी. कॉम.भाग - १ (अ)

कु. शुभांगी कोंडा
बी. कॉम. भाग - १ (ब)
विद्यापीठ खेळाडू - जलतरण

कु. देविका हबीब
बी. कॉम. भाग - १ (ब)
विद्यापीठ खेळाडू - जलतरण

कु. अंबिका मंजाळ
बी. कॉम. भाग - २

कु. रुक्मिणी कोळी
बी. कॉम. भाग - २

कु. सौम्या पुलगम
बी. कॉम. भाग - १

कु. पुजा शिंदे
बी. कॉम. भाग - ३

डॉ. टी. एन. शिंदे

संपादकीय

महाविदयालयातील विदयार्थीनींच्या कलागुणांना अधिक संधी मिळावी यासाठी सर्व विभागाकडून सतत प्रयत्न केले जातात, विविध उपक्रमांच आयोजन केले जाते.याचीच प्रचिती सन २०१७-१८ यावर्षीच्या पद्मप्रतिमा या वार्षिक अंक पाहताना येते.

महाविदयालयातील सर्व विभागाकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या विभागाच्या प्रमुखांनी याबाबतचे अहवाल वेळेत देणेबाबत उत्तम सहकार्य केले. विद्यार्थीनींनी पद्मप्रतिमा अंकासाठी लेख, व्यक्तिचित्रे, कथा, माहितीपर लेख, प्रवासवर्णन, व्यंगचित्रे, विनोद व कविता इ.विविध प्रकारच्या साहित्याचे लेखन केले.यामुळेच यंदाचा वार्षिक अंक अधिक सशक्त झाला आहे.

पद्मप्रतिमा अंकाच्या अनुषंगाने होणारे पत्रव्यवहार ,अंकातील फोटो व बातम्यांचे कात्रणे याबाबतीत मुख्य लिपीक श्री. व्यंकटेश गाजूल, सौ. संजीवनी सादुल, श्री. शिवाजी चिंता, श्री. अनिल सग्गम, श्री. सत्यनारायण गजेली, श्री. महेश घागरे, श्री.संतोष मालतुमकर, सौ.उमा कुडक्याल व रमाकांत म्हैसूर यांचे उत्तम सहकार्य लाभले याबाबत या सर्वांचे आभार मानतो. विभागीय संपादक डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ.संजय लांडगे आणि डॉ.ॲनी जॉन यांनी विदयार्थीनींकडून साहित्य जमा करुन घेणे ते संपादन करणे आणि दुरुस्त्या करणे इ.बाबतीत परिश्रम घेतले.

पद्मप्रतिमा या वार्षिक अंकाची मांडणी व सजावट आकर्षक व देखणी व्हावी याबाबतीत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचे उत्तम मार्ग़दर्शन लाभले. ओम प्रिंर्टीग ॲन्ड ग्राफिक्सचे रामगोपाल म्याकल यांनीही हा अंक वेळेत आणि उत्तमरित्या तयार व्हावा यासाठी प्रयत्न केले. यामुळेच पद्मप्रतिमा हा वार्षिक अंक वेळेत व आकर्षक झाला आहे.

डॉ. टी. एन. शिंदे
कार्यकारी संपादक

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

महाविद्यालय विकास समिती - २०१७- १८

अ.क्र.	नांव	पदनाम
१.	श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी	अध्यक्ष
२.	श्री. दशरथ नारायण गोप	सदस्य
३.	प्रा. डॉ. श्री. तुकाराम नारायण शिंदे	सदस्य
४.	प्रा. डॉ. श्री. शिरीष नागनाथ भोसले	सदस्य
५.	प्रा. डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	सदस्य
६.	प्रा. डॉ. श्री. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	सदस्य
७.	श्री. व्यंकटेश मल्लेशम गाजुल	सदस्य
८.	श्री. दिनेश भुमय्या यन्नम	सदस्य
९.	श्री. श्रीनिवास नरसय्या आकेन	सदस्य
१०.	सौ. मिनाक्षी दत्तात्रय मेडपल्ली	सदस्य
११.	श्रीमती सुलोचना व्यंकटेश गुंडू	सदस्य
१२.	प्रा. डॉ. सौ. अॅनी जॉन	सदस्य
१३.	कु. सोनाली ऐजिनाथ पवार	सदस्य
१४.	प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे	सचिव

संशोधन केंद्रातील पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे

अभिनंदन

सचिन भारत चौधरी

• मार्गदर्शक •
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
A Study on Assessment of Poverty Allegation and Employment Generation Programmers in Solapur District

सुनिल तुकाराम मोरे

• मार्गदर्शक •
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
A Study of Best Business Pratice Used by Organized Retail Sector to Attract and Retain Customer with Special Refreence to Solapur District

सुप्रिया बजरंग शिंदे

• मार्गदर्शक •
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
A Study of Problems and Prospects of Leather Footwear Industry In Kolhapur City

कविता दत्तात्रय मुरुमकर

• मार्गदर्शक •
डॉ. श्रृती वडगबाळकर

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
मराठी कवितेतील
मिथक

गुलरेज शौकतअली मक्री

• मार्गदर्शक •
डॉ. ॲनी जॉन

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
Unveling the Purdah : A Critical Study of Imitiaz Darker's Poetry

विजय नागनाथ म्हमाणे

• मार्गदर्शक •
डॉ. ॲनी जॉन

• पी.एच.डी.संशोधनाचा विषय •
An Exploration of the History, Myths and Landscape in the Selected Poems of Seamus Heaney

श्रीनिवास नरसिंग बोगम

- सोलापूर विद्यापीठ आयोजित संशोधन, अविष्कार महोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक
- महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी. राज्यस्तरीय संशोधन, अविष्कार महोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक

• राष्ट्रीय सेवा योजना विभाग - २०१७-१८ •

कु. गंधले भंजुषा महिनाथ
बी. कॉम. भाग - २.

- सन- २०१७-१८ रासेयो नियमित कार्यक्रम उत्कृष्ट स्वयंसेविका
- दि. ०१ ते १० जून २०१७ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय आव्हान शिबीरात सहभाग.
- दि. १८ जानेवारी २०१८ सुवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग.
- दि. १३ ते १८ फेब्रुवारी २०१८ किनवट जि. नांदेड येथे आयोजित रासेयो राष्ट्रीय एकात्मता राष्ट्रीय शिबीरात सहभाग.

कु. कामले जुल्फिना नासिर
बी. ए. भाग - २..

- दि. १८ जानेवारी २०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय शिबिरात सहभाग.
- दि. सन - २०१७-१८ रासेयो विद्यार्थीनी प्रतिनिधी

कु. कोळी रुक्मिणी अंबादास
बी. ए. भाग - २..

- दि. १८ जानेवारी २०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय शिबीरात सहभाग.
- दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०१८ दरम्यान नांदेड येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय उत्कर्ष शिबीरात सहभाग.

कु. पवार सोनाली रेजिनाथ
बी. कॉम. भाग-३.

- दि. १२ ते १६ जानेवारी २०१८ दरम्यान जयपूर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी सोलापूर विद्यापीठ संघात सहभाग.

कु. बोल्ल पूजा बाळकृष्ण
बी. ए. भाग - ३.

- सन २०१७-१८ वर्षातील रासेयो विशेष शिबीर उत्कृर्ष शिबीरार्थी पुरस्कार.

कु. गजेली नविना विवेक
बी. कॉम. भाग - २..

- दि. १० ते १६ फेब्रुवारी २०१८ दरम्यान नागपूर विद्यापीठ येथे आयोजित रासेयो राज्यस्तरीय शिबीरात सहभाग.

कु. धावण अपर्णा नंदकिशोर
बी. कॉम. भाग - २

- दि. ०७ ते १३ मार्च २०१८ दरम्यान म्हसकळ (कल्याण) येथे आयोजित रासोयो राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीरात सहभाग

कु. कांबळे रमा जानप्पा
बी. ए. भाग - २

- दि.०५ ते ०९ मार्च २०१८ दरम्यान चिखलदरा (अमरावती) येथे आयोजित रासेयो राष्ट्रीय साहसी क्रिडा शिबीरात सहभाग

कु. म्हेता अनिता अशोक
बी. कॉम. भाग - २..

- दि. ०९ ते १८ मार्च २०१८ दरम्यान धारवाड (कर्नाटक) विद्यापीठ, धारवाड येथे आयोजित रासेयो राष्ट्रीय एकात्मता शिबीरात सहभाग

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.
विशेष प्राविण्य प्राप्त गुणवंत प्राध्यापक

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

- Principal Dr. Rajendra Shendage has been Conferred the Honorary Degree of 'D.Litt' by University of South America (USA)

सौ. डॉ. भृती वडगबाळकर

- प्रेरणा ज्येष्ठ नागरी संघाकडून 'प्रेरणा महिलारत्न' पुरस्कार प्राप्त
- अखिल भारतीय साने गुरुजी कथामला कडून 'ए.पी.जे. अब्दुल कलाम' गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राप्त
- 'देवी माहात्म्य' पुस्तक प्रकाशित

डॉ. अॅनी जॉन

- **Nominated /Elected :-**
  a. Elected as Board of Studies (English) Chairman For the Second time, in Solapur University, Solapur
  b. Nominated as Chairman Lapses Committee, Solapur University, Solapur
- **Books Published :-**
  a. **Golden Petals :-** Compulsory English Text Book, Prescribed by Solapur University, Solapur for B.A./B.Com./B.Sc- I Year
  b. **Gems of Wisdom :-** Compulsory English Text Book, Prescribed by Solapur University, Solapur for B.A./B.Com.- II Year
  c. **Blossoms :-** Reference book of Optional English for B. A. - I
  d. **Aroma :-** Reference book of Optional English for B. A. - II

डॉ. शिवानंद भांजे

- सोलापूर विद्यापीठ वाणिज्य विभाग अकौटंन्सी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड

डॉ. शिरीष भोसले

- पंजाबराव देशमुख विद्यापीठाकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त...
- **A Study on Problem and prospects of Textile Industries in Maharashtra with Reference to Solapur city** या विषयात गुलबर्गा विद्यापीठाकडून पीएच. डी. पदवी प्राप्त....

डॉ. संजय लांडगे

- १. वर्ल्ड ह्युमन राईट्स कौन्सिल सातारा यांच्याकडून समता राष्ट्रीय पुरस्कार-२०१७
  २. डॉ. बी. आर. आंबेडकर युथ फाउंडेशन सोलापूर यांच्याकडून महाकवी वामनदादा कर्डक काव्यपुरस्कार-२०१७
  ३. तीन युगपुरुष व बाबासाहेब तुमच्यासाठी ही पुस्तके प्रकाशित

डॉ. रजनी दळवी (शारीरिक शिक्षण संचालक)

- २०१८ चा एक्सेलेंट असोशिएट प्रोफेसर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त
- सोलापूर विद्यापीठाच्या खो-खो, जलतरण या खेळाच्या निवड समितीच्या चेअरमनपदी निवड
- सोलापूर विद्यापीठाच्या योगासन व क्रिकेट समितीवर सदस्य म्हणून निवड
- महाराष्ट्र राज्य क्रिकेट वेटरन्स असोसिएशन आणि सोलापूर जिल्हा सुपन सेव्हन क्रिकेट संघटनेच्या सदस्यपदी निवड
- सोलापूर विद्यापीठ शारिरीक शिक्षण अभ्यास मंडळावर सदस्यपदी निवड

प्रा. रंजना बनसुडे (सहाय्यक प्राध्यापक)

- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक कडून एम. कॉम. कम्युनिकेशन ही पदवी प्राप्त.

प्रा. डॉ. अशोक एकलदेवी (सहयोगी प्राध्यापक)

- सोलापूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून निवड

डॉ. तुकाराम शिंदे (सहाय्यक प्राध्यापक)

- सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून निवड

प्रा. डॉ. टि. एन. शिंदे (सहयोगी प्राध्यापक)

- सोलापूर विद्यापीठ इतिहास अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड

प्रा. डॉ. शंकर राजे (सहाय्यक प्राध्यापक)

- सोलापूर विद्यापीठ व्यावसायिक अर्थशास्त्राच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड

डॉ. राजेंद्र वडजे (सहाय्यक प्राध्यापक)

- सन २०१६ - १७ वर्षाचा विद्यापीठ स्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून पुरस्कार
- मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री पुस्तक साहित्यसागर प्रकाशन, कानपुर या प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित
- कल्याण येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार राज्यस्तरीय शिबीरात उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्राप्त

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ।।

शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।
शब्द वाटू धन जनलोका ।।

तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।
शब्देचि गौरव पूजा करु ।।

- संत तुकाराम

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
गद्य विभाग				
१.	आजची श्रीमुक्ती चळवळ व त्यापुढील आव्हाने	कु. ममता कोंडा	बी. ए. भाग - ३	०९
२.	आजच्या शिक्षण व्यवस्थेची दशा व दिशा	कु. पुजा तातुरकर	बी. कॉम. भाग - २	१२
३.	महिला आणि राजकारण	कु. पुनम रेपाळ	बी. ए. भाग - ३	१४
४.	आनंदाने जगण्याची साईक स्टाईल	कु. लक्ष्मी रच्चा	बी. कॉम. भाग - १	१६
५.	जाणिव आई - वडिलांची	कु. मृणाली हिबारे	बी. ए. भाग - २	१७
६.	जीएसटी वस्तु व सेवाकर	कु. शिरीषा कंदिकटला	बी. कॉम. भाग - ३	१८
७.	शेतकरी नवरा का नको गं बाई... ?	कु. श्रुती चराटे	बी. ए. भाग - २	२१
८.	बी पॉझिटीव्ह टीम म्हणजे नक्की काय ?	कु. अनिता म्हंता	बी. कॉम. भाग - २	२२
९.	जगी सर्व सुखी असा कोण आहे ?	कु. मंजुषा गंपले	बी. कॉम. भाग - २	२३
१०.	चहा आणि आपले आरोग्य	कु. सोनाली मुनगापाटील	बी. ए. भाग - १	२४
११.	शहिद भगतसिंग आणि दलित	कु. सोनाली जिंदे	बी. ए. भाग - ३	२५
१२.	माझा बळीराजा	कु. तावण्या गोसकी	बी. कॉम. भाग - ३	२९
१३.	भारतीय लोक व राष्ट्रीयत्वाची भावना	कु. सोनाली शिंगे	बी. ए.. भाग - २	३२
१४.	रविवारच्या सुट्टीचे जनक !	कु. रुक्साना शेख	बी. ए. भाग - १	३४
१५.	मैत्रीण	कु. स्नेहा कोमाकुल	बी. ए. भाग - १	३५
१६.	श्री छत्रपती शिवाजी महाराज	कु. भारती धारा	बी. ए. भाग - १	३६
१७.	ओरिसा, कलकत्ता : अविस्मरणीय प्रवास	कु. अश्विनी काशिद	बी. ए. भाग - १	४०
पद्य विभाग				
०१.	प्रेम	कु. पुनम नायकवाड	बी. ए. भाग - २	११
०२.	माती	कु. जमुना पसतादी	बी. ए. भाग - ३	११
०३.	प्रेम	कु. तिक्षी कोकाटे	बी. ए. भाग - २	११
०४.	विनोद	कु. भारती धारा	बी. ए. भाग - १	११
०५.	तरी सांगून जा...	कु. स्नेहल खवले	बी. कॉम. भाग - १	१३
०६.	असे मला वाटते	कु. धनश्री ढवळे	बी. ए. भाग - ३	१३
०७.	जीवन	कु. अर्चना सव्वन	बी. कॉम. भाग - २	१३
०८.	आपणांस माहिती आहे का ?	कु. रुपा माततुमकर	बी. कॉम. भाग - १	१४
०९.	जीवनात काय करावे ?	कु. मिनाक्षी काडा	बी. कॉम. भाग - १	१४
१०.	क्षण	कु. सोनाली तुम्मा	बी. ए. भाग - ३	१५
११.	आयुष्य	कु. सुवर्णा चौनुले	बी. ए. भाग - २	१५
१२.	वेळ	कु. पुजा तातुरकर	बी. कॉम. भाग - २	१५
१३.	हे पाऊसा असा कसा रे तू	कु. सुवर्णा चौनुले	बी. ए. भाग - २	१५
१४.	कुणीतरी असावं	कु. सोनाली शिंदे	बी. ए. भाग - २	१६
१५.	मैत्री	कु. तुळशी जाधव	बी.कॉम. भाग - २	१६
१६.	पाऊस	कु. जमुना पसतादी	बी. ए. भाग -३	१६
१७.	देशभक्ती	कु. ममता कोंडा	बी. ए. भाग -३	१६
१८.	काहीच कळत नाही	कु. पुजा तातुरकर	बी. कॉम. भाग - २	१७
१९.	माय असतं आईचं	कु. अमृता ढेपे	बी. कॉम. भाग - २	१८
२०.	तुझे प्रेम	कु. किर्ती चाटला	बी. ए. भाग - २	१८
२१.	मन माझे	कु. संजना सरवदे	बी. ए. भाग - २	१९
२२.	भेट	कु. वैष्णवी साळुंके	बी. ए. भाग - २	१९
२३.	तू आहेस म्हणून मी आहे	कु. सोनाली शिंदे	बी. ए. भाग - २	१९
२४.	शेतकरी	कु. वर्षा कांबळे	बी. ए. भाग - ३	५०
२५.	हृदय	कु. सुकन्या मडिवाळ	बी. कॉम. भाग - २	५०
२६.	आयुष्य	कु. तुवर्षा चोनुले	बी. ए. भाग - २	५०
२७.	प्रेम	कु. ममता कोंडा	बी. ए. भाग - ३	५१
२८.	मैत्री	कु. अश्विनी कांबळे	बी. ए. भाग - २	५१
२९.	खुलता पाकळी प्रितीची	कु. सोनाली तुम्मा	बी. ए. भाग -३	५१
३०.	मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात	कु. पुनम दहिहंडे	बी. ए. भाग - २	५१
३१.	शेतकरी	कु. ज्योती मजने	बी. कॉम. भाग -२	५२
३२.	स्त्रियांचं सामर्थ्य	कु. इंद्रजा ताका	बी. ए. भाग - ३	५२
३३.	जीवन	कु. अर्चना सव्वान	बी. कॉम. भाग-२	५२
३४.	बेकारी	कु. वर्षा कांबळे	बी. ए. भाग - ३	५३
३५.	सुगंध आठवणींचा	कु. अमृता ढेपे	बी. कॉम. भाग - २	५३
३६.	फुले	कु. पायल बटाचे	बी. ए. भाग - २	५३
३८.	प्रेम	कु. रविना बद्दू	बी. ए. भाग - ३	५४
३९.	नसीब	कु. पुजा तातुरकर	बी. कॉम. भाग - २	५४
४०.	विनोद	कु. कविता बुचाल	बी. कॉम. भाग - १	५४

आजची स्त्रीमुक्ती चळवळ व त्यापुढील आव्हाने

कु. ममता कोंडा
बी. ए. भाग - ३

स्त्रीमुक्ती चळवळीपुढील आव्हाने हे सर्वात प्रथम आपण जाणून घेतले पाहिजे स्त्री मुक्ती म्हणजे निव्वळ पुरुषांच्या विरुध्द जाणे नव्हे तर पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा असलेल्या विशिष्ट पध्दतीचा विरोध करणारी चळवळ. पूर्वीची जाचक बंधने आज स्त्रियांवर नाहीत. पण याचा अर्थ स्त्री सर्वार्थाने मुक्त झाली असा होत नाही. स्त्री मुक्ती चळवळी ठिकठिकाणी कार्यरत आहेत. ह्या चळवळी शहरापुरत्याच मर्यादित आहेत. ही दलित आदिवासी, शोषित पीडीत स्त्रियांना त्याही खेड्यात राहणाऱ्या स्त्रियांना या चळवळीची सुध्दा कल्पना नाही.

आर्थिक, बौध्दिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रीने शिरकाव केलेला आहे. पुरुषांनी स्त्रियांना मुक्त केले. मोकळीक दिली. स्वातंत्र्य दिले त्यातून त्यांची मानसिकता किमान बदलली आहे. स्त्रियांना मुक्ती हवी कोणापासून मुक्ती हवी. स्त्रियांवरील अन्याय आता थोडा कमी झालेला दिसतो. आता असे कोणतेही क्षेत्र नाही की, तेथे महिला नाहीत. न्यायिक विभाग, महसूल खात्यात महिला आहेत. जिल्हाधिकारी म्हणून काम करणाऱ्या महिला आहेत. पोलीस खात्यात सर्वोच्चपदी महिला आहेत. रिक्षा चालक, टॅक्सी ड्रायव्हर, रेल्वे इंजिन ड्रायव्हर, विमान चालक, बस कंडक्टर तसेच विविध क्षेत्रात अधिकारीपदी, सर्वोच्चपदी पुरुषांची मक्तेदारी असलेल्या ठिकाणी महिलाही अग्रेसर आहेत. एवढेच नाही तर राष्ट्रपती, पंतप्रधान या पदावर स्त्रीया देखील आरूढ झाल्या आहेत.

मग त्या मुक्ती कोणापासून मागतात ? तर यासर्व क्षेत्रात काम करत असताना या दुहेरी भूमिका निभावतात आणि अशा वेळी त्याचं मानसिक खच्चीकरण करण्याचं काम रुढी, परंपरा करत आहेत. परंपरेपासून बळावलेल्या नजरांपासून सासू, सून, नणंद, भाऊ, भावजया त्यांच्या आया इत्यादी छळवादी महिलाकंडून स्त्रीही पुरुषाइतकीच स्वतंत्र आहे.

भारतात १९७५ नंतर स्त्री संघटनांच्या कृतिशील चळवळीना प्रारंभ झाला. मात्र भारताइतकी स्त्री जीवनाची दोन ध्रुवीय चित्रे कवचितच इतरत्र आढळत असल्याने दोन्ही टोकाच्या स्त्रीयांना समतोल मध्याकडे आणण्याची शक्ती असणाऱ्या चळवळी भारतामध्ये रुजू शकलेल्या नाहीत.

स्त्री संघटनांच्या खऱ्या अर्थाने कृतिशील चळवळीची १९७५ ते २००० ही २५ वर्षे होती स्त्रीयांचे प्रश्न, अगणित आणि स्त्री मुक्ती चळवळीची शक्ती मर्यादित भौगोलिक क्षेत्रातल्या प्रश्नांची बांधिलकी जास्त मानणारी त्यामुळे काही विधायक कार्यक्रम हाती घेऊन स्त्रीयांची परिस्थीती सुधारण्यात त्यांनी पावले उचललेली दिसून येतात. स्त्रीमुक्ती संघटनेने स्त्री मुक्तीची ललकारी हे चळवळीतल्या प्रबोधनात्मक आणि गाण्याचे पुस्तक तयार केले.

स्त्री मुक्ती संघटनेने प्रेरक ललकारी हे मुखपत्र सुरु

केले. स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, दारिद्र्य, बेकारी, हिंसा, कुटुंब नियोजन स्त्रीविषयक कायदे आणि पर्यावरण हे विषय त्यात प्रामुख्याने छापले जात. दृश्य माध्यमे ही लिखीत माध्यमांपेक्षा अधिक परिणामकारक असतात. ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आणि त्यासाठी चालणारे विविध उपक्रम यावर या मासिकाचा विशेष भर होता. मिळून साऱ्याजणी हे मासिक ही स्त्री मुक्ती प्रश्नांनाच वाहिलेले असून गेली चौदा वर्ष स्त्री-पुरुष संवादावर विशेष भर देऊन ते अव्याहतपणे चालू आहे. स्त्रियांच्या जीवनात सकारात्मकता आणणे स्त्रीयांची एकजूट घनिष्ठ करणे., विविध प्रांतातील स्त्रियांमध्ये सवांद प्रस्थापित करणे. त्यातून वर्ग धर्म जाती भेदमुक्त करणे, मनोरंजनाच्या माध्यमातून स्त्रियांच्या समस्या पृष्ठस्तरावर आणि उद्दिष्टये ठेवून गीत, नाट्य, नृत्य, चित्रकारी अशी विविध सत्रे आखली होती. महिलांच्या शक्तीच्या पारंपारिक स्त्रोतावर लक्ष केंद्रीत करुन दुर्गा, चंडी, काली या शक्तीमान देवतांच्या प्रतिमांचे आणि कर्तृत्वाचे पुनरुज्जीवन करु आधुनिक स्त्रीला तिच्या अंगातील स्त्री शक्तीची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न या दशकात (१९९० ते २०००) झाला. महाराष्ट्रात ही जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई अनेक ठिकाणी राणीलक्ष्मीबाई व्याख्यानमाला आयोजित झाल्या. तसेच स्त्रीमुक्ती पराक्रमी ऐतिहासिक स्त्रियांच्या आयुष्यावर अनेक ठिकाणी व्याख्यानमाला आयोजित झाल्या. तसेच स्त्रीमुक्ती प्रश्नावर लोकांमध्ये प्रबोधन करण्यासाठी गणेशोत्सव किंवा तत्सम प्रसंगी तरुण - तरुणांचे मत समजण्यासाठी प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या आहेत.

स्त्रियांना समतोल मध्याकडे आणण्याची शक्ती असणारी चळवळी भारतामध्ये रुजू शकलेल्या नाहीत. तरीही खऱ्या अर्थाने पुरोगामी कुवत अनुसरणाऱ्या प्रथा - परंपरा-सण रितीरिवाज अंधपणे न अनुसणाऱ्या आणि निदान आपल्या वैयक्तिक आयुष्यात चांगल्या अर्थाने परिवर्तन घडवून आणणाऱ्या अनेक स्त्रियांचा एक जात धर्म निरपेक्ष ' आधुनिक' दृष्टिकोन तयार झाला.

'स्त्री शिकली तर आमची कुटूंबव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त होईल असे कुजकट विचार स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत अग्रेसर असलेल्या एका राष्ट्रीय पुढाऱ्यांने व्यक्त केले होते. त्यामुळे केवळ समाजच नाही तर समाज जागरणाची धुरा ज्यांच्यावर आहे. अशी पुढारलेली माणसे देखील महिला बद्दल असे प्रतिगामी विचार करीत असल्याने स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवातीपासून अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. आजच्या अत्याधुनिक काळात स्त्री किंबहुना पुरुषापेक्षाही आज ती विविध क्षेत्रात अग्रेसर असली असती. उच्चशिक्षित म्हणून घेतलेल्या समाजातही त्यांनाही त्रास सहन करावा लागत असतो. अलीकडेच नागपूरात पार पडलेल्या महिला क्रांती परिषदेत या विषयावर व्यक्त झालेली चिंता आपण साऱ्यांनाच अतंर्मुख करणारी जशी आहे तशीच ती स्त्री मुक्तीच्या चळवळीला पुढे नेणारी देखील आहे. अगदी पुराणकाळापासून समाजाने स्त्रियांवर दास्यत्व लादले आहे. महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतीमुळे स्त्रीया शिकल्या आणि सबंध देशात स्त्रीमुक्ती चळवळ व्यापक झाली. पण अजूनही स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलत आहे. स्त्री मग ती कुठल्याही जातीची असो तिला हा त्रास होतोच, परंतु दलित समाजाच्या स्त्रीला होणारा त्रास हा तिहेरी स्वरुपाची असतो ती स्त्री आहे म्हणून कुटुंबात होणारा त्रास दुसरा ती दलित आहे म्हणून आणि तिसरा ती गरीब आहे म्हणून जाती व्यवस्थेमुळे भारतात लिंगभेदाचे स्वरुप भिन्न आहे. मात्र सर्वच जाती आणि स्तरातील स्त्रियांना हा छळ सहन करावाच लागतो. पण खेदाची बाब अशी की, स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रश्नावरही जातीभेद आणि वर्णभेद पाळला जातो. त्यामुळे लिंगभेद विरुध्दाच्या चळवळीत समस्त स्त्री वर्ग एकवटु शकत नाही. गडचिरोली किंवा मेळघाटातील आदिवासी स्त्रियांचे प्रश्न स्वतंत्रपणे का चर्चिले जात नाहीत. ही चर्चा केवळ कुपोषण आणि नक्षलवादातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांभोवती फिरत राहते.

समाज कुटुंबात एक पारंपारिक समाजव्यवस्थेत

स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे दिसते की, पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रीचे विविध पातळ्यावर शोषण केले आहे. परंपरेने तिचा 'अबला' हे विशेषण लावले आहेत. ' चूल आणि मूल' हेच तिचे आयुष्यभराचे कायक्षेत्र. तिच्याकडे पाहत असताना न्यूतत्वाच्या दृष्टीकोणातून पाहिले आहे.

'पुरुषाशिवाय तिला पूर्णत्व येवूच शकत नाही. हे तिच्या मनावर वारंवार बिंबवले गेले. यासाठी पुरुषप्रधान संस्कृत धार्मिक ग्रंथाचा आधार घेतला. त्याचे लेखनही पुरुषांनी त्यांच्या सोयीप्रमाणेच केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथामध्ये स्त्रीचे चित्रण सहनशील, सोसिक, ममतेचा सागर अशा रितीने केले गेले. पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वतःचा आवाज व स्वतंत्र अस्तित्व हरवून बसली. आपण जे त्यागाचे कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयात तिला आणले गेले. स्त्रीच्या अगतिकतेचे एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन परिस्थतीत यात बदल होत असल्याचे दिसते.

औद्योगिक क्रांती ही जागतिक इतिहासातील एक महत्वाची घटना आहे. विज्ञानातील विविध शोधांची मालिका चालू झाली आणि त्याचा परिणाम जीवनाच्या विविध क्षेत्रावर पडू लागला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. याच काळात आणखी एक महत्वाची घटना घडली आणि ते म्हणजे स्त्री मुक्ती चळवळ स्वातंत्र्य समता आणि बंधुता ही महान मुल्ये तिने जगाला दिली. परिवर्तनाच्या पहाटेचा उदय झाला. हा मानवी स्वातंत्रच्या जाहिरनामा होता. माणूस हा जन्मापासून स्वतंत्र असतो. त्याला बळाच्या जोरावर कोणीही आपला गुलाम म्हणून ठेवू शकत नाही. या विचाराने प्रेरित होऊन पारंतत्र्यांत खितपत पडलेल्या विविध देशातील स्वतंत्र चळवळींनी जोर धरला.



कु. मिनाक्षी काडा
बी. कॉम. भाग-३

आजच्या शिक्षण व्यवस्थेची
दशा व दिशा

कु. पुजा लातुरकर
बी. कॉम. भाग - २

सुशिक्षित आई ही शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे. हा आपल्या नेत्यांचा अनमोल असा संदेश जगासाठी आहे. कारण ज्या घरातली स्त्री शिकलेली आहे ते घर कधीच अशिक्षित राहणार नाही. तरीपण आजही आपल्या देशातील स्त्री - साक्षरतेचे प्रमाण हे ५०% पेक्षा कमी आहे.

खरे पाहता आज महाराष्ट्र शासनाने मुलींना पहिलीपासून ते पदवीपर्यंत शिक्षणाची मोफत अशी व्यवस्था निर्माण करुन दिली आहे. त्याशिवाय 'सावित्रीबाई दत्तक बालक' योजनेतून तिला शिक्षणासाठी येणाऱ्या इतर खर्चासाठी मदत मिळू शकते. त्यामुळे आज सद्याच्या परिस्थितीत स्त्रियांनी असे कोणतेच क्षेत्र सोडले नाही. ते शहरात असो वा खेडे गावात आज कित्येक स्त्रिया जबाबदारीचे पदे सांभाळात आहेत. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. कर्तृत्वाचे कोणतेही क्षेत्र आज ती हुशारीने सांभाळू शकते ही तिने सिध्द करुन दाखवले आहे. तरीही आपल्या देशातील स्त्री शिक्षणाची समस्या कठीण का झाली आहे ?

'किशोरी प्रशिक्षण' या प्रकल्पामुळे आता स्पष्ट झाले आहे की, स्त्री शिक्षणात अनेक अडथळे आजही उभे आहेत. वर्षानुवर्षे आपल्या समाजात स्त्रीला शिक्षणासाठी विरोधच होता. 'चूल आणि मुल' सांभाळयला शाळेत कशाला जायला हवे अशी मनोधारणा होती. स्त्रीयावर अनेक बंधने आहेत. तिला कोणतेही काम करताना इतरांची अनुमती घ्यावी लागत. तिला स्वतः निर्णय घेण्याची अनुमती नव्हती. परंतु आजचा समाज या वाईट व दुय्यम प्रतिच्या समजुर्तीपासून थोडा-थोडा बाहेर पडत आहेत. तरीही ग्रामीण भागात मात्र हे सर्व अजूनही सुरु आहे.

आजच्या मुली शिकतात आपल्या पायावर उभे राहतात पण पुर्वी मात्र मुलींच्या शिक्षणाबाबत लोकांची फार उदासीनता होती पण केवळ सावित्रीबाईंच्या पुण्याईमुळेच आजच्या स्त्रिया मोठमोठ्या पदावर गेल्या. आपली कामगिरी उत्तम बजावत आहेत. आज अनेक स्त्रिया डॉक्टर, इंजिनिअर, कलेक्टर, शिक्षक, प्राध्यापक, कमिशनर अशा अनेक स्तरावर जाऊन पोहोचल्या आहेत. या सर्वांचे व या स्वातंत्र्यांचे श्रेय केवळ सावित्रीबाईनाच जाते. म्हणूनच आपण त्यांना विद्येची देवता म्हणतो.

मुर्लीचे शिक्षण म्हणजे प्रगतीचे लक्षण हे दाखवून देताना सावित्रीबाईचेच उदाहरण योग्य ठरते. कारण त्यांनी स्वतः शिकून भारतीय स्त्रियांना शिक्षित केले असं म्हणता येईल.

ग्रामीण भागाच्या शिक्षणाचा जर विचार केला तर

तेथील शिक्षणातील जर मुख्य अडचण कोणती असेल तर ती म्हणजे गरिबी, दारिद्र्य, गरीबीमुळे शासनाने दिलेल्या अनेक सोयी सवलती त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यात भर असते ती म्हणजे पालकांच्या अज्ञानाची. आपल्या मुलांना शिकवले तर आपले व त्यांचे भवितव्य बदलेल ही जाणीवच या पालकांना नसते. काहींना जाणीव आली तरी परिस्थिती त्यांना अगतीक करते. उदरनिर्वाहसाठी त्यांना दिवसरात्र राबावे लागते. आई बाबा कामावर गेल्यावर लहान भावंडांना सांभाळायची जबाबदारी मोठ्या भांवंडावर विशेषतः मोठ्या मुलींवर येवून पडते. काही ठिकाणी घरातील खर्च भागवण्यासाठी मुलींनाही अशा विविध कामांत गुंतावे लागते. या गुंतलेल्या मुली शिक्षणापासून वंचित राहतात. आता बालकामगार विरोधी कायदाही झाला आहे. पण तेवढ्याने प्रश्न सुटेल का ?

मुलींना शिकवण्याचा मुद्दा आला की मुलीपेक्षा मुलाला शाळेत पाठवण्याला प्राधान्य मिळते. कारण तो वंशाचा दिवा असतो. याशिवाय शाळेत जाणाऱ्या मुलींना समाजकंटकापासून होणारा त्रास, शाळा दूर असणे याही गोष्टी स्त्रीशिक्षणाच्या आड येतात, काही कुटुंबे पोटासाठी गावोगाव हिंडत असतात मग त्यांच्या मुलांना शिक्षण कोठून व कसे मिळणार ? म्हणून त्यांच्यासाठी सरकारने अनेक योजना अस्तित्वात आणल्या आहेत. त्यापैकी ' शाळा तुमच्या दारी' फिरत्या शाळा अशा काही मार्गांनी या समस्या सोडण्याचा प्रयत्न काही सामाजिक संस्था करत आहेत. पण ते प्रयत्न अपुरेच पडतात.

आजच्या समाजातल्या शिकलेल्या स्त्रिया पाहिल्या तर दिसून येते की, काम करणाऱ्या शिकलेल्या स्त्रिया आपल्या घराबरोबर ऑफिसातले काम देखील व्यवस्थितरित्या सांभाळतात. तसेच घरी आल्यावर त्या आपल्या मुलांचा अभ्यास घेतात मुलांना शिक्षणांत हुशार करण्याचा प्रयत्न करतात. कारण तिच्या शिकवण्यात केवळ अभ्यास नसून त्यांना माया, प्रेम देखील दिसते. त्यामुळे मुले शिक्षणात प्रगती करतात.

ज्या हाताने स्त्री पाळणा हलवू शकते त्याच हाताने संपूर्ण देशाला हलवण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. आजची स्त्री डॉक्टर, कलेक्टर, राष्ट्रपती, संरक्षण दल, पोलीस दल, प्राध्यापक, गायक, पी. एस.आय. अशा अनेक मोठमोठ्या पदावर गेली आहे व पुरुषांच्या तुलनेत स्त्रियाच पुढे आहेत. प्रत्येक क्षेत्रात त्या पुढे व त्याच देशाच्या विकसासाठी हातभार लावतात. शिक्षण क्षेत्रातही स्त्रिया पुढे आहेत आणि आपल्या जीवनात येणाऱ्या कोणत्याही कामाला यशस्वीरित्या पुढे नेण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये आहे. अशा कर्तबगार स्त्रीयांचा देशाला अभिमान आहे. कारण स्त्रिला मिळालेले ज्ञान इतरांना देण्यासाठी ती सतत प्रत्यत्नशील असते. त्यातूनच इतरांना त्या ज्ञानाचे ज्ञान होते.

जो पर्यंत स्त्रिया साक्षर, सुशिक्षित होत नाहीत तोपर्यंत समाज निकोप होणार नाही समाजाची प्रगती होणार नाही कारण अज्ञानातून अंधश्रध्दा अविवेक या गोष्टी येतात. म्हणूनच जोतीराव फुले सांगतात की,

'' विद्येविना मती गेली । मतीविना निती गेली ।।
नितीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ''

महिला आणि राजकारण

कु. पुनम रेपाळ
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

राजकारणात महिलांचा सहभाग आता वाढतो आहे. पुरुषांच्या आधाराने निर्णय न घेता ती स्वत: निर्णयक्षम बनत आहेत. राजकीय वर्तुळात असलेल्या व्यक्तिंनी महिला बाबत आक्षेपार्ह विधान करण्याच्या घटनाही गेल्या वर्षभरात घडल्या. याचा परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेवर होतो हे अनेकदा विसरलं गेलं. महिलांचा राजकारणातील सहभाग आणि महिलांवरुन झालेलं राजकारण अशा काही घटनांचा हा आढावा.

स्त्री या या मुळातच नाजुक हळूवार, कोमल संवेदनशील असतात. राजकारण हे स्त्रियांचं क्षेत्रच नाही. अशा काही संकल्पना आपल्या समाजातल्या बहुसंख्य लोकांमध्ये रुढ आहेत. त्यामुळे राजकारणात महिलांना समान स्थान मिळणं अजुनही शकय झाल नाही. मात्र हे प्रमाण वाढण्याच्या दृष्टीने होणार संक्रमण हे निश्चितच आशादायी आहे. नुकत्याच झालेल्या बिहारच्या निवडणुकांमध्ये मतदारांच्या रुपात महिलांचा वाढलेला टक्का अश्वस्त करणारा आहे. एक स्वतंत्र राजकिय समज घेऊन वावरणारी स्त्री रोजच्या जगण्यातही हक्कांबाबत जागरुक असण्याच्या शक्यता वाढवते हे नक्की.

राजकारण म्हणजे सार्वजनिक निर्णय प्रक्रियेवर प्रभाव पाडणं निवडून गेलेले लोकप्रतिनिधी कायद्याच्या माध्यमातुन सार्वजनिक निर्णय घेतात. सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधींचा या निर्णयावर विशेष प्रभाव असतो. कायदयाची आणि योजनांची अमलबजावणी करत असताना शासनातील लोक सर्वांसाठी निर्णय घेत असताना हे निर्णय घेणं म्हणजे राजकारण आहे. महिला आरक्षणाचा कायदा आणायचा की नाही हे राजकारण असतं. महिलांना गरोदरपणाच्या काळात पगारी रजा मिळावी किंवा नाही हेही राजकारण आहे. लग्नासाठी मुलामुर्लीच वय काय असावं वडीलांच्या संपत्तीत महिलांचा वाटा असावा की नाही, हे सर्व निर्णय घेणं वा न घेणं राजकारण आहे.

सार्वजनिक निर्णय घेण्याच्या म्हणजेच राजकारण करण्याच्या प्रक्रियेत कायदेमंडळाचा सहभाग असतो. कायदे करण्याच्या, निर्णय घेण्याचा अधिकार संसदेपासून ते ग्रामपंचायतीपर्यंतच्या ग्रामसभेला असतो. याशिवायही एक राजकारणाचं क्षेत्र असतं. इथे प्रत्यक्ष निर्णय घेतले जात नाहीत, मात्र निर्णय घेणाऱ्या क्षेत्रातील लोकांना निर्णय घेण्यास भाग पाडलं जाऊ शकतं हे क्षेत्र म्हणजे संघटनाचं किंवा चळवळीचं क्षेत्र होय.

इ. स. २०१४ मध्ये बहुमताने निवडून आलेल्या सरकारची प्रचारादरम्यान बहुत हुआ नारी पर वार, अब की बार मोदी सरकार अशी घोषणा होती. सत्तेत आल्यानंतर या नारीला सत्तेत आणि सत्ताधाऱ्यांच्या धोरणात कोणतं स्थान आहे हे तपासून पाहणं गरजेचं आहे. गेल्या वर्षभराचं राजकारण, राजकारणातील महिला, महिलासाठीचं राजकारण समजून घेताना काही गोष्टी ठळकपणे जाणवतात. समजून घेणं महिलांच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक विकासाच्या वाटचालीत मार्गदर्शक ठरेल. यासोबतच पुरुषांच्या दृष्टीनेही ही बाब खूप महत्वाची आहे. मानवी समाज हा महिला, पुरुष यांचा एकत्रित मिळून असतो.

राजकारण आणि महिला :

महिलांना गृहमंत्री म्हटलं जातं, कारण ती घर सांभाळते. तिला चूल आणि मुल सोडून बाहेरच्या जगात संधी मिळाली नाही,

किंबहुना ती जाणीवपूर्वक दिली गेली नाही. महिलांनी आपल्या क्षमतांचा वापर करण्यासाठी घराबाहेर पडून काम करण्याची गरज आहे. राजकारणात आल्याने महिला ग्रामपंचायत सदस्याच्या कुंटूबांला जातपंचायतीने वाळीत टाकल्याचा प्रकार दौंड तालुक्यातील पारगावात झाला होता. उल्हास मोरे यांची पत्नी अनिता मोरे यांची पारगाव ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून निवड झाली. पण महिलांनी राजकारणात पडू नये असा आक्षेप घेऊन जातपंचायतीकडून त्यांना वाळीत टाकण्यात आलं या पार्श्वभुमीवर महिलाचं प्रतिनिधीत्व तपासणं आवश्यक आहे.

लोकसभा :

इंटर-पार्लमेंट युनियन या संस्थेच्या (नोव्हेंबर २०१५) १४० देशांच्या पाहणीनुसार राजकारणातील महिलांच्या प्रमाणाबाबतीत भारताचा क्रमांक १०६ वा आहे. लोकसभेत ५४३ पैकी ६५ म्हणचे १२.० टक्के आणि राज्यसभेत २४३ पैकी ३१ म्हणजेच १२.८ टक्के असं महिलांच प्रमाण आहे. भारताच्या शेजारील देशांची आकडेवारी पाहिली तर अविकसित समजले जाणारे देशसुध्दा भारताच्या पुढे आहेत. नेपाळचा क्रमांक ३८ वा आहे. चीनचा ५६ वा तर पाकिस्तानचा ६५ वा आहे. म्हणजेच या देशातील राजकारणात महिलांच्या सहभागाचं प्रमाण आपल्यापेक्षा किती तरी जास्त आहे. जागतिक स्तरावरही महिलांच्या राजकारणातील महिलांच्या सहभागाचं सरासरी प्रमाण २२.६ टक्के इतके आहे. आशियाई देशांची एकत्रित टक्केवारी १८.४ टक्के इतकी आहे. खांडा, बोल्विया आणि क्युबा या देशातील राजकारणात महिलांच प्रमाण सर्वाधिक आहे.

१६ व्या लोकसभेसाठी एकुण ५३८० उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी महिलांचे प्रमाण फक्त ४०२ म्हणजे ७ टक्के होती. २००९ च्या निवडणुकीत ही संख्या ५५० संख्या होती तर सन १९९१ मध्ये ६०० होती. दीड दशकात निवडणुक लढवणाऱ्या महिलांची संख्या घटत घटत १२ टक्क्यांवरुन ७ टक्क्यांवर आली. महिलांच्या राजकारणातील सहभागाबद्दल सर्वपक्षीय एकत्र आहेत. ४०२ महिला १६ व्या लोकसभेची निवडणुक लढल्या, त्यातील १२५ महिला अपक्ष होत्या.

चळवळीतील महिला :

सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक आणि राजकीय या सर्व स्तरांवर जागरुकता निर्माण होण्यासाठी चळवळीचं राजकारण महत्वाचं असतं. मोर्चे, आंदोलन, घेराव, संप ही चळवळीच्या राजकारणातील साधन. ट्रेड युनियन, शेतकरी समिती, राजकीय पक्ष यांच्या स्वतंत्र महिला शाखा उदयाला आल्या, त्याचप्रमाणे स्वतंत्र, स्वायत्त, बिगर सरकारी संस्था स्त्रियांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात स्थापन झालेल्या दिसतात. बहुतेक स्त्री संघटनांनी आपल्या धोरणाचा भाग म्हणून राजकारणाला आपल्यापासून दूर ठेवल. प्रत्यक्ष निवडणुकीत उतरणं, उमेदवार स्त्रियांचा प्रचार करणं, त्यांना मदत करणं या बाबतीत स्त्रीसंघटना उदासिन राहिल्या. खंर म्हणजे आपल्या मागण्याचा पाठपुरावा करण्यासाठी सत्तेत सहभाग असणं फार महत्त्वाच असतं

मानसिकता, भाषा अणि भाष्य :

आपली भाषा, आपलं साहित्य, आपल्या वेगवेगळ्या संस्था बारकाईने पाहिल्या तर या सर्वांचे व्यवहार काहीवेळा सुप्त आणि काहीवेळा दृश्य स्वरुपात या बाई-पुरुषपणाच्या चौकटीतून चालताना आणि नियंत्रित व नियमित होत असताना दिसतात. अनेक पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते, नेते साहित्यक यांनासुध्दा कैकदा याच भान नसतं, तिथे धर्माचं अधिष्ठान असलेलं सरकार पक्ष कार्यकर्ते, संघटना यांच्याकडून कोणती अपेक्षा करणार? गेल्या वर्षभरातील काही विधान पाहिली तर ती पुरुष-सत्ताक मानसिकतेतुन केलेली दिसतात. अशी पुरुषी मानसिकता दर्शवणारी कैक विधान विविध प्रतिनिधीकडून गेल्या वर्षभरात करण्यात आली.

असे हे ही महिला राजकारण.....!

आनंदाने जगण्याची लाइफ स्टाईल

कु. लक्ष्मी रच्चा
बी. कॉम. भाग - १.

रोज सकाळपासून रात्रीपर्यंत धकधकीचे कष्टमय आयुष्य जगताना एकदा तरी प्रसन्न चेहऱ्याने आपण कुंटूबासमवेत आनंदाने गप्पागोष्टी करीत सहभोजनांचा आनंद घेतो आहोत. असे आठवड्यातून एकदा होत असेल तरी आपण लकी असाल. कारण :- इतकासा आनंदही मिळणे अनेकांना अवघड होत आहे. आपली लाइफस्टाईल बदलली आहे काय? आपण बदललो आहोत काय? की भवतालचे वातावरणाच असे बनते आहे. पण जे आहे ते वास्तव आहे. यातुन मार्ग काढणे आता गरजेचे झाल आहे. आपण आपली लाइफस्टाईल बदलून ती आनंदी करु शकतो.

* थोडे विचार बदला :-

रोजच्या नियमित कामातून वेळ काढून आपण आपली लाइफस्टाइल आनंद पध्दतीची करु शकतो. फक्त विचारात जरा बदल करुन हे शक्य होऊ शकेल. खूप जण चांगल्या घरात राहत असतील, उत्तम पेहराव, खुप मित्र मंडळी असतील पण तेवढेच पुरेसे असेल काय? नाही. खुश असणारे लोक आपल्या राहणीमानासाठी जेवढे खर्च नाखुश लोक करत असतात.

* प्रवाशी बना :-

शहरातील लोकापेक्षा ग्रामीण भागातील लोक जास्त समाधानी असू शकतात. कारण नैसर्गिक वातावरणात राहून त्यांची वृत्ती अधिक आनंदी बनलेली असते. शहरातील धकाधकीच्या जीवनातून थोडा वेळ काढून आपण पर्यटकासारखे आठवड्यातून पंधरा दिवसातून फिरस्ती केली तर पुन्हा ताजेतवाने होऊ. कधी पर्यटन स्थळ, कधी धार्मिक तर कधी ऐतिहासिक, नैसर्गिक ठिकाणी एक दिवस जाऊन आले तरी आपल्या चित्तवृत्तीत पॉझिटिव्ह बदल होऊ शकतात.

* कला अंगीकारणे :-

रोजच्या कामाचे बस्तान बसलेले असते. त्यातून स्वत:साठी वेळ काढणेही केव्हा केव्हा जमत नाही. अशा वेळी एखादी कला, एखादा वादन प्रकार आपण शिकून घेतले तर ताणतणावातून मुक्त होण्यासाठी ही कला आपल्याला उपयुक्त ठरु शकते. पेटिंग, फोटोग्राफी करणे, ओरोगामी छंद, गिटार वादन, पेटी वादन, अगदी गाण्याचा रियाज,किंवा आवडीचे काम करणे, स्विमिंग, सायकलिंग करणे इत्यादी छंद जोपासणे यातूनही आपण आनंद मिळवू शकतो.

* कुंटूबाला वेळ देणे :-

ताणतणावाच्या वेळी आपण कुंटूबाला वेळ देणे हा एक उत्तम पर्याय होऊ शकतो. यातून आपल्या कुंटूबातील सदस्यांची आपले नाते अधिकच गहिरे होईल. जीवनीतील खरा आनंद ज्यांच्याबरोबर आपल्याला घ्यायचा आहे, त्या यादीत आपल्या परिवारातील सदस्याचे नावचं अग्रस्थानी असले पहिजे. यासाठी कुंटूबासमवेत वेळ जास्तीत जास्त घालविला पाहिजे. आनंदी लाइफस्टाइलसाठी हे सर्वात महत्त्वाचे ठरते.

* वाचन - लेखन :-

आपल्याला वाचनाच्या किंवा लेखनासाठी अधिक वेळ देता आला पाहिजे. सहित्य, पुस्तक वाचनातून विविधांगी अनुभवांचे भांडारच आपल्यापुढे येते. ही पुस्तके प्रेरणा देतात. ऊर्मी देतात, नव्याने जगण्याचे सूत्र शिकवतात.

* संगीत :-

संगीत हे जीवनातील सर्वात आनंददायी माध्यम असते. ज्या व्यक्ती संगीत किंवा यासारख्या कलांची जोपासना करतात. त्या व्यक्ती जीवनाकडे अतिशय सकारात्मक दृष्टीने पाहात असतात. जीवनातील प्रत्येक घटकांला संगीताची जोड देता आली पाहिजे. त्याकडे त्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

चलो, मुस्कराने
की वजह ढुंढते है.....

आपले अनुभव आपला आनंद आणि आपण पाहिलेले नवे काही इतरांना शेअर करण्यासाठी आपण नेहमीच उत्सुक असतो. नवे जग आपल्या नजरेतून पाहणे आणि हा आनंदाचा क्षण शेअर करणे प्रत्येकालाच जमते असे नाही पण प्रत्येकजण या अनुभवातून जात असतोच.

जिंदगी की दौंड में, तजुर्बा कच्चा ही रहा गया
हम सिख न पाये फरेल और दिल बच्चा ही रहा गया
बचपण में जहाँ चाहा हँस लेते थे
जहाँ चाहा रो लेते थे
पर अब मुस्कान को तमीज चाहिये
और आसुंओ को तनहाई
हमी भी मुस्कराते थे कभी बेपरवाह अंदाज से
देखा हैं आज खुद को कुछ पुरानी तस्वीरो में
चलो मुस्कराते की वजह ढुंढते हैं
तुम हमे ढुंढो, हम तुम्हे ढुंढते हैं.

आज छोट्या-छोट्या गोष्टीतील आनंद मिळवण्याची गरज आहे. सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असणाऱ्या या युगात लहान सहान आनंदापासून आपण सारेच जण मुक्त आहोत. धकाधकीच्या जीवनामुळे हा आनंद आपल्याला घेता येत नाही. पण तरी ही छोटे-मोठे आनंद मिळवण्याचा प्रयत्न आपण केला तर उत्तम लाइफस्टाइलने आपण जगू शकतो.

जाणिव आई- वडीलांची

खरं आपल्या देशत प्रगती होत आहे का
आजकालच्या तरुणांना आपले आईवडील नको का
मी बगितलेली कथा सांगते
आई-वडीलांचे दु:ख कवितेतून मांडते
आई-वडील मुलासाठी कष्ट करत होते
त्याला पोटभर अन्न मिळावं यासाठी ते उपाशी राहत होते
एक नाही दोन नाही चार-चार दिवस ते उपाशी रहायचे
आपले दिवस ते पाण्यावर काढायचे
सतत त्या मुलांचा विचार करायचे
त्याला शिकवून मोठे करायचे हेच स्वप्नं पहायचे
पण आई-वडीलांचे प्रेम त्या मुलांला कळलेच नाही
ते आपल्यासाठी राबतात हे त्याला समजलेच नाही
तो मुलगा मोठा झाला
आई-वडीलांच्या जिवावर बसून खायला लागला
आरामाशिवाय दुसरे कोणतेही काम करत नव्हता
व तो मुलगा नंतर आई-वडीलांना मारायला लागला.
व्यसनात पूर्णपणे बुडून गेला होता
आपल्याचं आई-वडीलांना ऐके दिवशी घराबाहेर काढला.
बिचारे आई-वडील दारोदार फिरु लागले
आजारामुळे ते कोठेपण काम करेनासे झाले होते.
आई-वडील शेवटचे क्षण जगण्यासाठी
दारोदार भिक्षा मागू लागले
यावरुन समजते की आपल्या देशात
किती प्रगती झाली आहे.
ही आजकालची पिढी
आई-वडीलांची मान न राखणारी आहे
या समाजात निर्माण झाली आहे.

संकलन - **कु. मृणाली हिवारे**
बी. ए. भाग - २

जीएसटी
वस्तु व सेवाकर



कु. शिरीषा कंदिकटला
बी. कॉम. भाग - ३

जीएसटी (Goods & Service Tax) ही एक अप्रत्यक्ष कर प्रणाली आहे. (Indirect Tax) ही कर वस्तूचे उत्पादन विक्री, आयात आणि सेवा या सर्वांवरील राष्ट्रीय पातळीवरील सर्व समावेशक अप्रत्यक्ष कर आहे. केंद्र सरकार आणि राज्यसरकार जे निरनिराळे अप्रत्यक्ष कर लावतात. त्या सर्व करांची जागा जीएसटीने घेतली आहे.

राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि नरेंद्र मोदी यांच्या उपस्थित ३० जून रोजी मध्यरात्री संसदेत आयोजित केलेल्या विशेष सोहळ्यात याबाबत घोषणा करण्यात आली. ही भारतातील सर्वांत मोठी आर्थिक सुधारणा आहे. वन नेशन वन टॅक्स (एक देश एक कर) या संकल्पनेवर जीएसटी आधारित आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या वेगवेगळ्या कर प्रणालीना जीएसटी हा एक पर्याय आहे. जीएसटीची जम्मू काश्मीर वगळता देशातल्या सर्व राज्यांमध्ये १ जुलैपासून अंमलबजावणी सुरु झाली. जीएसटी मध्ये ०%, ५%, १२%, १८%, २८% कर अशा पाच टप्प्यांमध्ये कर रचना करण्यात आली आहे. कर आकारणीसाठी जीएसटी मंडळ स्थापन करण्यात येईल. त्याचे अध्यक्ष केंद्रीय अर्थमंत्री असतील व सदस्य अर्थ राज्यमंत्री असतील. कुठल्याही एका राज्याचे अर्थमंत्री उपाध्यक्ष असतील तर इतर राज्यांचे अर्थमंत्री सदस्य असतील.

जगभरातील अनेक देशांमध्ये जीएसटी ही कर प्रणाली अस्तित्वात आहे. फ्रान्स या देशात सर्वांत पहिल्यांदा जीएसटी कर प्रणाली लागू करण्यात आली होती. मलेशिया, ऑस्ट्रोलिया, न्युझीलंड, कॅनडा चा देशांनीही ही कर प्रणाली लागू केली आहे.

जगभरात सध्या ५ ते २५% कर आहे. १५० देशात लागू आहे. परंतू सर्व ठिकाणी वेगवेगळा आहे. त्यामध्ये जपान ५%, ऑस्ट्रोलिया १०%, सिंगापूर ७%, कॅनडा ५%, जर्मनी १९%, पाकिस्तान १८%, फ्रान्स १९.६%, न्युझीलंड १५%, स्वीडन २५%, यामध्ये सर्वात कमी कर हे जपान व कॅनडाचा दर हे ५% आहे. आणि सर्वांत जास्त कर हे स्वीडन या देशाचा दर २५% आहे.

जीएसटी ही कर प्रणालीमुळे काही अप्रत्यक्ष कर बंद झाले ते पूढील प्रमाणे

सेंट्रल दर्जाची कर

1) Central Excise Duty
2) Additional Excise Duty
3) Service Tax
4) Surchrge, Education and Secondary Higher Secondary Cess.

स्टेट दर्जाची कर

1) VAT / Sales Tax
2) Purchase Tax
3) Entertainment Tax
4) Luxury Tax
5) Lottery Tax

जीएसटी लागू झाल्यावर फक्त तीन प्रकारचे कर विचारात घ्यावालागेल ते पूढीलप्रमाणे

१) सेंट्रल जीएसटी (CGST)

२) स्टेट जीएसटी (SGST)

३) इंटिग्रेटेड जीएसटी (IGST)

१) सेंट्रल जीएसटी (**CGST**) - Central Goods and Service Tax

२) स्टेट जीएसटी (**SGST**) - State Goods and Service Tax

जेव्हा आपण आपल्या राज्यातून म्हणजेच एकाच राज्यातून खरेदी-विक्री केली असेल तर तेव्हा सेंट्रल जीएसटी आणि स्टेट जीएसटी लागू करावा लागेल आणि त्या एकूण करामधून अर्धा कर सेंट्रल म्हणजेच केंद्रसरकारला आणि अर्धा कर स्टेट म्हणजेच राज्यसरकारला भरावा लागेल. ही कर प्रणाली लागू झाल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारला यातील समान वाटा मिळणार आहे.

उदाहरण :- महाराष्ट्रातच वस्तूची खरेदी-विक्री करणे



३) इंटिग्रेटेड जीएसटी (IGST) -

Integrated Goods andService Tax

जेव्हा आपण एका राज्यातून दुसऱ्या राज्याशी खरेदी-विक्री केला असेल तर तेव्हा इंटिग्रेटेड जीएसटी हा प्रकार लागू करावा लागेल आणि तो पूर्णपणे त्या त्या राज्यसरकारला भरावा लागेल.

उदाहरण : महाराष्ट्र राज्यातील व्यक्ती ही गुजरात राज्यातून एखादी वस्तू खरेदी करुन कर्नाटक राज्यात विक्री करणे होय.



* जीएसटीएन (GSTN) -
Goods and Service Network

जीएसटीएन ही एक बिगर सरकारी ना नफा तत्त्वावर कार्य करणारी संस्था असेल. या संस्थेकडे जीएसटीची सगळी माहिती असणार आहे. स्टॉक होल्डर्स, टॅक्सपेयर्स आणि सरकार या तिघांनाही लागणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा जीएसटीएन पूरवणार आहे. जीएसटीचे रजिस्ट्रेशन, रिटर्न फाईल करणे इत्यादी महत्त्वांचे कामे जीएसटीएन करणार आहे. जीएसटीएनमध्ये केंद्र सरकारचा २४.५% तर राज्य सरकारचा आणि राज्यांच्या वित्त सामित्यांचा २४.५% वाटा असेल. एचडीएफसी आणि आयसीआयसीआय बँकाचा १०-१०% असेल. याशिवाय एनएसई स्ट्रॅटेजिक इनव्हेस्टमेंट कंपनीचा ११% आणि एलआयसीचा १०% वाटा असेल.

* जीएसटीआयएन (GSTIN) -
Goods and Service Tax Identification Number

जेव्हा व्यक्ती कराची नोंदणी करते ते तेव्हा तेव्हा त्या व्यक्तीलो एक स्वतंत्र नोंदणी नंबर मिळतो त्यालाच जीएसटी मध्ये जीएसटीआयएन (GSTIN) नंबर म्हणतात. हा नंबर एकुण १५ अंकी असतो ते पुढील प्रमाणे

27BJPQJ1456L1Z5

गौरव बसंल मो. : ९८८९९१४३९०
: ९४१५५०७३८७
समीर प्रकाशन
विश्वविद्यालय स्तरीय सभी विद्योंकी पुस्तकोंके प्रकाशक एवं विक्रेता
शोरुम : १११/१९, अशोक नगर, कानपूर - २०८०१२
Email - samirprakashan@gmail.com

जीएसटीचे दर : दराचे प्रकार

0%	5%	12%	18%	28%
नैसर्गिक	इडली	मिक्सर	चॉकलेट	ऑटो मोबाईल्स
मध	दोसा	ग्रांइडरचे साहित्य	दुधपेस्ट	मोटार सायकल
ताज्या	बटर	गाडीचे साहित्य	च्युइंगम	
फळभाज्या	सिमेंटच्या	दुग्धजन्य पदार्थ	शॅम्पू	
बेसन	विटा	प्रिंटींग इंक	मार्बल	
प्रसाद	लेदर	शॉपिंग बॅग	सौदर्या	
ब्रेड	पॅकिंग	सेव्हिंग मशिन	प्रसाधने	
मीठ	पदार्थ	बांबू	कॅमेरा	
स्टॅम्प	अगरबत्ती	फर्निचर	काचेच्या	
न्यायालयीन	बॉयोगॅस	ज्युसेस	वस्तु	
कागदपत्रे	पावडर	मोबाईल	रबरी साहित्य	

* जीएसटीचा प्रवास :

जीएसटी हा २००६ ची Concept आहे

01 July 2017 ←
01 July 2017 ←
04 June 2017 ←
13 April 2017 ←
06 April 2017 ←
29 March 2017 ←
04 March 2017 ←
16 Jan 2017 ←
03 Nov 2017 ←
18 Oct 2016 ←
12 Sep 2016 ←
09 Sep 2016 ←
13 Aug 2016 ←
09 Aug 2016 ←
04 Aug 2016 ←
03 July 2015 ←
05 June 2015 ←
06 May 2015 ←
01 April 2010 ←
10 May 2007 ←
28 Feb 2006 ←
2003 ←
17 July 2000 ←

जीएसटीचे (GST) फायदे :

१) कर भरणे सोपे जाईल.

२) कर आकारण्याच्या पध्दतीत सहजता / सुलभता

३) कराची चोरी/कर न भरणे/ कर कमी भरणे, कमी होईल.

४) देशाचे GDP (Gross Domestic Product) वाढेल.

५) प्रगतीचा वेग वाढेल.

६) एक समान दराने कर भरावा लागेल.

७) संपूर्ण देशात एकाच किंमतीला एक प्रकारची वस्तू खरेदी करता येईल.

८) वेगवेगळ्या प्रकारचे कर भरण्यापासून सुटका होईल.

९) व्यवहारात पारदर्शकता येईल.

१०) शिक्षण क्षेत्रालाही जीएसटीच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आल्याने १२ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थाना जीएसटीची झळ बसणार नाही.

शेतकरी नवरा (का) नको गं बाई.....?

कु. श्रुती चराटे
बी. ए. भाग - २

शेतकरी नवरा नशिबात आला म्हणून आयुष्यभर कपाळ बडवत राहणाऱ्या सुवासिनी कमी नाहीत. शंभरात दहा-बारा सोडल्या तर शेतकरी नवरा मिळाल्यानं हातपाय आदळणाऱ्यांची संख्या मोठी, लग्न झालेल्यांची ही तऱ्हा तर लग्नाला आलेल्या उपवर मुलीचा तोरा काय सांगावा. ग्रॅज्युएट वगैरे झाल्यावर लग्नासाठी स्थळ शोधण्याची लगबग सुरु झाली की लाजत मुरडत, सरकारी नोकरीवाला पाहिजे मंबयत किंवा शहरात घर पाहिजे अगदीच नाय जमलं तर प्रायव्हेट कंपनीत रग्गड पगाराची नोकरी पाहिजे. कसलाची चालेल पण शेतकरी नको आशा फर्मोइशीन केल्या जातात. आयबापाचा सुध्दा मुलीचं चांगल व्हावं याकडं म्हणजेच नोकरीवालाचं जावाई शोधण्याकडे कल असतो.

खाद्यावर नांगर घेऊन जाणारा, रानात वावार हाकणारा, गुरं ढोरं सांभाळून घराला दुभत्यानं समृध्द करणारा मातीत राबणारा, जगाच्या अन्नाची भुख भागवणारा मुलगा कुणी सुचवलायं तर नाक मुरडतात. नोकरी धंद्यावाला असला तरी त्याला गावाकडं गुंठावर तरी जमीन हवीच अशा अपेक्षाही केल्या जातात. नोकरीवाल्या मुलाशी लग्न करुन शहरात राहणाऱ्या पोरी रानातली ताजी -भाजी, ताज दुध मिळावं म्हणून प्रयत्न करत राहतात. सुट्टया -पिट्टयाला गावी आल्याचं तर रानात फेरफटका मारण्याचा छंद मात्र जोपासत राहतात. रानात फेरफटका मारायला गेल्यावर रानात राबणारा त्याची बायको त्याच मातीत राबत असते. अख्ख्या शिवारभर मनसोक्त फिरणारी उड्या मारणारी शेतकऱ्यांची पोर, अल्लडपणे डोलणारी पिकं, झाड आणि डोंगराचे फोटो मोबाईल वर काढून तिथल्या तिथं फेसबुक, ट्विटरवर अपलोड केले जातात. सदा हसतमुख सुर्य फुलाबरोबर दात काढतानाचे फोटो क्षणभरात इंटरनेटच्या मायाजालात फेकले जातात. गायी म्हशीची धार काढतानाची उगाच दुधाची एखादी चिळकांडी तोंडावर उडवली जाते अपलोड केलेल्या फोटोंना ढिगभर लाईकस आणि कॉमेट मिळू लागल्यात. शेत आणि वावर हा त्यांच्या पर्यटनाचा विषय बनून राहतो. शेतीचं पर्यटन भावू लागत. पण ती फुलवणारा शेतकरी मात्र आयुष्याचा जोडीदार म्हणून नको असतो. हे गणित नेमंक काय ज्याच त्यांनाच माहीत.

आपण पाण्यात उतरायच नाही अंगाला पाण्याचा एकही थेंबही लागु द्यायचा नाही पण काठावर बसून पाण्यात पोहणाऱ्यांची मजा बघण्याइतकच हे कोरडेपणाच नाही का? शिक्षणातील भलीमोठी पदवी घेऊन एखाद्यांन शेतीतच करियर करायचा निर्णय घेतला तर त्याच्या आई-बापानं पोराचे दोनाचे चार हात पिवळे करताना रानातल्या मातीत माखलेल्या हातांना आपण कुठवर नाकारणार आहोत. अर्धएक आयुष्य जन्मदात्या शेतकरी बापाच्या सावलीत काढणाऱ्या मुलींना पुढच्या आयुष्यात मात्र शेतकरी नवऱ्याची सावली होऊन का राहते.

वॉट्सॲपवर फेसबुकवर बनवणारे श्रीमंत, बिडी, सिगारेट बनवणारे, श्रीमंत मग शेतकरी गरीब का? जगातील सर्व लोकांच्या अन्नाचा पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टाची मात्र आपण कमी किंमत देऊन त्याच्या कष्टाची माती करतो. मग तो कसा काय श्रीमंत होणार असल्या संदेशासह तोंडावर सुरकुत्या पडलेल्या शेतकऱ्याचे निष्पाप निरागस चेहऱ्याचे फोटो फॉरवर्ड करण्याच्या जमाण्यात शेतकरी तरुणांच्या भाळी मुंडावळ्या का नाहीत?

दगाबाजीनं होरपळून वावरात पिकाचं नंदनवन फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या संसारवेलीच हे करपणं कधी थांबणार आहे की नाही?
की शेतकऱ्याच्या अंगणात नातवापोरांनी बागडण्याऐवजी घरातील भांडीकुंडीच आदळतच राहणार, आदळतच राहणार?



कु. अनिता म्हंता
बी.कॉम.भाग - २

बी पॉझिटिव्ह टीम म्हणजे नक्की काय ?

एकदा एक श्रीमंत उद्योगपती एका खेडेगावात कारखान्यासाठी साईट बघायला गेला होता. तेथे खुप चिखल होता. येताना त्या उद्योगपतीची गाडी चिखलात रुतली आणि बंद पडली. त्याला थोड्या अंतरावरुन एक म्हातारे शेतकरी बाबा येताना दिसले. त्याने त्या शेतकरीबाबांना थाबवले, गाडी चिखलात रुतल्याचे सांगत मदत करण्याची विंनती केली. शेतकरीबाबा गाडीजवळ आले. पाहणी केली आणि म्हणाले नामदेवाला म्हणजेच नाम्याला बोलवावे लागेल. उद्योगपती म्हणाले मग बोलवाना तुमच्या त्या नाम्याला ! मी त्याला चांगले बक्षीस देईन, मस्त जेवायला, खायला घालेन, तो उद्योगपती म्हणाला.

अहो नाम्या म्हणजे कोणी माणूस नाही तो एक बैल आहे. मी आता त्याला घेऊन येतो, ते शेतकरी बाबा म्हणाले थोड्याच वेळात नाम्याला म्हणजे त्या बैलाला घेऊन आले. त्या बैलाला दोरीच्या सहाय्याने गाडीला जुंपले आणि म्हणाले हे हरबा खेच ! हे ढवळ्या खेच ! हे नाम्या खेच! हे पवळ्या खेच! त्याबरोबर त्या बैलाने जोर लावून ती गाडी चिखलातून खेचून बाहेर काढली. हे बघून तो उद्योगपती खुश झाला पण त्याला समजेना की, गाडीला एकच बैल जुपलेला असताना त्या बाबांनी चार बैलांची नावे का घेतली? उद्योगपतीने त्याचे कारण विचारले तेव्हा त्या म्हाताऱ्याबुवाने सांगितले.

त्याचे काय आहे हे त्याला माहित नाही मी अजून ती बैलाची नावे घेतली कारण नाम्याला वाटावे की, त्याच्याबरोबर अजून तीन बैल आहेत. म्हणजे तो टीममध्ये काम करतो आहे. म्हणूनच तो त्याची ताकद पणाला लावून सर्वोत्तम काम करुन दाखवतो. साहेब तुमच्या भाषेत याला टीम स्पिरीट म्हणतात. नाही का ? एका पागोटे, मुंडासेवाल्या म्हाताऱ्या शेतकरीबुंवाचे हे बोलणे ऐकून तो उद्योगपती चक्कच झाला.

या कथेतील मतितार्थ कोणतेही काम हे टीम केल्याशिवाय होणे अशक्य जरी असले तरी त्या टीममधील सर्व घटकांनी कोणाचीही वाट न पाहता जर जीव ओतून व जोर लावून काम केल्यास ते कार्य अद्वितीय व चोख झाल्याशिवाय राहत नाही.

जगी सर्व सुखी असा कोण आहे ?

कु. मंजुषा गंपले
बी. कॉम. भाग - २

एका जंगलात एक कावळा राहत होता. आपला दिवस आनंदीने आणि सुखाने घालवत तो आयुष्य काढत होता आपण सर्वात सुखी पक्षी आहोत. असं त्याला वाटायचं आणि त्याच आनंदात तो जगत होता. एक दिवस जंगलातल्या तळ्याकाठी बसला असताना त्याला त्या तळ्यात पोहत असलेला राजहंस दिसला. तो पांढराशुभ्र आणि डौलदार पक्षी पाहून तो थोडा हिरमुसला आणि विचार करु लागला मी असा एकदम काळा कुळकुळीत आणि हा पक्षी एकदम शुभ्र, खरंच हाच जगातला सर्वात सुखी पक्षी असावा. मी उगाचंच स्वत:ला सुखी समजत होतो असा विचार करत तो त्या राजहंसाकडे गेला आणि त्याला आपल्या भावना बोलून दाखवल्या.

तो राजहंसही म्हणाला, खरं आहे मित्रा तुझा मी ही समजत होतो पण एके दिवशी मी एका पोपटाला पाहिलं मला एक रंग आहे. पण त्याला दोन रंग होते. खरंच तो माझ्यापेक्षा सुखी असणार रे. मग हा कावळा पोपटाच्या शोधात निघाला तो पोपट हसत म्हणाला माझाही समज असाच होता. मी स्वत:ला खरंच सुखी समजत होतो. पण एके दिवशी मी एका मोराला पाहिलं आणि मला जाणवलं की तोच सगळ्यात सुखी पक्षी आहे पृथ्वीवर. कारण त्याच्या अंगावर अगणित रंग आहेत. हे ऐकून कावळा अजून संभ्रमित झाला आणि मोराच्या शोधात निघाला. एक प्राणी संग्रहालयात एका पिंजऱ्यात त्याला एक मोर दिसला. शेकडो लोक त्याच्या भोवती गोळा होऊन त्याचं गुणगान करत होते. आता कावळ्याला खात्री पटली की हाच जगातला सर्वात सुखी पक्षी आहे. म्हणून तो म्हणाला मयुरराज आपण खरंच खुप सुंदर आहात, रोज हजारो लोक तुम्हाला पाहायला येतात आणि तुमची स्तुती करतात. तो मोर खिन्नपणे हसत म्हणाला, मलाही सगळ्यात सुंदर आणि सुखी पक्षी असल्याचा अभिमान होता मित्रा पण माझ्या या सौंदर्यामुळे मी पिंजऱ्यात अडकलोय प्राणीसंग्रहालय फिरुन बघ तुला इथे सगळे पक्षी दिसतील पिंजऱ्यात पण कावळा नाही दिसणार कुठे आणि त्यामुळे मी असा निष्कर्ष काढतोय सध्या की कावळा हा सर्वात सुखी पक्षी आहे. कारण तो त्याच्या मर्जीने कुठेही उडू शकतो आणि जावू शकतो. थोडक्यात सांगायचं म्हणजे ऑलवेज बी पॉझिटिव्ह आपल्यातील चांगल शोधा आणि आनंद मिळवा.

चहा आणि आपले आरोग्य

कु. सोनाली मुनगापाटील
बी. ए. भाग - १

जे अति चहा घेतात त्यांच्यासाठी :-

बरेच लोक नुसत्या दुधाचा चहा करतात पण हे आरोग्यास चांगले नाही यामुळे पित्त वाढून डोके दुखी, अपचन, मळमळ, पोटफुगी असे वेगवेगळे आजार होतात. चहा घ्यायचा तर कमीत कमी दूध आणि पाणी जास्त. नाही तर सर्वात बेस्ट ब्लॅक टी, लेमन टी, अद्रक घातलेला चहा प्यावा, चहा प्यावा, चहा नंबर एक गुळाचा चहा (१०० वर्षे जगा पण गुळाचा चहा प्या) ९० टक्के आजार पोटातून होतात. साखरेचा चहा टाळल्यास तुमचे ४५ टक्के म्हणजे पोटाचे निम्मे आजार आपोआप नष्ट होतील.

चहाचे दुष्टपरिणाम :-

* दिवसाला ५ ते १० कप इतक्या प्रमाणात अति उकळलेला चहा पिणारे पचनशक्ती बिघडून आम्लपित्त, अल्सर, सांधेदुखी, अंगदुखी आणि मलावरोध अशा अनेक विकारांना बळी पडतात.

* भारतीयांमध्ये चहात साखर घालण्याचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. त्यामुळे बैठा व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती मधुमेह, कोलेस्टेरॉल, हृद्यविकार आणि स्थौल्य अशा विकारांकडे ओढले जात आहेत.

* दुध-साखरविरहित चहा जरी पुष्काळ प्रमाणात प्यायला, तरी त्याच्या तुरट चवीच्या अतिरिक्त प्रमाणामुळे मलावष्टंभ, रक्तदाब वाढणे, पक्षाघात यासारखे विकार आणि शुक्राणूंची संख्या अल्प होणे असे विकार बळावतात.

* दुध,साखर आणि चहाची भुकटी एकत्र करुन उकळलेला चहा कफ-पित-वात वाढवणारा आणि उष्ण गुणाचा आहे.

* टपरीवर चहा ॲल्युमिनियमच्या भांडयात उकळला जातो. ॲल्युमिनियमच्या धातुच्या खादयपदार्थांना झालेला दीर्घकाळ संपर्क अल्झायमर्स (स्मृतिनाश) सारखा असाध्य विकार निर्माण करणारा असतो.

* चहा दिवसाला २ वेळेस प्यायल्यास (१० रु.चहा असे) वर्षाचे ७२०० रुपये होतात. ५ वर्षाचे ३६००० रुपये होतात.

* भारतासारख्या समशीतोष्ण कटिबंधातील देशात चहा हे कधीही केव्हाही फार प्यायचे पेय नाही.

* चहा चवीला तुरट असल्यामुळे तो बध्दकोष्ठता निर्माण करतो काहीना चहा न प्यायल्यास शौचाला होत नाही हे सवयीमुळे होते. शौचाचा वेग निर्माण करणे हे चहाचे काम नव्हे, चहा रक्ताची आम्लता वाढवतो.

* नियमित चहा पिण्याने डोळे हाडे ठिसूळ होतात. रक्तवाहिन्या आंकुचन पावून रक्तदाब वाढतो आणि आम्लपित्तांचा त्रास वाढतो.

* चहासमवेत आपण काही पदार्थ खातो, त्या पदार्थांमध्ये मीठ असल्यास मिठाचा चहातील साखर व दुधाशी संपर्क आल्यामुळे चहा शरीराला खूपच मारक बनतो.

खरे पाहिले तर चहा दारुपेक्षाही जास्त घातक आहे पण दारु बदनाम आहे चहा नाही.

शहिद भगतसिंग आणि अस्पृश्य



कु. सोनाली जिंदे
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास ज्या महान क्रांतीकारकांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊन शकत नाही असे महान क्रांतीकारक म्हणजे शहीद भगतसिंग ! आजवरच्या भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामधून एक शूरवीर, राष्ट्राभिमानी, त्यागी, बलिदानी क्रांतीकारक इतकीच त्यांची ओळख आपल्याला आहे आणि म्हणूनच त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा आणखी एक पैलू आपल्याला उलगडून दाखविण्यासाठी तसेच तत्कालीन समाजात ज्या वर्गाचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते, अशा शोषित अस्पृश्य यांच्यासंबंधी भगतसिंगानी व्यक्त केलेले विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी हा लेखनप्रपंच !

आपल्याला ज्ञात असल्याप्रमाणे भगतसिंग हे एक क्रांतीकारकच होते पण कमलेश चौधरी यांच्या मते, ते पहिले भारतीय बुध्दीजीवी होते ज्यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक विषगता, धार्मिक कट्टरता, आर्थिक शोषण यापासून भयमुक्त, शोषणमुक्त समाजाचे स्वप्न पाहिले होते आणि त्या दृष्टीने प्रयत्नही सुरु केले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा राजकीय स्वातंत्र्यासाठी राष्ट्रवादी आंदोलने सुरु झाली होती, तेव्हा राजकिय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक समस्यांची देखील भगतसिंग व त्यांच्या साथीदारांनी गंभीर दखल घेतली होती. त्या कालखंडातील ३० कोटी जनतेपैकी ६ कोटी भारतीय जनतेची म्हणजेच एक पंचमाश भारतीय जनतेची जी सर्वात महत्वपूर्ण समस्या होती, ती समस्या म्हणजेच अस्पृश्यता आणि त्या वर्गाचे होणारे शोषण होय ! हीच समस्या भगतसिंगाच्या दृष्टीने देखील अत्यंत गंभीर होती. या १९ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात अस्पृश्य वर्गामध्ये सुरु झालेल्या राजकीय हालचाली भगतसिंगानी ओळखल्या व या हालचालींना आणखी वेग प्राप्त करुन देण्याचा त्यांनी प्रयत्नही केला. याच काळात अस्पृश्यता आणि अस्पृश्य वर्ग यासंबंधी त्यांनी व्यक्त केलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत.

भगतसिंह यांच्या मते, अस्पृश्य वर्गाला जाणीपूर्वक सर्व हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. जे विसावे शतक विज्ञानाच्या प्रसारासाठी प्रसिद्ध आहे त्या शतकातही आपण भारतीय अस्पृश्यांच्या स्पर्शाने धर्म भ्रष्ट होतो असे मानतो, अशा मूर्खपणाच्या गोष्टीवर विश्वास ठेवतो ही त्यांच्या दृष्टीने अतिशय लज्जास्पद गोष्ट होती. ही स्पृश्याअस्पृश्यता हा भेदभाव निर्माण झालाच कसा? यावर भगतसिंहानी खोल चिंतन केले होते. या चिंतनातूनच त्यांनी अछूत समस्या या नावाने एक लेख लिहिला ज्यात त्यांनी असा निष्कर्ष मांडला की, या प्रचलित भेदभावाला आणि अस्पृश्यतेला सनातन धर्माचा पाठिंबा असून कदाचित प्राचीन काळी घडून आलेल्या आर्य आणि अनार्य यांच्या संघर्षातून या भेदभावाची निर्मिती झाली असावी. भगतसिंगाच्या मते आर्याना एका अशा वर्गाची निर्मिती करायची होती, जो वर्ग समाज व मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी पण निम्न दर्जाची, हलक्या दर्जाची कामे करु शकेल, ज्या वर्गावर ही निम्न दर्जाची कामे आपल्याला वंशपरंपरागतरित्या लादता

येतील आणि या वर्गाकडे सोपविलेल्या कामांमुळे इतर वर्गातील लोक या वर्गापेक्षा स्वत:ला वेगळे ठेवून त्यांच्यापासून दूर राहतील आणि निम्न दर्जाची कामे करणारा हा वर्ग समाजापेक्षा वेगळा राहील. जेणेकरुन तो कधीही आपल्या विरोधात विद्रोह करु शकणार नाही आणि असा वर्ग म्हणजेच अस्पृश्य वर्गाची त्यांनी निर्मिती केली इतकेच नव्हे तर अस्पृश्यांच्या वर्तमानकालिन दुर्दशेला आपण नव्हे तर ते स्वत:च कारणीभूत आहेत हे त्यांना पटवून देण्यासाठी आर्यानी पूनर्जन्माची एक संकल्पनाही मांडली, ज्यानुसार अस्पृश्य आपल्या पूर्वजन्मात केलेल्या कर्माचीच फळे ते या जन्मात भोगत आहेत असे आर्यांनी अस्पृश्यांना पटवून दिले, हे विचार त्यांच्या मनावर ठसविले, ज्यामुळे अस्पृश्य वर्ग स्वत:च्या दुर्दशेला आपण स्वत:च दोषी आहोत असे मानून आपले दु:खी जीवन कंढू लागला. पूनर्जन्माच्या या संकल्पनेला अत्यंत घातक संबोधून या संकल्पनेमुळे माणूसकीच नव्हे तर व्यक्तीचा आत्मविश्वास, स्वावलंबन, कार्य करण्याची इच्छा समाप्त होऊ शकते असे मत भगतसिंगानी व्यक्त केले आहे.

भगतसिंगाच्या क्रांतीकार्यावरुन तर आपण त्यांना शूर,धाडसी, वीर, म्हणतोच पण तत्त्कालीन सनातन धर्माचा पगडा असणाऱ्या समाजात भारतीय धार्मिक स्थितीबाबत जे परखड विचार भगतसिंग यांनी व्यक्त केले तेही अत्यंत धाडसाचेच होते. भगतसिंग म्हणतात की आपण भारतीय स्वत:ला खूपच अध्यात्मवादी, सहिष्णु म्हणवून घेतो व याच आधारावर आपली संस्कृती आणि आपली सभ्यता पाश्चात्यापेक्षा किती श्रेष्ठा आहे हे सांगतो, पण वास्तविक पाहता आपण अध्यात्मवादी असण्याचे ढोंग करतो, पाखंडीपणाने स्वत:ला श्रेष्ठ म्हणवून घेतो, पण जो देश माणसाला माणसाप्रमाणे वागवू शकत नाही त्या देशातील लोक अध्यात्मवादी आणि सहिष्णू कसे? असा परखड सवाल करुन ते याच संदर्भात पुढे म्हणतात की, मदन मोहन मालवीयजी यासारखे समाजसुधारक जे स्वत:ला अखंड लोकांचे हितचिंतक म्हणवून घेतात, अस्पृश्यांच्या हातून स्वत:च्या गळ्यात हार घालून घेतात आणि नंतर कपड्यासमवेत स्नान केल्याशिवाय स्वत:ला अशुध्द मानतात ते अस्पृश्यांचे हितचिंतक करो असू शकतात? हा प्रश्न विचारुन पुढे धर्माचे समर्थन करणाऱ्या लोकांना भगतसिंग विचारतात की, ज्या धर्मांध व्यक्तींनी केवळ पवित्र पुस्तकांमधील वेदांची काही वाक्ये ऐकणाऱ्या लोकांच्या कानांमध्ये वितळलेले गरम शिसे ओतून त्यांना बहिरे करणाऱ्यांना धर्मानुसार कोणती शिक्षा करायला होती?

भगतसिंगानी अशा हिंदु धर्मियांचा धिक्कार केला आहे की, जे अस्पृश्य वर्गातील लोकांना पशूपेक्षाही वाईट वागणूक देतात. भगतसिंहांच्या मते, आपण पशूंची पूजा करु शकतो, पण स्वत: निम्न दर्जाची कामे करुन आपल्याला सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या अस्पृश्यांना माणूस म्हणून वागवू शकत नाही ही आपली वर्तणूक कृतघ्नतेच्या साऱ्या सीमा पार करणारी आहे. भगतसिंग म्हणतात की, इंग्रज स्वत:ला श्रेष्ठ तर भारतीयांना कनिष्ठ समजून दुय्यम दर्जाची अन्यायी, जुलमी वागणूक भारतीयांना देतात अशी तक्रार आपण करतो. पण अशी तक्रार करण्याचा अशा समाजाला काय अधिकार आहे. जो अस्पृश्यांना सर्वसामान्य जगण्याच्या हक्कांपासून वंचित ठेवतो. ज्या समाजाने अस्पृश्य वर्गाला सर्व हक्क नाकारले त्या समाजाला राजनैतिक अधिकार मागण्याचा हक्क नाही असे मत ते मांडतात. मै नास्तिक क्यों हूँ ? या भगतसिंगानी लिहिलेल्या लेखातून असे आढळून येते की, भगतसिंग हे नास्तिक होते. धर्म आणि आस्तिकतेवर त्यांचा विश्वास नव्हता. पण भारतातील हिंदु धर्मामध्ये अस्पृश्य वर्गाला दिल्या जाणाऱ्या अन्याय्यी व जुलमी वागणुकीतून अस्पृश्यांची सुटका करण्यासाठी त्यांनी अस्पृश्य वर्गाने हिंदु धर्माचा त्याग करुन अन्य धर्माचा स्विकार करणे योग्य आणि न्याय्य आहे असे मत मांडले. त्यांनी सनातन हिंदू धार्मियांना असा इशारा देखील दिला की, जर तुम्ही अस्पृश्यांना अशीच पशू पेक्षाही वाईट वागणूक देत राहिलात तर ते नक्कीच इतर

धर्मांमध्ये समाविष्ट होतील, ज्या धर्मात त्यांना माणसाप्रमाणे वागणूक दिली जाईल. आणि मग तेव्हा मुसलमान आणि ख्रिश्चन धर्म आपल्या हिंदू धर्मावर आक्रमण करत आहेत असे म्हणणे व्यर्थ ठरेल!.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात जातिविषयक राजकारणाची भूमिका देखील महत्वपूर्ण ठरली आहे. या संदर्भात भगतसिंग म्हणतात की, आपल्या भारतात स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा जसजशी तीव्र होत चालली आहे तस तसे आप-आपल्या जाती-धर्माच्या लोकांची संख्या वाढावी म्हणून अधिका-अधिक प्रयत्न केले जाऊ लागले आहेत. मुस्लिम, ख्रिश्चन या अन्य धर्मातील लोक अस्पृश्यांना आपल्या धर्मात समाविष्ट करुन घेऊन त्यांना मानवतापूर्ण वागणूक देऊन आपापल्या धर्मांतील लोकसंख्या वाढवू इच्छित आहेत आणि त्याप्रमाणे काही हिंदूनी केलेल्या धर्मांतरामुळे हिंदू धर्माला जबर धक्का बसल्यामुळे हिंदू धर्म आता अस्पृश्यांची गंभीर दखल घेऊ लागला आहे. नेहमी सांप्रदायिकतेमुळे समाजाचे नुकसानच होत आले आहे पण याच सांप्रदायिकतेमुळे भेदभाव दूर करण्याचे प्रयत्न झाले हा किमान एक फायदा झाला असे मत भगतसिंगानी मांडले.

भगतसिंग हे एक क्रांतीकारी होते आणि क्रांतीकारकांना अपेक्षित परिणाम शीघ्र हवे असतात आणि म्हणूनच भारतीय समाजातून अस्पृश्यता, भेदभाव शोषण या सर्व बाबींचे लवकरात लवकर उच्चाटन व्हावे असे भगतसिंगांना वाटत होते पण हे कार्य इतके सोपे नव्हते. या कार्याच्या मागती अनेक अडचणी होत्या. त्या सर्व अडचणीपैकी धर्म ही पहिली व मोठी अडचण आहे असे भगतसिंगांचे मत होते. धर्मामध्ये असणाऱ्या अनिष्टतेविरुध्द लढले तरी पाहिजे किंवा धर्माबद्दल काहीही न बोलण्याची शपथ घेऊन कायम गप्प तरी राहिले पाहिजे असे त्यांचे मत होते.

भारतीय समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अस्पृश्यांच्या शोषणांचे उच्चाटन करण्यासाठी भारतीयांनी आपली संकुचितवृत्ती त्यागली पाहिजे असे भगतसिंगांचे म्हणणे होते. अस्पृश्यांच्या उद्धाराच्या मार्गतील भारतीयांची संकुचित वृत्ती ही दुसरी मोठी अडचण आहे असे भगतसिंगांचे मत होते. म्हणूनच त्यांनी भारतीयांना आव्हान केले होते की, भारतीयांनी आपल्या मनातील स्पृश्यास्पृश्यता, भेदभाव उच्चनीचता आणि संकुचितपणा यांना तिलांजली द्यावी. असे जो पर्यंत घडत नाही तो पर्यंत एकसंघ भारतीय समाज निर्माण होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. ते म्हणतात की, आपण अस्पृश्यांना आपल्याजवळ का करत नाही? याची वेगवेगळी कारणे लोक सांगतात. काही लोक म्हणतात की, अस्पृश्य निम्न दर्जाची, घाणेरडी कामे करतात, ते अस्वच्छ आणि घाणेरडे राहतात. लोकांनी सांगितलेली या कारणावर भगतसिंग म्हणतात की, अस्पृश्य अस्वच्छ, गलिच्छपणे राहतात! पण ते असे का राहतात? याचाही विचार करायला हवा ते असे राहतात कारण त्यांची आर्थिक स्थिती हालखीची असते. समाजाने त्यांना विकासाची संधीच दिली नाही तर ते स्वत:ला सुधारणार तरी कसे? आणि घाणेरडी कामे करण्याने एखादी व्यक्ती अस्वच्छ, अस्पृश्य कशी बगू शकते? जर एखादी माता आपल्या बालकांची विष्ठा स्वच्छ करते तर ती अस्पृश्य बनत नाही ना? तसेच समाजाची घाण स्वच्छ करणारा वर्ग अस्पृश्य कसा बनू शकतो? असा सवाल भगतसिंग करतात. त्यांचे हे विचार अस्पृश्यांची तुलना मातेबरोबर करणाऱ्या म. गांधीजीच्या विचारबरोबर जुळतात ही देखील विशेष बाब म्हणावी लागेल.

भगतसिंग म्हणतात की, अस्पृश्यांची दुर्दशा आपल्या दुर्भाग्यामुळे झाली आहे, असे मानण्याची अस्पृश्यांची मानसिकता ही त्यांच्या विकास मार्गातील सर्वात मोठी अडचण आहे. भगतसिंगांच्या मते, या भाग्यवादामुळेच अस्पृश्य स्वत:च्या दुर्दशेला कारणीभूत ठरणाऱ्या मुळ तत्त्वांना समजू

शकत नाहीत. भगतसिंगांच्या मते, अस्पृश्यांची दुर्दशा स्वभावजन्य नसून ती समाजजन्य आहे. ते म्हणतात की, जन्मावर आधारित कार्यविभाजन अयोग्य असून प्रत्येक व्यक्तीला कार्य करण्याचे स्वातंत्र्य असायला हवे!.

१९ व्या आणि २० व्या शतकातील समाजसुधारकांचे विचार भगतसिंगांच्या विचारांशी जुळत नाहीत. कारण भगतसिंगांचे असे मत होते की, केवळ सुधारणेमुळे अस्पृश्यांची स्थिती बदलू शकत नाही. सुधार कार्याला अनेक मर्यादा असतात. हे देखील भगतसिंग ओळखून होते म्हणूनच अस्पृश्यता निवारण व अस्पृश्योद्धार यासाठी त्यांनी काही उपाय मांडले. त्यांतील पहिला उपाय म्हणजे समाजाच्या मानसिकतेतील बदल होय. त्यांच्या मतानुसार समाजाने अस्पृश्यांच्या बद्दल आपल्या मनातील पूर्वग्रह काढून टाकावेत आणि सर्व मनुष्य समान असून जन्माने आणि कार्याने कुठलाही भेदभाव केला जाऊ नये व भगतसिंगांनी भारतीय समाजाला असे आवाहन केले आहे की, भारतीय समाजाने अस्पृश्यांना आपल्यात समाविष्ट करुन घेण्यासाठी प्रथम पाऊल स्वत: उचलावे आणि त्यांना समानतेने वागवावे.

परंतु भगतसिंगांना याचीही जाणीव होती की, केवळ वरील उपायामुळेच अस्पृश्यता नष्ट होऊ शकणार नाही आणि समाजाची मानसिकता बदलणेही सोपे नाही. म्हणूनच त्यांनी अस्पृश्य वर्गाला संघटित होण्याचे आव्हान केले, कारण संघटन शक्तीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. म्हणून शोषित अस्पृश्य वर्गाने संघटित होऊन स्वत:ची परिस्थिती बदलण्यासाठी क्रांती घडवून आणण्यावर भर द्यावा असे मत भगतसिंगांनी मांडले. अस्पृश्य वर्गाला संबोधित करताना भगतसिंग म्हणतात की, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या खऱ्याखुऱ्या जनसेवकांनो उठा! वर्तमान व्यवस्थेच्या विरुध्द संघर्ष करा! तुम्ही देशाचे खरे आधार आहात खरी शक्ती आहात! उठा, झोपलेल्या सिंहानो उठा, जागे व्हा आणि आपला इतिहास पहा! गुरुगोविंदसिंग व शिवाजींच्या सैन्याची खरी शक्ती तुम्हीच आहात, तुमच्याच जोरावर त्यांचे नाव, अजरामर झाले आहे, तेव्हा स्वत:साठी आता संघर्ष करा !

अशा प्रकारे केवळ अस्पृश्यांच्या दुर्दशेमुळे त्यांच्याप्रती सहानुभूती व्यक्त न करता त्यांनी या अस्पृश्य वर्गामध्ये स्वाभिमान व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, अस्पृश्य वर्गाचा हा लढा केवळ याच वर्गापुरता मर्यादीत नसून हा लढा मुक्तीसंग्रामाचाही एक महत्त्वपूर्ण भाग होता. कारण केवळ, इंग्रजांच्या गुलामगिरीतून त्यांच्या सत्तेपासून मुक्ती म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य नव्हे, तर भारतातील सामाजिक एकतेची निर्मिती व या एकतेच्या आधारे मानसिक आणि बौद्धिक गुलामगिरीपासून भारतीय समाजाची मुक्तता म्हणजेच पूर्ण स्वातंत्र्य होय असे त्यांचे मत होते.

भगतसिंगांनी अस्पृश्योद्धराबद्दल जे काही विचार मांडले ते केवळ तार्किक नव्हे तर व्यावहारिकही आहेत.



माझा बळीराजा

कु. लावण्या गोसकी
बी. कॉम. भाग - ३

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. विविध प्रकारची शेती पिके, फळे, फुले, औषधी इत्यादी प्रकारची पिके या ठिकाणी घेतली जातात. जगातील इतर काही देश आपल्या देशावर अवलंबून आहेत. कारण आपला शेतीमाल भरपूर प्रमाणात निर्यात होत असतो. अशा कृषीसंपन्न असलेल्या भारत देशाला जणू कूणाची तरी दृष्ट लागलेली आहे. देशातला बळीराजा आज दुखावलेला दिसतो.

बळीराजा हा पोशिंदा असतो. हा पहिल्यांदा आपल्याला पूरवितो आणि त्याच्यानंतर तो त्याच्या कुंटूबातील व्यक्तींना घास घालतो. तो कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिकपणे त्याचे कर्तव्य पार पाडत असतो. अशा या नि:स्वार्थी बळीराजा आमच्या समाजात मान तर सोडाच तर त्या उलट त्याला वेळोवेळी अपमान केला जात आहे. त्या गरीब आणि कष्टकरी शेतकऱ्याला माझ्या बळीराजाला हे नाईलाजाने सहन करावे लागते.

कोणत्या तरी सावकाराकडून मोठ्या व्याजावर कर्ज घ्याचचं आणि त्याला धान्याची रास झाल्यानंतर कर्ज परत करीन हे आश्वासन द्यायचं असतं मिळालेल्या कर्जातून बळीराजा शेतात बी पेरतो. तो वरुणराजाला विनवणी करतो की, आमच्यावर दया कर बरस रे बाबा! निसर्गराजा देखील जणू काही शेतकऱ्यांच्या जीवावरच उठला आहे. एक तर वेळेवर पाऊस होत नाही. झालाच तर कधी खुप तर कधी कधी खुपच कमी अशा या ओल्या-कोरड्या दुष्काळातून कसे तरी सावरत तो ते शेतात लावलेलं पिक रक्ताच पाणी करुन वाढवितो आणि अशा या वाढलेल्या पिकांवर रोगराईचा त्रास होतो. त्या रोगांपासून त्या पिकांचा बचाव तो करत असतो. त्याच्या खूप प्रयत्नानंतर पिक कापणीला येतात आणि ही आलेली पिक धान्याच्या स्वरुपात बाजारात जातात. बाजारातील मोठ्या व्यापाऱ्यामार्फत त्या धान्यांचा भाव केला जातो आणि हा अत्यंत कमी स्वरुपाचा असतो. त्याला त्याच्या कष्टाचे दाम मिळत नाही. त्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणवर आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

अशा प्रकारे त्याला आर्थिक नूकसानीचा फटका बसल्याने त्याला त्याच्यासमोर आपल्या कुंटूबाला जगवण्याचा मोठा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहातो. परवाची ताजी घटना आहे. अशा अनेक घटना शेतकऱ्यांच्या मुलाबाबत घडत आहेत. हा बळीराजा त्याच्या कुंटूबाचा कर्ता असतो. तो त्याच्या कुंटूबाचा सर्वस्व असतो. अशा प्रकारे त्याच-त्याच समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य त्याच्यात राहत नाही. त्याचे व त्याच्या कुंटूबियाचे अतिशय हाल होतात. अशा समस्यांनी त्रासलेल्या बळीराजावर मानसिक दबाव व तणाव येतो आणि सावकाराकडून व इतर ठिकाणाडून घेतलेल्या कर्जाचा बोजा त्याच्या उरावर असतो. त्याला ते कर्ज कोणत्याही परिस्थितीत पतर करायचे असते. यातून त्याच्यासमोर एकच उपाय शिल्लक राहतो. म्हणजेच आत्महत्या आणि तो मृत्युला कव टाळतो.

बळीराजाच्या या मृत्यूला आत्महत्या म्हणावे की, हत्या हाच प्रश्न आज समाजापूढे आणि आपल्या समोर उभा राहतोय. बळीराजाच्या या आत्महत्येला जबाबदार कोण? हा देखील प्रश्न आपल्यासमोर उभा राहातो. परंतु बळीराजाला आत्यहत्येशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही का? असेलच

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. विविध प्रकारची शेती पिके, फळे, फुले, औषधी इत्यादी प्रकारची पिके या ठिकाणी घेतली जातात. जगातील इतर काही देश आपल्या देशावर अवलंबून आहेत कारण आपला शेतीमाल भरपूर प्रमाणात निर्यात होत असतो. अशा कृषीसंपन्न असलेल्या भारत देशाला जणू कूणाची तरी दृष्ट लागलेली आहे. देशातला बळीराजा आज दुखावलेला दिसतो.

बळीराजा हा पोशिंदा असतो. हा पहिल्यांदा आपल्याला पूरवितो आणि त्याच्यानंतर तो त्याच्या कुंटूबातील व्यक्तींना घास घालतो. तो कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिक पणे त्याचे कर्तव्य पार पाडत असतो. अशा चा नि:स्वार्थी बळीराजा आमच्या समाजात मान तर सोडाच तर त्या उलट त्याला वेळोवेळी अपमान केला जात आहे. त्या गरीब आणि कष्टकरी शेतकऱ्याला माझ्या बळीराजाला हे नाईलाजाने सहन करावे लागते.

कोणत्या तरी सावकाराकडून मोठ्या व्याजावर कर्ज घ्याचचं आणि त्याला धान्याची रास झाल्यानंतर कर्ज परत करीन हे आश्वासन द्यायचं असतं मिळालेल्या कर्जातून बळीराजा शेतात बी पेरतो. तो वरुणराजाला विनवणी करतो की, आमच्यावर द्या कर बरस रे बाबा! निसर्गराजा देखील जणू काही शेतकऱ्यांच्या जीवावरच उठला आहे. एक तर वेळेवर पाऊस होत नाही. झालाच तर कधी खुप तर कधी कधी खुपच कमी अशा या ओल्या-कोरड्या दृष्काळातून कसेतरी सावरत तो ते शेतात लावलेलं पिक रक्ताच पाणी करुन वाढवितो आणि अशा या वाढलेल्या पिकांवर रोग राईचा त्रास होतो. त्या रोगांपासून त्या पिकांचा बचाव तो करत असतो. त्याच्या खूप प्रयत्नानंतर पिंक कापणीला येतात आणि ही आलेली पिंक धान्याच स्वरुपात बाजारात जातात. बाजारातील मोठ्या व्यापाऱ्यामार्फत त्या धान्यांचा भाव केला जातो आणि हा अत्यंत कमी स्वरुपाचा असतो. त्याला त्याच्या कष्टाचे दाम मिळत नाही. त्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणवर आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

अशा प्रकारे त्याला आर्थिक नूकसानीचा फटका बसल्याने त्याला त्याच्यासमोर आपल्या कुंटूबाला जगवण्याचा मोठा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहातो. परवाची ताजी घटना आहे. अशा अनेक घटना शेतकऱ्यांच मुलाबाबत घडत आहेत. हा बळीराजा त्याच्या कुंटूबाचा कर्ता असतो. तो त्याच्या कुंटूबाच्या सर्वस्व असतो. अशा प्रकारे त्याच-त्याच समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य त्याच्यात राहत नाही. त्याचे व त्याच्या कुंटूबियाचे अतिशय हाल होतात. अशा समस्यांनी त्रासलेल्या बळीराजावर मानसिक दबाव व तणाव येतो आणि सावकाराकडून व इतर ठिकाणाडून घेतलेल्या कर्जाचा बोजा त्याच्या उरावर असतो. त्याला ते कर्ज कोणत्याही परिस्थितीत पतर करायचे असते. यातून त्याच्यासमोर एकच उपाय शिल्लक राहतो. म्हणजेच आत्महत्या आणि तो मृत्युला कव टाळतो.

बळीराजाच्या या मृत्यूला आत्महत्या म्हणावे की, हत्या हाच प्रश्न आज समाजापूढे आणि आपल्या समोर उभा राहतोय बळीराजाच्या या आत्महत्येला जबाबदार कोण? हा देखील प्रश्न आपल्यासमोर उभा राहातो. परंतु बळीराजाला आत्यहत्ये शिवा दुसरा कोणताच पर्याय नाही का? असेलच तर कोणता? माझा बळीराजा एवढा दुखावलेला असताना त्याच्याकडे कुणाचेचं लक्ष जात नाहीय. सगळे गुंतलेत आपआपल्या राजकारणाच्या वर्तुळात! आपण म्हणजे समाजाने निवडून दिलेल्या प्रतिनिधी घोटाळ्यावर घोटाळे करण्यात व्यस्त आहेत आणि त्यातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळवितात. असे हे प्रतिनिधी स्वत: वातानुकुलित कार्यालयात बसून घोटाळे करतात. हे कया शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणार? समाजालाच या शेतकऱ्याला यातून मुक्त करावं लागणार आहे. समाजान एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याला धीर दिला पाहिजे. त्यांना आपआपल्या कुवतीप्रमाणे आर्थिक मदत केली पाहिजे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व विवाहाची जबाबदारी आपल्यातीलच कोणाला तरी घ्यावी लागणार आहे. आपल्यातील काही अभिनेते व समाजातील काही व्यक्ती करीत आहेत. अशांचा उल्लेख मला आवर्जू करावासा वाटतो. त्यातून थोडासा तरी आधार कष्टकरी बळीराजाला मिळेल हे मात्र नक्की.

या परिस्थितीत मला शिवरायांचा एक प्रसंगाचा उल्लेख करावासा वाटतो. शिवराय हे १४ वर्षाचे होते, तेव्हा त्यांनी माँसाहेब म्हणजेच जिजाऊला प्रश्न विचारला, माँसाहेब आपली प्रजा एवढी दुखावलेली आणि त्रस्त अवस्थेत का आहे? त्यावर माँसाहेबांनी दिलेल उत्तर सुंदर आहे, त्या म्हणतात, शिवबा जोपर्यंत या स्वराज्यात बळीचं राज्य येणार नाही तोपर्यंत या रंजल्या-गांजल्या शेतकऱ्यांचा वाली कोणीच होणार नाही, तोपर्यंत या स्वराज्याचे सुराज्य होणार नाही. शिवबा म्हणून आपल्याला बळीराजाला या अवस्थेतून बाहेर काढले पाहिजे. त्यांना या परिस्थितीतून मुक्त केले पाहिजेत. त्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी प्रथम प्राधान्य शेतकऱ्यांच्या हिताला दिलं, ते शेतकऱ्यांचे वाली झाले. आणि हिंदवी स्वराज्यात शेतकऱ्यांचे सुराज्य निर्माण झालं. आजच्या युगात आपले राजकारणी आणि सरकार शेतकऱ्यांचा सुड घेत आहेत.

म्हणून मला या समाजाला एक आवाहन करावेसे वाटते की, आपल या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुंटूबांला या अवस्थेतून वाचविले पाहिजे. आपलं भविष्य व भवितव्य या शेतकऱ्यांवरच आधारलेलं आहे. त्यामुळे आपल्याला या शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्याचा थोडातरी प्रयत्न करायला हवा.

इडा पिडा टळू दे, बळीचं राज्य येव दे !!

जीवन संपवल्याने समस्या थांबत नाहीत. समस्यावर मात करुन संयमाने, विचाराने, हिंमतीने जो आपल्या कुंटूबाचा आधार बनून राहतो. तोच माझा खरा शेतकरी बाप आपल्या मागे आपल्या कुंटूबाचे काय होणार? याचा विचार करुन जो हिंमतीनं जगतो, कोणत्याही संकटात आपल्या कुटूंबाची साथ सोडत नाही. तोच खरा माझा शेतकरी बाप. ज्याची तासनतास उन्हा-पावसात राहण्याची ताकद आहे, ज्याने कष्टाला आपला मित्र बनवला आहे तोच माझ्या राष्ट्राचा शेतकरी होय. म्हणून सर्व शेतकऱ्यांनी जिद्दीने जगायला हवं.

संकटाना समोरे जावूनी, संकटात कुटूंबाचा आधार बनेल नाही जीव संपवण्याचा खूळ डोळ्यात, इच्छा आहे. जगण्याची माझ्या मनात इच्छा आहे जगण्याची माझ्या मनात.

दु:ख तो मेरा साथी है,
सुख मेरा मेहमान है,
लोग मुझे अन्न दाता कहते,
मेरा नाम किसान है !

बेकारी

किती शिकील तेवढं कमीच
बेकारी मोठ दु:ख आहे
रात्र दिवस झोप नाही
कष्टाचा पैसा घालायचा अन् शिकायचं
नोकरी मिळेना काय करायचं
माणूस झाला छोटा पैसा झाला मोठा
इथे भ्रष्टाचार लाचारीला मोल नाही
मग धरणी आता उद्योगाची कास
मांडावा उद्योगाचा पाठ
अन् चार चौघांना आपणच
नोकरी द्यावी आज
बेकारीची फेकून द्यावी फास
प्रत्येकाने घ्यावा हाच ध्यास.

कु. वर्षा कांबळे
बी. ए. भाग-३

भारतीय लोक व राष्ट्रीयत्वाची भावना

कु. सोनाली शिंगे
बी. ए. भाग - २

१५ ऑगस्ट १९४७ पासून आपण १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करतो आणि २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. प्रजासत्ताक दिनानिमित्त परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रण दिले जाते. प्रजासत्ताक म्हणजे लोकांची सत्ता याचा अर्थ लोकांना स्वतंत्र्यपणे वागणे, बोलणे व त्याचे विचार समाजासमोर स्पष्टपणे व्यक्त करणे. प्रजासत्ताक दिवशी परराष्ट्र व्यक्तिला प्रमुख अतिथी म्हणून बोलवले जाते. २१ बंदुकांची सलामी दिल्यावरच लाल किल्ल्यावर पंतप्रधान ध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना देतात. हा दिवस संविधान दिन म्हणूनही ओळखले जातो. प्रजासत्ताक दिन हा भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक आहे. (स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट व गांधी जयंती) या दिवशी प्रत्येक राज्याचे चित्ररथ तेथे पाठवतात तसेच वीर पुरुषांना मानवंदना देतात. नवी दिल्ली येथे एक मोठी (परेड) संचलन, राजपथ मार्गावर निघते. हे झालं आपल्या लाल किल्ल्यावरचे ध्वजारोहण... आपण आपल्या परिसरात शाळेत महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यासाठी त्या दिवशी एकत्र येतो. त्या दिवशी सकाळी उठून आपण शाळेमध्ये किंवा परिसरात महाविद्यालयामध्ये आपण एकत्र ध्वजारोहण करण्यासाठी जमतो. ते फक्त एक दिवसासाठी असते. पण आपल्या भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना किती आहे हे सांगणे कठीण आहे. तरीही २६ जानेवारी व १५ ऑगस्ट हे फक्त दोन दिवसच आपण भारताचे लोक आहोत असे वाटते. आपण वर्षाचे एकूण ३६५ दिवसापैकी फक्त ३६३ दिवस आपण देशामध्ये काय चालले... आपण या राष्ट्रांचे नागरिक आहोत

असे आपल्याला वाटत नाही. जपानमधील प्रत्येक नागरिक हे देशासाठी काम करतात. उदा. एका व्यक्तिने रेल्वेतून प्रवास करताना त्या रेल्वेचे सीट फाटले होते. ती व्यक्ति दुसऱ्या दिवशी घरातून सुई दोरा आणून ते सीट शिवते त्याला एक माणूस विचारतो हे सरकारच काम आहे तर तू का हे काम करतो यावर तो व्यक्ति सांगते की हे आपल्या राष्ट्राची संपत्ती आहे.

आपल्या राष्ट्रात येणाऱ्या व्यक्तिला प्रवास करताना हा सीट चांगले असले तर तो आपल्या राष्ट्राला नाव ठेवणार नाही असे तो उत्तर देतो.यावरुन आपल्याला जपानमधील लोकांच्या मनातील राष्ट्राविषयीची भावना दिसून येते. पण भारतामध्ये असे दिसून येत नाही. येथे तुलना करण्यात काही अर्थ नाही. जो पर्यंत प्रत्येक नागरिक हे भारतीय आहोत असे मानून जात, धर्म भेदभाव न मानता जीवन जगतो तेंव्हाच आपण आपल्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली असे आपण मानू शकतो. मुले हे केस वाढवणे ही फॅशन समजतात. मुले ही केस वाढवून त्यांना अनेक प्रकारचा कलरिंग करुन व केसांचा हेअर स्टाईल करुन आपली फॅशन दाखवतात. केसांमुळे मुली व मुलांमधील फरक ओळखणे कठीण झाली आहे. जसे आपण मुला-मुलींना समान लेखतो तर अनेक गोष्टीमध्ये सुध्दा मुलां-मुलींच्या फॅशन मध्ये सारखेपणा दिसून येते.

आधुनिक काळात मोबाईल हे खूप प्रिय झालेला आहे. आज मोबाईल फक्त संवाद साधण्यासाठी वापर न करता ती एक फॅशन सुध्दा झालेली आहे. मोबाईलचा वापर खूप प्रमाणात होत आहे. रस्त्यावर, प्रवासामध्ये, कार्यक्रमांमध्ये, कॉलेजमध्ये, घरामध्ये व इतर ठिकाणी मोबाईलचा वापर जास्त प्रमाणात दिसून येते. मोबाईलमुळे नाती व एका ठिकाणी बसून संवाद साधणे हे दृश्य आता दिसणे कठीण झालेले आहे.

मोबाईलचा फॅशन इतका होत आहे की, आपण एकमेकांना वेळ देणे सुध्दा विसरुन जातो. तरुण पिढी मोबाईल फॅशन म्हणून वापर करत असताना त्याचा गैरवापर जास्त प्रमाणात होतो. परिस्थिती नसतानाही मोबाईल हातात असणे महत्त्वाचे बनलेले आहे. अनेक ठिकाणी मोबाईलची वेगवेगळया प्रकारे फॅशन दिसून येते. रस्त्यावर जाताना मोबाईल वापरणे व कानामध्ये Ear Phone घालून जाणे ही फॅशन झालेली आहे. Whats app, Twiter, Facebook अशा अनावश्यक गोष्टीचीही फॅशन झाली आहे. मोबाईलच्या फॅशनमुळे मानवी जीवनामध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत. मोबाईलच्या फॅशनमुळे परगावी असणाऱ्या व्यक्तींसोबत Chatting करणे, Video call करतो तर यामुळे जवळची व्यक्ती लांब होत आहेत कारण आपण त्यांना मोबाईलमुळे वेळ देत नाही. मोबाईलची फॅशन करताना त्याचा फायदा होतो आणि काही प्रमाणात तोटेही होतात. मोबाईलमुळे व्यक्तींच्या दैनंदिन जीवनामध्ये खूप बदल झालेला आहे.

खाण्याच्या पदार्थांमध्ये सुध्दा आज आपण फॅशन करत आहोत. शिक्षणासाठी व नोकरीसाठी बाहेर गावी स्थलांतर व्हावे लागते. त्यामुळे खाण्यामध्ये सुध्दा बदल होत आहे. पौष्टीक आहारापेक्षा आपण नुडल्स, पिझ्झा, बर्गर जास्त प्रमाणात आहारामध्ये घेतो. ह्या प्रकारच्या खाण्याचा पदार्थ आजकालच्या कार्यक्रमात ठेवणे ही फॅशन झालेली आहे. अगोदरच्या काळात कोणत्याही कार्यक्रमामध्ये पोळी, भाजी, वरण, भात हे खाद्या पदार्थ ठेवत होते परंतु आजच्या फॅशनमुळे कार्यक्रमात अशा प्रकारच्या खाद्यपदार्थ ऐवजी स्नॅक्स पदार्थाचा जास्त प्रमाणात वापर करत आहोत. भारतीय खाद्य पदार्थाऐवजी विदेशी खाण्याच्या पदार्थाला खूप महत्त्व देतो. आपण आरोग्याचा विचार न करता विदेशी खाद्य पदार्थ व त्या फॅशनचा विचार करतो.

वस्तुबाबतीत सुध्दा फॅशन करता येते. घरामध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तुमध्ये फॅशन दिसून येते. लेस्टेट वस्तू घरामध्ये वापरणे फॅशन आहे. घराला वेगल्या पद्धतीने सजवणे व कलरिंग देणे व त्या घराला शो म्हणून वापरली जाणारी वस्तू जसे की, जुंबर वेगवेगळ्या प्रकारच्या लाईटिंग करणे व दिवाळीला वापरल्या जाणाऱ्या वस्तू यामध्ये फॅशन निर्माण झालेली आहे. फॅशनेबल वस्तूचा वापर केल्याने एक चांगला दर्जा निर्माण होतो असे समजले जाते.

वस्तू, कपडे, मोबाईल, केस इ. बाबतीत फॅशन पाहिली पण आजकाल बोलंण्याची शैली सुध्दा बदलेली आहे. फॅशन म्हणून अनेक प्रकारच्या भाषेचा वापर बोलताना करत असतो.

लाइफस्टाईल.

जिंदगी फास्ट ट्रैक हो गई है ... यानी तेज रफ्तार जिंदगी, मॉडर्न लाइफस्टाइल ... तेजी से बढ रही ख्वाहिशें इन ख्वाहिशों के पिछे भागते हम ... न खाने की फिक्र ... न रिश्तों की चिंता, न सेहत की सुध, न अपनों को खोने पाने की, नतीजा हम बहुत कुछ हासिल तो कर रहे हैं, लेकिन इसमें काफी कुछ छूटता भी जा रहा है, अपने रिश्ते तन-मन, शांती, सुकून ... सब कुछ इस सो कॉल्ड मॉडर्न लाइफस्टाइल ने हमारे रिश्तों को भी प्रभावित किया है और रिश्तों में दूरियॉ बढा दी है । पहले जिंदगी की पहली जरुरत हुआ करती थी अपनी और अपनों की खुशी, परिवार के साथ खुशियों के पल लेकिन, अब कामयाबं जिंदगी की चाहत और अधिक पैसा कमाने की चाह आज की लाइफस्टाइल की जरुरत बन गई है ।

कु. मनिषा हबीब
बी. कॉम. भाग-१.

रविवारच्या सुट्टीचे जनक !

कु. रुकसाना शेख
बी. ए. भाग - १

आपल्याला माहित आहे की रविवार हा सुट्टीचा व आरामाचा मस्त जेवणाचे बेत रचण्याचा वार बनून बसला आहे. आणि आपण खूप काही खेळ वगैरे खेळतही असतो. रविवार म्हणजे सुट्टीचा दिवस होय. याचे जनक कोण आहे हेच आपल्या माहित नसते त्यांचे नाव : नारायण मेघाजी लोखंडे हे आहे.

आपल्या देशात अनेक राष्ट्रीय चळवळींचे जनक आपल्याला माहिती असतात. पण आपल्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या काही गोष्टी कोणामुळे आल्या, याची आपल्याला काही कल्पना नसते. आता रविवारची सुट्टीच पाहा. साप्ताहिक सुट्टीचा हा वार आरामचा, मस्त जेवणाचे बेत रचण्याचा वार बनून बसला आहे. त्याचा शोध काही वेदांमध्ये वगैरे लागलेला नाही किंवा ब्रिटिशांनी स्वबुद्धीने निर्माण केलेली परंपराही नाही. आपल्याला नारायण मेघाजी लोखंडे यांचे नावही माहिती नसेल. त्यांनी दिलेली ही भेट आहे. त्यासाठी त्यांना फार मोठा लढा उभारावा लागला. लोखंडे हे भारतातल्या कामगार चळवळीचेही जनक त्यांच्या काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात कामाचे तास त्यानुसार पगार अशा काही पध्दती नव्हत्या. कामगार वर्षाचे बारा महिने रोजच्या रोज राबत असतं. त्यांना विश्रांतीच नसायची. मजुरीचं काम शारिरीक कष्टाचं ते करणाऱ्या माणसाला विश्रांती न देणं हे क्रुरपणाचे होते. म्हणूनच लोखंडे यांनी दर रविवार सुट्टी असली पाहिजे, असा अर्ज ब्रिटिश सरकारकडे केला. तो लगेच मान्य झाला नाही. १८८१ ते १८८९ या काळात त्यांनी उभारलेल्या लढ्यामुळे सुट्टी आली आणि तो आता आपला हक्क बनला आहे...

◆◆◆◆◆

विनोद

शिक्षिका : मुलांनो, आपण नेहमी वडिलांच्या नांवामागे श्री. लावत जावे, रोहन वडिलांचे नाव काय आहे?

रोहन : श्रीमतीराम ।

शिक्षका : गाढवा, वडिलांच्या नावामागे श्री लावावे व आईच्या नावामागे श्रीमती समजलं ?

रोहन : पण बाई, माझ्या वडिलांचे नाव मतीराम आहे.

कु. भारती धारा
बी. ए. भाग-१

फुले

आयुष्यात जरी एक दिवसाचे
त्याचे काम लाख मोलाचे
सुख, दु:खात असते सोबती फुलांची महती ही थोर
घेवू शिकवण आपण फुलांकडून सुख दु:ख मिळून
आयुष्यात असेल आपल्याही सुगंध
दृढ होतील ऋणानूबंध
फुले ही कधी मुलांच्या वहीत कोमेजून जातात
फुले ही कधी गळ्यांच्या हाटात एक होतात
फुले ही कधी सत्काराच्या समारंभात
फुले ही देऊळात असतात
फुले ही पुष्पगुच्छात असतात
फुले ही कुणाच्यातरी गळ्यात असातात
फुले ही कुणाच्यातरी सरणावर जळतात.

कु. पायल बटाणे
बी. ए.भाग-२

मैत्रीण

कु. स्नेहा कोमाकुल
बी. ए. भाग - १

मैत्रीण जीवनामध्ये खूप महत्वाची असते. कारण मैत्रीण ही अशी एक जागा की जिथे मान, अपमान, अहंकार याचा विचार करत नाही म्हणून मैत्रीण जीवनामध्ये खूप महत्वाची असते आणि मैत्रीण आपले सर्व सुख-दुःखात साथ देणारी असते, त्याला शेवट नसतो ना ते कधी तात्पूर्ती ही नसते. कधी दूर गेले तरी ती आठवण येणारी आपली मैत्री असते.

मैत्रीणीत कधी हिशोब नसतो, मैत्रीण प्रेमाची अनुभुती देणारी असते. मैत्री कधी जात, धर्म, वय, बंधनात अडकत नाही. म्हणून प्रेम करुन मैत्री करायला खूप कठीण जाते, पण मैत्री करुन प्रेम करायला खूप सोपे जाते. कारण भाव - भावना व्यक्त करुन आपले मन स्थिर करु शकतो आणि मैत्रीण म्हणजे आपल्याला विश्वास असतो, त्याग असतो त्यातच खरं प्रेम लपलेले असते.

मैत्रीण आनंद तर असतोच पण विश्वासही असतो मैत्रीणमुळे आपल्याला आनंद मजामस्ती मौज मिळतेच तसंच आपल्या त्यांच्याबद्दलचा विश्वासही मिळतो. मैत्रीमध्ये एकमेकांवर प्रेम असते, त्यात भावना असतात, विश्वास असतो तसेच त्यागीही असतो आणि एकमेकांचा आदरही असतो. मैत्रीण ही आपल्या सर्व विषयांमध्ये सहभागी होत असते.

मैत्रीण आपल्याला खूप काही देऊन जाते मैत्रीण आपल्याला शिकवते की जीवनात प्रत्येक क्षणी हसत रहा असे सांगून ती आपल्याला खूप खूप हसवते आणि माणसाचे आयुष्य वाढते.

मैत्रीणमुळे संपूर्ण जग सुंदर दिसतं फक्त तसं आपण पाहयला हवं, फक्त तसं समजायला हवं म्हणून प्रत्येक गोष्टीला अर्थ असतो मैत्रीण आपल्या संकटाच्या वेळी मदत करते '' मैत्रीण म्हणजे जीवाला जीव देणारी असते'' कोणावर तरी प्रेम करण्यासाठी संपूर्ण आयुष्य लागते. त्याला विसरण्यासाठी खरचं मैत्रीतल्या एका व्यक्तीला ही विसरणं म्हणजे खूप कठीण असतं मैत्रीणीतील सुंदर सहवास हे आनंदी व स्वतंत्र्य जगणं, मन उत्साही ठेवणारं हे कॉलेजमधील जीवन अनमोल असते असे हे जीवन कधी संपते हे कळतच नाही....

विनोद

शिक्षिका : मुलांनो, आपण नेहमी वडिलांच्या नांवामागे श्री. लावत जावे, रोहन वडिलांचे नाव काय आहे?
रोहन : श्रीमतीराम ।
शिक्षका : गाढवा, वडिलांच्या नावामागे श्री लाववे व आईच्या नावामागे श्रीमती समजलं ?
रोहन : पण बाई, माझ्या वडिलांचे नाव मतीराम आहे.

लहु : बाबा चला ना फिरायला, मला सुर्यास्त बघायचा आहे.
बाबा : हे बघ, आता नको अंधार होत आलायं, आपण उद्या सकाळी लवकर जाऊन बघु या...

कु. भारती धारा
बी. ए. भाग-१

छत्रपती शिवाजी महाराज



कु. भारती धारा
बी. ए. भाग - १

मराठा साम्राज्याचे संस्थापक आणि एक आदर्श शासनकर्ता म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजीराजे भोसले एक सर्वसमावेशक, सहिष्णु राजा म्हणून महाराष्ट्रात आणि इतरत्रही वंदिले जातात. शत्रुविरुध्द लढाया करता महाराष्ट्रातल्या डोंगर-दऱ्यामध्ये अनुकुल असलेली गनिमी काव्याची पध्दत वापरून त्यांनी तत्कालीन विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, मुघल साम्राज्यशाही ह्यांच्याशी लढा दिला आणि मराठा साम्राज्याचे बीजारोपण केले.

आदिलशाही, निजामशाही आणि मुघल साम्राज्य बलाढ्य असले तरी महाराष्ट्रात त्यांची सगळी भिस्त स्थानिक सरदारांवर आणि किल्लेदारांवर होती ते सरदार, किल्लेदार जनतेवर अन्याय-अत्याचार करत असत. शिवाजी महाराजांनी त्या अन्याय - अत्याचारातून जनतेची सुटका केली. आणि उत्तम शासनाचे एक उदाहरण भावी राज्यकर्त्यांसमोर ठेवले.

छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा जन्म पुणे जिल्हयातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर इ. स. १६३० मध्ये झाला. इतिहासाच्या अभ्यासाकांमध्ये जन्म तारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता, तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ (शुक्रवार, १९ फेब्रुवारी १६३०) ही शिवरायांची जन्म तारीख २००१ साली स्वीकारली. महाराष्ट्र सरकार दरवर्षी १९ फेब्रुवारी या दिवशी सुट्टी जाहीर करते. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ ही जन्म तारीख मानली जात होती. त्यानुसार महाराष्ट्र बाहेरचे अनेक लोक शिवजयंती दिवस म्हणून वैशाख शुध्द तृतीया हा दिवस आणि महाराष्ट्रतले काही लोक मराठी पंचांगाप्रमाणे फाल्गुन वद्य तृतीया हा दिवस शिवजयंती म्हणून पाळतात. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाई बाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती, म्हणुन या मुलाचे नाव 'शिवाजी' ठेवले गेले.

६ जून इ. स. १६७४ रोजी शिवाजी राजांना रायगडावर राज्यभिषेक करण्यात आला. या दिवसापासुन शिवाजी राजांनी शिवराज्याभिषेक शक् सुरु केला. आणि शिवराई हे चलन जारी केले. स्वाभिमानाची साक्षात मुर्ती असलेले शिवाजीराजे छत्रपती झाले. तमाम पोरक्या झालेल्या जनतेला राजा मिळाला. वडिलोपार्जित छत्राखाली नव्हे तर स्वतः मावळ्यांच्या मदतीने उभारलेल्या छत्राखाली शिवाजीराजे बसले आणि स्वयंघोषित नव्हे तर लोक घोषित छत्रपती बनले.

अस म्हणतात की, शिवाजी राजे स्वतःच्या एका असाध्य रोगात सापडल्यामुळे मृत्यू पावले. संपूर्ण तीन आठवड्यांचा

तापानंतर त्यांनी १६८० मध्ये अंतिम श्वास घेतला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनतंर त्यांचे मोठे पुत्र संभाजी आणि सोयरा बाईंनी राज्याच्या नियंत्रणासाठी लढत होती.

शहाजी राजे प्रथम अहमदनगरचा निजामशहाच्या पदरी एक सरदार म्हणुन होते. मलिक अंबर या निजामशहाच्या प्रभावी वजिरांच्या मृत्यूनंतर मोगल सम्राट शहाजहानच्या सैन्याने इ. स. १६३६ मध्ये अहमदनगरवर चाल करुन ते शहर आपल्या ताब्यात घेतल्यानतंर शहाजीराजे विजापूरच्या आदिलशहाच्या पदरी सरदार म्हणून रुजू झाले. आदिलशहाने त्यांना पुण्याची जहांगिरी दिली. शहाजी राजांनी तुकाबाईंशी दुसरा विवाह केला. लहान शिवाजीला घेऊन जिजाबाई पुण्याला रहायला. गेल्या, तुकाबाई आणि शहाजीराजे यांच्या एकोजी भोसले (व्यंकोजी भोसले) या पुत्रांनी पुढे सध्याच्या तामिळनाडूमधील तंजावरला आपले राज्य स्थापन केले.

जिजाई पुण्यात राहयला गेल्या त्यावेळी पुण्याची फार दुरव्यवस्था झालेली होती. तेव्हां छोटे शिवाजीराजे आणि कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतिकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून जिजाबाईंनी दादोजी कोंडदेवांच्या मदतीने पुण्याची पुनः स्थापना करायला सुरुवात केली. शिवाजी राजे लहानाचे मोठे होत असताना आणि मोठे झाल्यावर प्रत्येक महत्वाच्या प्रसंगी त्यांना जिजाबाईंनी खंबीर मार्गदर्शन दिले. शिवाजी महाराज्यांच्या त्या आद्यगुरु होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला शिवाजी महाराजांना जिजाबाईंनी स्फुर्ति दिली.

युध्दाभ्यास आणि रणनिती तसेच राज्यकारभार यासंबधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तरव्यवस्था व न्यायव्यवस्थेचे शिक्षण दादोजी कोंडदेव मलठणकर यांच्याकडून तर परकिय सत्तेविरुध्द लढा करण्याकरता आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण जिजाबाईंकंडून मिळाले असे मात्र उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरुन निश्चितपणे सांगता येते. जिजाबाई यांनी बाल शिवजींच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युध्दकला व राजनिती शास्त्राचे शिक्षण दिले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूढ इत्यादींच्या माध्यमातून बाल शिवबांच्या मनात प्राथमिक संत तुकाराम महाराज यांचे महत्वाचे मार्गदर्शनही शिवाजी राजांना लाभले होते.

छत्रपती शिवाजी राजांच्या सैन्यातील मावळ्यांनी शिवाजी राजांच्या सोबत हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मोठा सहभाग नोंदवला, सह्याद्रीच्या दोन डोंगर रांगाच्या मधल्या खोऱ्याला ''मावळ'' आणि खोऱ्यातील सैनिकांना ''मावळे'' म्हणत पुण्याखाली १२ आणि जुन्नर शिवनेरीखाली १२ अशी एकूण २४ मावळ आहेत. शिवाजी महाराजांचे मावळामधील सवंगडी आणि अन्य प्रसिध्द मावळे कान्होजी जेधे, बाजीप्रभु देशपांडे, मुरारबानी देशपांडे, नेताजी पालकर, बाजी पासलकर, जिवा महाला, तानाजी मालुसरे, हंबीरराव मोहिते हे होते.

इ. स. १६४७ मध्ये सतरा वर्षाच्या शिवाजी राजांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्याची मुर्हूतमेढ रोवली, तोरणागड हे स्वराज्याचे तोरणच ठरले. त्याच साली शिवाजीराजंनी कोंढाणा (सिंहगड) आणि पुरंदर हे किल्ले आदिलशहाकडून जिंकून पुणे प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शिवाय तोरणगडसमोरील मुरुंबदेवाचा डोंगर जिंकून त्याची डगडुजी केली व त्याचे नाव त्यांनी असे 'रायगड' ठेवले.

शिवाजी राजांच्या यशस्वी स्वाऱ्या बघून शिवाजी राजांना आळा घालण्याची एक युक्ती म्हणून आदिलशहाने

शहाजीराजांना अटक केली. शिवाय सुमारे ५००० फौज घेऊन फत्तेखान नावांच्या सरदारला शिवाजी राजांवर हल्ला करण्यास पाठवले. शिवाजी राजांनी पुरंदरावर फत्तेखानाचा पराभव केला. बाजी पासलकर सैन्यासकट पळत्या फत्तेखानाच्या पाठलागावर सासवडपर्यंत गेले. सासवडजवळ झालेल्या लढाईत बाजी पासलकरांचा मृत्यू झाला. शिवाजी महाराजांनी मोगल बादशहा शहाजहान यास त्याच्या दख्खनच्या सुभदाराकरवी पत्र पाठवून शिवाजीराजांसकट त्याच्या चाकरीत जायची इच्छा प्रकट केली. त्याचा परिणाम म्हणून शहाजहानाने आदिलशहावर दबाव आणला आणि परिणामी शहाजी राजांची सुटकी झाली. परंतु त्यासाठी शिवाजी राजांना कोंढाणा किल्ला आणि शहाजीराजांना बंगळूर शहर आणि कंदर्पीचा किल्ला आदिलशहाला द्यावा लागला.

आदिलशहाशी इमान राखणारा जवळीचा सरदार चंद्रराव मोरे शहाजीराजे आणि शिवाजी राजे यांच्या विरुध्द आदिलशहांकडे कुरापती काढत असे त्याला धडा शिकवण्यासाठी इ. स. १६५६ साली शिवाजीने रायरीचा किल्ला सर केला. त्यामुळे कोकण भागात स्वराज्याचा विस्तार झाला. इ. स. १६५९ पर्यंत शिवाजी राजांनी जवळपास पश्चिम घाटातील आणि कोकणातील चाळीस किल्ले जिंकले होते. आदिलशाहाच्या ताब्यात असणारे किल्ले जिंकत राहिल्यामुळे इ. स. १६५९ साली आदिलशहाने दरबारात शिवाजी महाराजांना संपविण्याचा विडा ठेवला. हा विडा दरबारी असलेल्या अफझलखान नावाच्या सरदारने उचलला.

मोठ्या सैन्यासह आणि लवाजम्यासह अफझलखान मोहिमेवर निघाला, अफझलखान वाईजवळ आला तेव्हा शिवाजी महाराजांना महाबळेश्वर जवळ असलेल्या प्रतापगडावरुन त्यास तोंड देण्याचे ठरविले. तहाची बोलणी सुरु झाली. आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महराजांनी स्वतः राजांच्या वकिलांनी (पंतजी गोपीनाथ बोकील) यांनी अफझलखानाला गळ घालुन प्रतापगडावरच भेट घेण्यास बोलावले. भेटीच्या नियमानुसार दोन्ही पक्षाकडून मोजकीच माणसे भेटीसाठी येतील आणि दरम्यान सर्वांनी निःशस्त्र राहण्याचे ठरले.

शिवाजीराजांना अफझलखानच्या दगाबाजपणाची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधगिरी म्हणून चिलखत चढविले आणि सोबत बिचवा तसेच वाघनखे ठेवली. बिचवा चिलखतामध्ये दडविला होता. तर वाघनखे हाताच्या पंजांच्या आतमध्ये वळविलेली असल्यामुळे दिसणारी नव्हती. शिवाजी महाराजंसोबत जिवा महला हा विश्वासु सरदार होता. तर अफझलखानासोबत सय्यद बंडा हा तत्कालीन प्रख्यात अशा दांडपट्टेबाज होता. प्रतापगडावरील. एका छावणीमध्ये भेट ठरली.

प्रतापगडामध्ये भेटीच्या वेळी उंचपुऱ्या, बलदंड अफझलखानने शिवाजी महाराजांना मिठी मारली आणि शिवाजी महाराजांचे प्राण कंठाशी आले. त्याच वेळी अफझलखानने कट्यारीचा वार शिवाजी महाराजांवर केला. परंतु चिलखतामुळे शिवाजी राजे वाचले. शिवाजीराजांनी वाघनखे खानाच्या पोटातून घुसवली त्याचबरोबर अफझलखानाची प्राणांतिक आरोळी चहुकडे पसरली.

सय्यद बंडाने तत्क्षणी शिवाजी राजांवर दांडपट्ट्याचा जोरदार वार केला. जो तत्पर जिवा महालाने सय्यद बंडाचा हात वरच्यावर उडवला. यामुळे शिवाजी राजांचे प्राण वाचले. यामुलेच " होता जिवा म्हणून वाचला शिवा" ही म्हण प्रचलित झाली, आधीच ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे भेटीच्या वेळी तीन तोफांचे बार प्रतापगडावरुन काढण्यात आले. आणि खानाच्या छावणीच्या जवळपासच्या झाडाझुडुपांमध्ये दडुन बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करुन खानाच्या सैन्याची दाणदाण उडविली. अफझलखानाचा मुलगा फाजलखान हा आणि इतर काही

सरदार लपुनछपुन वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचवण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले. शिवाजी राजांनी जनतेत मिळालेला आदर आणि प्रेम अनेक शतकानंतरही टिकून आहे. त्यामगचे त्यांनी सहिष्णुवृत्ती हे फार महत्वाचे कारण आहे.

अफझलखानच्या मुत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पध्दतीने करुन त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. अफझलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदारला कोकणपट्ट्यातील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठविले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसुन कोल्हापूरपर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापूरपर्यंत धडक मारली.

प्रतापगडाची लढाई ही महाराष्ट्रच्या इतिहासातील एक महत्वाची लढाई आहे. मराठे सैनिकांच्या तुकड्या प्रतापगडाच्या जंगलात दबा धरुन बसल्या होत्या. तोफा धडाडताच त्यांनी अफझलखानच्या सैन्यावर झपाट्याने काही कळायच्या आत आक्रमण केले. कान्होजी जेधे याने बंदुकधाऱ्यांवर आक्रमण केले. दुसऱ्या एका कमानीच्या हल्यात मुसाखान जखमी झाला व पळुन गेला. अफझलखानच्या सैन्याची वाताहत झाली. नेताजी पालकर यांच्या नेतृत्वाखाली मराठा घोडदळाने अफझलखानाच्या वाईच्या तळावर अचानक पणे हल्ला चढवला व तेथेही त्यांची वाताहत केली. आदिलशाही सेनेसाठी हा जबरदस्त पराभव होता.

शिवाजी महाराजांना अफझलखानाचा १० नोव्हेंबर १६५९ रोजी वध करुन त्यांच्या सेनेचा प्रचंड धुव्वा उडवला व काही दिवसातच अतिशय आक्रमक भुमिका घेऊन अनेक किल्ले आपल्या अखत्यारीत घेतले डिसेंबर १६५९ मध्ये शिवाजी कोल्हापूर नजीक पन्हाळ्यानजीक पोहचले व या सुमारास आदिलशाही सरदार रुस्तमजमान मिरजेपाशी पोहोचला. रुस्तमजमानकडे अनेक मातब्बर सरदार होते. फाजलखान, मलिक, इत्बार, सादतखान, याकुबखान, हासन खान, संताजी घाटगे इत्यादी व त्याचे सैन्यबळही मोठे होते.

शिवाजी महाराजांच्या सेनेत नेताजी पालकर, हणमंतराव खराटे, हिरोजी इंगले, भिमाजी वाघ इत्यादी सरदार होते. शिवाजी महाराज पन्हाळ्यावर आहेत असे कळाल्यानंतर पन्हाळावर आक्रमण करण्याच्या बेतात रुस्तमजमान होता परंतु २८ डिसेंबरला पहाटेच अचानकपणे शिवाजी महाराजांनी रुस्तमजमानच्या सेनेवर जोरदार हल्ला चढवला. पूर्ण जोरदार हल्ला न चढवता पुढून मागून आजुबाजूने तुकड्यांनी हल्ले चढवले व आदिलशाही सेनेला नामोहरम केले. रुस्तमजमान रणागंण सोडून पळून गेला...!

विनोद

- बबन : माझे पप्पा इतका गरम चहा पितात की मम्मीने कपात ओतल्याबरोबर गटगट पिऊन टाकतात.
- मगन : हे तर काहीच नाही, माझे पप्पा इतका गरम चहा पितात की चहा गाळणी तोंडाला लावून पातेल्यातील चहा थेट घशात ओततात.
- छगन : अरे हे तर काहीच नाही माझे पप्पा तर आधी पाणी पितात , मग दूध पितात, मग चहापत्ती खातात व डायरेक्ट गॅसवर जाऊन बसतात.

कु. भारती धारा
बी. ए. भाग-१

ओरिसा, कलकत्ता : अविस्मरणीय प्रवास



कु. अश्विनी काशिद
बी. ए. भाग -१

आपला भारत देश जसा निसर्ग सौंदर्याने नटला आहे. तसा ऐतिहासिक वारशाने समृध्द झालेला आहे. अशा भारताचा प्रवास करणं म्हणजे देशाच्या विविधतेचं दर्शन करण्यासारखं आहे. अशा भारतातील ओरिसा व कलकत्ता या शहरातील प्रवास वर्णनीय आहे. या दोन शहराचा मी कुटूंबासहीत प्रवास केला. आपल्या सोलापूरमधुन ही दोन्ही ठिकाण खूपच दूर आहेत. भारतीय रेल्वे ही सामान्यांच्या खिशाला परवडणारी आहे. त्यामुळे एखाद्या दूरवरचा प्रवास करण्यासाठी वेळ फार लागतो पण प्रवास कमी खर्चात होतो. याचा अनुभव ओरिसा व कलकत्ता येथेपर्यंतच्या रेल्वे प्रवासाना आला. सर्वप्रथम आम्ही ओरिसामध्ये गेलो.

ओरिसा हे राज्य निसर्ग, सौंदर्य शिल्पकलेच्या सौंदर्याने नटलेले आहे. या राज्याचा असा इतिहास सांगितला जातो की, ओरिसा हे राज्य ओडवंशीय राजा औड्रा यांनी वसवले आहे. ओरिसामधील अनेक मंदिरपैकी कोणार्कचे सुर्यमंदिर एक आहे. हे मंदिर भारतभर प्रसिध्द आहे. आम्ही जेव्हा या मंदिरात पोहोचलो तेव्हा या मंदिराची रचना मंदिरापासून थोड्या अंतरावर असलेला समुद्रकिनारा मंदिराची प्रचंड उंची व येथील लोकांची गर्दी पाहून भारावून गेलो. तिर्थस्थळाच्या ठिकाणी अनेक व्यवसाय तेजीत असतात. त्याला कोणार्क मंदिर ही अपवाद नव्हते. भुवनेश्वरजवळ असणारी उदयगिरी गुफा ही सुद्धा प्रेक्षणीय वाटली. आम्ही जेव्हा या गुंफेत पोहोचलो तेव्हा घाबरुन गेलो. दगडात कोरलेली ही गुंफा आहे. मार्गदर्शकाने जी माहिती दिली त्यानुसार कलिंगराजा खारवेल याने लिहीलेला जो शिलालेख येथे आहे. तो ब्राह्मी लिपीत लिहिलेला आहे. १३५ फूट उंच असलेला हा पर्वत पाहून डोळे गरागरायला लागले होते. येथील गुफा जैन मंदिरासारखी आहे. या गुफेमधून जवळ खंडगिरी गुंफा आहे. येथे आणखी १५ गुंफा आहेत.

ओरिसामधील चिलकासरोवर हेही प्रेक्षणीय आहे. चिलका सरोवर हे ओरिसाचे मुख्य आकर्षण आहे. यामुळे आम्ही या सरोवरला भेट दिली. भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून चिलका सरोवर ओळखले जाते. पण पावसाळ्यात येतील पाणी गोड असते. लिंगराज मंदिर व धौलीगिरी, शांतीस्तूप येथेही आम्ही भेट दिली होती. लिंगराज मंदिराचे सौंदर्य पाहण्यासारखे आहे. या मंदिरात मोठे शिवलिंग आहे. स्थापत्य कलेचा उत्तम नमुना म्हणून या मंदिराचा उल्लेख केला जातो. धौलीगिरी येथेही प्राचीन शिवमंदिर असून ते महाशिवारात्री वेळेस लोकांसाठी खुले केले जाते.

आम्ही भेट दिलेलं आणखी एक शहर म्हणजे कलकत्ता. पूर्वीचा पश्चिम बंगाल व सध्याच्या बंगाल राज्याची ही राजधानी आहे. हिमालयात उगम पावलेली गंगा नदी या शहरातून पुढे जाऊन बंगालच्या उपसागराला मिळते बंगालमध्ये ही नदी हुगळी नदी म्हणून ओळखली जाते. कलकत्त्याला सिटी ऑफ जॉप

म्हणूनही ओळखले जाते. कलकत्ता शहरात ब्रिटीश साम्राज्याच्या खुणा पाहायला मिळतात यामध्ये हावडा पूल व्हिक्टोरीया मेमोरियल आणि ईडन गार्डनचा उल्लेख करता येईल. हावडा ब्रिज हा सहा पदरी असून या ब्रिजवर वाहनांची प्रचंड गर्दी असते. हुगळी नदीवर असलेला हा ब्रिज प्रचंड अवाढव्य आहे. हा ब्रिज फक्त लोखंडाचामधून बनवलेला आहे. यासाठी २६५०० स्टील वापरले आहे. व्हिटोरिया मेमोरियल पाहण्यासारखं आहे. इ. स. १९०६ ते १९२१ याकाळात याचे बांधाकाम झाले आहे. संगमरवरचा भरपूर वापर केला आहे. व्हिक्टोरिया मेमोरियलला अष्टभुजाकार टेरेस आहे. उंच प्रवेशद्वार आहे. यामध्ये २५ गॅलरी आहेत. यापैकी रॉयल गॅलरी, नॅशनल लिडर गॅलरी, पोट्रेट गॅलरी, सेंटल हॉल व कलकत्ता गॅलरी या प्रमुख आहेत. या वास्तुमध्ये ब्रिटीश व मोगल वास्तुशैलीचे मिश्रण पाहायला मिळते. याशिवाय भारतातील सर्वात मोठे क्रिकेट मैदान ईडन गार्डन कलकत्ता शहरात आहे. ते पाहताच या मैदानावार झालेल्या काही सामन्यांची आठवण आली, कालीमातेचे मंदिर तर भारतभर प्रसिध्द आहे. तीन मजली असलेले हे मंदिर प्रेक्षणीय तर आहेच पण येथील वातावरण भक्तीरसाने भारावलेले वाटते. या मंदिराचा परिसर वीस एकराचा आहे. हुगळी नदीच्यातिरी असलेल्या बेलूरमठाला आम्ही भेट दिली तेव्हा तेथील रमणीय दृष्य व कलात्मकतेने भारलेलं वातावरण वाटले. या वास्तुकलेत हिंदु - मुस्लिम व ख्रिचन या तीन धर्माचा संगम झाल्याचे पाहवायास मिळते. सर्व धर्माला जोडण्याचे काम या मठाने केले आहे. बेलूर मठ राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिकही मानतात. हा मठ म्हणजे समाजकार्याचे मुख्यालयच आहे. याशिवाय कलकत्त्यामधील साईन्स सिटी, कालिघाट व जगन्नाथ पुरी ही ठिकाणे वैशिष्ट्येपूर्ण आहेत. सामान्य लोकांमध्ये विज्ञानबद्दल आवड निर्माण करण्येच काम साईन्स सिटी करते. कालिघाट अध्यात्माचे केंद्र आहे तर जगन्नाथपुरी हे चारधाम पैकी एक आहे.

ओरिसा व कलकत्ता येथील प्रवास कुतूहलपूर्ण साहसपूर्ण व वेगळ्या विश्वात घेऊन जाणारा वाटला. भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत. की तिथे भेट दिल्यास आपण खूप सुंदर देशाचे नागरिक आहोत याचे समाधान मिळते त्यापैकीच ओरसा व कलकत्ता ही ठिकाणे आहेत....

विनोद

सर : होमवर्क का नाही केले ?
बंडु : सर लाईट गेली होती.
सर : मेणबत्ती लावयची मग ?
बंडु : काडीपेटी नव्हती.
सर : का ?
बंडु : देवघरात होती.
सर : घ्यायची मग.
बंडु : अंघोळ नव्हती केली?
सर : का?
बंडु : पाणी नव्हतं.
सर : का?
बंडु : मोटार चालु होत नव्हती.
सर : का ?
मुलगा : आधीच सांगितलं ना लाईट गेली म्हणून...

कु. भारती धारा
बी. ए. भाग-१

प्रेम

प्रेम म्हणजे प्रेम असतं
प्रेमात सर्व काही क्षम्य असतं
प्रेम हे आंधळ असतं
प्रेमामध्ये सर्वकाही माफ असतं
प्रेम हे भावनाचं मंदिर असतं
प्रेम हे एकमेकांमधील घालमेल असतं
प्रेम एक समजूतदारपणांच लक्षण असतं
प्रेमात सर्वकाही करुन दाखवावं लागतं
प्रेम हे करुणामय असतं
प्रेमामध्ये सुख दु:ख, भावना,
यातनां सगळ्या गोष्टी सहन करण्याची ताकद येते
प्रेम हे वेडेपणाचं लक्षण आहे
प्रेम हे प्रत्येक माणसाच्या मनात असतं
प्रेम हे अस नातं आहे
त्याला कशाची देखील तोड नाही म्हणून,
प्रेम हे अमर आहे

कु. पुनम गायकवाड
बी. ए. भाग - २

माती

आईच्या पोटी नऊ महिने राहतो
जन्म घेऊन मोठे होतो,
भूमातेच्या गर्भातून रोप म्हणून
आलास बाहेर हळूचं हसतोस.
मुलगा वाढत आहे याचा आनंद
माझा मुलगा हाताला येईल
महाविद्यालयात पीएच.डी संशोधन केंद्र आहे. या केंद्रामार्फत मराठी, इतिहास, इंग्रजी या विषयात व वाणिज्य शाखेतील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. या केंद्रातून संशोधक विद्यार्थी पीएच.डी. चे संशोधक करत आहेत. यंदाच्या वर्षी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सचिन चौधरी, कु. सुप्रिया शिंदे व श्री. सुनिल मोरे, डॉ. श्रृती वडगबाळकर यांच्या मार्गदर्शनखाली कविता मुरुमकर आणि डॉ. ॲनी जॉन यांच्या मार्गदर्शनखाली गुलरेज मड्डी श्री. विजयकुमार म्हमाणे यांना पीएच.डी पदवी प्राप्त झाली.

प्रमुख
डॉ. ॲनी जॉन

३. ग्रंथालय विभाग

महाविद्यालयातील ग्रंथालय विभागात शब्दकोश, संदर्भ ग्रंथ, कथा, कविता संग्रह, चरित्र ग्रंथ व कादबंऱ्या मुबलक आहेत. चालू शैक्षणिक वर्षात यामध्ये नामवंत लेखकाचे साहित्य, ऐतिहासिक, संशोधन, अर्थविश्व, वाणिज्य इत्यादी विषयावरील ग्रंथाची भर पडली आहे. यामुळे ग्रंथालय अधिक समृध्द झाले आहे. आज ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व वाणिज्य या विषयाशी संबंधीत ४२ मासिके व नियतकालिके आहेत. १४००० हून अधिक विविध विषयावरील ग्रंथ आहेत. ग्रंथलयामार्फत विद्यार्थींना वायफाय व टॅब्लेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थींनी या सुविधांचा उपयोग करुन आपले ज्ञान अद्यावत करत असतात. ग्रंथालयातील ग्रंथ व उपलब्ध सुविधांचा अधिकाधिक उपयोग करणाऱ्या विद्यार्थींनीला दरवर्षी उत्कृष्ट वाचक हा पुरस्कार देण्यात येतो. यंदाच्या वर्षी हा मान बी.ए.भाग-३ मध्ये शिकत असलेली कु. सावित्री तुळशीदास कदम या विद्यार्थींनीला मिळाला आहे. कु. सावित्री कदम या विद्यार्थींनीला ग्रंथपरिक्षण स्पर्धेत रु. ५०१/- च्या बक्षिसासह प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

प्रमुख
सौ. सविता मल्लाडे

* स्पर्धा परिक्षा विभाग *

महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा विभाग विद्यार्थींनींना विविध प्रकाराच्या स्पर्धा परिक्षेत सहभागी होण्यासाठी सतत प्रोत्साहन देतो. यामुळे यंदाच्याही वर्षी महाविद्यालयातील विद्यार्थींनींनी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवला आणि यशही प्राप्त केले. सोलापूर विद्यापीठाकडून विद्यार्थीमधील संशोधनवृत्तीला प्रोत्साहन मिळावे यासाठी अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रातील श्रीनिवास बोगम यांच्या सादरीकरणास विद्यापीठ आणि राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाला तर बी.ए.भाग-३ मध्ये शिकत असलेली कु. खानसा मुश्ताकअहमद मुचाले या विद्यार्थींनीच्या सादरीकरणास विद्यापीठस्तरावर व्दितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनकडून गांधी विचार संस्कार परिक्षा घेण्यात आली होती. महाविद्यालयातील २०० विद्यार्थींनी या परिक्षेस बसल्या होत्या. त्यापैकी बी.कॉम-१ मधील कु. दीपिका मोहन गोसकी या विद्यार्थींनीला सोलापूर जिल्ह्यात प्रथम आणि बी.कॉम भाग-२ मधील कु. मंजुषा गंपले या विद्यार्थींनीस व्दितीय क्रमांक प्राप्त झाला.

प्रमुख
डॉ. प्राजक्ता जोशी

* सांस्कृतिक विभाग *

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग विद्यार्थींनीच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सतत उपक्रम राबवत असतो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या युवक महोत्सवात २२ कलाप्रकारात विद्यार्थींनींनी भाग घेतला होता. यापैकी एकांकिका या कलाप्रकारात कु. तुलसी जाधव (बी.कॉम-२) या विद्यार्थींनीला स्त्री अभिनयाचे तृतीय क्रमांकाचे आणि मिमिक्री कला प्रकारात कु. ऋषिता भालेराव (बी.ए.३) या विद्यार्थींनीलाही तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

प्रमुख
डॉ. तुकाराम शिंदे

* अर्थ-वाणिज्य मंडळ *

महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळ कार्यरत आहे. या मंडळामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. व्याख्याने आयोजित करण्यात आली. विविध परिषदामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थीनीना प्रोत्साहन देण्यात आले. या मंडळामार्फत सत्रारंभी Consumer Guidance Society of India Mumbai यांच्या सहकार्याने How to manage money and be a Smart Invester या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांचे 'व्यवस्थापनातील नव्या वाटा' डॉ. राजशेखर येळीकर यांचे 'अर्थसाक्षरता' आणि डॉ. एम.जी मुल्ला यांचे 'गुंतवणूकीची विविध माध्यमे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. बी. कॉम-३ या वर्गातील १०० विद्यार्थीनींनी सिध्देश्वर टेक्स्टाईल, एम.आय.डी.सी. सोलापूर येथे भेट दिली. आयसीएआयकडून घेण्यात आलेल्या टॅलेंट सर्च टेस्ट इन कॉमर्स या परिक्षेस वाणिज्य शाखेतील १८ विद्यार्थींनी उपस्थित होत्या. सोशल आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज सोलापूरकडून आयोजित जागतिकीकरण आणि आधुनिक व्यवस्थापन याविषयावरील कार्यशाळेत वाणिज्य विभागातील १० विद्यार्थींनी सहभागी झाल्या होत्या. सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे १३ वे वार्षिक अधिवेशन महाविद्यालयात आयोजित केले होते. 'काळा पैसा : विमुद्रीकरण व अर्थव्यवस्था' हा या अधिवेशनचा विषय होता. या अधिवेशनाचे उद्घाटन विचारवंत डॉ. अजित अभ्यंकर यांच्या शुभहस्ते झाले होते. सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी एकूण ३० शोधनिंबध यावेळी सादर केले. वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शिवानंद भांजे, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शिरीष भोसले, डॉ. शंकर राजे, प्रा. श्रीनिवास गुंडेली, प्रा. नादरगी, प्रा. मयुर हिरेमठ हे वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

प्रमुख
डॉ. शिवानंद भांजे

* स्टाफ अॅकॅडमी विभाग *

महाविद्यालयात स्टाफ अॅकॅडमी आहे. या विभागामार्फत प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित केली जातात. यावर्षी डॉ. संजय लांडगे यांचे विश्वनिर्मितीचे रहस्य डॉ. शिरीष भोसले यांचे अर्थनियोजन व भारतीय समाज डॉ. पी.आर. वाघमारे यांचे इंग्रजी कथेतील मिथकांचा विचार आणि डॉ. आर. के. वडजे यांचे संत कबीरजी की जीवनधारा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

प्रमुख
डॉ. संजय लांडगे

* करिअर गाईडन्स व जॉब प्लेसमेंट हा विभाग *

महाविद्यालयात करिअर गाईडन्स व जॉब प्लेसमेंट हा विभाग आहे. या विभागमार्फत स्पर्धा परिक्षेसाठी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले जाते. आठवडयातील चार दिवस मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. मुलाखतीला सामोरे जाताना याविषयावर श्री. सचिन जाधवर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. रोजगार मेळावा घेण्यात आला. डॉ. अशोक एक्कलदेवी व डॉ. पी.आर. वाघमारे हे या विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

प्रमुख
डॉ. अशोक एक्कलदेवी

* स्त्री अभ्यास केंद्र *

महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आहे. या विभागाचे काम डॉ. रजनी दळवी पाहतात. विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबर त्यांना स्वयंरोजगार मिळावा, विद्यार्थीनीमध्ये धाडस यावे आणि त्यांना स्वत:चे रक्षण करता यावे यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यादृष्टीने १० दिवसाचे लघुउद्योजक शिबीर आयोजित केले होते. यामध्ये २०० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. त्याचबरोबर Empowerment of girls to Face challenges of 21st Century या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. जोडीदार कसा असावा या विषयावर डॉ. मंजुश्री कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यासर्व उपक्रमासाठी फॅमिली ऑफ इंडिया शाखा सोलापूर ग.ल. काकडे फाऊंडेशन आणि अखिल भारतीय जैन संघटना यांचे सहकार्य लाभले होते.

प्रमुख
डॉ. रजनी दळवी

* विवेकवाहिनी केंद्र *

विद्यार्थीनीमधील अंधश्रध्दा कमी व्हाव्यात त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी विवेकवाहिनी केंद्र कार्यरत आहे. यंदाच्या वर्षी या विभागाचे उद्घाटन श्री. ब्रम्हानंद धडके यांच्या शुभहस्ते झाले. सौ. निशा भोसले यांचे विवेकी विचार व अंधश्रध्दा निर्मूलन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. वक्तृत्व व पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. जागर सप्ताहनिमित्त अंधश्रध्दा निर्मूलनाविषयी प्रात्यक्षिकाचे प्रयोग दाखविण्यात आले. या विभागमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमासाठी प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शंकर राजे, डॉ. पी.आर. वाघमारे आणि डॉ. आर.के. वडजे यांचे उत्तम सहकार्य लाभते.

प्रमुख
डॉ. संजय लांडगे

* जिमखाना विभाग *

महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग हा सतत कार्यशील असणारा विभाग आहे. महाविद्यालयाच्या पुनर्मुल्यांकनासाठी आलेल्या नॅक कमिटीने या विभागाच्या कामाचे विशेष कौतुक केले होते. या विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थीनी खेळाडूंना राष्ट्रीय, राज्य, जिल्हा स्तरावरील विविध प्रकारच्या खेळ प्रकारात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते, त्यांची तयारी करुन घेतली जाते. यामुळेच विद्यार्थीनी विविध खेळात प्राविण्य मिळवतात. विविध ठिकाणी आयोजित केलेल्या स्पर्धेसाठी त्यांची निवड होते. पारंपारिक खेळ प्रकाराबरोबर बॉक्सींग, तायक्वांडो, कराटे, ज्युडो मार्शल आर्टस्, क्रिकेट, हँडबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल व ॲथलेटीक्स अशा खेळप्रकारतही भाग घेतात. महाविद्यालयाने यंदाच्या वर्षी योगासन व जलतरण स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक प्रकारात सलग तिसऱ्यांदा अंजिक्यपद पटकावले. पॉवर लिफ्टींग या खेळ प्रकारात कु. मोनिका गुंडाळे व कु. अंबिका मंजा या विद्यार्थीनी खेळाडूंनी यश संपादन केले. आंतरविद्यापीठ फेन्सींग स्पर्धेसाठी कु. सौंदर्या मच्छा, अंबिका मंजा व शुभांगी कोंडा, भुवनेश्वर येथे झालेल्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी कु. पौर्णिमा पुकाळे (बी.कॉम-२) कु. शिवबाई हेगडे (बी.कॉम-२), उदयपूर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ हँडबॉल स्पर्धेसाठी कु. अंबिका पेंटा (बी.ए.-३) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी कु. सोनाली मुनगापाटील(बी.ए.-१) नांदेड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी कु. काजल इंब्रापूरे (बी. कॉम-२) या विद्यार्थीनी खेळाडूंची निवड झाली होती. कु. तुलसी जाधव (बी.कॉम-२) व मोनिका मुंजाळ या विद्यार्थीनी खेळाडूंची अमृतसर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी सोलापूर विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल संघात निवड झाली आहे.

याचबरोबर वेगवेगळें ठिकाणी झालेल्या योगासन स्पर्धेत कु. तुलसी जाधव कु. शिवबाई हेगडे, पौर्णिमा पुकाळे, कु. गौरी पासकंटी कु. देविका हबीब व भावना समारंभ आणि जलतरण स्पर्धेत कु. सोनिया पुलगम, कु. आरती मिड्डा, कु. देविका हबीब, कु. पूजा शिंदे, सोनम काशीद व रुक्मिणी कोळी या विद्यार्थीनी खेळाडू सहभागी झाल्या होत्या. या विभागाच्या प्रमुख डॉ. रजनी दळवी नेहमी आपल्या कामाबाबत दक्ष असतात.

प्रमुख
डॉ. रजनी दळवी

* इतिहास अभ्यास मंडळ *

महाविद्यालयामध्ये इतिहास विभागचे इतिहास अभ्यास मंडळ कार्यरत आहे. या मंडळामार्फत विविध उपक्रम राबवले जातात. थोर महापुरुषांची जयंती पुण्यतिथीनिमित्त तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. या शैक्षणिक वर्षात राजर्षि शाहू महाराज यांची अर्थनीती विषयावर डॉ. संतोष कदम यांचे व्याख्यान आयोजित केले होते. क्रांतीदिनानिमित्त डॉ. टी.एन. शिंदे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. सामाजिक शास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून दि. ०२/१२/२०१७ रोजी उत्तरसंगकुडल जि.द. सोलापूर येथे शिलालेखासंदर्भात एकदिवशीय चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रामध्ये डॉ. साईनाथ कबाडे आणि इतिहास विभागाच्या १० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर येथे दि. २३/०१/२०१८ रोजी विद्यार्थी इतिहास परिषदेचे १५ वे अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनात इतिहास विभागाच्या ५ विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी कु. सोनाली जिंदे हिने सादर केलेल्या शोधनिंबधास तृतीय क्रमांक प्राप्त झाला होता. त्याचबरोबर इतिहास विभागाकडून मोडी व ब्राम्ही लिपी वर्ग ०१/१०/२०१७ ते ३/१२/२०१७ या कालावधीत घेण्यात आला. यामध्ये १६ विद्यार्थीनीनी मोडी व ब्राम्ही लिपीचे प्रशिक्षण घेतले. इतिहास अभ्यास मंडळामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी डॉ. साईनाथ कबाडे, प्रा. अश्विनी राऊत आणि प्रा. गौरी भोसले नेहमी प्रयत्नशील असतात.

प्रमुख
डॉ. टी. एन. शिंदे

* राष्ट्रीय सेवा योजना विभाग *

महाविद्यालयातील पूर्ण कार्यक्षमतेने काम पाहणारा राष्ट्रीय सेवा योजना हा एक विभाग आहे. राष्ट्रीय सेवा योजनेत २०० स्वंयसेविका सहभागी आहेत. चालू शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. चालू शैक्षणिक वर्षात या विभागाकडून महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करणे, आंतरराष्ट्रीय योगदिन, गुरुपौर्णिमा, क्रांतीदिन, स्वातंत्र्यदिन, सद्भवना दिवस, जागतिक महिला दिवस, साक्षरता दिवस, आंतरराष्ट्रीय शांतता दिवस, प्रजासत्ताक दिन, जागतिक जलदिन, जागतिक आरोग्य दिन आणि दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन साजरा करण्यात आला. जागतिक वनसंवर्धन दिनानिमित्त दत्तक गाव कर्देहळ्ळी व महाविद्यालय परिसरात ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. प्लॅस्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून टाकाऊ कापडापासून टिकाऊ कापडी पिशव्या बनवणे या उपक्रमांतर्गत १२०० पिशव्या तयार करण्यात आल्या. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त महाअवयवदान व जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित रॅलीमध्ये रा.से. यो.च्या स्वंयसेविका सहभागी झाल्या होत्या. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात महाविद्यालय सहभागी असून दर बुधवारी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येतो. सोलापूर महानगरपालिकेकडून स्वच्छ महाविद्यालय स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून पूर्ण ताकदीनिशी उतरले होते. यासाठी परिसर स्वच्छता, प्लॅस्टिकचा वापर न करण्याबाबत जागृती, स्वच्छता प्रभात फेरी, घोषवाक्य स्पर्धा, पोस्टर स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

विद्यार्थीनीमध्ये निबंध, वक्तृत्व, पोस्टर, घोषवाक्य, चित्रकला रांगोळी इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रा.स.यो.च्या स्वयंसेविकेंनी जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील विविध शिबीरात सहभाग नोंदवला. खेल व युवा मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून जयपूर येथे आयोजित केलेल्या युवा महोत्सवात कु. सोनाली पवार (बी.कॉम-२) ही स्वंयसेविका सहभागी झाली होती. रा.से.यो.कक्ष महाराष्ट्र राज्य, मुंबईकडून सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय शिबीरात कु. रुक्मिणी कोळी (बी.ए.-२) ही स्वंयसेविका सहभागी झाली होती. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित आपत्ती व्यवस्थापन शिबीरात कु. मंजुषा गंपले (बी.कॉम-२) ही स्वयंसेविका सहभागी झाली होती.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे. कर्देहळ्ळी ता. द. सोलापूर येथे आयोजित केले होती. आपत्ती निवारण आणि व्यवस्थापनातील युवकांची भूमिका हा उद्देश घेऊन आयोजित केलेल्या या शिबीरात प्रबोधनात्मक कार्यक्रम, व श्रमदानातून ग्रामस्वच्छता हे उपक्रम राबविण्यात आले. तज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. शेतकरी मेळावा, महिला व युवती मेळावा आयोजित केला होता. ग्रामस्थांच्या मदतीने १९० शौचालये बांधण्यात आली. रक्तदान शिबीरात ४० जणांनी रक्तदान केले. स्वच्छता उपक्रमातंर्गत श्रमदानातून गावातील रस्ते, शासकीय शाळा, मंदिर, मस्जिद, समाज मंदिर व गावातील गटारी इ. ठिकाणे स्वच्छ करण्यात आली. ग्रामस्थांचे मनोरंजनातून प्रबोधन करण्यासाठी भारुड व संगीत रजनी हा सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आला होता.

प्रमुख	प्रमुख
डॉ. रजनी दळवी	डॉ. आर. के. वडजे

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या
पद्मप्रतिमा वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा।

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

Agents Code No. - 04672944



संतोषकुमार एस. येमुल
सदस्य अभिकर्ताओं के लिए अध्यक्ष कल्ब
Santoshkumar S. Yemul
Member Chairman's Club for Agents

Mob. : 9325262123, 9822132865

प्रोप्रा. प्रकाश भि. ढंगे
मोबा. : ९९२२१२३५९९
: ९८२२७६४४५६

ढंगे
स्टील इंडस्ट्रीज

• स्टील कपाट (स्टोरवेल) • ऑफीस टेबल, खुर्ची •
• स्कूल बेंचेस हॉस्पिटल कॉट व इतर होम ॲप्लायन्सेस् •

• शोरुम : १५१/५, रविवार पेठ, कन्ना चौक, बाळी मंगल कार्यालय, पूर्व विभाग सार्व. वाचनालय कॉम्पलेक्स, सोलापूर.
• फॅक्टरी : १०/४, घोंगडे वस्ती, गुरुदत्त चौक, सोलापूर.

जगदिश व्ही. हबीब
सुनिल व्ही. हबीब

सुनिल
प्रिंट & बायडिंग

• गोल्ड एम्बॉसिंग
• स्पायरल बायडिंग
• कलर प्रिंट डिजीटल झेरॉक्स
• सर्व प्रकारचे क्वालिटी बायडिंग
• लॉ बुक बायडिंग स्पेशालिस्ट
• पी.एच.डी. ॲन्ड मेडिकल थीसेस बायडिंग

९३८, रविवार पेठ, राजेंद्र चौक, बी. वाय. टेलर जवळ,
सोलापूर - ५. (दु.) ०२१७ - २३२१७५
मोबा. : ९३२६१६१७९६, ९३७०४१२१७५

पद्मशाली शिक्षण संस्था विविध शाखांची यादी

महाविद्यालय विभाग

१. अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय
२. कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय
३. कुचन कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय विभाग
४. सौ. भुदेवीबाई मल्लय्या पुल्ली प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय
५. रामकृष्णपंत बेत रात्र कनिष्ठ महाविद्यालय
६. देविदास न. बत्तीन तांत्रिक प्रशिक्षण विभाग

माध्यमिक विभाग

१. कुचन प्रशाला
२. कुचन प्रशाला - तेलुगू विभाग
३. सौ. भुदेवीबाई मल्लय्या पुल्ली कन्या प्रशाला
४. जनाबाई जनार्दन बिटला माध्यमिक प्रशाला (विडी घरकुल)
५. रामकृष्णपंत बेत रात्र प्रशाला
६. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम स्कूल

प्राथमिक विभाग

१. नारायणराव कुचन प्राथमिक शाळा
२. राजमल ना. बोमड्याल प्राथमिक शाळा
३. रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळा
४. रामव्वाबाई रा. बुर्ला प्राथमिकशाळा
५. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल

बालक मंदिर विभाग

१. भूदेवीबाई कटकम बालक मंदिर
२. भारतीबाई रा. बोमड्याल बालक मंदिर
३. भुदेवीबाई रामदास इप्पाकायल बालक मंदिर
४. रामव्वाबाई रा. बुर्ला बालक मंदिर
५. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम स्कूल

पद्मशाली शिक्षण संस्था

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

तज्ञ प्राध्यापक वर्ग

अ.क्र.	अधिव्याख्यात्यांचे नांव	शैक्षणिक अर्हता	पदनाम
१.	डॉ. राजेंद्र नारायणराव शेंडगे	M. Com., Ph. D., D. Litt.	प्राचार्य
२.	डॉ. सौ. प्राजक्ता प्रकाश जोशी	M.A., M. Phil., Ph .D.	हिंदी विभाग प्रमुख
३.	डॉ. ॲनी जॉन	M.A. (English), M.A.(Sub-Communication), D. H.E., M.B.A., Ph. D.	इंग्रजी विभाग प्रमुख
४.	प्रा. सुरेखा नरहरी वत्तुल	M. A. (History), M. A. (A.I.H.C.), B. Ed.	प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती विभाग
५.	डॉ. शिवानंद बाबुराव भांजे	M. Com., M. Phil., B. Ed., M. C. A., D.M.M., D.D.C. & A., Ph.D.	वाणिज्य विभाग प्रमुख
६.	डॉ. शिरीष नागनाथ भोसले	M.A., B. Ed., Ph. D.	अर्थशास्त्र विभाग
७.	डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	M. P.Ed., M. A. (English), M. A. (Sub Communication), Ph. D.	शारीरिक शिक्षण संचालिका
८.	डॉ. संजय संभाजी सांडगे	M.A., NET, Ph. D., Hindi Pandit	मराठी विभाग प्रमुख
९.	प्रा. रंजना वसंत बनसुडे	M. Com. (Sub Communication), M. Phil., M. Com. (Sub Communication)	वाणिज्य विभाग
१०.	डॉ. अशोक शिवाजी एकसदेवी	M.A., B. Ed., M. P. SLET., Ph. D.	समाजशास्त्र विभाग
११.	डॉ. तुकाराम नारायण शिंदे	M.A., SET, Ph.D.	इतिहास विभाग प्रमुख
१२.	डॉ. शंकर शिवाजी राजे	M.A. M.Phil., Ph. D., M.A. (Pol. Science), M. A. (Sub Communication)	अर्थशास्त्र विभाग
१३.	डॉ. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	M.A., NET, Ph. D.	इंग्रजी विभाग
१४.	प्रा. सौ. सविता शशिकांत मळ्ळाडे	M. A. M. lib, M. Phil., I.S.C., M.A. (Sub Communication)	ग्रंथपाल
१५.	डॉ. राजेंद्र कैलास वडजे	M. A. M. Phil., NET, Ph. D.	हिंदी विभाग
१६.	डॉ. तुकाराम विठ्ठल शिंदे	M.A., B. Ed., Ph. D.	भूगोल विभाग
१७.	प्रा. सी. ए. श्रीनिवास रामदास गुंडेसी	M. Com. F.C.A., D.I.S.A. (ACICAI)	वाणिज्य विभाग

कार्यक्षम शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

अ.क्र.	शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नांव	शैक्षणिक अर्हता	पदनाम
१.	श्री. व्यंकटेश महेशम गाजूल	B. Com.	अधिक्षक
२.	सौ. संजीवनी नरेशकुमार सावुल	H. S. C.	मुख्य लिपीक
३.	श्री. शिवाजी सदाशिव चिंता	B. Com.	वरिष्ठ लिपीक
४.	श्री. अनिल राजाराम सन्गम	H. S. C.	कनिष्ठ लिपीक
५.	श्री. सत्यनारायण मल्लय्या गजेली	B. A. M.Lib. & I. Sc.	कनिष्ठ लिपीक
६.	श्री. महेश रेवणसिध्द घागरे	H. S. C.	ग्रंथालय परिचर
७.	श्री. संतोष धोंडीराम मालतुमकर	H. S. C.	ग्रंथालय परिचर
८.	श्री. प्रभाकर लक्ष्मण धोत्रे	IX	शिपाई
९.	सौ. उमा अंबादास कुडक्याल	H. S. C.	शिपाई
१०.	श्री. रमाकांत विठ्ठल म्हेसूर	SSC	शिपाई

डॉ. सौ. प्राजक्ता जोशी

डॉ. अॅनी जॉन

प्रा. सुरेखा बत्तुल

प्रा. रंजना वनसुडे

डॉ. सौ. रजनी दळवी

डॉ. राजेंद्र वडजे

पद्मप्रतिमा अंकास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

श्री. मल्लिनाथ भिमराव सोरेगांव यांच्या व्यवस्थापने खाली

संगम रेस्टॉरेंट अॅन्ड स्वीटस्

स्पेशल : सोलापूरी स्वादिष्ट वडा पाव आणि पावभाजी

फक्त ६० रु. राईस प्लेट तयार आहे.

स्वीटस् गुलाबजामुन, लाडु, पेढा, कुंदा, जिलेबी, बालुशाही, खाराबुंदी, म्हैसुर पाक, बासुंदी.

नाष्टा शिरा, उप्पीट, मसाला डोसा, ईडली वडा, स्पेशल पुरीभाजी, टोमॅटो आम्लेट, कचोरी, समोसा, पावचटणी, खमंगदार भजी

चविष्ट, उत्कृष्ट नाष्टा व जेवणासाठी एकदा अवश्य भेट द्या. | कन्ना चौक, सोलापूर मोबा. : ९८८१४२६६८७

मासिक सदस्य नोंदणी चालू आहे.

LBP ACADEMY
Your Dream is Our Dream

LBP ACADEMY

SSC | CBSE | ICSE BOARD

Subjects

Std. 5th to 10th All Subjects
Std. 11th & 12th PCMB
Printed Notes
+
Education Tab

विद्यार्थी नापास झाल्यास
१००% फी परत !

FREE PICK UP AND DROP OFF
EDUCATION TAB

IF FAIL 100% MONEY BACK

LBP ACADEMY

3rd, 4th & 5th Floor, City Pride, Near Bank of Maharashtra,
Ashok Chowk, SOLAPUR - 413 005. Tel.: 0217 - 2654435
Cell.: 9960222099 **Toll Free : 1800 2336 787**

From failing grades to top of the class is a matter of weeks

Print & Design by : Gopi Myakal 9922926965

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

नॅक मुल्यांकित : 2017 दर्जा B++ (CGPA : 2.76)

website : www.arburla.org

email : arburla@gmail.com

पद्मप्रतिमा

२०१८-१९

पद्मशाली शिक्षण संस्था

• नूतन पदाधिकारी व विश्वस्त मंडळ : २०१९-२४ •

अध्यक्ष

श्री. काशिनाथ परशुराम गड्डम

उपाध्यक्ष

प्रा. श्री. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी

सचिव

श्री. दशरथ नारायण गोप

सहसचिव

सौ. संगीता यशवंत इंदापुरे

खजिनदार

श्री. नागनाथ ईरय्या गंजी

विश्वस्त मंडळ

श्री. अशोक अंबाजी चिलका
श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी
श्री. दिनेश भुमय्या यन्नम
श्री. श्रीधर बुचय्या चिट्याल
श्री. मधुकर लिंगराज कट्टा
श्री. व्यंकटेश लक्ष्मीनारायण आकेन
श्री. मल्लिकार्जून मल्लेशम सरगम
श्री. रमेश नागनाथ केदारी
श्री. रमेश श्रीहरी विडप

श्री. विजयकुमार अंबाजी गुल्लापल्ली
ॲड. श्री. श्रीनिवास शिवानंद कटकूर
श्री. लक्ष्मीकांत अंबादास गड्डम
श्री. श्रीनिवास यल्लप्पा पोशम
श्री. हरिष अविनाश कोंडा
श्री. गणेश नारायण गुज्जा
श्री. प्रभाकर रामकृष्ण आरकाल
श्री. नागनाथ हणमंतु श्रीरामदास
श्री. श्रीनिवास अंबाजी जोग

श्री. रमेश दशरथ बोध्दूल
श्री. प्रसाद अनिल पल्ली
श्री. अरविंद गंगाधरपंत कुचन
श्री. अमित किसन श्रीराम
श्री. नरसय्या रामदास इप्पाकायल
श्री. अरविंद राजमल बोमड्याल
श्री. गणेश नारायण बत्तीन
श्री. श्रीनिवास नरसय्या आकेन
श्री. सुरेश जनार्दन बिटला

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

नॅक मुल्यांकित 2017 दर्जा -'B++' (CGPA-2.76)

पद्मप्रतिमा

२०१८-१९

संपादक

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

कार्यकारी संपादक

प्रा. डॉ. तुकाराम नारायण शिंदे

विभागीय संपादक

मराठी विभाग : प्रा. डॉ. संजय लांडगे

हिंदी विभाग : प्रा. डॉ.प्राजक्ता जोशी

इंग्रजी विभाग : प्रा.डॉ. ॲनी जॉन

कार्यालयीन व्यवहार

श्री. व्यंकटेश गाजूल

पद्मप्रतिमा
२०१८-१९

• **अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय**
सिटी सर्व्हे क्र. ९७०५/९ अ,/२ अ, रविवार पेठ,
राजेंद्र चौक, सोलापूर.
दूरध्वनी : ०२१७ - २७४३९०८
website :www.arburla.org
email : arburla@gmail.com

• **मुखपृष्ठ**
कु. मंजुषा गंपले

• **ग्राफिक्स डिझाईन व मुद्रक**
(रामगोपाल (गोपी) म्याकल)
शिवानंद प्रेस
कुचन हायस्कूल रोड, रविवार पेठ,
सोलापूर. मोबा.: ९९२२०२६९६५

• **मांडणी व सजावट**
डॉ. टी. एन. शिंदे

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,
अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
यांनी हे पत्र खाजगी वितरणासाठी प्रकाशित केले आहे.

या अंकातील मजकूरांशी संपादक मंडळ
सहमत असेलच असे नाही.

कुलगुरु

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

डॉ. मृणालिनी फडणवीस

महाविद्यालयाच्या २९ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे
प्रमुख पाहुणे - प्रसिध्द वक्ते प्रा. गणेश शिंदे व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
यांच्या समवेत महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद...

महाविद्यालयाच्या २९ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे
प्रमुख पाहुणे - प्रसिध्द वक्ते प्रा. गणेश शिंदे व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
यांच्या समवेत महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचारी वर्ग...

प्राचार्यांचे मनोगत...

२९ वर्षाच्या वाटचालीत महाविद्यालय एका विशिष्ट उंचीवर पोहोचले आहे. संस्थाचालकांना अपेक्षित अशी महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी केंद्रीत विविध उपक्रम राबवताना आजच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा असल्याचे जाणवते. महाविद्यालयातील विविध विभागांनी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील या ऊर्जेला,उत्साहाला सकारात्मक वळण लावल्याचे यावर्षीच्या 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकावरुन दिसून येते. तसेच विद्यार्थ्यींनीमधील सळसळता उत्साह, उपक्रमातील सक्रिय सहभाग आणि त्यांची जिज्ञासा यामुळे विद्यार्थींनी महाविद्यालयाशी एकरुप झाल्याचे दिसते. विद्यार्थींनीमधील लिखाणाची आवड, दर्जा याबाबतही सुधारणा होत आहे. विद्यार्थ्यांनी विविध विषयावर उत्तम लेखन करत आहेत. यादृष्टीने विद्यार्थ्यांनींनी ज्ञानसंपादनेबाबत अधिक जागरुक राहिले पाहिजे. ज्ञान जिथून मिळाले तिथून ग्रहण केले पाहिजे.

२०१८-१९ च्या 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकासाठी कार्यकारी संपादक डॉ. टी. एन. शिंदे यांनी परिश्रम घेतले. विभागीय संपादक - डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे आणि डॉ. ॲनी जॉन यांनीही योगदान दिले, यामुळे यंदाचा 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंक उत्तमरित्या तयार झाला आहे. आणि तो वाचकांच्या हाती देताना नक्कीच आनंद होत आहे.

प्राचार्य डॉ. राजेंद्र थोडगे

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बी. ए. भाग - ३ इतिहास व बी. कॉम. भाग - ३ च्या सुधारित अभ्यासक्रमावर आयोजित विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्राचार्या सौ. किर्ती पांढे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी इतिहास परिषदेच्या १६ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. वस्तराव चव्हाण व व्यासपीठावर बसलेले प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राचार्य के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत वेळेगावकर, श्री. आनंद कुंभार, श्री. विलीन अणपेकर, प्रा. मराठे, डॉ. स. भा. आवटे व डॉ. टी. एन. शिंदे....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील स्त्री अभ्यास केंद्राकडून सुरु करण्यात आलेल्या बेसिक पार्लर कोर्स व फॅशन डिझायनिंग कोर्सचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. रजनी दळवी, कु. मंजुषा गंपले व आदी...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम व्यासपीठावर बसलेले प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व संस्थेचे विश्वस्त....

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे परिक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत वेळेकर व व्यासपीठावर बसलेले संस्थेचे अध्यक्ष -श्री. पांडुरंग दिड्डी, सहसचिव -श्रीधर चिटचाल, खजिनदार- श्री. दिवेन चव्हाण प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व आदी....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात २१ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलताना प्रमुख वक्ते प्रा. गणेश शिंदे व व्यासपीठावर बसलेले संस्थेचे अध्यक्ष- श्री. पांडुरंग दिड्डी, सहसचिव- श्रीधर चिटचाल, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त व आदी...

डॉ. टी. एन. शिंदे

संपादकीय,

सालाबादाप्रमाणेच यंदाही 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंक दर्जेदार करण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थींनीमधील दांडगा उत्साह, जिज्ञासा व समाजातील ज्वलंत प्रश्नांची जाण इ. चे प्रतिबिंब २०१८-१९ च्या 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकात दिसून येते. विद्यार्थींनींनी विविध विषयांवर लिहिलेले लेख, व्यक्तिचित्रे, कथा, माहितीपर लेख, प्रवासवर्णन, व्यंगचित्रे विनोद व कविता इ. प्रकारच्या साहित्यलेखनामुळे यंदाचा 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंक सजलेला आहे.

महाविद्यालयात विविध विभागाकडून प्राध्यापक वर्ग नाविण्यपूर्ण उपक्रम राबवत असतात. प्राध्यापकांनी याबाबतचे अहवाल वेळेत देऊन उत्तम सहकार्य केले. विभागीय संपादक डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे व डॉ. ॲनी जॉन यांनी उत्तम सहकार्य केले. विद्यार्थींकडून आलेले साहित्य संपादन करण्यासाठी परिश्रम घेतले.

'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकाच्या अनुषंगाने होणारे पत्रव्यवहार, फोटो व बातम्यांचे कात्रण याबाबतीत अधिक्षक श्री. व्यंकटेश गाजूल, मुख्य लिपीक- सौ.संजीवनी सादुल, वरिष्ठ लिपीक - श्री. शिवाजी चिंता, कनिष्ठ लिपीक- श्री. अनिल सग्गम व श्री. सत्यनारायण गजेली, श्री. महेश घागरे, श्री. प्रभाकर धोत्रे, श्री. संतोष मालतुमकर, सौ. उमा कुडक्याल, रमाकांत म्हैसुर यांचे उत्तम सहकार्य लाभले याबाबत सर्वांचे आभार मानतो.

'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकाचा दर्जा, अंकाची मांडणी, सजावट व आकर्षकता याबाबतीत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले, रामगोपाल म्याकल यांनी हा अंक वेळेत व उत्तम व्हावा यासाठी प्रयत्न केले. या सर्वांमुळेच यंदाचा 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंक उत्तमरित्या सजला आहे.

डॉ. टी. एन. शिंदे
कार्यकारी संपादक

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील रोल नं. १८ चा सिनेमाच्या प्रोमो प्रसंगी अभिनेत्री रोहिणी माने, डॉ. रजनी दळवी, डॉ. प्राजक्ता जोशी व विद्यार्थीनीसोबत...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व महाराष्ट्र पोलीस उन्नत दिन निमित्त आयोजित 'कायदे विषयक' जनजागृती या उपक्रमाप्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक श्री. वंदना शिरसिरे व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे, डॉ. रजनी दळवी व आदी....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील हिन्दी विभागाकडून साक्षरता दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. सुरक्षा शेख, प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. राजेंद्र बडजे व प्रा. रंजना वनसुडे....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात इतिहास अभ्यास मंडळाकडून आयोजित क्रांतीदिनानिमित्त बोलताना प्रमुख पाहुणे डॉ. एस. पी. शिंदे व्यासपीठावर बसलेले डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. टी. एल. शिंदे, प्रा. रंजना वनसुडे, डॉ. स्वाती धारुळे...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात वाणिज्य विभाग व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळाव्या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ सोलापूर (एमआयडीसी) यांच्या वतीने आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलताना डावे बेबीस सौ. वनश्री रेसे व व्यासपीठावर उपस्थित संस्थेचे अध्यक्ष-श्री. पांडुरंग दिड्डी, डॉ. रजनी दळवी व इतर मान्यवर...

विशेष प्राविण्य प्राप्त गुणवंत प्राध्यापक

प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायणराव शेंडगे

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट बोर्डावर (मानव संशोधन व्यवस्थापक मंडळ) निवड...

डॉ. अॅनी जॉन

- **Books Published :-**
  1. Literary Quest - Compulsory English Text Book for B. A. III
  2. Floret - Optional English Reference Book for B. A. II
  3. Literary - Sprouts- Special English Reference book for B.A. III
  4. Chapter on Research Methodology in B. A. III, Compulsory English Test book
  5. Chapter in M. A. English Text book, Bharti Vidhyapeet Pune.
  6. Chapter in M. A. English Text book, Shivaji University, Kolhapur.
  7. Resourece Person at Refersher Course for Teachers at Savitribai Phule, Pune University.
  8. Resourece Person at Refersher Course at Solapur University Solapur.

डॉ. रजनी जयंत दळवी

- अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा, महानगर सोलापूर या मंडळावर सहसचिवपदी निवड.
- सोलापूर लोकमंच सचिवपदी निवड
- योग असोसिएशन सचिवपदी निवड
- छत्रपती शिवाजी राजे सोलापूर राष्ट्रीय क्रिडा पुरस्कार

प्रा. डॉ. अशोक शिवाजी एक्कलदेवी

- **UGC - SET / NET / JRF** हा ग्रंथ प्रकाशित

प्रा. डॉ. तुकाराम नारायण शिंदे

- आधुनिक जग संदर्भ ग्रंथ प्रकाशित

प्रा. डॉ. कविता दत्तात्रय मुरुमकर

- महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाकडून स्त्री शतक : स्त्रीलिखीत आधुनिक मराठी कविता : प्रेरणा, परंपरा आणि योगदान (१९९८-२०१८) या संशोधन प्रकल्पास रु. १२ लाखाचे अनुदान
- फर्जापूर (अजिंठा-औरंगाबाद) येथे आयोजित राष्ट्रीय कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी निवड

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात भाषा संवादिनी मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे श्री. संजय वेऊलकर, व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे, श्री. भरतकुमार मोरे, डॉ. संजय लांडगे, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲंजी जॉन व इतर मान्यवर...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ इंग्लीश टिचर्स ऑर्गेनायझेशन आणि अरेरिएट स्टॅकस्वान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बी.ए.व बी.एस्सी.-३ च्या आवश्यक इंग्रजी विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमावर आधारित एकदिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्री. श्रीनिवास क्यातम व उपस्थित प्राध्यापक वर्ग....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राकडून आयोजित कार्यक्रम प्रसंगी स्पर्धा परिक्षेची पूर्वतयारी याविषयावर मार्गदर्शन करताना वित्त व लेखाधिकारी श्री. सुर्यकांत खटके, श्री. धर्मशाळे सर, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. शंकर राजे, डॉ. स्वाती घाटुळे व प्रा. जाधवजी...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्रिरत्न क्लबच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर ...

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागाकडून आयोजित ग्रंथ प्रदर्शन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भेंडगे व उपस्थित प्राध्यापक वर्ग....

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या सहकार्याने आयोजित महिला कायदे विषयक जनजागरण या कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन करताना सौ. न्यायाधिश वैशाली पाटील व व्यासपीठावर उपस्थित प्राध्यापक वर्ग....

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

• महाविद्यालयीन विकास समिती •

२०१८-१९

अ.क्र.	नांव	पद
१.	श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी	अध्यक्ष
२.	श्री. दशरथ नारायण गोप	सदस्य
३.	प्रा. डॉ. श्री. तुकाराम नारायण शिंदे	सदस्य
४.	प्रा. डॉ. श्री. शिरीष नागनाथ भोसले	सदस्य
५.	प्रा. डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	सदस्य
६.	प्रा. डॉ. श्री. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	सदस्य
७.	श्री. व्यंकटेश मल्लेशम गाजूल	सदस्य
८.	श्री. दिनेश भुमय्या यन्नम	सदस्य
९.	श्री. श्रीनिवास नरसय्या आकेन	सदस्य
१०.	सौ. मिनाक्षी दत्तात्रय मेडपल्ली	सदस्य
११.	श्रीमती सुलोचना व्यंकटेश गुंडू	सदस्य
१२.	प्रा. डॉ. सौ. अॅनी जॉन	सदस्य
१३.	प्राचार्य डॉ. श्री. राजेंद्र नारायण शेंडगे	सचिव



अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या
पद्मप्रतिमा वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा ।

Agents Code No. - 04672944



संतोषकुमार एस. येमुल

सदस्य अभिकर्ताओं के लिए अध्यक्ष कल्ब

Santoshkumar S. Yemul

Member Chairman's Club for Agents

Mob. : 9325262123, 9822132865

मराठी विभाग

- ज्ञानेश्वरी -

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ ५॥

जाईन गे माये तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥

सर्व सुकृतांचे फळ मी लाहीन ।
क्षेम मी देईन पांडुरंगी ॥ ३॥

बाप रखुमादेविवरु विठ्ठलेचे भेटी ।
आपुले संवसाटी करुनी राहे ॥४॥

- संत ज्ञानेश्वर

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
गद्य विभाग				
१.	स्त्री भ्रुण हत्या	कु. सोनाली शिंगे	बी. ए. भाग - ३	०७
२.	महिला उद्योजक	कु. बालमणी म्याकल	बी. कॉम. भाग - ३	१०
३.	पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध का?	कु. स्वाती भैरामडगी	बी. कॉम. भाग - ३	१२
४.	नको ही सामाजिक विषमता	कु. नेहा पिट्टल	बी. ए. भाग - ३	१४
५.	पोलीस... समाजाचे संरक्षण दूत	कु. प्राजक्ता होनमाने	बी. ए. भाग - ३	१५
६.	मुलींनी वागावे तरी कसे ?	कु. अमृता गांगुर्डे	बी. ए. भाग - ३	१६
७.	पर्यटकांना खुणावणाऱ्या बालाघाटच्या डोंगररांगा	कु. अमृता गांगुर्डे	बी. ए. भाग - ३	१७
८.	गडकिल्ल्याचे संरक्षण... हा काळाचा गरज	कु. निकीता शितोळे	बी. ए. भाग - ३	१८
९.	आत्मकथा ...एका रोपाची	कु. ऐश्वर्या जहागिरदार	बी. कॉम. भाग - १	१९
१०.	कर्जबाजारी शेतकरी व कर्जमाफी	कु. मंजुषा गंपले	बी. कॉम. भाग - ३	२०
११.	छत्रपती शिवाजी महाराजांचा वैज्ञानिक दृष्टीकोन	कु.निकिता शितोळे	बी. ए. भाग - ३	२२
१२.	लोकसेवा हीच देशसेवा	कु. प्रियांका मित्रा	बी. कॉम.भाग - २	२४
१३.	आरक्षण...असावे की नसावे ?	कु. प्रियांका देवळे	बी. ए. भाग - १	२५
१४.	प्राथमिक व्यवसायातील असामाधानकारकता	कु. मंजुषा गंपले	बी. कॉम. भाग - ३	२७
१५.	माझे आवडते महाबळेश्वर	कु. रचना श्रीराम	बी. कॉम. भाग- १	२८
१६.	मी पाहिलेला रम्य निसर्ग	कु. बालमणी म्याकल	बी. कॉम. भाग - ३	३०
१७.	पंडिता रमाबाई	कु.शारदा कसबे	बी. ए. भाग - २	३२
१८.	रुजावं देशभक्तीचं बीज	कु. संगीता नुले	बी. कॉम. भाग -२	३६
१९.	युवक कसा असावा	कु. भार्गवी कोटा	बी. कॉम. भाग - २	३८
२०.	सावित्रीबाई फुले	कु. राजश्री इराबत्ती	बी. कॉम. भाग - २	३९
२१.	२१ व्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने	कु. संजना सरवदे	बी. ए. भाग - ३	४१
पद्य विभाग				
१.	आयुष्य	कु. अमृता गांगुर्डे	बी. ए. भाग - ३	४१
२.	अशी एक मैत्रिण असावी...	कु. अमृता गांगुर्डे	बी. ए. भाग - ३	४३
३.	मैत्रीण	कु.सौम्या पुलगम	बी. कॉम. भाग -२	४४
४.	सोबत...	कु. सुवर्णा चौगुले	बी. ए. भाग -३	४४
५.	भारताचा अभिनंदन।	कु. प्रगती पोगुल	बी. ए. भाग - ३	४४
६.	प्रेम	कु. सिद्धी कोकाटे	बी. ए. भाग -३	४४
७.	मृगजळ	कु. ऐश्वर्या जहागिरदार	बी. कॉम. भाग -१	४५
८.	आशा	कु. हर्षदा सोसनकर	बी. ए. भाग -१	४५
९.	आई	कु. वैष्णवी साबुंळे	बी. ए. भाग -३	४५
१०.	मन...	कु. संजना सरवदे	बी. ए. भाग -३	४५
११.	मन	कु. संजना सरवदे	बी. ए. भाग -३	४६
१२.	मन	कु. पुनम रहिंडे	बी. ए. भाग -३	४६
१३.	इतकंही कठ नका	कु. सोनाली शिंदे	बी. ए. भाग -३	४७
१४.	भावना	कु. पुनम रहिंडे	बी. ए. भाग -३	४७
१५.	मैत्री	कु. पुनम गायकवाड	बी. ए. भाग -३	४७
१६.	आहेस तू....	कु. प्रगती पोगुल	बी. ए. भाग - ३	४७
१७.	भावना	कु. भृती वाळके	बी. कॉम. भाग -३	४८
१७.	अशी ही मैत्री	कु. अनिता म्हेत्रा	बी. कॉम. भाग -३	४८
१८.	आई माझी...	कु. भाग्यलक्ष्मी गोली	बी. कॉम. भाग -२	४८
१९.	आयुष्य	कु. अमृता गांगुर्डे	बी. ए. भाग - ३	४९
२०.	पक्षी जातीस गाणी	कु. अरुणा कुणी	बी. कॉम. भाग - २	४९
२१.	जाता... जाता....	कु.प्रियांका मित्रा	बी. कॉम. भाग - २	४९
२२.	सकाळ	कु. यशोदा सिंबोळे	बी. कॉम. भाग -३	५०
२३.	मोबाईल	कु. मंजुषा गंपले	बी. कॉम. भाग -३	५०
२४.	मैत्री	कु. हर्षदा सोसनकर	बी. ए. भाग -१	५१
२५.	फुलायचं असतं	कु. ऐश्वर्या जहागिरदार	बी. कॉम. भाग -१	५१
२६.	ध्येय	कु. प्रियांका बोगा	बी. कॉम. भाग -३	५२
२७.	मैत्री	कु. पुनम गायकवाड	बी. ए. भाग -२	५२
२८.	तू आहेस म्हणून...	कु. सोनाली शिंदे	बी. ए. भाग -३	५२
२९.	तुच्छ - पुरुष	कु. सोनाली शिंदे	बी. ए. भाग -३	५३
३०.	प्रेम	कु. पुनम गायकवाड	बी. ए. भाग -२	५३
३१.	भेट	कु. किर्ती चाटला	बी. ए. भाग - ३	५३
३२.	गुरुविना	कु. मंजुषी वडगांवे	बी. ए. भाग - ३	५४
३३.	विनोद	कु. आरती कांबळे	बी. कॉम. भाग-२	५४

कु. सोनाली शिंगे
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

स्त्री भ्रुण हत्या

"मी नसता लुळी पांगळी मी नसता वेडीखुळी का?
केवळ कन्या म्हणुनी घ्यावा तुम्ही माझा बळी
मुलगी मी होऊन येणे हाच का असे गुन्हा
तुच सांग ना माते तुला फुटला, नसता का पान्हा
फुलण्या आधीच का सुकावे, जन्माआधीच मरावे
पुत्र हवा हवा म्हणुनी का? कन्येला मारावे"

"आई मला जन्म दे गं
मृत्यू नको गं... मला मृत्यु नको गं... नको गं..."

असे हृदयद्रावक मन हेलावणारे विदायक स्वप्न एका गर्भवती मातेस पडले. स्वतःच्या गर्भातील स्त्री अर्भक तिला काही सांगत होतं, सुचवत होतं अचानक पडलेल्या स्वप्नामुळे ती माता खडबडून जागी झाली. क्षणार्धातच विचारांचे काहूर तिच्या मनात फिरु लागले. या स्त्री अर्भकाला जन्माला घालायचे की नाही? या विचाराने तिचे मन अस्वस्त झाले. ग्रासून गेले. ती व्यथीत झाली. काय करावे हे तिला सुचेना. विचारधीन झालेल्या त्या मातेची ती रात्र कधी संपली अन् नवा दिवस कधी उजाडला हे सुध्दा कळले नाही.

अचानक सूर्याची किरणे सर्व सृष्टीभर पसरताच जसा अंधःकाराचा नायनाट होतो तसाच त्या मातेच्या मनातल्या वाईट विचारांचा नायनाट होऊन नव्या विचारांना झरा फुटला. मनात विचार आला की जी आई, जी माता आपल्या स्वतःच्या गर्भातील अर्भकाला मारे त्याचा जीव घेई अशा मातेस आई म्हणून घेणे शोभेल का?

आई मारे अर्भकास मग ती माता कशी? तिने ठाम निश्चय केला, काही केल्या या स्त्री अर्भकाला जन्मास घालायचे पण पती आणि सासुसासऱ्यांच्या मर्जीपुढे आपले काय चालणार? या प्रश्नाने ती माता व्याकुळ झाली आणि शेवटी झाले ही तसेच, स्त्री अर्भक वाचविण्याचे तिचे सर्व प्रयत्न अपुरे पडले. तिच्या इच्छेविरुध्द तो स्त्री गर्भ पाडून टाकण्यात आला. क्रूरपणे हे पाप तिच्या माथी गोंदविल गेलं. फक्त आणि फक्त मुलगी नको म्हणून समाजात अब्रू कमी होईल म्हणून मान प्रतिष्ठा कमी होईल म्हणून. ते अर्भक आती मारण्यापूर्वी म्हणत होत

"निसर्गाचा बिघडवू नका समतोल"

मुला इतकेच मुलीचेही जीवन अनमोल

आज ही स्त्री-भ्रुण हत्या थांबवायला हवी. कुठेतरी ह्याचा शेवट व्हायला हवा. जन्माला येणारी मुलगी नाकारणे व तिची अमानुषपणे हत्या करणे हे मानवी जीवनात मानवतेला काळीमा फासण्याचे कृत्य आहे. माणूस हा माणूस न राहता पशुसारखा वागायला लागला आहे. दोन घरांना जोडणारा दुवा म्हणजे स्त्री आपल्या प्रेमाच्या नात्याने दोन कुटुंबांना जोडते.

मुली म्हणजे परक्याचं धन।
मुले म्हणजे वंशाचा दिवा ।।

असे का म्हणतात? ही समज सर्वांच्यांच मनात रुजली आहे. ही समज का बदलू नये. म्हणतात, मुलं मोठी झाली की आई-वडिलांना सांभाळतात, पण आता ती वेळ किंवा, ती परिस्थिती राहिली नाही. आई-वडिल मुलांना ओझे झाले आहेत. ते तर चक्क आई-वडिलांना आश्रमात पाठवतात व त्याच जागी मुलगी असती तर शिक्षण घेऊन, कष्ट करुन आपल्या आई-वडिलांना सांभाळली असती.

स्त्रीला आई, बहीण, पत्नी, मावशी अशा अनेक नावाने गौरविले जाते. स्त्रीमुळेच या विश्वाची निर्मिती झाली. स्त्री ह्या छोट्या शब्दांत अथांग समुद्राएवढा अर्थ दाटलेला आहे. प्रत्येक आई-बाबांना आपली मुलं प्रिय असतात. त्यात मुलगी ही वंश वाढवते. अनेक गुणांनी ती सर्व संपन्न असते. राणी लक्ष्मीबाई, राणी चन्नमा अशा अनेक धाडसी स्त्रीयांनी राज्य कारभार चालवला. त्यांचे नाव म्हणून आज या जगात अजरामर झाले आहे.

मी म्हणते, माँ चाहिए।
पत्नी चाहिए।
बहु चाहिए।
पर बेटी क्यूं नहीं?

आजच्या ह्या युगामध्ये महान भारत देशात दर १००० मुलांच्या मागे ८६० मुली आहेत. व इतर देशात त्या बरोबरीने आहेत. असे का? त्याच कारण एकच आहे. आपल्या भारतीय लोकांना आजची मुलगी डोक्यावर ओझं आहे असे वाटू लागली आहे. कारण हुंडा. लोकांचा एक फार मोठा गैरसमज झालेला आहे कि "बेटी पराया धन होती है।" अहो मुलगी ही दुसऱ्याची अमानत होतेच पण ती दोन्ही घराण्याचे नाव वर नेते.

मुलगी ही आज सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहे. एवढेच नाही तर पुरुषांच्या पुढे येऊन ती मुक्तपणे जुन्या बंधनातून बाहेर पडून, काम करून आपले नाव सूर्याच्या किरणांप्रमाणे चारी दिशेस प्रकाशित करत आहे. म्हणून ती आजही लाडकी आहे, कालही होती आणि उद्याही राहिल पण तिचे महत्त्व जाणून घेतले तरच... ना. आज हुंडाबळीमुळे अनेक स्त्रिया जीवंतपणी मृत अवस्थेची वेदना भोगत आहेत. त्रास सहन करत आहेत. कित्येक गरीब घरातील मुलींचे विवाहच होत नाहीत. कारण होणाऱ्या हुंड्याच्या मागणीमुळेच मुलीचा जन्म हा मात्यापित्यांना संकट वाटू लागले आहे. ह्याच कारणाने स्त्री भ्रुण हत्या म्हणजेच मुलींना ह्या जगात पाऊल ठेवण्या अगोदरच तिला नामशेष केले जाते. तर काही ठिकाणी जन्मतःच मारले. हे खरोखरच दुःखदायक आहे. खरे तर स्त्री व पुरूष हे समाजाचे दोन आधारस्तंभ आहेत, दोन पाय आहेत. एक पाय कमकुवत ठेवला, तर लुळापांगळा समाज प्रगती करू शकेल काय? आणि कसा करेल याचा विचार आपण केला पाहिजे.

कुणी कितीही दिलं तर पुरलंय काय?
शेवटी हातात कधी काही उरलयं काय?
उगीच भिकारी बनु नका,
हुंड्याच पाप कधी करू नका.

हुंड्याची अधिकाधिक मागणी करणारे, स्त्रीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात. आजही स्त्रीची खरेदी-विक्री केली जाते.

पुरूष जुगारांत स्त्रीला आपली मालमत्ता म्हणुन वापरतो. आजही आदिवासी जमातीत स्त्रीच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिचा जाहीर लिलाव केला जातो. स्त्री जन्मा ही तुझी कहाणी । हृदयी अमृत नयनी पाणी'।। इतके सर्व सहन करता एक स्त्री आपली आई, लेक माझी लाडकी असे म्हणते हे योग्य आहे. स्त्रीच्या जीवनातील या दुर्दशेचा पूर्ण बीमोड करायचा असेल, तर स्त्रियांनी संघटित होऊन जुलमी आक्रमकतेला तोंड दिले पाहिजे तरच ती खरीखुरी सुखी होऊन सर्वाची लेक माझी लाडकी म्हणण्याजोगे ठरेल. ती आई आहे ती ताई आहे मुलाची का तुम्हाला घाई आहे । कधी अंबा, जगदंबा, कधी दुर्गा, कधी काली माँ आहे. मुलगा तुम्हा काय देणार, मुलगी दोन घर उज्वल करणार आहे.

''मैं मेरी झाँशी नहीं दूँगी'' म्हणणारी मुलगी होती.

अंतराळवीर महिला होईल, याची कुणी कल्पनाही केली नव्हती गान कोकीळा होऊन बहरली लता, सांगा मुली कोठे राहिल्या मागे आता।

जन्म देण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे, तुम्हा आम्हा जन्म देणारी ही मुलगीच आहे. अशा ह्या मातेचा जर तुम्ही अशाच रितीने नायनाट कराल तर एक दिवस ह्या विश्वाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मी सांगते, ''मुलीला जन्म द्या, मृत्यु नको जर मुलगी वंशाचा पणती आहे. आपल्या महाराष्ट्रात ताज्या जणगणेनुसार स्त्री - पुरूष यांची सरासरी संख्या १००० मुलांमागे ८१२ मुली आहेत तर मग १८८ वंशाचे दिवे कायम ब्रम्हचारीच?

सर्व सुज्ञ लोकांना मी एक प्रश्न विचारते मुलगी नको असे आपण सर्वजण म्हणतो मग आपल्या सर्वांच्या मुलांना नवरी मिळेल काय? व पाचात एक 'द्रौपदी' कलीयुगात चालेल काय? आपल्या ह्या अनिष्ट कृतीला आळा घातला नाही तर २०२० चे भारताचे महासत्ताक होण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहिल्याशिवाय राहणार नाही. विचार करा मुलगीच नाही तर हे वंशाचे दिवे कायम ब्रम्हचारी म्हणून हिमालयात जावून बसण्याशिवाय दुसरा पर्याय नसेल. म्हणूनच विचार करा आणि स्वतः तुम्ही देशाला संदेश द्या.

वंशाचा किंवा संपत्ती मालमत्तेचा वारस उतारवयात आपले पालनपोषण करणारी मुलगी नसून मुलगा आहे ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना मी शेवटी एवढेच सांगू इच्छिते, मुलींचा आधार तुम्हीच आहात. म्हणून स्त्री भ्रुण हत्येला आता पूर्ण विराम द्या तुम्हीच. शेवटी एवढेच म्हणावसं वाटतं - एक स्त्री काय म्हणू शकते,

''माझ्या जीवनाचा करू नका कचरा
मीच नसेल तर पुढची पिढी विसरा''
हम भारत की नारी है, मुली वाचवा,
देश वाचवा, की एक चिंगारी है ।
उद्याची आई वाचवा।
अन्याय अत्याचार करु नका,
उगीच पुरुषी तोरा मिरवू नका,
शेवटी तिच आहे मदतीला,
हे कधीच विसरु नका।
हे स्त्री जन्मा तुझी ही कहाणी,
तुझीयाच पोटी अवतरती नर,

हृदयी अमृत आणि नयनी पाणी। तरी ते अन्यायच करतील तुझवर ।

पणतीनेच दिवा प्रज्वलित होतो स्त्री असो वा पुरुष जन्म तरीही आईच्याच पोटी घ्यावा लागतो तर आईची महती कशाला हवी सांगायला चला तर मग सज्ज होऊया या स्त्री भ्रुण हत्या थांबवायला...

''जन्म द्या, मृत्यु नको''

महिला उद्योजक

कु. बालमणी म्याकल
बी. कॉम. भाग - ३

आज जगात महिला आणि पुरूष यांच्यामध्ये फरक नाहीसे झाले. महिला आजच्या काळात नवनवे उद्योग स्थापन करत आहे. महिला ही उद्योजक बनून सुध्दा घरगुती जबाबदारी ही चांगल्या रीतीने पार पाडते. काही स्त्रिया जन्मतःच उद्योजक बनतात. कारण त्यांच्या घरातील पिढ्यापिढ्या चालवणाऱ्या व्यवसायामुळे त्यांना व्यवसायाचे बाळकडू मिळालेले असते. काही महिला उद्योजगाची जबाबदारी आनंदाने स्विकारतात. कारण वडिल, पती किंवा भावाच्या प्रेरणेने, तर काही महिला स्वतः प्रयत्नपूर्वक उद्योजकाचे गुण विकसित करतात. अशा तिन्ही या प्रकारांत मोडणाऱ्या महिला आपला उद्योग निर्माण करतात. काही जण पतीच्या व वडिलांच्या अचानक झालेल्या निधनानंतरसुध्दा अत्यंत खंबीरपणे व्यवसाय चालवणाऱ्या शीला साबळे व उद्योगांची माहिती नसताना कारखाना चालवणाऱ्या उषा शिंदे, वडिलांच्या निधनानंतर एका कारखान्याचे तीन कारखाने करणाऱ्या सुजाता सोपारकर आणि रेडिमेड ब्लाऊजच्या व्यवसाय चालवणाऱ्या श्वेता इनामदार इत्यादी महिलांनी खडतर व बिकट वाट कशी पार केली ते वाचण्यासारखे आहे.

समाजाची गरज ओळखून लक्ष्मी मोरे यांनी भाज्यांच्या पाकिटात चिरुन पॅक केलेल्या रतीब पुरवणे, कापड पुरवणाऱ्या रेखा कारखाना, रजिया तयार करुन निर्यात करणाऱ्या रॉट - आर्यनच्या फर्निचर क्षेत्रात नाव कमावणाऱ्या शैलजा सूर्यवंशी, पंचधान्यांचे व विविध प्रकारच्या लाडवांचा व्यवसाय करणाऱ्या सेवा गोखले, आरामदायी गाद्यांची निर्मिती करणाऱ्या डॉ. सुजाता पवार इत्यादीनी नाविण्यपूर्ण व्यवसाय सुरू करुन प्राप्त केलेले यश कौतुकास्पद आहे.

नारी ही नारायणी आहे. नर अणि नारायण अशा हा दोघांनाही जन्म घेण्यासाठी नारीची कूस लागते. अशी नारेबाजी आम्ही खूप केली, ऐकली परंतु दैनंदिन जीवनात मात्र नारीला नोकराणी बनवलं. भारतीय उद्योग जगामध्ये ज्या महिला

धडधडीने कार्य करतात, त्यांचा परिचय करुन देण्यात आला आहे. सन्मान आणि संपदा कधी कोणी चांदीच्या तबकातून भेट देत नाही. हे तर स्वतः कमवावं लागते. 'किलो- दिड किलो स्वाभिमान द्या हो' असा बाजारात तो विकत मागून मिळत नाही तर त्यासाठी आत्मनिर्भरतेचा पाया रचावा लागतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतःच आपलं भविष्य निवडावे लागते. 'सामान्य महिलांनी आधी आपली मानसिक जडणघडण बदलावी.' 'मी महिला आहे, त्यामुळेच मी या इतरांपेक्षा जास्त स्मार्ट आहे. महिलेच्या क्षमतेला कोणतीच सीमा, मर्यादा नाही'. 'कृपया मला कोणी वुमन एक्झिक्युटिव्ह म्हणू नका मी एक प्रोफेशनल एक्झिक्युटिव्ह आहे, अन् त्यांच पूर्ण मूल्य मी वसुल करते.'

स्त्रीचं व्यक्तिमत्व तिच्या कर्तबगाराने आणि धाडसाने विकसित होतं. आपल्या देशात अशा कर्तबगार स्त्रिया आहेत ज्यांनी पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये ही स्वतः च्या मेहनतीने चिकाटीने आपापल्या व्यवसायिक क्षेत्रात उत्तम कामगिरी करुन धैर्याने यश प्राप्त केले आहे.

महिला उद्योजकाचा स्वतः चा मार्ग स्वतः निवडतात. वेगळे करण्याचे लक्ष्य ठेवून अन् त्यांच्या पूर्तीसाठी आपली क्षमता पूर्णांशाने वापरतात. आकाशाला गवसणी घालण्याची महत्त्वकांक्षा ठेवून आपले पाय जमिनीलाच टेकलेले राहतील याची दक्षता घेतात. उदा., ज्योती नाईक हिने लिज्जत पापडचा व्यवसाय केला. या व्यवसायात आजमितीला ४० हजारांपेक्षा जास्त महिला कार्यरत आहेत. गेल्या ४० वर्षाचा इतिहास पाहता ग्राहकोपयोगी वस्तूची बाजारपेठ सातत्याने वाढत आहे. गिरगावातील चाळीत राहणाऱ्या सात महिलांनी एकत्र येऊन पापड बनवायला सुरुवात केली. घरोघरी उत्पादन होत असले तरी तयार झालेले पापड हे एकाच नावाने विकण्याचा निर्णय घेण्यात आला. ते म्हणजे लिज्जत पापड दि.२५ जुलै १९६६ रोजी 'श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड' या नावाने एक सोसायटी स्थापना करण्यात आली.

महिलांच्या सामुहिक उदयमशीलतेला एक कायदेशीर व्यासपीठ मिळाले. नियमांचे काटेकोर आज'लिज्जत' ला ग्रामीण उद्योग म्हणून मान्यता दिली. 'लिज्जत' चा व्यवसाय प्रचंड वाढला तरी उत्पादनाचे 'घरगुती' पण अजूनही टिकून आहे. ज्योती २३ व्या वर्षी त्या 'लिज्जत' च्या स्वतंत्र सदस्य बनल्या. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत 'लिज्जत' प्रसिध्द, लोकप्रिय आहे. सन २००१-०२ मध्ये ज्योती नाईक यांना 'बिझनेस वुमन ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि परिश्रम करण्याची तयारी आवश्यक असते. अशा प्रकारे आजच्या काळात महिला उद्योजक हा भारतीय उद्योगात घवघवीत यश प्राप्त करु लागले आहेत.



पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध का?

कु. स्वाती भैरामडगी
बी. कॉम. भाग - ३

आजचे युग झपाट्याने बदलत आहे. या बदलास कारणीभूत तीन गोष्टी जागतिकीकरण, खाजगीकरण आणि औद्योगिकीरण. या तिन्ही बदलांबरोबरच महत्वाचा बदल म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान. आपल्या देशात अनेक प्रकारचे तंत्रज्ञान विकसित झाले आहेत. त्याच बरोबर आपण अनेक प्रकारच्या पाश्चिमात्य तंत्रज्ञानाचा दैनंदिन जीवनात वापर करतो. एकीकडे जग इतके पुढे जात आहे. तरीपण काही लोकांचे विचार हे अजूनही घुसमटलेलेच आहेत. आपल्या समाजातील काही लोक जुन्या परंपरा व संस्कृतीलाच चिकटून बसलेले आहेत.

जसे की १ जानेवारीला साजरा होणाऱ्या जल्लोषास आपल्या समाजातून अनेकदा विरोध होतो. आपल्या समाजातील अनेक व्यक्तींचे असे मत आहे की, आपण पाश्चिमात्य संस्कृतीमधील नवीन वर्ष जेवढ्या जल्लोषात साजरा करतो, तेवढ्याच जल्लोषात आपले हिंदू नववर्ष देखील साजरा केला पाहिजे. आजच्या काळात आपण आपली संस्कृती विसरुन पाश्चिमात्य संस्कृतीला जास्त महत्त्व देत आहोत, असे समाजातील काही व्यक्तींचे म्हणणे आहे. जसे प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे ही झाली एक बाजू, परंतु दुसऱ्या बाजूला विचार केला असता आपण दैनंदिन जीवनातील पाश्चिमात्त्य कालनिर्णयाचा (कॅलेंडर) वापर करतो. आपले रोजचे बँकाशी निगडीत व्यवहार, आर्थिक व्यवहार हे याच कालनिर्णयावर अवलंबून असतात. १ एप्रिल ते ३१ मार्च हे आपल्याडे आर्थिक वर्ष मानले जाते.

जे लोक पाश्चात संस्कृतीला विरोध करतात, तेच पाश्चात संस्कृतीचे अनुकरण करत असताना दिसतात. जसे की, वॉटस्ॲप, फेसबुक, इंस्टाग्राम आणि ट्विटर इत्यादी. लोक म्हणतात की आपण आपली संस्कृती जपली पाहिजे. पण तेच लोक पाश्चिमात्य संस्कृतीचे मोठ्या प्रमाणात पालन करतात. पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक विसरतात की, ते पाश्चिमात्य तंत्रज्ञानानुसार व्यवहार करत आहेत. जसे की, नेट बँकिंग, ऑनलाईन पेमेंट, ऑनलाईन बिल भरणे इत्यादी. पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक ४ जी मोबाईल, ४ जी इंटरनेटचा वापर करतात आणि दुसरीकडे त्या संस्कृतीबद्दल वाईट बोलतात.

पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक पाश्चिमात्य पेहराव करतात ते चालत का त्यांना? म्हणजे बघा ना काही लोक जीन्स - टॉप, शॉर्ट्स आणि विविध प्रकारचे कपडे परिधान करतात. एकीकडे त्यांच्या संस्कृतीला विरोध करायचा आणि दुसरीकडे त्यांच्या सारखेच पेहराव करायचे. अरे जर तुम्ही एवढेच पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करता तर तुम्ही खादीच्या कपड्यांचा पेहराव का करत नाही.

पाश्चिमात्य संस्कृतीला नवीन वर्ष (१ जानेवारी), व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे सगळ्यांचा विरोध

करणाऱ्या लोकांना का कळत नाही की, आजकाल काळ बदलत आहे आणि काळानुसार आपल्यामध्येही बदल करणे आवश्यक आहे. कारण बदल हा निसर्गाचा नियम आहे. पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक हे का विसरतात की, ते लोक ही आपल्या संस्कृतीला मानतात. ते आपल्या संस्कृतीप्रमाणे वागतात देखील. तसेच आपण देखील त्यांच्या संस्कृतीला महत्त्व का नाही देऊ शकत? पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक हे विसरतात की त्यांच्या देशात आपल्या देशातील संस्कृतीला, परंपरेला आणि 'योगा' ला खूप महत्त्व आहे. जर आपला योगदिन जगाने स्विकारला असे वाटत असेल तर व्हॅलेंटाईन डे ला विरोध कशासाठी? चित पण तुमचीच पट पण तुमचीच हेच चालणार नाही. ते लोक आपल्या परंपरांना मानतात आणि आणि त्यांच्या जीवनात त्याचा समावेश देखील करतात. आपणही त्यांच्या संस्कृतीला, परंपरांना महत्त्व दिलो तर काय बिघडणार आहे?

विनोद

विद्यार्थी (राहुल) सर नटुरे म्हणजे काय?
शिक्षक : राहुल मी तुला उद्या सांगतो.
विद्यार्थी : ठीक आहे, सर.
शिक्षक : राहुल मी काल घरी जाऊन
गुगल वर सर्च केलो पण ते
नाही आलं. कदाचित स्पेलिंग
चुकलं असलं तु मला स्पेलिंग
लिहून दे, मी तुला बघुन सांगतो.
विद्यार्थी : बरं, ठीक आहे सर. (विद्यार्थीने
लिहून दिलेल्या नटुरे चे स्पेलिंग
खालीलप्रमाणे आहे). Nature
शिक्षक : अरे मूर्ख, ते नटुरे नाही. नेचर आहे.

कु. ऐश्वर्या जहगिरदार
बी. ए. भाग - १

पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणारे लोक त्यांच्या खाद्यपदार्थांना तर फार महत्त्व देतात. जसे चायनिज खाद्यपदार्थ हे तर प्रत्येक घरा - घरात खाल्ले जाणारे पदार्थ आहे. आजकाल तर प्रत्येक ठिकाणी चायनिज पदार्थांचे स्टॉल्स् दिसून येतात आणि तिथे मोठ्या प्रमाणात गर्दी देखील दिसते.

पिझ्झा, बर्गर, केक अशा विविध पदार्थांचे स्टोअर्स आज आपल्या देशात आहेत आणि अशा प्रकारचे खाद्यपदार्थ आपल्या देशात आहेत आणि अशा प्रकारचा खाद्यपदार्थ आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहेत. भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे आणि पाश्चिमात्य संस्कृती वाईट आहे असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्येक देशातील संस्कृती ही त्या ठिकाणच्या नैसर्गिक वातावरणानुसार किंवा तेथील परिस्थितीनुसार असते. आपण कोणत्याही संस्कृतीबद्दल काहीही वाईट बोलू शकत नाही. कारण प्रत्येकांना आपली संस्कृती प्रिय असते. आजकाल लोकांना वाटतं कि आपण आपली संस्कृती विसरुन पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करत आहे. परंतु माझे असे मत आहे की, आजकालची पिढीला दोन्ही संस्कृतीचे एकीकरण चांगल्या प्रकारे कळते. आताच्या पिढीला कोणती संस्कृती चांगली आहे आणि आपण कोणत्या संस्कृतीचे अनुकरण केले पाहिजे हे कळते.

कु. नेहा पिट्टल
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

नको ही सामाजिक विषमता

आजच्या युगात सामाजिक ऐक्य संपुष्टात येत असल्याचे दृष्टीत पडत आहे. जातीजातीमध्ये भेदभाव निर्माण झाल्याने सामाजिक विषमता निर्माण झाली आहे.

'आम्ही सारे बांधव आहोत, आम्ही एकाच देशाचे नागरिक आहोत,' अशी प्रतिज्ञा आपण सारेजण अगदी लहानपणापासून म्हणत आलो आहोत. पण खरोखरच आपले वर्तन त्यानुसार आहे का? प्रत्येकाने आपल्या मनाला हा प्रश्न विचारला पाहिजे व आपले आचरण आहे का? हे पाहिले पाहिजे.

भारत विविध जातीधर्माने नटलेला देश आहे. या देशात विविध धर्मांचे, जातींचे, पंथाचे लोक राहतात. या विविधतेचा आपल्याला अभिमान वाटतो. पण आज ही विविधता संपुष्टात आल्याने भेदभाव निर्माण झाला आहे. आज काही व्यक्तींना माझी जात श्रेष्ठ, इतर जाती तुच्छ आहेत असे वाटते. काहींना इतरांचा स्पर्श, सावलीही रुचत नाही असे का घडते? यामागे कोणते कारण असावे? खर तर सामाजिक जीवन व्यवस्थित राहावे, म्हणून आपल्या पूर्वजांनी कामांची विभागणी केली. त्यावरुन आपण वेगवेगळ्या जाती मानू लागलो. काही काळानंतर या जाती जन्मावरुन वाट्यांला येऊ लागल्या. मग त्यातून समाजातील श्रेष्ठ - कनिष्ठता ठरु लागली. हेच सामाजिक विषमतेचे मूळ कारण आहे.

एकावेळस कामाची विभागणी करणे खूप सोप आहे. कुणीही श्रेष्ठ नाही, कनिष्ठ नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही काम कमी प्रतीचे किंवा हलके नाही. हे सर्व ओळखूनच आपल्या सर्वांना विकासाची समान संधी दिली आहे.

जात, धर्म, पंथ, वर्ण यावरुन समाजात जशी विषमता केली जाते, तशीच विषमता तसाच भेदभाव काही वेळेला आर्थिक परिस्थिती वरुन केला जातो. अनेकदा श्रीमंत व्यक्ती स्वतःला गरीबापेक्षा श्रेष्ठ समजतात मालक नोकरांना तुच्छ समजतात. त्यांच्याकडून गुलामाप्रमाणे काम करुन घेतात. अशाप्रकारचे वर्तन हे सामाजिक विषमतेमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने घातक आहे.

स्त्री - पुरुष भेदभावही समाजात आपणास पाहावयास मिळतात. स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित असल्याचे लक्षात आणून दिले जाते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नसतो. तिला गुलामाप्रमाणे वागवले जाते. तिला स्वतःचे आयुष्य स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्याचा आधिकार दिला जात नाही.

अशाप्रकारे सामाजिक भेदभाव व विषमता, आर्थिक विषमता स्त्री - पुरुष भेदभाव समाजाच्या सर्वांगीण विकासाला घातक आहे. प्रत्येक व्यक्तीने इतर व्यक्तीशी माणसाप्रमाणे वागावे. त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे जगू द्यावे. असे केल्यानेच भारतातील सामाजिक तसेच इतर कोणत्याही प्रकारची विषमता अस्तित्वात राहणार नाही.

पोलीस... समाजाचे संरक्षण दूत

कु. प्राजक्ता होनमाने
बी. ए. भाग - ३
(इंग्रजी विभाग)

आजच्या वर्तमान काळाची गरज म्हणजे पोलीस आहे. देशाचे व पर्यायाने समाजाचे संरक्षण व शांतता प्रस्थपित करण्यासाठी पोलीसाचे स्थान अटळ आहे. पोलीस हे आपले संरक्षक दूत असल्यासारखे आहेत. कायम आपल्या संरक्षणासाठी तत्पर असतात. पोलीसांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख...

शहर म्हटले म्हणजे प्रचंड गर्दी, माणसे अन् वाहने यांनी फुललेला रस्ता. अशा या रहदारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करणारा म्हणजे आमचा चौकातील पोलीस. आजच्या वर्तमान काळाची गरज म्हणजे पोलीस आहे. देशाचे व पर्यायाने समाजाचे संरक्षण व शांतता प्रस्थपित करण्यासाठी पोलीसाचे स्थान अटळ आहे. पोलीस हे आपले संरक्षक दूत असल्यासारखे आहेत. कायम आपल्या संरक्षणासाठी तत्पर असतात.

तर आपल्याला चोरट्यांपासून सावध हे सर्व करत आहेत. पिडीत महिलेला सेवा पोलीसांकडून मिळते. काही आपत्कालीन घटना घडली असेल तर ते कळविण्यासाठी १०० हा नंबर उपलब्ध करुन दिला आहे. गणेशजयंती, नवरात्र, मोहरम अशा अनेक मिरवणूकींना पोलीस संरक्षण देत असतात. या मिरवणूकीत कांही गैरप्रकार घडून नये म्हणून पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त असतो. त्यामुळे शांतपणे आपण मिरवणूकीत सामील होऊ शकतो.

पोलीस खात्याचं नाव आपण बदनाम करुन ठेवलं आहे. पोलीस खातं असं आहे, तसं आहे. ते काम करत नाहीत. दिवसाढवळ्या चोरीचे प्रमाण वाढले आहे. असं आपण बोलत असतो. पानसरे हत्याकांडाच्या बाबतीत पोलीसही हत्याराला पकडू शकले नाहीत व शोध लागला नाही, म्हणून लोक पोलीस अधिकाऱ्यांना विरुध्द बोलतात. बोलता सर्वांना येत पण करुन दाखवनं अवघड असतं.

स्वतःच्या घराचा विचार न करता रात्रंदिवस आपल्याला सुरक्षित कसे करता येईल त्याच्याकडे त्यांचा जास्त कल असतो. अशोक कामटे, विजय साळसकर, हेमंत करकरे हे आपल्या पिढीला एक प्रेरणा देऊन गेले आहेत. त्यांना जगण्याचा अधिकार नव्हती का? त्यांना त्यांच्या लेकराबाळांची काळजी

नव्हती का? तरी पण २६/११ च्या हल्ल्यात ते शहीद झाले, आणि आता झालेल्या पुलवामा या हल्ल्यात ४० जवान शहीद झाले. पुलवामा हल्ल्यात ठार झालेले आपल्याला संरक्षण देणारे हे पोलीसच आहेत. पण याचा विचार कोणीसुध्दा करीत नाहीत आपण चुकांवर जास्त भर देतो. त्यांनी चांगले कामे करुन सुध्दा त्यांच्याकडे आपण दुर्लक्ष करतो. वाईट गोष्टी लगेच लक्षात राहतात, पण चांगले काम नाही.

वाईट गोष्टींवर आपण जास्त लक्ष देतो. परवाची एक घटना. एक हेडकॉन्स्टेबलने एक आदिवासी मुलाला १८ वर्षांनी शोधून त्याला आपल्या आई - वडिलांच्या स्वाधीन केले. अशा पोलीसाची कडक सुरक्षा तैनात केली जाते. नागरिक सुरक्षित राहावे म्हणून विविध उपक्रम राबवतात. रात्रीच्या वेळी प्रत्येक शहरात, प्रत्येक नगरात रात्रीच्या वेळी प्रत्येक शहरात, प्रत्येक नगरात रात्रीच्या वेळी राऊंडवर असतात. रात्रीच्या वेळी पोलीस तैनात आपल्या सुरक्षिततेसाठी असतात. ३१ डिसेंबर वेळी रात्री १२ नंतर सुद्धा पोलीसांचा कडक बंदोबस्त तर कोठेही काही गैरकृत्य होऊ नये म्हणून असतो. आपल्या जास्त सुरक्षेची काळजी ही पोलीसांना असते. जर त्यांना आपल्या सुरक्षेची काळची नसती तर ते सुध्दा कोठे तरी जावून ३१ डिसेंबरची पार्टी करत बसले असते. असे न करता आपल्या सुरक्षेसाठी रात्रंदिवस बंदोबस्त करत असतात. एवढी सुरक्षा असून सुध्दा आपण असे का म्हणतो. का आपण खरेच सुरक्षित आहेत का? एवढी सुरक्षा असूनसुध्दा मी कशाला म्हणू, मी सुरक्षित नाही.

आपली सुरक्षा ही पूर्णपणे पोलीसांनी दिली पाहिजे, असे काही नाही. आपण स्वतःची सुरक्षा सुध्दा केली पाहिजे.

मुलींनी वागावे तरी कसे ?

या दुनियेत मुलींनी वागावे तरी कसे?

मन मोकळेपणाने जगले तर म्हणतात.?
तिला घरचे घरबंधन नाही.

शांत, गंभीरपणे वावरले तर म्हणतात.
बोलण्याची हिंमत नाही.

जास्त बोलली तर म्हणतात.
पोरगी जास्तच चर-चर करते.

लवकर लग्न झाले तर म्हणतात.
एखादे लफडे लपवायचे असेल.

लग्नाला उशीर झाला तर म्हणतात.
तिच्यात एखादा दोष असेल.

काहीच करता आले नाही तर काय कामाची,
डोक्यावर मिरे वाटेल.

काहीच करता आले नाही तर म्हणतात.
मठ्ठच असेल.

मित्र मैत्रिणी जास्त असतील तर म्हणतात.
पोरगी हवाळखोर असेल.

मित्र मैत्रिणी नसेल तर म्हणतात.
ती एकलकोंडी आहे.

दुःखाला कंटाळून जीव द्यायला
लागली की म्हणतात.

जगणे जीवावर आले असेल
मुलींनी या दुतोंडी दुनियेत जगावे तरी कसे?

आणि निरापराध असताना छोट्याशा
बदनामीला घाबरून मरावे तरी कसे?

कु. अमृता गांगुर्डे
बी. ए. भाग - ३

पर्यटकांना खुणावणाऱ्या बालाघाटच्या डोंगररांगा

कु. अमृता गांगुर्डे
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

'मराठवाड्याचे प्रवेशद्वार' म्हणून बार्शी तालुक्याला ओळखले जाते. मराठवाडा व बार्शी तालुक्याच्या सीमेवर बालाघटच्या डोंगररांगा म्हणजे या दोन्ही परिसराला मिळालेली एक नैसर्गिक देणगी आहे. या भागातील निसर्गरम्य डोंगर व त्यामधून वाहणारे झर, पशु-पक्षी त्याचबरोबर विविध तीर्थक्षेत्र हे पर्यटकांना खुणावत असून पावसाळ्यात हिरवाईने नटलेल्या बालाघाटाच्या डोंगररांगा पर्यटकांना खुणावत आहेत. या भागाला सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्याला पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित करण्याची संधी आहे.

बालाघाटच्या पायथ्याशी बार्शी तालुक्यातील पांगरी, चिंचोली, पिंपळवाडी, शिराळे, काटेगाव या प्रमुख गावासह अनेक गावे वसलेली आहेत. डोंगररांगाच्या पायथ्याशी येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत. बालाघाटच्या या पर्वतरांगांवर विस्तीर्ण जंगल पसरले आहे. या जंगलामध्ये हरीण, काळवीट, मोर यासारखे वन्य प्राणी आणि पक्षी, त्याचबरोबर वनऔषधी त्याचबरोबर दुर्मिळ वृक्ष तसेच फुलांची व फळांची झाडे आहेत. या सर्वांच्या संरक्षणासाठी वन-विभागाने वेगवेगळे विभाग केले आहेत.

या परिसरातील पांगरी, पांढरी, इ. ठिकाणी लहान - मोठे तलाव उभारले असून या पाण्यावर पक्षांची तहान भागवली जाते. विविध प्रजातीचे पक्षी आपली तहान भागविण्यासाठी या तलावावर येतात. शासनाकडून दरवर्षी वनविभागाकडून या क्षेत्रात वृक्षांची लागवड होत असते. या डोंगरखोऱ्यातून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मातीचे बांध बांधले आहेत.

तार्थक्षेत्र रामलिंग - या बालाघाटच्या डोंगररांगामध्ये निसर्गासौंदर्याने नटलेले श्रीक्षेत्र रामलिंग हे तीर्थक्षेत्र असल्याने अनेक पर्यटक व भाविकांची वर्दळ असते. चोहोबाजूने डोंगर असून येथील मंदिरांचे बांधकाम हेमाडपंथी आहे. रामलिंग येथे प्रसिध्द धबधबा आहे. पावसाळ्यात या उंच धबधब्यावरुन पाणी कोसळत असल्याने याठिकाणी पर्यटकाची गर्दी असते. एक अविस्मरणीय क्षण अनुभवायला देणारा हा परिसर म्हणून नावारुपास येत आहे. श्रावणात महिनाभर पर्यटकांची व भाविकांची गर्दी लोटलेली असते. याच परिसरात उंचटेकडीसुध्दा आहे.

अनेक वनौषधी- बालाघाटच्या डोंगररांगात व परिसरात विविध वनौषधीच्या वनस्पती असून त्या अनेक रोगांवर गुणाकारी आहेत. वनस्पती-शास्त्रातील अनेक दुर्मीळ वनस्पती आहेत.

वन्यप्राण्यांचा वावर- या डोंगररांगात वन्यप्राण्यांचा मोठा वावर असून तरस, रानडुक्कर, लांडगा, काळवीट, हरीण, ससा, सायाळ, आदि. प्राणी आढळून येतात. त्याचबरोबर सरपटणारे प्राणी, मोठ्या प्रमाणात दिसतात. त्याचबरोबर पोपट, घुबड, बहिरीससाना लांडगा, कावळा, सांळुकी, मोर आदि पक्षांचादेखील वावर आहे. यांच परिसरातील येडशीतील वनक्षेत्र हे वन्यजीव अभयारण्य म्हणून शासनाने घोषित केले आहे. इत्यादी सर्वकारणामुळे या परिसरातून भटकंती करताना वेगळाच आनंद मिळतो. बालाघाटच्या डोंगररांगातून पुणे - लातूर राज्यमार्ग गेल्याने पर्यटकांना येणे - जाणे सोयीस्कर होणारे आहे. निसर्गाची अनमोल देणगी लाभलेला हा परिसर पर्यटनक्षेत्र म्हणून नावारूपास आला आहे.

गडकिल्ल्यांचे संरक्षण... ही काळाची गरज

कु. निकीता शितोळे
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात गडकिल्ल्याचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनत चालली आहे. आजकालच्या हवामानातील बदल व मानवी हस्तक्षेपामुळे गड, किल्ले ढासळत चालले आहे. गड, किल्ले हे इतिहासातील महत्त्वपूर्ण वास्तू आणि साधन आहे. त्यामुळे भूतकाळातील घटना आपल्या नजरेसमोर उभी राहतात.

आजकालच्या प्रदूषणामुळे मानवी हस्तक्षेपामुळे गडकिल्ल्याचे संरक्षण ही काळजी गरज बनत चालली आहे. महाराष्ट्रातील किल्ल्याची आजची परिस्थिती पाहता किल्ल्यांचे संवर्धन करणे ही खूप गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोठ्या कष्टाने व पराक्रमाने स्वराज्य स्थापन केले व स्वराज्य वाढविले. तसेच मोठ्या शर्थीने किल्ले जिंकले व किल्ले बांधले. या सर्वामध्ये मावळ्यांनी देखील महत्त्वपूर्ण व मोलाचे योगदान दिले व अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अशा इतिहासातील अविस्मरणीय घटना आपल्याला किल्ल्यांच्या आधारे पाहता येतात अनुभवता येतात. किल्ल्यांचे महत्त्व आपल्या जीवनात खूप आहे.

किल्ल्याच्या आधारे आपल्याला त्याकाळातील बांधकामशैली वास्तुशास्त्र, त्याकाळातील लोकांना असलेले भौगोलिक ज्ञान इ. ची आपल्याला माहिती मिळते. आजकाल किल्ल्याची अवस्था खूप बिकट होत चालली आहे.

गडकिल्ल्यांचे हे वास्तुवैभव पाहण्यासाठी पर्यटक भेट देत असतात. आजकाल मोठ्या प्रमाणात किल्ल्याला भेटी देणारे पर्यटकाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. किल्ल्यांचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. पहिला प्रकार म्हणजे भुईकोट किल्ला होय. भुईकोट किल्ला म्हणजे जमिनीवर किंवा भूभागावर असणारा किल्ला होय. दुसरा प्रकार म्हणजे गिरीदुर्ग होय. तिसरा प्रकार म्हणजे जलदुर्ग. समुद्रातील बेटावर असणाऱ्या किल्ल्यास जलदुर्ग म्हणतात. अशाप्रकारे किल्ल्याचे प्रकार आहेत. यावरुन किल्ल्याची रचना, भौगोलिक परिस्थिती, आसपासचा परिसर, त्या त्या ठिकाणी असणाऱ्या हवामानाची माहिती आपल्याला समजते. हे सर्व पाहण्यासाठी व अनुभवण्यासाठी पर्यटक किल्ल्यास भेट देत असतात.

पर्यटक हे तेथील भिंतीवर दगडावर चित्रे रेखाटतात त्यामुळे तेथील भिंतीचे सौंदर्य बिघडते. तसेच किल्ल्यांच्या परिसरात कचरा करतात, इ. कारणांमुळे किल्ल्यांचे परिसर व सौंदर्य दोन्हीची अवस्था खूप बिकट होत चालली आहे. किल्ल्याच्याआधारे आपल्याला छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराजापर्यंतचा इतिहास आपल्याला समजतो पण आपण किल्ल्याला भेटी देतोच पण तेथील परिसर तेथील भिंती अस्वच्छ करतो. अशा कारणांमुळे पुढील पिढीना महाराजांचा इतिहास समजणे अशक्य होईल. असे सर्व प्रकार रोखण्यासाठी शासनाने किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी अनेक कायदे अमलांत आणले आहेत. आपल्या महाराष्ट्रात असंख्य किल्ले आहेत. या किल्ल्यामध्ये भिंतीवर चित्रे काढणे, किल्ल्यांमध्ये कचरा काढणे, किल्ल्याचा परिसर अस्वच्छ करणे इ. प्रकार करणाऱ्यावर कडक कायदे व दंड अमलात आणले आहेत. या कायद्यानुसार तेथील परिसराचे संरक्षण करणे बंधनकारक केले आहे. आपण या महाराष्ट्राचा जबाबदार नागरिक किंवा व्यक्ती या नात्याने एक महत्त्वाची जबाबदारी व कर्तव्ये म्हणून किल्यांचे संवर्धन करणे खूप महत्त्वाची गोष्ट आहे.

किल्ल्याच्या आधारे भूतकाळातील घटना आपल्या डोळ्यांसमोर येतात. प्रत्येक किल्ल्याच्या मागे एक अविस्मरणीय घटना आहे. अशा कित्येक घटना किल्ल्यास भेटी देणाऱ्या पर्यटकाच्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात.

अशाप्रकारे किल्ला म्हणजे इतिहासातील महत्त्वपूर्ण वास्तू व साधन आहे. या महत्त्व पूर्ण वास्तूचे जतन व संवर्धन करणे ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे, तसेच खूप गरजेचे आहे.

आत्मकथा ...एका रोपाची

कु. ऐश्वर्या जहगिरदार
बी. कॉम. भाग - १
संकलन

ऊन, वारा, पाणी आणि माती हे माझे जन्मदाते, एक दिवस मालक मला आणि माझ्या मित्रांना पाणी घालत होते. त्या दिवशी मालक माझ्या हिरव्या गार मित्रांना कात्रीनं कापत होते. मालकाचे असे वागणे मला विचित्र वाटू लागले. जवळ - जवळ मी मेल्यातच जमा होतो. पण माझं हृदय (मूळ) माझ्यासोबत होते.

नंतर मला खूप आनंद झाला कारण मालकांनी मला त्यांच्या निसर्ग संकल्पनासाठी आणलं होतं. पण हा आनंद काही क्षणाचाच. माझ्या अवती - भोवती झाडे लावण्यात आली. प्लास्टिकची झाडे मला माझ्या अंगाला फार टोचत होती. पण मी सुध्दा उभा राहिलो. कारण या संकल्पनेवर जास्त अधिकार माझा आहे.मी मालकाची वाट पाहू लागलो. मला पाहून त्यांना खूप आनंद वाटेल. त्यांनी मला नाकारले. माझ्यापेक्षा जास्त त्यांना प्लास्टिकची झाडे जवळची होती. पण मी उभा राहिलो. कारण... तुमच्या भविष्याची मला काळजी वाटते.

मला तुमची काळजी वाटते कारण आम्ही तुम्हाला ऑक्सिजन देतो. जे तुमचे प्राणवायू आहे.

टाहो ऐकून धरित्रीचा,
कुशीतून बीज अंकुरले,
निर्बुध्द मानवाने
मज कचऱ्यात लेखिले...

खूप दुःख वाटते, मला या रोपाची ही आत्मकथा ऐकून. खरे तर त्या रोपाच्या मालकाने तसे करायला नको होते. रोपेच पुढे मोठे होऊन झाड होतात. झाडे आपल्याला किती मदत करतात. झाडे आपल्याला फळे, फुले, सावली, लाकूड आणि औषधे इ. गोष्टी देतात, आणि आपणच त्यांना मारतो. म्हणजेच त्यांना तोडतो, कापतो.

आपल्या लहानपणापासून ते आपल्या म्हातारपणापर्यंत ते आपले चांगले. मित्र बनून साथ देत असतात, जर आपण झाडांना कापलो, जंगलांना तोडले तर उलट आपल्यालाच त्रास होणार आहे. झाडे आपल्याला प्राणवायू देतात. ते आपले कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन आपल्याला ऑक्सिजन पुरवितात.

मला वाटते की, पुढे आपल्या पिढींना ऑक्सिजन मिळणे खूप कठीण आहे. कारण अलिकडच्या काळात माणसे, जंगलतोड करत आहेत. जंगलतोड करुन तेथे घरे, कारखाने उभे करत आहेत. त्यामुळे जंगलतोडाचे प्रमाण खूप वाढले आहे. आजच्या कलियुगात औद्योगिक क्षेत्रात प्रमाण खूप वाढले आहे, आणि त्यामुळे त्यातून जो दूषित वायू बाहेर पडतो तो दूषित वायू आपल्या शरीराला, आपल्या आरोग्याला खूप हानिकारक आहे. त्या दूषित वायूंमुळे आपल्याला अनेक रोगांना सामोर जावे लागेल.

झाडे लावा, झाडे जगवा,
झाडे लावा, झाडे वाचवा.

असे नारे फक्त जागतिक वृक्षदिनादिवशी म्हणून चालणार नाही. तर प्रत्यक्ष त्या नाऱ्यांची अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे. म्हणजे आपण प्रत्यक्षात झाडे लावली पाहिजे व झाडे जगवली पाहिजेत. त्यांना सजिवांप्रमाणेच वागणूक दिली पाहिजे. कारण किती केलं तरी शेवटी ते सजीवच आहेत.

कर्जबाजारी शेतकरी व कर्जमाफी

कु. मंजुषा गंपले
बी. कॉम. भाग - ३

भारत हा कृषीप्रधान देश आहे. जवळजवळ ६० ते ७०% लोकसंख्या आपल्या उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती हा देशातील एक महत्त्वाचा घटक मानला जातो. कारण शेतकरी जेव्हा शेतात धान्य पिकवतो व कष्ट करतो. तेव्हाच आपल्याला अन्नधान्य उपलब्ध होते. शेतकरी कधी असा विचार करत नाही. की आपण शेतीच करायची नाही शेतकरी देशातील लोकांचा विचार करतो पण सरकारने सुध्दा शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा वेळेवर देण्याची सोय केली पाहिजे. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा वेळेवर देण्याचा सोय केली पाहिजे.

सध्या चर्चेत असणारा शेतकऱ्यासंबंधी 'शेतकरी कर्जमाफी' ह्या विषयाचे विवेचन करुयात.

शेतकऱ्यांना कर्जमाफीची मागणी सध्या जोर धरत आहे. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना समस्या मात्र सुटणार नाहीत, म्हणून शेतकऱ्याच्या प्रश्नावर दूरगामी उपाययोजना करण्याची आणि यासाठी धोरणात्मक बदल करण्याची आता गरज आहे.

* शेतकरी कर्जबाजारी होण्याची कारणे

१) नैसर्गिक आपत्ती
२)पाण्याची करतरता
३)कच्चा मालाच्या वाढत्या किंमती
४)व्याज़ाचा बोजा
५)उत्पादनाच्या प्रमाणात घटलेला मागणीचा दर
६)घेतलेल्या मालावर आलेली कमी किंमत
७)हंगामाचा परिणाम
८)हवामानाचा लहरीपणा

या प्रकारच्या कारणामुळे शेतकरी कर्जबाजारी होतात व त्याचाच परिणाम नैराश्यग्रस्त होण्यामध्ये आणि शेवटी आत्महत्या करण्यामध्ये होतो.

शेतकरी कर्ज बाजारी होण्यामागे आणखी कारणे आहेत ती म्हणजे आपल्याकडे ऋण (कर्ज) काढून थाटामाटात लग्न करण्याची पध्दत आणि मुलाच्या शिक्षणावर होणारा अमाप खर्च होय.

शेतकरी शेतात पेरणी करतात पण शेतात पाण्याची करतरता, नैसर्गिक वातावरण बि - बियाचे गुणवत्ता याचा परिणाम शेतीवर होतो. त्याच बरोबर धान्याचा योग्य मोबदला त्यांना मिळत नाही. शेतकरी हे व्यापाऱ्यांना कमी किंमतीत धान्याची विक्री करतात पण दुसरीकडे व्यापारी जास्त किंमतीने धान्याची विक्री करतात यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते.

शेतकऱ्यांच्या या समस्यावर विचार विनिमय करणे तसेच त्यांचे प्रश्न सोडविणे यासाठी उपाययोजना सुचवणे गरजेचे आहे. खरं तर आज शेतकऱ्याला कर्ज घेण्याची वेळ येऊच नये, असे धोरण शासनाने आखणे गरजेचे आहे.

कर्जमाफीचा गैरफायदा घेता येऊ नये यासाठी निकष हवेत सर्व संकटग्रस्त व गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी व नव्या हंगामास पुरेसे कर्ज द्यावे अशी मागणी शेतकरी संघटनांच्या सुकाणू समितीने केली आहे. सुकाणू समिताच्या सांगण्यानुसार सर्व निकष बाजूला सारुन कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. यात सरसकट दीड लाख रुपयापर्यंतच्या पीक कर्जाला माफी

देण्याचा निर्णय घेण्यात आला यामुळे शेतकरी सुखावला.

* कर्जमाफीवर निकष (२०१२ - १३ ते २०१५ - १६)

१)कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कुटुंब - पती, पत्नी आणि १८ वर्षाखालील मुलांचे समावेश.

२)कर्जदार शेतकरी महिला असल्यास कुटुंबातील कर्जाची देय रक्कमेचा प्राधान्याने विचार.

३)फक्त राष्ट्रीयकृत, खाजगी ग्रामीण आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांनी दिलेले शेती कर्जाचा समावेश.

शेतकरी कर्जमाफीवर काही निकष लावले गेले. या निकषामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या हजारो शेतकऱ्यांना न्याय मिळालेल्या नाही. अपात्रतेचे निकष शेती व ग्रामीण वास्तवाशी सरकारी पक्षाची नाळ तुटलेली असल्याचेच लक्षण आहे. आदेशानुसार शासकीय नोकरीत किंवा अनुदानित संस्थेत नोकरीस असणाऱ्या अशा कर्जासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. अनेक गरजू व संकटग्रस्त शेतकऱ्यांवर यामुळे अन्याय होणार आहे.

कर्जमाफी मिळाली पण सर्वांना नाही काही व्यक्तिंना कर्जमाफीसाठी अपात्र ठरविले आहेत.

* राज्यातील आजी - माजी मंत्री, राज्यमंत्री, खासदार, आमदार.
* जिल्हापरिषद व महापालिकेचे सदस्य
* केंद्र - राज्य सरकारी अधिकारी कर्मचारी निमशासकीय संस्थाचे सर्व अधिकारी.
* कृषी उत्पन्न बाजार समिती सहकारी साखर कारखाना, सहकारी सूतगिरणी नागरी सहकारी संस्था, जिल्हा बँका, सहकारी दूध संघाचे अधिकारी.
* १ लाख रुपयांपेक्षा जास्त ढोबळ उत्पन्न असलेली सेवा कर भरण्यासाठी नोंदणीकृत व्यक्ती.
*जी व्यक्ती मूलवर्धीत कर किंवा सेवा कर कायद्याअंतर्गत नोंदणीकृत आहे. तसेच ज्याची २०१६ - १७ मधील वार्षिक उलाढाल १० लाख किंवा अधिक आहे.

याचप्रमाणे तसेच सुकाणू समिती यामध्ये १० हजाराचा जी आर (ऋण) तत्काळ रद्द करा अशी मागणी होती. थकीत कर्जमाफी नावातून थकित शब्द वापरावे कारण काहीच कर्जाची रक्कम थकित न ठेवता पूर्ण रक्कम माफ करावी. पीक कर्जासह इतर शेतीपूरक कर्जमाफीसाठी सुकाणू समितीने आग्रह केला. याप्रकारे कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. अर्थात नावानुसार या सुकाणू समितीला आणि शेतकरी आंदोलनाची पुढील दिशा तसेच शेतकऱ्याच्या कल्याणासाठी उपाययोजना करता येतील.

काही शेतकरी अशिक्षित असतात त्याच्या नावावर काही लोक शेतीसाठी म्हणून कर्ज घेतात व कर्ज बुडवतात या प्रकारात शेतकरी फसतात अशा प्रकारचे गैरव्यवहार समोर येण्यासाठी 'आधार लिंक' ही योजना राबवली गेली.

शेतमालाच्या बाजारावर असलेले सरकारी नियंत्रण उठले पाहिजे कारण त्यामुळेच शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने देखील शेतकरी त्रस्त झाला आहे. एकंदरीत शेतकऱ्यांच्या प्रश्नाला आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक असे अनेक पैलू आहेत या गोष्टीचा विचार करण्याची गरज आहे. कर्जमाफीने तात्पुरते समाधान मिळेलही पण समस्या मात्र सुटणार नाही. यावर योग्य उपाय सुचवणे किंवा शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'शेतकरी कर्जमाफी' या विषयावर अभ्यास केल्यावर मला खालील उपाय सुचवावेसे वाटतात.

शेतकऱ्याचा सरकारने विचार करायला हवा त्यांना वेळेवर कर्जाचा पुरवठा केला पाहिजे व सर्व प्रकारची पडताळणी करुनच कर्ज पुरवठा केला पाहिजे. कारण शेतकऱ्याच्या नावावर सावकार, राजकारणी यासारखे लोक कर्ज घेतात व परतफेड शेतकऱ्याला करावी लागते. याचाच परिणाम शेतकरी कर्जबाजारी होतो. नैराश्याकडे वळतो आत्महत्याचा विचार करतो.

शेतकरी व शेती व्यवसाय विकसित करावयाचे असेल तर अल्प भूधारक, लहान अशा शेतकऱ्यांकडे सरकारने लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे व स्वतंत्र धोरण आखण्याची गरज आहे. कारण जेव्हा लहान शेतकरी मोठा होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने सर्वकष विकास होईल.



छत्रपती शिवाजी महाराजांचा वैज्ञानिक दृष्टीकोन

कु. निकीता शितोळे
बी. ए. भाग - ३
(इतिहास विभाग)

मध्ययुगीन भारताचा इतिहासातील शिवाजी महाराजांचा उदय ही एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. तर समग्र महाराष्ट्राच्या दृष्टीने भाग्योदयाची घटना आहे. त्यांची प्रेरणा, विज्ञान निष्ठता, पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने त्यांची सजगता, सर्तकता व बुध्दीनिष्ठता, त्यांनी जागवलेली स्वातंत्र्याची ज्योत आजही जनतेच्या मनामनात जागी आहे. यातच त्यांचे यश दडले आहे. लोकांचे राजे अनेक असतात पण लोकांच्या हृदयात ३ - ४ शतके राज्य करणे ही सोपी गोष्ट नाही. शिवाजी महाराज आजही जनतेच्या स्वातंत्र्यकांक्षेचे प्रतिनिधी आहेत.

१७ व्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजामध्ये एक दृष्टीने टाकल्यानंतर असे दिसून येते की, या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेवर सामाजिक रुढी परंपरा, अनिष्ट प्रथा आणि धार्मिक अंधश्रध्देचा जबरदस्त पगडा होता, समाजातील लोक त्याच्या बऱ्याच प्रमाणात आहारी जाऊन गूरफटून गेले होते. याकाळात राजसत्तेवर धर्मसत्तेचे प्राबल्य वाढले होते. पण अशा काळात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि अल्पावधीत स्वराज्याचे रुपांतर सुराज्यात केले. शिवाजी महाराज हे परंपरावादी नसून ते विज्ञानवादी व परिवर्तनवादी होते. त्याच्या या दृष्टीकोनाचा प्रत्यय त्यांनी स्विकारलेल्या धोरणावरुन, घेतलेल्या भूमिकेवरुन दिसून येतो.

मध्ययुगीन काळात स्त्रियांचे जीवन प्राचीन काळाच्या तुलनेत काही प्रमाणात सुधारले असले तरी स्त्रियांवर सामाजिक परंपरेतून अनेक बंधने व निर्बंध लादण्यात येत होती. या काळामध्येही पतीचे निधन झाले की, पत्नीचे सती जाण्याची अनिष्ट प्रथा होती.

जर स्त्रिया पती निधनानंतर सती गेल्या नाही तर त्या स्त्रियांना समाज वाळीत टाकत असे. कारण जीवंत राहूनही तिला मरणापेक्षा जास्त यातना सहन कराव्या लागत होत्या. दि. २३ जानेवारी १६६४ ला शिवाजी महाराजांचे वडिल शहाजी राजांचे निधन झाले. त्यावेळी शहाजी राज्यांच्या पत्नी व शिवाजी महाराज्यांच्या मातोश्री 'जिजाबाई' यांनी सती जाण्याचे ठरविले होते. पण शिवाजी महाराजांनी आईच्या गळा पडून तिला तिच्या निर्णयापासून परावृत्त केले. शिवाजी महाराज यावेळी सुरतेच्या स्वारीहून परतले होते.

'जिजाबाई' पतीच्या निधनाची वार्ता ऐकून सती जाण्यास सिध्द झाल्या होत्या. तेव्हा स्वतः शिवाजी महाराजांनी मोठ्या प्रयत्नाने त्यांचे सांत्वन करुन त्यांना त्यांच्या निर्णयापासून परावृत्त केले. तत्कालीन काळाचा विचार केला तर शिवाजी महाराजांची ही भूमिका परंपरेला छेद देणारी होती. हे एक त्यांनी सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने उचललेले एक क्रांतीकारक पाऊलच होते असे म्हणावे लागेल. महाराजांच्या या क्रांतीकारक भूमिकेमुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहण्यास

सुरुवात झाली.

परिवर्तनवादी धोरणाबरोबरच त्यांनी पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले दिसून येतात. आजच्या काळाप्रमाणे त्या काळात पर्यावरणाविषयी जागरुकता लोकांमध्ये नव्हती. पण ती जागरूकता लोकांमध्ये निर्माण करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या धोरणातून केल्याचे दिसून येते. शिवाजी महाराज नवीन प्रदेश घरे बांधकाम, तळी खोदकाम व बागा लावण्यास सांगून स्वतः जातीने मदत करीत असत. पराभूत शत्रू प्रदेशातील रहिवाशांना अभय देणे, त्यांना स्वतः वैयक्तिक मदत करणे, त्यांना वृक्षलागवड व वृक्षसंगोपनास प्रोत्साहन देणे यातच शिवाजी महाराजांचे मोठेपण सामावलेले आहे. शिवाजी महाराजांनी आपल्या धोरणातून 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' हा पर्यावरण विषयी जनजागृतीचा संदेश दिला. यापुढे जावून त्याची सुरुवात स्वतः पासून केली. १७ व्या शतकामध्ये महाराजांचा हा पर्यावरण संतुलन साधण्याचा निर्णय किती विज्ञानवादी व पुरोगामी होता याची प्रचीती येते. महाराजांचे हे धोरण आजच्या स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करणाऱ्या व वृक्षतोड करुन निर्माण होणाऱ्या दुष्काळाकडे दुर्लक्ष करणाऱ्या राज्यकर्त्यांना दिशा देणारे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात मंदिरे, मशिदी बांधविल्या. अनेक मंदिरांना, मठाना, दर्ग्यांना इनाम जमिनी दिल्या हे खरे आहे. मात्र ते धार्मिक कट्टरवादी नव्हे तर सर्वधर्मसमभाव असा व्यापक दृष्टीकोन असणारे राज्यकर्ते होते. धर्म जगण्याला आधार व योग्य आकार देण्यासाठी असतो. एवढ्याच अर्थाने शिवाजी महाराज धार्मिक होते. छत्रपती शिवाजी महाराज मंदिरे व देणग्यावर फार कमी पैसे खर्च करत असत. उलट पडिक जमिनींना बी - बियाणे पुरविणे यासाठी जास्त पैसे खर्च करत असत. यावरुन शिवाजी महाराज स्वराज्यातील शेतकऱ्यांच्या हिताची किती काळजी घेत होते, आणि ते दैववादापेक्षा प्रयत्नवाद, कर्मवादाला प्राधान्य देणारे होते, हे सिध्द होते.

शिवाजी महाराजांचे धोरण हे समाजाभिमुख होते. महाराजांनी सामाजिक विकासाच्या आड येणाऱ्या अंधश्रध्दा व अनिष्ट प्रथा मोडीत काढण्याची सुरुवात स्वतःपासून केली. समाजामध्ये असलेल्या परंपरा प्रथा सर्व पाळल्या पाहिजेत असे नाही. त्या प्रथा समाजामध्ये खुळ्या समजुती निर्माण करतात त्याला प्रसंगी मुठमाती दिली पाहिजे या विचाराचे शिवाजी महाराज होते. त्यांनी कुठल्याही मोहिमेवर जाण्यापूर्वी पंचागामध्ये मुहूर्त पाहिला नाही. उलट आपल्या काही मोहिमा अमावस्येच्या अंधारी रात्री काढल्या. पोथीनिष्टता व दैववादाला आपल्या धोरणातून खतपाणी न देता माणसे जोडून आठरापगड जातीतील लोकांना एकत्र करुन मानवतावादाला खतपाणी देवून स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर केले.

आजच्या काळातील राज्यकर्त्यांनी शिवाजी महाराजांच्या या धोरणापासून प्रेरणा घेतली असती तर महाराजांच्या नावाचा जयघोष करणाऱ्या पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर आत्महत्त्या करण्याची वेळच आली नसती. आज २१ व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळात महाराष्ट्रात राज्यकर्त्यांनी उद्योग व स्वार्थासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारलेला दिसून येतो पण सर्वमावेशकपणा समोर ठेवून शिवाजी महाराजाप्रमाणे समाजाच्या विकास व उन्नतासाठी सामाजिक ऐक्य या दृष्टीने व समाजाला परंपरेतून, अंधश्रध्देतून परिवर्तनाच्या दृष्टीने ठोस पाऊले उचलेली दिसून येत नाही. तसा निर्णय घेतला असता तर संसदेत अनेक वर्षापासून रेंगाळलेले अंधश्रध्दा निर्मुलन विषयक कायदा पास करण्याचे विधेयक तेव्हाच मंजूर झाले असते. शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करुन स्वराज्यातील सर्वांना समानतेने वागण्याचे बळ दिले, पण आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे झाली पण सुराज्य मिळाले नाही त्याचे काय?

लोकसेवा हीच देशसेवा

कु. प्रियांका मिठ्ठा
बी. कॉम.भाग - २

लोकसेवा म्हणजे सरकारनं आपल्या हद्दीतील लोकांसाठी पुरवलेली सेवा. ही सेवा सरकारकडून परस्पर पुरवली जाते. पब्लिक सेक्टरच्या माध्यमातून किंवा सरकार अशी सेवा पुरवणाऱ्या खासगी संस्थांना आर्थिक पाठिंबा देते. या सेवा दोन स्तरांवर राबवल्या जातात. एक म्हणजे 'नॅशनल' म्हणजे भारतीय व दुसरं म्हणजे राज्य म्हणजे 'स्टेट'. या लोकसेवामध्ये भरती ही परिक्षेद्वारे केली जाते. भारतीय स्तरावर युपीएससी (युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन) व राज्यस्तरावर एमपीएससीच्या (स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशन) माध्यमातून. २१ वर्षापुढील सर्व पदवीधर पुरुषांना व स्त्रियांना या परीक्षा खुल्या असतात. एमपीएससीची वयोमर्यादा २८ ते ३५ पर्यंत आहे. तर युपीएससीची ३२ वर्ष असून या परीक्षा जास्तीत जास्त ६ वेळा देता येतात.

या दोन पातळीवरील परीक्षांपैकी एमपीएससी ही परीक्षा युपीएससीच्या तुलनेत थोडा सोपी वाटते. याचं कारण म्हणजे एमपीएससीमध्ये जास्त भर 'माहिती' वर असतो. तर युपीएससीमध्ये सगळा भर 'संकल्पना' वर असतो. माहिती गोळा करणें हे एखादी संकल्पना समजून त्यांच विश्लेषण करण्याच्या किंवा त्यांच्यावर विचार करण्याचा तुलनेत केव्हाही सोपं असतं. मुळातच या परीक्षा देण्यासाठी माहितीचा साठा खूप वाढवावा लागतो. यासाठी नियमितपणे वर्तमानपत्र सविस्तर वाचणं गरजेचं व फायद्याचं ठरतं. त्याचप्रमाणे भरपूर अभ्यास, उजळणी रोजच्या रोज किंवा आठवड्याचं अभ्यासचे वेळापत्रक व ते पूर्ण करण्यासाठी रोज एक नवी ऊर्जा व स्फूर्ती लागते. हे वेगळं सांगायला नको . वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करावा. जसं, इतिहास, भुगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, पर्यावरण जैवविविधता, शेतीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, मानववंशशास्त्र, रसायनशास्त्र, अभियांत्रिकी, लेखापरिक्षण, कायदा, व्यवस्थापन, तत्वज्ञान, भौतिकशास्त्र, मानसशास्त्र, प्रशासन, साहित्य इत्यादी. यातील काही विषय अनिवार्य असतात. तर काही पर्यायी विषयांमधून निवडायचे असतात. परीक्षेमध्ये ग्रहणशक्ती, तर्कशक्ती, निर्णयक्षमता, आकडेमोड, भाषाशैली तपासण्यासाठी एक अभिक्षमता चाचणी असते. तसचं एमपीएससी मध्ये कारकुनी व टायपिंगचीही चाचणी असते. या परीक्षांची तयारी करण्यासाठी ऑनलाईन व वर्ग - गट अभ्यासक्रम उपलब्ध आहेत व ते आवश्यकही आहेत.

युपीएससी / एमपीएससीच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विलक्षण बुद्धीमत्ता व तर्कक्षमता असणं गरजेचं आहे. युपीएससीसाठी अधिक कुशाग्र बुध्दिमत्ता अपेक्षित आहे. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर लोकसेवेमध्ये भरती झाल्यावर लोकसेवेची तळमळ तर हवीच. शिवाय आत्मविश्वास, जिद्द, प्रयत्नांची चिकाटी, ध्येयनिष्ठता, लोकांकडून काम करुन घेण्याची हातोटी, नेतृत्व, चांगली निर्णयक्षमता व अनुरुप भावनिक व ताणतणाव नियोजन हे स्वभावविशेष असणं महत्वाचं व उपयोगाचं आहे. त्याचबरोबर प्रशासकीय कामाजी आवड असणं संयुक्तिक आहे.

युपीएससी / एमपीएससीच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका, त्याला लागणारा अभ्यास व तयारी व भरती झाल्यावर लोकसेवेसाठी कामाची तत्परता या सर्वांचं डोळ्यासमोर नीट चित्र उभं करुन त्याच्या तुलनेत आपली बुद्धी, क्षमता, आवड व मानसिकता पडताळून पाहून मगच प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला हा लांबलचक व खडतर प्रवास सुरु करायचा की नाही. हे ठरविणे आवश्यक असते.

"तुम्ही सत्य बोलतात तर तुम्हाला काहीही,
लक्षात ठेवण्याची गरज नाही." - मार्क हवेन...

आरक्षण... असावे की नसावे ?

कु. प्रियांका देवळे
बी. ए. भाग - १

भारतातील आरक्षणाबद्दल अनेक निरनिराळे मते आणि मतांतर आहेत. त्याचबरोबर हा विषय सरळ सुटत नसून अत्यंत गुंतागुतीचा आहे. जोपर्यंत समाजात जात धर्म यावर सामाजिक भेदभाव आहे. तोपर्यंत जात आणि धर्म आधारीत आरक्षण असणे अयोग्य नाही. आरक्षण हा भारतीय संविधानानुसार मूलभूत नागरी अधिकार आहे. आरक्षण म्हणजे प्रतिनिधीत्व होय. आरक्षण म्हणजे सवलत, मेहरबानी, कुबड्या नसून तो प्रशासनातील हिस्सा, वाटा मिळवण्यासाठी अल्पसंख्यांक समाजाला दिलेला सवैधानिक संरक्षण आहे. आरक्षणाची संकल्पना प्रथम महात्मा फुले यांनी मांडली. त्यांनी जातीच्या संस्थेत कामे वाटून घ्यावीत अशी ब्रिटीश सरकारकडे मागणी केली होती. आरक्षण हे म्हणजे काय? असे विचारल्यावर सर्वात बुध्दीमान व्यक्ती म्हणून ज्याला जगात मान्यता आहे. अशा विभूषीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण म्हणजे प्रतिनिधीत्व असे म्हटले, म्हणजे सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जातीवर्गाला शासनाने प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून दिलेले आरक्षण.

आरक्षण हे मुलभूत अधिकार आहे. आरक्षण हे संविधानानुसार हिस्सा, वाटा व नागरी हक्क आहे. आरक्षणाचे जे काय स्वरुप आहे. ते काही काळासाठी दिलेली सवलत नाही. तर कायमचे आहे. सर्वप्रथम आरक्षण लागू करण्याचा मान छत्रपती शाहूमहाराजांना जातो. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूरात ब्राह्मण, पारशी व प्रभु या सर्व उच्च वर्ग वगळता उर्वरित समाजाला ५० टक्के आरक्षण लागू केले. आरक्षणाचा विरोध करण्यासाठी सांगली संस्थानातील ब्राह्मण कारकून गणपत अभ्यंकर हा गेला. शाहू महाराजांनी त्यांचा आदर सत्कार केला व त्यांना घोड्यांच्या पागेत घेऊन गेले. तेथे सर्व घोडे एका रांगेत बांधलेले होते. प्रत्येक घोडा त्याच्या (तोबऱ्यात) तोंडाशी

बांधलेल्या तोबाऱ्यात हरभरे खात होता. कोणीच कोणाच्या तोबाऱ्यात तोंड घालण्याची सोय नव्हती शाहू महाराजांनी कारकुनला हे दाखवून म्हटले, पाहा ही आमची व्यवस्था नंतर त्यांनी सेवकाला बोलावले व सांगितले सर्व घोडे सोडून द्या आणि हरभरे जमीनीवर ठेवा. सेवकांनी त्याप्रमाणे केले. लगेच काय दृश्य उत्पन्न झाले? जी धष्टपुष्ट, बलवान मोठी घोडी होती ती सर्व हरभऱ्याच्या चारी बाजूस वर्तुळ करुन उभी राहीली व ते हरभरे फस्त करु लागली. जी कमजोर, अल्पवयीन, म्हातारी घोडी होती ते मागे उभी राहून त्या घोड्याकडे लाचारपणे बघत होते. ते बलवान घोडे फक्त खातच नव्हते तर ते लाथा मारत होते. कमजोर घोड्याकडे बोट दाखवून महाराजांनी कारकुनास विचारले, मी या कमजोर घोड्याचे काय करु तुम्ही ब्राह्मणांनी जनावरांची व्यवस्था माणसात लागू केली हे ऐकून कारकुनने शरमेने मान खाली घातली. मला वाटते. आरक्षणाची संकल्पना स्पष्ट समजण्यास हे उदाहरण पुरेसे आहे.

आरक्षण म्हणजे कोणावर अन्याय नव्हे तर प्रत्येक समाजांचा वाटा सुरक्षित करणे आहे आणि एखाद्या समाजाला त्याचाच असलेला हिस्सा त्याला दिला किंवा संरक्षित केला तर इतर समाजाच्या पोटात दुखण्याचे कारण काय आहे. एखादा समाज त्याचा न्याय हक्काचा वाटा खातोय तर त्याच्याच ताटातलं जेवतो आहे. तर दुसऱ्या समाजावर अन्यायकारक कसे होऊ शकते ?

आरक्षण हे सामाजिक न्याय प्रस्थापित करणारे तत्व आहे. दुसरे एक उदाहरण देते. एक आई व दोन मुलं असतात. आई आपल्या दोन्ही मुलांना स्वयंपाक करुन ठेवते व कामावर जाते. काही काळानंतर असे आईच्या लक्षात येत की, धाकटा मुलगा बारीक कमजोर होत होता तेव्हा एके दिवशी ती धाकट्या मुलाला बोलावते आणि विचारते तू का बारीक व कमजोर होत आहे. त्यावर तो मुलगा आईला म्हणतो, दादाची भूक दिवसेंनदिवस वाढत आहे. तो खूप खातो आणि कधी कधीतर तो मला काहीच ठेवत नाही. तेव्हा आई दुसऱ्या दिवसांपासून स्वयंपाक एकत्र करते पण डबे वेगवेगळे व वेगवेगळ्या कपाटात टेवते आणि दोघांना त्यांच्या चावी देते. आता असा प्रश्न निर्माण होतो की, त्या आईने दोघा भावात वैमन्यस्य निर्माण केले ? आईने आपल्या धाकट्या मुलाला त्याचा हक्काचा वाटा मिळवून दिला. मग आता तुम्हीच विचार करुन सांग की आरक्षण असावे की नसावे ?

धन्यवाद...!

प्राथमिक व्यवसायातील असामाधानकारकता



कु. मंजुषा गंपले
बी. कॉम. भाग - ३

मानवाच्या उदनिर्वाहाच्या दृष्टीने शेती प्राथमिक व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. साऱ्या मानव जातीची अन्नाची गरज या व्यवसायातून भागवली जाते. शिवाय इतर अनेक उद्योगांना हा व्यवसाय कच्चा माल पुरवतो. म्हणून प्राथमिक व्यवसायांचे स्वरुप सर्वव्यापी आहे.

वाढत्या लोकसंख्येची मागणी पूर्ण करण्यासाठी आणि मनुष्यबळाला पर्याय म्हणून या क्षेत्रातसुध्दा यांत्रीकीकरणास सुरुवात झाली. हरितक्रांती, निलक्रांती व श्वेतक्रांती हे सर्व याच उद्योगांशी संबंधीत विकास आहे. या क्रांतीनंतर उत्पन्न तर वाढत गेले. हरितक्रांती नंतर सर्व पिकांची संकरित बियाणे उपलब्ध झाली. त्यामुळे शेती उत्पन्नात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. काळानुसार व नैसर्गिक साधनसंपत्तीत उपलब्धतेनुसार आपण आपल्या पीकपध्दतीत व शेतीपध्दतीत देखील बदल केले. दुग्धव्यवसाय हा तर शेतीचा पूरक व्यवसाय यात आपण कसे पाठीमागे राहणार? संकरित जनावरांच्या मदतीने व जागतीकीकरणातून देवघेव होणाऱ्या ज्ञानामुळे आपल्या देशात श्वेतक्रांतीचा देखील झेंडा रोवला गेला.

संगणकाच्या आणि तंत्रज्ञानाच्या या २१ व्या शतकात मात्र या व्यवसायाबद्दल विषमता वाढली आहे. कारण उत्पन्न जरी वाढले असले तरी या व्यवसायांच्या तुलनेत या व्यवसायांना खूपच कमी नफा भेटतो. यामुळेत तरुण पिढीने प्राथमिक वयवसायांकडे पाठ फिरवली आहे.

आपण जर उदाहरण घेतले, तर दूध हे २० ते ३० रु प्रति लिटरने शेतकऱ्यांकडून घेतले जाते. तेच दूध शीतकरणानंतर किंवा पॅकिंग नंतर ४० ते ५० रु प्रति लिटरने विकले जाते. तसेच दूधापासून बनवलेल्या, पदार्थांच्या किंमती व दूध यामध्ये देखील खूप जास्त तफावत आढळते आणि म्हणून समाजातील अर्थिक स्तरांमधील दरी कमी करण्यासाठी या उत्पन्नाच्या दरातील दरी कमी करणे गरजेचे आहे.

जवळपास सर्वच पूरक व्यवसाय हे खाजगी असतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. शेती त्या उत्पन्नावर प्रक्रिया करून प्राथमिक व्यवसायांचे उत्पन्न तयार होते. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या उत्पन्नावर फरक असणे ठीक आहे. पण तो जास्त असू नये. सर्व घटकांचा अभ्यास करुन तो प्रमाणातच असायला हवा.

शेती या प्राथमिक व्यवसायांच्या प्रगतीसाठी हे पूरक व्यवसाय हे जोडून असावेत जेणेकरुन दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील फायदादेखील शेतकऱ्यांना मिळेल. सरकारने देखील ना नफा ना तोटा या तत्त्वावर केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी अन्नप्रक्रिया उद्योगांसारखे सरकारी पूरक उद्योग सुरु करावेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या संघटनेने आपल्या मालकीचे उद्योग - द्वितीयक व तृतीयक व्यवसाय चालू करणे सर्वोत्तम होय.

प्राथमिक व्यवसायाला जोडव्यवसाय म्हणून पूरक व्यवसायात जर प्रवेश केला. तर मात्र शेतकऱ्यांची स्थिती व प्राथमिक व्यवसायांचे मर्यादित स्वरुप नक्कीच बदलेल. समाजाचे हे नवीन चित्र पाहण्यासाठी सरकारने काही प्रयत्न मात्र केले पाहिजेत शेतकऱ्यांना त्यांच्या शेती व्यवसायाला जोडून पूरक व्यवसाय करण्यासाठी व्यवसायिक शिक्षण देणे, आर्थिक पाठबळ व त्यांच्या उत्पन्नाला मोठी बाजारपेठ उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांची स्थिती जर बदलायची असेल तर प्राथमिक व पूरक व्यवसायांचे एकत्रीकरण व्हयला हवे. शेतकऱ्यांना तेव्हाच त्यांच्या कष्टाची योग्य ती किंमत मिळेल. खाजगी व्यवसायांमुळे त्यांचे शोषण आहे. जर ही नवीन योजना अंमलात आली तर शेतकऱ्यांची आत्महत्या ही सामाजिक व राजकीय समस्या सुटेल बेरोजगारीवरही मात करता येईल तसेच समाजातील अर्थिक समतोल ही राखला जाईल. शेतकरी समृध्द झाला तर देश समृध्द होईल. जय किसान...!

माझे आवडते महाबळेश्वर

कु. रचना श्रीराम
बी. कॉम. भाग- १

महाबळेश्वर महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील गाव आहे. हे एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. ब्रिटीश काळापासून महाबळेश्वरला लाभलेला उत्कृष्ट गिरीस्थान हा लौकिक आजही कायम आहे. समुद्रसपाटीपासून १,३७२ मीटर उंचीवर पश्चिम घाटांच्या रांगेत वसलेले महाबळेश्वर हे थंड हवेचे व सहलीचे निसर्गरम्य ठिकाण आहे. महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे ठिकाण आहे.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर हे एक नगरपालिका असणारे तालुक्याचे शहर आहे. सह्याद्री पर्वताच्या पश्चिम घाटातील उंच डोंगरावर हे वसलेले शहर आहे. भारतातील जी हिरवळीने सजलेले काही मोजकीच ठिकाणे आहेत. त्यातीलच हे एक ब्रिटीश राजवटीतील मुंबई परगण्याची उन्हाळ्यातील राजधानी होती. याचे क्षेत्रफळ १३७.५१ किमी (५२.९५) स्के. मीटर आहे.

समुद्रसपाटीपासून याची उंची १३७२ मीटर (४४३९ फुट) आहे. सन २०११ चे शिरगणतीनुसार याची लोकसंख्या १२७३७ आहे., येथे मराठी, हिन्दी या भाषा बोलल्या जातात. पुरुष/स्त्री प्रमाण १०/९ असे आहे. येथील साक्षरता प्रमाण ७८% आहे. ६ वर्षाखालील मुलाची ११ % लोकसंख्या आहे.

येथील महाबळेश्वराचे देऊळ हे यादव राजा सिंघनदेव याने तेराव्या शतकात बांधले. अफझलखानच्या तंभुवरील कापून आणलेले सोन्याचे कळस शिवाजी महाराजांनी या महाबळेश्वर मंदिरास अर्पण केले होते. सह्याद्रीच्या पठारावर वसलेल्या या ठिकाणी चांगली घनदाट वनश्री आहे. महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर लागून असलेले जावळीचे खोरे आणि प्रतापगड या सर्व स्थळांना शिवरायंच्या नावाचा व कर्तृत्वाचा ऐतिहासिक संदर्भ आहे.

महाबळेश्वराच्या मंदिरातून कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गोवित्री या पाच नद्या उगम पावतात. येथे पंचगंगेचे देऊळ आहे. हे ठिकाण क्षेत्र महाबळेश्वर म्हणून प्रसिध्द आहे. सावित्री ही नदी पश्चिमवाहिनी आहे तर बाकीच्या चार नद्या पूर्ववाहिनी आहेत.

महाबळेश्वराच्या स्ट्रॉबेरी, रासबेरी, जांभळाचा मध व लाल मुळे गाजरे प्रसिध्द आहेत. महाबळेश्वराचा मध तर खूपच चविष्ट आणि प्रसिद्ध आहे. गुलकंदही येथे मोठ्या प्रमाणावर

मिळतो.

महाबळेश्वर बाजारपेठ फार प्रसिध्द आहे. येथे लोकरीचे कपडे, स्वेटर, चामड्याचे बेल्ट, पर्स इ. विविध प्रकारात मिळतात.

कृष्णा, कोयना,गायत्री, सावित्री, वेण्णा, सरस्वती आणि भागीरथी या ७ नद्याचे उगमस्थान आहे की जे पाहिलेच पाहिजे यापैकी पहिल्या पाच नद्यांचा ओहोळ सतत बाराही महिने वहात असतो. सरस्वतीचा ओहोळ मात्र प्रत्येक ६० वर्षानी दर्शन देतो.

पंचगंगा मंदिरांचे पाठीमागे अगदी जवळच कृष्णाबाई मंदिर आहे, की जेथे कृष्णा नदीची पूजा केली जाते. हे सन १८८८ मध्ये कोकणचे राजे रत्नागिरी ओण यांनी उंच टेकडीवर बांधले की जेथून पूर्ण कृष्णा दरी पाहता येते.

मंकी पॉईंट या ठिकाणाला हे नाव दिलेले आहे त्याला कारण असे की नैसर्गिकरित्या येथे तीन दगड आहेत ते मंकीसारखे समोरासमोर बसलेले आहेत असे वाटते आणि गांधीचींच्या शब्दांची आठवण करुन देतात. तेथील खोल दरीत डोकावले की एक मोठ्या पाषानात तीन हुशार मंकी समोरासमोर बसलेले आहेत असे चित्र नजरेला दिसते. आर्थर सीट पॉईंटला जाण्याच्या मार्गावर हा पॉईंट आहे.

आर्थर सीट पॉईंट समुद्र सपाटीपासून १३४० मीटर उंचीवर असलेला हा महाबळेश्वरमधील एक पॉईंट आहे. सर आर्थर यांच्या नावामुळे या जागेला हे नाव मिळाले. अतिशय नैसर्गिक देखाव्यासाठी हे स्थान प्रसिध्द आहे. हे एक सुंदर ठिकाण आहे. खाली खूप खोल दरी आहे.

वेण्णा लेक (वेण्णा तलाव) महाबळेश्वर हे विश्रांतीचे ठिकाण व सहलीचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. वेण्णा लेक हे पर्यटकांसाठी महाबळेश्वरमधील प्रमुख आकर्षक ठिकाण आहे. हे लेक सर्व बाजूंनी हिरव्यागार झाडांनी वेढलेले आहे. महाबळेश्वरमध्ये सामान्य ते तीन स्टार हॉटेल्स् कमी बजेटमध्ये उपलब्ध आहेत. आणि तेथून तुम्ही लेकचा देखावा नजरेत सामऊ शकता किंवा प्रसिद्ध बाजारपेठत राहूनही आनंद घेऊ शकता.

केइंटटस् पॉ महाबळेश्वरच्या पूर्व बाजूस हा पॉईंट आहे. येथून तुम्ही बलकवठी आणि धोम धरणांचा देखावा पाहू शकतात. या पॉईंटची उंची साधरण १२८० मीटर आहे.

नीडल होल पॉईंट आहे. नैसर्गिकरित्या खडकाला सुईसारखे भोक आहे. ते सहजतेने दिसते म्हणून त्याला नीडल होल नाव दिलेले आहे. हा पॉईंट हत्तीच्या सोंडेसारखा दिसतो म्हणून त्याची डेक्कन ट्रप म्हणूनही प्रसिध्द आहे.

विल्सन पॉईंट सर लेस्ली विल्सन हे सन १९२३ ते १९२६ मध्ये मुंबईचे राज्यपाल होते तेव्हा या पॉईंटला त्याचे नाव दिले आहे. महाबळेश्वरमधील हा १४३९ मी उंचीचा सिंडोला टेकडीवरील सर्वात उंच पॉईंट आहे. महाबळेश्वरमधील हा एकच पॉईंट असा आहे की, येथून तुम्ही सुर्योदय आणि सुर्यास्तही पाहू शकता. महाबळेश्वराचे सर्व दिशांची आकर्षकता तुम्ही येथून न्याहाळू शकता. महाबळेश्वर - मेढा मार्गाच्या पाठीवरील बाजूस हा विल्सन पॉईंट महाबळेश्वर शहरापासून १.५ की. मी. अंतरावर आहे.

प्रतापगड किल्ला हा महाबळेश्वर जवळ आहे. महाबळेश्वरजवळ हा लिंगमाला धबधबा आहे. साधारणपणे ६०० फुट उंचीवरुन हे पाणी वेण्णा तलावात पडते. खडकाचे योजनापूर्वक विभाजन करुन हा धबधबा बनविलेला आहे.

महाबळेश्वर या ठिकाणी जाण्यासाठी बसमार्ग, रेल्वेमार्ग व विमानसेवा सरकारने उपलब्ध करुन दिलेली आहे.

अशा महाबळेश्वर अशा या निसर्गरम्य महाबळेरचा मी घेतलेला अनुभव आल्हादायक आहे.

मी पाहिलेला रम्य निसर्ग

कु. वालमणी म्याकल
बी. कॉम. भाग - ३

निसर्ग हा माझा मित्र आहे. परंतु तो बोलत नाही. पण कृत करतो. मित्र हा दुःखात आणि सुखात सहभागी होतो. पण निसर्ग हा कोणताही भेदभाव करत नाही. आपल्या समाजात विषमता आहे. माणुस विषमतेने वागतो. परंतु निसर्ग विषमतेने वागत नाही म्हणूनच निसर्ग हा माझा माणसांपेक्षा जवळचा सोबतीचा वाटतो. झाड, नदी, समुद्र, पाणी, रंग इ. बाबत निसर्गाने खुप किमया केली आहे. कोकणात असलेली गरम पाण्याची अनेक कुंड, हरिहरेश्वर येथे समुद्राच्या लाटा वर्षानुवर्षे आढळून कडेच्या खडकांमध्ये झालेली जाळी दार नक्षी, मालवणजवळ असलेला हडी या गावी नदीमध्ये तयार झालेली बेट म्हणजेच पाणखोल जुबे, कोलाडच्या जवळ नागशेत गावी असलेले रंजणखळगे अशी एक ना अनेक निसर्गातील चमत्कार कोकणात जागोजागी दिसतात. समुद्र किनारे, किल्ले आणि मासे याशिवाय कोकणात अशा अनेक गोष्टी आहेत.

उन्हाळी सुट्टी आणि कोकणांच अगदी घट्ट नातं आहे. उन्हाळ्यात नितांत सुंदर कोकण तर अनुभवता येतोच, पण इथे दडलेल्या निसर्ग नवलांमुळे आपल्या भटकंतीची मजा द्विगणित होऊ शकते.

भू - वैज्ञानिकांच्या मते काही विशिष्ट खडकांतून अशा प्रकारचा आवाज येवू शकतो. या खडकांचे विश्लेषण अजून झाले नाही. उमाड्याचा महादेव, वैभववाडी, तरळे या रस्त्यावर शंकराचे मंदिर आहे. मंदिरासमोर नदी वाहत असून त्यात एक निसर्गनवल दडलेले आहे. या नदीच्या पात्रातून कायम बुडबुडे वरती येत असतात. विविध ठिकाणाहून येणारे हे बुडबुडे आपल्या पायाला गुदगुदल्या करतात.

निसर्ग हाच आपला गुरु, हाच आपला मित्र व हाच आपल्या डॉक्टर सुध्दा आहे. निसर्ग, आपणा करता खूप मोठे वरदान आहे. त्याचाकडून आपणास आवश्यक सर्व घटक जसे पाणी, राहण्यास घर व अन्नसुध्दा मिळते. निसर्गाकडून आपणांस किती काही शिकायला मिळते. जसं फुल काट्यात फुलते तसं आपण ही प्रत्येक संकटातून हसत राहावे. झाडांप्रमाणे खंबीर उभं राहून नेहमी दुसऱ्यांना मदत करावी. नदी जशी किती ही अडथळे आली तरी वाहते. तसेच आपण ही सर्व कष्टांना न घाबरता सामोरे जाणे. आणखी बरच काही हा निसर्ग आपणांस शिकवतो.

निसर्ग हा तर खरा चित्रकार आहे. किती रम्यचित्र तो रोज रंगवतो व आपणांस प्रेरणा देतो. खोल दऱ्याखोऱ्या व तलाव, झरे, रम्य अथांग सरोवर, बेफाम समुद्र, घनदाट अरण्य, बर्फाच्छादित शिखरे, उतुंग पर्वत, कमळांनी भरलेली तळे, हिरवीगार शेत व डोंगरा आडून उगविणारा सूर्य व त्याची सोनेरी आकाशात गुलाब उधळणारी सूर्य किरणे हे सर्व किती सुंदर आहे आणि त्याचा अनुभव आपण रोज करतो.

वाढत्या आधुनिककीरणामुळे व वाहतुकीमुळे पाणी प्रदुषणामुळे निसर्गाचे सौंदर्य दिवसे न दिवस कमी होत आहे.

आकाशातील चांदोबा उंच उंच इमारतीच्या मागे लपलेला आहे व जंगलतोडमुळे पाऊस कमी पडत आहे. आणि यामुळे निसर्गाचे भयंकर दर्शन आपणांस घडत आहे. अतिवृष्टीने नद्या नाल्यांना पूर येऊन शहरेच्या शहरे नष्ट होत आहेत. तर कधी भूंकपाने हजारो घरे जमीनदोस्त होत आहेत. तेव्हा आपलं हे कर्तव्य आहे की निसर्गाचे संतुलन ठेवले पाहिजे कारण मनुष्याचे व निसर्गाचे अतूट नाते आहे. आणि निसर्ग हाच माझ्या सोबती सखा मित्र आहे.

डोंगर उतरणीवरुन खाली येताना मागून चंद्र उगवावा आणि पायाखालची वाट उजळून जावी. आजूबाजूला हिरवी झाड आणि प्रचंड वृक्षांची साथ असावी आणि बाजूनेच एखादा पाण्याची ओहोळ आपल्या निरव आवाजाने साथ देत असावी. आसमंतात अन्य कुठलाच आवाज नसावा. अशा वातावरणात बहुदा "पहाडी" रागाचा जन्म झाला असावा. अर्थात निसर्ग आणि प्रदेश यांचे ओतप्रोत दर्शन या रागातून सतत झुळझुळत असते. हिरव्या जर्द झाडीतून स्त्रवणाऱ्या आणि त्याला मिळणाऱ्या खळखळणाऱ्या पाण्याचा नद्यांशी नाते जुळवणाऱ्या सुरांशी या रागाचे फार जवळचे साहचर्य आहे. मुळात निसर्ग काहीतरी सुचवित असतो आणि अशा वेळी जर का आपण निसर्गाशी जवळीक निर्माण करण्याची इच्छा दाखवली तर निसर्गच जणु आपल्याला या रागाशी साहचर्य घडवुन आणतो.

नदी -निवाऱ्याचा बारामाही धबधबा हा शब्द राज्यात दुष्काळाचे सावट असताना उन्हाळ्यात धबधबा हा शब्द ऐकायलाही पण छान वाटते. पण कोकणात बारमाही कोसळणारे चक्क तीन धबधबे आहेत. त्यातला एक आहे दाभोसा इथे, दुसरा आहे तरळे गावजवळ नापणे इथे आणि तिसरा कसबा संगमेश्वरजवळ असलेला नदी तिवऱ्याचा धबधबा, ऐतिहासिक प्राचीनगड आपल्या पाठीशी असतोच ही जंगलातील वाट आपल्याला थेट धबधब्याशी घेऊन जाते. हाच धोधवण्याचा धबधबा म्हणून ओळखला जातो.

समाजातील गरीब, श्रीमंत ही विषमता दिसून आली तरी तेथील निसर्ग हा श्रीमंताच्या बंगल्यावर आहे. गरीबांच्या झोपडीवरदेखील एकसारखेच वैभव उधळत असतो. असे मनाला प्रसन्न करणारे मी पाहिलेला निसर्ग रम्य आहे.

महाबळेश्वर हे एक अनेक निसर्गरम्य स्थानापैकी असे एक निसर्ग रम्य ठिकाण आहे. तेथील घाट चढतांना आजुबाजूचा निसर्ग रम्य परिसर पाहून मन कसे हारवून जाते. नागमोडी रस्ते हे अतिशय विलोभनीय असुन पुढील रस्ते तर दाट झाडांनी कसे अगदी हिरवेगार वाटतात. मधेच एखादी दरी दिसली की, डोळे कसे घट्ट बंद करावे असे वाटते. महाबळेश्वराचे खास वैशिष्ट्य म्हणजे तेथून सूर्यास्ताची एक वेगळी शोभा दिसते. शिवाय परतीच्या उतारावरची सुंदर हिरवळ ही हिरवागार गालीचा पसरवला आहे अशी वाटते.

निसर्ग रम्य कोकणात कोणत्याही ऋतुमध्ये केलेली भटकंती ही कायमच रमणीय असते. पण फळांचा राजा आंबा, तसेच फणस, काजु, करवंद अशा फळांची मेजवानी ही फक्त उन्हाल्यातच अनुभवायाला मिळते. निसर्गरम्य समुद्रकिनारे, वळणावळणाचे रस्ते आणि टुमदार मंदिरे पाहण्यासाठी पर्यटकांची पसंती कायमच कोकणाला आहे. त्याच्यासोबत अनेक निसर्ग निर्मित नवलस्थाने कोकणात आहेत. ती प्रत्येकाने अगदी आवर्जून पाहिली पाहिजेत अशी आहेत.

पंडिता रमाबाई

(२३ एप्रिल १८५८ ते ५ एप्रिल १९२२)

कु. शारदा कसबे
बी. ए. भाग - २

पंडिता रमाबाई यांचे नाव त्यांनी प्रामुख्याने विधवा आणि परित्यक्त्या स्त्रियंच्या उधारणासाठी केलेल्या कार्याबद्दल घेतले जाते. हिंदुस्थानातील विधवा स्त्रीयांना जीवनात सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टा नष्ट व्हाव्यात आणि त्यांनी स्वावलंबी जीवन जगावे यासाठी प्रामुख्याने पंडिता रमाबाई यांनी प्रयत्न केले.

अल्प परिचय :- पंडिता रमाबाई यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई उर्फ अंबाबाई आणि वडिलांचे नाव अनंत शास्त्री डोंगरे होते. म्हैसुर संस्थानातील मंगलोर जवळील माळे हेरंजी जवळील गंगामुळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत त्यांचा जन्म दि. २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. वास्तविक पाहता हे चित्पावन कुटुंब मुळचे कोकणातील होते. परंतु पोर्तुगीज लोकांच्या जाचाला कंटाळून कोकणातील सुमारे दोनशे ते तीनशे कुटुंबे कोकण सोडून कर्नाटकातील एका डोंगराच्या कुशीत जाऊन राहिली. त्यापैकीच अनंत शास्त्री डोंगरे हे एक होते.

असे सांगतात की, अनंतशास्त्री डोंगरे हे आपले गुरुदेव शास्त्र संपन्न रामचंद्र शास्त्री साठे यांच्याबरोबर दुसऱ्या बाजीरावच्या राजप्रसादात गेले. दुसऱ्या बाजीरावच्या पत्नी वाराणासीबाई यांना रामचंद्रशास्त्री साठे रघुवंश हे काव्य शिकवित होते. त्यावेळी वाराणासीबाईची शुद्ध वाणी ऐकून आपण ही आपल्या पत्नीला संस्कृत शिकवले पाहिजे हे त्यांनी आपल्या मनाशी तेथे ठरविले आणि लग्न झाल्यानंतर त्यांनी आपली पत्नी व रमाबाई या दोघींनाही वेदांचे शिक्षण दिले. स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही. या विचारांचे अनंतशास्त्री डोंगरे होते. त्यामुळे लहानपणापासून त्यांनी रमाबाईच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले या शिक्षणामुळे रमाबाईचे वय नऊ वर्षांचे झाले तरी अनंतशास्त्री डोंगरे यांनी तिचा विवाह केला नाही. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विवाह करावयाचे त्यांनी ठरविले. त्यामुळे समाजाचा त्यांच्यावर रोष झाला. तत्कालीन पध्दतीप्रमाणे मुलीचा विवाह बालपणीच होत असे पण समाजाचे हे बंधन अनंतशास्त्री डोंगरे यांनी न पाळल्यामुळे त्यांना जातीच्या बाहेर काढले. समाजाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यामुळे लवकरच अनंतशास्त्री डोंगरे यांनी आपले मुळगाव सोडले आणि ते भारत भ्रमण करु लागले. दुर्दैवाने याच काळात इ. स. १८८७ मध्ये रमाबाई यांचे आई-वडील वारले आणि त्या पूर्णतः पोरक्या झाल्या.

इ. स. १८७८ मध्ये त्या आपले बंधू श्रीनिवास शास्त्री यांच्याबरोबर कलकत्ता येथे आल्या. कलकत्ता येथे यावेळी ब्राह्मो समाजाचे वारे वाहत होते. केशवचंद्र सेन स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करु लागले होते. पंडिता रमाबाई यांना संस्कृत बरोबर मराठी, हिंदी, कन्नड या भाषाही अवगत होत्या. त्यांनी कलकत्ता येथे

संस्कृतमधून जेव्हा व्याख्याने दिली तेव्हां कलकत्ताचा सारा समाज अवाक झाला. त्यांच्या विद्वत्तेवर खुश होऊन कलकत्तावासियांनी त्यांचा सत्कार सिनेट हॉल येथे घडवून आणला आणि त्यांना '' पंडिता'' आणि '' सरस्वती'' ह्या दोन पदव्या देवून त्यांचा गौरव केला. बंगाली स्त्रीयाही त्यांच्या या विद्वत्तेने आणि बुध्दीवैभवाने प्रभावित झाल्या. त्यांनीही रमाबाई यांचा सत्कार करुन त्यांना '' भारतवर्षीय स्त्रीयांचे भूषण '' हा किताब दिला विशेष म्हणजे पंडिता या पदवीने तत्कालीन काळात गौरवल्या गेलेल्या त्या एकमेव पहिला होत्या हे विशेष होय.

पंडिता रमाबाई यांच्या बुद्धी वैभवाने सारे कलकत्ता चकीत होत असतानाच त्यांचा एकुलता एक भाऊ श्रीनिवास शास्त्री हा इ. स. १८८० मध्ये मरण पावला. बिपीन बिहारी दास हा त्यांच्या भावाचा असामी मित्र होता. तो वकील होता. त्याने रमाबाई यांना लग्नाची मागणी घातली. ही लग्नाची मागणी त्यांनी विचारपूर्वक स्वीकारली. कारण त्या दिसायला अतिशय सुंदर होत्या गोरीपान वर्ण, निळसर डोळे आणि बुध्दी तेजाचे वलय त्यांच्या देहावर असल्याने अनेक आय. सी. एस अधिकाऱ्यांनीही त्यांना मागणी घातली होती. परंतु आपल्या विचारांशी सहमत असलेल्या व्यक्तींशीच विवाह केलेला चांगला असा विचार करुन त्यांनी बिपीन बिहारीदास यांच्याशी विवाह केला हा विवाह उच्चवर्णीय समाजास मान्य झाला नाही. कारण बिपीन बिहारीदास हे शुद्र वर्णातील होते. त्यामुळे पुन्हा त्यांच्याविषयी वादळ उठले हे वादळ शमत नाही तोच एक लहानशा आजारात ते १८८२ रोजी मरण पावले.

रमाबाईचे पती जेव्हा मरण पावले तेव्हां त्यांनी कलकत्ता सोडण्याचा निर्णय घेतला. इ. स. १८८२ मध्ये त्या आपल्या लहान कन्येला घेवून पुण्यात आल्या. तेथे त्या स्थायिक झाल्या. पुणे येथेही त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी, समाजातील घातक चालिरिती यापासून समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी आपले प्रयत्न चालू ठेवले. यासाठी त्यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली. त्याच्या शाखा त्यानी पुणे, नगर, सोलापूर, ठाणे, पंढरपूर आदि ठिकाणी काढल्या. स्त्रियांनी त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून इ. स. १८८२ मध्ये त्यांनी ' स्त्री धर्मनिती' नावाचे पुस्तक लिहिले इ. स. १८८३ मध्ये त्यांनी हंटर कमिशन पुढे साक्ष दिली.

स्त्री धर्मनीती हे पुस्तक लिहून त्यांच्या विक्रीतून त्यांना जो पैसा मिळाला त्याच्या सहाय्याने त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविले तेथे त्या इंग्रजी भाषा आणि वैद्यक शास्त्राचा विशेष अभ्यास करणार होत्या. इंग्लंडमध्ये त्या वॉंटिज् गावाच्या सेंट मेरी मठात राहिल्या तेथे त्यांनी येशूच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केला. येशुचे स्त्रीयांसंबंधीचे उदात्त विचार ऐकून त्या ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित झाल्या. २९ सप्टेंबर १८८३ रोजी त्यांनी वॉंटिज गावातील सेंट मेरी मठात ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. तसे पाहिले तर त्या कलकत्ता येथे असतानाच त्यांच्या मनात हिंदु धर्माविषयी चलबिचल निर्माण झाली होती. हिंदु धर्मात स्त्रियांना असलेले स्थान याविषयी त्या दुःखी होत्या. त्याचा उद्रेक इंग्लंडमध्ये झाला आणि त्यांनी हिंदु धर्माचा त्याग केला.

आनंदीबाई जोशी या अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण घेत होत्या. त्यांच्या पदवीदान समारंभाला हजर राहण्यासाठी खास रमाबाई या इ. स. १८८६ मध्ये अमेरिकेत गेल्या. तेथे त्यांनी हिंदुस्थानातील स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल व्याख्यान दिले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना अमेरिकेतील नागरिकांना हिंदुस्थानातील विधवा स्त्रीयांच्या परिस्थितीची चांगलीच जाणीव झाली. विधवा स्त्रीयांची परिस्थिती बदलली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे अमेरिकेतील काही लोक एकत्र आले आणि बोस्टन या शहरात त्यांनी रमाबाई असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत देणग्या गोळा करण्यात येवू लागल्या. त्या देणग्या हिंदुस्थानात पाठवून त्यांच्यामार्फत हिंदुस्थानातील विधवा स्त्रियांची परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रमाबाई अमेरिकेत असताना त्यांना असे वाटे की, हिंदुस्थानातील बाल विधवांनी स्वतःच्या पायावार उभे राहिले पाहिजे. त्यासाठी त्यांनी बालोद्यान शिक्षण पध्दती शिकली पाहिजे या पध्दतीच्या सहाय्याने विधवा स्त्रीया स्वावलंबी बनू शकतील पण बालोद्यान शिक्षण पध्दती म्हणजे काय याची माहिती हिंदुस्थानातील विधवा स्त्रियांना करुन दिली पाहिजे म्हणून स्वतः अमेरिकेत बालोद्यान पध्दतीचा अभ्यास केला. इतकेच नव्हे तर या पध्दतीची माहिती देणारे पुस्तक ही त्यांनी मराठी भाषेत लिहीले. हिंदुस्थानातील बालविधवांची माहिती अमेरिकेतील लोकांना व्हावी. म्हणून इ. स. १८८७ - ८८ मध्ये त्यांनी " द हायकास्ट हिंदु वुमन" नावाचे पुस्तक लिहिले. या पुस्तकात त्यांनी बालविधवांच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे. त्या अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देत असताना त्यांच्या मनात ह्या पुस्तकाची कल्पना सुचली आणि हे पुस्तक त्यांनी अमेरिकेतच लिहिले.

१ फेब्रुवारी १८८९ रोजी त्या अमेरिकेतून हिंदुस्थानात परतल्या. विधवा स्त्रियांच्या उध्दारासाठी आपण काहीतरी केले. पाहिजे हे त्यांच्या मनात आले. अमेरिकेत असतानाच बिंबले होते म्हणून ११ मार्च १८८९ रोजी त्यांनी विधवा स्त्रियांसाठी मुंबई येथे " शारदा सदन" नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था मुंबई येथे विल्सन कॉलेजजवळ चौपाटीवर एका खाजगी भाड्याच्या घरात सुरु केली. ही संस्था प्रामुख्याने बाल विधवा स्त्रीयांसाठी होती. असे सांगतात की, या संस्थेत दाखल झालेली पहिली बाल विधवा शारदा गद्रे ही होती. तिच्याच नावावरुन या संस्थेला " शारदा सदन" हे नाव देण्यात आले. शारदा सदनाच्या सल्लागार मंडळावर न्या. महादेव रानडे, न्या. काशीनाथ तेलंग, कृष्णाजी नूलकर, डॉ. रा. गो. त्र्यंबक भांडारकर या थोर व्यक्ती होत्या. संस्थेतील या विधवा मुलींना रमाबाई अतिशय चांगली वागणूक देत. त्यांना चांगले कपडे, खाणे, पिणे देत पण ही गोष्ट काही लोकांना चैन वाटली. विधवा स्त्रीयांना एवढ्या चांगल्या गोष्टी द्याव्यात काय असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रमाबाई रानडे यांनी या मुलींच्या ज्ञान संवर्धनासाठी अनेक ग्रंथ संस्थेत आणले. ह्या साऱ्या सुधारणा समाजातील काही विचारवंतांना रुजल्या नाहीत. अतएवं त्यांनी शारदा सदनवर टिका सुरु केली. या टिकेला रमाबाई रानडे घाबरल्या नाहीत त्यांच्या या कार्यामुळे या संस्थेतील मुलींची संस्था वाढत गेली. कारण विधवा स्त्रीयांच्या दुःखात वर फुकर घालणारी माता त्यांना मिळाली होती.

आनंदीबाई या शारदा सदनाच्या बालविधवा सदस्या होत्या. आनंदीबाई म्हणजे महर्षि कर्वे यांच्या भावी पत्नी त्या रमाबाईंच्या अतिशय लाडक्या होत्या ते संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनी त्यांनी समयोजित प्रसंग साधला या दिवशी त्यांनी गोदुबाईचा (आनंदीबाई) विवाह धोंडो केशव कर्वे यांच्या बरोबर करुन दिला त्या दिवशी त्यांना त्यांच्या कार्याची नवी दिशा मिळाली.

रमाबाई रानडे यांनी राष्ट्रीय चळवळीतही भाग घेतला. त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये स्त्रीयांना प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे असा आग्रह धरला. केशवपनाविरुध्द त्यांनी प्रचार केला. संमती वयाच्या चळवळीतही त्यांनी पाठिंबा दिला.

नोव्हेंबर १८९० मध्ये त्यांनी शारदा सदन ही संस्था मुंबईहून पुण्यास हलविली. ही संस्था स्थापन करताना स्त्रीयांची प्रगती व्हावी याचा एकमेव उद्देशाने ही संस्था स्थापन करण्यात आली होती. स्त्री स्वावलंबी व्हावी. तिची गुलामगिरी नष्ट व्हावी हा प्रमुख उद्देश या संस्थेचा होता. तरी ही या संस्थेबद्दल काही गैरसमज पुण्यात निर्माण झाले.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात अनेकदा दुष्काळ पडले. या दुष्काळामुळे अनेक कुटुंबाचे संसार उध्वस्त झाले पण ब्रिटीश सरकार त्याबाबत फारशी उपाययोजना करण्यास तयार नव्हते. दुष्काळाची सर्वात मोठी झळ लहान मुले आणि स्त्रीयांना बसते. यावेळी स्त्रियांचे अतोनात हाल होतात. असाच इ. स. १८९७ मध्ये मध्यप्रदेश येथे दुष्काळ पडला तेव्हा अनेक स्त्रीयांना रमाबाई यांनी आपल्या संस्थेत आश्रय दिला हिच परिस्थिती इ.स. १९००

मध्ये गुजरात येथे घडली. यावर्षी तेथे पुन्हा भीषण दुष्काळ पडला. स्त्रीयांचे जीवन उध्वस्त झाले तेव्हाही रमाबाई यांनी तेथील असहाय्य स्त्रीयांना मुक्ती सदनात आश्रय दिला. सुमारे तीनशे स्त्रीयांना त्यांनी आश्रय दिला. विशेष म्हणजे यातील बहुतेक स्त्रीया उच्च वर्णीय होत्या.

जानेवारी १८९८ मध्ये रमाबाई यांनी पुन्हा अमेरिकेला भेट दिली. ऑगस्ट १८९८ पर्यंत त्या अमेरिकेत होत्या. त्यांच्या सांगण्यावरुन पुर्वीची रमाबाई असोसिएशन संस्था बंद करण्यात आली व त्याऐवजी अमेरिकेत रमाबाई असोसिएशन नावाची संस्था स्थापन करण्यात आली. आतापर्यंत शारदा सदन ही संस्था सर्व धर्मांच्या स्त्रीयासाठी कार्य करीत असे. यापुढे मात्र ही संस्था केवळ ख्रिस्ती संस्था म्हणूनच कार्य करेल असे ठरविण्यात आले.

अमेरिकेतून आल्यानंतर रमाबाईंनी आपले कार्यक्षेत्र विस्तृत केले. आजारी व अपंग रोग्यांची सेवा केली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. या उद्देशांने त्यांनी कृपा सदनाला जोडून एका रुग्णालयाची स्थापना केली. याशिवाय प्रिती सदन, शारदा सदन आणि शांती सदन ह्या तीन इमारती होत्याच यात विविध गटाच्या स्त्रिया राहत.

स्त्रियांनी स्वावलंबी व्हावे असे त्यांना वाटे स्त्रीयांना शारिरीक श्रमाचे महत्व पटावे म्हणून त्यांनी स्त्रीयांना शेती, विणकाम, मुद्रण काम, शिवणकाम इ. विषयांचे शिक्षण या संस्थेतून देणे सुरु केले. मुक्ती सदनाला लागणारे धान्य, फळे, भाजीपाला यांचे उत्पन्न येथील स्त्रीयाच करु लागल्या. लागणाऱ्या कपड्याचे उत्पादनही येथेच होवू लागल्याने येथील स्त्रीयांना स्वावलंबनाचे धडे मिळाले. दुर्बल आणि आजारी लोकांसाठी त्यांनी सायं घरकुलाची योजना केली. स्त्रीयांच्या उन्नतीसाठी रमाबाईंनी केलेले कार्य पाहून ब्रिटीश सरकारने त्यांना इ. स. १९१९ मध्ये '' कैसर-इ- हिंद'' हे सुवर्ण पदक दिले.

रमाबाईनी हिंदुस्थानातील पिडीत स्त्रीयांचे जीवन सुखी व्हावे म्हणून खूप धडपड केली. या स्त्रीयांचे दुःख त्यांनी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनात आनंदाची बाग फुलविली. परंतु यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. वैयक्तिक जीवनात मात्र त्या दुःखीच होत्या. त्यांना समाजाच्या प्रखर टिकेला सतत तोंड द्यावे लागले. त्यात २४ जुलै १९२१ रोजी त्यांची एकमेव कन्या ' मनोरमा' ही मिरज येथे मरण पावली. त्यामुळे त्या खचून गेल्या. परंतु अंतिम अवस्थेतही त्यांनी हिब्रु भाषेतील बायबलचे भाषांतर केले. मूळ बायबल हिंदुस्थानातील ख्रिश्चन लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे ही त्यांची अंतिम इच्छा होती. या बायबलच्या शेवटच्या पानाचे मुद्रीत त्यांनी तपासले आणि त्यांचा १ एप्रिल १९२२ रोजी मृत्यू झाला. हा मृत्यू साध्या स्त्रीचा नव्हता तर एका ज्ञानी आणि समाजसुधारक स्त्रीचा तो मृत्यू होता.

वडील अनंतशास्त्री डोंगरे यांच्याप्रमाणे त्यांच्यात दूरदृष्टी होती म्हणून त्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. अखिल भारती राष्ट्रीय सभेत स्त्रियांना सभासदत्व देण्याची मागणी त्यांनी करुन भविष्यात स्त्रीयांनाही स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी करु घेतल्या शिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही हेच त्यांनी ही मागणी करुन अप्रत्यक्षरित्या दाखवून दिले होते.

त्यांना साहित्यातही रुची होती त्या इ. स. १८८८ मध्ये अमेरिकेत गेल्या. तेव्हा त्यांनी 'युनायटेड स्टेटची' लोकस्थिती आणि प्रवास वर्णन पुस्तक लिहीले. याशिवाय इबरी भाषेचे व्याकरण १९०८ नवा करार इ. स. १९१२, बायबलचे मराठी भाषांतर, प्रभु येशू चरित्र इ. स. १९१३, भविष्य कथा इ. स. १९१७, दुसरी आवृत्ती आदी ग्रंथ ही लिहले. कित्येक वर्षे भारतीय स्त्रीयांवर होणारा अन्याय त्यांनी जगापुढे मांडून त्या अन्यायातून हिंदुस्थानच्या स्त्रीची मुक्ती करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला ती खरोखरीच सामाजिक परिवर्तनाकडेच होवून गेला यात संशय नाही. तीळमात्र ही शंका नाही.

रुजावं देशभक्तीचं बीज

कु. संगीता नुले
बी. कॉम. भाग -२

दरवर्षी प्रजासत्ताकदिन साजरा करणं हे प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. संपन्न आणि गौरवशाली इतिहास असणाऱ्या एका देशाचा प्रजासत्ताक दिन साजरा करण्याजोगीच बाब आहे. पण हे साजरीकरण करताना काही बाबी अंतरंगात साठवून ठेवायला हव्यात. प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने भारत हा सुंदर देश आहे त्याला पाच - सहा हजार वर्षाचा इतिहास लाभला आहे. या भूमीला सुंदर भूगोल आहे. सहा ऋतुंचे सोहळे साजरे होणं हे या भूमीचं वैशिष्टय आहे. प्राचीन साहित्याचा आधार घेतला तर ही देवभूमी असल्याचं कळतं म्हणजेच देवांनाही लोभ वाटावा अशी ही भूमी आहे. माजी राष्ट्रपती बराक ओबामा इथे आले तेव्हा संसदेत भाषण करताना म्हणाले होते. संपूर्ण जगाला देण्यासाठी एक सुंदरस नाणं भारताकडे आहे. आणि ते म्हणजे ज्ञान संपूर्ण त्रिखंडात ते खणखणीत वाजतं आणि चालतं.

मधल्या काळात भारतावर वेगवेगळी आक्रमण झाली, वेगवेगळ्या राजसत्ता आल्या या सगळ्यामुळे इथली संस्कृती नष्ट होती की काय अशी भिती अनेकांनी व्यक्त केली.पण इथल्या मातीत प्रेमाचा असा काही ओलावा आहे की, इथली संस्कृती या सगळ्यांना पुरुन उरली. ही संताची जन्मभूमी आहे. ती अनेक पराक्रमांची कर्मभूमी आहे. आणि अलौकिक त्याग आणि सेवेची यज्ञभूमी आहे. अशी संपन्न परंपरा असल्यामुळेच पाच - सहा शतकांच्या पारतंत्र्यानंतरही हा देश स्वत्व टिकवू शकला. परकीय सत्तेच्या काळ्याकुट्ट अंधारातही स्वातंत्र्याची सोनेरी शलाका पसरु शकला.

पारतंत्र्याच्या शृंखला मोडून काढणारी स्वातंत्रभक्तांची मोठी फळी इथे निर्माण झाली. समाजसुधारक क्रांतिकारक यांनी देशाला नवी दिशा दाखविली त्यात आगरकर, महात्मा फुले यांच्यासारखा सुधारकांचा वर्ग होता. दुसरीकडे लोकमान्य टिळक

यांच्यासारखा यांच्यासारखा वर्ग होता. तिसरीकडे क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यासारखे शीर हाती घेऊन फिरणारे लोक होते. या सगळ्यामध्ये मातृभूमीवरचं अपरंपार प्रेम हा समान धागा होता. या सगळ्यांनी कष्टानं मिळवलेल्या स्वातंत्र्याचे फळ आज आपण चाखत आहोत. पाया भक्कम आहे. म्हणूनच आज देश प्रगतीपथावर वेगाने वाटचाल करत आहे. इथल्या सुविधा सुधारत आहेत, सुबता अनुभवयाला मिळत आहे. हे सगळं होत असताना या नव्या पिढीच्या मनातल्या देशाबद्दलच्या भावना, जाणिवा, देशभक्ती कमी होतीय की काय, त्यांच्यातल्या आत्मकेंद्रीपणा वाढला आहे की काय अशी शंका येते. याचं कारण म्हणजे आपल्या देशाची परंपरा आणि इतिहास या तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यात आपण कमी पडत आहोत. आजच्या पिढीला याची जाणीव नाही. सेनापती बापट यांनी या देशाचे ओझे खांद्यावरी असे. थोडे तरी वाटू घ्या हो असं सांगितलं होते. आज नव्याने पुन्हा एकदा हेच सांगण्याची वेळ आली आहे. एकीकडे आपला देश जगात नाव मिळवत आहे. पण दुसरीकडे देशातली सगळी कुशलता परदेशात कामी येत आहे. ही आजची खरी विसंगती आहे. ज्या देशाने घडवलं वाठवलं तिथे राहण्यास नकार देणारी पिढी पाहून मनात काहूर उठल्याशिवाय राहात नाही.

राष्ट्रभक्ती प्रत्येक भारतीयाच्या मनात हवीच पण सामाजिक जाणिवाही तेवढ्याच प्रखर हव्यात. प्रजासत्ताकदिनी हा विचार मनात रुजवणं अत्यंत गरजेचं आहे. आपल्याला सर्वस्पर्शी राज्यघटना मिळाली आहे. शांतता, समता, बंधुता, मानवता, या सगळ्या मुल्यांचा त्यात पुरस्कार केला आहे. त्यांचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा त्यातून मिळते. आपल्या अवतीभोवती काय चाललयं हे त्यांना माहित नाही. अशा प्रकारे आपल्या परिसराबद्दलच आपण निरस, अजाण असू तर देशाकडे कसं बघणार ? आता आपण स्वतःच्या पुढे जाऊन विचार करणं गरजेचं आहे. माझा, माझ्यानंतर कुटुंबियांचा विचार होणारचं ते स्वाभाविक आणि नैसर्गिक आहे. पण त्यापलीकडे जाऊन थोडा पुढचा विचार करण्याची वेळ आता आली आहे.

आध्यात्मामध्ये दान ही संकल्पना समाज जोडण्यासाठीच आहे. याचून समाजासाठी काही तरी योगदान देण्याची भावना जन्म घेते. बुध्दिजीवी वर्गामध्ये हा विचार रुजेल तेव्हाच खत्या अर्थाने स्वातंत्र्याचा अर्थ समजला असं म्हणता येईल अन्यथा ध्वजवंदन आणि राष्ट्रभक्ती गीताचं गायन एवढ्यापूरता हा दिवस मर्यादित राहील. या दिवशीची सुट्टी कुठे एंजॉय करायची या विचारात ही भावना दडपून जाईल. ही अनास्था टाळण्यासाठी किमान या दिवशी तरी देशाहिताचं एखादं काम हाती घेऊन या जनकल्याणाचा एखादा संकल्प सोडूया मुलांना आपल्या क्रांतीकारकांच्या कथा सांगू या त्यांच्या मनात देशभक्तीच्या आणि राष्ट्रभिमानाच्या भावनेची पेरणी करु या...

आहे. ही आजची खरी विसंगती आहे. ज्या देशाने घडवलं पाठवलं तिथे राहण्यास नकार देणारी पिढी पाहून मनात काहूर उठल्याशिवाय राहात नाही.

युवक कसा असावा

कु. भार्गवी कोटा
बी. कॉम. भाग - २

स्वामी विवेकानंद हे महापुरुष होते. ऋषी होते ते सांगणे जरी कठीण असले तरी ते मानवजातीचे खरे मित्र होते. हितैषी होते व भारतमातेचे सच्चे सुपुत्र होते हे मात्र निर्विवादपणे सांगता येईल. भारतावर हृदयापासून प्रेम करणारा मानवाचे दुःख बघून व्यथित होणारा मानवजातीच्या उद्धारासाठी प्राणर्पण करणारा आणि भारताच्या आध्यात्मिक संपदेचा परिचय करुन देऊन भारतमातेचा गौरव वाढविणारा एक मात्र वीर म्हणजे स्वामी विवेकानंद होय. भारत आणि भारतीय संस्कृती जेव्हा मृतप्राय झालेली होती. तेव्हांच्या आणीबाणीच्याप्रसंगी स्वामी विवेकानंद अवतीर्ण झाले व त्यांनी निद्रित भारताला जागृत केले. हे चित्र बदलण्यासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त असलेल्या आत्मशक्तीला जागृत करण्यासाठीच स्वामी विवेकानंद आले होते.

स्वामी विवेकानंद हे चिरतरुण होते. त्यांचे विचार आजच्या तरुण पिढील अतिशय प्रेरणादायी आहेत. स्वामीजींचा तरुण पिढीवर फार विश्वास होता. तरुणांनी त्याचे विचार आत्मसात करुन स्वतःची व देशाची प्रगती करावी याच उद्देशाने स्वामी आजच्या पिढीला अतिशय प्ररेणादायी आहेत व स्वामीजींच्या स्वप्नातला युवक असावा असा जसे चेहऱ्यावर तेज, देहामध्ये शक्ती, मनामध्ये उत्साह, हृदयामध्ये करुणा, बुध्दीमध्ये विवेक, मातृभुमीवर प्रेम आणि इंद्रियावर संयम, मन ज्याचे स्थिर आत्मविश्वास दृढ, ईच्छाशक्ती प्रबळ व सिंहासारखा निर्भय ध्येय ज्याचे उच्च , सत्य ज्याचे ईश्वर आहे. प्रेमळ ज्याचा सूर व्यसनापासून मुक्त, जीवनामध्ये शिस्त मानवता हेच कुळ, गुरुजनांचा आदर आणि पालकावरती श्रध्दा आहे. दिन दुबळ्याचा मित्र आहे, सेवेसाठी तत्पर देवावरती भक्ती जीवनामध्ये नीती आहे आणि धाडसाचे बळ, चारित्र ज्याचे शुध्द आहे तोच आदर्श पुरुष होय ते म्हणजेच विवेकानंद होय.

स्वामी विवेकानंदाच्या स्वप्नातला युवक असावा असा आणि आजच्या पिढीला हे समजून घेणे आवश्यक आहे. तुमच्या भाग्याचे तुम्हीच निर्माते आहेत कुणालाही माणसाला किंवा ईश्वराला किंवा जगातील आणखी कुणालाही दोष देऊ नका. ज्यावेळी त्याबद्दल स्वतःलाच दोषी ठरवा आणि जेणे करुन स्वतःचे कल्याण होईल ते ते करण्याचा प्रयत्न करा त्याच्यासारखे शूर व आदर्श आणि देशप्रेमी बनला व तुम्हाला खरच भारत जाणून घ्यायचा असेल तर विवेकानंदाचा अभ्यास करा आणि खरचं स्वामीजींच्या विचारातून भारताचे परिपूर्ण रुप दिसतो भूतकाळ दिसत, वर्तमानाचे महत्त्व समजते आणि भविष्यकाळ खुणावतो. म्हणूनच रविंद्रनाथ टागोर रोमॉरोला यांना म्हणाले होते की तुम्हाला जर भारत जाणून घ्यायचा असेल तर तुम्ही विवेकानंदाचा अभ्यास करा . याच्या सारखा महापुरुष व प्रेरणादायी युवक कुठेही नसतात तुम्हाला जर विवेकानंद सारखे व्हायचे असेल तर विवेकानंदाचा स्वप्नातला युवक बना व तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते वाहाल...

बघा या हनुमंताची लीला । विवेकानंद होऊनी आला ।
रामकृष्णांचा दास तो झाला । सागर पार करुनी गेला ।
संदेश प्रभुचा दिला जगाला । अमेरिका युरोप गाजविला ।।
वेदान्ताचा झेंडा रोऊनी । परतला पुण्य मातृभूमीला ।
रामकृष्ण संघ स्थापन केला । त्यागिले नश्वर कायेला ।
बोला जय जय विवेकानंद बोला ।

तुम्हीच तुमच्या भाग्याचे तुम्हीच निर्माते आहात.

सावित्रीबाई फुले

कु. राजश्री इराबत्ती
बी. कॉम. भाग - २

सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्या जन्म ३ जानेवारी १८३१ साली नायगाव, खंडाळ तालुका, सातारा जिल्हा येथे झाले. त्या मराठी शिक्षिका समाजसुधारका होत्या. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतीराव फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली. सावित्रीबाई या मराठीतील पहिल्या कवयित्री आहेत. आपल्या नायगाव या गावावर त्यांनी विधवांचे होणारे केशवपण थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला. त्यांचा मृत्यु प्लेग या आजारपणामुळे झाला.

सवित्रीबाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. इ. स. १८४० साली जोतीराव फुले यांचेशी सावित्रीबाईंचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईंचे वय नऊ, तर जोतीरावाचे वय तेरा वर्षांचे होत. सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसुंगीचे गोरे परंतु पेशव्यानी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांचा व्यवसाय करु लागले आणि या व्यवसायावरुन त्यांना " फुले" हे आडनाव मिळाले.

सावित्रीबाईंचे पती जोतीराव यांना लहानपणापासूच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावसबहिण सगुणाऊ यांनीच त्यांना सांभाळ केला होता. सगुणाऊ एका इंग्रजी अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या त्यांना इंग्रजी कळायचे व बोलाताही यायचे, त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग जोतीरावांना प्रेरित करण्यासाठी केला. जोतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या त्यावरुन जोतीरावांना एक नवा मार्ग सापडा. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीबाईंना शिकवले सगुणाऊ तर सोबत होतीच. दोघींनी रीतसर शिक्षण घेतले.

१ मे इ. स. १८४७ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा, सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. १ जानेवारी इ. स. १८४८ रोजी '' भिडेवाड्यात'' जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली, साऱ्या कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले १८४७ - १८४८ साली केवळ चार वर्षात १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या.

सगुणाऊंना त्या शाळेत बोलविण्यात आले. तत्कालीन ब्रिटीश भारतातील एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली. यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४-१५ शाळा उत्तर भारतात होत्या या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागातही २-३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरु केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टुडन्टस् लिटरी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी ' कमळाबाई हायस्कूल' नावाची मुलींसाठीची शाळा सुरु केली. मशिनरी नसलेले पिअरी चरण सरकार यांनी मुलींसाठी पहिली शाळा बारासात टाऊन येथे १८४७ मध्ये काढली. शाळेसाठी नवीन कृष्ण मित्र आणि काली कृष्ण मित्र या दोन भावांनी आर्थिक मदत केली. ही शाळा कालीकृष्ण हायस्कूल या नावाने चालू आहे. मुंबईत पारशी लोकांनी १८४९ मध्ये पहिली शाळा काढली पण काही दिवसातच या शाळेच्या मुलांसाठी आणि मुलीसाठी अशा दोन शाखा झाल्या.

सावित्रीबाईच्या शाळेत सुरुवातील सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी '' धर्म बुडाला'' जग बुडणार...'' असे सांगून केले. सनातन्यानी विरोधी केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. अनेक संघर्ष करत हा शिक्षण प्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रातही काम करणे गरजेचे आहे. स्त्रीयांना आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे. हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही क्रुर रुढीनाही त्यांनी आळा घातला. बाल, जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा - तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करुन करुप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत, गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनाशिवाय काहीच मिळणार नाही. अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रूणहत्या करत.

जोतीरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. सावित्रीबाईने ते समर्थपणे चालवले फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई...

२१ व्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने

कु. संजना सरवदे
बी. ए. भाग - ३
(इंग्रजी विभाग)

आज २१ व्या शतकात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात प्रगती केलली आहे. पण पूर्वीच्या काळात अशी परिस्थिती होती का ? तर नाही इ. स. पूर्वच्या काळात स्त्रियांची परिस्थिती ही अत्यंत हालाखीची होती. या काळातील स्त्रियाचं दुःख जाणून घेऊन काही समाजसुधारकांनी म्हणजे राजाराममोहन रॉय व ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांच्या अडचणी, दुःख समजून जाणून घेतलं. त्यांच्यासाठी नवीन मार्ग काढला. महात्मा फुले यांनी स्वतःच्या बायकोला म्हणजेच सावित्रीबाई फुले यांना शिकवून पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. यामुळे शिक्षणाचे महत्व मुलींना कळले व त्यामुळे आज २१ व्या शतकात स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने शिकून मोठमोठ्या पदावर काम करताना दिसतात.

स्त्रियांना फक्त पूर्वीच्या काळातच अनेक संकटांना आव्हानांना सामोरे जाव लागत होतं का ? तर नाही आज २१ व्या शतकातदेखील त्यांना अनेक गोष्टींना सामोरे जावं लागतं राजाराममोहन रॉय यांनी विधवा पुनर्विवाहाला पाठिंबा दिला म्हणून आजही स्त्रिया पुनर्विवाह करतात. एकट्यानं जीवन व्यतीत करणं अवघड आहे. म्हणून पुनर्विवाह केला जातो. पुन्हा कुटुंबासोबत जुळवून घ्यावं लागतं. तसेच पूर्वीच्या काळात हुंडाबळी ही समस्याही होतीच व आज २१ व्या शतकातदेखील स्त्रिया या हुंडाबळीसारख्या अत्याचाराला बळी पडतात. यामुळे त्यांना शारिरीक व मानसिक त्रासाला सामोरे जावं लागते मग ही आव्हानचं ना तिच्यापुढील ।

आज २१ व्या शतकात स्त्रीला शिक्षण मिळाल्यामुळे ती आर्थिकदृष्टया भक्कम बनली आहे. तिचे अस्तित्व आता 'चूल आणि मूल' असं राहिलेलं नसून ती आता आपल्याला वेगवेगळ्या पदावर काम करताना दिसते. स्त्रिया या कुटुंबाची जबाबदारी सांभाळून नोकरी करतात. तिला रोज सकाळी लवकर उठून घरच्यांसाठी नाष्टा, जेवण करणं, मुलाचं सर्व नीटनेटके करणं, नवऱ्याला काय हवयं ते देणं, सासु-सासऱ्यांची काळजी घेणे या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. घरातील काम-नोकरीसाठी बाहेर पडावं लागतं. घरातील काम - नोकरी याची सांगड घालणं हे तिच्यासमोरील आव्हानच आहे ना ।

आणि ते ही नोकरीसाठी बाहेर जाताना घरी सुरक्षित परत येईल. का ? हा प्रश्न घरच्यांसमोर उभा राहतो. आज आपण २१ व्या शतकात बलात्कार, छेडछाड, प्रेमाला नकार दिला म्हणून ॲसिडचा हल्ला यासारख्या घटना पाहतो. अश्लील विनोद, घाणेरड्या कॉमेंटसना सामोरे जावं लागतं आणि बलात्कार हे फक्त स्त्रिया किंवा मुलींवर होतात असं नाही. तर या त्या निष्पाप जीवाची काहीही चूक नसताना तिला अत्याचाराला बळी पडावं लागतं, सामोरे जावं लागतं म्हणजेच आज २१ व्या शतकात स्त्रियाच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहतो. म्हणजे आज तिच्यासमोर स्वतःच्या सुरक्षितेचं आव्हान उभं राहिलं आहे.

स्त्रियांसाठी ३३ % राखीव जागा असल्यातरी त्याचा पुरेपुर फायदा करुन घेण्यासाठी तिला झटाव लागतं, लढावं लागतं, आज करिअर घडविण्यासाठी ती धडपतेय निरनिराळ्या क्षेत्रातल्या संधी दोन्ही हात पसरुन तिला बोलावताहेत. तिलाही वाटतयं, ''आय कांट डु इट् नव्हे आय मस्ट डु इट''

पण घरच्यांचा विचार, समाज, संस्कार याचा विचार करावा लागतो. स्वतःच्या स्वप्नांना ती मनाच्या कोपऱ्यात दडपून ठेवते. तिला तिच्या स्वप्नांवर पाणी सोडावं लागतं. एवढचं नाहीतर तिला आजच्या समाजात जगात तिचं सत्व टिकवून ठेवावं लागतं इतकचं नव्हे तर सक्षम सशक्त, सुंस्कारित व सुशिक्षित युवापिढी घडविण्याचं आव्हानंही तिलाच पेलायचयं.

स्त्रियाची आव्हाने ही वर्षानुवर्षे न संपणारी आहेत. पण तिने कधीच हार मानलेली नाही. तिच्यासाठी तिला घरच्यांचा पाठिंबा असणं गरजेच वाटतं. स्त्रीची प्रतिष्ठा ही वीरपत्नी किंवा वीरमाता होण्यात नाही. तर वीर स्त्री होण्यात आहे. म्हणून स्त्रियांना आदराने व मानाने वागविले पाहिजे..

कु. प्रियांका मिठ्ठा
बी. कॉम.भाग - २



पाणी वाचवा... !
जल ही कल है।

पद्य विभाग

आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून,
आम्ही एकमेकाला
दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे.
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल
कधी हृदयाकडे वळत नाही.
इतकं जगून झालं पण,
जगायलाच वेळ नाही.
जगतो आहोत कशासाठी
काहीच करायला मेळ नाही.
क्षण एक येईल असा,
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या...

कु. अमृता गांगुर्डे
बी. ए. भाग - ३

अशी एक मैत्रिण असावी...

अशीही एक मैत्रिण असावी...
मनात काहीही न ठेवणारी
दिलखुलास बोलणारी...
अशीही एक मैत्रिण असावी
बिंधास्त आणि खोडकर असावी.
पण मनाने खुप प्रेमळ असावी.
अशीही एक मैत्रिण असावी.
जिला बघुनच हसु यावं
आणि तिच्याशी बोलताना
सर्व दुःख विसरुन जावं
अशीही एक मैत्रिण असावी
खुप खुप खुप बोलणारी
आणि ऐकताना बाकीचे जग
विसरायला लावणारी...

कु. अमृता गांगुर्डे
बी. ए. भाग - ३

मैत्रीण

मैत्रिण असावी झाडासारखी
ती नेहमी सोबत असावी
अडचणी काळात सात देण्यासारखी
मैत्रिण असावी बॉलसारखी
बॉलला कितीही दूर केल्याने
ते पुन्हा आपल्याकडे येण्यासारखी
मैत्रिण असावी पेन्सिलसारखी
त्याच्याने लिहिल्यावरही
ते चूक पुन्हा खोडून
लिहीता येण्यासारखी
मैत्रिण असावी पाण्यासारखी
जाताना ती दुःख पाण्याच्या प्रवाहासारखी
घेऊन जाण्यासारखी...
मैत्रिण असावी बेन्चसारखी
कोणत्याही जातीचा विचार किंवा भेदभाव
न करता कोणासोबतही बोलण्यासारखी....

कु.सौम्या पुलगम
बी. कॉम. भाग -२

भारताचा अभिनंदन !

अभिनंदन सुटला पाकच्या तावडीतून
आनंदला भारत सारा त्याच्या सुटकेतून...
पाक आता थोडं ताळ्यावर येत आहे.
धडा तसा त्याला भारताकडून मिळत आहे.
पाय भारताची ओढल्यास पाकड्यांनो
तुमची खैर नाही. नरक आता तुम्हाला दूर नाही.
सहनशक्ती आता आमची संपुष्टात येत आहे.
तुमच्या ईटचा जवाब आता पत्थरचं आहे.
दूध माघाल तर खीर देवू
पण कश्मीर माघाल तर जीव घेवू
म्हणून माणुसकीने राहण्यातच
तुमची खैर आहे.
माणुसकीने राहण्यातच
तुमची खैर आहे.

कु. प्रगती पोगुल
बी. ए. भाग - ३

सोबत...

तू सोबत असताना
आयुष्य किती छान वाटतं
उना मोकळं, एक रान वाटतं...
कधी बेधुंद... कधी बेभान वाटतं... खरचं...
तू सोबत असताना
आयुष्य किती छान वाटतं....
आयुष्याच्या प्रत्येक ऋतुमध्ये
तू माझ्या सोबत असतेस....
खरचं म्हणजे...
अगदी पावसाच्या थेंबातूनही...
तूच बोलत असतेस...

कु. सुवर्णा चौंगुले
बी. ए. भाग -३

प्रेम

प्रेम म्हणजे काय असतं...
कळीतून फुलणार फुल असतं...
प्रेमात खरं -खोटं नसतं...
ज्याच्या वर प्रेम करतो तोच खरा असतो...
रक्ताच्या नात्यापेक्षा
प्रेमाचं नातं श्रेष्ठ असतं...
प्रेम हे सगळे डोळ्याने करतात...
पण ते मनाने करावे...
प्रेम हे कोणावर करु शकतो...
प्रेम हे कोणावर करु शकतो...

कु. सिद्धी कोकाटे
बी. ए. भाग -३

मृगजळ

मरण्याची भिती नाही
जगताना धोका आहे.
जगण्याचा सुध्दा येथे
या जगात एकच चान्स आहे.

जगात फुकट काही नाही
घेण्याची लाईकी नाही.
या आयुष्याचा खर्च
कर्जात बुडला आहे

अनुभव आला आता
हे एक मृगजळ आहे
भाळले अनेकजण याला
आशा शेवटी यात धोकाच आहे.

कु. ऐश्वर्या जहागिरदार
बी. कॉम. भाग -१

आशा

काट्यांनी भरलो असलो तरी
फुलांची आशा आहे.
जखमाचा हिशोब नाही
दुःखाची जाणीव आहे.
दूर जाण्याचे दुःख नाही
भेटण्याची आस आहे.
सोबत असो अथवा नसो
पण आपलेपणाची
आस आहे.
मरण्याची भिती नाही.
जगण्याची आशा आहे.

कु. हर्षदा सोलनकर
बी. ए. भाग -१

आई

कोणत्या शब्दात सांगू आई
तू माझ्यासाठी काय आहेस...
आई म्हणजे काय असते?
आई म्हणजे हळव्या मनाची असते.
आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे दुधावरची साय असते.
कोणत्या शब्दात सांगू आई
तू माझ्यासाठी काय आहेस...
आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे मुलांचे काळीज असते.
आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे जीवनातील सुखाची बाग असते.
कोणत्या शब्दात सांगू आई...
तू माझ्यासाठी काय आहेस ?

कु. वैष्णवी साळुंखे
बी. ए. भाग -३

मन...

दूर नजरेला नजर देतोस
जवळून माझ्या हासून जातोस
माझ्यावर प्रेम असताना
असं गप्प का राहतोस...
डोळ्यातल्या स्वप्नातला कधी
प्रत्यक्षात ही आण..
किती प्रेम करते, तुझ्यावर
हे न सांगता ही जाण..

तुझ्या सहवासातच
जीवन जगावसं वाटतं
संपूर्ण आयुष्य फक्त
तुझ्या सोबत राहवसं वाटतं...

कु. संजना सरवदे
बी. ए. भाग -३

मन

आकाशात मनसोक्त उंच झेप घेणारं,

थकल्यावर जमिनीवर येवून विसावणार....

कुडकडणाऱ्या थंडित मिठीत घेणारं,

रखरखत्या उन्हात थंड वाऱ्याची अपेक्षा ठेवणार...

नदी सारखी वाट काढून खळखळ वाहणारं,

न थांबता शेवटी समुद्राला येऊन मिळणार...

सुखात सगळ्या समवेत आनंदाने नाचणारं,

दुःख न दाखवता एकांतात रडणार....

भरतीच्या लाटेप्रमाणे काहूर माजवणारं,

ओहोटीनंतर हळूवार शांत होणारं....

मनातल्या भावनांना कोंडून ठेवणारं,

पुन्हा अकुंराप्रमाणे नव्याने उमलून येणार...

आठवणीचं गाठोडं बांधून ठेवणारं,

स्वतःशिवाय कुणालाही न दाखवणारं...

उराशी मोठं स्वप्न बाळगणारं,

ध्येयापर्यंत पोहोचण्यास प्रयत्नांची

पराकाष्टा करणारं...

कु. संजना सरवदे
बी. ए. भाग -३

मन

मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात,

मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात,

तुझ्या आठवणीत दिवस जातो सरुन

वचनाची तुझ्या आठवण येते

तू नसल्याची जाणीव करु देते...

मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात,

क्षणा क्षणाला मरुनी जगते मी

जगुनी पुन्हा मरते मी

मनात तु ध्यानात तु श्वासात तू

माझ्या नसात नसात तू

माझ्या रोमा रोमा तू

मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात

स्वप्नात तुझ्या रमूनी जाते

हे जीवन तुझ्या स्वाधीन केले

मन माझे गुंतूनी जाते तुझ्यात...

कु. पुनम वहिहंडे
बी. ए. भाग -३

इतकंही करु नका

कुणाला इतकं ही बोलू नका,
की तो तुमच्या प्रेमात पडेल...
कुणाला इतक काही सांगू नका,
की तो तुमच्या घरापर्यंत पोहोचेल...
कुणाला इतकं ही भेटू नका,
की तो तुम्हाला पुन्हा, पुन्हा भेटायला बोलवेल...
त्याचे गिफ्ट पण घेऊ नका,
त्याला बघितल्यावर त्याची आठवण येईल.
कुणाला इतकं ही प्रेम देऊ नका ,
की तो तुमच्यासाठी जीव देईल....
म्हणून कुणाच्या प्रेमात पडण्यापूर्वी
आपल्या आई-वडीलांच्या आशा पूर्ण करण्यात
स्वतः काहीतरी व्हावं...
मग प्रेम करावं कुशाल...

कु. सोनाली शिंदे
बी. ए. भाग -३

श्रावण

श्रावण मधला पाऊस,
मला भिजायची खूप हौस...

क्षणाला करावे, क्षणभर ओले चिंब,
मनाला करावे, मन भर ओले चिंब...

पाऊसात भिझतच राहवेसे वाटते ओलेचिंब,
श्रावण मधला पाऊस कितीही भिजले तरी फिटत नाही हौस...

श्रावण मधला पाऊस,
हिरव्या गार मनाला, लागली श्रावणाच्या पाऊसाची चाहूल...

श्रावणाच्या पाऊसात भिजताच ओलेचिंब,
मनाला खूप खूप गावीशी वाटतात गाणी....

कु. पुनम दहिहंडे
बी. ए. भाग -३

मैत्री

शब्दांपेक्षा सोबतीचं सामर्थ्य जास्त असतं.
म्हणूनच मैत्रीचं खरं समाधान खांद्यावरच्या
हातात असतं...

मैत्री अशी करा,
जी दिसली नाही तरी चालेल,
पण जाणवली पाहिजे....

जीवनाच्या प्रवासात अनेक लोक भेटतात,
काही फायदा घेतात, तर काही आधार देतात.
'फायदा' घेणारे डोक्यात राहतात आणि
'आधार' देणारे हृदयात राहतात.

आयुष्यात येणारी प्रत्येक व्यक्ती
माणसाला कळत-नकळत
काहीतरी शिकवून जाते.
काहीतरी शिकवून जाते.

काही कसं राहयचे ते शिकवतात.
तर काही कसं वागायचं ते शिकवतात...

कु. पुनम गायकवाड
बी. ए. भाग -३

आहेस तू....

आहेस तु सावरायाला,
म्हणून पडायला ही आवडतं...
आहेस तु मनावयला,
म्हणून रुसायला ही आवडतं...
आहेस तु डोळे पुसायला,
म्हणून रडायला ही आवडतं...
आहेस तु पाहायला,
म्हणून सजायला ही आवडतं...
आहेस तु ऐकायला,
म्हणून बोलायला ही आवडतं...
आहेस तु जवळ घ्यायला,
म्हणून तुझ्या मिठीत शिरायला ही आवडतं...
आहेस तु सोबतीला,
म्हणून जगायला ही आवडतं....

कु. प्रगती पोगुल
बी. ए. भाग - ३

श्रावण

असा रंग बेरंग उधळीत श्रावण येतो,
सृष्टीचा हा हिरवागार दृष्य देखावा रेखितो...
हिरव्या दृश्याने मन जाते भरुन,
इंद्रधनुष्याचे आभाळात रंग येतात बहरुन...
वेली गुंफिले, पाना-फुलांनी वृक्ष सजले,
हिरव्या पानांवरील त्या द्वबिंदुंचे वर्णन करावे किती,
झाडांवरील फुलांना महत्व किती ?
श्रावणातील सण नागपंचमी अन् रक्षाबंधनाचा
स्त्रियांच्या आवडीचा घालती फेर पंचमीचा....
झुला पोरींना झुलाया, असे टांगतो झाडाला,
झुलता-झुलता लय पोरींचा गाण्याला...
भावाला बांधती रक्षेचा धागा बहीण,
देतो सुरक्षिततेचे अन् सुखाचे वचन...
१५ ऑगस्टचा तो स्वातंत्र्य दिन,
लोकांना वाटतो सण पण
सणांपेक्षाही मोठा सण झाला हा
भारतीयांचा सण...
पोरांमध्ये खेळायला येते श्रावण...
दही-हंडीच्या संगती चिंब होतो गोपाळ कृष्ण
कोवळ्या उन्हासोबत उजाडलेला... श्रावणाचा दिवस,
हळुवार वाऱ्याची लहर....
पाना-फुलांना फुटलेला अनोखा बहर...
भिजल्या मातीतील श्रावण आला,
मेघात लावीत सोनेरी निशाने
आकाशवाटेने श्रावण आला...

कु. श्रृती वाळके
बी. कॉम. भाग -३

अशी ही मैत्री

दुःखात पण सुख माननं,
सगळ्यांना हसवणं, दुःख नाहिसा करणे
अशी ही मैत्री...

चूक झाली तर माफ करणारी,
व संकट आली तर साथ देणारी...
अशी ही मैत्री...

खूप प्रेम, आपुलकी माया देणारी,
व कधी साथ न सोडणारी...
अशी ही मैत्री...

जिवापाड प्रेम करणारी,
आपल्या जीवनातील एक अविभाज्य घटक
म्हणजे अशी ही मैत्री....

कु. अनिता म्हंता
बी. कॉम. भाग -३

आई माझी...

सकाळी झोपेतून उठवते ऐकत नसेल तर दटावते
शाळेला तयार करते.. आई माझी...
भाजी पोळी करते डब्बा भरते, रिकामी करण्या
डब्बा मला सांगते,
भुकेसाठी माझी काळजी करते. आई माझी...
मी शाळेत ती घरी दुपारी वाट पाहते दारी
घेण्यासाठी दप्तराचे ओझे रिक्षाकडे धावते.. आई माझी...
अभ्यास घेते गाणे गाते, मी शिष्य ती गुरु होते.
आयुष्याचे फलीत सांगत असते, आई माझी...
तिच्या चरणी डोके ठेवते, शिकून बाळा मोठा हो...
आशीर्वाद मी घेते, डॉक्टर, इंजिनिअरचे स्वप्न
पाहत असते माझी आई...

कु. भाग्यलक्ष्मी गोली
बी. कॉम. भाग -२

आयुष्य

जीवनाला नवीन ओळ देणे
हे आयुष्य माझे.... ।

दुःखाचा शोक सावरुन सुखाला नाविण्य देणे.
हे आयुष्य माझे....

जीवनात नाविण्य मिळवून सुखाच्या ओघात
वाहून जाणे हे आयुष्य माझे...

मनसोक्त हसणे, मनसोक्त रडणे, राग आला

तर मनसोक्त चिडणे पण हितचिंतकांना
न विसरावे हे आयुष्य माझे... ।

स्वतःला सावरावे, बावरावे पण
गुरुंना न विसरणे हे आयुष्य माझे...?
स्वतःच्या स्वप्नांना दिलासा देणे.
हे आयुष्य माझे...

कु. अमृता गांगुर्डे
बी. ए. भाग - ३

पक्षी गातील गाणी

लावु रोपटे होईल झाड..
पक्षी गातील पानाआड...

येतील फळे बहरतील फुले
झाडाखाली मग खेळतील मुले...

ताजी शुध्द मिळेल हवा
सुगंध फुलांचा घेवून नवा...

वाहील वारा हसेल आभाळ
झाडा-फुलांचा करु सांभाळ....

ढग देतील पाणीच पाणी
पक्षी गातील सुरेल गाणी...

कु. अरुणा कुणी
बी. कॉम. भाग - २

जाता... जाता....

जाता... जाता.... वाटेवर एक
पाकळी ठेवून जा...

जाता... जाता.... नजरेमध्ये
नजर तुझी देऊन जा...

जाता... जाता.... पापणीआड
तुझेच स्वप्न झाकून जा

जाता... जाता.... या हृदयाला
प्रित सुखे ओवाळून जा...

जाता... जाता.... सांज गुलाबी
स्पर्श तुझा तू देवून जा

जाता... जाता.... आर्थ विराणी
हृदयहाक तू ऐकून जा...

मंदिराच्या जीर्ण शिळांवर
अश्रुंचे ओंघळ गाळून जा

दवबिंदुंचे मलूल पुष्प
ऊनपावली तू माळून जा...

जाता... जाता.... पारंब्याना
हळूच झोके देऊन जा

झोकावलेल्या पारंब्यांना
हृदयलय तू सांगून जा...

कु.प्रियांका मित्रा
बी. कॉम. भाग - २

सकाळ

सुमुधर रात्रीचा निरोप आहे, ही सकाळ...
नव दिवसाची सुरुवात आहे, ही सकाळ..
सकाळ आहे ही, काल्पनिक स्वप्नांची तोडफोड
सकाळ आहे ही, रचलेल्या स्वप्नाला साकारण्याची वेळ..
चंद्रमामा लपायची वेळ आहे, ही सकाळ
भूमीला पहिले रविकिरणांचा स्पर्श आहे, ही सकाळ
सकाळ आहे ही, चिमण्यांचा चिवचिववाट..
सकाळ आहे ही, दगदगी जीवनाचा आभास..

पहाटेचा परीक्षेचा अभ्यास आहे, ही सकाळ,
उज्वल भविष्याची उंच झेप आहे, ही सकाळ,
सकाळ आहे ही, मुलाचे हट्ट गोंधळ अन् सकाळची शाळा,
सकाळ आहे ही, शाळेची घंटा अन् देवाची प्रार्थना...

झोपी उठताना आळस येतो आहे, ही सकाळ
नव सुरुवातीचा चैतन्य आहे, ही सकाळ
सकाळ आहे की, कुणाला कुडकुडती थंडी
सकाळ आहे ही, कुणाला मिळे बेडवर टी

असफल प्रेमाची कडु आठवण आहे, ही सकाळ
झाले गेले विसरुन नव प्रेमाचा शोध आहे, ही सकाळ,
सकाळ आहे ही, कुणाला जीवनातून मुक्ती...
सकाळ आहे ही, कुणाला जीवनात नवा जन्म....

कु. यशोदा लिंबोळे
बी. कॉम. भाग -३

मोबाईल

मम्मी सोड मोबाईल... माझ्या सोबत बोल
थोडावेळ बागेमध्ये खेळू आपण चल....
सोबत तुला नेहमी मोबाईल लागतो केवळ
घरी आल्यावर तरी घे ना मला जवळ...
रात्रभर मोबाईल असतो तुझ्या उशाला
तरी सुध्दा दिवसभर सोबत ठेवते कशाला...
पप्पा आज मोबाईल ऑफीसमध्ये विसरा
माझा चेहरा होईल आनंदाने हसरा...
दिवसभर मोबईल तुम्ही हातात धरता
माझे बोट धरुन सांगा कधी फिरता...
पुढच्या जन्मा मला मोबाईल व्हायचं आहे...
कारण मला दिवसभर मम्मी आणि पप्पांसोबत
राहायचं आहे...

कु. मंजुषा गंपले
बी. कॉम. भाग -३

मैत्री

अमर्यादित अशा मैत्रीच्या मर्यादा

आई-वडील - शिक्षक या अतूट नात्याप्रमाणे
एक नाते म्हणजे मैत्री मैत्री आधीही होती
मैत्री आजही आहे. मैत्री होती सुर्यासारखी...
कधीही न संपणारी मैत्री होती पाण्यासारखी
निर्मळ, शुध्द असणारी व्यवहारी स्पर्श नसणारी
मैत्री होती चंद्रासारखी, अंधाऱ्या रात्री प्रकाश देणारी,
मैत्री होती झाडासारखी वर्षानुवर्षे टिकणारी
स्वतः उन्हात राहून वाटवासरुला छाया देणारी मैत्री
होती फुलासारखी मंद धुंद दरवळणारी
हवी हवीशी वाटणारी.. एक प्रश्न आला मनी,
आज सापडेल का हो अशी मैत्री या जगी,
मैत्री आधीही होती, मैत्री आजही आहे.
मैत्री आजही आहे, त्या सूर्यासारखी
सकाळी उगवून संध्याकाळी मावळणारी
मैत्री आजही आहे. त्या पाण्यासारखी
व्यवहारी स्पर्शापायी गढुळ होणारी
मैत्री आजही आहे, त्या चंद्रासारखी
रोजच बदलणारी. मैत्री आजही आहे,
त्या झाडासारखी, ऋतुमानानुसार बदलणारी..
मैत्री आधीही होती, मैत्री आजही आहे.
कॉलेज, कॅन्टीन, सोशल मिडीया पुरतीच सिमीत
पार्टीला येणारे पैसे उधळणारे,
आई-माई उदारणारे मित्र जागोजागी मिळतील...
पण संकटाप्रसंगी सोबत असणारा एखादाच मिळेल.
मैत्री आधीही होती, मैत्री आजही आहे,
फरक फक्त एवढाच की, अमर अमर्यादीत अशी होती.
ती मैत्री... आज फक्त हातावर बांधल्या जाणाऱ्या
एका कापडी धाग्यापूर्तीच मर्यादित आहे...

कु. हर्षदा सोलनकर
बी. ए. भाग -१

फुलायचं असतं

- सदाफुली सांगते,

रुसुन फुगुन रहायचं नसतं,

हसुन हसुन जगायचं असतं.

- रातराणी सांगते,

अंधाराला घाबरायचं नसतं

काळोखात ही फुलायचं असतं.

- गुलाब सांगतो,

येता जाता रडायचं नसतं.

काट्यात सुध्दा हसायचं असतं.

- बकुळी म्हणते,

सावळ्या रंगाने हिरमुसायचं नसतं

गुणाच्या गंधाने जिंकायचं असतं.

- कमळ म्हणते,

संकटाच्या चिखलात फुडायचं नसतं.

संकटाला बुडवून फुलायचं असतं.

कु. ऐश्वर्या जहागिरदार
बी. कॉम. भाग -१

ध्येय

गुलाब सांगतो,
येता -जाता रडायचं नसतं,
काट्यात सुद्धा हसायचं असतं...

रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायं नसतं,
काळोखातही फुलायचं असतं...

सदाफुली सांगते,
रुसून राहयचं नसतं,
हसून - हसून हसावयचं असतं....

मोगरा म्हणतो,
स्वतःचा बडेपणा सांगायचा नसतो,
सद्गुणांचा सुगंध मैलावरुनही येतो....

कमळ सांगतो,
संकटात, चिखलात बुडायचं नसतं,
संकटांना बुडवून फुलायचं असतं

फुल असते श्वासासाठी,
हृदय असते प्रेमासाठी,
कोणा नसतात कोणासाठी.... म्हणूनच
आपण ध्येय गाठायचं असतं,
फक्त आपल्या आई- वडीलांसाठी....

कु. प्रियांका बोगा
बी. कॉम. भाग -३

तू आहेस म्हणून...

तू आहेस म्हणून...
तुझ्याशिवाय जीवन अपूर्ण आहे.
तुला विचारल्याशिवाय काही केले नाही...

तू नसेल तर माझे काय होईल.
हाच प्रश्न मला पडलाय...
तुझ्यासोबत काढलेले दिवस
मी कधी विसरु शकत नाही.
माझ्या सुखात ही तूच...
माझ्या दुःखात ही तूच...

तुला दिलेले वचन
ते मी पूर्ण करेन...
तुझ्या या प्रेमाने हिरावून घेतलाय मला...
म्हणून म्हणते तू आहेस म्हणून मी आहे...
तुझ्याशिवाय जीवन अपूर्ण आहे...

कु. सोनाली शिंदे
बी. ए. भाग -३

मैत्री

मैत्री ही एक

अनमोल व न तुटणारी

जीवाभावाची सोबत असते..

मैत्री ही निर्मळ भावनेची असते..

मैत्री म्हटलं की आपल्या मनात

अनेक शब्दाचे पाझर फुटतात.

मैत्री ही अशी असावी की,

कधीही सोडून न जाणारी

मैत्री ही अशी असावी की,

सुख दुःखात सोबत असणारी

मैत्री ही अशी असावी की,

शेवटपर्यंत साथ देणारी

मैत्री अशी असावी की,

अड-अडचणीवेळी नेहमी मदत करणारी

मैत्री अशी असावी की,

चुकीच्या मार्गावर कधीही न जाणारी

मैत्री ही अशी असावी की,

प्रत्येकवळी हवीहवीशी वाटणारी

मैत्रीचं नातं हे खरंच खूप असतं

म्हणून हे नातं कधीच तुटत नसतं...

कु. पुनम गायकवाड
बी. ए. भाग -२

सुख - दुःख

तुमच्यासारखी गोड गोड विचार देणारे...
ुख, दुःखात मिसळून राहणारे, अशी ही मैत्री...
कधी कुणास न रागवणारे,
कुणाचे मन न दुःखवणारे अशी ही मैत्री...
सगळ्यांना आपलसं मानणारी,
सगळ्यांनाच मन जिंकून घेणारी
कधीच एकमेकांशी साथ न सोडणारी

कु. सोनाली शिंदे
बी. ए. भाग -३

प्रेम

प्रेम म्हणजे प्रेम असतं...
प्रेमात सर्वकाही क्षम्य असतं
प्रेम हे आधंळ असतं.
प्रेमामध्ये सर्वकाही माफ असतं
प्रेम हे भावनाचं मंदिर आहे
प्रेम हे एकमेकांमधील घालमेल असते.
प्रेम एक समजुतदार पणाचं लक्षण असतं
प्रेमात सर्वकाही करुन दाखवावं लागतं
प्रेम हे करुणामय असते
प्रेमामध्ये सुख दुःख, भावना, यातना या
सगळ्या गोष्टी सहन करण्याची ताकद येते.
प्रेम हे वेडेपणाचं लक्षण आहे...
प्रेम हे प्रत्येक माणसाच्या
मनात भरभरुन असतं
प्रेम हे असं नात आहे त्याला
कशाची देखील तोड नाही.
म्हणून प्रेम हे अमर आहे...

कु. पुनम गायकवाड
बी. ए. भाग -२

भेट

भेटत, ती पण नाही भेटत,
मी पण नाही...
निभवणे तिला जमत नाही
आशेवर ठेवता मला पटत नाही.
फसवत, ती पण नाही. फसवत,
मी पण नाही...
तिला रुसण्याचे दुःख आहे.
मला एकटेपणाची भिती आहे.
समजत, ती पण नाही समजत,
मी पण नाही.
कुठल्याही वाटेवर भेटत असतो नेहमी
बघत, ती पण नाही. थांबत,
मी पण नाही...
जेव्हा पण बघतो तिला,
ठरवतो काही तरी बोलेन तिच्याशी...
ऐकत, ती पण नाही. सांगत,
मी पण नाही..
पण एक गोष्ट मात्र खरी आहे.
प्रेम माजे आजही आहे तिच्यावर...
नाकारत, ती पण नाही. सांगत,
मी पण नाही...

कु. किर्ती चाटला
बी. ए. भाग - ३

गुरुविना

जन्मलात तेव्हा रडण्याशिवाय काय येत
होय, आज जे मिळवलात ते गुरुशिवाय काय शक्य होत...।

आज कुठे एखाद्या विषयांची मोठी पुस्तके वाचताय, पण
जमलं असतं का हो ते आधी त्या मुळाक्षराशिवाय...।

कुणी बसलं तर करायाला गुरुंची यादी,
आई - वडील आणि शिक्षक आठवतील सगळ्यात आधी... ।

ग्रंथ आणि अनुभव यांनी बरच काही शिकवलं,
पडद्यामागच्या गुरुमध्ये त्याचच नाव पाहिलं... ।

लहान-लहान गोष्टीसुध्दा सांगुन जातात,
बरेच काही, गुरु लपलेला असतो त्या सर्वांच्या ठायी.... ।

व्हील्स् गेअर्स नी सांगितलं सतत,
गतिमान रहायला...
इलेक्ट्रॉनिक्स नी शिकवलं परत ऋण फेडायला... ।

कॉम्प्युटर ने सांगितल प्रत्येक बीटला महत्व द्यायला...
चांगलं काही शिकवणार प्रत्येकजण गुरुच असतो... ।

अपयश आल्यावर आठवणीला होती ती भिंतीवरची मुंगी...
कितीही वेळा पडली तरी चिकाटी होती अंगी....

फळ्याखाली कोपऱ्यात खडूचा चुराचुरा झाला होता..
दुसऱ्यांना शिकवण्यासाठी तो शेवटपर्यंत झिजला होता... ।

मधमाशी जशी मध गोळा करते जशी,
फुलांमधून तसे सद्गुण वेचायला शिका तुम्ही सर्वांकडून.... ।

कु. मंजुश्री वडगांवे
बी. ए. भाग - ३

विनोद

बाप : तू माझ्या पसंतीच्या मुलीशी लग्न कर..
मुलगा : अजिबात नाही...
बाप : ती बिल गेट्सची मुलगी आहे.
मुलगा : मग चालेल (बाप बिल गेट्स कडे जातो)
बाप : तुमच्या मुलीचं लग्न माझ्या मुलाशी कराल का?
बिल गेटस् : अजिबात नाही.
बाप : माझा मुलगा वर्ल्ड बँकेचा सी. ई. ओ. आहे.
बिल गेट्स : मग चालेल.
(बाप वर्ल्ड बँकेचा अध्यक्षाकडे जातो.)
बाप : माझ्या मुलाला वर्ल्ड बँकेचा सी.ई.ओ. कराल का ?
अध्यक्ष : अजिबात नाही ?
बाप : माझा मुलगा बिल गेट्सचा जावई आहे.
अध्यक्ष : मग चालेल....

कु. आरती कांबळे
बी. कॉम. भाग -२

विनोद

तरुण : मी तुझ्याशी लग्न नाही करु शकत.
तरुणी : का रे । काय झालं ?
तरुण : घरच्यांचा होकार नाही मिळत आहे.
तरुणी : कोण कोण असतं घरी ?
तरुण : कोणी जास्त लोक नाहीत,
फक्त एक बायको व तीन मुले ।
वडील (मुलाला) : बारा अधिक पाच किती.
मुलगा : येत नाही.
वडील (रागाने) : मुर्खा, एवढं येत नाही का ?
जा, आतून कॅलक्युलेटर घेऊन ये...

कु. आरती कांबळे
बी. कॉम. भाग -२



हिंदी विभाग

- गीतांजली -

" मन जहाँ डर से परे है
और सिर जहाँ ऊंचा है,
ज्ञान जहाँ मुक्त है,
और जहाँ दुनिया को
संकीर्ण घरेलु दिवारोंसे
छोटे छोटे टुकडो में बांटा नहीं गया है,
जहाँ शब्द सच की गहराइयों से निकलते है,
जहाँ शब्द सच की गहराईयों से निकलते है,
जहाँ थकी हुई प्रयासरत बांहे
त्रुटी हीनता की तलाश में हैं,
जहाँ कारण की स्पष्ट धारा है
जो सुनसान रेतीले मृत आदत के
वीराने में अपना रास्ता खो नहीं चुकी है,
जहाँ मन हमेशा व्यापक होते विचार और सक्रियता में
तुम्हारे जरिए आगे चलताा है,
और आझादी के स्वर्ग में पहुंच जाता है,
ओ पिता
मेरे देश को जागृत बनाओ "

- रविंद्रनाथ टागोर

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग			
१.	राष्ट्रभाषा हिन्दी	कु. झुल्फिना कामले	बी. ए. भाग - ३	५७
२.	नाम में क्या हैं ?	कु. प्राजक्ता होनमाने	बी. ए. भाग - ३	६०
३.	साक्षरता का महत्व	कु. श्रृती चराटे	बी. ए. भाग - ३	६१
४.	सबला नारी...! नारी शक्ती...!	कु. दिपीका गोसकी	बी. कॉम. भाग - २	६३
५.	बचाओ... बचाओ... बचाओ...	कु. प्रियांका बनसोडे	बी. ए. भाग -३	६४
६.	जिंदगी चलती जाती हैं।	कु. प्राजक्ता होनमाने	बी. ए. भाग - ३	६५
७.	वृक्ष लगाओ... देश बचाओ...	कु. पुजा कोंडी	बी. ए. भाग - ३	६६
	पद्य विभाग			
१.	माता -पिता	कु. मृणाली हिबारे	बी. ए. भाग - २	६७
२.	टूट सकते हैं मगर हम झुक नही संकते	कु. पुजा कोंडी	बी. ए. भाग - ३	६७
३.	जिंदगी	कु. प्रियंका बनसोडे	बी. ए. भाग - ३	६७
४.	कॉलेज लाईफ /जीवन	कु. मंजुषा गंपले	बी. ए. भाग - ३	६८
५.	हार के बाद जीत	कु. मंजुषा गंपले	बी. ए. भाग - ३	६८
६.	मैं वह भाषा हूं...	कु. जुल्फिना कामले	बी. ए. भाग - ३	६८



राष्ट्रभाषा हिन्दी

कु. झुल्फिना कामले
बी. ए. भाग - ३
(हिंदी विभाग)

सारे देश की यह आशा
हिंदी है हमारी राष्ट्रभाषा...

राष्ट्रभाषा का अर्थ है राष्ट्र की भाषा (लॅग्वेज् ऑफ नेशन) अर्थात ऐसी भाषा जिसका प्रयोग देश की हर भाषा के लोग आसानी से कर सकें बोल सकें और लिख सके। हमारे देश की ऐसी भाषा है हिंदी । आजादी के पहले अंग्रेजी सरकार ने अंग्रेजी के माध्यम से सारा काम चलाया किन्तु अपने देश में सबसे लिए एक भाषा का होना आवश्यक है, ऐसी भाषा जो अपने देश की हो। वह भाषा केवल हिंदी ही है।

संसार के किसी भी देश का व्यक्ति कुछ ही समय के प्रयत्न से हिन्दी बोलना और लिखना सीख सकता है। इसकी दुसरी विशेषता है के यह भाषा लिपी (स्क्रिप्ट) के अनुसार चलती है। इसमें जैसा लिखा जाता है. वैसी ही बोला जाता है।

इसकी सबसे बडी विशेषता है कि संसार की लगभग सभी भाषाओं के शब्द इसमें घुलमिल सकते है। कुर्सी, आलमारी, कमीज्,बटन, स्टेशन, पेन्सिल, बेच आदि शब्द है, जो विदेशी भाषाओं से आकार इसके अपने शब्द बन गए है।

हिंदी संसार के अनेक विश्वविद्यालयों (युनिव्हर्सिटीस्) में पढी जाती है. और इसका साहित्य (लिटरेचर) भी विशाल है। इसके अलावा हिंदी में देश की एकता लाने में बडी महत्वपूर्ण भूमिका निभाई है। उत्तर से लेकर दक्षिण और पुरब से पश्चिम तक अधिकार विद्वानोने भारत की एकता और अखंडता (युनिटी ॲन्ड इंटरगेरिटी) के लिए हिंदी का समर्थन किया।

हम सब का अभिमान है हिंदी
भारत की शान है हिंदी।

इतने अधिक गुणों से भरपूर होकर भी हिंदी आज अंग्रेजी के पिछे क्यों चल रही है। इसका सबसे बडा कारण है, ऊँचे पदोपर बैठे व्यक्ति। जो अंग्रेजी के पुजारी हैं। वे सोचते है कि अंग्रेजी न रही तो देश पीछड़ जाएगा।

आज हिंदी के प्रचार - प्रसार में कुछ बाधाए अवश्य है किंतु दुसरी और केंद्रीय सरकार, राज्य सरकारे एवं जनता सभी एकजूट होकर हिंदी के विकास के लिये प्रयत्नशील है। सरकार द्वारा अनेक योजनाएँ बनाई गई है। उत्तर भारत में अधिकांश राज्यों मे सरकारी कामकाज हिंदी में किया जा रहा है।
राष्ट्रीयकृत बँको ने भी हिंदी में कार्य करना आरंभ कर दिया है।

विभिन्न संस्थाओं एवं अकादमीयों द्वारा हिंदी लेखकों की श्रेष्ठ पुस्तकों को पुरस्कृत किया जा रहा है। दूरदर्शन और आकाशवाणी द्वारा भी इस देश में काफी प्रयास किए जा रहे है।

हिंदी है देश की राष्ट्रभाषा
हिंदी सबसे उत्तम भाषा।

निःसंदेह हिंदी एक ऐसी भाषा है, जिसमें राष्ट्रभाषा बनने की पूर्ण क्षमता है। इसका समृध्द साहित्य और इसके प्रतिभा संपन्न साहित्यकार इसे समूचे देश की संपर्क भाषा का दर्जा देते है। किंतु आज हमारे
सामने सबसे बडा प्रश्न यह है की हिंदी का प्रचार - प्रसार कैसे किया जाए ? सर्वप्रथम तो हिंदी भाषा को रोजगार से जोडा जाए। हिंदी सिखनेवालों की सरकारी नोकरियों में प्राथमिकता दी जाए। सहकारी कार्यालयो तथ न्यायालयों में केवल हिंदी भाषा का ही प्रयोग होना चाहिए। अहिंदी भाषी क्षेत्रों में हिंदी का आधिकाधिक प्रचार होना चाहिए। वहाँ हिंदी को पत्र पत्रिकाओंके प्रकाशकों एवं संपादको को और आर्थिक अनुदान दिया जाए।

हिंदी है भारत की आशा
हिंदी है भारत की भाषा।

हिंदी वह भाषा है जो किसी भी देश के अधिकतर निवासियों द्वारा बोली एवं समझी जाती है। वह राष्ट्रभाषा कहलाती है। प्रत्येक राष्ट्र कि कोई न कोई राष्ट्रभाषा अवश्य होती है। हमारे भारत की राष्ट्रभाषा हिंदी है। जो कि भारत के अधिकतर राज्यो के लोगो द्वारा बोली एवं समझी जाती है। हिंदी भाषा हमारे राष्ट्र की एकता, सम्मान तथा विकास का आधार है जिस प्रकार सभी व्यक्ति अपने देश की राष्ट्रभाषा का सम्मान करते है, उसी प्रकार हमें भी अपने राष्ट्रभाषा का सम्मान करना चाहिए।

अपनी राष्ट्रभाषा में ही बातचीत करते परंतु भारतीय हिंदी में बात करने से शर्म महसूस करते है। उसे हीन दृष्टी से देखा जाता है। सबसे पहले हमें अपनी राष्ट्रभाषा को सम्मान देना, हमारा कर्तव्य है।

हिंदी लिखो, हिंदी पढो, हिंदी बोलो...।

उसके पश्चात् तय भाषाओं को सीखने में कोई हर्ज नही है। सबसे अधिक बोली जाने वाली भाषाओं में हिंदी का तीसरा स्थान है। हिंदी, फीजी, सुरी नाम, ट्रिनीडाड, मलेशिया, मॉरिशस आदी देशोमें काफी लोगों द्वारा बोली एवं समझी जाती है। जो जिस प्रकार बोली जाती है। उस प्रकार लिखी भी जाती है।

जब तक सुरज चांद रहेगा।
हिंदी तेरा नाम रहेगा।

हिंदी के राष्ट्रभाषा हो जाने से हमें अनेक लाभ है। राष्ट्रभाषा साधारण से साधारण व्यक्ति के लिए अत्यंत आवश्यक है। अगर सभी को हिंदी आती होगी तो विचारों के आदान -प्रदान में भी आसानी होगी, जिससे देश में एकता स्थापित होगी। राष्ट्रभाषा का प्रचार हो जाने से शासन कार्यो में भी आसानी होगी हिंदी एक जानदार भाषा है। वह जितनी बढेगी देश का उतना ही नाम होगा।

देश की यह आशा।
हिंदी है हमारी राष्ट्रभाषा।

हमारे देश में हर वर्ष १४ सितंबर को हिंदी दिवस मनाया जाता है। १४ सितंबर सन १९४९ को भारतीय संविधान सभा ने एक फैसला लिया कि हिंदी भारत की राष्ट्रभाषा होगी, इस ऐतिहासिक फैसले को हर क्षेत्र में प्रसारित करने के लिए भारत की राष्ट्र भाषा प्रचार समिती ने १९५३ से हर साल १४ सितंबर को हिंदी दिवस मनाने का फैसला किया, जो कि भारत में हर राज्य और हर वर्ग तक हिंदी भाषा के प्रचार और प्रसार के लिये इस दिन को चुना गया।

अंग्रेजी खाली आशा है।
हिंदी तो राष्ट्रभाषा है।

राष्ट्रभाषा एक देश की संस्कृती का महत्वपूर्ण हिस्सा होती है। जिसे संपूर्ण राष्ट्र में कार्यो के लिए प्रमुखता से प्रयोग मे लाया जाता है वह भाषा जिसमें राष्ट्र के काम किए जायें। राष्ट्र के काम - धाम या सरकारी कामकाज के लिए स्वीकृत भाषा। राष्ट्र शब्द का प्रयोग किसी देश तथा वहाँ बसनेवाले लोगों के लिए किया जाता है। प्रत्येक राष्ट्र का अपना स्वतंत्र अस्तित्व होता है। उसमें विभिन्न जातियों एवं धर्मो के लोग रहते है। इसी भिन्नता के साथ -साथ उनमें एकता भी बनी रहती है।

दो नहीं एक व्यक्ति की ही रोटी दे उसे,
राष्ट्रभाषा हिंदी अधा कच्ची जली या मोटी दे

उसे पर उसे तु खुद से दूर कर तु पराये पर इतना गरुर न कर ये टिमटिमाते तारे सूरज नही होंगे जो तेरे साथ है आज कल नहीं होंगे, यूँ करेगा अनदेखा तो वो मर जाएगी, फिर किसी पहर तुझे याद भी आयेगी, पर होकर कमजोर तेरी मदत कर पायेगी, इसलिए कहती हूँ, बिखर ने से बचाले उसे, सर का ताज न सही दिल के कोने में जगह दे उसे, ये दिल की आवाज बन के दूर तलक जाएगी. तू जहाँ तक चाहेगा वहाँ तलक हो जाएगी हाँ, इससे इतर गए तो हम बाज नहीं आयेगें तो सच कहती हूँ चलो जाग जाए हम, अभी भी वक्त है, कुछ कर दिखाए हम जिस तरह माँ का दर्जा शीर्ष का होता है। उसकी तरह मातृभाषा को राष्ट्रभाषा बनाए हम....

शुद्ध हिंदी का करे उपयोग।
भारतीयता की उच्च सोच।
जय हिंद जय हिंद।

देशकी एक लाडली बेटी बेटी है हिंदी। बहनों को साथ लेकर चलती है हिंदी। सुंदर है, मनोरम है, मिठी है सरल है। ओजस्विनी है और अनुठी है हिंदी। पथिक है, प्रवास में परिचय का सूत्र है। मैत्री जोडने की सांकल है हिंदी। अंग्रेजी से भी इसका कोई बैर नहीं। उसको भी अपनेपन से लुभाती है हिंदी।

युँ तो देश में कई भाषाएँ और है।
पर राष्ट्र के माथे की बिंदी है हिंदी।

भारत के गाँवो और कसबो की भाषा हैं हिंदी।
शहरो और गाँवो की ताकद हैं हिंदी।
सिखो जी भर भाषा अनेक।
राष्ट्रभाषा न भुलो एक।

हिंदी को राष्ट्रभाषा घोषित करने का प्रमुख तर्क यह है कि हिंदी एक भारतीय भाषा है। दुसरे जितनी संख्या यहाँ हिंदी बोलने वालो लोगों की थी, उतनी किसी अन्य प्रांतीय भाषा बोलने वालो की नही। तिसरे, हिंदी को समझना बहुत आसान है।

हिंदी भाषा का अपना महत्व।
इसमें हैं अपनत्व।

आज जहाँ शासक और जनता हिंदी को आगे बढाने और उसका विकास करने के लिए प्रयत्नशील है, वहाँ ऐसे लोगों की भी कमी नहीं है। जो उसकी टाँग पकडकर पीछे घसीटने का प्रयत्नकर रह है। इन लोगों मे कुछ ऐसे भी है। जो हिंदी को संविधान के अनुसार सरकारी भाषा बनाने से तो सहमत है, किंतु उसे राष्ट्रभाषा के रुप में स्वीकार नही करना चाहते। धीर- धीरे पंजाब, बंगाल और चन्नई के निवासी भी प्रांतीयता की संकीर्णता में फंसकर अपनी अपनी भाषाओं की मांग कर रहे है। परंतु हिंदी ही एख ऐसी भाषा है। जिसके द्वार संपूर्ण भारत को एक सुत्र में पिरोया जा सकता है।

जब भारत करेगा हिंदी का सम्मान।
तभी तो आगे बढेगा हिंदुस्थान।

भाष के द्वारा मनुष्य अपने विचारों का आदान-प्रदान करता है। अपनी बात को कहने के लिए और दुसरे की बात समझने के लिए भाषा एक सशक्त साधन है। जब मनुष्य इस पृथ्वी पर आकर होश संभालता है तब उसके माता -पिता उसे अपनी भाषा में बोलना सिखाते है। इस तरह भाषा सिखाने का यह काम लगातार चलता रहता है। प्रत्येक राष्ट्र की अपनी अलग अलग भाषाएं रहती है। प्रत्येक राष्ट्र की अपनी भाषामें उनका राजकार्य जिस भाषा में होता है, और जो जन सम्पर्क की भाषा होती है उसे ही राष्ट्रभाषा का दर्जा प्राप्त होता है। आजादी के इतने वर्षों बाद भी हिंदी को जो गौरवपूर्ण स्थान प्राप्त होना चाहिए था। वह उसे नहीं मिला। अब प्रश्न यह उत्पन्न होता है कि हिंदी को उस का यह पद कैसे दिलाए , कौन से ऐसे उपाय किए जाए, जिससे हम अपने लक्ष्य तक पहुँच सकें।

हिंदी सप्ताह मनाईयें।
हिंदी के प्रगती की बात किजीए।

यद्यपि हमारी राष्ट्रभाषा हिंदी है, परंतु हमारा चिंतन आज भी विदेशी है। हम वार्तालाप करते समय अंग्रेजी का प्रयोग करने में गौरव समझते है। भले ही अशुध्द अंग्रेजी हो। इसलिए इस मानसिकता का परित्याग करना चाहिए और हिंदी के प्रयोग करने में गर्व अनुभव करना चाहिए। हम सरकारी कार्यालय, बैंक अथवा जहाँ भी कार्य करते है। हिंदी में ही कार्य करते है। हमें हिंदी में ही कार्य करना चाहिए। उसमें विभिन्न जातियों एवं धर्मो के लोग रहते है। विभिन्न स्थानों अथवा प्रांतोमें रहने वाले लोगो की भाषा भी अलग-अलग होती है। पुरे राष्ट्र के शासन का एक केंद्र होता है। अंतः राष्ट्र की एकता को और दृढ बनाने के लिए एक ऐसी भाषा की आवश्यकता होती है, जिसका प्रयोग संपूर्ण राष्ट्र में महत्वपूर्ण कार्यो के लिए किया जाता है। हमारी स्वतंत्रता कहा है, वहाँ हमारी राष्ट्रभाषा है। हिंदी है अपना अलग ही दर्जा है, लेकिन इसकी महानता का हो गया लोप।

जैसे रंगो के मिलने सें, खिलता हैं बसंत।
वैसे भाषाओं में मिठ्ठीसी बोलती हैं हिंदी।

निमंत्रण पत्र, नामपट्टी हिंदी में होने चाहिए। अदालतों का कार्य हिंदी में होना चाहिए। बिजली, पानी, गृहकर आदि के बिल जनता को हिंदी में दिये जाने चाहिए। इससे हिंदी का प्रचार और प्रसार होगा। प्राथमिक स्तर से स्नातक स्तर तक हिंदी अनिवार्य विषय के रुपमें पढाई जानी चाहिए।

जो नहीं करते राष्ट्रभाषा का सम्मान।
हमेशा होता हैं, उनका अपमान।

जब विश्व के अन्य देश अपनी मातृभाषा में पढकर उन्नती कर सकते है। तब हमें राष्ट्रभाषा अपनाने में झिझक नहीं होनी चाहिए। राष्ट्रीय और अन्तराष्ट्रीय स्तर पर पत्र-व्यवहार हिंदी में होना चाहिए। स्कूल के छात्रो को हिंदी पत्र - पत्रिकाएं पढने की प्रेरणा देनी चाहिए। जब हमारे विद्यार्थी हिंदी प्रेमी बन जायेंगे तब हिंदी का धारावाह प्रसार होगा। हिंदी दिवस के अवसर पर हमें संकल्प लेना चाहिए। हिंदी दिवस केवल एक दिन नही है। यह लोगों के बीच राष्ट्रीय भाषा हमारे देश की आत्मा है और अपने नागरिकों की पहचान है।

जैसे भारत माता के माथे की बिंदी।
वैसे हमारी राष्ट्रभाषा हिंदी।

नाम में क्या हैं ?

लघुकथा

कु. प्राजक्ता होनमाने
बी. ए. भाग - ३
(इंग्रजी विभाग)

रास्ते से चलते हुए कई बार विभिन्न इमारतोंपर लगे होर्डिंग पर जब नजर जाती है तो उसे पढ लेते है। चाहे अनचाहे पढते हुए एक तरह से समय भी पास होता है। ध्यान बां टने से थोडी मानसिकता को राहत भी मिलती है, और जब पढते है तो फिर चिंतन भी करते है। मैं खासतौर से हिंदी और संस्कृत निष्ठ नाम देखकर यह सोचती हूँ कि यह क्या है? जरा आगे पढें । नाम तो होते है बडे प्यारे । जैसे -वात्सल्य, संस्कार, जीवनधारा, निरोग, स्नेह, अंकुर, सुरभि, सुरुचि और सहज आदि कई बार तो ऐसा लगता है की शायद किसी पत्र-पत्रिका के दफ्तर हो और क्या कोई लोगों की सेवा करनेवाला संस्थान हो । इमारत का बाहरी स्वरुप और वहाँ खडी गाडियों का जमघट देखकर लगता है जैसे कोई बडा होटल हो । पर नहीं, साहब वहाँ तो होते है. नर्सिंग होम या अल्ट्रासाऊंड सेंटर या कोई पैथलोजी लैब । तब लगता है कि इतने प्यारे नाम होना आश्चर्य की बात है। इसकी वजह है कि इन स्थानों पर आदमी कभी स्वस्थ होने की स्थिती में तो जाता नहीं है। इतना ही नहीं नाम पढने के बाद तो नाम और इमारत का भव्य आकर्षण भूलकर आदमी भगवान से याचना करता है कि कभी इन अस्पतालों की तरफ न भेजे ।

कई बार किसी शहर में जाते है। और पैदल चलते हुए -दूर -दूर तक नजर दौडते चलते हुए किसी भव्य और ऊँची इमारत पर दृष्टी पडती और मन में विचार आता है । कि शायद किसी बडे आदमी की रियासत होगी या कोई होटल होगा या कोई मार्केट होगा और जब पास आते ही नाम पर नजर पडती है तो मन में प्रफुलता का भाव आता है। पर आगे जब दृष्टी जाती है। नर्सिंग होम का बोर्ड देखकर पूरा जायका बिगड जाता है।

उस दिन मैं और मेरा मित्र एक जगह खडे बातचीत कर रहे थे तो हमने देखा एक महिला और पुरुष पास से गुजरे तो, हमने महिला को कहते सुना - हम वहाँ दूर से देख कर कह रहे थे कि इस बिल्डींग में यह होगा और वह होगा, यहाँ तो अस्पताल है । भगवान न करे कभी ऐसे अस्पतालों में आना पडे आदमी का यहाँ इतना पैसा खर्च हो जायेगा कि ठिक भी होगा तो घर लौटने के बाद भूखा मर जाएगा । नाम भी देखो कितना प्यारा रखा है।

उसके जाने के बाद हम दोनों ने उस इमारत को ध्यान से देखा तो हँसने लगे । मित्र ने कहा - ऐसा धोखा कई बार हमारे साथ भी हो चुका है। अक्सर जब ऐसा होता है तो सोचता हूँ कि इनके नाम क्या हैं और काम क्या हैं ।

साक्षरता का महत्व

कु. श्रुती चराटे
बी. ए. भाग - ३
(हिंदी विभाग)

" अगर देश को है, प्रगती की चाह,
हर कदम बढे साक्षरता की राह"

राष्ट्रीय खेळाडू – आर्चरी

कु. स्वप्ना मराळे
बी. कॉम. भाग –१

राष्ट्रीय खेळाडू – आर्चरी

कु. शिवलिला नरवणे
बी. ए. भाग –२

राष्ट्रीय खेळाडू – योगासन

कु. जयंती गाजूल
बी. कॉम. भाग –२

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. उमा हेगडे
बी. कॉम. भाग –२

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. सुस्मीता संगनगारी
बी. कॉम. भाग –२

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. सौंदर्या शक्रल
बी. कॉम. भाग –२

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. वैष्णवी बसुल
बी. कॉम. भाग –२

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. सोनाली लकपती
बी. ए. भाग –

विद्यापिठ खेळाडू – योगासन

कु. पुजा गाडवे
बी. कॉम. भाग –१

राज्य खेळाडू – बेसबॉल

कु. पुजा दारुना
बी. ए. भाग –१

राज्य खेळाडू – बेसबॉल

कु. पायल पवार
बी. ए. भाग –१

राज्य खेळाडू – बेसबॉल

कु.वर्षा आतवले
बी. ए. भाग –१

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

• महाविद्यालयीन विकास समिती •

२०१९-२०

अ.क्र.	नांव	पद
१.	श्री. काशिनाथ परशुराम गड्डम	अध्यक्ष
२.	श्री. दशरथ नारायण गोप	सदस्य
३.	प्रा. डॉ. श्री. तुकाराम नारायण शिंदे	सदस्य
४.	प्रा. डॉ. शिरीष नागनाथ भोसले	सदस्य
५.	प्रा. डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	सदस्य
६.	प्रा. डॉ. श्री. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	सदस्य
७.	श्री. व्यंकटेश मल्लेशम गाजूल	सदस्य
८.	प्रा. डॉ. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी	सदस्य
९.	श्री. दिनेश भुमय्या यन्नम	सदस्य
१०.	सौ. मिनाक्षी दत्तात्रय मेडपल्ली	सदस्य
११.	श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी	सदस्य
१२.	प्रा. डॉ. सौ. अॅनी जॉन	सदस्य
१३.	प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे	सचिव

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या
पद्मप्रतिमा वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा ।

Agents Code No. - 04672944

संतोषकुमार एस. येमुल

सदस्य अभिकर्ताओं के लिए अध्यक्ष कल्ब

Santoshkumar S. Yemul

Member Chairman's Club for Agents

Mob. : 9325262123, 9822132865

मित्र कोणाला म्हणावे....

ज्याच्या जवळ मनातील भाव व्यक्त करताना
लज्जा संकोच वाटत नाही...
खोटे बोलावेसे वाटत नाही...
फसवावेसे वाटत नाही...
पापपुण्याची कबुली देण्यास कचरत नाही...
ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावासा वाटतो...
ज्याच्या जवळ पराभवाने शल्य उघडे करायाला
कमीपणा वाटत नाही...
ज्याच्या सुखदुःखाशी आपण एकरूप होऊ शकतो,
तो खरा मित्र....

- पु. ल. देशपांडे

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग			
०१.	हुंडा : एक सामाजिक समस्या	कु. विमल पवार	बी. ए. भाग-१	०७
०२.	महिलांची सुरक्षितता	कु. वैशाली कोले	बी. ए. भाग-२	०८
०३.	बाप...	कु. उमा खारे	बी. ए. भाग-१	०९
०४.	प्रियंका रेड्डी हत्याकांड घटना	कु. लक्ष्मी रापर्ती	बी. कॉम. भाग-२	११
०५.	स्त्री शक्तीला सलाम	कु. पुजा कोंडी	बी. ए. भाग-३	१२
०६.	सोलापूर जिल्ह्याचे पर्यटन क्षेत्रातील महत्व	कु. पुजा कोंडी	बी. ए. भाग-३	१४
०७.	पंडिता रमाबाई	कु. शारदा कसबे	बी. ए. भाग-३	१६
०८.	महात्मा गांधीजींचे विचार कालबाह्य झाले आहेत का ?	कु. प्रतिभा भोसले	बी. ए. भाग-२	१९
०९.	भगतसिंग यांचे विचार आणि कार्य...	कु. वरलक्ष्मी द्यावरकोंडा	बी. ए. भाग -१	२१
१०.	महात्मा जोतीराव फुले यांचे शेतकऱ्यांविषयी विचार...	कु. ऐश्वर्या शावणे	बी. ए. भाग -३	२२
११.	पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर	कु. तेजस्विनी पाटील	बी. कॉम. भाग-२	२५
१२.	लेक	कु. सविता गोटीमुकुल	बी. कॉम. भाग-१	२७
१३.	भारतीय नागरिकत्व	कु. प्रियंका देवळे	बी. ए. भाग-२	२८
१४.	चीन मधील कोरोना व्हायरस	कु. लक्ष्मी रापर्ती	बी. कॉम. भाग-२	३०
१५.	या वेटावर महिलांची बंदी पुरुषांसाठी कडक नियम...	कु. सुष्मिता नरोळे	बी. कॉम. भाग -२	३१
१६.	सात हजार वर्षांपूर्वी चीजचा वापर	कु. प्रियंका मिट्टा	बी. कॉम. भाग -३	३२
१७.	विचार बदला जीवनाची दिशाही बदलेल	कु. प्रियंका कलशेट्टी	बी. कॉम. भाग -२	३२
१८.	आई वडिलांना विसरु नका...	कु. प्रियंका कलशेट्टी	बी. कॉम. भाग -२	३३
१९.	प्रयत्न	कु. लक्ष्मी रच्चा	बी. कॉम. भाग -३	३३

पद्य विभाग

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
०१.	बहिणीसाठी	कु. तेजश्री नक्का	बी. ए. भाग-३	३४
०२.	मैत्रिण	कु. अंकिता हिरवे	बी. कॉम. भाग-१	३४
०३.	एक कागदाच पान...	कु. अश्विनी गाडगी	बी. कॉम. भाग-१	३५
०४.	शाळेतील शिक्षा	कु. ममता नामल	बी. कॉम. भाग-१	३५
०५.	कसं असतं ना 'आयुष्य'	कु. तेजश्री नक्का	बी. ए. भाग-३	३६
०६.	कॉलेज	कु. लावण्या इरकुल	बी. कॉम. भाग-३	३६
०७.	प्रेम	कु. वैशाली कोले	बी. ए. भाग-२	३६
०८	एखादाच असतो	कु. पायल नान्नूल	बी. कॉम. भाग-२	३७
०९.	मैत्री	कु. रोहिणी पानगंटी	बी. कॉम. भाग-३	३७
१०.	राजे	कु. प्रियंका चारगुंडी	बी. कॉम. भाग-२	३७
११.	नानं वडिलांचं...!	कु. प्रियंका चारगुंडी	बी. कॉम. भाग-२	३८
१२.	खरी मैत्री	कु. पायल नान्नूल	बी. कॉम. भाग-२	३८
१३.	प्रेम कथा	कु. स्वाती महेता	बी. कॉम. भाग-२	३८
१४.	मैत्री	कु. रोहिणी पानगंटी	बी. कॉम. भाग-१	३९
१५.	मैत्री कशी असावी ?	कु. रोहिणी पानगंटी	बी. कॉम. भाग-१	३९
१६.	फरक	कु. लक्ष्मी रापर्ती	बी. ए. भाग-२	३९

हुंडा : एक सामाजिक समस्या

कु. विमल यवार
बी. ए. भाग - १

हुंडा ही आजच्या समाजाला ग्रासणारी एक जीवघेणी समस्या आहे. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत, पुरातन काळापासून आजपर्यंत हुंड्याची ही अमानुष अघोरी रुढी चालू आहे. रामायण, महाभारतासारख्या महानग्रंथातूनही हुंड्याचा उल्लेख केला आहे. हुंडा ही एक प्राचीन परंपरा आहे. हुंडा घेणे जेवढे वाईट तेवढेच हुंडा देणे चुक आहे.

प्राचीनकाळी विवाह म्हणजे 'कन्यादान' असे मानले जाते असे. त्यामुळेच मुलगी सासरी जाताना तिच्याबरोबर धन, धान्य, गाई इत्यादी गोष्टी दिल्या जात. त्यामुळे सर्वजण खुष होते. आईवडीलांची संपत्ती वारसा हक्काने मुलाकडे जात असत त्या संपत्तीत मुलीचा हक्क नसे. हा विषय दूर करण्यासाठी मुलीच्या लग्नाच्या वेळी हुंडा दिला जाई. हा विषय आई वडिलांच्या संपत्तीतील मुलीचा वाटा असे.

मुलाच्या लग्नाच्या वेळेस मुलीकडून संपत्ती मिळवली जाते. ही गोष्टी चुकीची आहे. माणसातील माणूस हरवला आहे. तो एक हिंस्र प्राणी झाला आहे. तो 'भयंकर' स्वार्थी झाला आहे. लग्नाच्या वेळी वाटेल त्या गोष्टींची मागणी केली जात. मुलीचा पिता स्वत:ची जमीन जुमला विकून कर्जबाजारी होऊन वराच्या मागण्या पूर्ण करतात परंतु ही मागणी भरपूर प्रमाणात वाढली आहे.

हुंडा घेऊनही लग्नानंतर मुलीचा छळ सुरु होतो तिला आत्महत्येला प्रवृत्त करतात. कधी कधी तिची हत्या केली जाते. नंतर त्या मुलीला सोडून दुसरे विवाह दुसऱ्या मुलीकडून संपत्ती मिळवणे. अशी प्रथा आहे. हे महाभयानक सत्य आहे. म्हणूच हुंडा ही एक भयंकर समस्या आहे. हुंडा घेणे म्हणजे स्वत:ला विकणे स्वत:ची किंमत करुन घेणे.

आजकाल मुलींनी आपली पात्रता भक्कम केली आहे. अलीकडे अनेक घरात असे दिसून येते की, लग्न करुन येणारी मुलगी घराला वाढवते, घराच्या उत्पन्नात भर घालते. अडीअडचणीत समर्थपणे ती घराला सावरते. मग स्त्रीला भार का समजावे ? तिच्या कडूनच हुंड्याची अपेक्षा का ?

कुटंबात स्त्री-पुरुष समान असतात. पत्नीला अर्धांगिनी म्हटले जाते. पण प्रत्यक्षात मात्र पुरुषाला श्रेष्ठ समजतात व स्त्री कनिष्ठ समजतात. हे समाजाच्या वातावरणात स्पष्टपणे दिसते. हुंडा ही एक अनिष्ठ प्रथा मानली जाते. हुंडा हे एक वास्तावाचे रुप आहे. हुंडामुळे मुला-मुलींचे लग्न ठरल्या ठिकाणी उध्वस्त होतात. त्यामुळे मुलीचा जन्म ही एक आपत्ती मानली जाते. तिला या जगात प्रवेश म्हणजे एक पाप समजली जाते.

स्वत:च्या कन्येचा घात केला जातो. म्हणून प्रत्येक सुज्ञ माणसाने या हुंड्याला हद्दपार केला पाहिजे अनेकदा हुंड्यासाठी स्त्रीला जाळण्यात येते. क्वचित तिच्यावर बलात्कारही केला जातो. स्त्रीवरील अन्याय संपणार नाही.

झोपडीत राहणाऱ्या गरीब स्त्रीया आज शहरांतून मोलमजुरीची कामे करुन दो-तीन हजार रुपये कमावतात त्यावर त्या आपल्या मुलाबाळांची कुटंबाची गुजराण करतात. प्रसंगी पोटाला चिमटा घेवून मुलांना चांगल्या शाळेत घालतात. त्यामागे त्या माऊलींचा एकच हेतू असतो की, त्या मुलांचे भवितव्य उज्वल व्हावे. पण अशा या कष्टकरी महिलांचे दारुडे पती, कामधंदा न करता या स्त्रियांना मारहाण करुन दारुसाठी पैसे उकळतात.

हुंड्याला विरोध करणारा कायदा सरकारने केला आहे. पण या कायद्याला कोणी विरोध करत नाही. आजही प्रचंड पिळवणूक चालू आहे. या घातक समस्येविरुध्द काही सामाजिक स्त्री संस्था आजही काम करत आहेत. पण ते प्रयत्न पुरेसे नाहीत. त्यासाठी मोठी क्रांती व्हायला हवी. समाजातील सर्व घटक त्यासाठी एकत्र यायला हवेत. सर्वजण मिळून चर्चा करायाला हवी. समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोहचयला हवे.

हुंड्याच्या प्रथेचा नाश करण्यासाठी समाजात स्त्री-पुरुष समानतेची दृष्टी निर्माण केली पाहिजे. केवळ हुंडा या एका बाबीचाच विचार करता येणार नाही. समाजाच्या विचारधारेच्या मुळाशी आपल्याला जावे लागेल. स्त्री ही पुरुषासारखेच माणूस आहे. तिला पुरुषासारख्याच सुख-दु:खाच्या भावना असतात. इच्छा आकांक्षा असतात. स्वत:चे आयुष्य घडवण्याचा पुरुषांइतकाच तिला अधिकार आहे. ही दृष्टी समाजात रुजवली पाहिजे. किंबहुना समाजातील सर्व पातळीवरील विषमता नष्ट होईल.

-: सामाजिक लेख :-

महिलांची सुरक्षितता

कु. वैशाली कोले
बी. ए. भाग - २

महिलांची सुरक्षितता हा आमच्या काळात एक गंभीर समस्या बनून आपल्या देशापुढे उभी आहे. जो देश २०२० साली महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहे. त्याच देशात आज महिलांना घराबाहेर जाणेही कठीण होऊन बसले आहे. आजच्या काळात स्त्रींवरील अत्याचार वाढत आहे. देशाची राजधानी असलेल्या दिल्ली येथे एका २३ वर्षीय तरुणीवर सामुहिकरित्या बलात्कार झाला आणि या अन्यायाशी संपूर्ण १३ दिवस लढा देवून तिने अखेर मृत्युला कवटाळले या घटनेत फक्त दिल्ली नव्हे तर संपूर्ण देश पेटून उठला आज भारतात महिला मुक्तपणे वावरु शकत नाहीत. महिलांवर वाढलेले अत्याचार हे खूप वाढत जात आहेत. त्यानतर काही वर्षातच निर्भया ही शाळकरी मुलगी तिच्यावर दुष्कर्म करुन तिची हत्या करण्यात आली या घटनेला आता ७ वर्षे उलटून गेले. पण आजही ते आरोपी अस्तित्वात आहेत. त्यांना फाशीची शिक्षाही सुनविण्यात आली.

परवा नुकतेच हैद्राबाद येथे डॉक्टर असलेल्या एका २६ वर्षीय तरुणी प्रियंका रेड्डी हिच्यावर दुष्कर्म करुन तिला जाळून टाकण्यात आले. देशभरात महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणात वाढ होत असताना हैद्राबाद येथे ही अत्यंत वाईट अशी घटना घडली. ही घटना घडल्यावरही हैद्राबाद बरोबर संपूण देशात संतापाची वातावरण होते. प्रत्येक ठिकाणी प्रियंका रेड्डी विषयाची चर्चा सुरु होती. बलात्कार सारखा गुन्हा करण्याऱ्यास आपल्या देशात ७ वर्षाचा तुरुंगवास आहे. स्त्री सुरक्षितेचा कायदा कडक केला जावा.

या घटनेनंतर मुलींना बाहेर वावारणे भितीदायक ठरले आहे. कायद्याबरोबरच समाजाची मानसिकता बदलायला हवी कितीही कडक कायदे केले तरीही येथे प्रश्न निर्माण होतो तो स्त्रीयांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा. ज्या देशात स्त्री आईच्या गर्भात सुरक्षित नाही. त्या देशात स्त्री ही समाजात कशी सुरक्षित राहील. आपल्या समाज आजही स्त्रीस मान-सन्मान व बरोबरीची वागणूक देवू इच्छितो. अनेक पालक माझी मुलगी म्हणजे काचेचे भांडे घरची इज्जत तिनं रात्री बाहेर जावू नये. रात्रीच नव्हे तर दिवसाही एकटीने कुठेच जावु नये. असे नेहमीच मुलीला ते वागवतात. त्यावेळी त्यांना हे लक्षात येत नाही की आपण आपल्या मुलीचा आत्मविश्वास कमी करत आहोत. आपल्या मुलीच्या मनात जी भिती राहते ते काढली पाहिजे.

आजही आपल्या देशात स्त्री-पुरुष हा भेदभाव केला जातो. आपण स्वत: मुलीच असल्याचे पटवून देतो. काही मुली एखाद्याने छेडले की आपण लाचार असल्यासारखे तसेच काही न बोलता पुढे निघुन जातात. घरच्यांना कळले तर कॉलेज सोडावे लागेल. समाजात आपल्याबाबत गैरसमज निर्माण होईल. या विचाराने मुली शांत राहतात. समाजाला काय वाटेल याचा विचार कधीच करायचा नाही. त्यावेळी जे योग्य आहे ते करुन मोकळे होणे हे जास्त महत्वाचे आहे. स्त्री ही उपभोगाची शोभेची वस्तु आहे. ती 'चुल' आणि 'मुल' या चौकटीतच बांधील आहे. ती या गोष्टी शिवाय बोली नये. असे अनेक विचारात समाजात रुजलेले आहे. या सर्वप्रकारातून बाहेर येण्यासाठी किती कायदे, आंदोलन केले तर ते कमीच पडतील. बलात्कारासारखा गुन्हा करणाऱ्याला फाशीची शिक्षा दिली तरीही स्त्री सुरक्षित राहतील याची काय ग्यांरटी ? या सर्वांसाठी एकच उपाय ते म्हणजे समाजातील मुलगा-मुलगी भेद नाहीसा करणे. स्त्रीयांविषयी असलेले वाईट विचार मनातून काढून टाकणे जेव्हां-जेव्हां पृथ्वीवर पाप वाढत गेले. तेव्हां-तेव्हां स्त्रीने काली, दुर्गा यांचा अवतार घेतला आणि पापांचा सर्वनाश केला. त्याच काली आणि दुर्गाची आपण पुजा करत असतो. आजच्या काळातही स्त्री पापाचा सर्वनाश करुन शकते. नारी मध्ये तेवढी शक्ती आहे. पण ते करायची ताकद तिने केली पाहिजे.

एक गोष्ट सांगायची गेली तर '' अन्याय करण्याऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा हा खुप मोठा गुन्हेगार असतो.'' त्यामुळे अन्याय सहन करायचा नाही. प्रत्येक मुलीने लढायला शिकले पाहिजे.

-: सामाजिक लेख :-

बाप....

कु. उमा खारे
बी. ए. भाग - १

बा बा, पप्पा, डॅडी बोलायला ऐकायला किती छान वाटतंय ना । पण आपण कधी कधी मुद्दामहून जाणून बुजुन त्यांना बाप नावाने संबोधतो आज अशाच एका बापाची कहाणी आई घराचे मांगल्ये असते. तर वडील घराचे अस्तित्व असतात. पण आपण या अस्तित्वाला आपण कधी समजून घेतले आहे. त्यांच्या विषयी अजून तरी फारसे चांगले बोलले जात आहे.... नाही.....

लोकांनी वडील रेखाटलेले आहेत ते ही तापट, व्यसनी, चिडखोर, भांडखोर, मारझोड करणारे, नाही असे वडील असतील ही एक ते दोन टक्के पण बाकीच्या चांगल्या वडीलांबद्दल काय ?

आईकडे अश्रुंचे पाड असतात ती रडून मोकळी होते. पण सांत्वन वडिलांनाच करावे लागते आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करण्यावरच जास्त ताण पडत असतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापत असते. आणि श्रेय मात्र ज्योती घेऊन जाते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते. पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आपण किती सहज विसरुन जातो. आई सर्वांसमोर मोकळेपणाने रडून दु:ख व्यक्त करते. रात्री उशीत तोंड खुपसुन मुस्मुसतात ते आपले वडीलच असतात. स्वत:चे वडील जरी वारले तरी त्यांना रडता येत नाही. कारण लहान भावंडाना धीर देणे कुंटुबाला आधार देणारे पण तेच असतात. पत्नीने अर्धावासात सोडले तरी स्वत:ला आवर घालत मुलांच्या अश्रुंना आवर घालणारे वडीलच असतात.

'' जिजाऊ नि शिवबांना घडवले असे म्हणता येईल पण त्याच वेळी शहाजीराजांची ओढाताण लक्षात घ्यावी.''

'' देवकी यशोदाचे कौतुक अवश्य करावे पण त्यावेळी भर पुरात डोक्यावरुन पुत्राला घेऊन जाणारा वासुदेव आठवावा. ''

'' राम हा कौशल्याचा पुत्र अवश्य आहे. पण पुत्र वियोगाने तडफून मरणारा बाप राजा दशरथच होता.''

वडीलांची टाच झिझलेली चप्पल आणि फाटलेले बनियान पहिले की कळेल की नशिबाचे भोक त्यांच्या बनियनला पडले आहेत. त्यांच्या दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो. मुलांना कपडे घेतील, बायकोला साडी घेतील पण स्वत: मात्र जुनेच कपडे वापरतील. मुलगा सलूनमध्ये ५० एक रुपये खर्च करतो. मुलगी पार्लरमध्ये शंभर रुपये खर्चेल पण त्याच घरातील बाप मात्र दाढीचा साबण संपला तर अंघोळीच्या साबणाने दाढी करतील, कधी कधी तो ही नसेल तर पाणी लावून दाढी खरवडतील बाबा कधी आजारी पडले तर कधी डॉक्टरांकडे जात नाहीत. मुळात ते आजरपणाला घाबरतच नसतात. त्यांना काळजी असते. ती डॉक्टरांनी महिनाभरासाठी आराम करायला लावण्याचे कारण मुलीचे लग्न, मुलांचे शिक्षण घरातील सर्व खर्च याची काळजी असते.

ऐपत नसली तरी सर्व खर्चात काटकसर करुन मुलाला मेडिकल, इंजिनिअरींग या सारख्या महागड्या शिक्षणाचा खर्च सोसतात. महिन्याच्या पगारी झाल्या की सर्व खर्चात बचत करुन काटकसर करुन पहिले मुलाला त्याच्या शिक्षणासाठी पैसे पाठवतात. खरे तर शिक्षण कमी आणि मौज मजाच जास्त करतात. मित्रांना पार्ट्या देणे, सिनेमा पाहणे या सगळ्यात आपल्याला पैसे पाठवणाऱ्या वडिलांची टिंगल टव्वाळी करत असतात. हीच मुले एकमेकांना वडिलांच्या नावाने हाक मारणे, त्यांच्या स्वभावाची टर उडवणे असले प्रकार करत असतात.

ज्या घरात वडील आहेत त्या घराकडे कोणाची वाकडी नजर करुन पाहण्याची हिम्मत होत नाही. कारण घरातला कर्ता जिवंत असला तो जरी काही करत नसला तरी तो त्या पदावर असतो. आई

असण्याला अथवा आई होण्याला वडीलांमुळेच अर्थ प्राप्त होतो.

कोणत्याही परिक्षेचा निकाल लागला की जवळी वाटते ती आहे आई. कारण ती जवळ घेते, कौतुक करते, प्रेम करते, गोंजारते पण गुपचुप जाऊन पेढे आणणारा, अभिमानाने सर्वांना सांगणारा बाप कोणालाच दिसत नाही. चटका बसला, ठेच लागली, फटका बसला तर तोंडातून आपसुकच आई हाच शब्द बाहेर पडतो. पण एकादा मोठा रस्ता ओलांडताना अचानक जर एखाद्या ट्रकने जोरात ब्रेक मारून मोठे संकट टाळले तर त्यावेळी आपण बाप... रे... । असेच म्हणतो, छोटी-छोटी संकटे आई सोसती हो पण मोठी मोठीवादळे पेलताना बापच आठवतो... काय पटतयं का?

एखाद्या मंगल प्रसंगी अखंड कुंटुब सहभागी होत असते. पण जर एखादा मयत झाला तर बापालाच जावे लागते. मुलांच्या नोकरीसाठी जर एखाद्या साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळासाठी उंबरे झिजवणारा बाप घरच्यासाठी स्वत:च्या व्यथा दडपणारा बाप, खरचं किती ग्रेट असतो बाप...

वडिलांचे खरे महत्व त्यांनाच जे कळते ज्यांनी वडीलापासून दूर जातात. लहानपणीच सर्व घरच्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. एकेक गोष्टीसाठी त्यांना तरसावे लागते हेच वडिलांचे महत्व समजतात.

वडीलांना समजून घेणारी एकमेव व्यक्ती असते. ती म्हणजे त्यांची मुलगी, सासरी गेल्यावरही अथवा घरापासून दूर असताना ही फक्त फोनवर बोलताना वडिलांचा आवज जरी बदलेला तरी त्यावरुन सतरा प्रश्न विचारेल. त्यांची विचारपूस करेल.

वडीलांना खऱ्या अर्थाने ओळखते ती त्यांची मुलगीच असते. आणि वडीलांना जपणारी त्यांची काळजी करणारी ही मुलगीच असते. आणि एवढीच अपेक्षा एक वडील सर्वांपासून करत असतात.

• विनोद •

गुरुजी - तुझी हजेरी कमी आहे , तु परीक्षेला बसु शकत नाही .
गण्या - फिकीर नॉट गुरुजी . आपल्याला जराबी घमेंड नाय. आपुन उब्यानेच पेपर लिवु बगा .
गुरुजी - (काहीच न बोलता शाळा सोडती)

बाबा - काय रे तुझ्या वर्गात सगळेजण पास झाले का ?
चंदु - हो आम्ही सगळे पास झालो पण आमच्या मॅडम मात्र नापास झाल्या .
बाबा - (आश्चर्याने) मॅडम कशा नापस होतील रे गाढवा ?
चंदु - हो बाबा,त्या आजुन त्याच वर्गाला शिकवतात .

गुरुजी - बंडु खर खर सांग नाही तर शर्ट काडुन मारेन
बंडु - पण सगळी चुक माझी अहे , मग तुम्ही का शर्ट काढताय ?

कु. भारती धारा
बी. ए. भाग -३

• विनोद •

प्रेमी : तुझ्या पप्पांशी मी केव्हा लग्नाविषयी बोलू ?
प्रेमिका : ज्या वेळेस त्यांच्या पायात चप्पल नसतील तेव्हां...

एक प्रेमीने तीन इंग्रजी शब्द पाठ केलेले असतात

Yes, No, Thank you एक दिवस तो आपल्या प्रेयसी बरोबर ...

प्रेमीका - तु माझ्यावर खरोखरच प्रेम करतोस?
प्रेमी - Yes
प्रेमीका - तु माझ्याबरोबर लग्न करशील ?
प्रेमी - No
(रागात येउन) - मग मी आता घरी जाते.
प्रेमी - Thank you

कु. दिपाली जमादार
बी. कॉम. भाग - १

-: सामाजिक लेख :-

प्रियंका रेड्डी हत्याकांड घटना

कु. लक्ष्मी शर्मा
बी. कॉम. भाग - २

स्त्री ही एक देवी असते. त्यामुळे भारतासारख्या देशात स्त्रियांना देवीपेक्षा कमी मानले जात नाही. म्हणूनच स्त्रियांचा आदर केला पाहिजे आणि स्त्रियांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्यच आहे. तसेच मुलींवर अत्याचार व्हायचे ते मात्र बदलले नाही. आणखी एक मानवतेचा विवेक हादरावून टाकणारी घटना घडली आहे. पुन्हा एका महिलेवर अत्याचार झालेला आहे. बलात्कार आणि हत्येची आणखी एक धक्कादायक घटना घटली आहे. ती म्हणजे तेलंगाणा येथील तरुण भारतीय पशुवैद्यकीय डॉक्टर प्रियंका रेड्डीवरील भयानक लैंगिक अत्याचार आणि तिला जाळणे ज्याने देशाला हादरावून टाकले आहे. ही घटना २७ नोव्हेंबर २०१९ रोजी बुधवारी हैद्राबाद मध्ये घडली, कारण असे दिसत आहे की भारतात मुली आणि स्त्रीयांसाठी सुरक्षित ठिकाण नाही. मुलींवर होणारा अत्याचार, बलात्कार आणि हत्येची प्रकरणे वर्षानुवर्षे वाढत आहेत. यामागील कारण असे आहे की भारत सरकार आरोपीविरोधात कठोर कारवाई करीत नाही आणि त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे.

हैद्राबाद शमशाबाद येथील पशुवैद्यकीय डॉक्टर २७ वर्षीय डॉ. प्रियंका रेड्डी मुळची तेलंगाणा येथील हैद्राबादची रहिवासी होती. २७ नोव्हेंबर २०१९ रोजी, हैद्राबादमधील शादनगर जवळील कल्लुरु गावच्या रुग्णालयात आपले कर्तव्य पूर्ण करुन ती घरी परतली होती. जिथे ती गेल्या एक वर्षापासून कार्यरत होती. जाताना तिच्यावर चार माणसांनी निर्घृण बलात्कार करुनच तिचा खून केला मला वाटते भारतातील मुली आणि स्त्रिया सुरक्षित राहण्यासाठी मुलींवर जे अत्याचार करतात. त्या आरोपीविरुध्द कठोर कारवाई केली पाहिजे की जेणे करुन माहिलांवर अत्याचार करुण्याचे पुरुषांचे धाडस होणार नाही.

प्रियंका रेड्डी एक सुंदर, सुरेख, सुशिक्षित, होतकरु मुलगी होती. ती आपल्या आयुष्यातील २५ वर्षे खूप महेनत करुन डॉक्टर बनली होती व समाजातील विकृत पुरुष समाज अशा मुलीवर बलात्कार करुन तिला जिवंत जाळतात. हे चुकीचे आहे.

प्रियंका रेड्डी ने आपल्या आयुष्यात खूप महेनत करुन आपण डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. परंतु तिच्यावर जे अत्याचार झालेला आहे. ते माझ्या मते खूपच दु:खद घटना घडलेली आहे. ह्या घटनेविरुध्द त्यांच्या घरातल्यांवर दु:खाचे आभाळच कोसळले आहे. मला असे वाटते की मुलींवरील महिलांवरील अत्याचार बलात्कार रोखण्याची वेळ आलेली आहे. कारण आता नाही तर कधीच नाही.....

प्रियंका रेड्डीला पाहून मला एकच आठवते की उठ माणसा.... जागा हो.... माणुसकीचा धागा हो... अजून किती मेणबत्ती जाळणार... आता वेळ आली बलात्कारी जाळायची...

अशा प्रकारे प्रियंका रेड्डीला मी माझ्याकडून भावपूर्ण श्रध्दांजली देत आहे.... !

नवीन

'जन्म' हे गणित आहे.
'लग्न' हे बेरीज आहे.
'जीवन' हे वजाबाकी आहे.
'संसार' हा गुणाकार आहे.
'मुलं' हे भागाकार आहे. आणि
या सर्वांचं 'मृत्यू' हे उत्तर आहे.

कु. पायल नागुल
बी. कॉम. भाग - २

-: वैचारिक लेख :-

स्त्री शक्तीला सलाम

कु. पुजा कोंडी
बी. ए. भाग - ३

८ मार्च जागतिक 'महिला दिन' या दिनानिमित्त केवळ महिलांनाच नव्हे तर समस्त पुरुष जातीलाही शुभेच्छा. कारण स्त्रिमुळेच पुरुषांचं अस्तित्व असणार आहे. पिता, भाऊ, पती, काका, मामा, आजोबा आदी सगळी नाती पुरुषाला मिळतात ते स्त्रिमुळेच. विचार करा, स्त्रिच नसेल तर नुसता पुरुष काय करेल ? वंश सातत्याबरोबर जीवनामध्ये येणारे ताणतणाव, सुख दु:ख हे सगळं जिच्याबरोबर जोडून येतात, जिचा आधार घेऊन हा जीवन संघर्ष लढण्याची ताकद मिळते ती आई, बहीण, पत्नी, मैत्रिण या नात्यांमुळे म्हणून ही नाती सगळ्यात श्रेष्ठ. म्हणूनच स्त्रिचं श्रेष्ठत्व वादातीत आहे. अशा स्त्रिच्या पोटी जन्म घेणाऱ्या समस्त पुरुषजातीलाही म्हणूनच शुभेच्छा ।

२१ व्या शतकाची वाटचाल पाहताना आज अनेक महिलांनी आपल्याला वेगवेगळ्या क्षेत्रात सिध्द केल्याचं आढळून येईल. आपल्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, किरण बेदी, सानिया मिर्झा, लता मंगेशकर, सायना नेहवाल, शोभा डे, अरुंधती रॉय, सुनिता विल्यम अशा शेकडो महिलांची नाव घेता येतील. आपल्यातलं 'दि बेस्ट' देण्यासाठी पडेल ते कष्ट करुन कुटुंबासाठी, समाजासाठी त्यांनी काही चागलं करुन दाखवलेलं आहे. तर मुळातच स्त्री पुरुषापेक्षा कितीतरी पटीने कष्टाळू, सोशीक, समंजस, प्रामाणिक असते. या गुणांच्या आधारे खूप काही चांगलं घडवून आणण्याची जिद्द तिच्यात असते आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आपलं व्यक्तिमत्व जपताना इतर व्यक्तिमत्वचा मान राखणं हे स्त्रिला जास्त जमतं आता हेच पाहा ना... वीस पंचवीस वर्ष एका घरात मुलगी म्हणून व्यतित केल्यानंतर लग्नबंधनाच्या त्या एका क्षणात ती दुसऱ्या घरची सून, पत्नी, अस्तित्वात स्वत:ला विरघळून टाकून त्या घराच्या सुख समृध्दीसाठी सर्वार्थानं झटण्यासाठी ती तयार असते. मला स्त्रिच्या या गुणांविषयी खूप आदर वाटतो. लग्नाच्या त्या एका क्षणात स्वत:ला समर्पित करणं खूप अवघड आहे. पुरुषांना तर ते अशक्य आहे असं मला स्वत:ला वाटतं.

स्त्रिला निसर्गानं कमालीचे गुण देऊन पाठवलेय बघा ना... पाककला, घरचं संगोपन, आर्थिक बचत, अनेक कौशल्य यासाठी खास प्रशिक्षण न घेता ती त्यात गुणवान होते. हे सगळे उपजत गुण निसर्गाने तिला बहाल केले आहेत आणि याच उपजत गुणांच्या जोरावर जर राजकारणात स्त्रिचं अस्तित्व निर्माण होईल. मिळालेल्या पैशात टुकीनं काटकसरीनं संसार करुन भविष्यासाठी चार पैसे राखून ठेवण्याची उपजत कला स्त्रियांकडे असते. घरकाम, मुलांचा अभ्यास, पै-पाहुण्याची उठबस, कुंटुंबातील सण-समारंभ, लग्न कार्यक्रम या सगळ्याचं उत्तम नियोजन स्त्रिया सहजतेने करतात आणि या स्त्रिया जेव्हां आपलं गांव, आपलं शहर, राज्य वा देशपातळीवर कारभार करण्यासाठी येतील तेव्हा मला वाटतं या त्यांच्या गुणांचा सदुपयोग होईल आणि निश्चितच लोकांसाठी हा कारभार फलदायी होईल. स्त्रिया मुळात पापभीरु असतात. मवाळ असतात. त्यांची वृत्ती तडजोडीची असते. मात्र वेळ पडल्यास त्या रणरागिणीही बनतात हे इतिहास वाचुन किंवा स्त्रियांची आत्मचरित्र वाचली की लक्षात येते. केंव्हा मवाळ आणि केंव्हा कठोर व्हायचं हे त्यांच्या इतकं पुरुषाला कळत नाही. त्यामुळे बऱ्याचदा स्त्रियांकडून निर्णय अचूक घेतले जातात.

अनेक स्त्रिया नोकरी करता करता छोटासा घरगुती उद्योगही करतात. पैसा-पैसा जमवुन मुलाबाळांचे शिक्षण, लग्न, स्वत:च घरदार, सोनं -नाणं या सगळ्या गोष्टी वेळच्यावेळी साध्य करतात. कोंड्याचा मांडा करुन संसार नेटानं चालवण्याच्या स्त्रिच्या वृत्तीला पुरुषांनी सलामच केला पाहिजे. म्हणून बरोबर घेऊन हा संसार सागर पार करताना दिसतात. घर-कुटुंब नोकरी हे सगळे ताण-तणाव सहज करणारी स्त्री आणि त्याच स्त्रिचा जन्म नाकारणारा हा समाज ही वृत्ती लक्षातच येत नाही. गर्भातच स्त्रिभ्रुण हत्या करणारे महाभाग याच समाजातले आहेत. याची लाज वाटते. प्रत्येक घराला सून हवी पण घरात मुलगी नको हा कुठला न्याय ? कसली इच्छा ? जगात सगळ्यात मोठं नातं आईचं असे म्हटले जाते. या संदर्भात एक संस्कृत सुभाषित आहे.

'' शंभर उपाध्यापेक्षा एक आचार्य श्रेष्ठ,
एक हजार आचार्यपेक्षा पिता श्रेष्ठ आणि
दहा हजार पित्यांपेक्षा माता श्रेष्ठ ''

अशी माता स्त्रिच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे आणि जगात आपल्याला सगळ्यात जास्त आईच ओळखते कारण आई ही एकच व्यक्ती अशी आहे. जी तुम्हाला इतरापेक्षा नऊ महिने जास्त ओळखत असते म्हणून स्त्रिचा जन्म हा अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी आहे. हे आपण लक्षात ठेवलंच पाहिजे आणि यासाठी स्त्री-पुरुष या दोघांनी हातात हात घालून एकमेकांना सहकार्य केलं पाहिजे. आता महिलांना स्थानिक राजकाराणात पन्नास टक्के आरक्षण दिलं जात आहे. कर्तृत्ववान महिलांसाठी तर ही सुवर्णसंधी आहे. पाण्याचा, महागाईचा प्रश्न घरात येणाऱ्या अडचणी, मुलांच शिक्षण या सगळ्यांना स्त्रिला जास्त तोंड द्यावं लागतं आणि त्यामुळेच पंचायत समिती, जिल्हा परिषद वा महापालिकेत हे प्रश्न या समस्या कशा सोडवायला हव्यात याचं उपजत ज्ञान त्याच्याकडे आहे. म्हणूनच स्त्रियांकडून शहराचा, गावाचा कारभार जास्त दक्षतेनं आणि समक्षपणे चालवला जाईल याची खात्री आहे.

तो समाज प्रगल्भ जो स्त्रियांना मान-सन्मान व आदराने वागवतो. तोच समाज पुढारलेला आणि जिथं स्त्रियांच्या विचारांना स्थान आहे. तोच समाज सुखी आनंदी असतो. जिथं स्त्री समाधानी आहे. आपल्या समाजाच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी या स्त्रिशक्तीला आपणचं सगळेच सलाम करु आणि तिच्या कर्तृत्वाला वाव देऊ... नाही.... का....!

स्त्री शक्तीला सलाम... !

विसरायचं नसतं...

उंच शिखरावर पोहोचल्यावर
पायथ्याला विसरायचं नसतं
तारुण्यात आल्यावर कधी
बालपणाला विसरायचं नसतं
प्रेयसीत गुरफटत असताना
मात्या पित्यींना विसरायचं नसतं
पक्वान्नाचा आनंद घेताना....
चटणी भाकरीला विसरायच नसतं
आधुनिक सिनेमा पाहताना
श्यामच्या आईला विसरायच नसतं
उंच भगरी मारताना
चिमण्या बाळांना विसरायचं नसतं
सागरात डुबत असताना
नदीला विसरायच नसतं
स्वर्ग सुख भोगत असताना
दु.खाना विसरायच नसतं
आणि किती ज्ञानी झालास...
तरी गुरुला विसरायचं नसतं

कु. अंकिता हिबारे
बी. कॉम. भाग - १

• विनोद •

दोन मित्र एकाच परीक्षेत दुसऱ्यांदा नापास होतात .
पहिला - ाऊ दे यार चल आत्माहत्या करु
दुसरा - येडा झाला का रे तु ...?
पुढच्या जन्मी परत बालवाडी
प सून स्टार्ट करावं लागेल .

कु. अनुराधा कोंगारी
बी. कॉम. भाग - १

-: पर्यटन विषयक लेख :-

सोलापूर जिल्ह्याचे पर्यटन क्षेत्रातील महत्व

कु. पुजा कोंडी
बी. ए. भाग - ३

आजचा मानव या वेगवान जीवनात सुख शोधत आहे. या सुखी व आनंद क्षणासाठी मानवासमोर 'पर्यटन' हे चांगला पर्याय आहे. कारण निसर्गाच्या सहवासात आनंदाचे क्षण घालविण्याची आणि नवीन कला, संस्कृतीविषयी जाणून घेण्याची माणसांची मूलभूत प्रवृत्ती पर्यटनाचा मूळ आधार आहे. म्हणून धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला तेवढेच महत्व आहे. आज वेगवान दळणवळणाच्या साधनाने जग जवळ आले असताना देशाबरोबरच बाहेरचे जग जाणून घेण्याच्या माणसाच्या ओढीने हे क्षेत्र सातत्याने विस्तारीत आहे.

कोणत्याही देशाच्या राज्याच्या आणि शहराच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्वाची आहे. म्हणूनच भविष्याचा वेध घेत या भूमिकेला अधिक महत्व प्राप्त व्हावे यासाठी सर्वत्र पर्यटनाला विकासाचे साधन म्हणून मान्य केले आहे.

पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास व पर्यटनस्थळ परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनमानतही बदल घडून येतो. पर्यटकाला आवश्यक असणारी निवास, भोजन, वाहतूक, माहिती मनोरंजन आदी व्यवस्थेसोबतच त्या भागातील उत्पादनेदेखील मागणी निर्माण होते. सांस्कृतिक आदानप्रदानच्या माध्यमातून नागरिकांना एकमेकाशी जोडण्याचे कामदेखील पर्यटनाच्या माध्यामातून होत असते. त्यामुळे पर्यटन विकासात नागरिकांचा जेवढा सहभाग वाढेल तेवढेच त्या भागातील अर्थकारणाला देखील गती मिळते.

पर्यटनाबाबत विकासाच्या कल्पना मांडताना त्या भागातील खास खाद्य संस्कृती, पारंपारिक कला, साहित्य, लोकजीवन, निसर्ग पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा, पर्यटकांना नव्या जगाचे दर्शन होणे व रोजच्या जीवनापेक्षा नवा अनुभव मिळणे महत्वाचे असेल. इतर राष्ट्रांनी शहरांनी आपल्या परंपरेच्या खुणा याचसाठी खासकरुन जपल्या आहेत आणि त्याचेच मार्केटींग उत्तमरित्या केले जाते.

या सर्वच दृष्टीने आपल्या सोलापूर जिल्ह्यास महत्व प्राप्त होत आहे. सोलापूर जिल्ह्यास आपल्या विविध वैशिष्ट्यांमुळे धार्मिक ऐतिहासिक, शैक्षणिक, कृषी आणि औद्योगिक पर्यटनामध्ये आपले विशेष स्थान निर्माण केले आहे. यामुळे येथे विविध रोजगाराच्या सुविधा, दळणवळण, माहिती व तंत्रज्ञानाच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

कारण सोलापूर जिल्ह्यास प्राचीन इतिहासाची परंपरा लाभली आहे. सोलापूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख शहर असून ते पश्चिम महाराष्ट्र या विभागात हे शहर येते. सोलापूर हे महाराष्ट्रातील ५ वे मोठे शहर आहे. सोलापूर कापड गिरण्याचे शहर म्हटले जाते. सोलापूर या शहराला प्राचीन काळात 'सोन्नलगी' किंवा 'सोन्नलापूर' म्हणून ओळखले जाते असे हे शहर भारतातील मुख्य अशा उत्तर दक्षिण रेल्वे मार्गावर असल्याने त्यास महत्व प्राप्त झाले आहे.

इतिहासामध्ये सुध्दा सोलापूरने महत्वाचे योगदान दिले. कारण स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीचे सोलापूर शहराने सन १९३० मध्ये तीन दिवसाचे स्वातंत्र्य उपभोगले. स्वांतत्र्य संग्रामादरम्यान मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व किसन सारडा यांनीही आपले बलिदान दिले. सोलापूर शहरात साखर, विडी व चादरीचे विक्रमी उत्पादन घेतले जाते.

सोलापूर लोकजीवन, संस्कृती, प्रशासन, रंगभूमी, चित्रपट, धर्म–अध्यात्म भाषा, देवस्थान, विद्यापीठ, विज्ञान केंद्र, निसर्गस्थळे, राजकीय नेतृत्व, उद्योगधंदे, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, हॉटेल्स्, निवासाची सोय, बाजारपेठ, हस्तकला उद्योग, खाद्य संस्कृती, ऐतिहासिक स्थळे व वास्तु पर्यटनास प्रोत्साहित करीत आहेत. या सर्व घटकांच्याद्वारे निश्चित सर्वांना रोजगार उपलब्ध करुन मानवी जीवन समृध्द करु शकतील. यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील.

धार्मिक पर्यटन स्थळे – देवस्थान

१) श्री सिध्देश्वर मंदिर – सोलापूर शहर

२) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर – पंढरपूर तालुका

३) श्री भगवंत मंदिर – बार्शी तालुका
४) श्री स्वामी समर्थ मंदिर – अक्कलकोट तालुका
५) श्री कमलादेवी मंदिर – करमाळा
६) श्री नागनाथ मंदिर – वडवळ, ता. मोहोळ
७) श्री भैरवनाथ मंदिर – तांबोळे, ता. मोहोळ
८) श्री खंडोबा मंदिर – बाळे, सोलापूर
९) श्री मरिआई मंदिर – चिखली, मोहोळ
१०) श्री यमाई देवी मंदिर – माडी, सोलापूर
११) श्री मल्लीकार्जून मंदिर – माचनूर, सोलापूर
१२) श्री राम मंदिर – होळकर वाडा, पंढरपूर
१३) श्री संत दामाजी मंदिर – मंगळवेढा, उत्तर सोलापूर
१४) श्री रिहरेश्वर मंदिर – हत्तरसंग कुड, द. सोलापूर
१५) श्री अर्धनारी नटेश्वर मंदिर – वेळापूर, माळशिरस
१६) श्री कुलस्वामीनी तुळजाभवानी मंदिर – तुळजापूर तालुका

ऐतिहासिक वास्तु व स्थळे

१) भूईकोट किल्ला – सोलापूर जिल्हा
२) डॉ. द्वारकादास कोटणीस स्मारक – सोलापूर शहर
३) चार हुतात्मा पुतळा – सोलापूर शहर
४) सोलापूर महानगर पालिका – सोलापूर शहर
५) रिपन हॉल – सोलापूर शहर
६) नळदुर्ग किल्ला – तुळजापूर तालुका
७) शिवसृष्टी – अकलूज

शैक्षणिक स्थळे

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर
२) सोलापूर विज्ञान केंद्र, सोलापूर
३) अश्विनी वैद्यकिय महाविद्यालय, सोलापूर
४) शेठ सखाराम चिकित्सालय आयुर्वेद) सोलापूर
५) वृत्तपत्र छपाई केंद्र –सोलापूर

निसर्गरम्य स्थळे

१) उजनी परिसर – उजनी धरण
२) हिप्परगा तलाव – सोलापूर शहर
३) कंबर तलाव – सोलापूर शहर
४) माळढोक अभयारण्य – नान्नज
५) सिध्देश्वर मंदिर बगीचा – सोलापूर शहर

उद्योग

सोलापूर शहराची ओळख औद्योगिक कारणांसाठी ही असून या जिल्ह्यात सर्वात जास्त साखर कारखाने असून मोठ्या प्रमाणात साखर उत्पादन घेतले जाते. सोलापूर येथे बनविले जाणारे 'सोलापूर चादर' यास विदेशातही मोठी मागणी असलेली दिसते या चादरी सोबत इतरही हस्तकला आधारीत कापडी वस्तुंचे उत्पादन घेतले जाते.

सोलापूर येथे प्रिसिजन, बालाजी अमाईन्स, लोकमंगल सारखे मोठे उद्योग समूह येथे प्रगतीस मदत करीत आहेत.

खाद्य संस्कृती

१) कडक भाकरी, शेंगा चटणी
२) शेंगाची पोळी
३) हुग्गी

या प्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळाची माहिती घेता येईल यासोबतच सोलापूरातील विविध भाषा, चित्रपट गृहे, रेल्वे स्टेशन, शासकीय वाहतूक सेवा, अशासकीय वाहतूक सेवा, हॉटेल्स्, लॉज, बाजार पेठ, हस्तकला इ. ठिकाणे ही आर्थिक उलाढाली केंद्र बनले आहे.

सोलापूरातील या स्थळांची आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होत आहे. रोजगाराची संधी प्राप्त होऊन बेरोजगारी कमी होण्यास मदतीचे ठरत आहे. पर्यटकांच्या मागणीमुळे येथील सर्जनशीलता वाढण्यास सुरुवात झाली व उत्पादन क्षमता वाढली आहे. यामुळे येथील रहिवाश्यांचा सुध्दा वैयक्तिक विकास झालेला दिसून येतो.

यामुळे सोलापूर हा जिल्हा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, औद्योगिक देवाण–घेवाणाची केंद्र बनलेलेला आहे. हे पर्यटन वाढावे व आपल्या शहरात पर्यटकाची संख्या जास्त आणायची असेल तर येथील प्रशासनाने काही मूलभूत गरजा पुरविल्या पाहिजेत, विमान सेवा, स्वच्छाता, स्वच्छ पाणी व अन्न, शहरातील पर्यटनस्थळातील स्वच्छता, मनोरंजनाची सुविधा, सुरक्षित निवास व्यवस्था, बोटींग आकर्षक रोषणाई, संगीत नैसर्गिक समृध्दता, गाईडची उपलब्धता या गरजा पुरवल्या पाहिजेत.

तसेच येथील रहिवाश्यांमध्ये जनजागृती करुन येथील पर्यटनाचे फायदे त्यांच्यापर्यंत पोहचविले पाहिजेत यामुळे निश्चितच सोलापूर जिल्हा जागतिक स्तरावरील पर्यटन स्थळ म्हणून पुढे येईल. या सर्व वैशिष्ट्यांमुळे ही तिर्थक्षेत्रे, धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक व पर्या'रण पर्यटनाची केंद्र बनलेली दिसतात. एवढेच नव्हे तर या सोलापूर जिल्ह्यामुळे धार्मिक, वैचारिक, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, शैक्षणिक आणि आर्थिक अभिसरण घडून येत असल्याचे दिसून येते. या वैशिष्ट्यामुळे येथे धार्मिक व सामाजिक समन्वय साधलेली दिसून येतो. या सर्व स्थळांना समाजातील सर्व स्तरावरील, जातीतील व धर्मातील स्त्री–पुरुष समानतेने सहभागी होताना दिसून येतात.

-: व्यक्तिचित्र लेख :-

पंडिता रमाबाई

कु. शारदा कसबे
बी. ए. भाग - ३

पंडिता रमाबाई यांचे नाव त्यांनी प्रामुख्याने विधवा आणि परित्यक्त्या स्त्रियांच्या उध्दारणासाठी केलेल्या कार्याबद्दल घेतले जाते. हिंदुस्थानातील विधवा स्त्रियांना जीवनात सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टा नष्ट व्हाव्यात आणि त्यांनी स्वावलंबी जीवन जगावे यासाठी प्रामुख्याने पंडिता रमाबाई यांनी प्रयत्न केले.

अल्प परिचय : पंडिता रमाबाई यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई उर्फ अंबाबाई आणि वडिलांचे नाव अनंत शास्त्री डोंगरे होते. म्हैसूर संस्थानातील मंगलोर जवळील माळे हेरंजी जवळील गंगामुळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी झाला वास्तविक पाहता हे चित्पावन कुटुंब मुळेच कोकणातील होते. पोर्तुगीजांच्या जाचाला कंटाळून सुमारे दोनशे ते तीनशे कुटुंबे कोकण सोडून कर्नाटकातील एका डोंगराच्या कुशीत जाऊन राहिली. त्यापैकीच अनंत शास्त्री डोंगरे हे एक होते असे सांगतात की, अनंतशास्त्री डोंगरे हे आपले गुरु वेद शास्त्र संपन्न रामचंद्र शास्त्री साठे यांच्याबरोबर दुसऱ्या बाजीरावाच्या राजप्रासादात गेले होते. दुसऱ्या बीजरावची पत्नी वाराणसीबाई यांना रामचंद्र शास्त्री साठे रघुवंश हे काव्य शिकवत होते. त्यावेळी वाराणासीबाईची शुध्द वाणी ऐकून आपण ही आपल्या पत्नीला संस्कृत शिकविले पाहिजे हे त्यांनी आपल्या मनाशी तेथे ठरविले आणि लग्न झाल्यानंतर त्यांनी आपली पत्नी व रमाबाई या दोघींनाही वेदाचे शिक्षण दिले. स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही. या विचाराचे अनंतशास्त्री डोंगरे होते. त्यामुळे लहानपणापासून त्यांनी रमाबाईच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. या शिक्षणामुळे रमाबाईचे वय नऊ वर्षांचे झाले तरी अनंतशास्त्री डोंगरे यांनी तिचा विवाह केला नाही. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विवाह करावयाचे त्यांनी ठरविले. त्यामुळे समाजाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यामुळे लवकरच अनंतशास्त्री डोंगरे यांनी आपले मुळ गांव सोडले आणि ते भारत भ्रमण करु लागले. दुर्दैवाने याच काळात इ. स. १८८७ मध्ये रमाबाई यांचे आई-वडील वारले आणि त्या पूर्णतः पोरक्या झाल्या.

इ. स. १८७८ मध्ये त्या आपले बंधू श्रीनिवास शास्त्री यांच्याबरोबर कोलकत्ता येथे आल्या. कोलकत्ता येथे यावेळी ब्राह्मो समाजाचे वारे वाहत होते. केशवचंद्र सेन यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करु लागले होते. पंडिता रमाबाई यांना संस्कृत बरोबर मराठी, हिंदी, कन्नड या भाषाही अवगत होत्या. त्यांनी कोलकत्ता येथे संस्कृत मधून जेव्हां व्याख्याने दिली तेव्हा कोलकत्ता येथील सारा समाज अवाक झाला त्यांच्या विद्वत्तेवर खुष होऊन कोलकत्तावासियांनी त्यांचा सत्कार सिनेट हॉल येथे घडवून आणला आणि त्यांना 'पंडिता' आणि 'सरस्वती' ह्या दोन पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. बंगाली स्त्रिया त्यांच्या या विद्वत्तेने आणि बुध्दी वैभवाने प्रभावित झाल्या त्यांनी ही रमाबाई यांचा सत्कार करुन त्यांना भारतवर्षीय स्त्रीयांचे भूषण हा किताब दिला. विशेष म्हणजे पंडिता या पदवीने तत्कालीन काळात गौरविल्या गेलेल्या त्या एकमेव महिला होत्या हे विशेष होय.

विवाह : पंडिता रमाबाई यांच्या बुध्दी वैभवाने सारे कोलकत्ता चकीत होत असतानाच त्यांचा एकलुता एक भाऊ हा इ. स. १८८० मध्ये श्रीनिवास शास्त्री मरण पावला. बिपीन बिहारीदास हा त्यांच्या भावाचा असामी मित्र होता. तो वकील होता. त्याने रमाबाई यांना लग्नाची मागणी घातली. ही लग्नाची मागणी विचारपूर्वक स्वीकारली कारण

त्या दिसायला अतिशय सुंदर होत्या वर्ण, निळसर डोळे आणि बुध्दीतेजाचे वलय त्यांच्या देहावर असल्याने अनेक आय.सी.एस. अधिकाऱ्यांनीही त्यांना लग्नाची मागणी घातली होती. परंतु आपल्या विचारांशी सहमत असलेल्या व्यक्तींशीच विवाह केलेला चांगला अशा विचार करुन त्यांनी बिपीन बिहारीदास यांच्याशी विवाह केला. हा विवाह उच्चवर्णीय समाजास मान्य झाला नाही. कारण बिपीन बिहारीदास हे शुद्र वर्णातील होते. त्यामुळे पुन्हा त्यांच्याविषयी वादळ उठले. हे वादळ शमत नाही तोच एका लहानशा आजारात त्यांचे पती बिपीन बिहारीदास हे ४ फेब्रुवारी १८८२ रोजी मरण पावले.

आर्य महिला समाजाची स्थापना : रमाबाईचे पती जेंव्हा मरण पावले तेंव्हा त्यांनी कोलकत्ता सोडण्याचा निर्णय घेतला. इ. स. १८८२ मध्ये त्या आपल्या लहान कन्येला घेऊन पुण्यात आल्या. तेथे त्या स्थायिक झाल्या. पुणे येथेही त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी समाजातील घातक,चालिरिती यापासून समाजाला मुक्त करण्यास त्यांनी आपले प्रयत्न चालू ठेवले यासाठी त्यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली. त्यांच्या शाखा पुणे, नगर, सोलापूर, ठाणे, पंढरपूर आदि ठिकाणी काढल्या. स्त्रियांना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून इ. स. १८८२ मध्ये त्यांनी स्त्री धर्मनिती नावाचे पुस्तक लिहीले इस. स. १८८३ मध्ये त्यांनी हंटर कमिशन पुढे साक्ष दिली.

ख्रिश्चन धर्माचा स्विकार : स्त्री धर्मनिती हे पुस्तक लिहून त्याच्या विक्रीतुन त्याना जो पैसा मिळला त्याच्या सहाय्याने त्यानी इंग्लंडला जाण्याचे ठरविले. तेथे त्या इंग्रजी भाषा आणि वैद्यक शास्त्राचा विशेष अभ्यास करणार होत्या. इंग्लंडमध्ये त्या वॉटिज गावातील सेंट मेरी मठात राहिल्या . तेथे त्यांनी येशूच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केला. येशूचे स्त्रीयांसंबंधीचे उदात्त विचार ऐकून त्या ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित झाल्या. २९ सप्टेंबर १८८३ रोजी त्यांनी वॉटिंग गावातील सेंट मेरी मठात ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. तसे पहिले तर त्या कलकत्ता तेथे असतानाच त्यांच्या मनात हिंदू धर्माविषयी चलबिचल निर्माण झाली होती. हिंदु धर्मात स्त्रियांना असलेले स्थान या विषयी त्या दु:खी होत्या. त्याचा उद्रेक इंग्लंड मध्ये झाला आणि त्यांनी हिंदु धर्माचा त्याग केला.

आनंदीबाई जोशीच्या पदवीदान समारंभ उपस्थित (इ.स. १८८६) :

आनंदीबाई जोशी या अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण घेत होत्या . त्याच्या पदवीदान समारंभाला हजर राहण्यासाठी खास रमाबाई या इ. स. १८८६ मध्ये अमेरिकेत गेल्या तेथे त्यांनी हिंदुस्थानातील स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल व्याख्यान दिले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना अमेरिकेतील नागरिकांना हिंदुस्थानातील विधवा स्त्रियांच्या परिस्थितीची चांगली जाणिव झाली. विधवा स्त्रियांची परिस्थिती बदललली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे अमेरिकेतील काही लोक एकत्र आले. आणि बोस्टन या शहरात त्यांनी रमाबाई असोसिऐशन नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत देणग्या गोळा करण्यात येऊ लागल्या. त्या देणग्या हिन्दुस्थानमध्ये पाठवून हिंदुस्थानातील विधवा स्त्रीयांची परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रमाबाई अमेरिकेत असताना त्याना असे वाटे की, हिंदुस्थानातील बाल विधवांनी स्वत:च्या पायावर उभे राहिले पहिजे. त्यासाठी त्यांनी बालोद्यान शिक्षण पध्दती शिकली पाहिजे या पध्दतीच्या सहाय्याने विधवा स्त्रिया स्वावलंबी बनू शकतील पण बालोद्यान शिक्षण पध्दती म्हणजे काय ? याची माहिती हिंदुस्थानातील विधवा स्त्रियांना करुन दिली पाहिजे म्हणून स्वत: अमेरीकेत बालोद्यान पध्दतीचा अभ्यास केला. इतके नव्हे तर ह्या पध्दतीची माहीती देणारे पुस्तकही त्यानी मराठी भाषेत लिहिले. हिंदुस्थानातील बाल विधवांची माहिती लोकांना व्हावी म्हणून इ.स. १८८७-८८ मध्ये त्यांनी ' द् हायकास्ट हिंदु वुमन ' नावाचे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकात त्यांनी बाल विधवांच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे. त्या अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देत असताना त्यांच्या मनात ही कल्पना सुचली. त्यांनी हे पुस्तक अमेरिकेतच लिहीले.

शारदा सदन स्थापना (११ मार्च १८८९) :

१ फेब्रुवारी १८८९ रोजी त्यांनी अमेरिकेतून हिंदुस्थानात परतल्या. विधवा स्त्रीयांच्या उध्दारासाठी आपण काही तरी केले पाहिजे हे त्याच्या मनात अमेरिकेत असतानाच बिंबले होते म्हणून ११ मार्च १८८९ रोजी त्यांनी विधवा स्त्रियांसाठी मुंबई येथे 'शारद सदन' नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था मुंबई येथे विल्सन कॉलेज जवळ चौपाटीवर एका खाजगी भाड्याच्या घरात सुरु

केली. ही संस्था प्रामुख्याने बाल विधवा स्त्रियांसाठी होती असे सांगतात की, या संस्थेत दाखल झालेली पहिली बाल विधवा शारदा गद्रे ही होती तिच्या नावावरुन ही संस्था या संस्थेला 'शारद सदन' हे नाव देण्यात आले. ' शारद सदन 'च्या सल्लागार मंडळावर न्या. महादेव रानडे न्या. काशिनाथ तेलंग, कृष्णाजी नूलकर, डॉ. रा.गो.त्र्यंबक भांडारकर या थोर व्यक्ती होत्या. संस्थेतील या विधवा मुलींना रमाबाई अतिशय चांगली वागणुक देत. त्यांना चांगले कपडे, खाणे , पिणे, देत पण ही गोष्ट काही लोकांना चैनीची वाटली. विधवा स्त्रियांना एवढ्या चांगल्या गोष्टी द्याव्यात का असा प्रश्न त्यानी उपस्थित केला. रमाबाई रानडे यांनी ह्या मुलींच्या ज्ञान संवर्धनासाठी अनेक ग्रंथ संस्थेत आणले. या साऱ्या सुधारणा समाजातील काही विचारवंताना रुजल्या नाहीत. त्यांनी 'शारदा सदन' वर टिका सुरु केली. या टिकेला रमाबाई रानडे घाबरल्या नाहीत त्यांच्या या कार्यामुळे या संस्थेतील मुलींची संख्या वाढत गेली कारण विधवा स्त्रियांच्या दु:खावर फुंकर घालणारी माता त्याना मिळाली होती.

आनंदीबाई या शारदा सदनाच्या बालविधवा सदस्य होत्या. आनंदीबाई म्हणजे महर्षि कर्वे यांच्या भावी पत्नी त्या रमाबाईच्या अतिशय लाडक्या होत्या. संस्थेच्या पाचव्या वर्धापनदिनी त्यांनी समायोचित प्रसंग साधला. या दिवशी त्यांनी गोदुबाईचा (आनंदीबाई) विवाह धोंडो केशव कर्वे यांच्याबरोबर करुन दिला. त्या दिवशी त्यांना त्यांच्या कार्याला नवी दिशा मिळाली.

रमाबाई रानडे यांनी राष्ट्रीय चळवळीतही भाग घेतला त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये स्त्रियांना प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे असा आग्रह धरला. केशवपणाविरुध्द त्यांनी प्रचार केला. संमती वयाच्या चळवळीतही त्यांनी पाठिंबा दिला.

नोव्हेंबर १८९० मध्ये 'शारदा सदन'ही संस्था मुंबईहून पुण्यास हलविली. ही संस्था स्थापन करताना स्त्रियांची प्रगती व्हावी याच एकमेव उद्देशाने ही संस्था स्थापना करण्यात आली होती. स्त्री स्वावलंबी व्हावी., तिची गुलामगिरी नष्ट व्हावी हा प्रमुख उद्देश या संस्थेचा होता. तरी या संस्थेबद्दल काही गैरसमज पुण्यात निर्माण झाले. म्हणून रमाबाई यांनी या संस्थेचे मुख्य कार्यालय अहमदनगर जवळील केडगांव येथे हलविले. तेथे २४ सप्टेंबर १८९८ रोजी 'मुक्ती सदन' या नावाचे कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

दुष्काळग्रस्त स्त्रियांना आश्रय : १९ व्या शतकात शेवटच्या दशकात अनेकदा दुष्काळ पडले. या दुष्काळामुळे अनेक कुटुंबाचे संसार उध्वस्त झाले पण ब्रिटीश सरकार त्याबाबत फारशी उपाय योजना करण्यास तयार नव्हते. दुष्काळाची सर्वात मोठी झळ लहान मुले आणि स्त्रीयांना बसते यावेळी स्त्रियांचे अतोनात हाल होतात. असाच इ. स. १८९७ मध्ये मध्य प्रदेश येथे दुष्काळ पडला तेव्हा अनेक स्त्रियांना रमाबाई यांनी आपल्या संस्थेत आश्रय दिला. हिच परिस्थिती इ. स. १९०० मध्ये गुजरात येथे घडली. या वर्षी तेथे पुन्हा भीषण दुष्काळ पडला. स्त्रियांचे जीवन उध्वस्त झाले. तेव्हांही रमाबाई यांनी तेथील असहाय्य स्त्रियांना मुक्त सदनात आश्रय दिला. विशेष म्हणजे यातील बहुतेक स्त्रियां उच्च वर्णीय होत्या.

अमेरिकेत रमाबाई असोसिएशन स्थापना : जानेवारी १८९८ मध्ये रमाबाई यांनी पुन्हा अमेरिकेला भेट दिली. ऑगस्ट १८९८ पर्यंत त्या अमेरिकेत होत्या. त्यांच्या सांगण्यावरुन पुर्वीची रमाबाई असोसिएशन ही संस्था बंद करण्यात आली. आणि अमेरिकेन रमाबाई असोसिएशन नावाची संस्था स्थापना करण्यात आली. आतापर्यंत 'शारदा सदन' ही संस्था सर्व धर्माच्या स्त्री यांसाठी कार्य करत आहे.

• विनोद •

शिक्षक - पुढच्या जन्मी तुला कोण व्हावसं वाटतं ?
विद्यार्थी - सर , जिराफ
शिक्षक - का ?
विद्यार्थी - त्यामळे तुम्ही आम्हाला तोबाडीत मारु शकत नाही

कु. विद्या जिंदम
बी. ए. भाग – १

जसे मुलींना कुठे चालली, लवकर घरी परत ये असे कित्येक प्रश्न विचारले पाहिजेत मुलांना चांगल्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. सर्वांनीच तिचा सन्मान केला पाहिजे आई वडीलांनी त्यांना लहानपणापासून चांगल्या व वाईट गोष्टींची ओळख करुन दिली पाहिजे. त्यांच्यावर लहानपणापासून चांगले संस्कार घडवायाला गेलो की त्यांना वाटते की समाजापेक्षा आई-वडिलच आपले दुश्मन आहेत की काय असे वाटायला लागते व त्यांनी त्याचा उलट उत्तरे मिळतील. स्वांतत्र्यापूर्वी काळात सुभाषचंद्र बोस यांनी '' तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुंगा ।'' असा संदेश दिला पण आजची तरुण पिढी म्हणते की,

'' तुम मुझे तंबाखू दो ।
मै तुम्हे चुना दुँगा ।''

अशी आजची तरुण पिढी. महात्मा गांधीजींनी याच भारत देशासाठी स्वत:च्या प्राणचे बलिदान दिले तो देश असा आहे का ? महात्मा गांधीजींनी भारतात त्यांनी तीन माकड म्हणजे वाईट बोलू नका, वाईट ऐकू नका, वाईट पाहू नका तर आमची तरुण पिढी जे करुन नका म्हणतात, तेच मुद्दाम करते. म्हणजे वाईट बोलू नका म्हंटले की वाईट बोलतात, वाईट बघु नका म्हंटल की वाईट पाहतात तसेच वाईट कृत्य केल्यामुळे काहीच मिळणार नाही. कधी या तरुण पिढीला समजणार की त्यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्त्रियांना चांगले जीवन जगण्यासाठी व देण्यासाठी किती झटले. किती कष्ट घेतले.

मला वाटते की, जसे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सुख आहे तसेच दु:ख देखील आहे. तसेच चांगले लोक देखील असतीलच तसेच वाईट लोक देखील असतीलच...

महात्मा गांधीजींनी आपल्याला सत्य, अहिंसा, सत्याग्रह ही मुलतत्व सांगितली आणि त्यांनी स्वत: देखील या तत्वांचा पुरस्कार करत आयुष्यभर जनतेच्या कल्याणासाठी आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अख्खे आयुष्य वेचले. त्यांनी फक्त सत्य, अहिंसा, सत्याग्रह या मुलतत्वाचा पुरस्कार केला नाही. तर त्यानी खेडा सत्याग्रह, चंपारण्य सत्याग्रह यासारख्या सत्याग्रहाच्या माध्यमातून सिध्द करुन दाखविले आणि ब्रिटीश शासनाला आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जेरीस आणले.

पण आजचा काळ फक्त महात्मा गांधीजींच्या जयंती आणि पुण्यतिथी साजरा करण्यात धन्यता मानतोय पण त्यांनी जी शिकवण दिली त्याचे काय ? एक अण्णा हजारे उभे राहिले आणि गांधीवादीच्या मार्गावर निघाले याचा अर्थ असा होत नाही की, सर्व भारत सुधारला. त्यातूनही आहेत. आज अनेक संप, बंद, आंदोलन होत आहे. पण त्यात गांधीवादीचा मार्ग देखील नाही. फक्त हिंसक आणखी काही नाही.

आज भारताला गरज आहे. ती खऱ्या खऱ्या गांधीजींची कारण आज भारताला कोण तारणार असेल तर तो फक्त गांधींचा विचार. महात्मा गांधीजी जगले दुसऱ्यांसाठीच म्हणून कवी मनमोहन म्हणतात चंदनाचे खोड लाजे... हा झिजे त्याहून ही कोणतेही पद कोणतेही स्थान सत्ता त्यांनी स्वीकारले नाही. स्वातंत्र्य मिळाले तेव्हाही ते नौखालीत निर्वासितांसाठी धडपडत होते. तसेच कार्यरत असताना ३० जानेवारी १९४८ रोजी या राष्ट्रपित्याचा एक माथेफिरुने खून केला महात्मा गांधी या देशात नसले तर काय? पण ते प्रत्येक व्यक्तींच्या हृदयात आहेत. त्यांचे विचार आजही सर्वांच्या मनात आहेत. आज सर्वत्र पाहिले तर जसे की, राजकारणात देखील भ्रष्टाचार होत आहेत. माणूस हा मनुष्याशीच भांडत बसत आहेत. फक्त मी आणि मी आहे हे मी पणाची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. आज ना उद्या गांधींजीसारखे या भूतलावर पुन्हा पुन्हा जन्म घ्यावेत तसेच त्यांचे कार्य त्यांचे विचार प्रत्येक व्यक्तीला पुन्हा - पुन्हा अनुभवता यावे प्रत्येक जन्मी त्यांना लोकांनी ओळखावे व ओळखत राहवे.

महात्मा गांधींजी आज जिवंत नसले तरी त्यांचे विचार फक्त व्यक्तीमध्ये जिवंत आहेत आणि पुढीही राहतील.

-: व्यक्तिचित्र लेख :-

भगतसिंग यांचे विचार आणि कार्य

कु. वरलक्ष्मी द्यावरकोंडा
बी. ए. भाग - १

लाहोरचा प्रंचड तुरुंग सर्वत्र गंभीर, भयसूचक वातावरण, सशस्त्र सैनिकांचा कडेकोट बंदोबस्त थोड्याच वेळानंतर फासावार चढवले जाणार असलेले तीन तरुण क्रांतीवीर ''इन्किलाब झिंदाबाद'' त्या घोषणा देत निघाले होते. सकाळपासून बाहेर मोठा जमाव जमला होता.

साक्षात मृत्यू समोर उभा असताना क्रांतीचा जयजयकार करणारे कोण होते ते निर्भय तरुण ? ते होते भारतमातेचे थोर सुपुत्र भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव सन १९२८ साली लाहोर येथे 'सायमन कमिशन' च्या विरोधात जी उग्र निदर्शने झाली. त्यात ब्रिटीश अधिकारी स्कॉडच्या आदेशावरुन पोलीसांनी तुफान लाठीमार केला. त्यात थोर पंजाबी नेते लाला लजपतराय हे गंभीर जखमी झाले व त्यातच १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मरण पावले. सारा देश हळहळला या हत्येचा बदला घेण्याचा निर्धार करुन ब्रिटीश अधिकारी स्कॉडला ठार मारण्याची कामगिरी चंद्रशेखर आझाद, राजगुरु, भगतसिंग व जयगोपाल यांच्यावर सोपवण्यात आली.

१७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोर येथे पोलीस कचेरीतून इंग्रज अधिकारी बाहेर पडला. तसा त्याचा पाठलाग करुन राजगुरुंनी गोळ्या झाडल्या. पाठोपाठ भगतसिंगनीही गोळ्या झाडल्या मारल्या गेलेल्या ब्रिटीश अधिकारी स्कॉड नसून त्याचा सहाय्यक 'सँडर्स' होता.

हत्येच्या या घटनेनतर चंद्रशेखर आझाद व राजगुरु दोन वर्षांपर्यंत भूमिगत होते. भगतसिंगासह अनेक क्रांतीकारकांना अटक करण्यात येऊन त्या सर्वांवर खुनाचा खटला भरण्यात आला. तो कित्येक दिवस चालला चंद्रशेखर आझाद मात्र शेवट पर्यंत पोलीसांच्या हाती लागले नाहीत. पुढे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्क मध्ये पोलीसांच्या चकमकीत ते ठार झाले.

दि. ३० सप्टेंबर १९२९ रोजी राजगुरुंना पुण्यात अटक झाली खटल्याच्या अखेरीस भगतसिंग व सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. '' इन्किलाब झिंदाबाद'' अशी घोषणा देत तिन्ही क्रांतीकारी हसत सहत फासांवर चढले. दि. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना लाहोर तुरुंगात सायंकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी फाशी देण्यात आले, भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांचा अंत्यविधी फिरोजपूर जवळ (पंजाब) सतलज नदीच्या काठी त्याच रात्री करण्यात आला. फिरोजपूर (पंजाब) येथे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांची समाधी आहे.

सरदार भगतसिंगचा जन्म पंजाबमधील बंग (सध्या हे गाव पाकिस्तानात आहे) या गावी सन १९०७ साली एका क्रांतीकारी कुटुंबात झाला. वडील किशनसिंग व चुलते स्वर्णसिंग दोघांनाही देशासाठी तुरुंगात जावे लागले असल्याने भगतसिंगांना देशभक्तीचे बाळकडू कुटुंबातून मिळाले हेते. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण बंग या जन्मगावी झाले. उच्च शिक्षण लाहोर येथे दयानंद अँग्लो – वेदिक महाविद्यालयात व नॅशनल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेत जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. पदवी मिळवून ते घरी परतले.

कानपूरला जाऊन प्रताप वृत्तपत्रात त्यांनी बलवंतसिंग या नावाने क्रांतीकारी लेखन व कार्यही सुरु केले. पोलीसांना त्यांच्या गुप्त हलचालींचा सुगावा लागताच कानपूर सोडून भगतसिंगानी दिल्ली गाठली. लाहोर प्रमाणे दिल्ली देखील भारतीयांच्या असंतोषाचे दुसरे केंद्र झालेले होते. दिल्लीच्या 'अर्जून' साप्ताहिकात बलवंतसिंग याच नावाने ते काम करु लागले. तिथेही पोलीसांची पाळत वाढली तेव्ही ते लाहोरला आले व मुंडण करुन भगतसिंग या नावाने वावरु लागले. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग या नावाने वावरु लागले. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाब तर्फे होते. यात शिववमी चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थी ही होते.

भारत – पाकिस्तान फाळणीनंतर हुसेनीवाला हा भाग पाकिस्तानात गेला होता. पण भारत सरकारने बदली जमीन देऊन तो भाग मिळवला. सन १९६८ मध्ये भारत सरकार तर्फे तेथे भगतसिंगाचे भव्य स्मारक उभारले गेले. त्यावेळी भगतसिंग यांच्या वृध्द माता विद्यावती उपस्थित होत्या. अशा क्रांतीकारकाचा शतशः प्रणाम...!

-: व्यक्तिचित्र लेख :-

महात्मा जोतीराव फुले यांचे शेतकऱ्यांविषयी विचार

कु. ऐश्वर्या शावणे
बी. ए. भाग - ३

प्रस्तावना : प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे या देशातील बहुसंख्या लोक शेतीवर अवलंबून आहेत. भारत हा खेड्याचा देश मानला जातो. ग्रामीण लोकांच्या उपजिविकेचे साधन म्हणजे शेती होय. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात अर्धा वाटा शेतीच्या उत्पन्नाचा आहे. आज देखील भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७०% एवढी लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतवलेली पाहावयास मिळते. भारतीय अर्थ व्यवस्थेला आज देखील कृषीप्रधान अर्थव्यवस्था या नावाने संबोधले जाते. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा सहभाग हा जगातील विविध राष्ट्रांच्या तुलनेत बराच मोठा आहे. पाश्चात देशाप्रमाणे भारतीय शेती प्रगतावस्थेतील नाही. आपले दर हेक्टरी उत्पादन फार कमी आहे. शेतीबरोबर जोडधंद्यात फारसा विकास झाला नसल्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती समाधानकारक नाही. नैसर्गिक आपत्ती, अज्ञान व कर्जबाजारी वाढती लोकसंख्या इत्यादी गोष्टीमुळे येथील शेतकरी मागासलेला आहे. शेतीवर अधिक लोकसंख्येचा भरणा अवलंबून असल्यामुळे आपल्या देशातील शेती आणि शेतकरी फारसा प्रगत झाला नाही.

महात्मा जोतीराव फुले यांच्या काळात ही शेतकऱ्यांची परिस्थिती फार वाईट होती. म्हणून त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांची दुरावस्थेची व शेती सुधारण्यासाठी उपाय योजना सांगितली आहे. ती आजही उपयुक्त ठरणारी आहे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची वर्णन शेकऱ्यांचा आसुड ब्राह्मणाचे कसब या पुस्तकातून केले आहे.

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कारणे :- १) धार्मिक शोषण :- महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची अनेक कारणे सांगितली आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे शेतकऱ्यांचे विविध मार्गाने होणारे धार्मिक शोषण होय. शेतकरी मुळात धार्मिक वृत्तीचा होता. धर्माच्या नावानेच ब्राह्मण शेतकऱ्याला लुबाडत असतात. धर्म व्यवस्थेच्या आधारावर शेतकऱ्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या अंतापर्यंत कोणता न कोणता विधी करावा लागे. त्यातूनही शेतकरी पूर्णपणे लुबाडला जात होता. शेतकऱ्यांच्या घरी मुले जन्मले की त्यांच्या घरी जाऊन ब्राह्मण जोशी खोटे सांगून पैसा उपटतात. त्यामुळे महात्मा फुले म्हणतात काड्यामुड्या जाळी लज्जा होम केला । नाही त्यामुळे मनी घाला लज्जाहीन ब्राह्मण जोशी शुद्रांच्या घरा ऋतुशांतीच्या वेळी अशा अनेक निरर्थक विधी करावयास लावती. अशाप्रकारे धर्माचा वापर करुन आपले पोट भरण्याचा हा ब्राह्मण जोशींचा प्रकार होता.

२) अंध श्रध्दा :- महात्मा फुले कालीन समाजाचा भ्रामक गोष्टीवर फारच विश्वास होता. भूतबाधा, चेटूक, करणी, जादूटोणा यासारख्या अघोरी प्रकरावर लोकांची श्रध्दा होती. अंधश्रध्देच्या नावाखाली शेतकऱ्यांची भट ब्राह्मणकडून खूपच लुबाडणूक होत होती. म्हणून महात्मा फुले यांनी हिंदू धर्मातील कर्मकांडवरही हल्ले केले. त्यांनी सामान्य शेतकरी शेतमजुरांना धीर दिला. जपाने, यज्ञाने पाऊस पडत नाही. मंत्रानी अपत्य प्राप्त होत नाही. देवाला कोणी पाहिले नाही. त्याला नारळ, कोंबडी, बकरी यांच्या नैवद्याची आवश्यकता नाही. हे त्यांनी स्पष्ट केले आहे. सर्व धर्म पुस्तकात स्वर्ग

आहे. म्हणून सांगतात. पण पृथ्वी वरील एक तरी व्यक्तीने स्वर्ग पाहिला आहे काय ? असा प्रश्न ते उपस्थित करतात ते म्हणतात.

स्वर्गाची शांतता कल्पून मनाला । लिहिली ग्रंथता तर्कबाळे ।
काठे आहे स्वर्ग पाहिला तो कोणी । भिऊ नका मनी । दावा आम्हा ।

अंधश्रध्देवरती त्याकाळी त्यांनी केलेले प्रहार आजही तेवढेच मार्गदर्शक ठरतात. रुढी, परंपरा अंधश्रध्दा यांच्यावर असणार धर्माचे प्राबल्य आणि प्रत्यक्ष दैनंदिन जीवन जगताना अनुभवातून प्रत्यक्षात येणारे वास्तविक शल्य या दोन्हीतील फरक त्यांनी शेतकऱ्यांच्या लक्षात आणू दिला.

३) सावकारांचे स्वार्थी धोरण :- शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक नव्हती. शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून होती. कमी पाऊस, जास्त पाऊस, कमी उत्पादन व दैनंदिन गरजांची पूर्ती इत्यादीमुळे शेतकऱ्यांला सावकाऱ्याकडे जावे लागे. भारतातील शेतकऱ्यांची स्थिती इतर देशातील शेतकऱ्यांपेक्षा निकृष्ट आहे. असा दावा महात्मा फुले करतात. सावकार शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुटतात. मारवाडी, गुजराती, व्यापारी लिंगायत आणि ब्राह्मण ही सावकारी करतात हे स्पष्ट केले. व्याजाचा प्रचंड दर व हिशोबातील खोटेपणा यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात शोषण करतात. सावकार कर्ज वसुल करीत असताना शेतकरी व त्यांच्या बायकोचे (कुटुंबाचे) काही एक ऐकून घेत नाही. महात्मा फुले सावकाराचा उल्लेख सर्वांचा प्राणहरण यमरुपी ब्रह्मराक्षस या शब्दात करतात.

लोकसंख्या वाढ :- ब्रिटीशकालीन भारतातील राजे लोकांनी संस्थानिकानी आपल्या पदरी मोठे सैन्य ठेवले होते. त्यात लोक मोठ्या प्रमाणात नोकरीत असल्यामुळे शेतजमीनवर फार भार पडत नसे. ब्रिटीशांची सत्ता भारतात आल्यामुळे या स्थितीत बदल झाला त्यामुळे सैन्यातील लोक घरी आले. इंग्रज सरकारमुळे हिंदुस्थानातील लढाया बंद पडल्यामुळे देशात शांतता प्रस्थापित आली. बेकरीचे प्रमाण वाढले सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेती जमीनवर त्याचा भार पडला. शांततेच्या काळात लोकसंख्या भरमसाठ वाढली. कुटुंबातील वाटपामुळे शेतजमीनीचे लहान लहान तुकडे पडले. शेतकरी आपली शेती शेजाऱ्यास अर्धकालीन अथवा खंडाने देऊन आपली मुले माणसे बरोबर घेऊन कोठे तरी परगावी मोल मजुरी करुन पोटभरण्यास जातात. अशी बिदायक वस्तुस्थिती महात्मा फुले यांनी मांडली होती. भुमीहीन झालेल्या शेतकऱ्यांना उदर निर्वासाठी काम मिळावे म्हणून वण वण लागले.

५) शेतीमालास अल्प किंमत :- शेतकऱ्यांची वाईट अवस्था होण्याचे कारण म्हणजे शेती मालास अल्प किंमत होय. जागतिक बाजारपेठेत १८७० साली भयंकर महामंदी आली. अमेरिकेच्या धान्य उत्पादनात खूप वाढ झाली. यंत्र सज्ज बोटी मुळे जल वाहतूक करणे सोपे झाले. त्यामुळे दुसऱ्या प्रदेशातील माल आपल्या देशात आणणे सोपे झाले. याचा परिणाम असा झाला की, शेती मालाच्या किंमती पार कोसळल्या. १८७१ साली एका ज्वारीच्या पोत्याला तीन रुपये मिळत होते. ते १८७४-८५ साली याच पोत्याची किंमत अवघी सव्वारुपया झाली पण सरकारने दहा वर्षापूर्वी वाढविलेला शेतसारा कमी केला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला जकातीचे संरक्षण मिळाले नाही. शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठेत भाव मिळत नाही. त्यामुळे त्याचा पीक उत्पादनावरील खर्च वसुल होत नसे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जफेड जमली नाही. त्यांनी शेती व गुरेढोरे विकून टाकली. उरलेली गुरेढोरे १८७७-७८ च्या काळात दुष्काळात मरुन गेली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीस खिळ बसली आणि शेतकऱ्यांची कर्जापोटी दैन्यावस्था झाली.

६) ग्रामोद्योगाची ऱ्हास : - ब्रिटीश राजवटीत भारताची जी भौतिक प्रगती झाली. त्याबद्दल महात्मा फुले ब्रिटीश राजवटीचे कौतुक करतात. ब्रिटीशांनी भारतात रेल्वे आणि रस्ते विस्तारावर भर दिला. त्यामुळे भारतातील कच्चामाल स्वस्त भावाने खरेदी करता आला आणि त्याचा पक्का माल करुन याच रेल्वेने खेड्यापाड्यापर्यंत पोचविता आला. शिवाय शासनाने ब्रिटनमधील कारखान्याची भरभराट व्हावी म्हणून जकात रद्द करुन टाकली १८५६ नंतरच्या अवघ्या पंधरा वर्षात पाच हजार मैल लांबीचे रस्ते आणि रेल्वेरुळ टाकण्यात आले. याचा अर्थ असा की एका वर्षाला दोनशे मैल लांबीचे रेल्वे रुळ सरकारने तयार करुन घेतले. याचा फटका शेती मालाच्या घसरत्या किंमतीवर जसा झाला तसाच हस्तकारागिरांच्या व्यवसायावर झाला.

इंग्लंडमधून भारतात आयात होणाऱ्या कापडावर ब्रिटीशांनी जकात कर रद्द केला. त्यामुळे भारतातील कापड उद्योगाचे नुकसान झाले. विदेशी कापड भारतात मोठ्या प्रमाणात ही बाब ही ते नमूद करतात. ब्रिटीश लोकांनी कच्चा माल कमी किंमतीत खरेदी करुन

त्यांच्या देशात नेऊन पक्का माल जास्त किंमतीत लावून भारतीय भाजार पेठत विकून भारताचे फार मोठे आर्थिक शोषण केले. असे महात्मा फुले सांगतात.

७) शेतकऱ्यांचे अज्ञान :- महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे अनेक कारणे सांगितली आहेत. त्यापैकी एक म्हणजे शेतकऱ्यांचे अज्ञान होय. अज्ञानामुळे तो मानवी अधिकार समजण्यास आणि उपभोगण्यास असमर्थ ठरतो. एक अविद्येने किती अनर्थ होतात हे शेतकऱ्यांचे आसूड या ग्रंथाच्या पद्यात ते म्हणतात.

विद्ये विना मती गेली,
मती विना नीती गेली,
नीती विना गती गेली,
गती विना वित्त गेले
वित्त विना शुद्र खचले...

इतके अनर्थ एका विद्येने केले. शेतकऱ्यांनी लग्नकार्यासाठी, चैनीसाठी, दारु पिण्यासाठी, नाचगाण्यासाठी शेतीवर कर्ज काढू नये गुलामगिरीतून शेतकऱ्यांची मुक्तता करावयाची असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे., म्हणून स्वतः कष्ट करा, मुलाबाळांना शाळेत पाठवा असा उपदेश महात्मा फुले शेतकऱ्यांना करतात.

८) भीषण दारिद्र्य :- देशातील शेतकरी देशाचा, सैनिक आणि देशाचा प्रशासकीय अधिकारी हे तीन कोणत्याही देशाचे आधारस्तंभ असतात या तीन आधारस्तंभाचे सुस्थितीवरच देशाची सुस्थिती निर्धारीत होते. पण महात्मा फुले यांच्या काळात या तीन घटकापैकी सर्वात निष्कृष्ठ अवस्था पहिल्या घटकांची म्हणजे शेतकरी वर्गाची होती. सैनिक आणि सरकारी अधिकाऱ्यांची स्थिती समाधानकारक अशी होती. मात्र या घटकांना खूप सवलती आणि अधिकार होते. शेतकरी आणि त्यांचे आठ-नऊ माणसे कुटुंबांसह अष्टोप्रहर राबत असून ही कर्ज आणि सारा भागविल्यावर एका माणसाला एका महिन्यात रु. ३ उत्पन्न उरत नव्हते. या उलट एका युरोपीयन अधिकारी इथला आपल्या दरमहा रु. १५ रुपयापेक्षा अधिक खर्च करतो. इंग्रज सैनिकांचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या उत्पन्नापेक्षा १०पटीने अधिक होते. असे महात्मा फुले यांनी दाखवून दिलेले आहे. मिस्टर इलियट साहेबांनी शेतकऱ्यांविषयी लिहिलेले आहे की, अर्ध्या शेतकऱ्यांची वर्षानुवर्षे पूर्ण भूक भागत असे कधी ही होत नाही. हे म्हणणे अक्षरशः खरे आहे.

९) शेती सुधारणेच्या उपाय योजना : महात्मा फुले यांनी ग्रामीण भागात दौरा करुन शेतकऱ्यांची स्थिती जाणुन घेतली. शेतकऱ्यांनी शेती चांगली करावी यासाठी त्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथातून शेतीच्या सुधारणेसाठी काही उपाय योजना सुचवितात.

*युरोपीयन आणि हिंदु मुसलमान यांना कायद्याने गोमांस खाण्याची बंदी करावी. त्याऐवजी शेळ्या, मेढ्यांचे मांस खाण्यास भाग पाडावे.

* लष्करी व पोलीस दलास कामास लावून नदीवर धरणे बांधावी.

*नदीचे पाणी विहीरीतून साठवून व फळबांगासाठी आणि शेतीसाठी उपयोगात आणावे.

* सरकारी मदतीशिवाय स्वतः विहीरी खाणीतील त्यांना बक्षीस द्यावे.

* तलाव, तळी आणि नद्या यातील गाळ शेतकऱ्यांना विनामुल्य द्यावा.

* शेळ्या, मेंढीची उपज करण्यासाठी चांगल्या चांगल्या जातीच्या शेळ्या परदेशातून आणुन शेतकऱ्यास पुरवठा कराव्यात.

* वृक्ष तोडून नये म्हणून कायदा करावा.

* शेतीचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना बंदुका द्यावी.

* नांगरणीच्या उत्तम कलेबद्दल व उत्तम पिक काढण्याबद्दल बक्षीस द्यावे.

* शेतकऱ्यांना शेती विषयक ज्ञान देणारी पुस्तके द्यावीत.

* शेती, शाळा स्थापन कराव्यात

सारांश :-

महात्मा फुले यांचा शेती विषयक विचार हा अवघ्या समाजाच्या नि राष्ट्राच्या अभ्युद्याचा विचार आहे. त्यांच्या विचारामुळे शेतकऱ्यांना हक्कांची जाणीव होऊ लागली. लोकसंख्या वाढ, शेतीवर कराचा बोजा, शेतीचे तुकडे आणि पर्यावरणाच्या विनाशामुळे शेतीचा होणारा विध्वंस याकडे महात्मा फुले यांनी १०० वर्षापूर्वीच लक्ष वेधले. भूमी आणि भूमीपुत्र यांच्या शिवाय शेतीप्रधान देशाला सर्वांगिण विकास साधता येत नाही. यासाठी तरी शेतकऱ्यांचा विकास आवश्यक आहे. असा हा त्यांचा एकूण विचारांचा सूर आहे. तो शंभर सव्वाशे वर्षापासून जितका मोलाचा होत तितकाच आजही आहे. यात शंका नाही.

-: व्यक्तिचित्र लेख :-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

कु. तेजस्विनी पाटील
बी. कॉम. भाग - २

ज्या मनगटात बळ, बुध्दी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकभिमुख राजा बनू शकतो ।

राजमाता अहिल्यादेवी होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चोंडी या गावी झाला. चोंडी हे गाव पूर्वी बीड जिल्ह्यात होते. आता अहमदनगर जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यात आहे. तेथे दरवर्षी ३१ मे रोजी मोठा जन्मोत्सव साजरा होत असतो. आई सुशीलाबाई शिंदे व वडील माणकोंजी शिंदे त्या यांच्या एकमेव कन्या होत्या.

अहिल्यादेवी केवळ राज्यप्रशासकच नव्हत्या तर
प्रजाहितदक्ष लोकमाता होत्या. दया तिचे नांव ।
भुतांचे पालन, आणि निर्दालन कंटकांचे ।।

या तत्वज्ञानाच्या त्या पालनकर्त्या होत्या. युध्द टाळण्याकडे त्यांचा कल होता. युध्दाचे कारण राज्यकर्त्याचा अहंकार हेच असल्याचे त्या मानत. युध्दामुळे सामान्य रयत शेतकरी, गावकरी स्त्रिया, बालके श्रमकरी यांचे जीवन उद्‌वस्त होत असते. याशिवाय हजारो सामान्य सैनिकांच्या मृत्यूमुळे त्यांची घरे उद्‌ध्वस्त होत हाती. राजघराण्यातील अथवा सरदार सुभेदाराकडील कर्ती पुरुषमंडळी मरण पावल्यास त्यांच्या बायकांना जबरदस्तीने सती जावे लागत असे. हे सर्व कटू अनुभव अहिल्यादेवींनी अनुभवलेले होते. याचा अर्थ त्यांना युध्दाची भीती होती असा घेऊनये. त्या स्व:शूर सेनानी होत्या लढवय्या होत्या. शस्त्रास्त्राची पूर्ण पारख असणाऱ्या होत्या. सासरे लढाईत गुंतलेले असताना रसद पुरविणे सैन्य उभे करणे, नवे शस्त्र तयार करणे वा खरेदी करणे, तोफा तयार करणे, शस्त्रांचे भांडार करणे. युध्द शाळा – गजशाळा, अश्वशाळा चालविणे ही सर्व कामे त्या स्वत: करत. त्या सर्वार्थने अत्यंत बलवान होत्या.

सामान्य जनतेला शासन दरबारी व न्याय दरबारी सन्मान मिळावा असे अहिल्यादेवींचे प्रशासन होते. अहिल्यादेवी स्वतेसाठी मायेच्या मायेनेच प्रशासन राबवत असत. त्याचवेळी अंतर्गत प्रशासकीय नोकरांवर त्यांची शिस्तबध्द जबर होती. अहिल्यादेवींनी प्रथम शांतता स्थापित करण्यावर भर दिला. त्यानंतर गावोगावी सरकारी अधिकारी पाठवून गावपातळी पर्यंत शासन व्यवस्था निर्माण केली. गावचे जमीनक्षेत्र मोजून प्रथम लागवडी खालील क्षेत्रासाठी शेतीचा विकास घडवत आणला. त्यासाठी सरकारी खर्चाने शेती विकास करु शेतकऱ्यांना पट्टे दिले. बलुतेदार, शेतमजुर, शेतकरी यांना प्रशिक्षणाची कार्यशाळेची व्यवस्था करुन उत्तम प्रशिक्षक नेमले. केंद्र शासनाने व राज्य शासनाने यानंतर एमसीव्हीसी, आयटीआय सुरु केल्याचे दिसते त्यासाठी होळकर पॅटर्न वापरला गेला होता. अहिल्यादेवींनी स्वयंरोजगारातून निर्माण झालेल्या वस्तुंसाठी राज्यांतर्गत तसेच राज्याबाहेरही बाजारपेठा उपलब्ध करुन दिल्या. विशेष निर्यात धोरण अवलंबविले.

मनुस्मृतीनुसार सर्वच स्त्रिया धर्मबाह्य अथवा शुद्रतिशुद्र मानल्या जातात. समाजात वा घराबाहेर होत नसून चार भिंती आड चौकटीत आतही खूप स्त्रिया शोषणाच्या बळी ठरत असतात. त्यातल्या त्यात गरीब मागास जातीतील. स्त्रिया शोषणाच्या बळी ठरत असतात. विधवा, बलात्कारीत, प्रौढ अशा स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची नजरही वाईटच असते. त्यामुळे अनेकदा अशा स्त्रियांना जबरदस्तीने घराबाहेर काढले जाते. त्या निराधार व निरक्षित

असतात. हक्काचे छप्पर काय अंगावरील फाटक्या कापडाखेरीज सोबत काहीच नसते. तरुण, रुपवान, धडधाकट अशा निरक्षित स्त्रींकडे समाजातील दुष्ट लोक लांडग्याच्याच नजरेने बघत असतात. पोटासाठी काम मागायला गेल्यास अशा तरुण भगिनींना बलात्काराला तोंड द्यावे लागते तर वयोवृध्द स्त्रिया उपाशी पोटी मरणाला कवटाळतात.

अशा निराधार स्त्रियांसाठी महिलाश्रम, अनाथश्रम, कुटीरोद्योग उभारण्यात आले होते. आजही महेश्वरला काही हात उद्योग सुरु आहेत. स्त्रियांच्या कलागुणांना वाव देऊन त्यातून आर्थिक विकासाचे नवे सूत्र बचत गटाच्या माध्यामातून राबविले गेले. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र्य असाव्यात हीच अहिल्यादेवींचे योजना होती.

त्यातील अनेक चांगल्या यशस्वी झाल्या इथे सर्व बाबींकडे अहिल्यादेवीचे कार्य हे स्त्री-पुरुष या सर्वांनाच प्रेरणादायी आहे. तरी स्त्रियांनी अहिल्यादेवींची मानसिक कणखरता अवश्य घ्यावी. रडत बसण्यापेक्षा लढत जगावे.

धन्य धन्य कलियुगी देवी अहिल्यादेवी।
गेली किर्ती करुनिया भूमंडळाचे ठायी।।
महाराज अहिल्यादेवी पुण्यप्राणी।
संपूर्ण स्त्री यामध्ये श्रेष्ठ रत्नखाणी।।

गेल्या हजारो वर्षात भारतभूमीने व भारतीयांनी अनेक बादशहा राजे अनुभवले वैदिक धर्म व्यवस्थेचे मनुस्मृतीमधील विषमतावादी कायद्यांचे पालन करणे समाजास बंधनकारक होते. अहिल्यादेवींचे शासन प्रशासन निधर्मी असतानाही त्यांनी स्वत: हिंदू धर्मातील अनेक कुप्रथा नाकारुन शुध्दीकरण केलेला हिंदूधर्म आचरणात आणला. समाजात धर्मश्रध्दा अत्यंत खोलवर रुतलेल्या आहेत व होत्या असे राज्यकर्त्या या नात्याने त्यांना जाणवले.

अशा ह्या लोकमाता, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी दि. १३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर मुक्कामीच आपला अखेचा निरोप घेतला. भारतीय इतिहासात त्या एकमेव लोकमाता झाल्यात जागतिक इतिहासामध्ये एवढे अफाट व दु:ख काळजाड दडवून रयतेची लेकरासारखी सेवा करणारी त्या एकमेव राज्यकर्त्या होत्या. अशा लोकमातेस विनम्र अभिवादन. नवी पिढी देखील त्यांच्या पासून प्रेरणा घेत राहील अशी अपेक्षा आहे.

• विनोद •

भिकारी रॉक्स शॉक्स्

भिकारी : आजी भाकरी दे...
आजी : आता तयार नाहीय... नंतर ये...
भिकारी : हा माझा मोबाईल नंबर घे भाकरी तयार झाल्यावर मला मिसकॉल दे...
आजी : अरे, मिसकॉल काय करु थोड्या वेळाने भाकरी तयार होईल तेव्हां... व्हॉटस्ॲपवर अपलोड करते, तू डाऊनलोड करुन खाऊन ....

बायको : हॅलो कुठे आहात... ?
नवरा : ऑफिसमध्ये, तू कुठे आहेस ?
बायको : मी हॉटेलमध्ये तुमच्या मागे आहे...
मुले विचारताहेत पप्पाबरोबर ती आत्या कोण आहे... ?

कु. श्रीदेवी मनगुळे
बी. कॉम. भाग - २

सुखी जीवनाचे आठ मंत्र....

१) पुजा करायच्या अगोदर -
विश्वास ठेवायला शिका.

२) बोलायच्या अगोदर -
ऐकायला शिका.

३) लिहायला शिकायच्या अगोदर -
समजुन घ्यायला.

४) खर्च करायच्या अगोदर-
समजुन घ्यायला.

५) हार मानायच्या अगोदर-
कमवायला शिका.

६) नाते बनवायच्या अगोदर-
दुसऱ्याला जपायला शिका.

७) रडायच्या अगोदर-
दुसऱ्याला हसवायला शिका.

८) मरण्याच्या अगोदर
फक्त मनसोक्त जगायला शिका.

कु. प्रियंका देवळे
बी. ए. भाग -२

-: माहितीपर लेख :-

लेक

कु. सविता गोटीमुकुल
बी. कॉम. भाग - १

लेकी बद्दलचे लेख म्हणजेच नंतर फक्त दोन गोष्टींचा विचार मनात येत असेल ना ? एक म्हणजे ती आता सुंदरशा दुनियेत दिसत नाही याचे दु:ख व दुसरी म्हणजे त्या राक्षसांना मिळालेल्या शिक्षेचा आनंद ती म्हणजे हैद्राबाद मध्ये घडलेली घटना प्रियंका रेड्डी हिची हैद्राबाद येथील येल्लूर या गावात पशु चिकित्सक म्हणून काम करत होती व ती रोज हायवे पर्यंत तिच्या दुचाकीवर येत होती. व नंतर बसने सकाळी १०.३० पर्यंत येल्लूरला पोहचली. तिथे ती गावकऱ्यांना पशु स्वच्छता आणि त्यांच्या आहाराबाबत जागरुक करायची. त्यामुळे ती या गावकऱ्यांनी मुलगी समान झाली होती. अशाप्रकारे चाललेल्या वेळेला जणू काही नजरच लागली. तो दिवस होता २७ नोव्हेंबर ला तिच्यावर अत्याचार झाले. तिला रॉकेल व पेट्रोल ने जाळून टाकले व तिची हत्याही केली गेली. या हत्याच्या मागे होते चार मुले २७ नोव्हेंबर २०१९ ला रात्री टोलनाक्याजवळ तिला स्कूटर पार्क करताना पाहिले व ते तिच्या स्कुटरचे टायर पंक्चर करुन दिला असा विश्वास करु घातला की जणू काही त्यांनी तिचा मदत करायला आले असावे. ती त्यांच्यावर विश्वास ठेवला पण त्या चार राक्षसांनी तिचा विश्वासघात केला व त्यांच्यावर अन्यायाने सामुहिक दुष्कर्म केले व तिचा मृत्यू झाल्यानंतरसुध्दा तिच्यावर दुष्कर्म करुन तिला जाळून टाकले.

अहो... त्या ठिकाणी त्या चारही राक्षसरुपी नरधामाची बहिण आई, वहिनी असे कोणही असले असते तर त्यांनी केले असते का हो ते असे कृत्य...

या घटना प्रकरणी हैद्राबाद चे सायबराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर या ठाण्याचे प्रमुख ऑफीसर व्ही. पी. सज्जनार यांनी २९ नोव्हेंबरला मुख्य आरोपी मोहम्मद पाशाला अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर पोलीस आयुक्त व्ही. सी. सज्जननार यांच्या नेतृत्वाखाली ६ डिसेंबर २०१९ रोजी ह्या पशु रुपात असणाऱ्या अत्याचारकांना दंड देण्यात आला. त्याला चौघांनी तिला जिथे जाळून टाकले होते त्या जागेपासून सुमारे ४०० मीटर अंतरावर पहाटे ०५.४५ ते ६.१५ ला त्याचा एन्काऊंटर करण्यात आला.

आता आंध्रप्रदेशामध्ये सर्व मुलींना एक सुरक्षित जीवन देण्याचे प्रयत्न तिकडचे सरकार करत आहेत. त्यांना 'सेल्फडिफेशन' चे शिक्षण देत आहेत. प्रत्येक शाळेत विशेष तास घेऊन त्याना शिकवत आहेत.

हैद्राबादच्या पोलीस ऑफिसरांना व व्ही.सी.सज्जनार यांना माझे सलाम छोट्याशा या आयुष्यात बरच काही हवं असतं...

पण नेमक हवं तेच मिळत नसतं...

प्रियंका रेड्डी हिच्या आत्म्यास शांती लाभो....

हीच ईश्वर चरणी प्रार्थना....

• विनोद •

एका कॉलेज तरुणाने एका अनोळखी
मुलीला कमळाचे फुल दिले
तिने ताडकन त्याच्या थोबाडीत मारली
" मी प्रेमाने भाजपचे चिन्ह तुला दिले होते, "
" तु मला भाजपाचे चिन्ह दिलेस तर मी तुला काँग्रेसचे दिले ।"

कु. दिपाली जमादार
बी. कॉम. भाग - १

-: माहितीपर लेख :-

भारतीय नागरिकत्व

कु. प्रियंका देवळे
बी. ए. भाग - २

लोकांना आपल्या देशात मिळालेला राजकीय दर्जा म्हणजे नागरीकत्व असे स्थुलमनाने म्हणता येईल. नागरिक म्हणजे नगराचा रहिवासी. प्राचीन काळात एकेका शहरापुरती शासन संस्था मर्यादित असायची म्हणून शहराचा रहिवासी तो शासन संस्थेचा सभासद किंवा घटक मानला जायचा पुढे शासन संस्थेचे क्षेत्र मोठ्या प्रदेशावर पसरले. लहानमोठ्या प्रदेशातील समाजाला देश ही संज्ञा प्राप्त झाली. एका देशात किंवा शासन संस्थेच्या अधिकारी क्षेत्रात राहणारे ते सगळे त्याचे नागरिक मानले जाऊ लागले. आधुनिक काळात नागरिकत्व म्हणजे शासन संस्थेचे सदस्य आणि नागरिक म्हणून असलेले हक्कच जबाबदाऱ्या यांचा समुच्चय असे म्हता येईल. नागरिकत्व ही संकल्पना कायदेशीर आहे आणि तिला राजकिय नैतिक अधिष्ठान आहे. शासन संस्था ही नागरिकांची बनलेली असते. विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समुदायाचे राजकीय संघटन म्हणजे शासन संस्था या संघटनेचा उद्देश समाजाचे स्थैर्य, स्वास्थ आणि सातत्य टिकवणे व त्या आधारे व्यक्तीच्या विकासाला अवसर मिळेल अशी चौकट व वातावरण निर्माण करणे हे आहे.

प्रत्येक व्यक्तीचे तसेच सर्वांचे सामुहिक कल्याण साधता यावे, या दृष्टीने समाजव्यवहारांचे नियम करणे व परकीय आक्रमांपासून संरक्षण करणे हे शासन संस्थेचे कर्तव्य होय. ते नीट पार पाडायचे तर नागरिकांनी चालवण्यातील आपला वाटा उचलला पाहिजे शासन संस्थेचा उद्देश व्यक्तीमत्वाच्या व एकंदर मानवजातीच्या हिताचा असल्याने तिचे सभा सदस्य केवळ अपरिहार्यच नव्हे तर श्रेयकर आहे. म्हणून नागरिकत्व ही संकल्पना संस्कृती संवर्धनाला उपकारक व पोषक ठरणारी आहे. मानव समाज राजकीय दृष्ट्या संघटीत होऊ लागण्यापूर्वीच्या अवस्थेशी तुलना केली म्हणजे नागरीकत्वाची ही सांस्कृतिक बाजू स्पष्ट होईल. आदिमानव जंगले व स्वापर यामधून यास अलग अलग राहत असे. मोठा मासा लहान माशाला गिळतो, तसाच न्याय आदिमाणसा माणसांत चालायचा. यावरुन जंगलाचा कायदा हा वाक्यप्रचार रुढ झाला. अशा स्थितीत माणसाला सुरक्षितता वाटणे अशक्य होते. हळू हळू ही अवस्था काहीशी आपोआप तर काही अशी माणसाच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांनी बदलली.

शासन संस्था विकसीत झाली. राजेशाहीत राजा व प्रजा यांच्यातील नाते सत्ताधारी आणि त्यांचे आज्ञाधारक सेवक या प्रकारचे होते. पुढे मात्र प्रजाजन हे नागरिकत्व आले. प्रत्येक माणसाने आपले स्वत:चे काम करीत करीत शासनसंस्थेतील घटक या नात्याने येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडायची पध्दत वाढू लागली. त्यामुळे सांस्कृतिक जीवन विकसीत झाले. विद्या व कला यांचा विकास झाला. शासनसंस्थेवर निष्ठा ठेवणे हे नागरीकांकडून अपेक्षित असलेले अगदी प्राथमिक कर्तव्य होय.

नागरिकत्व म्हणजे राज्य संस्थेचे सभासदस्यत्व होय. प्राचीन काळापेक्षा आधुनिक काळात नागरिकत्वाची संकल्पना अधिक, व्यापक अधिक समावेशक बनलेली आहे. प्राचीन काळी गुलाम स्त्रिया इत्यादींना नागरिकत्वाचे हक्क नसतं. परराज्यातील व्यक्तीला राज्याचे नागरीकत्व मिळणे दुरापास्त असे. आधुनिक

काळात मात्र लिंगभेद वर्गभेद असा कोणताही भेदभावन न करता सर्व देशवासियांना नागरिकत्व दिले जाते. लोकशाही देशात धर्म, वंश, पंथ, वर्ग, लिंग असा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान हक्क दिलेले असतात. नागरिकांना जसे हक्क प्राप्त होतात. तसेच नागरिकांची काही कर्तव्ये मानलेली असतात. आणि ती नागरिकांनी निष्ठापूर्वक पार पाडावीत अशी अपेक्षा असते. आजच्या काळात प्रत्येक नागरिकांने स्वत:ला समाजाला जबाबदार घटक मानले पाहिजे आणि स्वत:चे हित साध्य करत असतानाच समाजहिताचाही विचार केला पाहिजे. म्हणजेच राज्याकडून प्राप्त झालेल्या हक्कांचा उपभोग होत असतानांच आपल्या कर्तव्यांचे पालन केले पाहिजे अशी अपेक्षा असते.

नागरिकत्वासंबंधी प्रत्येक राज्याने काही नियम केलेले असतात. नागरिकत्व कसे प्राप्त होऊ शकते किंवा ते कसे नष्ट होऊ शकते या संबंधीच्या तरतुदी बहुधा राज्याच्या राज्यघटनेमध्ये केलेल्या असतात. त्यानुसार व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त होत असते. याबाबत त्यांच्यात साम्य आढळते.

१) जन्मानुसार २) स्वीकृतीनुसार

जन्मानुसार मिळणाऱ्या नागरिकत्वाबाबत दोन भिन्न प्रकारची तत्वे अस्तित्वात आहेत. काही देशात भूमी तत्वानुसार नागरीकत्व दिले जाते. या तत्वाप्रमाणे आई-वडील कोणत्याही देशाचे नागरिक असले तरी व्यक्तीचा जन्म ज्या देशात झाला असेल त्या देशाचे नागरिकत्व या व्यक्तीचा जन्म ज्या देशात झाला असेल, त्या देशाचे नागरिकत्व या व्यक्तीला मिळते. या तत्वानुसार व्यक्तीचा जन्म कोणत्याही देशात झालेला असला तरी तिचे आई-वडील ज्या देशाचे नागरिक असतील त्या देशाचे नागरिकत्व त्या व्यक्तीला मिळते. उदा. दुसऱ्या देशाचे नागरिक असणाऱ्या आई - वडीलांचा आपल्या जन्म भारतात झाला असेल तर त्या आपल्याला भारताचे नागरिकत्व मिळू शकते. त्याबरोबर भारतीय नागरिकांचे मुले इतर कोणत्याही देशात जन्मली तरी त्या मुलांना भारताचे नागरिकत्व मिळू शकते.

वेगवेगळ्या देशात नागरिकत्वाचे नियम वेगवेगळे असल्यामुळे काही वेळा एकच व्यक्ती दोन देशाच्या नागरिकत्वाची दावेदार ठरते. अशा परिस्थितीत कोणत्या देशाचे नागरिकत्व स्वीकारावयाचे हा निर्णय त्या व्यक्तीवर सोपविला जातो. नागरिकत्व प्राप्त होण्याचा दुसरा प्रकार म्हणजे स्वीकृतीनुसार होणारे नागरिकत्व होय. प्रत्येक देशात वेगवेगळ्या कारणामुळे काही परदेशी व्यक्तीचे वास्तव्य असते. अशा परकीय व्यक्तीना देशाचे नागरिकत्व देण्यासंबधी प्रत्येक देशाचे काही नियम असतात. या नियमांची पूर्तता करणाऱ्या परकीय व्यक्तीला नागरिकत्व देण्याची तरतूद अनेक देशाच्या घटनेमध्ये केलेली आहे. स्त्रीने परदेशी नागरिकाशी विवाह केल्यास तिला तिच्या पतीच्या देशाचे नागरिकत्व मिळू शकते. सरकारी नोकरी करणाऱ्या परदेशी व्यक्तींना काही देशात नागरिकत्व देण्यात येते तर काही देशात मालमत्ता केली असल्यास तेथील नागरिकत्व प्राप्त होऊ शकते.

परदेशी व्यक्तींना नागरिकत्व देण्याबाबत काही देशाचे धोरण उदार असल्याचे दिसून येते तर काही देशात याबाबत कडक निर्बंध घातलेले आढळतात. उदा. ऑस्ट्रोलियात गौरवर्णियखेरीज इतर कोणत्याही वंशाच्या व्यक्तीला नागरिकत्व मिळत नाही. नागरिकत्व देण्यासंबधी त्याप्रमाणे प्रत्येक राज्याने काही नियम केलेले असतात. त्याचप्रमाणे व्यक्तीचे नागरिकत्व नष्ट होऊ शकते. याबद्दलही प्रत्येक राज्याचे नियम असतात.

१) एकाच वेळी दोन राज्याचे नागरिकत्व स्वीकारता येत नाही. २) व्यक्ती दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकरण्यास तिचे मूळ राज्याचे नागरिकत्व रद्द होते. ३) राज्याबाहेर सतत अनेक वर्षे वास्तव्य असल्यास काही राज्ये अशा व्यक्तीचे नागरिकत्व रद्द करताना दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकार करता येते. नागरिकत्वाचा पाया अशा प्रकारे नैतिक व सांस्कृतिक असला तरी तिची जात कुळी राजकीय आहे नागरीक हा समाजातील एक व्यक्ती किंवा अर्थ व्यवहारात उत्पादक, उपभोगता या नात्याने भाग घेणार असला तरी त्याचे नागरीकत्व हे शासन संस्थेशी म्हणजे समाजाच्या राजकीय संघटनेशी निगडीत आहे. व्यक्ती जन्मल्या बरोबर ती नागरीक बनते नागरिकत्वाचे हक्क जबाबदारी ही त्या बरोबर येऊन पडतात नागरिकत्व हे प्रदेशविशिष्ट असते एका देशात राहणारे ते नागरिक असे सर्वसाधारण मानले जाते. पण त्याला अपवाद आहेत. ब्रह्मदेशाच्या स्थानिक वंशापैकी एका वंशाचे आहेत त्यानांच नागरिकत्वाचा हक्क होता. ज्यांना अशा प्रकारे नागरिकत्व आहे पण जर खोलवर आपण विचार केला तर सर्व नागरिकाला हा हक्क आहे का ?

-: सामाजिक लेख :-

चीनमधील कोरोना व्हायरस

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग - २

कोरोना व्हायरस हा विषाणूंचा एक मोठा गट आहे. जो मानवांना आणि प्राण्यांनाही संक्रमित करणारा म्हणून ओळखला जातो आणि मानवांमध्ये श्वसन रोगाचा त्रास होतो ज्यास सामान्य सर्दीपासून ते आधिक गंभीर संक्रमणांपर्यंतचा धोका असतो. कोरोना व्हायरस साथीचा सर्वात गंभीर त्रास म्हणजे तीव्र श्वसन सिंड्रोम (सरस) होते. ज्यात पहिल्यांदा दक्षिण चीनमध्ये २००२ मध्ये सापडल्यानंतर याचा अनेक देशांवर परिणाम झाला आणि त्यात ८००० हुन अधिक रुग्ण आढळले कोरोना व्हायरस्ने संक्रमित झालेल्या लोकांची संख्या आता सार्सने बाधित झालेल्यापेक्षा जास्त आहे.

सध्याच्या उद्रेकाचे कारण सुरुवातीला माहित नव्हते, तर ७ जानेवारी रोजी चिनी आरोग्य अधिकाऱ्यांनी हे ओळखले की ते कोरोना व्हायरस्च्या ताणतणावात आहेत जे यापूर्वी मानवांमध्ये आढळेले नव्हते. पाच दिवसानंतर चिनी सरकारने विषाणुचा अनुवंशिकक्रम सामायिक केला. जेणे करुन इतर देश त्यांच्या स्वत:चे निदान किट विकसित करु शकतील.

कोरोना व्हायरस (सीओव्ही) व्हायरस कुटुंबाशी संबधित आहे. ज्याच्या संसर्गामुळे थंडीपासून श्वासोच्छावासापर्यंत समस्या उद्भवू शकतात. हा विषाणू यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. डिसेंबरमध्ये चीनमधील वुहानमध्ये या विषाणूची लागण सुरु झाली. डब्ल्युअचओच्या मते ताप, खोकला, श्वास लागणे ही लक्षणे आहेत. या विषाणुचा प्रसार होण्यापासून रोखण्यासाठी अद्याप कोणतीही लस उपलब्ध नाही. कोरोना व्हायरस हा विषाणुचा नवीन प्रकार आहे. प्राण्यांच्या एका प्रजातीतून दुसऱ्या प्रजातीत संक्रमित होतात आणि त्यानंतर मानवालाही संसर्ग होतो. या संक्रमणावस्थेच्या काळात त्याचा शोध लागत नाही. नॉटिंगम युनिव्हर्सिटीत वायरोलॉजीचे प्राध्यापक असलेले जोनाथ बॉल यांच्या मते हा अगदी नवीन प्रकार कोरोना विषाणू आहे. या विषाणूची लागण प्राण्यांमधूनच माणसाला झाली असावी अशी दाट शक्यता आहे.

रुग्णांमधून घेतलेल्या या विषाणूच्या सॅम्पलची प्रयोगशाळेत चाचणी करण्यात आली. त्यानंतर चीनचे अधिकारी आणि जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोना व्हायरस असल्याचं सांगितलं. कोरोना विषाणुचे अनेक प्रकार आहेत. मात्र यापैकी केवळ सहा प्रकारच्या विषाणुंची माणसाला बाधा होऊ शकते. मात्र नव्या विषाणुचा शोध लागल्यानंतर संक्रमित होणाऱ्या कोरोना विषाणूंची संख्या आता सात झाली आहे. कोरोना विषाणूचा एक प्रकार म्हणजे सार्स हा नवा विषाणू सार्सच्या जवळचा असल्याचं संशोधकांनी केलेल्या विश्लेषणात आढळलं आहे. सार्स प्रकारातला कोरोना विषाणू अत्यंत घातक मानला जातो. २००२ साली चीनमध्ये ८०९८ लोकांना मृत्यू झाला होता.

कोरोना विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये साधारणपणे सर्दी, खोकला अशी लक्षणं दिसतात. मात्र लागण गंभीर असेल तर मृत्यूही ओढावू शकतो. कोरोना व्हायरस यामध्ये सर्दीची सामान्य लक्षणं यात दिसत नाही. त्यामुळे ही चिंतेची बाब आहे.

कोरोना व्हायरसची उत्पत्ती वुहान –सीफुड मार्केटमधून झाली आहे. जेथे जंगली जनावरे, ज्यात मॉरमोटस् पक्षी, ससे आणि साप यांचा समावेश आहेत.

कोरोना व्हायरस प्राण्यांपासून माणसांकडे जाण्यासाठी ओळखले जातात. म्हणून असा विचार केला जातो की, रोगाचा संसर्ग करणारे प्रथम लोक मुख्यत: सीफुड मार्केट मधील स्टॉल धारकांनी बनविलेले एक गट ते प्राण्यांच्या संपर्कातून संक्रमित झाले. कोरोना विषाणुमुळे डोके दुखी, नाक गळणे, खोकला, घसा, खवखवणे, ताप अवस्थ वाटणे, शिंका येणे धाप लागणे, थकवा

जाणवणे, निमोनिया, फुफ्फुसात सूज येणे इत्यादी कोरोना व्हायरसची लक्षणे आहेत.

कोरोना व्हायरसमुळे मुख्यत्वे हिवाळ्यामध्ये आणि वसंतऋतूच्या सुरुवातीच्या काळात मानवामध्ये ताप, घसा सुजलेल्या डिनॉईड्सह सर्दी उद्भवते, कोरोना व्हायरसमुळे न्यूमोनिया आणि ब्रॉंकायटिस देखील होऊ शकतो.

आज जगात कोरोना विषाणूचा मोठा फैलाव झाला आहे. अमेरिकेत सध्या कोरोना विषाणूचा सर्वाधिक प्रादुर्भाव झाला आहे. भारताचाही पहिल्या पाच देशाच्या यादीत समाविष्ट झाला आहे. हे भारतात मृत्यूदर मात्र कमी आहे.

नवीन वर्षात चीन फिरायला गेलेल्या अनेक पर्यटकांच्या माध्यमातून लाखो लोकांमध्ये झाला असण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. चीनमध्ये पसरलेल्या प्राणघातक कोरोना विषाणुमुळे जगातील अनेक देश चिंतेत आहेत. चीनमधील परिस्थिती अशी आहे की प्रत्येक व्यक्तीकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे. जीव वाचविण्यासाठी लोक अशा शहरांमध्ये जात आहेत. जिथे त्याचा परिणाम होत नाही. विषाणू फैलाव झाल्यामुळे आणि आजारी लोकांना उठता येऊ नये म्हणून खबरदारीच्या उपाय योजना केल्यामुळे एअर लाईन कंपन्यादेखील घाबरल्या आहेत. यामुळे बुधवारी रात्री नाझिंग चीन शहरातील विमानतळ येथे प्रचंड गोंधळ उडाला. अखेर पालकांनी आपल्या आजारी मुलांना एअरपोर्टवर सोडले आणि विमानात एकट्याने चढले. महत्वाचे म्हणजे चीनमध्ये सार्स सारख्या विषाणूच्या अस्तित्वामुळे २६ लोक मरण पावले आहेत आणि १४ शहर सीलबंद करण्यात आली आहेत. सुमारे ४.१ कोटी लोकांना त्यांच्या घरात तुरुंगात टाकण्यात आले आहेत. प्रशासन गाड्या, बस, विमानतळांची सखोल तपासणी करीत आहे.

कोरोना विषाणू बाधा झालेल्या रुग्णांवर स्वतंत्र खोलीत उपचार सुरु आहेत. जेणे करुन इतरांना याचा संसर्ग होऊ नये. प्रवाश्यांना ताप आहे का ? हे तपासण्यासाठी प्रवासी ये – जा करतात अशा सर्व ठिकाणी थर्मल स्क्रिनींगची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय स्वच्छता राखता यावी आणि संसर्ग टाळावा यासाठी सी–फुड मार्केट ही काही काळ बंद करण्यात आले आहेत.

या सर्व उपाययोजना केवळ चीनमध्ये करण्यात आल्या आहेत. असं नाही. चीनव्यतिरिक्त आशियातील इतर अनेक देश आणि अमेरिकेतही असेच खबरदारीचे उपाय योजन्यात आले आहेत.

या बेटावर महिलांना बंदी पुरुषांसाठी कडक नियम -

दो कीयो : जपान मध्ये ओकीनोशीमा आयलंड नावाचे एक बेट आहे. या बेटाला युनेस्कोने जागतीक वारसांच्या यादीत समाविष्ट केलेले असले तरी तेथे सगळेच जाऊ शकत नाहीत. या बेटावर महिलांना जाण्यासाठी मज्जाव आहे. तसेच पुरुषांसाठी अनेक कडक नियम आहेत.

७०० वर्ग मीटर आकाराच्या या बेटाबाबात असे सांगितले जाते की चौथ्या ते नवव्या शताब्दीपर्यंत हे बेट कोरियन बेट आणि चीनमधील व्यापाऱ्याचे एक केंद्र होते. हे बेट धार्मिक दृष्टया अत्यंत पवित्र स्थान मानले जाते.

प्राचीन काळापासून परंपरेने चालत आलेल्या काही प्रतिबंधाना तिथे आजही मानले जाते. महिला या बेटावर जाऊ शकत नाहीत तर पुरुषांसाठी ही अनेक कडक प्रतिबंध आहेत या बेटावर प्रवेश करण्यापूर्वी पुरुषांना निर्वस्त्र स्नान करावे लागते. जे पुरुष या बेटावर येतात त्यांना तेथून कोणतीही वस्तू घेऊन जाण्यास त्यांना मज्जाव आहे. तसेच या यंत्रेबाबत कुणालाही सांगण्यास प्रतिबंध आहे. तेथील नियम इतके कडक आहेत की वर्षभरात केवळ २०० पुरुषच या बेटावर जाऊ शकतात. या बेटावर मुनाकाता ताइशा ओकीत्सु मंदिर आहे. त्या ठिकाणी समुद्र देवतेची पुजा केली जाते.

कु. मुग्मिता नरोळे
बी. कॉम. भाग - २

• विनोद •

बाप : तुला काहीही प्रश्न विचारायचा झाला तर मला विचार मला सगळं ज्ञान आहे. कारण बाप हा मुलापेक्षा नेहमीच जास्त हुशार असतो.

मुलगा : बाबा, आगगाडीच्या इंजिनचा शोध कोणी लावला ?

बाप : जेम्स वॅट या संशोधकाने...

मुलगा : त्याचा बाप त्याच्यापेक्षा हुशार होता तर त्याच्या बापाने तो शोध का नाही लावला ?

कु. दिपाली जमादार
बी. कॉम. भाग - १

-: माहितीपर लेख :-

सात हजार वर्षांपूर्वी चीजचा वापर...

कु. प्रियंका मित्रा
बी.कॉम. भाग - ३

लंडन : संध्याच्या काळात पिझ्झा, बर्गर सारख्या अनेक पदार्थामध्ये चीजचा वापर होतो, मात्र दुधापासून बनवला जाणारा हा चीज नामक पदार्थ हजारो वर्षापूर्वीही आहारात वापरला जात होता. याची तुम्हाला माहिती आहे का? पोलंडमध्ये तसे संशोधन आलेले आहे. तेथील एक गावात सापडलेल्या भांड्याच्या तुकड्यांचे रासायनिक परिक्षण केल्यानंतर चीज तयार करण्यासाठी विशेष प्रकारची रचना केलेली भांडी वापरली जात होती असे त्यांना आढळले. चीजसाठी सध्या प्रसिध्द असलेले ब्रिटनमधील सॉमरसेट आणि फ्रान्समधील ब्री ही ठिकाण बघून पोलंडमधील कुयाविया भागात चीजची तयार करण्याचे तंत्र प्रथम विकसीत झाले होते. या गावातील उत्खन्नात सापडलेल्या भांड्यामध्ये लहान छिद्रे असल्याने व त्याच्या रासायनिक परीक्षण दुग्धजन्य पदार्थमध्ये असणारी मेदान्ले (फॅटी ॲसिड) असल्याने दिसून आले. ही भांडी आधुनिक काळात चीज तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गाळण्याप्रमाणेच आहेत. त्यामुळे ही विशेष प्रकारची भांडी चीज तयार करण्याची भांडीच असली पाहिजत या शक्यतेची पुष्टी होते, असे संशोधनकांनी म्हटले.

-: वैचारिक लेख :-

विचार बदला जीवनाची दिशाही बदलेल

कु. प्रियंका कलशेट्टी
बी.कॉम. भाग - २

एक खुप श्रीमंत माणुस होता. पण त्याच्याकडे असलेल्या संपत्ती एवढे त्याचे मन मोठे नव्हते. एखाद्याला पैसे दिले तर स्वत:चे मोठेपण तो १० लोकांना जाऊन सांगायचा. एके दिवशी शहरात थोर विचारवंत आले असल्याचे त्याला कळले तो त्वरीत त्यांना भेटायला गेला. त्या श्रीमंत माणसाने आदरातिथ्य केल्यावर त्या थोर विचारवंताने त्याला भेटायला येण्याचे कारण विचारले. मात्र आपले येण्याचे कारण न सांगता तो स्वत:च्या संपत्तीचे आणि दानशुरतेचे गोडवे गाऊ लागला त्याच्या दानशूरपणाच्या गोष्टी सांगून झाल्यावर त्या श्रीमंत माणसाने पैशाच पाकिट काढून थोर विचारवंताला देऊ केले आणि म्हणाला तुम्हाला पैशाची गरज आहे असे मला वाटले म्हणून मी हे आणले आहे, हे सांगत असताना त्यांच्या डोळ्यात वेळात अहंकार दिसत होता.

त्या थोर विचारवंत पैशाचे पाकिट बाजुला करत म्हणाले मला या पैशांची नव्हे तर तुझी गरज आहे, हे ऐकून तो श्रीमंत माणुस दुकावला गेला. मी दिलेले पैसे यांनी नाकरण्याचा हिंम्मत कशी केली. आतापर्यंत मी दिलेले पैसे कोणीही नाकारण्याची धाडस केले नाही असे तो मनातल्या मनात म्हणाला तेवढ्यात थोर विचारवंत म्हणाले, तुला माझ्या वागण्याचे वाईट वाटले असेल ना तो श्रीमंत माणूस म्हणाला. वाईट तर वाटणारचं, मी देऊ केलेली मदत तुम्ही नाकारलीत जणू काही मी हे पैसे नाही तर माती दिली आहे, हे ऐकून ते विचारवंत म्हणाले, हे पाहा महाशय, दात्याने केवळ पैसे दिले आणि स्वत:ला अर्पण केले नाही तर त्याचे मोल मातीसमान असते. कोणत्याही असलेल्या गोष्टीचे समान भाग करुन अर्धी गोष्ट दुसऱ्याला देणे हे पैसे जे तु मला दिलेस ते काही सगळेच तुझे नाहीत हे पैसे तू दान करतोस यात अभिमान काय बाळगायचा ? हे तर तु केलेल्या चोरीचे प्रायश्चित केल्यासारखे आहे. हे ऐकून त्या धनिकाचा अंहकार तुटला आणि त्याचे विचार बदलले.

-: सामाजिक लेख :-

आई- वडिलांना विसरु नका !

कु. प्रियंका कलशेट्टी
बी.कॉम. भाग - २

फक्त एकच मिनिट लागेल नक्की वाचा आणि शेअर करा एके दिवशी एक वर्षाच्या मुलीने आपल्या वडिलांना सहज विचारले '' बाबा तुम्ही माझ्या १५ व्या वाढदिवशी कोणती भेट वस्तू देणार ? '' वडिल म्हणाले, '' त्याला खूप वेळ आहे बेटा काही वर्षानंतर''

१४ वर्षाची असताना ती मुलगी अचानक बेशुध्द पडली त्यानंतर तिला रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी अंती तिच्या वडिलांना सांगितले की, तुमच्या मुलीला हृदयाचा विकार आहे. आणि ती काही दिवसांचीच पाहुणी आहे. ती मुलगी गुपचुप या दोघींचे बोलणे ऐकते नंतर रुग्णालयात असताना मुलगी तिच्या वडिलांना म्हणाली. '' बाबा डॉक्टर असे का म्हणाले का मी काही दिवसानी मरण पावणार आहे. वडिल म्हणाले. '' नाही गं, तु १०० वर्षे जगणार आहेस आणि वडिलांच्या डोळ्यातून अश्रू निघाले.

उपचार सुरु असताना काही महिन्यांनी ती १५ वर्षाची झाली आणि बरी होऊन जेव्हा घरी परतली तेव्हा तिच्या बेडरुममध्ये तिच्या पलंगावर एक चिठ्ठी तिला सापडली. त्यात लिहीले होते. माझे सोने, जर तु हे पत्र वाचत असशील तर माझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व काही ठिक आहे. एक दिवशी तू मला विचारलं होतेस की, तुम्ही माझ्या १५ व्या वाढदिवशी काय भेट वास्तु द्याल ?

तेव्हां मला माहित नव्हते परंतु मी तुला माझे हृदय भेट म्हणून दिले आहे. तिच्यासाठी वडीलांनी हृदयदान केले होते.

तात्पर्य : – आपल्या आई–वडीलांवर प्रेम करा –तुम्हाला सुखी ठेवण्यासाठी तुमच्या नकळत त्यांनी खूप त्याग केले आहेत. आपण मोठे झाल्यावर आपल्या कामात एवढे व्यस्त होतो की आपले पालकांकडे दुर्लक्ष होते. त्यांच्या सहवासात तुमचा पुरेसा वेळ घालवा त्यांना नेहमी काळजीपूर्वक प्रेमाने वागणूक द्या.... !

-: वैचारिक लेख :-

प्रयत्न

कु. लक्ष्मी रुच्चा
बी.कॉम. भाग - ३

प्रयत्न ही गोष्टच अशी आहे की प्रयत्न करुन कार्य पूर्ण होतात. परंतु फक्त विचार किंवा इच्छा करुन नाही. प्रयत्नाला पर्याय नाही हे माणसाने सदैव लक्षात ठेवले पाहिजे म्हणूनच प्रयत्न ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली होय.

इंग्लिश मध्ये अशी एक सुंदर म्हण आहे की, God helps those who help themselves याचा अर्थ असा जे प्रयत्न करतात, त्यांनाच देव सहाय्य करीत असतो. या म्हणीतून प्रयत्न करण्याचे महत्व सुरेखपणे विशद केलेले आहे. समर्थ रामदास स्वामीनी एक पाऊल पुढे टाकून असे सांगितले की प्रयत्न तो देव जाणावा. त्याच्याही एक पाऊल पुढे टाकून जीवन विद्येने सांगितले की, देवा सकट सर्व काही मिळवून देण्याचे सामर्थ्य प्रयत्नात आहे, म्हणून हे रत्न देवापेक्षा श्रेष्ठ आहे.

प्रयत्नवाद श्रेष्ठ की प्रारब्धवाद हे वाद किंवा विवाद किंवा वितंडवाद अक्कलशुन्य माणसांनी खुशाल घालीत बसावे. परंतु प्रयत्नाला पर्याय नाही हेच त्रिकालबाधित सत्य आहे, इतकेच नव्हे तर प्रयत्न करीत राहणे हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग असून त्रिकालबाधित निसर्ग नियमांशी ते सुसंगत आहे. या नियमाला अपवाद असतो या सिध्दांतानुसार प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही, हे प्रत्येकांनी सदैव लक्षात ठेवले पाहिजे.

१) देवा सकट सर्व काही प्राप्त करुन देण्याचे सामर्थ्य प्रयत्नात आहे, म्हणून प्रयत्न हे रत्न देवापेक्षाही श्रेष्ठ होय. २) वाईट म्हणून जे काही आहे ते कष्ट केल्याशिवाय पदरात पडते. परंतु चांगले म्हणून जे काही आहे ते मात्र केवल प्रयत्नानेच साध्य असते.

३) प्रयत्नाशिवाय प्रसाद नाही असा प्रभुचा प्रिय संकेत आहे.

४) प्रयत्न श्रेष्ठ की परमेश्वर श्रेष्ठ असाच जर सवाल असेल तर प्रयत्नच श्रेष्ठ असे म्हणणे योग्य ठरेल. ५) प्रपंच काय किंवा परमार्थ काय प्रयत्नाशिवाय ते कळत नाहीत म्हणून प्रयत्न हाच परमेश्वर जाणावा.

६) प्रयत्न हा करावयाचा असतो, तर प्रारब्ध हे भोगावयाचे असते.

७) प्रयत्नाचे अधिष्ठान तत्वत, परमेश्वरच आहे तर प्रभुचा प्रगट फुलोरा म्हणजे प्रयत्न होय. ८) ज्या गोष्टी माणसाच्या हातात नसतात त्याबद्दल काळजी चिंता, दु:ख करीत वेळ वाया घालविण्यापेक्षा ज्या गोष्टी त्यांच्या हातात असतात त्यासाठी सतत प्रयत्न करत राहणं माणसाच्या हिताचे असते. ९) प्रयत्न हा प्रकारच इतका प्रभावी आहे की प्रयत्न करण्याच्या प्रक्रियेत प्रयत्न करण्याऱ्याला प्रकाश दिसू लागून त्या प्रकाशातूनच त्याला प्रभुचा प्रसाद प्राप्त होतो.

१०) धड धडेपर्यंत केलेली खटपट म्हणजे धडपड. ११) प्रयत्न तो परमेश्वर जाणावा. १२) प्रयत्न व अभ्यास यांना जीवनात पर्याय नाही.

पद्य विभाग

बहिणीसाठी...

खरचं किती सुंदर असत ना...
दोन बहिणीचं नात...
म्हणायला गेलं तर खूप हळवं नातं असतं...
त्या दोघींच कधीही पटत नसतं..पण...
त्या दोघी एकमेकींनशिवाय
राहु ही शकत नाहीत...
खरच किती सुंदर असतं ना...
दोन बहिणींच नात...
खूप खूप भांडतील...
मारामारी करतील पण...
नंतर थोड्या वेळाने...
एकमेकींना चिडवत... परत.. हसतील..
खरचं किती सुंदर असत ना..
दोन बहिणींच नातं...
स्वभावाने कितीही वेगळ्या असल्या तरी
मनाने मात्र.... एकच असतातत....
खरचं किती सुंदर असत ना...
दोन बहिणींचं नातं...
समोर कितीही वाईट बोलत असल्यातरीही...
आपल्या मैत्रिणसमोर नेहमी
आपल्या बहिणींचं कौतुक करत असतात.
खरचं किती सुंदर असतं ना....
दोन बहिणींच नातं...

कु. तेजश्री नक्का
बी. ए. भाग - ३

मैत्रिण...

कशी असावी मैत्रिण तुझ्या
सारखी असावी....

कशी असावी मैत्रिण
तुझ्या सारखी असावी...

स्माईल तिची खास... स्वभाव तिची क्लास...
अॅटीट्युड तिचा झकास... तोडांत गोड शब्दांचा घास...

मैत्रिण कशी असावी...
मैत्रिण तुझ्या सारखी असावी...
रोज नाही पण कधी तरी सवडीनं...
आवडीने एसएमएस करणारी...

मैत्रिण... कशी असावी...
मैत्रिण तुझ्या सारखी असावी...
व्हॉट्सअॅपच्या स्टेटस् मधून मैत्रीच्या
भावना ओळखून रिप्लाय देणारी...

मैत्रिण... कशी असावी...
मैत्रिण तुझ्यासारखी असावी...
व्हॉटस्अॅप ची रोमॅंटिक स्टेटस् पाहून
कोणासाठी ठेवली नाव सांग म्हणून पिडणारी....

मैत्रिण... कशी असावी...
मैत्रिण तुझ्यासारखी असावी.
वाढदिवासाची पार्टी मागितल्या वर तु ये तर खरं
बनवते तुझ्या आवडीचे डिश
लयभारी अशी म्हणणारी...

कु. अंकिता हिबारे
बी. कॉम. भाग - १

एक कागदाच पान...

एक कागदाचं पान असतं ...
श्री लिहाल, की पूजलं जातं
प्रेमाचे चार शब्द लिहले, की,
जपलं जातं...

काही चुकीचं आढळलं की
फाडलं जातं...
एका कागदाचं पान असतं ।।

कधी त्याला विमान बनवून
भिरकावलं जातं...
कधी होडी बनवून
पाण्यात सोडलं जातं...

जे लेखकाच्या लेखणीला हात देतं...
जे चित्रकाराच्या चित्राला साथ देतं....
जे व्यापाऱ्याच्या...
हिशोबाला ज्ञात ठेवतं....

एक कागदांचं पान असतं...
ज्यावर बातम्या छापल्या
की वर्तमानपत्र बनतं....

प्रश्न छापले की प्रश्नपत्रिका बनतं...
विवाहांच निमंत्रण छापलं....
की लग्नपत्रिका बनतं...

तर कधी आदेश, संदेश लिहले की,
तेच टपालही बनतं....
एक कागदाचं पान असतं...

एक कागदाचं पान असतं...
माणसाच्या जीवनांत...
आणि त्यांत खूप साम्य असतं...
एक कागदाचं पान असतं....

कु. अश्विनी गाडगी
बी. कॉम. भाग - १

शाळेतील शिक्षा

शालेत आपल्या आदरणीय,

शिक्षकांनी केलेल्या काही शिक्षा आठवल्या की ,

पुन्हा एकदा त्याचे आभार मानावेसे वाटतात

कारण,

त्यातून त्यांनी काय शिकवले ते बघा

नाकावर उभे रहा- आपली पातळी उंच व मोठे स्वप्न

हात वर करुन उभे रहा -उच्च ध्येय ठेवा, उंची गाठा.

भिंतीकडे तोंड करुन उभे रहा- आत्मपरीक्षण करा.

वर्गाबाहेर उभे रहा - चार भिंतीतून बाहेर या , जग बघा.

गुडगे टेका - विनम्र व्हा.

कॉबडा व्हा -शारीरीक सहनशक्ती वाढवा.

फळा पुसा -झाले गेले विसरा आणि नव्याने सुरुवात करा.

तोंडावर बोट ठेवा - बाता कमी मारा (स्वत:च्या)

कान धरा - लक्षपूर्वक ऐका.

वाका, अगंठे धरुन उभे रहा - लवचिक बना.

हा धडा दहा वेळा लिहा - अचुकतेसाठी सराव करा.

शाळा सुटल्यावर थांबा - जीवघेण्या स्पर्धेत उतरु नका.

विशेष व्यक्ती बना.

आयुष्यात खरचं निघून गेले ते दिवस...

आणि राहिल्या फक्त आठवणींचा सहवास...

कु. ममता सामल
बी. कॉम. भाग - १

कसं असतं ना "आयुष्य"

अहंकार हा काटकोनासारखा
नेहमी ताठपणे उभा राहणारा...
दुःख नेहमी हा विशालकोनासारखा
नेहमी आकाशाकडे बघणारा...
नम्रता ही लघुकोनासारखी...
सगळ्यांचा आदर करणारी...
आयुष्य हे त्रिकोणासारखे
तीन अवस्था दर्शविणारे...
परिवार हा चौकोनासारखा...
हात हाती होऊन चालणारा...
जीवन हे वर्तुळासारखे
स्वप्नांभोवती फिरणारे...

कु. तेजश्री नक्का
बी. ए. भाग - ३

प्रेम

ज्याचं आपल्यावर खरचं प्रेम असतं.
तो कधीतरी चुकुन किंवा मुद्दाम सुध्दा
आपल्याला भलं बुरं बोलत असतात..
पण तो फक्त बोलतो त्याच्या मनात वाईट विचार नसतो.
ना तसं काही घडावं अशी इच्छा त्याच्या मनात असते.
उलट, त्यांच्या त्या दुखावणाऱ्या शब्दात
नाराजीमध्ये सुध्दा आपली काळजी आपल्याबद्दल
प्रेम आपल्याबद्दल वाटणारी काळजी हे
सगळं दिसत असतं म्हणूनच आपल्या लोकांचे शब्द किंवा
त्यांची नाराजीदेखील समजुन घेतली पाहिजे.
कारण ते आपल्यावर खरं प्रेम करत असतात.

कु. वैशाली कोले
बी. ए. भाग - २

कॉलेज

घरट्यातून पिलू उडावे तसेच,
कॉलेजचे दिवस उडून गेले...
काल पर्यंत जे आपले होते...
तेही हातातून निसटून गेले...
कॉलेजचे जीवनच निराळे...
कितीही जगले तरी कमीच वाटावे...
कॉलेजमध्येच प्रत्येकाला ओळखीचे
रंग नवीनच वाटावे...
कॉलेजमुळेच कळला मला...
मैत्रीचा अर्थ काय असतो...
शब्दातही सांगता येणार नाही....
असा तो निराळा भास असतो...
कॉलेजमुळेच प्रत्येकाच्या आशा पल्लवीत होतात..
मनाच्या त्या खोल गाभाऱ्यातून
उंच – उंच भराऱ्या घेतात.
त्याच कॉलेजचे शेवटचे दिवस असताना
डोळ्यातील पाणीही कमी पडते.
इतक्या काही वेदना होतात की,
मनातल्या यातनाचीही किव येते...
आपल्या मैत्रिणींना सोडताना फुलांचे
काटेच जणू मला टोचतात...
आयुष्यभर एकमेकांशिवाय राहण्याची ते सुध्दा
माझ्या सारखचं असफल प्रयत्न करतात.
त्या कॉलेजच्या आठवणी मला समुद्राच्या
लाटांसारख्या वाटतात. काही क्षण का होईना.
त्याची आठवण येताच मनामध्ये खूपच गोडवा
निर्माण करताना असे हे कॉलेजचे
रुप कधीच संपू नये असा
मला हट्टच करावा असं वाटतो.
अशा या मैत्रिच्या कॉलेजसाठी...
मला पुन्हा–पुन्हा जन्म घ्यावसा वाटतो....

– संकलन

कु. लावण्या इरकुल
बी. कॉम.भाग - ३

एखादाच असतो

सुखाचे भागीदार सर्वच असतात.
दुःखाचा भागीदार एखादाच असतो.
जळणारे तर बरेच जण असतात, परंतु
मेणबत्ती प्रमाणे जळणारा एखादाच असतो...

जगामध्ये मोठ-मोठ्या इमारती
बांधणारे खूप जण असतात परंतु
ताजमहल बांधणारा एखादाच असतो....

जाताना देण्यासारखं काही नाही
माझी मैत्री मात्र ठरणार आहे.
तुझी आठवण फक्त नेणार आहे....
दिवस इथले संपले ऋणं मैत्रीचे उरले

खटकले असेल काही तर ऊने-सुने ठेवु नकोस
ओळखीच्या वाटेवर कधी अनोळखी होवू नकोस....

कु. पायल नागूल
बी. कॉम. भाग - २

मैत्री

मैत्री असावी फुलासारखी
सुंगध एकमेकांना देणारी...
मैत्री असावी दिव्यासारखी
प्रकाशाने मने उजळणारी
मैत्री असावी सोन्यासारखी
शुध्दता जपणारी
मैत्री असावी चंद्रासारखी,
शितलता देणारी...
मैत्री असावी तुझ्यासारखी
सदैव साथ देणारी....

कु. स्वाती म्हंता
बी. कॉम. भाग - २

राजे...

तुमच्या नसण्याने राजे...
स्वार्थाच्या पायी माणसांनी
माणुसकीपण हरलयं
चारित्र्य खीचं तिनंच
विकायच ठरवलंय
निष्ठेला विकुन लोकांनी
लबाडीनं मन भरवलयं
तुमच्या नसण्याने राजे
खूप काही हरवलयं ।

पैशाच्या बळावर श्रीमंतानी
गरीबांना वाकवलयं
जन्मणाऱ्या प्रत्येक पिढीला
त्यांनी खोटेपणं शिकवलयं
अंतः करणाला देव विसरुन
त्याला मंदिरात बसवलंय
तुमच्या नसण्याने राजे
खूप काही हरवलंय ।।

सत्तेच्या मोहासाठी पुढाऱ्यांनी
जातीच साम्राज्य टिकवलयं
स्वतः नीचपणाचा पुतळा होऊन
नियतीला लाजवलयं
घात केलाय स्वतःच्या इमानीचा
अन् इतिहासलाच रडवलयं
तुमच्या नसण्याने राजे
खूप काही खूप काही हरवलंय ।।

कु. प्रियंका चारगुंडी
बी. कॉम. भाग -२

नातं वडिलांच...!

आयुष्याच्या प्रदीर्घ वाटेवर
एक कधी न फुलणारं नातं भेटतं
मनात संस्काराचं बीज लावणारं
स्वतःच्या कष्टानं घामानं
आपलं जीवन फुलवणारं
नातं ते वडिलाचं असतं.
वडील म्हणजे नक्की काय असतं
आपल्या मुलाला सावली देणारं
अन् स्वतः ऊन झेलणारं
वडील आपल्यात असतात
तेव्हां ते कधी जाणवत नाही
अन् निघुन गेल्यावर मात्र
डोळ्यात अश्रुंना जागा पुरत नाही
वडीलांशिवाय ते घर कसं
जसं पाखरं असुनसुध्दा
मोकळं वाटणारं घरटं
खरचं वडील नक्की काय असतात
वडील असतात मायेचं आभाळ
जे कधीही सरत नाही.
अन् उरतही नाही.

कु. प्रियंका चारगुंडी
बी. कॉम. भाग - २

खरी मैत्री

भूतकाळात घडून गेलेला
वर्तमान काळात घडत असलेला
जो काळ असतो तो म्हणजे
दुःखाच्या पाठीमागे लपलेले राग
रागाच्या पाठीमागे लपलेले प्रेम
प्रेमाच्या पाठीमागे लपलेला
भविष्यातील आनंद समजून
घेऊन जाणारी खरी मैत्री असते...

कु. पायल नागूल
बी. कॉम. भाग -२

प्रेम कथा

एक चिमणी एका गुलाबावर
खूप प्रेम करायची एके दिवशी
तिने आपलं प्रेम व्यक्त ही केलं
पण गुलाब म्हणाला,
जेव्हा माझा रंग लाल होईल
तेव्हांच मी प्रेम करेन
चिमणीने आपल्या प्रेमासाठी
आपले पंख कापले आणि
गुलाबावर रक्त सांडले
गुलाब लाला झाले पण गुलाबवर
प्रेम करणारी चिमणी मात्र राहिली नव्हती

कु. स्वाती म्हंता
बी. कॉम. भाग - २

मैत्री

कधी रुसले कधी हसले
कधी हरले तर कधी जिंकले
कधी धडपले तर कधी सोडले
कधी घाबरले तर कधी सारावले
कदी शब्दांनी दुखावले तर
कधी मायेने सुखावले
या वाटेवर चालताना
खुशित तुमच्या सुखावले
जगणे जरा ही गंमत नसली तरी
जेव्हा तुमची साथ असली तेव्हा
प्रत्येक पावलावर जे आधार देता
ते मैत्रीचा असते.

कु. रोहिणी पानगंटी
बी. कॉम. भाग - ३

मैत्री कशी असावी ?

मैत्री ही आईसारखी असावी
जसे लहान मुलांना माया देणारी.

मैत्री ही वडीलांसारखी असावी
जसे चुक केल्यास शिक्षा देणारी .

मैत्री ही शिक्षकांसारखी असावी
जसे अज्ञान मुलांना ज्ञानी बनवणारी

मैत्री ही चंद्रासारखी असावी जसे
अंधारात सर्वांना उजेड देणारी

मैत्री ही टॉम अॅन्ड जेरी सारखी असावी
जसे सतत लढत असणारी

मैत्री अशी असावी की
कष्टाच्या वेळेला साथ देणारी
अशी असावी मैत्री.

कु. रोहिणी पानगंटी
बी. कॉम. भाग - ३

फरक

पुरुष रडला तर सारे जग हेलावते
स्त्री रडली तर काळीज वाहुन जाते.

अश्रु एकच पण किंमत एक नसते.
जगात स्त्रीला काहीच का किंमत नसते.

पुरुष बोलला तर मन-मोकळा असतो
स्त्री बोलली तर कजाग ठरते.

नाही तर तिची बडबड वायफळच ठरते.
शब्द एकच पण जाणीव एक नसते .

पुरुष मेला तर घर उजाड होते.
स्त्री मेली तर सवत तीची जागा होते .

मृत्यु एकच पण त्यातही स्वार्थ असतो.
स्त्रीच्या मरण्यालाही काहीच का अर्थ नसतो...

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. ए. भाग - २



कु. अंकिता हिवारे
बी. कॉम. भाग - १

कु. स्वाती म्हंता
बी. कॉम. भाग - २

कु. विमल पवार
बी. ए. भाग -१

कु. पुजा कोंडी
बी. ए. भाग - ३

अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

पद्मप्रतिमा 2019-20

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन करताना डॉ. बी. एन. कांबळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. आर. के. वडजे, प्रा. रंजना बनसुडे व उपस्थित विद्यार्थी व इतर मान्यवर....

" राष्ट्रीय सेवा योजना " दिनानिमित्त वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. टी. व्ही. हिंदे, डॉ. आर. के. वडजे व इतर उपस्थित मान्यवर...

राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांच्या वतीने आयोजित " क्रांती दिना " दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. प्रभाकर कोळेकर व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. टी. एन. हिंदे, डॉ. आर. के. वडजे व आदि उपस्थित मान्यवर.....

साक्षरता व हिंदी पंधरवडा उपक्रमाच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नंगाथर बिराजदार व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. प्राजक्ता जोशी व डॉ. आर. के. वडजे....

महाविद्यालयातील आरोग्य केंद्र व प्रिसीजन सोशल फाउंडेशन यांच्यातर्फे आयोजित सर्व समावेशक लैंगिक शिक्षण या विषयावरील कार्यशाळेत विद्यार्थीनींचे हिमोग्लोबीन तपासणी करताना...

महात्मा गांधी जयंती निमित्त वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. आर. के. वडजे, डॉ. शंकर राजे, डॉ. पंचप्पा वाघमारे व उपस्थित विद्यार्थीनी....

राष्ट्रीय सेवा योजना विभागकडुन आयोजित महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त प्राचार्य डॉ. राजेंद्र शेडगे यांच्यासह उपस्थित प्राध्यापक व कार्यालयिन कर्मचारी वर्ग....

आयक्युएसी, इतिहास व एआयएचसी विभाग यांच्यावतीने आयोजित सोलापूर इतिहास संशोधन मंडळाच्या १६ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विकास कदम व्यासपीठावर उपस्थित संस्थेचे अध्यक्ष- श्री. काशिनाथ गड्डम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेडगे, बीज भाषक डॉ. एन. के. बागल, विश्वस्त व उपस्थित मान्यवर

श्री मार्कंडेय महायुनी जन्मोत्सवानिमित्त श्री मार्कंडेय फाऊंडेशन व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आयोजित वाहतुकी संदर्भात व्याख्यानाची काळजी या उपक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक श्री. आनंद मलाळे व व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र शेडगे यांच्यासह उपस्थित मान्यवर...

महाविद्यालय परिसरात श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेविका....

गुरु पौर्णिमानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेडगे व व्यासपीठावर उपस्थित डॉ. अॅनी जॉन, डॉ. प्रांजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे, डॉ. शिवानंद भाजे व डॉ. टी. एन. शिंदे....

महाविद्यालय परिसरात श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेविका....

हिंदी विभाग

कभी हार नहीं होती ।

लहरों से डर कर नौका पार नहीं होती,

कोशिश करने वालोंकी कभी हार नहीं होती ।

असफलता एक चुनौती है, इसे स्विकार करो,

क्या कमी रह गई, देखो और सुधार करो ।

जब तक न सफल हो, नींद चैन को त्यागो तुम,

संघर्ष का मैदान छोडकर मत भागो तुम ।

कुछ किए बिनाही जय जयकार नहीं होती,

कोशिश करनेवालों की कभी हार नही होती ।

- हरिवंशराय बच्चन

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	विद्यार्थिनींचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग			
०१.	**छत्रपती शिवाजी**	कु. संध्या सरवदे	बी. ए. भाग-१	४३
०२.	**मेरे सपनोंका भारत**	कु. विद्या जिंदम	बी. ए. भाग-१	४४
०३.	**अपनी राष्ट्रीय भाषा हिंदी**	कु. विद्या जिंदम	बी. ए. भाग-१	४५
०४.	**कृष्णा सोबती व्यक्तित्व**	कु. अंकिता परकीपंडला	बी. ए. भाग-३	४६
०५.	**नरेंद्र मोदी**	कु. लक्ष्मी रापर्ती	बी. कॉम. भाग-२	४८
०६.	**मुदित हुए विवेकानंद**	कु. ललिता बोडा	बी. ए. भाग-३	५०
०७.	**करुणा का स्नान**	कु. तेजश्री नक्का	बी. ए. भाग-३	५०
०८.	**प्रगती का राज**	कु. अंकिता परकीपंडला	बी. ए. भाग-३	५१
०९	**योग्यता की पहचान**	कु. अश्विनी कोंडापुरे	बी. ए. भाग-३	५१
	पद्य विभाग			
०१.	**कविता**	कु. विद्या जिंदम	बी. ए. भाग-१	५२
०२.	**शायरी**	कु. अनुराधा कोंगारी	बी. कॉम. भाग-२	५२
०३.	**शायरी**	कु. उमा खारे	बी. ए. भाग-१	५३
०४.	**पापा पर शायरी**	कु. उमा खारे	बी. ए. भाग-१	५३
०५.	**दोस्ती**	कु. उमा खारे	बी. ए. भाग-१	५३
०६.	**क्या कहे पापा के बारेमे ?**	कु. अनुराधा कोंगारी	बी. कॉम. भाग-२	५४

-: व्यक्तिचित्र लेख :-

छत्रपती शिवाजी

कु. संध्या सरवदे
बी. ए. भाग - १

छत्रपती शिवाजी भारत माँ के उन सपुतो मे वे एक है जिन पर इतिहास सदा गर्व करता रहेगा, उन्होने अपने त्याग, वीरता एवं बल से राष्ट्रकुल के राष्ट्र शक्ती का विस्तार किया शिवाजी का जन्म सन १६३० में शिवनेरी नामक दुर्ग मे हुआ । इनके पिता शहाजी भोसले एक जहांगिरदार थे । शहाजी का प्रभाव शिवाजी पर बहोत अच्छी तरह से हुआ । शिवाजी की माता जिजाबाई उत्तम विचारों की महिला थी । शिवाजी के पिता शहाजी ने अनेक प्रदेश बलपूर्वक बिजापूर के बादशाह के राज्य में मिलाए । शिवाजी की शिक्षा के लिए दादोजी कोंण्डदेव को रखा गया जिजाबाई ने शिवाजी को हिंदु संस्कार दिए। वे शिवाजी को पौराणिक गाथाएँ सुनाती तथा कृष्ण अर्जून जैसे आदर्श वीरों के चरित्र वर्णन करती... कोण्डदेव जी शिवाजी को अस्त्र-शस्त्र चलाने, घुडेसवारी आदि के निरंतर अभ्यास करते तथा राजनैतिक मसलोपर विचार - विमर्श करते । बचपनसेही शिवाजी साहसी वीर थे और हिंदु धर्म और संस्कृती की रक्षा की भावना उनके खून में समा गई थी । शिवाजीने महाराष्ट्र के वन्य प्रांतो में रहने वाले मावळी तथा अन्य जन-जाती के वीर और साहसी युवकों को संगठता करना प्रारंभ किया । धीरे-धीरे शिवाजी की शक्ती बढती गई उनकी उस सेना मे साहसजोश एवं उमंग तो थी परंतु वे साधनहीन थे । उन्होंने बीजापूर के खजाने के मार्ग से ही लुट लिया तथा एक पुराने दुर्ग पर भी अधिकार कर लिया। शिवाजी की प्रथम विजय थी यहाँ-वहाँ छापे मारकर उन्होंने अपनी आर्थिक शक्ती बढाई ।

बीजापूर नरेश ने शिवाजी को भेट के बहाने मारने का षडयंत्र रचा । शिवाजी को गुप्तचरों से अफझल खाँ की नियत का पता चल चुका था । भेट का स्थान जंगल में था । अफझल खाँ अपनी बडी सेना के साथ आया था । उसने छल से गले मिलने के बहाने शिवाजी पर तलवार से वार करना चाहा, परंतु शिवाजी ने कटार से उसका पेट फाड डाला । उनकी सेना ने छिपे यवन सैनिकों का काम तमाम कर दिया ।

शिवाजी को कैद करने के लिए शाहिस्ता खाँ को दल-बल समेत भेजा गया । शिवाजी के सैनिकों ने बेश बदलकर शाहिस्ता खाँ के सैनिकों पर धावा बोला और तब मजबूर होकर उसे भागना पडा । औरंगजेब को अपनी इस हार पर बहुत गुस्सा आया ।

फिर उसके बाद १६६४ में सुरत शहर को लुटा । इस लुट में शिवाजी को बहोत संपत्ती की प्राप्ती हुई । औरंगजेब ने हिंदुओ से संधी का प्रस्ताव भेजा । उसके दरबार में महाराज जयसिंग तथा शिवाजी उपस्थित हुए । वहाँ शिवाजी को अनादर सहना पडा । इससे नाराज होकर उन्होंने भरे दरबार में महाराज जयसिंग तथा शिवाजी को कैद कर लिया ।

शिवाजी औरंगजेब की कैद से रिहा होने तथा पुनः मुगलों पर आक्रमण की योजना बनाने लगे । एक उन्होंने बीमारी के बहाने मिठाई बँटवाना आरंभ किया । वे मिठाई के टोकरे में छिपाकर कैदखाने से भागे- छिपते -छिपाते रायगढ पहुँचे । वहाँ उनका राज्याभिषेक से हिंदू को उनका राजा मिल गया, शिवाजी को स्वंतत्र्य राज्य स्थापना हुआ था ।

आजीवन हिंदु जाती के संगठन के लिए इस वीर सैनिक ने संघर्ष किया । इ.स. १६८० मे उनका स्वर्गवास हो गया । वो देशभक्त थे जिन्होंने आजीवन जननी की सेवा में सर्वस्वी त्याग किया ।

-: सामाजिक लेख :-

मेरे सपनों का भारत

कु. विद्या जिंदम
बी. ए. भाग - १

स्वतंत्रता पाने के बाद कृषि, उद्योग, व्यापार विज्ञान शिक्षा, संरक्षण आदि क्षेत्रो मे भारत ने काफी प्रगती की है । विश्व के विकासशील देशोमें भारत का अग्रस्थान है । इसके बावजूद हमारा देश अपनी मूल समस्याओंसे मुक्ति नही पा सका है । जब मैं अपने देश की वर्तमान तस्वीर देखती हूँ । तो लगता है की यह तो मेरे सपनों का भारत नहीं है ।

मेरे सपनों का भारत तो वह भारत है । जिसमें गांधीजी के रामराज्य का आदर्श होगा । वह ऐसा भारत है जिसके लिए हमारे देश के शहिदों ने अपने अनमोल प्राणों की बली चढा दी थी । मेरे सपनों के भारत में 'स्वराज्य' ही नही बल्कि 'सुराज्य' भी होगा ।

मेरी कल्पना का भारत सब तरह से एक फलता फुलता देश होगा । गाँवो मे किसान अपनी भूमी के मालिक होंगे । उनके खेतो में हरियाली और उनके फलते फुलते होंगे । मिलो – कारखानों में प्रसन्नता से काम करते हुए मजदूर देश को समृध्द बनाने में जुटे होंगे । देश में न किसी के सामने बेकारी का प्रश्न होगा और न भूख किसी की मृत्यू का कारण बनेगी । सबके तन पर कपडा होगा और सबके दिल में खुशी होगी ।

मेरे सपनों के भारत में छोटे गाँव मे भी प्राथमिक शाला होगी । बडे गाँ मे विद्यालय और कस्बों में महाविद्याल ज्ञान– विज्ञान का प्रकाश फैलाते होंगे । जगह–जगह पुस्तकालयों और वाचनालयों की स्थापना होगी । उच्च शिक्षण के द्वारा सबके लिए खुले होंगे । शिक्षण में औद्योगिक और तांत्रिकी विषयों को महत्व पूर्ण स्थान दिया जाएगा । हमारे विद्यालय सरस्वती के सच्चे मंदिर होंगे ।

मेरे सपनों के भारत में रोगो को लोगो के जीवन पर हावी नही होने दिया जाएगा । शहरी और देहाती इलाको में चिकित्सा की उत्तम सुविधाएँ उपलब्ध रहेंगी । गाँव – गाँव दवाखाने होंगे । गाँव का डॉक्टर किसी ग्रामवासी को बेमौत नही मरने देगा ।

हमारे देश की संरक्षण व्यवस्था लाजवाब होगी। हमारी सेनाएँ शत्रुओं के हमारी सीमाओंपर बुरी नजर डालने नहीं देगी । देश में कानून का सख्ती से पालन होगा । चोरो, डाकुओं, तस्करो और काला बाजार करनेवालों को अपनी काली कमाई के दरवाजे बंद कर देने पडेंगे । भ्रष्टाचारीयों और देशद्राहोयो को कडी सजाएँ देकर उन्हे उनके पापो का फल चखाया जाएगा ।

मेरे सपनों के भारत में सभी देशवासी एकता सुत्र में बंधे होंगे। उनमें प्रांतवाद, भाषावाद तथा धार्मिक संकीर्णता का विष न होगा । सब खुले दिल से राष्ट्र को सुखी, समृध्द और शक्तीशाली बनाने में लगे होंगे । समाज में ऊँच–नीच, जाती–पाँती आदि की दरारे न होगी । दहेज जैसी कुप्रथाओं का कही स्थान न होगा।

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागाकडुन आयोजित मराठी भाषा दिनानिमित्त साहित्यिक पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर व भालचंद्र नेमाडे यांचे प्रतिमापूजन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीनी.....

प्रकाश गोविंदलाल सोनी सार्वजनिक विश्वस्त समितीच्या अध्यक्षा सौ. ललित सोमाणी यांच्याकडुन देणगी रु. २५०००/- चा धनादेश स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे व याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित श्री.प्रकाश सोमाणी व डॉ.श्रुती पगडबाळकर.

गुणवंत विद्यार्थी

बी. ए. भाग-१ मध्ये प्रथम

कु. अश्विनी नडीमेट्ला

बी. ए. भाग-२ मध्ये प्रथम

कु. स्वप्नाली गुजर

बी. ए. पदवी मध्ये प्रथम
बी. ए. भाग-३ (हिंदी) मध्ये प्रथम

कु. पुनम चिल्ला

बी. कॉम. भाग-१ मध्ये प्रथम

कु. ऐश्वर्या दासरी

बी. कॉम. भाग-२ मध्ये प्रथम

कु. मिनाक्षा शेख

बी. कॉम. भाग-३ मध्ये प्रथम

कु. हर्षदा हिरनवाले

बी.सी.ए.भाग-१ मध्ये प्रथम

कु. शुभांगी बहिरवाडे

बी.सी.ए.भाग-२ मध्ये प्रथम

कु. विद्या बिर्रू

बी.सी.ए.भाग-३ मध्ये प्रथम

कु. पल्लवी मादास

बी.ए.भाग-३
(मराठी विभाग) मध्ये प्रथम

कु. प्रगती सुरवसे

बी.ए.भाग-३
(इंग्रजी विभाग) मध्ये प्रथम

कु. सोनाली चौगुले

बी.ए.भाग-३
(इतिहास विभाग) मध्ये प्रथम

कु. पुजा खांडेकर

फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन शाखा सोलापूर व प्रिसिजन फाउंडेशन, सोलापूर अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या अनुश्री युथ क्लबकडून क्रिडा साहित्याचा स्वीकार करताना प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, डॉ. रजनी दळवी व उपस्थित फॅमिली प्लॅनिंग असोशिएशनचे सदस्य व विदयार्थीनी.

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयातील बी.सी.ए. विभागाच्यावतीने सायबर गुन्हे शाखा, सोलापूरचे पोलिस विरीक्षक श्री.व्ही.बी.वायस यांच्या मुलाखतीप्रसंगी विदयार्थीनीचे स्वागत करताना सायबर गुन्हे शाखेचे डी.एस.पी. श्री. बापू बंडगर.....

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयात उच्च शिक्षण संस्था चालकांची सेवाभावी संस्था व सोलापूर विदयापीठ प्राचार्य असोशिएशन यांच्या सहविचार सभेप्रसंगी संस्थाचालक श्री.मनोहर सपाटे यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत गड्डम व व्यासपीठावर उपस्थित संस्था चालक संघटनेच्या अध्यक्षा मा. पद्मजादेवी मोहिते, प्राचार्य संघटनेचे सचिव प्राचार्य जयप्रकाश बिले व आदी मान्यवर

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयात उच्च शिक्षण संस्था चालकांची सेवाभावी संस्था व सोलापूर विदयापीठ प्राचार्य असोशिएशन यांच्या सहविचार सभेप्रसंगी प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष- श्री लक्ष्मीकांत गड्डम व महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे प्राचार्य संघटनेचे सचिव प्राचार्य जयप्रकाश बिले व आदी मान्यवर.

कै. अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांच्या ३१ व्या पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी प्रतिमेचे पूजन करताना प्रमुख पाहुणे श्री.जयंत आकेन संस्थेचे ,महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, श्री व्यंकटेश गुंडेली,डॉ.शिरीष भोसले व डॉ.रजनी दळवी व उपस्थित मान्यवर...

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयात महामुनी मार्कंडेय जयंतीप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राधयापक व कार्यालयीन कर्मचारी वर्ग.

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयात राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांच्यावतीने आयोजित महात्मा गांधी जयंती व हुतात्मा दिन कार्यक्रमप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वर्ग

ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्यावतीने आयोजित भारताचे राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वर्ग, संस्थेचे खजिनदार - श्री. भागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे विश्वस्त व उपस्थित मान्यवर...

७२ व्या प्रजासत्ताक दिनाप्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्री . श्रीनिवास कोंडी व व्यासपीठावर उपस्थित संस्थेचे विश्वस्त श्री हरिष कोंडा, श्री.व्यंकटेश आकेन व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे.

ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागाकडून आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त भरविण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, मराठी विभागप्रमुख डॉ.संजय लांडगे व उपस्थित प्राध्यापक वर्ग

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समिती भेटीप्रसंगी प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे व उपस्थित समिती सदस्य व रा.से.यो. विभागातील प्राध्यापक वर्ग..

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

नॅक मुल्यांकित दर्जा 2017 – 'B++' (CGPA-2.76)

पद्मप्रतिमा

२०२०-२१

• संपादक •

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

• कार्यकारी संपादक •

प्रा. डॉ. तुकाराम नारायण शिंदे

• विभागीय संपादक •

मराठी विभाग : प्रा. डॉ. संजय लांडगे

हिंदी विभाग : प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी

इंग्रजी विभाग : प्रा. डॉ. ॲनी जॉन

• कार्यालयीन व्यवहार •

श्री. व्यंकटेश गाजूल

- **अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय**

सिटी सर्व्हे क्र. ९७०५/९/अ,/२अ, रविवार पेठ,
राजेंद्र चौक, सोलापूर.
दूरध्वनी : ०२१७ - २७४३९०८
website :www.arburla.org
email : arburla@gmail.com

- **मुखपृष्ठ**

- कु. लक्ष्मी रापर्ती

- **ग्राफिक्स डिझाईन व मुद्रक**

श्रीकांत ग्राफीक्स्
(रामगोपाल म्याकल)

- **मांडणी व सजावट**

डॉ. टी. एन. शिंदे

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,
अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
यांनी हे पत्र खाजगी वितरणासाठी प्रकाशित केले आहे.

या अंकातील मजकूरांशी संपादक मंडळ
सहमत असेलच असे नाही.

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

• महाविद्यालयीन विकास समिती •

२०२०-२१

अ.क्र.	नांव	पद
१.	श्री. काशिनाथ परशुराम गड्डम	अध्यक्ष
२.	श्री. दशरथ नारायण गोप	सदस्य
३.	प्रा. डॉ. श्री. तुकाराम नारायण शिंदे	सदस्य
४.	प्रा. डॉ. शिरीष नागनाथ भोसले	सदस्य
५.	प्रा. डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	सदस्य
६.	प्रा. डॉ. श्री. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	सदस्य
७.	श्री. व्यंकटेश मल्लेशम गाजूल	सदस्य
८.	प्रा. डॉ. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी	सदस्य
९.	श्री. दिनेश भुमय्या यन्नम	सदस्य
१०.	सौ. मिनाक्षी दत्तात्रय मेडपल्ली	सदस्य
११.	श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी	सदस्य
१२.	प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे	सचिव

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या
पद्मप्रतिमा वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा ।

Agents Code No. - 04672944

संतोषकुमार एस. येमुल

सदस्य अभिकर्ताओं के लिए अध्यक्ष कल्ब

Santoshkumar S. Yemul

Member Chairman's Club for Agents

Mob. : 9325262123, 9822132865

मराठी विभाग

माझे गीत....

असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे....

हवेत ऊन भोवती, सुवास धुंद दाटले
तसेच काहिसे मनी, तुला बघून वाटले
तुणांत फुलापाखरु तसे बसेल गीत हे....

स्वयें मनात जागते, न सूर ताल मागते
अबोल राहूनी स्वतः अबोध सर्व सांगते
उन्हें जळांत हालती तिथे दिसेल गीत हे....

कुणास ठाउके, कसे कुठे उद्या असू
निळ्या नभांत रेखिली, नकोस भावना पुसू
तुझ्या मनीच राहिले, तुला कळेल गीत हे....

- शांता ज. शेळके

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	लेखाचा प्रकार	विद्यार्थीनीचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग				
०१.	कोरोना व्हायरस - कोव्हीड - १९	- माहितीपर लेख	- कु. नुस्मिता कानकुर्ती	- बी. कॉम. भाग-१	०७
०२.	अर्थ व्यवस्था	- अर्थकारण माहितीपर लेख	- कु. सुजाता बिराजदार	- बी. कॉम. भाग-२	०८
०३.	कोरोना व मजूर	- माहितीपर लेख	- कु. विद्या जिंदम	- बी. ए. भाग - ३	०९
०४.	भारतीय अर्थव्यवस्था	- अर्थकारण माहितीपर लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	१०
०५.	व्यसनाधीनता आणि युवा पिढी	- वैचारिक लेख	- कु. संध्या सरवदे	- बी. ए. भाग-२	१२
०६.	कोरोना नंतरचे जग	- वैचारिक लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	१३
०७.	नवे कृषी धोरण आणि भारतीय शेतकरी	- अर्थकारण वा वाणिज्य	- कु. मिनबा शेख	- बी. कॉम. भाग-३	१४
०८.	२१ व्या शतकातील महिलांची स्थिती	- सामाजिक लेख-	- कु. अश्विनी क्षीरसागर	- बी. ए. भाग-३	१६
०९.	वाणिज्य : विस्तार व व्याप्ती	- वाणिज्यपर लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	१७
१०.	स्वच्छता ही काळाची गरज	- पर्यावरणपर लेख	- कु. रोहिणी गोन्यात	- बी. कॉम. भाग-३	१९
११.	कोरोना	- माहितीपर लेख	- कु. सुजाता बिराजदार	- बी. कॉम. भाग-२	२०
१२.	स्वच्छता हेच जीवन	- पर्यावरणपर लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	२१
१३.	माझे बडील हेच माझे हिरो	- आत्मकथनात्मक लेख	- कु. भावना आर्मची	- बी. कॉम. भाग-२	२२
१४.	आजची स्त्री सुरक्षित आहे का?	- सामाजिक लेख	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	२४
१५.	क्रिकेट आणि मी	- विनोदी लेखन	- कु. तुलसी येमुल	- बी. कॉम. भाग-१	२६
१६.	सायबर वर्ल्ड	- मुलाखत	- कु. विद्या बिर्रु	- बी. कॉम. भाग-२	२८
१७.	त्यागमूर्ती रमाई	- व्यक्तिचित्रपर लेख	- कु. प्रियंका देवळे	- बी. ए. भाग-३	३१
१८.	महात्मा गांधीची केंद्रे पर्यटनासाठी उपयुक्त	- माहितीपर लेख	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	३३
१९.	मोबाईलचे जग	- माहितीपर लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	३५
२०.	कोरोना : भारतातील सामाजिक आर्थिक परिस्थिती	- वैचारिक लेख	- कु. पूजा मुनीपल्ली	- बी. कॉम. भाग-३	३६
२१.	कुटुंब आणि पोलीस	- आत्मकथनात्मक लेख	- कु. वैशाली कोले	- बी. ए. भाग-३	३७
२२.	बापलेकीच मायेच नातं	- सामाजिक लेख	- कु. मधुरी कामुर्ती	- बी. सी. ए. भाग-१	३८
२३.	हारून तो जिंकला	- कथा - लघुकथा	- कु. स्मिता त्रिमल	- बी. कॉम. भाग-१	३८
२४.	विज्ञानयुगातील माणूस	- सामाजिक लेख	- कु. स्मिता त्रिमल	- बी. कॉम. भाग-१	३९
२५.	सर्वसमावेशक शहर सोलापूर	- माहितीपर लेख	- कु. उमा हेगडे	- बी. कॉम. भाग-३	४०
२६.	कोरोना योध्दा	- माहितीपर लेख	- कु. संध्या सरवदे	- बी. ए. भाग-२	४१
२७.	वसुंधरा बोलू लागली तर....	- पर्यावरणपर लेख	- कु. पूजा बदलापूरे	- बी. कॉम. भाग-१	४२
२८.	सकारात्मक विचार : जगण्याचा मंत्र	- माहितीपर लेख	- कु. वैष्णवी मादगुंडी	- बी. कॉम. भाग-१	४३
	पद्य विभाग				

अ.क्र.	कवितेचे नाव	विद्यार्थीनीचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
०१.	युवक असावा असा....	- कु. नुस्मिता कानकुर्ती	- बी. कॉम. भाग-१	४४
०२.	आयुष्य	- कु. नम्रता रोभानम	- बी. कॉम. भाग-१	४४
०३.	लॉकडाऊनची शाळा	- कु. सुलोचना डोनरे	- बी. ए. भाग-३	४४
०४.	छोटया या आयुष्यात...	- कु. धृतिका गड्डम	- बी. ए. भाग - २	४४
०५.	तुझा भाऊ	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	४४
०६.	कोण आहेत हे.....!	- कु. अंजुम बागेवाले	- बी. ए. भाग -१	४४
०७.	आई	- कु. नुस्मिता कानकुर्ती	- बी. कॉम. भाग-१	४५
०८.	स्त्री जन्मा	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	४५
०९.	कोरोना जा ना....	- कु. पूजा मुनीपल्ली	- बी. कॉम. भाग-३	४५
१०.	नव्वा या वर्षात	- कु. ऐश्वर्या आडम	- बी. कॉम. भाग-३	४५
११.	जीवन	- कु. अंजुम बागेवाले	- बी. ए. भाग -१	४५
१२.	आयुष्यात असे एक नातं असावं...	- कु. नुस्मिता कानकुर्ती	- बी. कॉम. भाग-१	४५
१३.	आई आणि बाबा	- कु. आस्ती देवकर	- बी. ए. भाग -३	४५
१४.	मृत्यू	- कु. वृषाली पवनंडे	- बी.सी.ए.भाग-१	४६
१५.	उगवाय का तुम्ही ?	- कु. सुलोचना डोनरे	- बी. ए. भाग - ३	४६
१६.	आदर्श मित्र	- कु. अंजुम बागेवाले	- बी. ए. भाग-१	४६
१७.	दुणावा म्हणजे प्रेम	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम.भाग - ३	४६
१८.	देव...	- कु. पूजा गाडवे	- बी. कॉम.भाग-२	४६
१९.	मुलींनी बानावे तरी कसे ?	- कु. पूजा गाडवे	- बी. कॉम. भाग-२	४७
२०.	शिक्षक म्हणजे	- कु. स्नेहल वेमुल	- बी. कॉम. भाग-३	४७
२१.	आयुष्य असचं उगावचं असतं....	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	४७
२२.	आयुष्य	- कु. नम्रता सभारेम	- बी. ए. भाग - १	४७
२३.	कोणी नसतं	- कु. पुनम कोरे	- बी. ए. भाग - ३	४८
२४.	काव सांगू	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	४८
२५	आयुष्याला द्यावे उत्तर....	- कु. स्वप्नाली गुजर	- बी. ए. भाग-३	४८

– माहितीपर लेख –

कोरोना व्हायरस
कोव्हीड - १९

कु. सुस्मिता कानकुर्ती
बी. कॉम. भाग-१

कोरोना व्हायरस हा अतिसुक्ष्म व घातक विषाणु आहे या व्हायरसला कोव्हीड १९ असे ही म्हटले जाते. हा व्हायरस सर्वप्रथम डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधील वुहान या शहरात आढळून आला होता. 'जागतिक आरोग्य संघटना' (डब्ल्यु. एच. ओ.) ने या व्हायरसला महामारी म्हणून घोषित केले आहे. हा संसर्गजन्य रोग असल्याने याचा प्रसार जगभरातील जवळपास १८० पेक्षा अधिक देशामध्ये वेगाने पसरला आहे.

आज अखेर संपूर्ण जगभरात या विषाणूच्या संसर्गामुळे लाखोंच्या संख्येने लोक मृत्यूमुखी पावले आहेत. हा आजार पूर्णपणे बरा करण्यासाठी यावर औषधे, लस तयार करण्यासाठी जगभरातून संशोधन प्रयत्न केले जात आहेत.

(कोव्हीड १९) कोरोना कसा पसरतो ?

हा एक संसर्गजन्य रोग असल्यामुळे याचा प्रसार हा वेगाने होतो. प्रमुख्याने हा आजार कोरोनाबाधित व्यक्तीच्या संपर्कातून किंवा त्यांच्या खोकण्याच्या अथवा शिंकण्याच्या त्यातून निर्माण होणाऱ्या थेंबापासून तो इतरांमध्ये पसरतो.

लक्षणे :

ताप, कोरडा खोकला, श्वास घेण्यास त्रास इ. कोरोनाची लक्षणे आहेत. पण ही लक्षणे दिसायला सामान्य असली तरी ती जीवघेणी ठरु शकतात. हा व्हायरस शरीरामध्ये गंभीर प्रमाणात परिणाम करतो. त्यामुळे व्यक्तीच्या जीवाला धोका निर्माण करतो.

कोरोनाला रोखण्याचा उपाय –

कोरोनाला रोखण्यासाठी तसेच त्यापासून स्वत:चा बचाव /संरक्षण करण्यासाठी आपण खालील उपाय करु शकतो.

१. नियमित मास्कचा वापर करणे.
२. नियमित सॅनिटायझरचा वापर करणे,साबणाने हात स्वच्छ धुणे.
३. खोकताना किंवा शिंकताना नेहमी हातरुमालचा वापर करणे.
४. हात न धुता वारंवार चेहऱ्याला हात लावणे टाळणे.
५. गरज नसताना सार्वजनिक ठिकाणावर जाणे टाळणे.
६. सार्वजनिक ठिकाणी किमान २ मीटरचे अंतर ठेवणे आवश्यक आहे.

अशा प्रकारचे आपण आपली कुटंबाची काळजी घेतली तर नक्कीच आपण आपले कोरोनापासून रक्षण करु शकतो व त्याच्या वाढत्या संसर्गाला देखील रोखू शकतो.

कु. तुलसी सोमा
बी. कॉम.भाग-१

– अर्थकारण माहितीपर लेख –

अर्थ व्यवस्था

कु. सुजाता बिराजदार
बी. कॉम. भाग-२

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती किंवा शेतीशी संबधित उद्योगांवर चालतो. परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलीकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावायला लागला आहे. भारत हा अति–कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठी निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन औषधनिर्माण आणि दूरसंचार, जहाज निर्माण विमान निर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमता ही वेगाने वाढताना दिसत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग अवलंबण्यात आला. भारतात सुरुवातीस खाजगी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील सहभागावार परदेशांशी व्यापारावर आणि इतर देशांकडून भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारताने हळूहळू परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करुन आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधारांद्वारे खुली करायाला सुरुवात केली आहे. मात्र राजकाराणातील मतभेद आणि भिन्न विचारधारांमुळे, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण आणि विशिष्ट क्षेत्रामधील खाजगी आणि परकीय सहभागाला मार्ग खुला करणे अशा आर्थिक सुधारांमधील काही महत्वाच्या गोष्टी मंद गतीने पुढे सरकत आहेत.

अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि सामाजिक विषमता व वाढती आर्थिक दारिद्रय /गरीबी हे भारतातील महत्त्वाचे प्रश्न आहेत मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गरीबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते व तसेच भारताने केंद्रीत नियोजनाच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब केला. अर्थव्यवस्थेचा समतोल विकास व्हावा. तसेच देशाच्या नैसर्गिक संपत्तीचा सर्वांना समान उपयोग व्हावा असा यामागचा उद्देश होता हे अर्थव्यवस्थेचे नियोजन पंचवार्षिक योजनांद्वारे होते.

कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

– माहितीपर लेख –

कोरोना व मजूर

कु. विद्या जिंदम
बी. ए. भाग – ३

या जगामध्ये मनुष्याने अनेक रोगाचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगभरात एका अशा व्हायरसने थैमान घातलय की ज्यामुळे संपूर्ण दुनियेची झोप उडाली आहे. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्यामुळे सर्वाचे जीवन जगणे कठीन बनले आहे. या व्हायरसचे नाव आहे कोरोना व्हायरस...

देशातील मजूर बिकट परिस्थितीतून जात आहे आजच्या या स्थितीचा परिणाम त्यांच्या कुटुंबाला पुढील दहा वर्षे भोगवे लागू नये म्हणून नियोजनकर्ते आणि अमंलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने गंभीर विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. कष्टकरी बांधवाच्या यातना कमी होण्यासाठी शासन प्रशासनाला वाट दिसावी ही इच्छा करण्यात गैर काहीच नाही.

सध्या संपूर्ण जग कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे त्रस्त आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. कोणत्याही देशामध्ये आर्थिक संकट ओढावले की सर्वात आदी गरीबी, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर आणि महिला आदी घटक त्याचा बळी ठरतात. आपल्या देशात जवळपास दोन महिने कुठलीही आर्थिक उलाढाल नव्हती संपूर्ण देशात लॉकडाऊन होता. त्यामध्ये सर्वात जास्त हाल स्थलांतरित मजुरांचे, त्यांच्या कुटुंबाचे होत आहेत रोजगार नाही. रहायला घर नाही. पोटाला अन्न व पिण्यासाठी स्वच्छ पाणी नाही. लहान मुलांची काळजी महिलांची सुरक्षितता आणि भविष्याची चिंता या आणि अशा अनेक गंभीर समस्यांनी या वर्गाला ग्रासले आहे.

सन २०१८–१९ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार ९३% कामगार अनौपचारिक अर्थव्यवस्थेमध्ये काम करतात तर निती आयोगाच्या अभ्यासानुसार हा आकडा ८५% आहे. परंतु अनौपचारिक कर्मचाऱ्यांचे योगदान आणि त्यांचे प्रमाण ही वास्तविकता आहे हे कामगार भारताच्या राष्ट्रीय उत्पनाच्या ३०% वाटा उचलतात आणि तो देशाच्या मानवी भांडवलाचा एक मोठा भाग मानला जातो पण याच समूहावर आज भयंकर परिस्थितीला सामोरे जाण्याचे दुर्देव ओढवले आहे. स्थलांतरित कामगारांची समस्या भारतापासून वेगळी राहुच शकत नाही. देशभरात ४० दशलक्षहून अधिक स्थलांतरित कामगार आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाला दिलासा मिळणे कठीण आहे. या वर्गामध्ये बहुतेक खेड्यापाड्यामधून घरकामासाठी आलेल्या महिला, पुरुष, वाहनचालक, सुरक्षारक्षक किंवा बांधकामावरती रोजंदारी म्हणून काम करणारी कुटुंब आहेत. त्यात पायाभूत सुविधाच्या प्रकल्पापासून रस्त्यावर विविध वस्तु विकून गुजराण करणारेही अनेक आहेत.

राज्य आणि केंद्र शासनाच्या कोव्हिड १९चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन करण्याच्या घोषणेनंतर काही तासांतच लाखो स्थलांतरीत कामगार आपल्या घराकडे जाण्यासाठी निघाले. परंतु बस नाही, ट्रेन बंद, कुठलेही प्रवासाचे साधन उपलब्ध नाही. अशा परिस्थीत हे मजुर त्यात पुरुष महिला आपली मुले आणि भरलेल्या पिशव्या घेऊन महामार्गाने आपापल्या गावी जाताना दिसू लागली. काहीनी शेकडो मैल दूर जाण्याचा प्रयत्न केला. यात काही लोकांचा जीवही गेला ही परिस्थिती खूप भयानक आहे. दुर्बल मजुर या संकटाशी दोन हात करण्यासाठी तयार नव्हता. कष्टकऱ्यांनी दिवस–रात्र एक करुन ज्यांच्या तिजोऱ्या भरल्या ते लोक मात्र आपल्या कुंटुंबासोबत लॉकडाऊन साजरा करत असल्याचे विरोधाभासी चित्रही दिसून आले. अर्थात याला सन्मानीय अपवाद आहेत. हे नाकरता येत नाही. पण एकूणच मजुरांच्या वाट्याला आलेली फरपट सामाजिक विषमता अधोरेखित करणारी आहे. भारताला लॉकडाऊन, लोकसंख्येचे प्रमाण आणि त्याची घनता लक्षात घेता एक व्यापक तार्किक आणि अमंलबजावणीचे आव्हान होतेच परंतु त्याच्या अमंलबजावणीने विषाणुचा प्रसार रोखला जाईल हीच एक आशा आणि विश्वास होता मात्र या संकटांना तोंड देण्याचा पर्याय अवलंबताना कष्टकऱ्यांना मोठ्या प्रमाणात भेदभावपूर्ण वागणूक मिळत आहे आणि ही असमानता, असुरक्षितता वाढते आहे.

वाढती लोकसंख्या मुलभूत सोयी सुविधांचा अभाव राजकीय नकारात्मकता आणि स्थानिक पातळीवर रोजगारांचा अभाव या सर्व बाबी मजुरांच्या स्थितीला कारणीभूत आहेत. मजूर म्हटले की गरीब, कौशल्याचा अभाव, कर्जबाजारी, जास्तीचा वेळ काम करणारा, मालक किंवा दलाल ठरवेल त्या रोजंदारीवर काम करणारा असेच आपल्याकडचे चित्र आहे. आज ना उद्या परिस्थिती पूर्वपदावर येईल परंतु जो मजुर आज या परिस्थितीतून गेला आहे. जात आहे त्याचे कुटुंब पुढील दहा वर्षे याचे परिणाम भोगतील तसे होऊ नये म्हणून शासन, नियोजन आणि अमंलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने गंभीर विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. मानवी प्रवृत्ती अशी आहे कि सर्व उपाय करुन झाल्यावर तो श्रध्दास्थानाला साकडे घालतो. अशा वेळी त्याच्या मनात ' वाट दिसू दे गा देवा... गाठ सुटु दे' अशी भावना दाटून येणे स्वाभाविक आहे. शेवटी आपल्यावरचे हे संकट लवकर टाळण्यासाठी, कष्टकरी बांधवाच्या यातना कमी होण्यासाठी शासन प्रशासनाला वाट दिसावी, ही इच्छा करण्यात गैर काहीच नाही.

भारतीय अर्थव्यवस्था

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल बोलण्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप जाणून घेणे आणि समजणे खूप आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप शेतीभिमुख आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने १९५१ मध्ये प्रथम पंचवार्षिक योजना सुरु केली., तेव्हांपासून पंचवार्षिक योजना दर ५ वर्षानंतर कार्यरत आहे. ज्यात प्रत्येक वेळी देशाच्या अर्थव्यवस्था व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मुद्यांकडे लक्ष दिले जाते.

भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान आहे. अर्थव्यवस्थेत शेतीविषयक क्रियाकलापांचा वाटा जवळपास ५०% आहे. शेतीमध्ये पिके, कुक्कुटपालन, मत्स्यपालन व पशुपालनांचा विकास आणि विक्री यांचा समावेश आहे. भारतातील लोक या कामांमध्ये स्वत:ला सामील करुन आपला उदरनिर्वाह करतात. भारत कृषी आधारित अर्थव्यवस्था असला तरी उद्योग (विकासकाम, व्यापार, वाणिज्य बँकिंग व्यवस्था इ.) आणि सामाजिक, आर्थिक पायाभूत सुविध्यांच्या विकासावरही बराच भर आहे. जसे की शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण शक्ती ऊर्जा, वाहतूक संप्रेषण इ.

भारतात केंद्र व राज्य सरकार आर्थिक विकासाकडे नेणाऱ्या सर्व क्षेत्रात हातमिळवणी करतात. गेल्या काही दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेत मोठी वाढ झाली आहे. या भरभराटीचे बरेचसे श्रेय सेवा क्षेत्राला जाते.

जागतिक स्तराशी जोडण्यासाठी कृषी आणि त्याच्याशी संबंधित क्रियाकलापामध्येही सुधारण्या करण्यात आल्या आहेत. तसेच विविध खाद्यपदार्थाच्या निर्यातीत वाढ झाली असून त्यामुळे आर्थिक वाढ झाली आहे. अलीकडच्या काळात अनेक नवीन लघु उद्योगांची स्थापना झाली असून भारतीय अर्थव्यवस्थेवरही त्याचा सकारात्मक परिणाम झाला आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था आहे. एकेकाळी भारताला सोन्याचे पक्षी म्हटले जात असे. आर्थिक इतिहासकार अँगस मॅडिसनच्या मते पहिल्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत भारताची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था होती.

भारतीय अर्थव्यवस्थेचे तीन भागात विभाजन केले जाते.

१. प्राथमिक किंवा कृषी क्षेत्र : या भागात शेती आणि त्यांसंबधी कामांचा समावेश आहे. ज्यामध्ये दुग्धव्यवसाय, पोल्ट्री, मासेमारी, वनीकरण, पशुसंवर्धन इ. प्राथमिक क्षेत्रामध्ये बहुतेक लोक सामान्य नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करुन उत्पादित होतात.

२. दुय्यम किंवा उत्पादन क्षेत्र : हा भाग औद्योगिक क्षेत्र म्हणूनही ओळखला जातो. या श्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात आणि लहान प्रमाणात सर्व प्रकारच्या उत्पादन क्षेत्रांचा समावेश आहे. लहान आणि कॉटेज उद्योगांमध्ये कपडे, मेणबत्त्या, कुक्कुट पालन, मॅचबॉक्सेस, हातमाग, खेळणी इत्यांदीचा समावेश आहे. या युनिटमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करतात.

तृतीयक किंवा सेवा क्षेत्र : या क्षेत्रामध्ये वाहतूक, दळणवळण बँकिंग, विमा, व्यापार आणि वाणिज्य यासारख्या विविध सेवा तयार केल्या जातात. ज्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यांचा समावेश आहे. नागरिकांच्या कल्याणासाठी सरकारने पुरविल्या गेलेल्या सेवांच्या देखील

तृतीयक क्षेत्रात समावेश आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती. हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन –तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो. परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकाराच्या सेवांचाही वाढता वाटा आहे. आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्य स्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावयाला लागला आहे.

भारत हा अति–कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन, औषध निर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसुक्ष्मतंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्माण विमाननिर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रातील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे वर्ष कोरोना आणि त्यानंतर लागू लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर वाईट असल्याचं तज्ज्ञ सांगत आहेत. असं असलं तरी पुढील वर्ष म्हणजेच २०२१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा उभारी घेईल आणि चीनलाही धोबीपछाड देईल. असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) वर्तवला आहे. मागील आठवड्यात जागतिक बँकेने भारताचं सकल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजेच जीडीपी या वर्षी ९.६ टक्क्यांपर्यंत घटेल असं म्हटलं होतं. याशिवाय मुडीजसह इतर अनेक मोठ्या रेटिंग संस्थांनी आधीच जीडीपीमध्ये घट होईल, असा अंदाज वर्तवला आहे.

कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

कु. आरती भोसले
बी. ए.भाग-१

– वैचारिक लेख –

व्यसनाधीनता आणि युवा पिढी

कु. संध्या सरवदे
बी. ए. भाग-२

भारतात व्यसनामुळे पिढी वाया जात आहेत. व्यसन आणि त्याचे दुरगामी परिणाम माहीत असून त्यापासून परावृत्त होण्याकडे आजच्या तरुणाचा कल नाही. आजचा युवक हा देशाचे भविष्य आहे. मात्र व्यसनाधीन युवा वर्ग देश कसा सांभाळणार असा प्रश्न पडतो. व्यसनाधीनता आणि युवा पिढी यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे.

व्यसन म्हणजे एखादी अशी सवय की ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर शारिरीक, मानसिक व सामाजिक त्रास होत असल्याची जाणीव होत असूनही त्यात बदल करणे शक्य होत नाही. कोणतीही व्यक्ती व्यसनाधीन होण्यासाठी मद्यसेवन करत नाही. काल्पनिक अथवा वास्तवातील प्रश्नापासून दूर जाण्यासाठी दारु किंवा अमली पदार्थांचा वापर केला जातो. पैशांचा गैरवापर, मार्गदर्शनाचा अभाव, उत्सुकता, संगत या आणि अशा कांही कारणांमुळे व्यसनाधीनता हा मानसिक रोग होतो.

व्यसन एक विनाशकारी वादळ आहे. या वादळात आज आपल्या देशातील युवापिढी अडकलेली आहे. या विनाशकारी वादळाला आत्ताच जर थांबविले नाही. तर कितीतरी नवयुवक आणि युवती नव्या दशकाचा पहिला उगवलेला सूर्य बघण्यासाठी शिल्लकच राहणार नाहीत. मेंदूला बधीर करण्याऱ्या कोणत्याही मादक पदार्थाचे अतिरेकी सेवन करणारी व्यक्ती म्हणजेच व्यसनी व्यक्ती होय. ही व्यक्ती स्वत:च्या पायाने एक एक पायरी उतरत मृत्यूच्या गर्तेत एके दिवशी संपून जाते.

मादक पदार्थ म्हणजे तंबाखू, सिगारेट, दारु, गांजा, चरस, झोपेच्या गोळ्या इ. अशा प्रकारच्या कोणत्याही पदार्थाचे अतिरेकी सेवन करणाऱ्या व्यक्तिला व्यसनी ही पदवी प्राप्त होते. चित्रपटामधील अभिनेत्री व अभिनेता हे सुध्दा व्यसनी असतात. उदा. अभिनेत्री दिपीका पादुकोण व सारा अली खान ह्या अभिनेत्री सुध्दा ड्रग्ज् घेतात हे सिध्द झाल आहे. ते पण सुशांत सिंह रजपूतच्या आत्महत्येच्या प्रकरणातून सर्वांना कळले आहे.

मद्यपान व्यसनाचा घात परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. मद्यपानामुळे यकृतामध्ये विविध विकार उत्पन्न होतात. यामध्ये लिव्हर फेल्युअर, लिव्हर कैन्सर इ. यकृताची विकार उत्पन्न होतात. याशिवाय मद्यपान करण्याऱ्यामध्ये हृदयरोग, हार्टअॅटक, किडण्या निकामी होणे, पोटाचा कॅन्सर तसेच विविध मानसिक आजार होण्याचा धोका अधिक असतो. एकट्या सिगारेट मध्ये जवळजवळ ३२ वेगवेगळी अपायकारक रसायने असतात. एक सिगारेट मनुष्याच्या जीवनातील ४ मिनीटे कमी करतो. धुम्रपान करणाऱ्या व्यक्तीला सोबत असणाऱ्या व्यक्तिलाही याचे परिणाम भोगावे लागतात. कारण सिगारेट ओडणारी व्यक्ती फक्त ३० टक्के धूर घेते आणि उरलेला ७० टक्के धूर वातावरणात सोडते आणि इतरांवर त्याचा परिणाम होतो. याला अप्रत्यक्ष सेवन म्हणतात आजची पिढी पूर्णपणे व्यसनाधीन असल्याची प्रचिती जागोजागी येत आहे. त्यांना मानसिक आधार कुठेच मिळत नाही मग ते व्यसनाच्या आहारी जातात.

या सगळ्या गोष्टींचा विचार केल्यावर व्यसनरुपी विनाशकारी वादळाची तीव्रता किती भयंकर आहे ते कळते फक्त इच्छाशक्तिंच्या बळावर दारु सुटू शकत नाही. त्याला योग्य प्रयत्नांची जोड योग्य मार्गदर्शन तसेच योग्य औषधोपचारांची साथ हवी. प्रत्येक गावात समाजसेवी संस्थानी हा विषय हाती घेणे आवश्यक आहे. अन्यथा व्यसनाच्या विनाशकारी जाळ्यामध्ये अडकलेली युवा पिढी या महान देशाचा गाडा ताकदीने ओढून एकविसाव्या शतकामध्ये नेण्यापूर्वीच संपून जाईल.

– वैचारिक लेख –

कोरोना नंतरचे जग

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

कोरोनामुळे जग बदलत आहे, अजूनही बदलणार आहे. जगण्याच्या विविध क्षेत्रांवर याचा परिणाम होत आहे. मात्र या बदलाचे स्वरुप प्रत्येक देशात वेगळे असेल. ''कोव्हिड १९'' च्या विषाणुने सध्या जगभरात धुमाकूळ घातलायं या विषाणुच्या फैलावला आटोक्यात आणण्यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या जात आहेत. साथीच्या या संकटाचा प्रभाव कमी करण्यासाठी रोजच्या रोज नवे निर्णय घेतले जात आहेत.

हे सगळे होत असताना आपल्याला जगभरातच मानवी स्वभावात अर्थपूर्ण बदल दिसू लागले आहेत. हे बदल अनेक पातळ्यांवरील आहेत. जेवणाच्या व झोपण्याच्या वेळा बदलल्या आहेत. उपभोगाच्या सवयी बदलल्या आहेत. सांस्कृतिक बदल दिसत आहेत. शिकण्याची व सरावाची नवी कौशल्ये आत्मसात केली जात आहेत. वर्षानुवर्षे चालत आलेले धार्मिक विधी करण्याच्या पध्दती बदलल्या आहेत.

'कोरोना' च्या साथीच्या पार्श्वभूमीवर मानवी स्वभावामध्ये होत असलेले हे बदल हा प्रामुख्याने इंटरनेटचा वापर आणि सोशल मिडीयाच्या वेगवेगळ्या पर्यायांच्या वाढत्या वापराचा परिणाम आहे. जगभरातील जवळपास सहा अब्ज लोक इंटरनेटचा वापर करतात ऑनलाईनच्या आभासी विश्वात मोठ्या प्रमाणात वेळ घालवतात. ''कोव्हिड १९'' चा उद्रेक झाल्यापासून इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. या सगळ्या घडामोडींमुळे नव्या मानवजातीच्या उद्याबद्दल किंबहुना सध्या जगभर पसरलेल्या ''कोव्हिड १९'' च्या साथीनंतरच्या नव्या जगातील बदल हे येणाऱ्या काळात वैश्विक पातळीवर विविध क्षेत्राचे नियम बदलणारा ठरणार आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रेही त्यास अपवाद ठरणार नाहीत.

कोरोना विषाणुचा मुकाबला करताना सारे जग सध्या मेटाकुटीला आले. आहे. परिस्थिती कधी पूर्वपदावर येईल दोन महिन्यांनी, सहा महिन्यानी की दोन वर्षांनी कोणाला काही कळेनासे झाले आहे. सारे जग इतक्या विमनस्क स्थितीत याआधी कधीच पाहायला मिळाले नाही. कोरोनानंतर लोकांचे प्राधान्यक्रम बदलतील विविध देशांना धोरणे बदलावी लागतील यावर साऱ्यांचे एकमत आहे. कोरोनानंतरचे जग कसे असेल यावर जगभरातील माध्यमांमध्ये विचारामंथन सुरु आहे. विविध क्षेत्रातील तज्ञ आपले विचार मांडत आहेत.

कोरोना नंतर जगात विविध क्षेत्रांचे नियम लोकांचे प्राधान्यक्रम अनेक पध्दतीमध्ये बदल घडून येणार आहे. आणि उपभोगाच्या सवयीही बद परंतु रोज स्वच्छ हात धुणे आणि तोंडाला मास्क लावणे, गर्दीचे ठिकाण टाळणे, शिंकताना, खोकताना चेहरा झाकून ठेवणे. आणि स्वच्छतेची कास धरावी लागणार आहे. हे सगळे नियम आपण पाळलेच पाहिजे असे मला वाटते. हे नियम आपण न चुकता पाळले तर आपण कोरोनाच्या फैलावास टाळू शकतो आणि कोरोनाला जगातून हद्दपार करु शकतो.

सर्वांनी एकत्र येऊन लढा दिल्यास आपण केवळ कोरोनावरच विजय मिळवणार नाही तर येत्या काळात मानवतेसमोर उभ्या ठाकणाऱ्या संभाव्य वैश्विक साथींनाही आळा घालू शकतो.

कोरोना व्हायरसने हे सिध्द केले आहे की आपल्या सभोवतालची प्रत्येक गोष्ट तात्पुरती आहे. आपल्या आयुष्याभोवती फिरत असलेले आपले कार्य, बाजार, चित्रपट, समाज यासारख्या गोष्टी एका झटक्यात निघुन गेल्या आहे. कारण आपण त्यांच्याशिवाय जगायला शिकत आहोत त्याने आपल्याला शिकवले आहे की शेवटी आपल्या स्वतःचे घर आणि कुटुंब आपल्यास सुरक्षित ठेवते.

अशा प्रकारे मला ऐवढेच सांगायचे आहे की कोरोनानंतरच्या जगात कोणतेही बदल घडून येऊ दे आपण नेहमी हात स्वच्छ धुवणे, तोंडाला नेहमी मास्क लावणे. हे नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे. आणि अत्यंत गरजेचे आहे. कारण आपल्या सगळ्यांना कोरोनाशी लढायचे आहे. कोरोनाला हरवायचं आहे आणि कोरोनाला जगातून हद्दपार करायचे आहे. आणि आपल्या सर्वांना स्वच्छतेची कास धरायची आहे. तसेच समाजाला सुरक्षित ठेवण्यास मदत करायचे आहे.

नवे कृषी धोरण आणि भारतीय शेतकरी

कु. मिसबा शेख
बी. कॉम. भाग-३

पंजाब आणि हरियाणातील शेतकरी हे केंद्र सरकारने आणलेल्या तीन नव्या कृषी कायद्यांविरोधात अनेक महिन्यापासून दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत आहेत. ८ डिसेंबर २०२० ला "भारत बंद" ही करण्यात आला होता.

केंद्र सरकारने २० सप्टेंबर २०२० रोजी कृषी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले होते. त्या कायद्यांना शेतकऱ्यांचा विरोध होता आणि त्यासाठीच हे आंदोलन सुरु आहे.

हे आहेत तीन नवे कायदे...

शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२०

शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०

अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२०

खरं तर पंजाबमधील शेतकरी कायदे मंजूर झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच म्हणजे सप्टेंबरपासून आंदोलन करत होते. मात्र ऑक्टोबर महिन्यात या आंदोलनाने आक्रमक रुप धारण केले आणि हे आंदोलन देशाच्या राजधानीच्या सीमेवर पोहोचले होते.

बाजार समित्याचं अस्तित्व एमएसपी (Minimum Support Price) (न्यूनतम समर्थन मुल्य) आणि कंत्राटी शेती हे मुद्दे प्रामुख्याने शेतकरी आंदोलनाच्या केंद्रस्थानी होते. त्यामुळे शेतकरी हे तिन्ही कायदे पूर्णपणे मागे घेण्याची मागणी करत होते.

आतापर्यंत खरेदी विक्रीची जी व्यवस्था सुरु होती. त्यात शेतकऱ्यांचे हातपाय बांधलेले होते. जुन्या कायद्यांच्या आडून ताकदवान टोळ्या तयार झाल्या होत्या. त्यांनी शेतकऱ्यांचा गैरफायदा घेतला होता. हे कुठवर चालणार होतं ? असा प्रश्न विचारत हे विधेयक मंजूर झाल्याबद्दल त्यांनी देशातल्या शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या विकास कामाचं उद्घाटन करताना शुभारंभ करताना २१ सप्टेंबर रोजी आपली भूमिका अधिक स्पष्ट केली.

एमएसपी सुरुच राहणार गहू, तांदूळ, डाळी, तेलबियांसाठी १ लाख १३ हजार कोटी रुपये एमएसपी वर दिले असं सांगितले.

हे कायदे करुन शेतकऱ्यांचं भलं होणार असं सरकार म्हणतयं पण याला विरोध करणारे म्हणतायेत की हे कायदे म्हणजे फक्त खासगी उद्योगांचं भलं करण्याचा आणि राज्य सरकारांना कमी लेखण्याचा प्रयत्न आहे.

पण वादात अडकलेली ही तीन विधेयकं शेतकऱ्यांसाठी नेमकं काय करु पाहतायत आणि त्यांना विरोध का होतोय हे समजून घेऊ या..

या कायद्यांमध्ये कोणत्या तरतुदी आहेत आणि शेतकऱ्यांचा आक्षेप कशाला आहे.

केंद्र सरकारने शेती क्षेत्राशी संबंधित तीन अध्यादेश आणले होते. ज्याचं रुपांतर आता कायद्यात करण्यात आले आहे. या कायद्यामधील तरतुदी कशा व कोणत्या आहेत आणि त्यावर काय आक्षेप घेतले जातायत ते आधी पाहू या.

पहिला कायदा – शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२० हा कायदा कृषीमालाच्या विक्रीसंबंधीत तरतुदी करतो त्यातल्या प्रमुख तरतुदी काय आहेत.

कृषी उत्पन्न बाजार समितीने मान्यता दिलेल्या बाजारांबाहेरही मालाची खरेदी विक्री.

कृषी मालाच्या राज्यांतर्गत आणि आंतरराज्य हालचालीतील अडथळे दूर करणे. मार्केटींग आणि वाहतूक खर्च कमी करुन शेतकऱ्यांना अधिक चांगली किंमत मिळवून देणे. इ. ट्रेडिंगसाठी व्यवस्था उपलब्ध करुन देणे. शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळावी आणि त्यांच्या मालाला लवकरात लवकर गिऱ्हाईक मिळावे यासाठी या सुविधा केल्या जात असल्याचं सरकारचं म्हणणं आहे.

पण याबद्दल काही आक्षेपही आहेत.

–विरोधकांचे आक्षेप काय आहेत ?

–एपीएमसी बाहेर विक्री झाल्यास बाजार शुल्क न मिळाल्याने राज्यांच नुकसान होईल.

–बाजार समित्या हद्दपार झाल्यास मध्यस्थ, आडते यांच काय होणार ?

–किमान आधारभूत किंमतीची यंत्रणा यामुळे मोडकळीस येईल.

– ई–नाम सारख्या ई – ट्रेडिंग यंत्रणा बाजारांवर अवलंबून असतात. बाजारच नामशेष झाले तर त्या कशी चालतील.

दुसरा कायदा – शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा – २०२०

हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल बोलतो. शेतकऱ्यांना ते घेत असलेल्या पिकांसाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतूद यात केलेली आहे. भारतात सध्याही काही प्रमाणात अशाप्रकारची कंत्राटी शेती पाहायला मिळते. पण याला कायदेशीर स्वरुप देण्याचा हा प्रयत्न आहे.

– आपल्या पिकांसाठी घाऊक विक्रेते प्रोसेसिंग इंडस्ट्रिज किंवा कंपन्यांशी करार करता येईल. त्यासाठी किंमतही ठरवता येईल.

– ५ हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कंत्राटांचा फायदा होईल.

– बाजारपेठेतल्या अस्थिरतेचा भार शेतकऱ्यांवर नाही त्यांच्या कंत्राटदारांवर राहील.

– मध्यस्थांना दूर करून शेतकरी पूर्ण नफा मिळवू शकतात.

शेती क्षेत्राचं उदारीकरण ?

शेती क्षेत्राचं उदारीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. असंही म्हटलं जातंय पण यात खरंच शेतकरी फायदा करुन घेऊ शकतील का ही शंका उपस्थित केली जातेय.

– कंत्राटी व्यवस्थेत शेतकरी सक्षमपणे वाटाघाटी करु शकतील का?

– अनेक लहान शेतकऱ्यांशी करार करण्यात व्यावसायिक रस दाखवतील का ?

तिसरा कायदा – अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२० म्हणजे **Essential Commoddities (Amendment) Bill** म्हणजे अत्यावश्यक वस्तु (दुरुस्ती) विधेयक हा तिसरा आहे. ज्यावरुन वाद होतोय. सरकारने अनेक कृषी उत्पादन या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतलाय याच्या तरतुदी काय आहेत ?

डाळी, कडधान्यं, तेलबिया, कांदा, बटाटे यांना अत्यावश्यक वस्तुंच्या यादीतून वगळणे यामुळे साठा करण्यावर निर्बंध राहणार नाहीत.

अपवाद : युध्द सदृश असामान्य परिस्थिती..

– निर्बंध कमी झाल्याने परकीय गुंतवणूक तसचं खाजगी गुंतवणूकदारांचा ओघ वाढेल.

– किंमती स्थिर राहण्यात मदत होईल. ग्राहक – शेतकरी दोघांचा फायदा.

या तरतुदीमुळे शेतकऱ्यांचं नुकसानच होईल असाच आरोप केला जातोय. नेमके काय आक्षेप आहेत ते आपण पाहू या.

– मोठ्या कंपन्या वाटेल तेवढा साठा करु शकतील.

– शेतकऱ्यांना कंपन्यांच्या सांगण्याप्रमाणे उत्पादन करावं लागेल आणि कमी किंमत मिळण्याचीही भिती.

– कांदा निर्यातबंदी सारख्या निर्णयांमुळे हा कायदा अंमलात आणला जाईल का याबद्दल साशंकता.

केंद्र सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार संजीव सन्याल यांनी हिंदुस्तान टाईम्समध्ये लिहिलेल्या एका लेखात या विधेयकांचे समर्थन करताना म्हटलंय " अत्यावश्यक वस्तु कायद्यात बदल करुन निर्मला सीतारमण यांनी शेती क्षेत्रात लायसन्स परमिट राज आणि इन्स्पेटक्टर राज संपवण्याच्या दिशेने पाऊल टाकलयं.

२०१९–२० च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात दिसून येते की ECA मुळे साखर, कांदा आणि डाळींच्या किंमती वाढायच्या आणि साठेबाजांवर धाडी टाकण्यात फक्त व्यापाराचं शोषण व्हायचं.

किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी बीबीसीशी बोलताना सांगितलं की " अत्यावश्यक वस्तुंच्या यादीतून कृषीमाल वगळण्याचं आम्ही स्वागत करतो पण त्याबरोबरच सीलिंग कायदाही रद्द झाला पाहिजे. १९६० पूर्वी बाजार समित्यांशिवायच व्यवहार व्हायचे आता पुन्हा शेतकऱ्यांना तसा पर्याय उपलब्ध होणार असेल तर ती चांगलीच गोष्ट आहे.

एकूणच केंद्र सरकारने केलेले कायदे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बसणारे असतीलही पण यामुळे शेतकऱ्यांच भलं होईलच याचं उत्तर येणारं काळच देईल.

कु. शारदा तवटम
बी. कॉम. भाग-१

–सामाजिक लेख–

२१ व्या शतकातील महिलांची स्थिती

कु. अश्विनी क्षीरसागर
बी. ए. भाग-३

स्त्रि यांना फक्त कुटुंबामध्येच नाही तर एकूण समाजात दुय्यम स्थान आहे. आपल्या समाजात स्त्रीची भूमिका फार महत्वाची आहे. स्त्री ही कुटुंबातील सदस्यांच्या उन्नतीसाठी त्याग करणारी, इतरांसाठी स्वत:च्या गरजा बाजूला सारणारी अशीच असावी अशी सर्वांची असते आणि ह्या सर्वांची सुरुवात तिच्या जन्मापासूनच झालेली आढळते. बहुतेक ठिकाणी आजही मुलगी जन्मला आली की घरातील मंडळी निराश झालेली दिसतात. शहरी भागात काही सुशिक्षितांमध्ये अशी परिस्थिती नसेल परंतु बहुसंख्य कुटंबामध्ये ग्रामीण भागामध्ये हेच चित्र प्रामुख्याने दिसते. मुलगी थोडी मोठी झाल्यांवर शाळेत जाऊ लागते ते सुध्दा सरकारने सर्वाना प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत केले आहे म्हणून. परंतु असे असूनही सगळ्या मुली शाळेत जातातच असे नाही. घरामध्ये कुठलीही अडचण असो सर्वात प्रथम घरी ठेवले जाते ते मुलीलाच.

समजा मुलीची शाळा पुढे चालू राहिली तरी घरातील कामे जबाबदाऱ्या सांभाळून तिला अभ्यास करावा लागतो. घरातील कामे सुध्दा मुलगी आणि घरातील स्त्रीलाच जास्त करावी लागतात. मुलगी ६–७ वर्षाची झाली की घर झाडणे, स्वयंपाक करणे ही कामे तिच्यावर लादली जातात. तिला बालपणी खेळायला बागडायाला वेळच मिळत नाही. थोडक्यात म्हणजे सासरी जाऊन तिने नीट काम करावे. कुणाला उलट उत्तर देऊ नये. सोसत रहावे. यासाठीची प्राथमिक तयारी तिच्याकडून न कळत करुन घेतली जात असते. मुलीला हट्ट करुन हक्काने कुठलीही गोष्ट मिळवता येत नाही. उलट, हट्टपणा करणे वाईट, सहनशीलता, सोशीकपणा चांगला हे तिच्या मनावर लहानपासूनच बिंबवले जाते. मुलीला घरामध्ये कुठल्याही बाबतीत अगदी तिचे स्वत:चे लग्न केंव्हा व्हावे याबाबत सुध्दा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. मुलगी वयात आली की माता पित्यांना तिचे ओझे वाटू लागते. तिला घरात ठेवणे म्हणजे त्यांना मोठी जबाबदारीच वाटू लागते. आणि म्हणून घरातील मोठी माणसे तिच्या लग्नाचा निर्णय परस्पर घेऊन टाकतात. आपल्या साहित्यामध्ये सुध्दा स्त्रीचे चित्र चुल आणि मुल यापुरतेच मर्यादित असलेले पहावयास मिळते.

आपल्या राज्याचे व देशाचे शासन यांनीही स्त्रीयांची परिस्थिती सुधारण्यासाठी काही पावले उचलेली आहेत. आता सगळ्यात महत्वाचे म्हणजे स्त्रियांनी आपल्या मुला–मुलींना वाढवताना समानतेची वागणूक देऊन वाढविले पाहिजे. सध्या परिस्थिती बदलत असली तरी खूप मुलींना शिक्षण पूर्ण करता येत नाही. जर केले तरी नोकरी, व्यवसाय काही करण्याची परवानगी दिली जात नाही. समाज सुधारणाचा प्रयत्न घराघरातून झाला पाहिजे. मुला–मुलीत जर समानता आणायची असेल तर घरची कामे दोघानांही करायला आली पाहिजेत. बाहेरीची कामे पण येत असली पाहिजे आणि बाईक, गाडी, कार मुलींना देखील शिकवली पाहिजे. प्रत्येक गोष्टीमध्ये समानता असलीच पाहिजे. संस्कार असो वा विचार, वागणूक सर्व समान असले पाहिजे. स्वतंत्र्यपणे बोलण्याचा, विचार मांडण्याचा आणि निर्णय घेण्याचा देखील अधिकार समान असला पाहिजे. महिलांना स्वत:चा निर्णय स्वत: घेण्याइतपत स्वातंत्र्य असले पाहिजे. अस नाही वाटला पाहिजे की, मुलगा असला तर मला बाईकवर डॉक्टरकडे घेऊन गेला असता. प्रत्येक गोष्ट जी मुलाना येते ती मुलींना देखील आली पाहिजे. सर्व काही करता आलं पाहिजे, शिकली पाहिजे. तिला स्व:ची संरक्षण करता आले पाहिजे. अतितात्काळ प्रसंगी उपयोगी पडेल असे प्रशिक्षण तिला दिले पाहिजे. तिला स्वत:ची आत्मरक्षा करु शकेल इतकी स्वावलंबी बनवले पाहिजे. तायकानदो शिकली पाहिजे.मात्र हे यासाठी परिवार कुटुंब, समाजाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरच आजची स्त्री आणि तिच्या पुढे येणारे प्रत्येक संकट आणि प्रत्येक आव्हान ती सहजच पेलू शकेल याची तयारी लहान असतानाच करण्यात आल पाहिजे. तेव्हांच आपण सर्वजण बोलू शकतो की स्त्री पुरुष समानता आहे.

वाणिज्य : विस्तार व व्याप्ती

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

वाणिज्य ही संज्ञा वस्तू व सेवा यांच्या उत्पादकांपासून ग्राहकांपर्यंत पोहोचणाऱ्या साखळीतील सर्व प्रकारांच्या देवघेवीला उद्देशून योजिली जाते. यात वस्तू, सेवा, पैसा माहिती या व अशा अर्थशास्त्रीय मूल्य असलेल्या कोणत्याही गोष्टींना दोन व्यक्ती किंवा संस्थामधील व्यापार अभिप्रेत असतो. वाणिज्य भांडवलवादी व अन्य काही अर्थशास्त्रीय व्यवस्थांचा मूलाधार आहे.

व्यवसायाचा असा एक विभाग कि जो वस्तू व सेवांचे वितरण करतो त्याला वाणिज्य असे म्हणतात तुलनेने भांडवली गुंतवणूक कमी प्रमाणात लागते. वितरणाचे काम बाजारपेठेमध्ये तसेच कार्यालयात केले जाते. वस्तुंचे वितरण करण्यासाठी मनुष्यबळाची व संदेशवहनाची गरज भासते. वाणिज्यामुळे वस्तुमध्ये स्थळ, काळ व समय उपयोगिता निर्माण होते. वाणिज्य वस्तु व व्यापारी अभिकर्ते करतात. वाणिज्य हा व्यवसायाचा एक भाग असल्यामुळे त्यामध्ये व्यापारी कौशल्य असणे गरजेचे आहे.

आर्थिक व्यवहार सुलभ व्हावेत या गरजेतून वाणिज्याचा उगम झाला. एखाद्या समूहाचे वस्तु व सेवा यांचे उत्पादन जोपर्यंत त्यांच्या गरजा भागविण्यापुरतेच मर्यादित असे, तोपर्यंत त्या समुहास वाणिज्य व्यवस्थेची विशेष गरज भासत नसे. कारण स्थानिक परिसरात परस्परांना गाठीभेटी घेऊन वस्तू व सेवा यांची देवघेव करणे शक्य होते.

वाणिज्य हे मानवी सभ्यतेइतकाच प्राचीन असून त्याच्या विकासाची सुरुवात कृषीबाल्यावस्थेच्या प्रारंभापासून झाली. वाणिज्य हे नाव **Com** व **Metcis** या दोन लॅटीन शब्दापासून तयार झाले आहे. **com** म्हणजे एकत्र येणे आणि **Metcis** म्हणजे वस्तु किंवा सामुग्री होय. वस्तु किंवा सामुग्रीची देवाण–घेवाण करण्यासाठी एकत्र येणे म्हणजे वाणिज्य होय वाणिज्याच्या साहय्याने विनिमय **(Exchange)** ही संकल्पना अस्तित्वात येऊन मूलभूत आर्थिक क्रियांचा प्रारंभ झाला. कालांतराणे मुद्रेचा शोध लागला आणि ती वस्तु विनिमय व वाणिज्य या दोन्ही कार्यांसाठी पर्वणीच ठरली.

वाणिज्यामध्ये व्यापाराला खूप महत्व आहे. कारण अर्थव्यवस्थेचा विकास व तिचे कार्य प्रामुख्याने पैशांच्या मध्यस्थीने होणाऱ्या देवघेवीवर अवलंबून असल्यामुळे वाणिज्यात व्यापारास अतिशय महत्व आहे. देवघेव सुलभ व्हावे म्हणूनच व्यापाराची आवश्यकता जाणवते.

वस्तू व सेवा यांचे उत्पादन वितरण आणि उपभोग ही अर्थव्यवस्थेची मूलभूत अंगे आहेत व त्यांच्या कार्यक्षमतेची जबाबदारी बहुतांशी वाणिज्यावर येऊन पडते. उत्पादनाचे व वितरणाचे नियोजन करण्यासाठी भांडवल पुरवावे लागते. उत्पादनासाठी लागणारे श्रमिक व सामाग्री एकत्र आणून त्याचे योग्य व्यवस्थापन करावे लागते. उत्पादित मालाची व्यवस्था करणे, तो बाजारपेठमध्ये नेणे त्याच्या वाटपाची व्यवस्था करणे आणि सर्व व्यवहार सुरळीतपणे चालावेत व उत्पादक व उपभोक्ते या दोघांच्याही गरजा भागाव्यात यासाठी वाणिज्य व्यवस्था अस्तित्वात येते.

वाणिज्य व्यवसायात अनेक प्रकारच्या संघटना कार्य करीत असतात. त्यातील काही खाजगी क्षेत्रात तर काही सहकारी वा सरकारी क्षेत्रात असतात. संयुक्त क्षेत्रातही काही संस्था असू शकतात. खाजगी क्षेत्रातील वाणिज्य व्यवसाय एकमेव व्यापारी, भागिदारी खाजगी वा संयुक्त भांडवल कंपनी अथवा सुत्रधारी

कंपनी यापैकी एखाद्या स्वरुपाची संघटना बनवून चालतो. सहकारी क्षेत्रातील व्यवसाय संस्था सरकारी कंपन्या किंवा सरकारी विभाग, मंत्रालय, जिल्हा परिषदा, नगरपालिका व ग्रामपंचायती किंवा कायद्यानुसार खास अस्तित्वात आलेली महामंडळे यांच्या मार्फत चालविल्या जातात. तर अशाप्रकारे वाणिज्य व्यवसायात संघटना कार्य करीत असतात.

वाणिज्य वस्तुंचे उत्पादक आणि वस्तुंच्या ग्राहकांमध्ये आवश्यक दुवा प्रदान करते. वाणिज्य वस्तु आणि सेवांचा मुक्त प्रवाह सुलभ करण्यासाठी विविध संस्थांद्वारे वितरीत केलेल्या सेवांचा समावेश करते हे विनिमय प्रक्रियेतील व्यक्ती, ठिकाण, वेळ जोखीम, ज्ञान, वित्त इत्यादी सर्व अडथळे दूर करते. नफा व्यवसायिक क्रियाकलाप करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून कार्य करते. सामान्य भाषेत वाणिज्य म्हणजे वस्तू आणि सेवांच्या देवाण–घेवाणचा नसून त्यामध्ये अशा सर्व क्रिया समाविष्ट असतात. ज्या वस्तू व सेवा उत्पत्तीच्या बिंदूपासून उपभोगाच्या बिंदूपर्यंत आणण्यासाठी आवश्यक असतात. वाणिज्य उत्पादक आणि ग्राहक यांना जोडतो, वाणिज्य रोजगाराच्या संधी निर्माण करते, वाणिज्य आपले जीवनमान उंचावण्यास मदत करते, वाणिज्य राष्ट्रीय उत्पन्न वाढवते, वाणिज्य औद्योगिक विकासास मदत करते हे वाणिज्यचे महत्त्व आहे.

जगातील देशांमधील मोठ्या प्रमाणात व्यापारी वस्तुंच्या देवाण–घेवाणीचा अभ्यास हा आहे. वाणिज्य अभ्यासासाठी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. वाणिज्य अभ्यासमुळे व्यवसाय संस्थेच्या विविध प्रकरांबद्दल ज्ञान प्राप्त झाले आहे. लोकांना असे ज्ञान प्राप्त होते की एखादा व्यवसाय लहान प्रमाणात किंवा मोठ्या प्रमाणावर नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत आणि कोणत्या प्रकाराची माहिती ध्यानात ठेवणे आवश्यक आहे याची माहिती मिळते.

वाणिज्य शिक्षण व्यवसाय घरांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यास मदत करते. हजारो व्यावसायिक उपक्रमामध्ये वाढत्या मनुष्यबळाच्या गरजा वाढवण्यासाठी हे विकसित उद्योग आणि व्यापाराच्या विविध कार्यक्षेत्रात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी उपयुक्त अशा विशिष्ट कौशल्यांनी सुसज्ज आहे.

व्यवसायाच्या वाढीसाठी कुशल मनुष्यबळ पुरवठा अपरिहार्य आहे. आजच्या गतिमान व्यवस्था वातावरणात वाणिज्य शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. खासगीकरण, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाची अमंलबजावणी वेगाने बदलत चाललेल्या संघटनांना व्यवसाय जगात स्पर्धा टिकवून ठेवणे कठीण केले आहे. यामुळे वाणिज्य शिक्षणाची मागणी अनेक पटीने वाढली आहे. बाह्य वातावरणात अचानक झालेल्या बदलांप्रमाणे व्यवसाय अधिकाऱ्यांना त्यांची कौशल्ये पटकन अद्यावयात व परिस्थितीशी जुळवून घेण्यास प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.

वाणिज्य शिक्षण असे ज्ञान देते ज्याद्वारे उत्पादनासाठी चांगले व्यवस्थान स्थापित केले जाऊ शकते. याद्वारे उत्पादित वस्तू आणि सेवांचे वितरण आणि जाहिरात याबद्दल ज्ञान देखील मिळते. वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या बऱ्याच संधी उपलब्ध आहेत या अर्थाने वाणिज्य शिक्षण महत्त्वपूर्ण आणि मौल्यवान आहे. ते स्वत:चा व्यवसाय सुरु करु शकतात ते लेखाकार आणि लेखापरिक्षक म्हणून देखील काम करु शकतात जाहिरात एजन्सीमध्ये आणि विपणन क्षेत्रात देखील काम करु शकतात. वाणिज्य शिक्षणामुळे अनेक व्यावसायिक गुण विकसित होतात. म्हणून वाणिज्य क्षेत्रात करियरच्या संधी इतर प्रकारच्या व्यावसायिक शिक्षणाच्या तुलनेत बहुतेक हे वाणिज्य शिक्षण घेण्याचा कल दिवसेंदिवस जगभरात वाढत आहेत.

कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

– पर्यावरणपर लेख–

स्वच्छता ही काळाची गरज

कु. रोहिणी गोन्याल
बी. कॉम. भाग-३

स्वच्छता हा माणासाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. ह्या एका गुणामुळे माणसाचे जीवन सुंदर बनते. ही एक सवय आहे. स्वच्छता म्हटली की आपल्या समोर अनेक बाबी उभ्या राहतात. स्वच्छता कश्याकश्याची आणि कशी ठेवायची हा मोठा प्रश्न आपल्या समोर असतो. स्वच्छतेची सुरुवात ही स्वत: पासून म्हणजे स्वत:च्या शरीर स्वच्छतेपासून करावी.

सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत आपल्या स्वच्छतेविषयी आपण जागरुक राहून कार्य केल्यास आपली छाप इतरावर निश्चितपणे पडते. लहानपणी सकाळी उठले की आई मुलांच्या मागे राहून दात स्वच्छ घास, चूळ भर आणि हात–पाय स्वच्छ धुवून घेण्याविषयी तगादा लावते. कारण स्वत:च्या स्वच्छतेची सुरुवात ही याच क्रियेपासून होते स्वत:च्या स्वच्छतेनंतर घराच्या स्वच्छतेकडे लक्ष देतो आणि ते आवश्यक आहे. कारण आपले ज्याठिकाणी उठणे, बसणे, खाणे आणि पिणे असते त्या ठिकाणी स्वच्छता असणे गरजेचे आहे. त्यामुळे रोज सकाळी आणि संध्याकाळी आपले घर झाडूने साफ करीत असतो. आपले अंगण स्वच्छ करतो. घरातील आणि अंगणातील कचरा परिसरात टाकतो. म्हणजे आपणांस परिसर घाण असलेले चालते. परंतु आपले घर आणि अंगण स्वच्छ असावे असे वाटते. ही प्रत्येकाची मानसिकता आहे. हा बदल करण्यासाठी स्वच्छतेकडे धडे किंवा पाठ आज समाजाला शिकवण्याची खरी गरज आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे हे चुकीचे आहे हे कळतय पण वळत नाही अशी स्थिती झाली आहे.

सार्वजनिक ठिकाणी आपली वागणूक चांगली असेल तर परिसर स्वच्छ राहू शकते बरेच जण सार्वजनिक ठिकाणी बेजबाबदारपणे वागतात आणि त्यामुळे परिसरात अस्वच्छता पसरत जाते. राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये प्रवास करताना असा अनुभव खास करुन येतो. बसमध्ये प्रवास करणारे काही मंडळी पान तंबाखू आणि गुटखा खाऊन कोपऱ्यात थुंकून सर्व जागा घाण करतात. त्यामुळे इतर प्रवाश्यांना त्याचा त्रास होतो. धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे या फलकाकडे लोक दुर्लक्ष करतात. सार्वजनिक ठिकाण अस्वच्छ करण्याऱ्या व्यक्तिस दंड लावण्याचा कायदा अस्तित्वात आहे. मात्र फक्त तो कागदावरच आहे. त्याची अमंलबजावणी जर करण्यात आली आणि दंड लावण्याची प्रक्रिया चालू केल्यास अस्वच्छता कमी होईल असे वाटते.

बसनंतर सर्वात जास्त प्रवाशी वाहून नेणारे रेल्वेमध्ये स्वच्छता दिसणे खूपच अवघड आहे. आपले घर आणि परिसर स्वच्छ ठेवणारे नागरिक रेल्वेत मात्र सर्व काही विसरुन वागतात. जेथे काही खाल्ले तेथेच कचरा करतात. याचा त्रास इतर प्रवाश्यांना होतो. कधी कधी त्याचे बळी आपणच ठरतो हेही सत्यच आहे. बागेत सुध्दा आपली बेफिकीर वृत्ती दिसून येते. पर्यटनांच्या स्थळी सुध्दा आपण स्वच्छ वागतो असे काही दिसून येत नाही. त्यामुळे बस आणि रेल्वेमधील स्वच्छता असो वा इतर ठिकाणची स्वच्छता ही आपल्या हातात आहे ती आपली सर्वांची मालमत्ता आहे अशी काळजी घ्यावी.

निरोगी जीवन जगण्यासाठी तसेच आजारांपासून दूर राहण्यासाठी आजूबाजूला स्वच्छ व स्वच्छता राखणे आवश्यक आहे. जगातील सर्व धर्म आपल्याला स्वच्छते बद्दल शिकवतात. शिवाय वैज्ञानिकदृष्ट्या हे सिध्द झाले आहे की घाणेरड्या भागात राहणारे लोक आजारांना सहज बळी पडतात. आपला परिसर आणि घर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक माणसाची जबाबदारी आहे आणि प्रत्येक माणसाने ही जबाबदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आपण जेवढा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवतो तेवढेच जीवन निरोगी राहते. आपण वैयक्तिक जेवढी स्वच्छता ठेवतो तेवढेच आपण रोगांपासून मुक्ति मिळवतो. शहर स्वच्छ करणे हे आपण स्वत: आपल्यापासून सुरु केले पाहिजे. कारण स्वच्छता हे माणसाचे आत्मदर्शन घडवते स्वच्छतेविषयीची प्रत्येक कृती सामाजिक आरोग्याला गती देते आणि स्वच्छता सर्व रोगांचे एकमेव औषध आहे. त्यामुळे आपण स्वच्छता राखून निरोगी रहावे. आपल्या जीवनाचा खरा अर्थ म्हणजे स्वच्छता म्हणूनच स्वच्छ सुंदर परिसरसुध्दा सुंदर सुसंस्कृत नागरिक घडवतात. स्वच्छता राखणे आणि स्वच्छता ठेवणे हे प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. आणि जबाबदारी पूर्ण करणे हे खूप महत्वाचे आहे.

महात्मा गांधीजी यांनी ज्याप्रकारे आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्त्व दिले होते. तसेच आपण ही महत्त्व देऊ या आणि स्वच्छ भारत निर्माण करण्यात आपलेही काही योगदान देऊन या. आपण सर्व नागरिक मिळून आपला परिसर आणि घर स्वच्छ ठेऊ या स्वच्छतेला महत्त्व देऊ या आणि स्वच्छ भारत निर्माण करु या असे मला वाटते. कारण आपण स्वच्छता राखणे हे जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे आपण ही जबाबदारी पूर्ण करणे गरजेचे आहे महत्वाचे आहे. कारण ज्या घरामध्ये स्वच्छता ठेवली जाते त्या घरात लक्ष्मी वास करते म्हणूनच स्वच्छता असेल ज्या घरी तेथे लक्ष्मी वास करी असे म्हटले जाते.

– माहितीपर लेख –

कोरोना

कु. सुजाता बिराजदार
बी. कॉम. भाग-२

''चीन मधून आलेली ही स्वारी,
जगासाठी ठरली सगळ्यात मोठी महामारी
खबरदारी घेणे हीच आपली जबाबदारी''

विज्ञानाच्या या युगात मानवला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. याच संकटात भर म्हणजे सध्याची असलेली महामारी होय. मी बोलतेय कोरोनाविषयी ज्याने जगातील सर्वात मोठ्या महामारीचे रुप घेतले आहे. अमेरिकेसारखा महासत्ता देश ही कोरोनापुढे हतबल झाला आहे.

कोरोना हा विषाणूपासून तयार झालेला रोग आहे. तो सगळीकडे ''कोव्हिड १९'' म्हणून ओळखला जातो २०१९ मध्ये चीनच्या वूहान शहरात त्याची सुरुवात होऊन आजपर्यंत तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आणि त्याने जागतिक महामारीचे रुप धारण केले. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये उच्चताप, सर्दी , खोकला, श्वास घेण्यात अडथळा यांचा समावेश आहे. प्रचंड थकवाही जाणवतो लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्याचा कालावधी दोन ते चौदा दिवसापर्यंत असू शकतो. हा आजार बहुतेक लोकामध्ये अगदी सौम्य असतो तर अगदी अल्प प्रमाणात घात ठरु शकतो.

हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कामुळे पसरतो खोकल्यामुळे, शिंकल्यामुळे किंवा बोलताना आपल्या थुंकीतून कोरोना पसरतो. या विषाणूपासून स्वत:ला दूर ठेवण्यासाठी वारंवार हात धुतले पाहिजे. मास्कचा वापर केला पाहिजे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे अत्यावश्यक असेल तरच घराच्या बाहेर पडले पाहिजे.

सरकारने कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन म्हणजे बंद ठेवला आहे. या कोरोनामुळे अनेक माणसे मारली गेली. रोजगार बंद झाले. व्यवसाय बंद पडले, शिक्षण व्यवस्था, पर्यटन, चित्रपटसृष्टी, कृषीव्यवस्था यांच्यावर विपरीत परिणाम झाले अनेक देशांच्या अर्थव्यवस्थाही मंदावल्या. एकंदरीत जनजीवन विस्कळीत झाले.

कोरोना व्हायरस विरुध्द लढण्यासाठी रात्रंदिवस डॉक्टर, पोलीस, सफाई कर्मचारी, नर्स, जनसेवक प्रयत्न करत आहेत. आपणही कोरोनाला हरवण्यासाठी सरकारने सांगितलेल्या नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

कोरोनाला हरवू या... देशाला जिंकू या... !

कु. रुचिता पुल्ली
बी. कॉम. भाग-१

– पर्यावरणपर लेख–

स्वच्छता हेच जीवन

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

स्वच्छता संपूर्ण भारतभर स्वच्छतेची वाढती गरज आहे जी केवळ देशातील प्रत्येक नागरिकांच्या पाठिंब्याने करता येते . स्वच्छता राखणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. ' स्वच्छ भारत अभियान' २०१४ पासून स्वच्छ भारत बनविण्यासाठी सरकारने चालवलेली ही ' स्वच्छ भारत' मोहिम आहे.

स्वच्छता ही भारतातील एक मोठी सामाजिक समस्या आहे आणि ही मोहिम भारतात स्वच्छतेच्या कमतरतेमुळे उद्भवलेल्या समस्यांचे निराकरण कसे करावे यावर चर्चा करते. निरोगी आणि शांततापूर्ण जीवन जगण्यासाठी सर्वांनी स्वच्छतेचे महत्त्व समजून घेणे आणि ते कायम राखणे आवश्यक आहे. स्वच्छता म्हणजे केवळ शरीराचा स्वच्छतेबद्दलच नव्हे तर याचा अर्थ सर्वत्र स्वच्छता (शरीर, मन, आत्मा, घर आजूबाजूचे वातावरण, नदी आणि संपूर्ण भारताची स्वच्छता) होय.

देशभरात अस्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी स्वच्छता, सुरक्षित शौचालय आणि कचरा व्यवस्थापनेचे योग्य प्रश्न सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. १५ ऑगस्ट २०१४ रोजी भारतीय स्वांतत्र्य दिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ' स्वच्छ भारत ' यावर अधिक जोर दिला आहे. पण हे अभियान २ ऑक्टोंबर २०१४ रोजी यशस्वीरित्या सुरु करण्यात आले होते. या अभियानाने २०१९ पर्यंतचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले होते. या मिशनचे उद्दीष्टे होते की सर्वांना स्वच्छता व सुविधा पुरविणे तसेच २०१९ पर्यंत लोकाच्या सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक प्रथा दूर करणे होय.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते की "स्वच्छता स्वांतत्र्यपेक्षा महत्वाची आहे." दारिद्रय, शिक्षणाचा अभाव, स्वच्छतेचा अभाव आणि इतर सामाजिक समस्यामुळे भारत अजूनही विकसनशील देश आहे. आपल्या समाजातील सर्व वाईट प्रवृत्ती दूर करण्याची गरज आहे ज्यामुळे आपल्या देशाच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होतो.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात महात्मा गांधीना भारतीय ग्रामीण लोकांच्या दुर्बलतेची जाणीव होती. त्यांनी हा देश एक स्वच्छ देश बनविण्याचे स्वप्न पाहिले परंतु लोकांच्या कमी सहभागामुळे ते पूर्ण होऊ शकले नाही. स्वातंत्र्याच्या बऱ्याच वर्षानंतर आपण अजूनही घाणेरड्या वातावरणात जगत आहोत आणि प्रत्येक क्षणाला आपले आयुष्य संकटात आहोत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांर्तगत नगर, शहरात दर गुरुवारी एका वॉर्ड समितीत स्वच्छता व घनकचरा नियोजन उपक्रम मनपाने हाती घेतला असला तरी गेल्या दोन आठवड्यांपासूनच्या या उपक्रमाकडे मनपातील पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे का ? हा प्रश्न समोर आला आहे. संबंधित परिसरातील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभाग घेत असल्याने किमान या एका दिवशी तरी संबंधित भागात सार्वजनिक स्वच्छतेचे चित्र दिसू लागले आहे.

तुंबलेल्या गटारी, वाढती दुर्गंधी आणि अस्वच्छता ग्रामपंचायतीकडे असलेली कर्मचाऱ्यांची वाणवा काही ग्रामपंचायत सदस्यांचे वॉर्डाकडे असलेले दुर्लक्ष या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी स्थानिक तरुणांनी विधायक विचार करुन स्वत:च पुढाकार घेत महिन्यातून एकदा गटाराची साफसफाई करण्यात पुढाकार घेतला पाहिजे.

केवळ स्वच्छता अभियानाचे यश भारतातच एक मोठा सकारात्मक बदल आणू शकेल. त्यामुळे मला असे वाटते की स्वच्छता राखणे ही जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे आणि प्रत्येक नागरिकाने ही जबाबदारी पूर्ण केलीच पाहिजे. आणि स्वच्छता राखलीच पाहिजे. स्वच्छतेकडे दुर्लक्ष होऊ नये याची काळजी आपण घेतली पाहिजे.

– आत्मकथनात्मक लेख –

माझे वडील हेच माझे हिरो

कु. भावना आमंची
बी. कॉम. भाग-२

'वडील' हा असा शब्द आहे. जो आपल्या आयुष्यातील प्रत्येक अडचणीला दूर करतो. वडीलाचे महत्व आणि वडिलांना महत्व असूनही त्यांच्याबद्दल फारस बोललं जात नाही. या समाजाने वडील रेखाटले पण तेही थापट व्यसनी, मारजोड करणारा. नाही हो, एक दोन टक्के असे वडील असतील पण चांगल्या वडिलांबद्दल काय ? अहो. आज काल कुठलेही पुस्तक बघा. फक्त आणि फक्त आईविषयीचं बोललं जातं... अहो । आईला महत्व आहे आणि तिच्यामुळेच आपण या जगात आहोत पण एका स्त्रीला देखील आईचे रुप देणारा हा फक्त आणि फक्त एक पुरुषचं असतो ना...

मग एवढं महत्व असूनही वडीलाबद्दल का बोललं जातं नाही ? म्हणून मी निश्चय केला की माझ्या आयुष्यात माझे वडीलच माझे हिरो...

माझी कहाणी सांगायचं म्हटले तर माझ्या वडिलाचं नाव आहे रमेश आमंची आणि ते एक टॉवेल कामगार होते आणि ते सकाळी लवकर उठून देवपूजा करुन कामाला निघत होते आणि दुपारी जेवायला घरी यायचे त्यांच्यासोबत हसत, मस्ती करत कधी जेवण संपत होतं हे कळतचं नव्हतं आणि जेवल्यानंतर त्याच्या हातावर डोक ठेवून अगदी सगळे जीवनातले अडचणी दूर होऊन देवाच्या सानिध्यात असल्यासारखं वाटायचं आणि माझ्या वडिलांना जास्त पगार नव्हता. महिन्याला एक तीन हजार रुपये पण त्यातचं आम्ही समाधानी होतो कारण कष्टाचे पैसे होते ना...

दर मंगळवारी माझ्या वडिलांना पगार मिळत होता आणि मंगळवार म्हटलं तर माझ्या बहिणीचे आणि माझं ठरलेलं असतं ते म्हणजे पाच रुपयाचं बिंगो ट्रँगल कुरकुरे. हा मित्रानो खरचं मला हे नाव देखील लक्षात आहे कारण आम्ही हे नाव वडिलांच्या डायरीत लिहून द्यायचो म्हणून हे नाव मला आजही देखील लक्षात राहिलं आहे.

सगळ्यांच्या घरात किमान महिन्यातून एकदा तरी परिवारासोबत बाहेर फिरायला हॉटेलमध्ये जेवण करायला जातात पण माझ्या आठवणीप्रमाणे तर आम्ही कधीच बाहेर जात नव्हतो. पण सगळ्यां आमच्या मैत्रिणींना पाहून आम्ही एकदा हट्ट धरलो होतो की, आपण देखील एकदा तरी बाहेर जेवायला जायचं म्हणून. मग शेवटी आम्हा बहिणीचा हा हट्ट पूर्ण झाला. मी माझी बहिण माझे वडील आणि आई आम्ही चौघे जण नवीपेठला गेलो होतो फिरायला. मग आम्ही पूर्ण नवीपेठ फिरलो आणि शेवटी माझे वडिलांनी आम्हा बहिणींना मेकअप बॉक्स घेऊन दिले व नंतर आम्ही एका लहानशा हॉटेलमध्ये नाष्टा केलो होतो. हे दिवस माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण आहे. कारण माझ्या वडिलांसोबत पहिल्यांदा आम्ही बाहेर फिरायला गेलो होतो.

अगदी व्यवस्थित आमचं जीवन सुखी समाधानी होतं आहे. त्यात आम्ही स्वत:ला भाग्यवान समजायचो. अशा या आमच्या आयुष्यात एक तुफान आलं. एके दिवशी मी आणि माझी बहिण दोघेही शाळेला गेलो होतो, वर्गात बसलेलो होतो. गुरुजी शिकवत होते आणि आम्ही ऐकत होतो अचानकपणे आमच्या घराशेजारचा एक मुलगा धावत धावत आमच्या वर्गाकडे आला आणि आमच्या सरांशी त्याच बोलणं चालू होतं आणि दोघांचं बोलणं झाल्यानंतर सरांनी मला व माझ्या बहिणीला त्या

मुलासोबत पाठवलं. आम्हाला काहाही कल्पना नव्हती तो मुलगा कशासाठी आला ? आमचे सर आम्हाला त्यांच्यासोबत का पाठवलेत ? याची काहीही पूर्वकल्पना आम्हांस नव्हती. रस्त्यात जाताना आम्ही त्या मुलाला अनेक प्रश्न विचारले की तू आमच्यासाठी का आला ? कशाला घरी न्यायला ? असे खूप काही प्रश्न विचारलो. पण त्याने एका प्रश्नांचेही उत्तर दिला नव्हते. पण आमच्या गल्लीत जाताना लोक आम्हा दोघा बहिणीकडे पाहून रडत होते. कोणी आमच्याकडे पाहून आपापसात बोलत होते. ते सगळे दृश्य आम्हास गोंधळात टाकणारं होतं. काहीच कळत नव्हतं आणि चालता चालता आम्ही आमच्या दाराजवळ पोहोचलो. तेथील दृश्य तर वेगळीच .सगळे पाहुणे वगैरे जमा झाले होते. आमचे हात पाय मात्र थरथर कापत होते आणि आत गेलो तर... तर... काय... माझे वडील हे मृत्यु पावले होते. ते चित्र पाहताच आम्हा दोघीं बहिणीला धक्काच बसला. हात पाय थरथर कापायला लागले. डोळ्यांत पाणी कसे उतरुन आले हे आम्हांस कळालेच नाही. कारण सकाळीच वडीलांनी आम्हा बहिणींना अगदी हसऱ्या चेहऱ्यांनी शाळेला सोडले होते आणि फक्त दोन तासात अशा बदल हा आम्हांस अगदी हेलावून टाकणारा होता. त्या दिवसापासून पाहतो तर आमच्या जीवनाचं चित्रचं बदललं. अगदी लहान वयातच माझे वडील मला सोडून गेलेत ही गोष्ट मला सतत हेलावत असते.

त्या दिवसापासून ते आतापर्यंत मी माझ्या वडिलांना खूप मिस करते. त्यांच प्रेम, त्याचं कौतुक करणं, त्याचं रागावणं, त्याचं हसवणं, प्रत्येक गोष्ट हे मी मिस करते. त्यांची आठवण आली तर डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहत नाही पण मी अश्रूंना थांबविण्याचा प्रयत्न करते. कारण मी रडलं तर कुठं अश्रूंच्या रुपात माझे वडील मला सोडून तरी जात नाहीत ना म्हणून मी अश्रू थांबविण्याचा नेहमी प्रयत्न करते. माझे वडील हे नेहमी माझ्या सोबतचं असायला पाहिजे. म्हणजे माझं दुःख हे माझ्या मनातच असायला पाहिजे.

मित्रानो माणासांची माणूसकी बघा ना उंदिर जर घरात फिरत असेल तर घरातले त्याला मारल्याशिवाय राहत नाहीत पण तोच उंदीर जर मूर्तीच्या रुपात गणपतीच्या पायाजवळ असेल तर त्याची पूजा करतात आणि घरात जर चुकून साप आला तर त्याचा जीव घेतल्याशिवाय राहत नाहीत पण तो साप एक फोटोत असेल तर त्याची पूजा करतात आणि अगदी तशाच प्रकारे आई–वडील असताना त्यांना किंमत द्यायचं नाही पण त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या फोटोसमोर उभारुन रडत असतात. अहो हा कुठला न्याय. जिवंत असेल तर किंमत द्यायची नाही आणि फोटोत असेल तर पूजा अर्चा.... अहो माणूस नसताना त्याची स्तुती करण्यात किंवा रडण्यात काहीच अर्थ नाही. म्हणून माणूस असताना त्यांना किंमत दिली पाहिजे. आई–वडीलांची सेवा केली पाहिजे. त्यांच्यामुळेच आपलं सारं आयुष्य धडलेलं असतं.

मित्रांनो । अनेक महान कवी, लेखक हे असे म्हणतात की शेवटी या सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेवालासुध्दा एक स्त्रीपोटी जन्म घ्यावा लागला म्हणून पण सगळे हा गोष्ट कशाला विसरतात की त्या स्त्रीला 'आई' चे रुप देणारा हा एक पुरुषचं होता म्हणून... अहो त्या ठिकाणी जर पुरुष असता तर त्या स्त्रीला आईचं रुप मिळालं असतं का ? थोडसं विचार करा मित्रानो. आपल्या या जन्माचा सूत्रधार हा आपला वडीलच आहे. मित्रांनो म्हणून माझ्या जीवनात तर माझे वडीलच माझे हिरो... आहेत म्हणून

I love my dad Dad I Miss him so much...



कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

आजची स्त्री सुरक्षित आहे का ?

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग-३

खरंच आजची स्त्री ही सुरक्षित आहे का? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. स्त्रिया व मुली घरातून बाहेर निघतात पण घरी पुन्हा सुरक्षित येतात का ? पूर्वीच्या काळात रस्त्यातून चालताना चुकून एखाद्याचा धक्का लागला तर ती व्यक्ती माफ करा ताई असे म्हणायची. पण आता पूर्वी सारखे दिसत नाही. आताच्या काळात मुलींनी दारातून पाय बाहेर काढायाचे कठीण होत चालले आहे. रस्त्यातून चालतानही मुलींना स्वातंत्र्य नाही. रस्त्यात एकटी मुलगी दिसली की मुलं मुलीला चिडवितात, नको त्या नावाने हाक मारतात. त्या मुलांना असे का नाही वाटतं की, त्या मुलीच्या जागी जर माझी बहीण असती तर हे सगळं मी होवू दिले असतं का ? मग का? नाही वाटत. त्याही मुली कोणाची तरी बहीण कोणाची तरी मुलगी आहे. तिला का छेडायचं. मुलींना स्त्रियांना छेडण्यात पुरुषांना मोठा मर्दपणा वाटतो का ? अहो... पण स्त्रियांची इज्जत करणे ही तर खरी मर्दांगी आहे तो खरा पुरुषार्थ आहे हे पुरुष मंडळी कधी विचारात घेणार ?

आज प्रियांका रेड्डी सारख्या ताईचे आज काय झाले. निर्भयानंतर हिंगणघाट प्रकरण यासारखी आपल्याला माहितीही नसलेली कित्येक प्रकरणे दाबून ठेवली आहेत. पण त्याही ताई कुणाची तरी मुलगी होती. बहिण होती आणि प्रियांका रेड्डी ही ताई तर समाजात प्रतिष्ठीत पदावर होती. त्यानंतर हिंगणघाट प्रकरणातील अंकिता ताई याही एक प्रतिष्ठित पदावर काम करीत होती. प्रियांका ताईचे काय झालं. ती घरातून निघाली आपल्या कामासाठी आणि रस्त्यात त्यांची स्कुटर बंद पडल्याने तिा नराधामांनी घात केला. हिंगणघाट प्रकरणाही ती ताई नेहमीप्रमाणे आपल्या कामाला जात होत्या. पण रस्त्यातच त्यांना जाळले. त्या ताईचे कुठे चुक झाली. माझ्या मते त्या ताईने माणसावर म्हणजे पुरुषांवर विश्वास ठेवला हीच मोठी चूक झाली. आजच्या काळात कोणावरही कधी विश्वास ठेवू नये. आज भारत देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली असूनही भारतातील स्त्रिला खरचं स्वतंत्र आहेत का ? हा प्रश्न मनात घर करुन बसला आहे.

या देवी सर्व भुतेषु, शक्ती रुपेण संस्थिता ।
नमस्तयै नमस्तयै नमस्तयै नमो नम :।

असे म्हणून आपण देवीची पूजा करतो. त्याच वेळी देवीरुपी स्त्रीची अशी विटंबना होत आहे. आपला भारत देश हा कायदे करतो. मग चुकतो कुठे. कायदयाची अंमलबजावणी करण्यात का ? गुन्हेगारांना कायदयाची भिती राहीली नाही. भारतात स्त्रिया खरचं सुरक्षित आहे का? या विषयी लिहिले तर मोठे रामायण आणि महाभारत होणार. ज्या भारतात महाभारत घडलं असे सांगतात त्या भारतामध्ये स्त्रियांना सुरक्षाच नाही ,स्वातंत्र्य नाही. ही आपल्या सर्वांसाठी लाजीरवाणी गोष्ट आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडे स्त्रिया आल्यास मोगल काहीच काळजी करत नव्हते. कारण त्यांना माहिती होते की, शिवाजी महाराज स्त्रियांचा सन्मान करतात. पण आजचे तरुण स्त्रीचा सन्मान करत नाहीत. स्त्री ही कोणाची तरी बहिण, मुलगी असते. त्यांना वाकडे नजरेने पाहिल्यास व त्यांच्या बलात्कार करणाऱ्यास चौकात मारले पाहिजे. पण आज तसं होताना दिसत नाही म्हणून अपराध करणाऱ्याला कोणतीही भिती राहिली नाही. गुन्हेगार हा गुन्हा केल्यानंतर तो पैशाच्या जोरावर बाहेर यायचा. यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत चालली आहे. जिजाबाईंनी शिवाजी महाराजांना लहानपणापासून चांगले संस्कार दिली होते. पण आजच्या काळात ते कोणत्याही तरुणाकडे पाहिल्यास जाणवत नाही. खरं आजच्या काळात

स्त्रियांची सुरक्षा ही काळाची गरज बनली आहे.

हैद्राबादमध्ये प्रियांका रेड्डी आणि आता हिंगणघाट प्रकरण यासारख्या अजून कित्येक घटना झाल्या आहेत. देशामध्ये आज वर्ष दोन वर्षात अशा घटना घडतात. ग्रामीण भागात या घटना मोठ्या प्रमाणात होतात पण ते दाबून ठेवल्या आहेत अजूनही बलात्कार करण्याऱ्या अपराध्याला बऱ्याच ठिकाणी शिक्षा दिली जात नाही. त्यामुळे भितीच राहीली नाही गुन्हेगारांना. उत्तर प्रदेशमध्ये पोलीसाच्या गाडीत एका मुलीवर बलात्कार झाला हे किती जणांना माहिती आहे. ह्या गुन्हात सीआरएसपीचा एक जवान होता. आणि पोलीसांचा मुलगा होता त्यांना शिक्षा झाली का ? हे माहित नाही. त्या पिडीत मुलीच्या कुटुंबाला मदत मिळाली का हेही माहित नाही.

NDTV India is 24 hours Hindi News या चैनलमध्ये दाखवले होते की, बलात्कार का होतात ? मुलांची मानसिकता तशा प्रकारे का होते ? याचा शोध घ्यायला पाहिजे. आजच्या काळात सोशल मिडीया आहे. हातात मोबाईल फोन आहे. ज्या वयात मुलांनी अभ्यास करायला पाहिजे त्या वयात मुलं फोनमधील कित्येक ॲप पाहून या वयात नको त्या गोष्टी शिकतात. त्यामध्ये यु ट्युबचा मोठ्या प्रमाणात गैरवापर मुलांकडून होतो. यु ट्युब मध्ये ५ ते १० मिनिटला एखादा ब्रेक असतोच त्या ब्रेकमध्ये मुलींनी अंग प्रदर्शन करणारे कपडे घातलेले असतात. त्यांचा परिणाम मुलांच्या मनावर होतो. आज स्त्रिया असुरक्षित आहेत. याचा परिणाम सर्व सोशल मिडीया हाही त्यास जबाबदार आहे.

माझ्या मते मुलींनी स्वत:जवळ चाकू सुरीही ठेवली पाहिजे.त्यामुळे ती एखाादया मुलाच्या तावडीतून एक दोन हात करुन स्वत:ची सुटका करेल पण ३,४ असतील तर ती काय करु शकेल. ती त्यांच्या समोर असहाय्य होणारच. काही समाजातील लोक बसल्या ठिकाणी म्हणतात की मुलीने त्यावेळी असे करायला हवे होते. तसे करायला हवे होते पण म्हणतात ना ? ज्याचं जळतयं त्यालाच कळतं, साखर खाल्याने चव कळते तसेच अनुभव आल्यावर समजते किंवा परिस्थिती आल्यावर समजते. समाजातील लोक मुलींनी कसे कपडे घालावेत ते सांगतात त्यावरुन त्यांचे संस्कार ठरवितात असे सांगतात ना ? मग मुलीने कसे वागावे हे आदी का नाही जावून त्यांना शिकवतात. स्त्रियांना प्रवास करताना मानसिक त्रास होतोच त्याचबरोबर प्रवास करताना बसमध्ये पुरुषांचे घाणेरडे स्पर्श नाईलाजाने सहन करावे लागतात मग स्त्रियांची सुरक्षा कुठे आहे. खरचं आजची स्त्री सुरक्षित आहे का ? हा प्रश्न मला पडतोच. स्त्री म्हणजे काय असते ? तुमच्या बापाची प्रॉपर्टी नाही. पुरुष तिचा हवा तसा वापर करणार.असं करणं म्हणाज काय तुमच्या बापाचं राज्य आहे का?

स्त्री म्हणजे काय...
जिवारमांची वसुंधरा तू....
यावनाची कामिनी तू....
हिमतीची वाघिण तू....
कुळाची स्वामिनी तू....
आकाशी धगधगती सौदामिनी तू....
ओलावून बसणारी श्रावणी तू....
उन्हात गारव्याची सावली तू....
थंडीच्या शहाऱ्यात उबेची दुलई तू....
पतीची अर्धांगीनी तू....
लेकराची माऊली तू....
भावाची पाठराखीण बहिण तू....
मैत्री जपणारी मैत्रिण तू....
ज्ञानाचा प्रसार करणारी विधा तू....
स्वरांची सुरेल सरस्वती तू....
शब्दातून जिवंत अशी कविता तू....
शिवबाची जिजाऊ तू....
राणी झाशीची बळकट बाहु तू....
ताजमहलाची प्रेमळ निशाणी तू....
राक्षसांना बघणारी काली माता तू....
सळसळत्या मावळ्यांची जय भवानी तू....
ना कुठला इंद्र मा कुठलाच शिव...
ना संपणार तुझे अस्तित्व... ना तू विरळ होणार....
तुझ बाचुन हे विश्व आपुले.किती काळ टिकणार....

स्त्रिला जर सुरक्षित ठेवायचे असेल भारत सरकारने भारतातील प्रत्येक स्त्रिला एक असं शस्त्र दिला पाहिजे जेणे करुन त्यांना ते कोणत्याही अडचणीच्या क्षणात व त्यांच्यावर अत्याचार होत असल्यास तिला वापर करता यावा कारण अत्याचार तिच्यावर होतो. दुसऱ्यावर होत नाही. मग त्याला शिक्षा देण्याचाही अधिकार तिला दिला पाहिजे. भारत सरकारने त्याला शिक्षा देण्याचाही अधिकार तिला दिला पाहिजे. भारत सरकारने स्त्री सुरक्षित तर देश सुरक्षित एक पाऊल स्त्रियांच्या सुरक्षितेसाठी ही भूमिका प्रत्यक्षात आणली पाहिजे.

– विनोदी लेखन–

क्रिकेट आणि मी

कु. तुलसी येमुल
बी. कॉम. भाग-१

कोण जाणे पण वयाची चाळीशी उलटून जाईपर्यंत क्रिकेटची गोडी मला लागलीच नाही आणि त्याचे आकर्षणही कधीच वाटले नाही. क्रिकेटचे आणि माझे पहिल्यापासूनच किती सख्य आहे हे माझ्या मित्रमंडळाना तसेच नातेवाईकांना चांगलेच ठाऊक आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे या सर्वांपैकी कुणीही माझ्या समोर क्रिकेटचा विषय कधीच काढत नव्हते. माझी क्रिकेटच्या ज्ञानाविषयीची ख्याती सगळीकडे पसरलेली होती. दोन – तीन उदाहरणेच तुमच्या समोर ठेवतो म्हणजे तुम्हालाही माझ्या क्रिकेट प्रेमाविषयी कळेल.

पहिले उदाहरण म्हणजे माझ्या विद्यार्थी दशेमध्ये जेव्हा भारत आणि श्रीलंका आणि कुठल्याही दोन देशामध्ये क्रिकेटचे सामने रंगत असत तेव्हा प्रत्येकाच्या काना जवळ ट्रान्झीस्टर असायचा आणि प्रत्येक जण क्रिकेटची कॉमेंट्री ऐकण्यात तल्लीन होऊन जायचे हे सर्व पाहून मला मोठी गंमत वाटायची मी मनातला मनात म्हणायचो ' लोक किती रिकामे टेकडे आहेत. कामधाम सोडून खुशाल कॉमेंट्री ऐकत आहेत.'

अशावेळी रस्त्याने जाणाऱ्या एखाद्या वाटसरुने उत्सुकतेने चुकून मला विचारले की '' स्कोअर काय झाला ? '' तर त्यालाच मी प्रतिप्रश्न करायचो '' तुम्ही जर माझ्या तीन प्रश्नाची उत्तरे दिलात तर मी तुम्हाला स्कोअर सांगू शकेन तेव्हा तो भाबडेपणाने मला विचाराचा '' कोणते तीन प्रश्न'' मग मी त्याला आरामात म्हणायचो '' महाशय माझे तीन प्रश्न असे आहेत की कोण कोण खेळतयं ? कुठे खेळतयं ? आणि काय खेळतयं ? या सर्व प्रश्नांची उत्तर मला सांगा मग मी तुम्हाला सांगतो स्कोअर किती झालाय ते ? '' माझे हे उत्तर ऐकुन कुठून अवदसा आठवली आणि या मुर्खाला स्कोअर विचारला हे किंवा तत्सम दुसरे वाक्य मनावल्या मनात म्हणत तो काढाता पाय घ्यायचा.

दुसरे उदाहरण म्हणजे नोकरीच्या निमित्ताने मी पैठणला गेलो होतो तेव्हा तिथे गणेशोत्सामध्ये विविध कार्यक्रम व्हायचे तिथे एका गणेश मंडळाने एकदा उत्स्फूर्त भाषण स्पर्धा ठेवली त्या भाषण स्पर्धेसाठी मीही माझे नाव नोंदविले. समोर एका बॉक्समध्ये विविध विषय लिहिलेल्या अनेक चिठ्ठ्या ठेवलेल्या होत्या ज्याचे नाव पुकारले जाईल त्याने स्टेजवर येऊन बॉक्समधून अनेक चिट्ठ्यांपैकी एक चिठ्ठी काढायची आणि त्यात जो विषय लिहीलेला असेल त्या विषयावर पाच मिनिटे बोलायचे अशी ती स्पर्धा होती. चार पाच स्पर्धकांची भाषणे झाल्यानंतर माझे नाव पुकारले गेले.

मी स्टेजवर जाऊन एक चिठ्ठी काढली त्या चिठ्ठीत नेमका '' क्रिकेट '' एवढाच शब्द लिहीलेला होता. आता आली का पंचायत! जिथे चोराची भीती तिथेच दिवस माळवतो अशी एक म्हणं मी ऐकून होतो. त्या म्हणीची प्रचिती मलाच येईल असे कधीच वाटले नव्हते. मला तर क्रिकेटमधले ओ का हो माहित नव्हते. भाषणासाठी पाच मिनिटाची वेळ दिलेली पण इथे तर माझी पाचावर धारण बसली. काय करावे सुचेना पण लगेच माझ्या अंगी उपजतच असलेली समयसुचकता माझ्या कामी आली आणि मी स्वतः ला सावरले आणि लगेच भाषण सुरु केले '' मित्रांनो आजकाल आपण पाहतो जो तो उठतो आणि क्रिकेटची महती गातो. या क्रिकेटने सर्वांना वेडे करुन सोडले आहे. क्रिकेटचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सामने सुरु झाले की गल्लोगल्ली छोटी–छोटी मुले तरुण मंडळी इतकेच नव्हे तर प्रौढसुध्दा हातात क्रिकेटची बॅट घेऊन क्रिकेट खेळायला तयार होतात. अरे काय चाललयं काय हे तुम्हाला माहित आहे का? चीन, जपान, अमेरिका हे पुढारलेले देश क्रिकेटचे नाव सुध्दा घेत नाहीत. आपल्या भारतातच आहेत हे क्रिकेटचे लाड. आपला राष्ट्रीय खेळ कबड्डी आहे. पण तो किती दुर्लक्षित आहे. वास्तविक आपण आपली कब्बडी सातासमुद्रापार नेण्याइतके समर्थ आहोत पण कुणी लक्षातच घेत नाही.

असे सांगत मी सगळे भाषण कबड्डी वरच केले. पाच मिनिटांची वेळ केव्हां संपली मला कळालेच नाही. वेळ संपल्याची घंटा जेव्हा अध्यक्षांनी वाजवली तेव्हाच मी थांबलो. उपस्थितांनी सुध्दा टाळयांचा कडकडाट करुन माझे भाषण आवडल्याची पावती दिली. म्हणजे क्रिकेटविषयी मनामध्ये नकारात्मकता असूनही मी माझे भाषण व्यवस्थित पूर्ण केले. याचे राहून राहून मलाच नंतर आश्चर्य वाटू लागले.

ते काहीही असो पण एक दिवस मी मनाशी विचार केला

की इतरांइतके नसेल तरी थोडे बहुत का होईना स्वारस्य आपण क्रिकेटमध्ये दाखवायला काय हरकत आहे ? मग तो जमेल तसा क्रिकेटचा सामना टिव्हीवर अगदी लक्षपूर्वक पाहू लागलो. फलंदाजी कोण करतो. गोलंदाजी कोणाकडे आहे यांची माहिती घेऊ लागलो. कोणती टीम जिंकली. कोणती हरली या गोष्टीमध्ये रस दाखवू लागलो. पण यामुळे झाले असे की क्रिकेटमधल्या अशा काही नवीन गोष्टी मला कळू लागल्या की ज्या कदाचित इतर क्रिकेटरसिकांना कळतही नसतील. उदाहरणच द्यायचे झाले तर जेव्हा एखादा गोलंदाज एखाद्या फलंदाजाला बाद करायचा तेव्हा तो बाद झालेला फलंदाज पॅव्हेलियनकडे जाण्यास उशीर करु लागला तर तो गोलंदाज अशा काही नजरेने त्याच्याकडे पाहयचा की मला वाटायचे आता हा गोलंदाज त्या फलंदाजाचा गळाच पकडतो की काय किंवा अपेक्षेपेक्षा जास्त धावा करणारा फलंदाज विजयी मुद्रेने आपली बॅट स्वत: भोवती अशी गरगर फिरवायचा की मला वाटायचे जर गोलंदाज थोडा जवळ असता तर त्याच्या डोक्यातच याने बॅट हाणली असती की काय ?

फलंदाज फलंदाजीला तयार झालेला असताना पंच गोलंदाजला चेंडू टाकण्याचा इशारा करतो आणि लगेच गोलंदाज धावायला लागतो. त्याने धावणे सुरु करताच अचानक फलंदाज यष्ट्या समोरुन बाजूला होऊन गोलंदाजाला थांबायला सांगतो. त्यामुळे स्वत:ची मेहनत वाया गेल्यामुळे गोलंदाज संतापाने मागे फिरतो आणि हातातील चेंडू रागारागाने जवळपासच्या क्षेत्ररक्षकाकडे फेकून तणतणत हातवारे करीत धावपट्टीवर परत जातो पण हे फक्त टीव्हीवर सामना पाहताना मलाच समजायचे. प्रत्यक्ष स्टेडियमवर हजर असलेल्या प्रेक्षकांना त्याची काही सोयरसुतक नसायचे. बहुदा पूर्वी कोणताही खेळाडू मैदानावर आल्यावर आधी शांततेने मैदानाचा अंदाज घ्यायचा. मैदानावर स्वत:ला स्थिर करायचा. आपली बॅट हलके हलके मैदानावर मारुन पहायचा मग एकदा डावीकडे नजर टाकायचा एकदा उजवीकडे नजर टाकायचा. क्रीजवर उभा राहून चेंडूची वाट पाहायचा. मग कधी कधी गोलंदाजाने धावायला सुरुवात केला की, हा खेळाडू क्रीजपासून बाजुला व्हायचा गोलंदाज मग परत जायचा आणि चेंडूला थुंका लावून आपल्या पँटीला चांगला रगडायचा नंतर तो चेंडू फेकायचा. फलंदाज त्या चेंडूचा आदर करुन फलंदाजची करायचा. जर फलंदाज चेंडूच्या प्रेमात पडला तर एखादा चौकार किंवा षटकार लगावूनच थांबायचा. एखाद्या खेळाडूने दिवस भरात दोन चार चौकार किंवा एक दोन षटकार मारले तरी तो सर्व प्रेक्षकांच्या कौतुकास पात्र ठरायचा. पूर्वी या टीमचे खेळाडू या टीमच्या खेळांडूसोबत गप्पा, गोष्टी किंवा विनोद करुन वातावरण आल्हाददायक ठेवायचे पण आज परिस्थिती बदलली आहे. 'हाय' नाही अन् 'हॅलो' नाही.

आता तर मैदानावर आल्याबरोबर '' दे दणादण'' सुरु होऊन जाते. स्त्रियांनी संक्रातीचा आवा लुटावा त्याप्रमाणे पहिल्या चेंडूपासूनच धावांचे डोंगर रचायला सुरुवात होते. या सगळ्या धामधुमीमध्ये बिचाऱ्या चिअर गर्ल्सचे खूप हाल होतात. प्रत्येक चौकारावर आणि षटकारावर त्यांना ठुमका लावावा लागतो. सौंदर्याची इतकी उघडउघड बेअब्रू कुठेही आणि कधीही झाली नसेल. फलंदाज जेव्हा एक किंवा दोन धावा काढतो तेव्हा या चिअरबालांनी हळूहळू कंबर हलवली तरी चालते. पण जेव्हा चौकार किंवा षटकार होतो. तेव्हा इतक्या जोरजोरात कंबर हलवावी लागते. जणू काही विजेचा झटकाच बसला त्यांना. बिचाऱ्या चिअरबाला माझ्याच्याने तर त्यांचे हे हाल बघवतच नाहीत. त्या चिअर बाला चौकार किंवा षटकार ठोकणाऱ्या खेळाडूंना मनातल्या मनात शिव्या घालीत असतील.

'' स्वत: जागेवरून इंचभरही न हालता सहा धावा पदरात पाडून घेतल्या अन् इकडे आम्ही कंबर हलवून हलवून बेजार झालोत इतकीच हौस आहे धावा काढायची तर जरा मैदानावर पळत जाऊन घाम गाळून काढ ना धावा असे काहीसे त्या मनात म्हणत असतील. तुम्ही काही म्हणा पण मला त्या चिअर बालाचे हाल पाहवत नाही. माझा जीव त्याच्यासाठी तीळ तीळ तुटतो पण मी बसल्या जागेवरुन त्यांची काहीच मदत करु शकत नाही. म्हणून मला अपराध्यासारखे वाटते. या चिअर बालांना जर कुणी विचारले की '' आदर्श खेळाडू कसा असावा'' तर त्या नक्कीच म्हणतील की, सुनील गावास्कर सारखा असावा'' कारण सुनील गावस्करने पहिल्या विश्वचषकाच्या सुरुवातीलाच साठ ओव्हर मध्ये नॉट आऊट राहून केवळ छत्तीस धावा काढल्या होत्या.

पूर्वी स्वर्गातील अप्सरा ऋषी मुनींना स्वत:च्या सौंदर्याने मोहित करुन त्याच्या तपश्चर्येमध्ये अडथळे आणीत असत. त्यामुळे त्या ऋषींची तपश्चर्या भंग पावत असे पण आमचे हे क्रिकेटर कशाचे बनले कोण जाणे. चिअर बाला सुंदर असतात नृत्यामध्ये पारंगत असतात. एकदम कमी कपडे घालतात. जीव तोडून नाचतात पण त्याच्याकडे हे खेळाडू ढुकूंनही पाहत नाहीत. फलंदाज असो की गोलंदाज असो त्याची नजर फक्त चेंडूवरच.

मला तर कधी कधी असे वाटते की, प्रत्येक चिअर बाला क्रिकेटच्या मैदानाकडे निघण्याअगोदर देवाला प्रार्थना करीत असेल की अव्वल दर्जाच्या खेळाडूंना लवकर बाद होऊ दे. कारण कालपासून कंबर दुखतेय. आज तरी कंबरेला आराम मिळू दे किंवा परमेश्वरा आज असं काही तरी कर जेणेकरुन प्रत्येक चेंडूला अंपायर तिसऱ्या अंपायरच मत मागेल सामाना भलेही उशिरापर्यंत चालू दे. पण दोन चेंडूच्या मध्ये भरपूर अंतर राहू दे म्हणजे मला थोडा तरी आराम मिळेल.

माझी तर देवाला अशी प्रार्थना आहे की क्रिकेटच्या खेळामध्ये पूर्वीचे शांत दिवस पुन्हा येवोत. चिअर बालांना एवढे कष्ट करण्याची गरज न पडो. त्यांना अंगभर कपडे दिले जावेत जेणेकरून त्यांनाही मैदानावर त्याची कला दाखविणे सुसह्य होईल.

सायबर वर्ल्ड

मुलाखत घेणाऱ्या विदयार्थीनीचे नाव कु. विद्या बिर्रु व पल्लवी तगारे (बी.सी.ए. भाग-३)

मुलाखत : श्री.व्ही.बी. बायस
(पोलिस निरीक्षक सायबर गुन्हे शाखा,सोलापूर)

कु. विद्या बिर्रु
बी. कॉम. भाग-२

१. प्रश्न–सायबर गुन्हे कोणते आहेत आणि त्याचा तपास कसा केला जातो ?

उत्तर : मोबाईल हाय टेक्नॉलाजी आजकाल खूप वाढली आहे. त्याचा वापर खुप केला जातो. आपल्या दैनंदिन जीवनात असे एकही काम नाही जे ऑनलाईन करु शकत नाही. समाजात दोन प्रकारचे लोक असतात एक टेक्नॉलाजीचा सदुपयोग करणारे आणि एक टेक्नॉलाजीचा दुरुपयोग करणारे, जे दुरुपयोग करतात ते आपल्यापेक्षा एक पाऊल पुढेच असतात. सायबरमध्ये फिशिंग नावाचा प्रकार असतो, हुबेहुब दिसणारे ॲपलिकेशन्स व वेबसाईट्स तयार करतात आणि ते लोकांपर्यंत पोहोचवतात. यालाच फिशिंग असे म्हणतात. उदा. मासेमारी. जसे आपण मासे पकडण्यासाठी जाळे लावतो, माशांना वाटते की आपल्यासाठी काही तरी खाद्य आहे, तसेच ते आपल्यासाठी हुबेहुब दिसणारे ॲपलिकेशन्स आणि वेबसाईट्स आपल्यापर्यंत पोहोचवतात मग आपण त्यात अडकतो. जसे की बँकेचे वेबसाईट (हुबेहुब बँकेसारखी दिसणारा वेबसाईट) ते आपल्याकडे मेसेजद्वारे पोहोचवतात आणि ते आपण बँकेची वेबसाईट आहे म्हणून त्या वेबसाईटला उत्तर देतो पण त्यात आपली सगळी स्वत: ची माहिती असते आणि ते आपण त्यांना देतो. किंवा त्यांचा फोन येतो कि तुमचे क्रेडिट किंवा डेबिट कार्डची मुदत संपला आहे ते वाढवून देतो. ते आपल्याला असे भिती घालतात की आता आपण आपले बँकमधून पैसे काढू शकत नाही या भितीने आपण आपल्याला आलेले OTP (One time password) त्यांना सांगतो. आणि या ओटीपीद्वारे ते आपल्या खात्यामधून पैसे काढतात.

या मध्येच दुसरा प्रकार आहे तो म्हणजे हॅकिंग. यात आपले स्वत: चे कॅम्प्युटर किंवा लॅपटॉप हॅक करतात आणि त्याचे हार्ड डिस्क ईनक्रप्ट करतात. याकाळामध्ये रॅमसम व्युअर नावाचा एक हॅकिंगचा प्रकार आला होता. त्यामध्ये ते आपले कॅम्प्युटर किंवा लॅपटॉपचे हार्डडिस्क ईनक्रिप्ट करतात आणि ते आपल्याला ॲक्सेस करता येत नाही. त्याच्यासाठी ते एक KEY देतात आणि त्या KEY ची किंमत २ ते ३ लाखांवर असते. यासाठी आपले लॅपटॉप व कॅम्प्युटर जास्तीत जास्त सुरक्षित ठेवावे लागते. जेणेकरुन बाहेरची व्यक्ती ते हाताळू नये .

त्यातलाच एक प्रकार आहे सोशल मिडीया. आजकाल लहान मुलांपासून ते वयस्कर माणसांपर्यंत सगळे वापरतात. त्यात व्हाट्स्अप, फेसबुक, ईन्स्टाग्राम, ट्विटर इत्यादी. ते वापर करत असताना आपण त्यातील उणिवाचा चा विचार करत नाही आणि ते आपल्याला मनोरंजन आहे असं वाटते आणि आपण ते सहज म्हणून प्रोफाईल ओपन करतो. अनोळखी किंवा ओळखीच्या व्यक्तीनां आपण फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा त्यांच्याकडून येते आणि आपण तिचा स्वीकार करुन बोलायला सुरुवात करतो आणि बोलताबोलता आपण जे सांगू नये ते सांगतो.जसे की, फोन नं, घरचा पत्ता , आपला फोटो त्यांना पाठवतो. आणि ते फोटो डाउनलोड करुन त्याचा दुरुपयोग करतात. यालाच मॉरफिंग असे म्हणतात. यात चेहरा एकाचा आणि शरीर एकाचे असते. या फोटोचा उपयोग ते कुठेही कसेही करु शकतात. आणि ते आपल्याला ब्लॅक मेल पण करु शकतात . त्यामुळे आपण कोणालाही आपली माहिती शेअर करु नये. कुणाला किती माहिती शेअर करावी हे आपल्याला माहित असले पाहिजे, म्हणून सोशल मिडीयामध्ये कमीत कमी माहिती दिली पाहिजे. आपण आपली माहिती जास्त शेअर केल्यामुळे आपली प्रोफाईल हॅक होऊन आर्थिक फसवणूक होऊ शकते. त्यामुळे आपल्या अकाऊंटचा पासवर्ड स्ट्राँग ठेवला पाहिजे. स्ट्राँग म्हणजे हा पासवर्डमध्ये नाव,नंबर विशेष चिन्ह याचा समावेश करावा कॅरक्टर्स नंबर्स , स्पेशल सिंबॉल्स ठेवले पाहिजे .प्रत्यक्ष उदा : मॅट्रीमोनी साईटस् चे एक उदाहरण म्हणजे त्यात एक व्यक्ती (

मुलगा) तो पदवीधर आहे असे प्रोफाईल तयार केले आणि त्या साईटस्वर असलेल्या सगळ्या मुलीचे प्रोफाईल चेक केले. त्यानंतर एक १ मुलीला त्याचे मोबाईल नंबर शेअर केला आणि त्या मुलीसोबत चांगल्या पध्दतीने बोलणं सुरु झालं आणि त्यांने चांगल्या प्रकारे त्या मुलीचा विश्वास संपादन केला, प्रत्यक्ष ती मुलगी त्याला भेटली सुध्दा आणि त्या दोन्ही कुटुंबामध्ये बोलण झालं आणि त्यात त्या मुलाने मुलीला सांगितले की तो नेव्हीमध्ये काम कारत आहे. तो अंडर कव्हर ऑपरेशनमध्ये काम करत आहे ही गोष्ट जास्त जणांना माहिती नाही असे त्याने त्या मुलीला सांगितले.

त्यानंतर आता त्याची सुट्टी संपली आणि तो आता कामाला जात आहे आणि कामावरुन यायला ६ ते ७ महिने जातील व आल्यानंतर आपण लग्न करु असे सांगून तो निघतो. २ महिन्यापर्यंत तो आपला मोबाईल बंद ठेवतो व दोन महिन्यानंतर दुसऱ्याच नंबर वरुन तिला त्याचा फोन येतो आणि सांगतो की ठराविक एका जागी फसलो आहे. मला इकडून निघण्यासाठी पैशाची खूप गरज आहे. तू या नंबरवर मला गुगल पे मधून २-३ लाख रुपये पाठव आणि ती विश्वास ठेवून पैसे पाठवते. असे करुन तो तिच्या कडून १५ ते २० लाख रुपये घेतो. त्यानंतर थोडया दिवसानी ती त्याला संपर्क करण्याचा प्रयत्न करते. पण त्याचा फोन बंद होतो आणि तो दिलेला पत्ता सुध्दा चुकीचा असतो. त्यानंतर तिला समजतं की आपल्या सोबत फसवणूक झाली हे झाले सायबर क्राईम चे प्रकार.

२.सायबर गुन्हांचा तपासा कसा लावला जातो ?

उत्तर : सायबर गुन्ह्याच्या प्रकारात फेसबुकची प्रोफाईल हॅक झाली आणि त्यातून कुठल्या मुलीना किंवा कुठल्याही व्यक्तीला कुठल्याही पध्दतीने कोणताही मेसेज पाठवणे वा व्हिडीयो शेअर करणे आणि एकाच मुलीला सतत मेसेज करणे असले प्रकार होतात आणि त्याचा तपास त्या प्रोफाईलची माहीती फेसबुक वरुन काढून त्याचा रजिस्टर नंबरचा आईपी आड्रेस् व ते कोठे,केव्हा, लॉग ईन केला आणि ह्याचा तपास करुन त्या फ्रॉडला पकडतात. किंवा रजिस्टरनंबर ऐवजी त्याने ई-मेल आयडीने लॉग ईन केला असेल तर ते फेसबुक खाते लॉग ईनद्वारे कुठल्या संगणकावर कधी लॉग ईन केला हे त्याच्या संगणकांच्या आईपी ॲड्रेसने कळते आणि तो फ्रॉड व्यक्ती पकडला जातो.

३. सायबर गुन्ह्यांना कोणती कलमे लागू होतात ?

उत्तर : यामध्ये IT Act ६६ आणि ६७ हे दोन कलम लागू होतात. त्यामध्ये 66A रद्द झाले आहे. 66B व 66C हे दोन कलमे आर्थिक फसवणूकीसाठी लागू होतात. आणि 66D हा बँक फसवणूक म्हणजे एखादी व्यक्ती बँकेतून फोन करत आहे असे बोलतो आणि आपण त्याला आपली माहिती देतो. त्यानंतर आपल्याला समजते की आपली फसवणूक झाली. यासाठी हे कलम लागू होते, 66E या कलमामध्ये एखादी व्यक्ती Personal & Privacy Limit Cross करतात त्यासाठी हे कलम आहे. 66F हे कलम सायबर आतंकवादी यांच्यासाठी आहे. 67A हे कलम एखाद्या व्यक्तीला Text, message, Photo, Records , Videos , चुकीचे मेसेज पाठवतो यासाठी हे कलमे लागू होते. 67B हे कलम Child Pornography साठी लागू होते. यामध्ये आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर अशी यंत्रणा आहे की त्यामध्ये Child Pornograph हे Download करणे किंवा बघणे हे सोडून तो Search जरी केला तरी त्यांना कळते की ठराविक ठिकाणी या व्यक्तीने या गोष्टी Search केल्या आहेत. त्यामुळे त्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो. यामध्ये एखाद्या व्यक्तीने case करावी असा कोणताही नियम नाही. उदा. एका case आहे ती केंद्र सरकारकडून आलेली होती. त्यामध्ये एका मुलाने Child Pornography चे २ व्हिडीओ Share केले होते आणि त्यावर 67B या कलमा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

67C हे कलम मध्यस्थी (Mediator Or Third Party) यांच्यासाठी लागू होते. 66C, 66D, 66A, 67B सध्या या चार कलमांचा वापर करतात. यासोबत IPC ची कलमे सुध्दा लागू होतात. एखाद्या मुलीला Fake Profile Continuous मेसेजेस येत असेल तर त्यावर PC 354 हा कलम लागू होते. (विनयभंगाचा) गुन्हेगार हा अल्पवयीन म्हणजे १८ वर्षाच्या आत असेल तर त्यावर Prospo Act चा गुन्हा दाखल होतो. IPC 420,66C,66D हा कलम Financial Fraud साठी लागू होतो. IPC d IP Act चे कलम लागू केले जाते.

४) एखाद्या महिलेच्या फोटोचा दुरुपयोग झाल्यास त्याचा शोध कसा लावला जातो ?

उत्तर : एखादी मुलगी आपला फोटो FaceBook, Instagram, अशा Social media मध्ये Post करत असते. त्यामध्ये ती Settings न बघता Post करते आणि त्या Settings मध्ये Public , Only Me , Friends, Friends - Friends Ago चार Options असतात. पण ती मुलगी Public हा Option निवडून #tag घालून Post करते तेव्हा तिचा फोटो हा Publically सगळ्यांकडे जातो. Fake Profile तयार केलेली व्यक्ती किंवा Fraud व्यक्ती याला तुमचा फोटो शोधणे किंवा तुमच्या मागे येणे याची गरज भासत नाही तो सहजपणे तुमचा फोटो Download करुन त्याचा दुरुपयोग करतो. यामध्ये तो तुमच्या फोटोचा वापर BlackMail साठी करतो. आणि त्या Account वरुन तुमच्या मित्र-मैत्रिणींना चुकीचे मेसेज करणे, Videos पाठविणे किंवा पैशांची मागणी करणे अशाप्रकारे तो छळ करतो. आणि तुमचा फोटो ते Adult Site, वर Post केला असेल तर ते कधी, कुठे व कोणी केला याची महिती त्या Site वरुन कळते. असा त्याचा शोध होतो . यासाठी म्हणून आपले Account Hack होऊ नये (कुठला ही FaceBook , Instagram, Whatsup) म्हणून Two-Step Authentication करणे गरजेचे आहे. आणि हे केले तर मोबाईल नंबर वर एक OTP येतो ते कोणाला ही

सांगू नये. सांगितला तर Account Hack होते.

५. सायबर क्राईमवरील संशोधनावरील नवीन ट्रेंड काय आहेत ?

उत्तर : सध्याचा ट्रंड म्हणजे कोरोना काळात Vaccine हा सरकारच्या माध्यमातून मोफत दिला जातो तुम्ही ह्या Link वर आपली माहिती द्या आणि त्या माहितीमध्ये आपली वैयक्तीक माहिती आणि E - Banking चा ID आणि Credit Card & debit Card चा Pin Number द्यायला सांगतात आणि आपण ते देतो. पण ही लिंक Fake असते. व ही जी माहीती आपण त्यांना देतो ते आपल्या संबंधीत बँकेच्या Site वर जाऊन आपली माहिती तेथे भरतात आणि आपल्या बँकेतील खात्यात असलेली रक्कम काढून घेतात.

६.सायबर क्राईमच्या गुन्ह्याविरूध्द डेटाबेसचे संरक्षण कसे केले जाते.

उत्तर : जेव्हा आपण एक server विकत घेतो तेव्हा त्या server बद्दल सगळे अपडेट्स किंवा Settings मधले changes आपण ज्यांच्याकडून घेतो ते changes करतात. आणि नंतर ते आपल्याला provide करतात. ते जो लिंक आपल्याला देतात त्या लिंक च्या माध्यमातून आपण आपली डेटाबेसमधील डेटा संरक्षित करू शकतो. आणि हे बदल सहा महिन्याला किंवा वर्षाला एकदा केला जातो.

७) कोरोना परिस्थितीत सायबर क्राईम ची काय भूमिका आहे. ?

उत्तर : कोरोनाच्या कालावधीत जे लोक बाहेरगावी अडकलेले होते आणि ज्यांना इथून बाहेरगावी जायचे होते त्यांना जे Passes दिले गेले होते ते या सायबर विभागाकडून दिले. यात मजूर, विद्यार्थी इत्यादी होते. जे मजूर बाहेरगावी अडकले होते त्यांना त्यांच्या गावी जाण्यासाठी सायबर officers नी मदत केले होती. आणि हे काम प्रत्येक राज्यामध्ये झाले होते.

८) कोरोना काळामध्ये पोलिसांची यंत्रणा काय व कशी कार्य करत आहे ?

उत्तर : कोरोना काळामध्ये डॉक्टरनंतर महत्त्वाची भूमिका ही पोलिसांची होती. जेव्हा कुठेतरी एक कोरोना व्यक्ती पॉजिटिव्ह सापडली तर तेथे जाऊन सगळीकडे चौकशी करुन त्या पूर्ण जागेला सिल करण्यात आले. आणि ती कोरोना व्यक्ति दुसरीकडे गेली किंवा कोणाला तरी भेटली याची चौकशी करुन महानगरपालिकेत त्यांची माहिती देणे आणि डॉक्टरांपर्यंत त्या व्यक्तीला पोहचवणे असे खूप धोकादायक परिस्थितीतही त्यांनी आपली कर्तव्य चांगल्या रितीने पार पाडले आहे. त्याचबरोबर रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांवर नियंत्रण ठेवणे आणि लोक Social Distance पाळत आहेत की नाही याची तपासणी करणे यासारखी सगळी कामे त्यांना करावी लागत आहेत.

९.महाविद्यालयीन मुलींना कोणत्या महिलेच्या कायद्यांचे ज्ञान असावे ?

उत्तर : IPC ३५४ कलम याच्यानुसार कुठला तरी मुलगा पाठलाग करत आहे आणि तो कुठल्या तरी ठराविक ठिकाणी सारखा दिसत आहे. हा देखील गुन्हा आहे. कुठल्या तरी मुलाने एखाद्या मुलीकडे वाईट नजरेने बघणे सुद्धा गुन्हा आहे . अणि हे कुठल्याही मुलीसोबत घडलेले आहे किंवा घडत असेल तर ती गोष्ट त्या मुलीने सहन करु नये यासाठी त्या मुलावर Prospo चा गुन्हा दाखल होतो. यामध्ये घरात, शाळेत, बाहेर, कुठेही असा प्रकार घडत आहे तर एखाद्या मुलीने कुणावर आरोप केल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल होतो व त्याला शिक्षा दिली जाते व प्रत्येक मुलींना Prospo कायद्याचे ज्ञान असले पहिजे. सायबर tocking हा ही एक गुन्हा आहे यातील व्यक्ती एखाद्या मुलीला सारखा एकच मेसेज करत असेल किंवा तिचा फोटोला Like करणे हेही यात येते. अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करु नये. हुंडाबळी हा ही एक प्रकार यात येतो. यामधून एकच समजते की कुठल्याही Social Media वर आपला फोटो post करु नये किंवा प्रमाणापेक्षा जास्त वापर करु नये आणि आपण सुरक्षित रहावे. कुठल्याही अनोळखी व्यक्तींना Social Media वर आपला फोटो व आपली माहिती त्यांना देऊ नये. Social Media वर post करताना एकदा विचार करायला पाहिजे की हे आपल्याला गरज आहे का ? सारखे Status Update करु नये आपण कुठे ही गेलो कोणासोबत गेलो हे Location ठेऊ नये. यामुळे तो आपले Profile Hack करतो किंवा आपल्याला फसवण्याच्या तयारीतच असतो. त्याला तुमच्या मागे येण्याची गरज नसते कारण तुम्ही त्या पोस्टमुळे त्याला आधीच आपली माहिती दिलेली असते. Social Media वर येणारी माहिती ही खरी असते असे नाही अणि आपण ठरवले पाहीजे की आपण किती Secure असले पाहिजे. सर आपण खूप महत्वपूर्ण माहिती दिली .मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे असणारे कायदे व सविस्तर माहिती दिल्याबद्दल मी महाविदयालयाच्या वतीने आपले आभार व्यक्त करते.



कु. शारदा तवटम
बी. कॉम. भाग-१

– व्यक्तिचित्रपर लेख –

त्यागमूर्ती रमाई

कु. प्रियंका देवळे
बी. ए. भाग-३

प्रेमाचा झरा मायेचा सागर,
रमाई माऊली झाली, दिन दुबळ्यांची सावली.

आता आपणाला प्रश्न पडला असेल की ही रमाई आहे तरी कोण? तर त्या आहेत डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी. त्यागाचे प्रतीक, बाबासाहेबांची प्रेरणा, कोट्यावधी दिनदुबळ्या अस्पृश्यांची माता, बाबासाहेबांची प्रिय रामू ,करूणेचा सागर म्हणजे माता रमाई होय. रमाईने आपले सर्व जीवन डॉ. बाबासाहेबांना समर्पित केले व त्या युग प्रवर्तकांच्या पत्नी झाल्या. या माता रमाईचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ साली रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील वणंद गाव येथे झाला. वडील भिकू धोत्रे तर आई रमाबाई. दारिद्र्य व गरीब परिस्थितीत या काळात त्यांचा जन्म झाला. बहीण, भाऊ लहान असल्याने त्यांवर जबाबदारी होती. त्या लहान असताना आईवडील दोघेही वारले. त्या तिघांचा सांभाळ त्यांच्या वलंकर काकांनी केला. त्या अडाणी पण खूप समजूतदार होत्या. त्यांचा विवाह १९०६ मध्ये डॉ.बाबासाहेबांबरोबर झाला. तेव्हा त्यांचे वय वर्षे ९ तर डॉ. बाबासाहेबांचे १४ वर्षाचे होते. वयाच्या ९ व्या वर्षीच त्यांचावर संसार करण्याची जबाबदारी आली होती. त्या शिक्षित नसून त्या खूप चांगला सांभाळ करत होत्या. घरातील अनेक माणसे मरण पावली. अशावेळी त्यांचे पती सोबत नव्हते. अशाकाळात त्यांनी तेवढे मोठे दु:ख एकटीने सहन केले. पती परदेशी असताना त्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून त्या सांगत नसत व दु:ख एकटी सोसत.

आहे पाठींबा रमाचा, बा भिमाला
साहिले रमाने हाल अपेष्टा
नांदली रामजी सुभेदाराच्या घरी भोळी रमाई.

डॉ.बाबासाहेबांचे शिक्षण पूर्ण होण्याआधी लग्न झाले. ते शिक्षण पूर्ण करण्यास परदेशी गेले. रमाई त्यांच्या आरोग्याची शुभकामना करत करत काबाड कष्ट करत होती आणि आपल्या पतीला पैसे पाठवत व संसारही चालवत होती.

शेण गौऱ्या वेचूनी रमाई
संसारात झाली अर्धांगिणी
बाबांच्या शिक्षणासाठी रात्रंदिन राबली
झाली तिच्या देहाची चाळणी.

त्यांच्या जीवनात अनेक संकट आली पण रमाईने समंजसपणाने संकटांना तोंड दिले. त्यांची मुलं वारली तरी त्या बाबासाहेबांच्या मागे ठामपणाने उभ्या राहिल्या. जेव्हा भिमराव शिक्षण घेऊन भारतात आले तेव्हा त्यांना कळले की, औषधाविना आपला मुलगा राजरत्न मेला, त्यांना खूप दु:ख झाले.

शिक्षण घेऊन आले बाबा भारतात कळला त्यांना रमाईचा जीवन प्रवास गेले राजरत्न झाले बाबा निराश पुन्हा फुलविला संसार दिला रमाईला विश्वास बाबासाहेब म्हणत होते. मी परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहीली व तिला अजूनही वाहावी लागते आहे व मी स्वदेशी परत आल्यावरही माझ्या विपन्न दशेत शेणाचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहून आणण्यास जिने मागे पुढे पाहिले नाही अशा ममताळू , सुशील व पूज्य पत्नीच्या सहवासात दिवसाच्या २४ तासातून अर्धा तास मला घालविता येत नाही. परदेशातून परत आल्यावर प्रिय पत्नीला सुखाचे दिवस दाखविता आले नाही.

शेण गोळ्यांनी फुंकूनी चूल
अपार दु:ख सोसुनी जपले मूल
रमाईने काट्याकुट्यातून फुलविला संसार वेल

बाबांना दिला शिक्षणास आधार अनमोल

बाबासाहेब परत आल्यावर रमाईला सारखे सांगायचे की, तू शिक. तर रमाई म्हणत मला शिकून काय करायचे तर साहेब सांगत की, एक स्त्री शिकली की ती अनेकांना शिकवते. आपल्या यशवंताला तूच शिकवशील. म्हणून रमाई शिकल्या.

रमाई मातेने सोसला अंगार
शिक्षणा भिमाला दिला आधार
जिद्द कष्ट स्वाभिमानाचा तिचा संसार
जीवनभर समाजाचा केला तिने विचार

एकदा रमाई धारवाडच्या वसतीगृहात गेली. तिला समजले की, मुले दोन दिवसांपासून उपाशी आहेत. पण पैसे नसल्याने तेथील लोक काही करु शकत नव्हते. रमाईने कोणताही विचार न करता आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढल्या व तेथील प्रमुखाकडे दिल्या आणि आपल्या हाताने मुलांना ताठ वाढून जेऊ घातले.

आभाळाचा पदर छाया आहे, जगात रमाईची अशी माया अमर आहे. अशा रमाईवर २७ मे १९३५ रोजी काळाने झडप घेतली आणि आपला डाव साधला. रमाई गेल्यावर प्रत्येक स्त्री तिच्या साठी आपले अश्रू ढाळत होती.

यागाला वाटावी लाज असा माई तुझा त्याग
त्यागानेच निर्माण झाला आम्हा मुलींचा अभिमान.
त्यागाच्या वाटेचा, खडतर प्रवास तू
चंदनाच्या फुलमाळीचा, सुगंधीत सुवास तू
ज्योतीसम झिजलीस अविरतपणे
बाबासाहेबांना जपताना
पाहिलंय ह्या भारतवर्षाने
अश्रू तुला वेचताना
बुध्दचरित्र वाचणारी तूच होतीस निळाई
नवकोटी हृदयातली आई तू रमाई
मोह तुला ना कधी कनकाचा, साहेब सर्वस्व तुझं
तुझ्या काळोखातल्या श्रमाने, भविष्य घडवलं माझं
तुझा त्याग तुझ्या ममतेच
निळ्या पाखरांना स्मरण होईल,
आठवतील जेव्हा बाबासाहेब
आठवण रमाईची येत राहील.



कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

कु. शारदा तवटम
बी. कॉम. भाग-१

– माहितीपर लेख –

महात्मा गांधीची केंद्रे पर्यटनासाठी उपयुक्त

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग-३

प्रामाणिकपणे मनात विचार केला तर आजच्या प्रगतीच्या अंधळ्या धावपळीत आपण गांधीजीचे मुल्ये आणि त्यांच्या सिध्दांताला विसरत आहोत. ज्या ठिकाणी गांधीजीच्या जीवनाचा आणि आपल्या स्वातंत्र्याचा पाया घातला गेला. तसे पाहिले गेले तर आपण पर्यटन स्थळे सिनेमागृह हॉटेल आणि देशविदेशाला फिरायला जातो. पण आपण गांधीजींशी जोडलेल्या जागी कधीच जात नाही. गांधीजींची ते ठिकाणे जे आपल्या भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात कोरले गेले. पोरबंदरच्या ठिकाणी महात्मा गांधीजींचा जन्म झाला. त्या ठिकाणाला आज कीर्तिमंदिर या नावाने ओळखले जाते. कीर्तिमंदिराची स्थापना होण्याअगोदर त्या ठिकाणी तीन मजली इमारत होती. त्याला महात्मा गांधीजीचे पंजोबानी श्रीहरजीवन रायदास यांनी १७ व्या शतकात खरेदी केले होते. नंतर गांधीजींना सन्मान देत त्या ठिकाणाचा कायापलट करुन त्या ठिकाणी कीर्ति मंदिराची स्थापना झाली. त्याचे उद्घाटन १९५० मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हातून करण्यात आले. कीर्ति मंदिराची स्थापना करण्यात एक खास वैशिष्ट्य आहे. किर्ती मंदिराच्या बांधकामात हिंदु, बौद्ध , जैन मुस्लिम धर्माचे वास्तुकलेचे मिश्रण केले आहे.यामुळे हे मंदिर सर्व धर्मसमभावाचे प्रतिक बनले आहे. गांधीजींच्या ७९ वर्षाच्या जीवनकाळाचा विचार करुन या मंदिराची लांबी रुंदी ७९ मीटर ठेवण्यात आली आहे. या मंदिराची स्थापना उद्योगपती नागजी कालीदास मेहताजींनी मोठ्या मनाने पुरुषोत्तम मिस्त्रीच्या हातून केली होती. आता या जागेची देखरेख भारत सरकारचे पुराततत्व विभागाकडे आहे. त्या ठिकाणी गांधीजींच्या जवळच्या मगनलाल गांधी आणि महादेव देसाई यांची खोली आहेत. महादेव देसाई हे लेखक आणि गांधीजींचे सेक्रेटरी होते. मगनलाल गांधी त्यांच्या काकाचे पुत्र होते. गांधीजींचे भाऊ होते. मगनलाल गांधींनी स्वातंत्र्यलढयाचे नाव सत्याग्रह ठेवण्याचे सुचविले होते. महात्मा गांधीजीची शाळा अल्फ्रेड हाईस्कुल, राजकोट (गुजरात) मध्ये आहे. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीच्या सन्मानामध्ये त्या शाळेला मोहनदास गांधी विद्यालय असे नाव देण्यात आले. नंतर राजकोटच्या महानगरपालिकेने गांधी म्युझियम म्हणुन नाव दिले आहे. त्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी केले आहे. कोचरब आश्रम हे गांधीजीचे देशातील पहिला आश्रम आहे. त्याची स्थापना १९१५ मध्ये झाली. साबरमतीच्या अगोदर या आश्रमाचे स्थापना झाली आहे. अहमदाबादमध्ये त्याचे दोन आश्रम आहेत. या आश्रमात लोकांना स्वावलंबी, समानता, शिक्षण यासारखे अंतरिक आणि आर्थिक प्रगतीचे शिक्षण दिले जाते. साबरमती आश्रमात सरदार वल्लभभाई पटेल त्यांना भेटले होतें. साबरमती आश्रमात नोकर न ठेवण्याचा आग्रह होता. यासाठी तेथील कामे स्वयंपाक करणे, पाणी भरणे स्वच्छता ठेवणे असे सर्व कामे आश्रमात राहणारे व्यक्ती स्वत: करीत होते. साबरमती आश्रमाची स्थापना १९१७ मध्ये झाली. साबरमती आश्रम इथूनच महात्मा गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहाची सुरुवात केली होती. साबरमती नदी ही जवळच आहे. म्हणून महात्मा गांधीजींना साबरमतीचा संत म्हणत होते. या आश्रमाची स्थापना होऊन सुमारे १०० वर्षे झाली आहे.

साबरमती हा आश्रम देशातील लोकांसाठी देशविदेशातील मोठ–मोठ्या नेत्यासाठी प्रेरणा स्त्रोत राहिला आहे. स्वातंत्र्याच्या कार्यासाठी हा आश्रम केंद्रबिंदू राहिला आहे. महात्मा गांधीजी लोकांमध्ये स्वतंत्र जगण्याबरोबर शेती, पशुपालन ग्रामउद्योगासारखे व रचनात्मक कार्यही करत होते. गांधीजीची इच्छा होती, की त्यांचा जन्म दिवस चरख्याच्या जन्म दिवसाच्या स्वरुपात साजरा करावा. त्यामुळे आजचा दिवस २ ऑक्टोंबर या दिवसाला रेटिया भारत या नावाने ही ओळखले जाते. साबरमती आश्रमामध्येआज ही गांधीजींचे जुने वस्त्रे, जुने पत्र, फोटोग्राफ आहेत. महात्मा गांधीजींनी १२ मार्च १९३० ला मिठाच्या सत्याग्रहाला सुरुवात केली होती. महात्मा गांधीजींनी चरखाच्या

साहय्याने देशातील लोकांना खादी वस्त्रे बनवण्यासाठी शिकवले. त्यामुळे देशातील लोक आत्मनिर्भर बनू शकले. ज्या ठिकाणी हे सर्व शिकवले जाते. त्या ठिकाणाला उद्योग मंदिर म्हणून ओळखले जाते. वर्धा येथील सेवाग्राम आश्रम खूप मोठा आहे. हा आश्रम ३०० एकरमध्ये विस्तारित आहे. महाराष्ट्राच्या या वर्धामध्ये सेवाग्राम आश्रमाशी कसा जोडला गेला आहे. गांधीजींना ग्रामीण भागातील कार्यातून देशाची सेवा करण्याच्या हेतूने आणि ते एका गावात जाण्याचे विचार करत होते. त्या ठिकाणाच्या स्थानिक लोकांना त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण देता येईल. त्यात त्यांना म्हणजे गांधीजीच्या खूप जवळच्या उद्योगपती जमनालाल बजाजने वर्धाच्या जवळच ४ मैल लांब या गावात आश्रम करण्याचे सुचविले. गांधीजींनी या प्रस्तावाचा स्वीकार केला आणि हा आश्रम १९३६ मध्ये सेगामध्ये स्थापित केल्यानंतर त्याला सेवाग्राम आश्रम या नावाने ओळखले गेले. गांधीजी नेहमी म्हणत होते. मोकळ्या आभाळाखाली किंवा मोकळे मैदान प्रार्थनेसाठी उपयुक्त स्थान आहे. आजही तिथे दररोज प्रार्थना होते. सेवाग्राम आश्रमाच्या सुरुवातीला एक घर होते. त्यावेळी त्याठिकाणी स्नानगृह आणि स्वयंपाक घर ही होते त्यामुळे त्याला आदिनिवास ही म्हणतात. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाची सभा याच ठिकाणी भरली होती. या ठिकाणी बापुकुटी ही आहे. जी त्याकाळी होती. ती आजही तशीच ठेवलेली आहे. बापुकुटीमध्ये गांधीजींच्या वस्तू आहेत. सेवाग्रामचा एकच उद्देश होता. निस्वार्थ सेवा करणे एक अशी सेवा ज्यात संपत्तीची लालसा नाही, ना सत्तेचा मोह नाही केवळ मानवतेची सेवा आणि या सेवेच्या संदेशाला वर्धापासुन पूर्ण भारतात पोहोचवला जाई. गांधीजींचे कार्यालय हा त्याकाळी जसे होते. आज ही तसेच आहे. आजही त्याकाळचा टाईपराईटर आणि टेलिफोन बुथ ही आहे. महात्मा गांधीजी हे गावात राहिल्याने इंग्रज सरकारला गांधीजींशी संपर्क करणे कठीण झाले होते. तेव्हा इंग्रज सरकारने गांधीजींना टेलिफोन उपलब्ध करुन दिला होता. सेवा, साधेपणा, सर्वधर्मसमभाव आणि अहिंसा हे चार सिध्दांत महात्मा गांधीजींनी पूर्ण देशाला शिकविले.

'मारो जीवन हेच मारो संदेश'

ज्या देशाची प्रजा आपली राष्ट्रभाषा आणि मातृभाषेचा सन्मान करत असेल आणि आपल्या देशाचा इतिहास लक्षात ठेवत असेल तरच आपल्या देशाची प्रगती होते.

महात्मा गांधी यांनी अशी स्थापन केलेले केंद्रे आज पर्यटकांना आकर्षित करणारी आहेत.

कु. शारदा तवटम
बी. कॉम. भाग-१

कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

– माहितीपर लेख –

मोबाईलचे जग

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

आजच्या युग हे विज्ञानाचे युग म्हटले जाते या विज्ञानाच्या साहय्याने मानवाने अनेक शोध लावले आहेत. त्यामुळे मानवाचे जीवन अगदी सोपे बनले आहे. त्या सर्व शोधांपैकी मोबाईल फोन हा एक विज्ञानाचा शोध आहे. ज्यामुळे संपूर्ण जगाचा नकाशा बदलला आहे. त्याचबरोबर हा शोध लोकांना समजण्याचा आणि मानवाने त्याचा विचार करण्याचा आहे. आज मानवाची सर्व कामे ही मोबाईल फोनद्वारे होऊ लागली आहेत.

आज जगातील प्रत्येक व्यक्तीकडे मोबाईल फोन आहे आणि सध्या मोबाईल फोन ला स्मार्ट फोनचे स्वरुप देण्यात आले आहे. त्यामुळे याला ' छोटा संगणक' देखील म्हटला जातो.

जगामध्ये मोबाईल फोन येण्याआधी रेडिओचा शोध लागला होता. तसेच दूरध्वनीचा शोध लावला होता. सर्वात प्रथम मोबाईल फोनचा शोध हा सन १९७३ मध्ये मोटोरोला नावाच्या कंपनीने लावला होता. जो जॉन एफ़ मिशेन आणि मार्टिन कूपर यांनी तयार केला होता. आज आपण कोणत्याही व्यक्तिशी मोबाईलद्वारा बोलू शकतो. मोबाईल फोन हा मानव आपल्या सोबत कोठेही घेऊन जाऊ शकतो. आकारामुळे हा पॅन्टच्या किंवा शर्टाच्या खिशात ठेवू शकतो. तसेच स्मार्ट फोन वरुन व्हिडिओ कॉलही करु शकतो.

आजच्या युगामध्ये मोबाईल फोन हा बोलण्या व्यतिरिक्त एक मनोरंजनाचे साधनदेखील बनले आहे. कारण आपण मोबाईल फोनद्वारा गाणी ऐकू शकतो. फिल्म बघू शकतो, गेम खेळू शकतो. तसेच जगातील वर्तमानपत्रेदेखील वाचू शकतो. तसेच शिक्षणासाठीही आपण मोबईल फोनचा वापर करत आहोत. मोबाईल फोनच्या साहय्याने आपण कधीही आणि सहजपणे कुठेही इंटरनेट चालवू शकतो. याच्या मदतीने आपल्याला जगभरातील कोणत्याही ठिकाणची माहिती मिळू शकते आणि ती आपण पाहू देखील शकतो. अशा प्रकारे मोबाईल फोन हा इंटरनेट चालविण्याचे साधन आहे.

आज बहुतेक व्यवसाय हा मोबाईल फोनच्या साहय्याने चालत आहेत. त्यामुळे काही मिनिटात एक व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्याशी कोणताही व्यवहार करु शकतो. तसेच आपला व्यवसाय हा दुप्पट पटीने देखील वाढू शकतो. प्राचीन काळी मानव व्हिडीओ किंवा फोटो काढायचे असेल तर फोटोग्राफरला बोलावयाचे त्यामुळे खूप पैसा खर्च करावा लागत असे. परंतु आज मोबाईल फोनच्या मदतीने आपण फोटो काढू शकतो तसेच व्हिडीओ देखील बनवू शकतो यासाठी आपल्याला आता कोणत्याही छायाचित्रकाराची गरज भासत नाही.

आज मानव मोबाईल फोनच्या साहाय्याने बँकेचा कोणताही व्यवहार करु शकतो. आज आपल्याला बँकेच्या समोर रांगेत उभे राहावे लागत नाही. तसेच आपल्याला कोणत्याही बँकेत जाण्याची गरज लागत नाही. त्याचप्रमाणे कोणतीही वस्तू विकत घ्यायची असेल तर आपण मोबाईल फोनच्या मदतीने ऑनलाईन मागवू शकतो आणि ऑनलाईन शॉपिंग ही करु शकतो.

बहुतेक लोक हे मोबाईल फोनचा अतिवापर करतात. म्हणून त्यांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. काही लोक हे कार्यालयात काम करत असताना ही मोबाईल वापरतात. तसेच बहुतेक लोक हे वाहन चालवताना मोबाईल फोनवर बोलत असतात. हे चुकीचे आहे. वाहन चालवताना मोबाईल फोनवर बोलू नये लोकांनी याच भान ठेवले पाहिजे. त्याच बरोबर मोबाईल फोनचा योग्य प्रकारे वापर न केल्यामुळे अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्या देखील मानवाला निर्माण होतात. जे लोक जास्त प्रमाणात मोबाईलचा वापर करतात त्यांना मानसिक ताण सहन करावा लागतो मोबाईल फोनचा सर्वात जास्त प्रभाव हा मुलांवर सुध्दा होतो. कारण मुले दिवसभर मोबाईल फोन घेवून गेम खेळत असतात.

अशा प्रकारे मोबाईल फोनचा वापर शिक्षणामध्ये ऑनलाईन लेक्चर करण्यासाठी, व्हिडिओ बघण्यासाठी गाणे ऐकण्यासाठी वेगवेगळे व्यवसाय करण्यासाठी तसेच नवीन नवीन गोष्टी शिकण्यासाठी मोबाईल फोनचा वापर होतो. यावरुन मला कवितेच्या दोन ओळी आठवल्या आहेत.

सोशल मिडीयाच्या युगात माणसे झाली व्यस्त...
रोजच्या रेलचलीत आता जीवन झाले स्वस्त....

मोबाईल फोनचा जर योग्य वापर केला तर ते वरदानापेक्षा कमी नाही. परंतु त्याचा जास्त प्रमाणात वापर केला तर ते आपल्यासाठी रोगांचे घर आहे. मला असेत वाटते की या मोबाईल फोनचा योग्य वापर करुन यातून आपण काहीतरी चांगल शिकले पाहिजे. परंतु मोबाईल फोनला आपले आयुष्य नाही बनविले पाहिजे. म्हणून आपण सर्वांनी मोबाईल फोनचा वापर योग्य प्रमाणात केला पाहिजे.

– वैचारिक लेख –

कोरोना : भारतातील सामाजिक आर्थिक परिस्थिती

कु. पूजा मुनीपल्ली
बी. कॉम. भाग-३

सध्या जगभरात कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. या साथीत जगभरात आतापर्यंत ब–याच लोकांचे मृत्यू झाले आहेत. या साथीपुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या दिसत आहेत. अगदी सुक्ष्म स्वरुपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समूहाला जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. या विषाणूचा प्रादुर्भाव जगभरातील अनेक श्रीमंतापासून ते गरीबापर्यंत होतोय. जोपर्यंत या विषाणूचे स्वरुप त्याचा प्रसार आणि व्याप्ती याचा ताळेबंद घालायच्या आताच या विषाणूने व्यस्त प्रमाणात पसरायला सुरुवात केलेली आहे. ८ च्या सुमारास देशाला संबोधित करताना २१ दिवसाच्या (१४ एप्रिल पर्यंतची) संचारबंदीची घोषणा पंतप्रधानांनी केली. ज्या आधी त्यांनी २२ मार्च रोजी एक दिवसाचा 'जनता कर्फ्यू' पाळण्याचे आवाहन नागरिकांना केले होते. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बरेच लोक अहोरात्र आपल्या जीवाची परवा न करता सेवा देत आहेत. या लोकाप्रती सामाजिक कृतज्ञता म्हणून टाळ्या–थाळ्या इत्यादी आपल्या गॅलरीमधून किंवा घरातून वाजवून या सर्व लोकांचे पंतप्रधानांनी आभार प्रदर्शन करायला सांगितले होते.

देशातील काही भागातील लोकांनी कर्फ्यूचे गांभीर्याने पालन केले नाही. उलट कर्फ्यूचे थोडं कंटाळतच पालन केले. यामध्ये काही जण ढोल–ताशा, फटाके घेऊन रस्त्यावर – चौकात पोहोचले. या सर्व गोष्टींचा अनुक्रम आपल्या सर्वांना माहित आहे. या अशा अवघड परिस्थितीमध्ये सर्वांना एकत्र येऊन कोरोनाच्या विरुध्द लढायला पाहिजे. ही वेळ लिखणातून चुका दाखविण्याची नाही. या लॉकडाऊनच्या काळात प्रत्येकाने घरी बसून आपले सहकार्य शासकीय यंत्रणांना दिले पाहिजे.

नरेंद्र मोदी यांच्या भाषणात २१ दिवसांची बंदी झाल्यानंतर बऱ्याच ठिकाणी किराणा माल – दैनंदिन गोष्टीसाठी गर्दी झाल्याची पाहायला मिळाली. पुढचे किमान २१ दिवस घरातून बाहेर जाता येणार नसल्यामुळे बऱ्याच लोकांनी सामाजिक अंतराचे भान न ठेवता कोरोना संसर्गाचा धोका पत्करुन खरेदीला बाहेर पडण्याचे ठरवले. जवळच्या किराना दुकान आणि मॉलमध्ये गर्दी केली. दुसरीकडे समाजमाध्यमांवर कर्फ्यूचे उल्लंघन केल्यानंतर पोलीसांची लाठी खाल्लेल्या लोकांचे व्हिडीओ देशभरातून फिरत आहेत. नरेंद्र मोदी यांनी भाषणात सांगितले की २१ दिवसांचा लॉकडाऊन पूर्ण देशात लागू करण्यात येत आहे. याचा अर्थ संपूर्ण देश बंद कोरोना व्हायरसचा प्रसार थांबवण्यासाठी लॉकडाऊन हा चांगला निर्णय आहे. या लॉकडाऊनमुळे विशिष्ट सामाजिक अंतर राखलं जाईल आणि या आजाराचा जास्त प्रसार होणार नाही. त्याला या मार्गाने लवकर थांबता येईल असे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात सांगितले.

सध्या काही ठिकाणी हा आजार पसरत आहे. देशातील बऱ्याच भागांसोबत आदिवासी भागात देखील शहरातून येणाऱ्या लोकांना गावात प्रवेश दिला जात नाहीये. प्रवेश रोखण्यासाठी गावाच्या वेशीवर झाडे–काटे – दगड टाकण्यात आलेले आहेत. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेची असणारी स्थिती आणि कोरोनाचे संकट अत्यंत बिकट परिस्थितीला जन्म घालेल. लोकांना काही दिवसानंतर जर रोजगार भेटला नाही. तर कोरोनापेक्षा उपासमारीने जीव गेल्याच्या घटना समोर येतील. आपल्याला कुठल्याही नेत्यासाठी केलेल्या इव्हेंटपेक्षा हॉस्पिटल सर्वांना घर, शिक्षण, अन्न अशा प्राथमिक गरजेच्या गोष्टींकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सध्या भारतीय अर्थव्यवस्था दृष्ट चक्रामध्ये सापडली आहे. ज्यामुळे लोकांच्या हातात कामधंदा नाही. पैसे नाहीत बँक बचत/ठेवी नाहीत. नेमक्या या परिस्थितीत कोरोनाच्या प्रादुर्भावंमुळे हतबलता वाढत चालली आहे. या सगळ्याचा सारासार विचार केंद्र शासनाने करणे गरजेचे होते. मला असे वाटते की कोरोनाच्या काळात आपण सगळे न घाबरता कोरोनाशी लढले पाहिजे. सर्दी, खोकला आणि ताप याकडे आपण दुर्लक्ष करु नये आपल्याला परदेशवारी आणि गर्दीचे ठिकाण टाळायचे आहेत. आणि शिंकताना खोकताना चेहरा झाकून ठेवायचे आहेत. आणि स्वच्छतेची कास धरायची आहे. रोज स्वच्छ हात धुणे आणि तोंडाला मास्क लावणे असा रोज केल्याने आपण कोरोनाच्या फैलावला टाळू शकतो. अशा प्रकारे आपल्याला कोरोनाला हरवायचे आहे.

– आत्मकथनात्मक लेख–

कुटुंब आणि पोलीस

कु. वैशाली कोले
बी. ए. भाग-३

पोलिस म्हटले की लोकांना आठवते ते शिव्या, रागवणे, लाच खाणारे पण त्याच पोलिसांनी चांगले काम केलेले कधीच दिसत नाही. काही लोक पोलिसांना घाबरणारे पण असतात. पण तोच पोलीस वरून कठोर पण आतून मऊ, मृदू मनाचा असतो. त्यालाही मन असतं हे कोणाला दिसत नाही. पोलिसांचे ब्रीद वाक्य 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' याचा अर्थ तो सतत रक्षण करत असतो. लोकांच्या मदतीला धावून जात असतो. वेळी–अवेळी फोन आला की आपल्या कुटुंबाना सोडून जातो. पोलिसांचे आयुष्य वाटत तेवढे सोपे कधीच नसते शिक्षकांच्या ड्युटीची वेळ ठरलेली असते. डॉक्टरांची ही तसेच प्रत्येक क्षेत्रात काम करणार्यांचे वेळ ठरलेली असते पण पोलिसांना वेळो वेळी–अवेळी रात्री–अपरात्री बाहेर पडावा लागतं.

कोणताच सण ते आपल्या कुटुंबाबरोबरी साजरा करू शकत नाही. होळी, रमजान ईद, गणेशोत्सव, दसरा असे प्रत्येक सण सगळेजण आपण आपल्या बायका मुलांबरोबर साजरे करतात. पण तो पोलीस त्यावेळी भर उन्हात बंदोबस्त करत असतो. सगळ्यांना वाटतं तो फक्त उभा आहे अरे पण तो उन्हात उभा आहे. आपण साधं एक तास फक्त एक तास बँकेच्या लाईन मध्ये किंवा महाविद्यालयात फॉर्म भरण्यासाठी सावलीत उभे राहू शकत नाही मग विचार करा तो उन्हात उभा असतो.

पोलिसांच्या मुलांनाही वाटतं ना त्यांचे बाबा त्यांच्यासोबत प्रत्येक सणाला असायला हवेत पण तसं होत नाही. त्याच वेळी पोलिसांचं एक तत्व असते. ते म्हणजे आधी खाकी मग बाकी त्यांना अगोदर ड्युटी त्यांचे कर्तव्य महत्त्वाचे असतात मग कुटुंब महत्त्वाचे असते.

आपण २०२० मध्ये कोरोना या महामारीला सगळेच सामोरे गेलोत. त्यावेळी सरकारकडून लॉकडाऊन करण्यात आले. त्या लॉकडाऊनमध्येही तो पोलीस उन्हात ड्युटी करत होता. त्यांची फक्त छोटीशी अपेक्षा होती. लोकांनी त्यांना सहकार्य केले पाहिजे. घराबाहेर पडू नये. त्या सहकार्यामुळे त्यांची ड्युटीही कमी होईल. आणि हा आजारही कमी होईल.

पोलिसांची ड्युटी वाटते तेवढी कधी साधी सोपी नसते. अवेळी जेवण, अवेळी झोपणे इ. अशाप्रकारच्या सगळ्या गोष्टींना सामोरे जावे लागते. आपण घरात निवांत झोपत असतो पण तोच पोलीस नाईट ड्युटीला जाऊन झोपतो. त्या जागेवर आपण एक ताही उभे राहू शकणार नाही. अशी या जागेवर तो रात्र काढतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा प्रत्येक ऋतूमध्ये त्याचे कर्तव्य पार पाडत असतो.

आपण लॉकडाऊनमध्ये सोशल मीडियावर व्हिडिओ पाहिलेत. पोलिसांबद्दल त्यांच्या कुटुंबाबद्दल पाहिल्यावर आपल्याला एवढे दुःख होत असतं मग त्यांच्या कुटुंबाचं काय होतं असेल. आपला माणूस जेवायला ही वेळेवर येत नाही. कारण त्याला वेळच मिळत नाही मुलाच्या शाळेत महाविद्यालयात शिक्षक –पालक सभेला ते कधीच हजर राहू शकत नाही. त्याची ड्युटी असते. सगळ्यांचे पालक येतात. पण त्याचेच नाही. याचं दुःख फक्त त्याच्या मुला मुलींनाच कळू शकते.

सगळेच पोलीस लाच खाणारे नसतात त्यात काही प्रामाणिकपणे काम करणारे पण पोलिस असतात हे कोणालाच समजत नाही. डोळ्यात न दाखवताही तो मनात कुटुंबाबद्दलची ओढ लपवतो ना, तो राजा माणूस पोलीस असतो. तुम्ही फक्त एकदा त्याच्या जागेवर येऊन विचार करा मग कळेल तो आपल्या समाजासाठी त्याचे रक्षण करण्यासाठी किती तरी आनंदाचे क्षण गमावत असतो. पोलीस रात्रभर नाईट ड्युटी करतात. सगळीकडे गस्त घालतात. म्हणून आपण घरी सुखाची झोप घेऊ शकतो. लोकांनी समाजांनी यांना सहकार्य करावे. ती वेळ कोणतीही असो सणाचा बंदोबस्त असो किंवा कोरोना सारखे आजार आल्यावर लॉकडाऊन असो.

मला गर्व आहे महाराष्ट्र पोलिसांचा आणि मी एका पोलीसाच्या घरात जन्माला आले याचा "सर्व माझ्या पोलीस बांधवांना त्यांच्या कामगिरीबद्दल मानाचा मुजरा..."

– सामाजिक लेख –

बापलेकीच मायेच नातं

कु. मयुरी कामुर्ती
बी. सी. ए. भाग-१

मुलगी वडिलांची खूप लाडकी असते. परीच असते ती वडीलांसाठी. मला कळत नाही, काही बाप लेक जन्मल्यावर नाखूश होतात? गर्भातली कळी खुडणाऱ्यांना ती लेकीची माया कधीच कळत नाही. स्त्रीभ्रूण हत्या ही अत्यंत चिंतेची बाब आहे. वंशाचा दिवा, घराचं नाव पुढे नेणारा मुलगा असं म्हणत मुलींना आज कमी लेखणाऱ्यांना सर्व क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मुली दिसत नाहीत का?

आज मुली आत्मनिर्भर आहेत. मोठमोठ्या कंपनीच्या प्रमुखपदी आहेत, कर्तबगार आहेत. गृहिणी म्हणून सुद्धा त्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आपल्या मुलांच पालनपोषण करत त्या सारं घर तोलून धरत आहेत.

मुलगा उतारवयाची काठी हे जुनं झालं. मुलगीही उतारवयात आपल्या आई–वडिलांना सांभाळू शकते आणि सांभाळतेसुद्धा. म्हणूनच खरं तर आपल्या घरी जन्माला येणाऱ्या मुलीचे स्वागत झाले पाहिजे. तिचा जन्म हा महाउत्सव असला पाहिजे खरं सांगते, घरात मुलगी नसेल तर तिची प्रत्येक क्षणी उणीव जाणवेल.

लेक काय असते हे आपण कधीच अनुभवू शकणार नाही. तिची माया तीचं घरभर हसू सांडणं आनंद वाटणं फार मोलाचं आहे म्हणून खरं तर पुरुषांनी पुढाकार घेऊन आता आपल्या लेकीच्या जन्माचा उत्सव करावा. लेकीला आपलं सर्वस्व मानून तिला मनमोकळेपणाने जगण्याची संधी द्यावी.

''ज्या घरात मुलगी असते ना,
त्या घरातला पिता हा राजा असतो.
कारण राजकुमारी ही प्रत्येकाच्या
नशिबात नसते.''

– कथा – लघुकथा –

हारून तो जिंकला

कु. स्मिता त्रिमल
बी. कॉम. भाग-१

रापूर गावातील अभिनव विद्यालयामध्ये शिकणारा अथर्व नावाचा एक विद्यार्थ्यी अभ्यासाबरोबर खेळातही उत्तम होता. उत्कृष्ट धावपटू म्हणून त्याची ख्याती होती. शिवाय तो स्वभावाने देखील एक गुणी, सुसंस्कारी मुलगा म्हणून सर्वपरिचित होता.

त्याच्या शाळेला त्याच्याबद्दल विशेष अभिमान होता. धावण्याच्या शर्यतीत शालेय व आंतर शालेयस्तरावर अनेक वेळा त्याने शाळेला पारितोषिके मिळवून दिली. त्याचे प्रशिक्षक त्याच्याकडून नेहमी धावण्याचा सराव करुन घेत असत.

एकदा अशीच एक आंतरशालेय स्पर्धा आयोजित केली होती. शाळेने भाग घेतला होता. अथर्वाचा प्रतिस्पर्धी म्हणून दुसऱ्या शाळेतील खेळाडू त्यांच्याबरोबर धावण्याच्या शर्यतीत उतरला होता. दोघेही चांगल्या पध्दतीने शाळेत सराव करत होते.

अखेर स्पर्धेचा दिवस उजाडला. दोघेही एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून पळण्यास सज्ज झाले. स्पर्धा सुरु झाली. दोन्ही शाळेतील विध्यार्थी आणि शिक्षक, अथर्व व तनयला टाळ्या वाजवून प्रोत्साहित करीत होते. दोघांमध्ये चांगलीच चुरस लागली होती. आणि धावता धावता अचानक तनयचा पाय मुरगळला तो तेथेच पटकन खाली बसला. बघणाऱ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि भीती अशा संमिश्र भावना दिसू लागल्या. आता काय होणार असे प्रश्न चिन्ह सर्वांच्या चेहऱ्यावर होते. काय झाले आहे हे कळेनाच. धावताना तनयमागे राहिल्याचे आणि तो पडल्याचे कळताच अथर्वने स्पर्धा सोडून धावतच तो तनयकडे गेला. त्याने तनयला आपल्या खाद्यांचा आधार देत उठवले आणि हळूहळू धावपट्टीच्या बाहेर आणले तितक्यात तनयचे प्रशिक्षक प्रथमोपचार पेटी घेऊन आले. आणि त्याच्यावर प्राथमिक उपचार करुन झाले.

पुढे अथर्वच्या बाबतीत मात्र वेगळेच घडले होते. स्पर्धा जिंकल्यापेक्षा तो अडचणीत सापडणाऱ्याला मदत करुन माणुसकीचे नाते तो जपत होता. त्यामुळे धावण्याची स्पर्धा हारुन जगण्याच्या स्पर्धेत मात्र तो जिंकला होता.

दोन्ही गावांतील शिक्षक, विद्यार्थी मान्यवरांकडून अथर्वचे तोंडभरून कौतुक झाले. उत्तम मुल्यांची रुजवण विद्यार्थ्यींदशेत खऱ्या अर्थाने रुजवली जात होती. त्याची प्रचिती सर्वांना ' याचि देही याचि डोळा' येत होती.

– सामाजिक लेख –

विज्ञानयुगातील माणूस

कु. स्मिता त्रिमल
बी. कॉम. भाग-१

विज्ञानयुगातील माणूस हा त्यांच्या पूर्वजापेक्षा फार वेगळा आहे. आपली आजी जात्यावर दळण दळत असे आणि मग चुल पेटवून गरम गरम भाकरी करत असे. आज मात्र अगदी खेडोपाडीही विजेवर चालणाऱ्या पिठाच्या गिरण्या व गॅसच्या शेगड्या आल्या आहेत.

पूर्वी एका गावाहून दुसऱ्या गावाला निरोप पाठवायचा म्हणजे माणूस पाठवावा लागे. श्रीमंताच्या बाबतीत निरोप पोहोचवण्याचे काम घोडेस्वार करत असे. विज्ञानयुगात तार – पत्र किंवा शक्य असल्यास दूरध्वनीवरुन महत्त्वाची बातमी त्वरीत कळवली जाते. थोडक्यात वेळेतच टेलिफोनवरुन बोलणारी माणसे एकमेकांना बोलू शकतील.

विज्ञानयुगातील माणूस चंद्रावर पोहचला आहे. वेगवेगळ्या देशांत होणारे सामने तो आपल्या घरी बसून दूरदर्शनवर पाहू शकतो. विज्ञानामुळे माणसाच्या जीवनाला विलक्षण गती लाभली आहे. संगणकांमुळे गतीचा वेग प्रचंड प्रमाणात वाढला. अशक्य वाटणाऱ्या असाध्य आजारांवर माणसाने विज्ञानामुळे मात केली आहे. कृषिक्षेत्रातही विज्ञानाने विलक्षण समृध्दी आली आहे.

विज्ञानयुगातील माणसाने अक्षरशः आकाशाला गवसणी घातली आहे. अथांग आकाशातून तो पक्ष्यांच्याप्रमाणे मुक्तपणे संचार करु शकतो. खोल सागरातून पाणबुडीच्या मदतीने जलप्रवास करु शकतो. ..... शक्य नसले तरी हृद्याचे आरोपण यशस्वीपणे करु शकतो. चित्रपटाद्वारा तसेच ध्वनिफितीमार्फत असंख्य कलावंताच्या कलाकृतींना चिरंजीवित्व देऊ शकतो.

असा या विज्ञानयुगातील प्रगत व्यक्ती सुखी आहे का ? याबद्दल मात्र नाही असेच उत्तर द्यावे लागेल. विज्ञानाच्या वरदानामुळे मात्र माणूस अधिक स्वार्थी व अधिक संहारक बनला आहे.

विज्ञानाच्या साहय्याने माणसाने विध्वंसक शास्त्रोक्त पध्दतीने शस्त्रास्त्रे बनवली आहेत. विज्ञानाने जग जवळ आले. पण एक माणूस शेजारच्या माणसापासून कित्येक योजने दूर गेला आहे. हीच तर या प्रगत मानवाच्या जीवनाची शोकांतिका आहे.

कु. सुनैना यलदंडी
बी. कॉम. भाग-१

– माहितीपर लेख –

सर्वसमावेशक शहर
सोलापूर

कु. उमा हेगडे
बी. कॉम. भाग-३

सोलापूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख शहर असून ते प्राचीन काळात सोन्नलगी किंवा सोन्नलापूर म्हणून ओळखले जात असे. स्वातंत्र्यप्राप्तीपुर्वीच्या सोलापूर शहराने ९ ते ११ मे १९३० या काळात तीन दिवसाचे स्वातंत्र्य उपभोगले. या घटनेमुळे स्वातंत्र्य संग्रामादरम्यान मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व किसन सारडा यांना १२ जानेवारी १९३१ रोजी ब्रिटीशांनी फाशी दिली. तेव्हांपासून सोलापूर हुतात्म्यांचे शहर म्हणून ओळखले जाते.

श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर मंदिरामुळे या जिल्ह्याला एक आगळे – वेगळे वलय प्राप्त झाले असून अनेक भाविक येथे दर्शनासाठी येतात. येथे सिध्दरामेश्वरांची यात्रा फार प्रसिध्द आहे. या व्यतिरिक्त सोलापूरात अशी बरीच ठिकाणी आहेत. जसे दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल या ठिकाणी भीमा आणि सीना नदीचा संगम, महात्मा गांधी प्राणी संग्रालय, भुईकोट किल्ला, हुतात्मा स्मृती मंदिर, महाराष्ट्राची कुलदैवत आई तुळजाभवानी उस्मानाबाद जिल्ह्यात आहे.

"सिध्दरामेश्वर आमचे आराध्य दैवत,
चार हुतात्मे आमचे प्रेरणास्थान,
मनात बाळगुनी गर्व आम्हा वाटतो त्याचा अभिमान
किल्ला बाग आहे प्रेक्षणीय, सात रस्ता आहे आमुची शान,
कॉर्नर क्रंचचा वडापाव खाऊन कोणाला राहत नाही भान..."

औद्योगिक केंद्र म्हणून ओळख मिळवलेल्या या जिल्ह्यातील सुती वस्त्र, सोलापूर चादरी प्रसिध्द असून या शहराला कापड गिरण्यांचे शहर देखील म्हटले जाते. सोलापूर शहरात हातमागावरील नऊवारी साडीला खूप मोठ्या प्रमाणत मागणी असते. तसेच या जिल्ह्याला ज्वारीचे कोठार म्हणून ओळखले जाते.

सोलापूर हा महाराष्ट्रातील ४८ लोकसभा संसद मतदारसंघापैकी एक आहे. या जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदार संघ समाविष्ट केले आहेत. सोलापूर हे भारतामधील १०० सर्वात वर्दळीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक आहे. सोलापूर शहर हे कर्नाटक व आताचे तेलंगणा व पूर्वीचे संयुक्त आंध्र प्रदेश यांच्या सीमेलगत असल्याने येथे विविध धर्मांचे व भाषा बोलणारे लोक राहतात. सोलापूरच्या मातीत पिकलेल्या डाळिंबाना एक वेगळी प्रतिष्ठा आहे व ही डाळिंबे आंतरराष्ट्रीय बाजारात प्रसिध्द आहेत.

नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक पक्षी हा भारतात आणि पाकिस्तानमधील कोरड्या प्रांतामध्ये आढळणारा अत्यंत दुर्मिळ पक्षी आहे. या पक्ष्याला 'हुम' म्हणतात. या पक्ष्यांच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने १९७९ मध्ये माळढोक अभयारण्याची घोषणा केली. या अभयारण्याचे मुख्यालय सोलापूर जिल्ह्यात नान्नज येथे आहे.

सोलापूरात डॉ. द्वारकानाथ शांताराम कोटणीस यांच्या जन्म १० ऑक्टोबर १९१० रोजी झाला. चीन–जपान दुसऱ्या महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर भारताने चीनमध्ये पाठवलेल्या पाच वैद्यकीय तज्ञांपैकी ते एक होते. भारत–चीन या दोन देशातील मैत्रीचे ऋणानुंबध निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

"सैन्यांना एक चांगला सहकारी
देशाने एक चांगला मित्र गमावला आहे.
त्यांची आठवण सदैव आपल्या मनात तेवत ठेवू या..."

सोलापूर हे हातमाग व यंत्रमाग, विणकाम उद्योगाचे माहेरघर आहे. विडी उद्योग हे चादर उद्योगानंतर २ मोठे उद्योग आहे. सोलापूर चादरीने सातासमुद्रपार नावलौकिक मिळविला व तसेचकडक भाकरी हे सोलापूरचे ब्रँडिंग झाले आहे. तसेच शेंगा चटणी व लोणचे हे प्रसिध्द आहे.

सोलापूर शहर शैक्षणिकदृष्ट्या एक उत्तम केंद्र आहे. या जिल्ह्यात एकूण ६१ प्रकारची महाविद्यालये आहेत व २००४ ऑगस्ट रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची स्थापना करण्यात आली व तसेच शहराच्या विकासासाठी सोलापूर महानगरपालिकेची स्थापना झाली व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, जिजामाता प्रसुतीगृह असे विविध हॉस्पिटल नागरिकांना वैद्यकिय सुविधा देतात.

इतका प्रसिध्द असलेला सोलापूर जिल्हा आज जगाबरोबरच कोरोनाच्या महाभयंकर रोगाला सामोरे जात आहे. आज दिवसेंदिवस या रोगाला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. अशा महाभयंकर रोगापासून वाचवण्यासाठी प्रत्येक सोलापूरकरांने स्वत:ची काळजी घेतली पाहिजे. सरकारी नियमांचे काटेकोर पालन करुन प्रशासनास व रात्रंदिवस झुंजणारे डॉक्टर व पोलीस बांधव यांना सहकार्य करावे.

"माझे आरोग्य, माझी जबाबदारी, जीवनावश्यक वस्तु नसतात,
तर जीवन हेच आवश्यक असते. मी सुरक्षित तर देश सुरक्षित"

– माहितीपर लेख –

कोरोना योध्दा

कु. संध्या सरवदे
बी. ए. भाग-२

कोरोना काळात आपल्या जावीची पर्वा न करता आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणारे योध्दा म्हणजेच कोरोना योध्दा, कोरोना व्हायरस ने धावत्या भारत देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला जरी थांबविले तरी कोरोना योध्दा त्या संकटाशी संघर्ष करत होते. आणि आजही ते या संकटाचा सामना करत आहेत. कोरोना व्हायरस हा इतका सुक्ष्म व्हायरस आहे. की जो आपल्या डोळ्यांना ही न दिसणारा असा व्हायरस आहे. हा विषाणू सुक्ष्म असला तरी इतका घातक आहे की या विषाणुमुळे लोकांचा मृत्यू ही झाला आहे. अशा कठीण परिस्थितीत स्वत:च्या जीवाची पर्वा न करता कोरोना बाधीत रुग्णांची सेवा करणारे ते खरे योध्दा आहेत. आपल्या देशाचे डॉक्टर, नर्सेस, आरोग्य कर्मचारी, पोलीस व सफाई कर्मचारी हे सर्व कोरोना काळातील योध्दा आहेत.

कोरोना हा साथीच्या रोगाच्या विषाणु आहे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात आल्यामुळे या विषाणूचा फैलाव वेगाने होतो. या साथीच्या रोगाचा विषाणू असल्यामुळे हा विषाणूचा फैलाव वेगाने होतो. हा साथीच्या रोगाचा विषाणू असल्यामुळे हा विषाणू कमी कालावधीत अत्यंत वेगाने संपूर्ण देशभर पसरला. त्यामुळे सुरुवातीच्या काळात भारत सरकारने संपूर्ण लॉकडाऊन जाहीर केला होता. सर्वजण आपापल्या घरामध्ये सुरक्षित राहावेत हाच त्यामागचा उद्देश होता. अशाकाळात कोरोना योध्दांनी त्याचे काम जबाबदारीने निभावले सर्व डॉक्टर, नर्सेस हॉस्पिटलमध्ये दिवस रात्र कोरोना रुग्णांची सेवा करत होते. आरोग्य कर्मचारी सर्व कोरोना बाधीत रुग्णांना योग्य औषधोपचार, सुविधा उपलब्ध करुन देत होते. सर्व पोलीस कर्मचारी लोकांना घरी सुरक्षित राहण्यासाठी वेळोवेळी सुचना करत होते. दिवस रात्र सर्वत्र बंदोबस्त ठेवून पोलीसांनी आपले काम अगदी व्यवस्थित आणि प्रामाणिकपणे निभावले. आपल्याला वेळोवेळी भाजीपाला, दूध पुरविणाऱ्या लोकांनानाही आपण विसरता कामा नये.

सुरुवातीच्या काळातच नव्हे तर आजही प्रत्येक योध्दा आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहे.

कु. वृषाली परचंडे
बी. सी.ए.भाग-१

– पर्यावरणपर लेख –

वसुंधरा बोलू लागली तर...

कु. पूजा बदलापूरे
बी. कॉम. भाग-१

" कधी संपायची वाट ? कधी मिळेल विसावा ?
तुला एकट्याला ठावे, आकाशातल्या रे देवा । "

रंच, आपण राहतो ती पृथ्वी म्हणजे वसुधंराच हो ना । तिचे स्वरुपही अफाट व मनोवेधक, उंच उंच पर्वत शिखरांनी नटलेलं । इवल्या इवल्या गवताच्या पाल्यापासून ताडामाडाच्या वृक्षराजांनी बहरलेलं । घनदाट जंगल, प्रचंड जलाशय, दऱ्या खोऱ्यांनी व्यापलेलं अगदी असचं आहे तिच रुप. वसुंधरा म्हणजे विश्वाच्या विशाल साम्राज्यात सजीव सृष्टी धारण करणारा एकमेव घटक म्हणूनच आपल्या पूर्वजानी तिला देवता रुप मानले. वसुंधरा ही महान उदार, जीवसृष्टीच्या भरपोषणासाठी ती अनंत हस्ते भरभरुन देते पण अशा या उदार अंत:करणाच्या मातेची आपण काय कदर करतो ? आपण तिचे वातावरण दूषित करतो. तिच्या पर्यावरणाला बाधा आणतो. तिचे नैसर्गिक स्वरुप आपल्या दुष्कृत्यांनी अगदी कुरुप करतो. परंतु याचा परिणाम आपल्या भावी पिढ्यांना भोगावा लागणार आहे, याचाही विचार आपण कधी करत नाहीत.

अखिल जीवसृष्टीच्या कल्याणासाठी भावी जीवनाचा गतिमान विकास व पर्यावरणाचे योग्य संवर्धन याची आज नितांत गरज आहे. उन्हाने तप्त झालेल्या वसुंधरेला भिजताना काय सुख वाटत असेल., पहिला थेंब चोचीत पकडताना सागराच्या शिंपल्यांना किती आनंद वाटतो... हे सारं अनुभवलं असेल. वसुंधरेने पहिला पाऊस अंगावर घेताना कालांतराने बाहेरचा थांबला तरी वसुंधरेच्या मनातंल्या पावसाचे काय ? तो तर सतत कोसळतोच आहे. हो हो प्रदुषणाचा किती वेळ कोण जाणे ? म्हणून म्हणावसं वाटतं.

" अशी वसुंधरा भिजली, ओलीचिंब झाली,
पावसाच्या एकेका सरीला, चातकावाणी आसुसली "

वसुंधरेवरील निसर्गाची मी फार चाहती आहे. मला तर वाटते फुरसतीच्यावेळी निसर्गाच्या सान्निध्यात जावं, पद्याचं गाणं मनापासून ऐकावं, ओढ्याचं ते खेळ खेळणार संगीत ऐकून तृप्त व्हावं आणि मजेत एकादं आवडतं गाणं गुणगुणत घरी जाव, पण आज मी, तुम्ही आपण सारे पारखं झालो आहोत. ५०-६० वर्षाचा इतिहास जर पाहिला तर या महाराष्ट्रात काटेरी बोरी बाभळीची बने होती. या ' माळरानांनं ' जणू हिरवी शालच पांघरली आहे, असे वाटत होतं. पाऊस अगदी नको नको करुन सोडायचा. गणपतीच्या सोंडेतून निघाला तर घटमाळेन गुंतायचा. आता मात्र परिस्थिती बदलत आहे. अनेक समस्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुढे येत आहेत. झाडे कमी पाऊस कमी याचा परिणाम दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्यात झाला.

वसुंधरेवरील एक अजान उजाड वृक्ष माझ्याशी बोलला– कुणीच कसं लक्ष देत नाही ? विसरलात की काय ? मीही मानसपुत्र आहे या वसुंधरेचा. मला पुत्रसमान मानता आणि घाव घालता... मीच तर भागवल्या तुमच्या अन्न, वस्त्र, निवाराच्या गरजा, मीच दिली तुम्हाला शुध्द हवा. मीच करतो मृदा आणि जलसंधरण, मीच ठेवतो पर्यावरण संतुलन कल्पवृक्ष म्हणता आणि घाव घालता... ? माझ्याचं सानिध्यात तुम्हाला मिळाली आहे. शांती आणि चिरंतन सुख, समाधान माझ्याच छायेत झाला आहे. महापुरुषांना साक्षात्कार. बोधीवृक्ष म्हणता आणि घाव घालता ? तुम्ही म्हणाला होतात. "देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे. घेता घेता एक दिवस देण्याऱ्याचे हात घ्यावे" मी दिले कितीतरी...शतकानुशतके तुम्हीही घेतले भरभरून " लावा वृक्ष– मिळवा मोक्ष " म्हणता आणि घाव घालता ? कसा मिळेल तुम्हाला मोक्ष? नका घालू असा मुळावर घाव... नाहीतर... माझ्यासारख्या तुम्हालाही करावा लागेल आक्रोश ... एक दिवस...

त्या वृक्षाचे स्वागत ऐकून मी तर थक्कच झाले. वाटलं, आभाळाएवढं दु:ख झाड किती सोशिकतेने झेलतं. हे वृक्ष म्हणजे मौन सेवेचे मूर्तिमंत प्रतिकच, त्याच अस्तित्वच जणू जगाच्या कल्याणासाठी आहे. संपत्तीत तसेच विपत्तीतही साथ न सोडणारे मग, यांना संत नाही म्हणायचं तर कोणाला म्हणायचं ? पण आज मात्र वसुंधरेतील वृक्ष तोडले जात आहेत. वृक्षाच्या बेछूट तोडीमुळे वसंदुरेच्या असंतुलनातून मानवाचे अस्तित्व धोक्याच्या कक्षेत पोहोचले आहे. एका कवितेतील या संदर्भातील मर्म आपणास सांगताना एक कवि म्हणतो.

" झोपले अजून माळ तापवीत काया । असंख्य नद्या अजून वाहतात वाया । अजून हे अपार दु:ख वाट पाहता हे । अजून हा प्रचंड देश भीक मागत आहे ।।

हे सावरण्यासाठी दुसऱ्या देशातून कुणी येणार आहे काय ? नाही ना. मग उठा सज्ज व्हा... वसुंधरेचे लेणे जोपासण्यासाठी क्रियाशील होणं ही काळाची गरज आहे. वसंधुरा सगळ्यांनाच वेड लावते. तिच्या सौंदर्याने प्रत्येक जण मोहन जातो. अगदी कुणीही यावं आणि तिच्या प्रेमात पडावं. असचं आहे. या वसुधरेचं सौंदर्य फरक फक्त एवढाच की तिला आपली रसिकता प्रकट करता येत नाही. " हिरवे हिरवे गार गालिचे... " ही कल्पना भूतकाळातच जमा झाल्यासारखी वाटते. कोणालाही हेवा वाटावा असे सौंदर्य होते तिचे पण हे सारे त्याचे पावले आहे. " वसुंधरा माझी सख्या सोबती, अनंत उपकार तिचे आमच्यावरती " ' वसुंधरा हा शब्द किती व्यापक आहे. वसुंधरा म्हटली म्हणजे तिच्यामध्ये गगनाला भिडणारे वृक्ष हिरव्यागार लता, पशुपक्षी, नद्या या सर्वाचा समावेश होतो. संत तुकाराम महाराजांनी म्हटलेच आहे.

" वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती ।।

मग सांगा, आपणही याच दृष्टीकोनातून पहायला नको का ?

सकारात्मक विचार : जगण्याचा मंत्र

कु. वैष्णवी मादगुंडी
बी. कॉम. भाग-१

''पॉझिटिव्ह'' हा २०२० मध्ये सर्वात 'निगेटिव्ह' शब्द होता. बहुधा पहिल्यादांच लोक 'पॉझिटिव्ह' शब्दाला इतके घाबरलेले होते. तरीही ते घरात राहूनही सकारात्मक राहिले. परंतु या परिस्थितीने त्यांना नवे काही करण्यापासून रोखले नाही. त्यांनी अजब नावांचे पदार्थ बनवले.

काही लोकांनी पाककलेत एवढी सर्जनशीलता दाखवली की लोक त्याच्या चवीवर शंका घेऊ लागले. रसगुल्ला, बिर्याणी पाहून बिर्याणीचे चाहतेही लाजले. फ्रेशर, रोशर (एक चॉकलेट) मंचुरियनने चकित केले आणि लोक त्यांच्या मोबाईलवर मॅगी, पाणीपुरीकडे डोळेझाक करु शकले नाहीत. ओरिओ, पकोडे, च्यवनप्राश स्मुदी व नटीला बिर्याणीही असेच पदार्थ आहेत. मी विचित्र का म्हटले हे आता तुम्हाला समजले असेलच. स्वाभाविकच हे सर्व व्हायरल झाले आणि त्यावर खवय्यांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया आल्या.

परंतु या महामारी काळात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्याने स्वत:चा ज्या प्रकारे शोध घेतला ते आपल्या तरुण भारताने 'महामारी' शब्द किती सकारात्माकतेने स्वीकारला आहे हे दर्शवते गोरखपूरच्या (उत्तर प्रदेश) १४ वर्षीय अमर प्रज्ञाप्रतीने इलेक्ट्रॉनिक उपकरणांची स्वत:ची उत्पादन कंपनी उघडली आहे. त्याचे उद्दिष्ट चिनी उत्पादनांची जागा भारतीय उत्पादनानी घ्यावी हे आहे. हे छोटे आव्हान नाही. त्यांनी प्रथम एलईडी दिवे तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. स्वत:ची कंपनी उघडली आणि काही महिन्यातच पाच कर्मचाऱ्यांना कामावर घेतले आता त्याला इलेक्ट्रॉनिक उपकरणांची एक संपूर्ण श्रेणी लाँच करायची आहे.

लॉकडाऊननंतर अनेक लोक बेरोजगार झाले आणि निराश होऊन आपल्या राज्यात परत जात होते. म्हणून त्यांना पाहून अमर दु:खी झाला. एकेदिवशी त्यांने एलईडी लाईट मेकिंगच्या प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल वृत्तपत्रात वाचले त्यांने आपल्या वडिलांकडे हे शिकण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यांनी ते मान्य केले. प्रक्रिया शिकल्यानंतर अमरने घरी दिवे बनवायला सुरुवात केली. आणि काही लोकांना कामावर घेतले. तथापि घरात जागा नसल्यामुळे काम करणे कठीण झाले. वडिलांच्या मदतीने त्यांने सुमारे दोन लाख रुपयांची गुंतवणूक केली आणि एक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी स्थापन केली. त्यात त्याची आई प्रजापर्ती डायरेक्टर आहे. अलिकडेच या सुमन छोट्या उद्योजकाने एक चार्जेबल विद्युत दिवा बनवला. तो विजेशिवाय १२ तास चालतो. वीज गेल्यावर ३ तीस चालणारा एक बल्बही तयार केला.

कोलकत्याच्या आयुष शारदाने ॲम्फन वादळपिडीतांच्या मदतीसाठी '' स्वीटनेस ऑफ इथिक्स'' हा सामाजिक उपक्रम सुरु केला. त्यात मद्य संकलन, पॅकिंग व विक्री करुन ह्यातून उदरनिर्वाहासाठी मदत केली जाते. बेटावरील सुमारे १५००० लोक बाधित झाले. गावकरी परतले तेव्हा त्यांची घरे पडली आणि शेती पाण्यात बुडाली होती. परंतु सहा महिन्यांनी त्यांच्याकडे नवीन घरे, महिलांसाठी शिलाई केंद्र, शाळा आणि चांगले उत्पन्न आहे. २२ वर्षाच्या आयुषच्या प्रयत्नातून हा बदल झाला. तो मदतकार्यासाठी गावी गेला होता. मद्य विक्री १० कुटूंबापासून सुरु झाली व आता ५० वर पोहोचला आहे. शेतकऱ्याचे सरासरी उत्पन्न २५०० वरुन १० हजार रुपयांवर गेले.

तात्पर्य : २०२० मध्ये 'पॉझिटिव्ह' या शब्दाने आपल्या घाबरवले असेल तरी तो आपल्या जीवनाचा आधार आहे, म्हणूनच २०२१ मध्ये तो कायम ठेवा.

* BE POSITIVE *

पद्य विभाग

युवक असावा असा....

चेहऱ्यावर तेज आहे....
देहामध्ये शक्ती आहे....
मनामध्ये उत्साह आहे.....
बुद्धीमध्ये विवेक आहे ....
हृदयामध्ये करुणा आहे..
.मातृभूमीवर प्रेम आहे...
इंद्रियांवर संयम आहे....
मन ज्याचे स्थिर आहे...
आत्मविश्वास दृढ आहे....
इच्छाशक्ती प्रबळ आहे....
धाडसाचे बळ आहे....
सिंहासारखा निर्भय आहे...
ध्येय ज्याचे उच्च आहे...
सत्य ज्याचा ईश्वर आहे...
व्यसनांपासून मुक्त आहे....
जीवनामध्ये शिस्त आहे...
प्रेम ज्याचा सूर आहे...
मानवता हेच कुळ आहे...
दीनदुबळ्यांचा मित्र आहे...
सेवेसाठी तत्पर आहे...
देवावरती भक्ती आहे
जीवनामध्ये नीती आहे...
चरित्र ज्याचे शुद्ध आहे...
तोच आदर्श युवक आहे...

संकलक

कु. सुश्मिता कानकुर्ती
बी. कॉम. भाग–१

आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही....
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद...
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाकडे कळत नाही.....
इतकं जगून झालं पण,
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही.....
क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेलं
असेल जीवन प्रवास....
अजूनही वेळ आहे.
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या....

कु. नम्रता संभारम
बी. कॉम. भाग–१

लॉकडाऊनची शाळा

फळा आणि खडू
लागलेत रडू
विचारात आहेत प्रश्न
शाळा कधी सुरु... ?
छम छम छडीचा
नाही राहिला धाक...
ढिगभर सुट्टी आणि
परिक्षाही माफ...
डिजीटल फळ्यावर
ऑनलाईन शाळा...
गुगल वर हजेरी...
यु ट्युबचा लळा....
मोबाईलच्या स्क्रिन वर
मैदान गाजत आहेत...
पब–जीतल्या बंदुका
रातभर वाजत आहेत...
आता वाजेल का घंटा
शिजेल का सुकडी....
लक्षात तरी राहिली का
इयत्ता आणि तुकडी....

कु. सुलोचना डोंगरे
बी. ए. भाग – ३

छोट्या या आयुष्यात...

खूप काही हवं असतं..
पण पाहिजे तेच मिळत नसतं....
असंख्य चांदण्यानी भरुन सुध्दा
आपलं आभाळ मात्र रिकामं असतं...
हव्या असलेल्या सगळ्याच गोष्टी
माणसाला मिळत नसतात.
पण न मिळणाऱ्या गोष्टींचं
माणसाला का हव्या असतात....

कु. श्रृतिका गड्डम
बी. ए. भाग – २

तुझा भाऊ

ओवाळल्यानंतर आज विचारलं ...
बहिणीला "सांग ना तायडे... तुला भेट,
मी काय देऊ....? म्हणाली
"एकच मागते आयुष्यात भावड्या..."
आई–बाबांना वृद्धाश्रमात कधी नको ठेवू
आणि भावाने बहिणीला दिलेला सुंदर उत्तर...
पण ताई तुही लक्षात ठेव....
कोणत्याही मुलाला त्याच्या
आई वडिलांपासून वेगळे करू नकोस....

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग–३

कोण आहेत हे.....!

अवकाशातून भरारी घेऊन,
जमिनीपर्यंत आणणारे कोण आहेत हे....
देशाला पृथ्वी पल्लीकडे
पोहोचवणारे कोण आहेत हे....
ध्येय मोठे ठेवा, छोटी स्वप्ने पाहू
नका असे म्हणणारे कोण ? आहेत हे....
तरुणाशी सारखे संवादणारे
तरुणांना प्रोत्साहित करणारे
असे कोण आहेत हे....
हे आहेत सर्वांचे आवडणारे डॉक्टर
एपीजे अब्दुल कलाम.....

कु. अंजुम बाणेवाले
बी. ए. भाग –१

आई

जगण्याच्या धडपडीत,
घर सुटतं पण...
आठवणी कधी सुटत नाहीत...
आयुष्यातलं आई नावाचं पान...
काहीही झालं तरी मिटत नाही....
तळहाताचा पाळणा करून सांभाळत
ती आपल्याला...
आपल्या आयुष्यात आनंदाचा...
नेहमीच खुलवते मळा
आपण जरी विसरलो
तरी माया तिची कधी घटत नाही....
आयुष्यातलं आई नावाचं पान....
काहीही झालं तरी कधीच
मिटत नाही... तिच्या अखेरच्या
श्वासापर्यंत.... तिला आपलाच
लळा असतो... आपलं भलं व्हावं...
हाच तिच्या जगण्याचा
सोहळा असतो... तिच्या
पंखाखाली मन निवांत असते...
चिंता कधी वाटत नाही
आयुष्यातील आई नावाचं
पान काहीही झालं तरी कधीच
मिटत नाही, कधीच मिटत नाही....

कु. सुष्मिता कानकुर्ती
बी. कॉम. भाग – १

स्त्री जन्मा

आजी म्हणायची उपास-तापास कर,
पूजापाठ कर सासर चांगलं मिळेल.
आजोबा म्हणायचे शांत राहा
समजुतीने घे सासरी ऐकून घ्यावं लागेल...
आई म्हणायची घरची चार काम शिक
सासरी सोपे जाईल.....
काकू म्हणायची धडधड चालू नको
जोरात बोलू नको सासरी नाव ठेवतील...
काका म्हणायचे जीन्स नको टिकली लाव
बांगड्या घाल सासरी चालत नसतं....
आत्या म्हणायची नाच गाणी कशाला ?
शिवणकाम शिक सासरी उपयोग होईल....
मावशी म्हणायची सारखं पुस्तक अभ्यास
करू नकोस, चार माणसात उठ-बस
सासरी हेच करावं लागत....
पण, फक्त बाबा म्हणायचे
जग बाळा मनसोक्त तुला हवं तसं
भरभरून तुला हवं ते घाल हवं तेवढं शिक
ओरड, खेळ, नाच, फिर मोकळेपणाने.....
कारण तुला तुझ्या हक्काच्या
घरी आहेस, तू तुझ्या माहेरी आहेस

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग-३

कोरोना जा ना....

मोल मजुरीचे पोट घरी बसून
भरेना उभा ठाके हाच प्रश्न...
काळ बनला जगाचा जीवघेणा
हा पाहुणा स्वच्छ हात हाच मंत्र
लस यावर निघेना...
नका घाबरु कुणीही थोडं
पथ्यपाणी पाळू हिंमतीने
सर्वजण याच्या फैलावास टाळू....
सर्दी, खोकला नि ताप नका
करु हो दुर्लक्ष नाक, तोंड
आणि डोळे हेच कोरोनाचे लक्ष
नका जाऊ परदेश टाळा गर्दीच
ठिकाण शिंकताना, खोकताना
ठेवा चेहरा झाकून.... सर्व मिळून
आपण स्वच्छतेची कास धरु
कोरोनाला जगातून
चला हद्दपार करु....

कु. पूजा मुनीपल्ली
बी. कॉम. भाग – ३

नव्या या वर्षात

पुन्हा एक नवीन वर्ष
पुन्हा एक नवी आशा...
तुमच्या कर्तृत्वाला
पुन्हा एक नवी दिशा....
मागे वळुनी नको पाहणे
नको भाषा दु:खाची
सदैव वाहो तुमच्या दारी
सरिता ही आनंदाची
एक सुंदरता, एक ताजेपणा
एक स्वप्न, एक कल्पना
आणि एक विश्वास
हेच आहे एक नव्या वर्षाची
सुरुवात... तुमचे स्वप्न सगळे
या नव्या वर्षी पूर्ण होवो...
हीच देवाला प्रार्थना...
नवी स्वप्ने, नवी क्षितिजे
सोबत आपल्या नव्या या वर्षात...

कु. ऐश्वर्या आडम
बी.कॉम.भाग-३

जीवन

जीवन हे अनमोल आहे...
जीवन हे तिखट आहे.....
जीवन हे प्रवास आहे.....
मृत्यू हे स्टेशन आहे....
जन्म हे सुगंध आहे.....
जीवन हे सुवास आहे.....
जीवनातील ही छोटीआशा
कविता म्हणजेच
जीवनाचे रहस्य आहे....
जीवन हे माणसाचे मिलन आहे...
जीवन हे सर्वांना सुखकर,
ठेवण्याचे एक रहस्य आहे....
जीवन जगण्यासाठी पैशाची नसून,
माणुसकीची गरज असते...
जीवन हे अद्भुत नाते आहे....
ते कधीही तोडता येत नाही

कु. अंजुम बाणेवाले
बी. ए. भाग –१

आयुष्यात असे एक नातं असावं...

आयुष्यात असं एक नातं असावं...
दिसण्यावर नाही मनावर प्रेम करणारं...
जगाला दाखवण्यासाठी नाही,
आपल्या दोघांत जग निर्माण करणारं....
आयुष्यात असं एक नातं असावं...
कितीही भांडण झालं तरी साथ न सोडणारं....
आपली मनापासून विचारपूस करून,
आपली काळजी करणारं....
आयुष्यात असे एक नातं असावं....
एक उदास असताना दुसऱ्याला
न सांगताच ओळखणारं...
डोळ्यात न दिसणारे पाणी....
मनातल्या नजरेने अलगद टिपणारे....
आयुष्यात असे एक नातं असावं....

कु. सुश्मिता कानकुर्ती
बी. कॉम. भाग–१

आई आणि बाबा

आईने घडवलं बाबांनी बनवलं
आईने शब्दाची ओळख करुन दिली.
बाबांनी शब्दाचा अर्थ समजवला
आईने विचार दिले.
बाबांनी स्वांतत्र्य दिले.
आईने शक्ती शिकवली
बाबांनी वृत्ती शिकवली
आईने लढण्यासाठी शक्ती दिली.
बाबांनी जिंकण्यासाठी निती दिली.
त्यांच्या परिश्रमामुळे
यश माझ्या हाती आहे. म्हणून
तर माझी आज ओळख आहे....

कु. आरती देवकर
बी. ए. भाग –३

मृत्यू

सजवत होते मला
मी शांत निजले होते
बहुतेक असावाच्या धारेने
मी चिंब भिजले होते.....
शेवटी अंघोळ होती ती
गरम पाण्याची
ज्याला त्याला घाई होती
मला डोळे भरुन पाहण्याची.....
आयुष्याचे खेळ संपले होते.
पण मन माझं डौकत नव्हतं
का कुणास ठावूक ?
मला अजून जगायचं होतं.....
सारे होते जवळचे
होतं कोणीतरी परकं
नेऊ नका मोठ्याने
म्हणत होतं सारखं....
आज काहीतरी वेगळच
घडत होत वैऱ्याचे प्रेम
देखील माझ्यावर पडत होते का
कुणास ठावूक असं का घडत होतं.....
अजून चार लाकडं द्या
म्हणजे यात भागेल
माझ्याच माणसाने विचारलं
अजून किती वेळ लागेल....
एकमेकांपासून हात माझा सुटत होता....
रडून रडून सारे आसमान मला उठवत होते
आणि माझ्याचं माणसाने
आज मला जाळलं होतं.....
आतापर्यंत जगलेले प्रत्येक क्षण
आज संपले होते.
त्या सर्व आठवणी घेऊन मी
या जगातून जात होते.....

कु. वृषाली परचंडे
बी. सी. ए. – भाग १

जगताय का तुम्ही ?

हृदयाचे ठोके तालात वाजतात
आणि ब्लडचं प्रेशर पण नॉर्मल आहे.
म्हणून तुम्ही जगताय असं नाही.
दुसऱ्याच्या सुखासाठी स्वत:चा
त्याग करणं जर तुम्हाला जमत
असेल तर तुम्ही जगताय...
लोक काय बोलतील त्याचा
विचार न करता तुमचे छंद जोपासत
असाल तर जगताय तुम्ही..
आयुष्यातील सर्व गोष्टी सकारत्मक
फिरवण्याची जादू, तुम्ही शिकला
असाल तर जगताय तुम्ही...
लोकांच्या यशाच्या प्रगतीची
वार्ता ऐकून तुम्हाला जर खरचं
आनंद होत असेल तर तुम्ही जगताय....
एखाद्या सिनेमामधील इमोशनल
सीन बघून जर तुमच्या डोळ्यांत
पाणी येत असेल तर जगताय तुम्ही...
शेवटी काय कारण काहीही असो
मिळणार फक्त एकच आहे. आनंद....

कु. सुलोचना डोंगरे
बी. ए. भाग – ३

दुरावा म्हणजे प्रेम

अन् ओलावा म्हणजे देखील प्रेम...
दुराव्यात असते आठवण....
अन् ओलाव्यात असते ती साठवण....
दुराव्यात अनेक भास असतात...
अन् ओलाव्यात तेच भास खास असतात...
दुरावा असह्य असतो...
अन् ओलावा मात्र हवाहवासा असतो...
दुराव्यातही असावा ओलावा...
पण, ओलाव्यात असू नये कधीही दुरावा...
दुराव्यात प्रेमाचं घर असतं....
अन् ओलाव्यात त्याला सजवायचं असतं...
दुरावा कितीही असला तरी प्रेम
एकमेकांच्या विश्वासावर
टिकवायचं असतं...

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग – ३

आदर्श मित्र

संकटातही खरे बोलणे
शिकवणारा,
म्हणजे आदर्श मित्र.....
जन्मापासून ते मरेपर्यंत
साथ देणारा,
म्हणजे आदर्श मित्र.....
कसल्याही परिस्थितीत
मदत करणारा,
म्हणजे आदर्श मित्र....
आपल्यावरचे संकट
स्वत: वर ओढून घेणारा,
म्हणजे आदर्श मित्र....
स्वत:चे सुख सोडून
मित्राच्या दु:खात
सहभागी होणारा
म्हणजे आदर्श मित्र....
आपले प्राणही मित्रासाठी
अर्पण करणारा
म्हणजे आदर्श मित्र...

कु. अंजुम बाणेवाले
बी. ए. भाग–१

देव...

तुटलेल्या / खचलेल्या
मनाला उभारी देतानाचे बोल...
देवा तुटलेल्या गोष्टींचा किती छान
उपयोग करतो ना...
ढग तुटतात आणि पाऊस पडतो,
जमिनीला भेगा आल्या की
शेत बनते... वृक्ष तुटतो तेव्हा बीज
उमलतं आणि
बीज अंकुरलं की झाड होतं.
म्हणून माणूस जेव्हा तुटतो,
खचतो तेव्हा समजून
घ्यायचं की देव आपला उपयोग
चांगल्या गोष्टीसाठी करत आहे....

कु. पुजा गाडवे
बी.कॉम.भाग–२

मुलींनी वागावे तरी कसे ?

मनमोकळेपणाने समाजात वावरले तर,
म्हणतात मुलींना वळणच नाही...

धीर गंभीरपणाने समाजात वावरले तर,
म्हणतात फेस करण्याची हिंमत नाही...

लग्न लवकर केलं तर,
म्हणतात प्रकरण असेल....

लग्न उशीरा होत असेल तर ,
म्हणतात मुलीतच काही खोट असेल....

खूप मित्र मंडळी असतील तर,
म्हणतात टवाळखोर असेल....

आणि मित्र मंडळी नसतील तर,
म्हणतात एकलकोंडी असेल.....

खूप शिकलेली असेल तर,
म्हणतात डोक्यावर मिरे वाटेल....

आणि कमी शिकलेली असेल तर
म्हणतात अडाणी असेल....
अशा दुहेरी दुनियेत मुलींनी
जगावे तरी कसे ?
निरपराधी असताना बदनामीला
घाबरुन मरावे तरी कसे ?
मुलींनी वागावे तरी कसे ?
मुलींनी वागावे तरी कसे ?

कु. पुजा गाडवे
बी.कॉम.भाग–२

शिक्षक म्हणजे

आयुष्याला कलाटणी
देणारी प्रेरणा ध्येयपूर्तीसाठी
मार्ग दाखवणारी दिशा
कधी बिकट परिस्थितीत
साथ देणारे तर कधी पाठीवर
शाबासकी देणारेकधी कौतुकाचे
गोड शब्द बोलणारे....
शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांना चांगले
वाईट समजवणारे विद्यार्थ्यांना चांगले
संस्कार देणारे संकट काळात धैर्य देणारे
विद्यार्थ्यांना घडवणारे.... शिक्षक म्हणजे
सखोल मुलभूत ज्ञानाचे भांडार
दूर करी जीवनातील अज्ञानमय अंधार
अन्यायाविरुध्द आवाज उठवणारे
विद्यार्थ्यांना दिशा दाखविणारे
शिक्षक म्हणजे साक्षात दैवत.....

कु. स्नेहल पेरले
बी.कॉम.भाग–३

आयुष्य

खरचं आयुष्य किती छान आहे....
उसने थोडे जगलो थोडे गहाण आहे...
हृदयातील प्रेमास अश्रुंची तहान आहे.....
आंधळ्याच्या घोळक्यात डोळसांना अनुदान आहे.....
खरचं आयुष्य किती छान आहे...
अपुऱ्या पगारात महागाईचा ताण आहे....
कपाळावरील आठ्या चिंतेचा प्राण आहे...
थोड्या झिझल्या, थोडी घाण आहे....
कवटीतील मेंदुला स्मशानाचे भान आहे....
खरचं आयुष्य किती छान आहे....
सुकलेल्या तळ्याकाठी बगळ्यांची कमान आहे.
पर्यटकांच्या कॅमेऱ्याच्या कलेची शान आहे...
दोन थेंबाच्या शोधात मृगजळास अभिमान आहे.
बेडकाचे आयुष्य कोरड्या चिखलात महान आहे.
खरचं आयुष्य किती छान आहे...

कु. नम्रता सभारंभ
बी. ए. भाग – १

आयुष्य असचं जगायचं असतं....

जे घडेल ते सहन करायचं असतं....
बदलत्या जगाबरोबर आपणीही बदलायचं असतं...
आयुष्य असचं जगायचं असतं....

कुठुन सुरु झालं हे माहित नसलं तरी,
कुठतरी थांबायचं असतं...

कुणासाठी काहीतरी निस्वार्थपणे करायचे असतं....
स्वत:च्या सुखापेक्षा इतरांना सुखावायचे असतं....
आयुष्य असच जगायचं असतं....

दु:ख आणि अश्रुंना मनात कोंडून ठेवायचं असतं....
हसता नाही आलं तरी हसवायचं असतं...
आयुष्य असचं... जगायचं असतं....

पंखामध्ये बळ आल्यावर घरटं सोडायचं असतं...
आकाशात झेपावुनही धरतीला विसरायचं नसतं...
आयुष्य असंच जगायचं असतं....

मरणानं समोर येऊन जीव जरी मागितला तरी
मागुन मागुन काय मागितलसं असंच म्हणायचं असतं...
आयुष्य असचं जगायचं असतं....

इच्छा असो व नसो जन्मभर वाकायचं असतं....
पणं जग सोडताना मात्र समाधानानं जायचं असतं....
आयुष्य असंच जगायचं असतं....

देवा कसे धन्यवाद देऊ तुला...
खरचं आयुष्य असचं जगायचं असतं....

कु. लक्ष्मी राघर्ती
बी.कॉम.भाग–३

कोणी नसतं

चार दिवस घराबाहेर राहून बघा...
मग समजेल तुम्हाला की
रियालीटी काय..
जवळची माणसं, मित्र दोन दिवस
जेवण घालतील
नंतर मग घरी जा असं सांगितल
कोणी नसतं रे कोणाचं...
जे आहे त्यांची किंमत समजून घ्या...
हे नाही आहे ते आहे करत बसू नका
जे आहे त्यात समाधानी रहा...

आपण खूप सुखात आहोत
BVA लोकांपेक्षा हे लक्षात ठेवा
आपल्याकडे घर आहे राहण्यासाठी
दोन वेळचं जेवण मिळतं
अजून काय पाहिजे यार....

जे नाही आहे त्यासाठी मेहनत घ्या,
कष्ट करा आणि सगळ्यात महत्त्वाची
गोष्टी आयुष्य एंजाय करा यार...
कारण सगळे जगत आहेत पण काही
मन मोकळेपणाने जगा....

आणि घरच्यांना कधी बोलू नका की,
तुम्ही माझ्यासाठी काय केलंत ते
जेवढे ते करतात तेवढे कोणी नाही
करु शकत हे लक्षात ठेवा कायम....

आयुष्य एवढं सोप नाही आहे ते
सोप बनवतात तुमच्यासाठी...

कु. पुनम कोरे
बी. ए. भाग – ३

काय सांगू

काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते.
तुझ्या खोट्या प्रेमाच्या नादात
आयुष्य हरवून गेले ।
तू लांब असूनही जवळ असल्याचा
भास होतो,तुला काय सांगू मी तुझ्यावर
किती प्रेम करते,तुझ्या खोट्या प्रेमाच्या
नादात आयुष्य हरवून गेले.
माझं तुझ्यावर किती प्रेम आहे,
ते मी शब्दात व्यक्त करू शकतच नाही,
काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते.
तुझ्या खोट्या प्रेमाचा नादात आयुष्य हरवून गेले.
जेव्हा जेव्हा त्रास तुला झाला,
पापण्या माझा ओलावल्या
काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते.
तुझ्या खोट्या प्रेमाच्या नादात आयुष्य हरवून गेले.
तु ज्या क्षणी दिसला नाही,
तो क्षण उदास जायचा
काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते,
तुझ्या खोट्या प्रेमाचा नाद आयुष्य हरवून गेले.
लाखोंच्या गर्दीत असून सुद्धा
स्वत:ला एकटे भासतंय
काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते,
तुझ्या खोट्या प्रेमाच्या नादात आयुष्य हरवून गेले.
कळत नकळत माझं मन तुझं
केव्हा झालं याची जाणीवच झाली नाही
काय सांगू मी तुझ्यावर किती प्रेम करते,
तुझा खोट्या प्रेमाच्या नादात आयुष्य हरवून गेले.

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग–३

आयुष्याला द्यावे उत्तर....

असे जगावे दुनियेमध्ये
आव्हानाचे लावून अत्तर....
नजर रोखुनी नजरेमध्ये...
आयुष्याला द्यावे उत्तर....
नको गुलामी नक्षत्रांची,

भिती आंधळ्या ताऱ्यांची....
आयुष्याला भिडतानाही
चैन करावी स्वप्नांची....
असे दांडगी इच्छा ज्याची

मार्ग तयाला मिळती सत्तर....
नजर रोखुनी नजरेमध्ये
आयुष्याला द्यावे उत्तर....
पाय असावे जमिनीवरती
कवेत अंबर घेताना....
हसू असावे ओठांवरती
काळीज काढून देताना...

संकटातही डबाकावून
सांगावे, आता ये बेहतर...
नजर रोखुनी नजरेमध्ये
आयुष्याला द्यावे उत्तर...

करुन जावे असेही काही,
दुनियेतुनी या जाताना...
गहिवर यावा जगास साऱ्या
निरोप शेवटचा देताना....

स्वर कठोर त्या काळाचाही,
क्षणभर व्हावा कावरा-कावर....
नजर रोखुनी नजरेमध्ये.....
आयुष्याला द्यावे उत्तर...?

कु. स्वप्नाली गुजर
बी. ए. भाग–३

हिंदी विभाग

निर्धनता इस देश में, एक अजब है रोग....
खुद तो मिटती हैं नहीं, मिटते निर्धन लोग...
माया के ऊँचे शिखर, चढता गया अनेक...
पर आत्मा मरती गई, गिरता गया विवेक...

- डॉ. सत्यनारायण त्रिपाठी

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	लेखाचा प्रकार	विद्यार्थीनींचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग				
०१.	**मैं सावित्री बोल रही हूँ**	- एकांकिका	- कु. संध्या सरवदे	- बी. ए. भाग-२	५१
०२.	**शायरी**	- शायरी	- कु. रोहिणी गोन्याल	- बी. कॉम. भाग-३	५१
०३.	**बेटी बचाओ... बेटी पढाओ...**	- सामाजिक लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	५२
०४.	**कोव्हिड -१९**	- माहितीपर लेख	- कु. वर्षाराणी वसेकर	- बी. ए. भाग-१	५३
०५.	**भारतीय वैद्य आचार्य सुश्रुत**	- माहितीपर लेख	- कु. लक्ष्मी यन्नम	- बी. ए. भाग-१	५४
०६.	**महिला सुरक्षा और कानून**	- सामाजिक लेख	- कु. श्रृतिका कुसेकर	- बी. ए. भाग-१	५५
०७.	**सोशल मीडिया शाप या वरदान**	- माहितीपर लेख	- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	५६
०८.	**कब तक महिलाओं पर अत्याचार**	- सामाजिक लेख	- कु. श्रृतिका कुसेकर	- बी. ए. भाग-१	५८
	पद्य विभाग				
अ.क्र.	कवितेचे नाव		विद्यार्थीनींचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
०१.	**मैं राजभाषा हिंदी हूँ....**		- कु. मुबीना शेख	- बी. ए. भाग - ३	५९
०२.	**कोरोना को हराना हैं...**		- कु. ऐश्वर्या आडम	- बी. कॉम. भाग - ३	५९
०३.	**वीर जवान**		- कु. वनेला बुधाराम	- बी. कॉम. भाग-१	५९
०४.	**दोस्ती**		- कु. लक्ष्मी रापर्ती	- बी. कॉम. भाग-३	६०
०५.	**शिक्षक**		- कु. स्नेहल पेरले	- बी. कॉम. भाग -३	६०
०६.	**दोस्ती**		- कु. श्रृतिका पिट्ठा	- बी. कॉम.भाग-	६०
०७.	**साहब ये हकीकत**		- कु. मुबीना शेख	- बी. ए. भाग-३	६०

– एकांकिका –

मैं सावित्री बोल रही हूँ

कु. संध्या सरवदे
बी. ए. भाग-२

मैं सावित्रीबाई ज्योतिबा फुले हूँ। मैं आज कल आपसे बात करना चाहती हूँ। महिला जाती को समाज मे एक जगह रखने, शिक्षित हो ने और अपने पैरों पर खडे होने के लिए मैने उस समय के कठोर समाज के खिलाफ विद्रोह किया। मैंनें केवल महिला जाती के लिए पत्थरों की पिटाई को सहन किया। अगर एक महिला आगे बढना सिखती हैं। तो पुरा परिवार आगे बडेगा, मैंने महिलाओं की शिक्षा के बारे में ज्ञान का एक बलिदान स्थापित किया। ताकी उसे बोझिल विचारों से मुक्त किया जा सके और उस पर लगाए गये अवांछनीय मानदंड समाप्त हो जायेंगे। लेकिन आज मैंने जो काम किया है उससे मुझे वाकई शर्म आती है क्योंकि मैने जिस महिला को शिक्षा दिलाने मे प्रगती की है। आज हलांकी महिला खुद महिला की जड तक पहुँच गई है। क्योंकी उसके अस्तित्व को मिटाने के लिए एक अभियान चलाया जा रहा है। ताकि उसकी आवाज न सुनी जाए। आप महिलाएँ स्त्री पुरुष समानता के बारे मे बात कर रही है। गर्भ में कल की उबलती कली को कुचलने के लिए खुनी हाथों से हिंमत कर रही है। फिर मैं पुरी स्त्री जाति से सवाल पूछ रही हूँ। आपकी शिक्षा कहा गई है ? भले ही आज आप शिक्षित है, आप सडे हुए विचारों मे लिपटे हुए हैं। खुद एक महिला होने के नाते सास अपनी बहू को कन्याभ्रूणहत्या करने के लिये मजबूर करती है। फिर उस समाज को दोष क्या दे ? सावधान... रहो, मेरे बच्चो अपने आप उठो मत। अपने आस पास की महिलाओं पर हो रहे अत्याचारों बर्दाश्त न करें। आप में से प्रत्येक मे जीवित सावित्री को बाहर लाये और इन अवांछनीय रीतीरिवाजओ, प्रथाओ के खिलाफ लढ़ो उस महिला पर दया करो, जो अन्याय सेहन कर रही है। अपनी एकता दिखाये और समाज मे सम्मान के साथ जिए। अनगिनत महिलाएँ कन्याभ्रूण हत्या रोकने की कोशिश करती है। और नहीं की दुसरे मजे करे। यह एक ज्वलंत सामाजिक प्रश्न है। व्यक्ति के दिमाग मे कोई सुधार आना चाहिए। समाज की सोच बदलने के लिए सभी को आगे आना चाहिए। भविष्य के समाज के बारेमें सोचते हुए, किसी को कन्याभ्रूण हत्या के खिलाफ आवाज उठानी चाहिए। और सावित्री के जन्मदिन को एक लडकी के दिन के स्वरूप मे मनाना चाहिए। जिस दिन आप ऐसा करते है। तभी मै वास्तव मे संतुष्ट हो जाऊंगी कि बालिका दिवस सार्थक हो गया है। आपसे यही उचित उम्मीद हैं।

शायरी

सुरज कि किरण रोशनी लाती है।
सुबह उठते ही आपकी याद आती है।
आपको याद आती है। हम तो जाग गये
आप की यादों की दस्तक से। अब देखना है।
आपको हमारी याद कब आती है,
भूल जाओ बीते हुए कल को,
दिल मे बसलो आने वाले काल को,
मुस्कुराओ चाहे जो भी हो पल,
खुशिया लेकर आयेगा आनेवाला कल...
पढ़ने से ही इंसान बुद्धिवान होता है।
मेहनत से ही इंसान बडा होता है ।
इन्तजार करो आने वाले कल का,
क्योंकी सबर का फल मीठा होता है।

कु. रोहिणी गोन्याल
बी. कॉम. भाग-३

बेटी बचाओ... बेटी पढाओ...

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

मानवी संसाधन के रूप मे स्त्री और पुरुष दोनो एक समान रूप से महत्त्वपूर्ण होते है। जैसे कोई भी गाडी एक पहिये से नहीं चल सकती है । ऐसे ही जीवन रूपी गाडी केवल पुरुषों से नही चल सकती है । जीवन चक्र में स्त्री और पुरुष दोनों की समान सहभागिता है । बेटियों की घटती संख्या के लिये चिंता का विषय हैं।

हम सभी जानते है कि हमारा भारत देश एक कृषिप्रधान देश हैं । और पुरुष प्रधान देश है यहाँ सदियों से स्त्रियों के साथ जादतियाँ होते आई है । जब ईश्वर होकर माता सीता इस कुप्रथा से नहीं बच पाई फिर हम तो मामुली इन्सान है हमारी क्या औकात ।

ये पुरुष प्रधान समाज लडकियों को जीनें नहीं देना चाहता है। मुझे समझ नहीं आता मैंने इन मर्दों की सोच पर हंसू या क्रोधित हुए ये जानते हुए भी की उनका अस्तित्व भी एक महिला के कारण ही हैं। फिर भी पुरुष समाज केवल पुत्र की ही कामना करता है । और अपने इस पागलपन में न जाने कितनी लडकियों का जीवन नष्ट किया है । जरा सोचिये कैसा होगा, जहाँ महिला ये न हो केवल कल्पना करने की जरूरत है । तस्वीर खुद– ब– खुद साफ हो जाएगी । ऐसा कोई काम नहीं जो लडकियाँ नहीं कर सकती। वो भी देश की प्रगती मे समान रूप से भागीदार हैं। इंदिरा गांधी से लेकर कल्पना चावला तक कैसे लाखों नाम हैं। जिन्होंने देश का नाम रोशन किया हैं। इन महिलाओं को मैं सलाम करती हुँ। क्योंकि इन महिलाओं ने देश का नाम रोशन किया हैं। इसलिये ये महिलाएँ इसकी हकदार हैं।

लडकियों के साथ शोषण होने के पीछे मुख्य कारण अशिक्षा हैं। अगर हम पढ़े –लिखे शिक्षित होते हैं। तो हमे सही गलत का ज्ञान होता है । जब बेटीयाँ अपने पैरोंपर खडी होंगी तो कोई भी उन्हें बोझ नही समझेगा । इसलिए बेटियाँ को अधिक से अधिक शिक्षित बनना होगा । शिक्षित लोगों के साथ कुछ भी गलत करना आसान नहीं होता । लडकी पढ़ी–लिखी होगी तो न अपने साथ कुछ गलत होने देगी और नही किसी और के साथ कुछ गलत होने देगी और इस लिए लडकी का शिक्षित होना बहुत जरुरी हैं।

मेरा मानना है कि जो लोग केवल पुत्र कि कामना करते है । हमे उन लोगों की सोच को बदलना हैं। ऐसे करने से लोगों की सोच बदल जायेगी और हमारे देश मे बेटीया सुरक्षित रह पाऐगी। बेटा हमेशा भाग्य से होते है । लेकिन बेटी हमेशा सौभाग्य से प्राप्त होती हैं। बेटी हैं तो अरमान हैं, बेटीयों से ही रोशन जहाँन हैं। बेटीयो से ही तो घर का आँगण महकता है। बेटीयाँ ही लक्ष्मी का रूप हैं ।यही परिवार का मान–सन्मान हैं । बेटियाँ सरस्वती का मान है और लक्ष्मी का वरदान हैं। इसलिए देश मे बेटिया नही तो देश अधूरा हैं।

इस पर कविता की चार पंक्तियाँ

देवी का रूप देवों का मान है बेटियाँ,
परिवार के कुल को,
जो रोशन करे,
वो चिराग हैं बेटीयाँ.....!

कोव्हिड -१९

कु. वर्षाराणी वसेकर
बी. ए. भाग-१

कोरोना व्हायरस ने पुरे विश्व मे हाहाकार मचा दिया । कोरोना व्हायरस का जन्म वुहान शहर मे हुआ। २०१९ डिसेंबर के पहिले सप्ताह मे वुहान के सी–फुड मार्केट के इदगीत रहने वाले लोग अचानक बुखार से पिडीत होने लगे । इन के टेस्ट के लिए सॅम्पल लॅबमे भेजा गया। जिसके बाद ये सॅम्पल वुहान इन्स्टिट्यूट ऑफ वायरलॉजी नॅशनल बायो सेफ्टी लॅब मे भेजा गया । यहाँ वैज्ञानिक मायक्रोस्कोप से जो उन्हे दिखा रहे थे । वो आनेवाले जान लेवा ग्लोबल खतरे का संकेत था । मगर चिनी अधिकारीयों ने डॉक्टर और वैज्ञानिको बदनामी और अफरा–तफरी के माहौल से बचाने के लिए खामोश करा दिया गया ।

डिसेंबर २०१९ का आखिरी हप्ता डॉ. लिव्हर त्रियांक के अस्पताल में स्थानिक सी – फुड मार्केटसे करीब सात मरीज पहुँचे थे । वही डॉ. लीव्ह त्रियांक थे । जिन्होंने दुनिया को पहिली बार इस जानलेवा वायरस से आगाह करवाया था ।

बैरहाल इन मरीजों के लक्षन देखकर डॉ. लिव्ह को समज मे आ गया था की, के सभी के सभी किसी अंजान घातक वायरस के शिकार बने है। उन्होने फौरन इस बिमारी के बारे में दुसरी डॉक्टर को अलर्ट कर दिया और इसके बारे मे अपने रिपोर्ट दी । इतना ही नही इस बारे में उन्होंने रिचॅट अॅप पर अपने मेडिकल कॉलेज के अॅलिमोनी ग्रुप में अभी जानकारी दी और सबको अपने जानकारो, दोस्तो, रिश्तेदारों को इसके बारे मे आगाह करने को कहा। लेकिन कुछ घंटो में उनके मेसेज का स्क्रीन शॉट वायरल हो गया ।

नए साल के जश्न में दुनिया और चीन डुबे हुए थे । ठिक उनके नाक के नीचे ये वायरस तभी लगातार फैलता जा रहा था । ७ से १४, १४ से २१ और २१ से ४२ होते होते ये तादाद सेकडों में पहुंच गई । मगर चीन इस पर रोकथाम की बजाय इस जानलेवा बिमारी को दुनियासे छुपाने में लगा रहा । अंग्रेजी नए साल के बाद आया चिनी नया साल अफरा–तफरी से बचने के लिए चीन इस जानलेवा वायरस की खबर को सामने तो नहीं लाया । मगर अंदर ही अंदर वुहान इन्स्टिट्यूट ऑफ वायरोलॉजी नॅशनल बायोसेफ्टी में इनकी जाँच चलने लगी । जो की इस चमगादडो से फैलनेवाली बीमारियों का रिसर्च चल रहा था । ये रिसर्च इसलिए था जो की सिर्फ वुहान और आसपास के इलाकों में चमगादडों की तादाद ज्यादा है । बल्कि यहाँ चमगादडों और दुसरे तमाम जानवरों का मांस खाने और सुप पीने का चलन भी था । अब तक की जाँच में ये साफ हो रहा था की, हो न हो ये जानलेवा वायरस इन्हीं ही चमगादडों से ही फैला है। डॉ. लिव्ह लियांक इस बिच लगातार अपने डॉक्टर साथियों और लोगों को इस जानलेवा वायरस से न की, सिर्फ आगाह कर रहे थे । बल्की पिडीतों को आइंसुलेशन वॉर्ड में रखकर अपने तरीके से इलाज भी कर रहे थे । इस बीच खबरे चीन से निकल कर दुनिया तक पहुंचने शुरू हो गई । चीन ने भी आखिरकार मान लिया है । उसने मुल्क को कोरोना नाम के महामारी मे जखड लिया।

दुसरी तरफ चिनी सरकारने ३४ साल के डॉ. लिव की वायरल हो चुके कोरोना व्हायरस से आगाह करनेवाले मेसेज की जानकारी लेते हुए, नोटीस भेजकर उसके जवाब माँगा। मगर डॉ. लिव की परेशानीयाँ यही तक खत्म नही हुई इसके बाद उनपर अफवा फैलाने का आरोप भी लगाया गया । और उन्हें लिखितमें माफी माँगनी पडी। वुहान और आसपास के इलाकों के साथ –साथ पुरा चीन इस बिमारी के चपेट मे आ गया। इससे होनेवाली मौत का आकडा भी लगातार बढता चला गया । अचानक खबर सामने आई की कोरोना व्हायरस के बारे मे सबसे पहले जानकारी देने वाली डॉ. लिव्ह की मौत हो गई । डॉ. लिव १२ जनवरी से अस्पताल में भरती थे । और ३० जनवरी को पता चला की, वो कोरोना वायरस की चपेट में आ चुके । चीन ने कहा की उन्हें बचाने की काफी सारी कोशिशे की। मगर उन्हें बचाया नहीं जा सका । वुहान सेंट्रल हॉस्पिटल मे अपने रिपोर्ट में कहा की डॉ. लिव्ह की मौत ७ फरवरी २०२० की रात २ बचकर ५८ मिनिट पर हुई, बताया गया की उन्हें काफी बुखार था । सरकारी विरोधीयों का मानना था की। चीनने उन्हें इस महामारी का खुलासा करने की सजा दी ।

कोरोना नाम कि महामारी ने पुरे विश्व को हिलाकर रख दिया। WHO विश्व स्वास्थ्य संगटन मे भी इस बिमारी को महामारी बताकर घोषित किया । इस महामारी से बचने के लिए सरकार ने कुछ नियम बनाए । अगर हम सब भारतीय मिलकर इस नियमों का पालन करेंगे तो कोरोना वायरस नाम की बिमारी को पुरी तरह से नष्ट कर देंगें । चलो आज हम सभी मिलकर ये शपथ लेंगे सरकार के नियमों का पालन करेंके कोरोना व्हायरस को पुरी तरह से हटा देंगे और हमारा जीवन स्वस्थ और सुंदर बना देंगे ।

कोरोना व्हायरस को हटाव...
खुशहाल जिंदगी बचाओ...!

भारतीय वैदय
आचार्य सुश्रुत

कु. लक्ष्मी यन्नम
बी. ए. भाग-१

महर्षी चरक के जैसे ही इनके बारे में भी कुछ भी प्रमाणित जानकारी नहीं है । लेकिन इन के द्वारा लिखी पुस्तक 'सुश्रुत संहिता ' में कुछ प्रमाण मिलता है। इनका जन्म छठी शताब्दी ईसपूर्व काशी में विश्वमित्र के कुल में हुआ था। आचार्य सुश्रुत के द्वारा लिखी गई पुस्तक भारतीय चिकित्सा में एक नए स्थान पर है। इस पुस्तक को आयुर्वेद की नीव भी कहा जाता है । इन्होंने इस पुस्तक मे आठ प्रकार के शल्य क्रिया के बारेमें वर्णन किया है।

१) छंद्य२) भेद्य३) लेख्य ४) वेध्य ५) ऐष्य ६) अहार्य ७) विश्रव्य ८) सीव्य इनके समय में न ही कुछ खास उपकरण के जैसे प्रयोगशाला थी और नही कुछ खास उपकरण लेखन अपने ज्ञान से इन्होंने कही औजारों का भी खोज किया। जिसे ऑपरेशन करने में आसानी हो । इन्होंने धन्वंतरी से अपनी शिक्षा ली । उन्होंने शल्यचिकित्सा का ज्ञान किस प्रकार प्राप्त किया था । इसक बारेमें सिर्फ अनुमान ही लगाया जा सकता है । इन के द्वारा रचित पुस्तक 'सुश्रुत संहिता' को भारतीय चिकित्सा मे एक विशेष स्थान प्रदान है ।

आचार्य सुश्रुत ने अपनी लंबी साधना और अपनी मेहनत से शल्य चिकित्सा को निपुणता हासिल की । इन्होंने शल्यचिकित्सा के लिए अनेक यंत्र एवं उपकरणोंको विकसित किया । आचार्य सुश्रुतजीने परिष्कृत एवं नव विकसित मुल्यचिकित्सा ज्ञान को अपनी १२० अध्यायवाली पुस्तक मे कलमबद्ध भी किया । उन्होंने चीरफाड के नये तरिके विकसित किए और अपने शिष्य को लौकी, तरबूज, कद्दू और अन्या फलोंकों काटकर उन विधियोंको समझाया शरीर छेदन के लिए उन्होने मोम के पुतले एवं मरे हुए जानवरोंको काटकर अभ्यास करवाया । सुश्रुत जिने मानव के शरीर के अध्ययन के लिए अच्छे शरीर वाले शव घास, फूरनसे ढककर नदी के पानी मे डाल देते थे । जिस से शरीर त्वचा छोड देती थी । इन्होंने शरीर के विभिन्न अंगो को सुरक्षित व सावधीपूर्वक चीर फाड के लिये १०१ यंत्र व उपकरणे का अभी विकास किया था। जिन मे से आज भी बहुत से उपकरणोंके प्रयोग होते है । इन्होंने शल्यचिकित्सा के बाद शरीर को वापस सीने की तकनीक भी विकसित की थी । शल्य चिकित्सा अर्थ होता है । पिडा इराणी चिकित्सा शास्त्री 'राजी'ने आचार्य सुश्रुत के ज्ञान पर आधारित पुस्तक लिखी जिसमें हलदी एवं लहसुन आदी के गुणोंका वर्णन किया गया । धीरे धीरे उनका ज्ञान रुप पहुचा और अंग्रेज मात्र २०० वर्ष पूर्व अनेक प्लास्टिक सर्जरी को अपने यहाँ ले गए और आगे विकसित किया था। आचार्य द्वारा विकसित शल्य चिकित्सा विधी, पट्टी बांधने सिलने आदी को विधिया आज भी उपयोग में आती है। सुश्रुत जी टुटी हड्डियों को जोडने और मोतियांबिंद की शल्य चिकित्सा मे दक्ष थे । सुश्रुत एक अच्छे अध्यापक भी थे, उन्होने अपने शिष्यों से कहा था । ''अच्छा वैद्य वही है जो सिध्दांत और अभ्यास दोनों मे पारंगत हो '' जख्मो की सिलाई हेतू २८ प्रकार की सलाईयाँ होती थी।

प्राचीन भारत के ऊन वैज्ञानिको, ऋषी एवं महान पुरुषों की जीवन उनके अविष्कार और महान कार्य किया है । जिने इतिहास में या तो भुला दिया गया है । यहा सही पहचान नही दी गई है । अपने और में भी यही पढा या सुना होगा,
की शल्य चिकित्सा या सर्जरी की खोज युरोप में हुई थी और उसके बारे में स्कूल और कॉलेज में नही पढाया जाता था । सुश्रुत को भारतीय चिकित्सा विज्ञान का पितामह भी कहा जाता है।

– सामाजिक लेख –

महिला सुरक्षा और कानून

कु. श्रृतिका कुसेकर
बी. ए. भाग-१

पिछले कुछ वर्ष तो महिला सुरक्षा का स्तर लगातार गिरता जा रहा है। इसके पीछे कारण है। लगातार होते अपराधों में तीव्रता । मध्यकालीन युग से लेकर २१ वी सदी तक महिलाओं की प्रतिष्ठामें लगातार गिरावट देखी गयी है । महिलाओं को भी पुरुषों के बराबर अधिकार है । वे देश की आधी जन संख्या का प्रतिनिधित्व करती है । तथा विकास मे भी आधी भागीदार है ।

आज के आधुनिक युग में महिला पुरुषोंके साथ ही नही बल्की उनसे दो कदम आगे निकल चुकी है । वे राष्ट्रपती के दप्तर से लेकर जिला स्तर की योजनाओं का आधार बन चुकी है। महिलाओं के बिना दिनचर्या को कल्पना मी नही किया जा सकती । भारतीय संविधान के अनुसार महिलाओं को भी पुरुषों के समान स्वातंत्र्य, गौरवमयी जीवन जीने का हक है । महिलाओं की लगातार मौन, हिंसा, दहेज हत्या और मारपीट का शिकार होना पडता है । तेजाब फेंकना, जबरदस्ती करना आम बात हो गई है । ये सब एक सभ्य समाज के लिये बेहद शर्मनाक है ।

शिक्षा और आर्थिक विकास :– ग्रामीण क्षेत्र के महिलाएँ एवं पुरुषो में जमीन आसमान का फर्क है । जब की शहरी क्षेत्र मे ऐसा नही है । इसका कारण है । गांव में महिलाओं की कम साक्षरता अगर हम केरल और मिजोरम का उदाहरण ले तो ये आपकी श्रेणी में आती है । इन दोनों राज्यांमें महिला हा दूसरा सबसे जरुरी सवाल यह है कि कानून से नहीं तो फिर कैसे रुकेंगे बलात्कार? कैसे बनेगा । समाज जहाँ लडकियाँ बेफिक्र होकर घूम सके, इस सवाल का जवाब कानून की किताब और सिन्सिअर बिके आंकडोमें नही है । इसका जवाब है हमारे समाज और परिवार के पितृसत्तात्मक ढाँचे में, जिसने मर्दों के लिए सारे विशेष अधिकार सुरक्षित कर रखी है । औरतोंके लिए सौ नियम – कानून बनाएँ है ।

जो बलात्कार होने पर लडकी के कपडो के इंक्वायरी करने लगता है । जो अपनी लडकियों को बलात्कार से बचने के सौ सबक सिखाता है । लेकिन अपने बेटों को कभी नहीं सिखाता कि किसी लडकी के साथ ऐसा नहीं करना चाहिएँ, जो छेडखानी के डर मे लडकियों को घर में कैद कर देता है । और लडकोंको छेडने के लिए सडकों पर आजाद घुमने देते है ।

जिस समाज ने अपनी इज्जत का सारा ठेका औरतों के सिर डाल दिया हो और जिसे समाज में इज्जत बलात्कारी की नही, बलात्कार का शिकार होनेवाली लडकीयाँ की जा रही है । उस समाज में औरतों के लिए गरिमापूर्ण जगह मुमकिन नहीं । यही है वे सबसे जरुरी सबसे बुनियाद सवाल, जिसे पुछे बिना और जिसका ईमानदारी से जवाब दिए बिना औरतों के लिए एक बेहतर और सुरक्षित समाज बनाने का सपना पूरा हो ही नहीं सकता ।

महिला संरक्षण विधेयक बहुत से कायदे अस्तित्व में है । स्त्री के जन्म को प्राधान्य देने के लिए ' मेरी कन्या भाग्यश्री', सुकन्या योजना, बेटी बचाव ,बेटी बढ़ाव ऐसे विविध योजना सरकार चला रहे है। महिला जैसे घर चलाती है। वैसे देशही चला सकती है । संपूर्ण विमान उड्डाण महिला संभाल सकती है । एक बैंक, एक स्कूल का प्रबंधन कर सकती है। विभिन्न उद्योग को सफलतपूर्वक चला सकते है। २१ वी सदी का आधुनिक भारत देश को आधुनिक स्त्री ज्ञान और विज्ञान के पंखोंके साथ प्रगती के शिखर पर ले जाएगी इस में कोई संदेह नही । तो केवल अनुरोध यह है कि हम सभी यह सुनिश्चित करने का प्रयास करते है। कि किसी भी परिस्थिती में महिलाओंके मानवधिकारों का उल्लंघन न हो।

सोशल मीडिया शाप या वरदान

कु. लक्ष्मी रापर्ती
बी. कॉम. भाग-३

भूगोल विभागाकडून दिनांक १९ ऑक्टोबर २०२० रोजी ' महाराष्ट्रातील पाणी प्रश्न आणि वस्तुस्थिती' या विषयावर राज्यस्तरीय वेबीनार आयोजित केला होता. या वेबीनारमध्ये श्री. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. या वेबीनारमध्ये १५५ प्राध्यापक व विद्यार्थीनी सहभागी झाले होते. डॉ. तुकाराम शिंदे भुगोल विभागाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

प्रमुख : डॉ. तुकाराम शिंदे

प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती विभाग

प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती या विभागाकडून दिनांक ३ ऑक्टोंबर २०२० रोजी ' पुरातत्वशास्त्र आणि पर्यटन-व्यापती व आव्हाने' या विषयावर राष्ट्रीय वेबीनार आयोजन केले होते. या वेबीनारमध्ये डॉ. रविकिरण जाधव यांनी मार्गदर्शन केले. या राष्ट्रीय वेबीनारमध्ये २५६ प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. सुरेखा बत्तुल ए.आय.एच.सी. विभागाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

प्रमुख : प्रा. सुरेखा बत्तुल

पद्मशाली शिक्षण संस्था विविध शाखांची यादी

महाविद्यालय विभाग

१. अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय
२. कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय
३. कुचन कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय विभाग
४. सौ. भुदेवीबाई मल्लय्या पुल्ली प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय
५. रामकृष्णपंत बेत रात्र कनिष्ठ महाविद्यालय
६. देविदास न. बत्तीन तांत्रिक प्रशिक्षण विभाग

माध्यमिक विभाग

१. कुचन प्रशाला
२. कुचन प्रशाला – तेलुगू विभाग
३. सौ. भुदेवीबाई मल्लय्या पुल्ली कन्या प्रशाला
४. जनाबाई जनार्दन बिटला माध्यमिक प्रशाला (विडी घरकुल)
५. रामकृष्णपंत बेत रात्र प्रशाला
६. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम स्कूल

प्राथमिक विभाग

१. नारायणराव कुचन प्राथमिक शाळा
२. राजमल ना. बोमड्याल प्राथमिक शाळा
३. रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळा
४. रामव्वाबाई रा. बुर्ला प्राथमिकशाळा
५. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल

बालक मंदिर विभाग

१. भूदेवीबाई कटकम बालक मंदिर
२. भारतीबाई रा. बोमड्याल बालक मंदिर
३. भुदेवीबाई रामदास इप्पाकायल बालक मंदिर
४. रामव्वाबाई रा. बुर्ला बालक मंदिर
५. डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम स्कूल

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

नॅक मूल्यांकित दर्जा 2017 - 'B++' (CGPA-2.76)



पद्मशाली शिक्षण संस्था

◆ पदाधिकारी व विश्वस्त मंडळ ◆

श्री. काशिनाथ परशुराम गड्डम
अध्यक्ष

प्रा. श्री. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी
उपाध्यक्ष

श्री. दशरथ नारायण गोप
सचिव

सौ. संगीता यशवंत इंदापुरे
सहसचिवा

श्री. नागनाथ ईरय्या गंजी
खजिनदार

◆ विश्वस्त मंडळ ◆

श्री. अशोक अंबाजी चिलका
श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी
श्री. दिनेश भुमय्या यन्नम
श्री. श्रीधर बुचय्या चिटचाल
श्री. मधुकर लिंगराज कट्टा
श्री. व्यंकटेश लक्ष्मीनारायण आकेन
श्री. मल्लिकार्जून मल्लेशम सरगम
श्री. रमेश नागनाथ केदारी
श्री. रमेश श्रीहरी विडप
श्री. विजयकुमार अंबाजी गुल्लापल्ली
ॲड. श्री. श्रीनिवास शिवानंद कटकूर
कै. लक्ष्मीकांत अंबादास गड्डम
श्री. श्रीनिवास यल्लप्पा पोशम
श्री. हरिष अविनाश कोंडा
श्री. गणेश नारायण गुज्जा
श्री. प्रभाकर रामकृष्ण आरकाल
श्री. नागनाथ हणमंतु श्रीरामदास
श्री. श्रीनिवास अंबाजी जोग
श्री. रमेश दशरथ बोध्दूल
श्री. प्रसाद अनिल पल्ली
श्री. अरविंद गंगाधरपंत कुचन
श्री. अमित किसन श्रीराम
श्री. नरसय्या रामदास इप्पाकायल
श्री. अरविंद राजमल बोमड्याल
श्री. गणेश नारायण बत्तीन
श्री. श्रीनिवास नरसय्या आकेन
श्री. सुरेश जनार्दन बिटला

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

नॅक मूल्यांकित दर्जा 2017 –'B++' (CGPA-2.76)

पद्मप्रतिमा

२०२१-२२

संपादक

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

कार्यकारी संपादक

प्रा. डॉ. तुकाराम नारायण शिंदे

विभागीय संपादिका

मराठी विभाग : प्रा. डॉ. कविता मुरुमकर

हिंदी विभाग : प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी

इंग्रजी विभाग : प्रा. डॉ. ॲनी जॉन

कार्यालयीन व्यवहार

श्री. व्यंकटेश गाजूल

• **ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय**

सिटी सर्व्हे क्र. ९७०५/९/अ,/२अ, रविवार पेठ,
राजेंद्र चौक, सोलापूर.
दूरध्वनी : ०२१७ - २७४३९०८
website :www.arburla.org
email : arburla@gmail.com

• **मुखपृष्ठ**

- कु. लक्ष्मी रापर्ती

• **ग्राफिक्स डिझाईन व मुद्रक**

श्रीकांत ग्राफीक्स्
(रामगोपाल म्याकल)

• **मांडणी व सजावट**

डॉ. टी. एन. शिंदे

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,
ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
यांनी हे पत्र खाजगी वितरणासाठी प्रकाशित केले आहे.

या अंकातील मजकुराशी संपादक मंडळ
सहमत असेलच असे नाही.

कुलगुरु

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

डॉ. मृणालिनी फडणवीस

महाविद्यालयात भाषा संकाडिनी मंडळाचे उद्घाटन करताना स्वाक्षिप्तिक डी. डीकांत मोरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे, डॉ.ॲनी जॉन, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. कविता मुरुमकर व डॉ. आर. के. बडाजे व आदि मान्यवर

महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन करताना डॉ. एम. जे. मुद्दा, प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले व प्रा. रंजना घनमुंदे आदि मान्यवर...

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला पुरस्कृतिचे प्रसंगी प्रतिमापूजन करताना संस्थेचे उपाध्यक्ष- प्रा.डी.डीनिवास कोंडी, विश्वस्त- डी. डीनिवास आकेन, सहसचिका-सौ.संगीता इंदापुरे, विश्वस्त - डी. हर्ष कोंडा प्राचार्य डॉ.राजेंद्र रोंडगे, प्रा. डॉ. शिरीष भोसले

महाविद्यालयास ISO दर्जा प्राप्त प्रमाणपत्र स्वीकारताना प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे व उपस्थित प्राध्यापक वर्ग.....

महाविद्यालयात सामुहिक सेवा दीजलेकडून आयोजित स्वच्छता शिबीराचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे व उपस्थित विद्यार्थीनी, मान्यवर...

महाविद्यालयात सामुहिक सेवा योजना विभाग व इतर्या न. बोहो स्वयंसेवी संस्था संयुक्त विद्यमाने आयोजित स्वच्छता शिबीर प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे व कार्यक्रम अधिकारी डॉ. आर.के.बडाजे, डॉ. ॲनी जॉन तसेच डॉ. तुकाराम रिठे व उपस्थित स्वयंसेविका...

महाविद्यालयात आरोग्य केंद्राकडून जोडमाळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने आयोजित 'कोव्हीड-१९ लसीकरण' शिबीरप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे, डॉ. आर.के.बडाजे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शंकर शेजे व लस घेतना महाविद्यालयातील विद्यार्थीनी....

महाविद्यालयातील आय.क्यु.ए.सी. व हिंदी विभाग यांच्याकडून आयोजित साहित्य चर्चासत्राचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष डी. कोसिनाथ गड्डम, व उपस्थित मीत मालक डॉ. अर्जुन चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रोंडगे, संस्थेचे उपाध्यक्ष-प्रा. डी. डीनिवास कोंडी, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. आर.के.बडाजे, डॉ. ॲनी जॉन

प्राचार्यांचे मनोगत...

एका मोठ्या जीवघेण्या संकटातून जग सावरत असताना महाविद्यालयीन वर्ग सुरु झाले. कोव्हिड-१९ महामारीतून बाहेर पडत असताना माणसात आलेले मेंदरलेपण अजून पूर्ण संपले नव्हते. कोव्हिड-१९ सारख्या संकटाला, निर्माण झालेल्या परिस्थितीला पायाखाली घेऊन विद्यार्थीनी मोठ्या उत्साहाने महाविद्यालयात येऊ लागल्या. तेव्हा सर्वांमध्येच उत्साह पुन्हा संचारला आणि पुन्हा पूर्वीच्याच उत्साहाने महाविद्यालयातील वर्ग, विविध उपक्रम सुरु झाले. तरी कोव्हिड-१९ काळातील टाळेबंदी, विद्यार्थीनींची झालेली शैक्षणिक हानी आणि ऑनलाईन शिक्षण व परीक्षा पध्दतीमुळे विद्यार्थीनींमध्ये शिक्षणापासून आलेले तुटलेपण यामुळे मनाला एकप्रकारची टोचणी लागून राहिली होती. या स्थितीतून विद्यार्थीनींना कसे बाहेर काढता येईल याबाबत मन चिंतनशील होत होतं. पण आम्हा सर्वांचे प्रयत्न आणि विद्यार्थीनींचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे विद्यार्थीनींचा वर्ग पूर्वपदावर येत गेला. नियमित तास होऊ लागले. विविध उपक्रमात विद्यार्थीनी मोठ्या उत्साहाने सहभागी होऊ लागल्या. यासर्वांचे प्रतिबिंब यंदाच्या 'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकातील विद्यार्थीनींचे विविध विषयावरील लेखन आणि विविध उपक्रमांमधून दिसून येते.

संस्थेचे अध्यक्ष श्री.कार्शीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा.श्री. श्रीनिवास कोंडी, सचिव श्री. दशरथ गोप, सहसचिवा सौ. संगीता इंदापुरे, खजिनदार श्री.नागनाथ गंजी आणि सर्व विश्वस्त यांचे उत्तम सहकार्य लाभले. यंदाचा वार्षिक अंक सुबक व आकर्षक व्हावा यासाठी कार्यकारी संपादक डॉ. टी.एन. शिंदे यांनी परिश्रम घेतले. विभागीय संपादिका डॉ. कविता मुरुमकर, डॉ. प्राजक्ता जोशी व डॉ. ॲनी जॉन यांचे त्यांना उत्तम सहकार्य लाभले. यामुळे यंदाचा 'पद्मप्रतिमा' हा वार्षिक अंक वाचनीय झाला आहे. तो वाचकांच्या हाती देताना निश्चितच आनंद होत आहे.

-प्रा. डॉ. राजेंद्र शेंडगे

महाविद्यालयात इतिहास विभाग व रा.से.यो.विभागाकडून आयोजित कोरोनायोगी सावित्रीबाई फुले जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.कविता मुरुमकर व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र सोहनी, डॉ. डी.एल. रिठे, डॉ.आर.के. चव्हाण, डॉ.अॅनी जॉन व डॉ. तुकाराम रिठे...

महाविद्यालयात पालक-शिक्षक संघाकडून आयोजित पालक-शिक्षक सहसंविचारी सभेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र सोहनी व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयात पेरेंसिनी ट्रेनिंग असोसिएशन व क्रिमॅटिज फाऊंडेशन मार्फत आरोग्य शिबिराचे उत्तम नियोजन केल्याबद्दल खेळ साहित्य भेट वस्तू कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र सोहनी, डॉ. रजनी ढाकणे, सुनील गायकवाड व उपस्थितीत विद्यार्थी खेळाडू...

महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताह निमित्त इतिहास विभाग, रा. से. यो., समाजकल्याण विभाग, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बक्तृत्व स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सैद्धांतिक विचार या विषयावर मांडणी करताना कु. सरस्वती सस्पडे (बी.ए.भाग-३), व व्यासपीठावर उपस्थितीत प्राचार्य डॉ. राजेंद्र सोहनी, डॉ. डी.एल. रिठे व डॉ. शंकर साळे...

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या 'पुण्यक महोत्सवात' शास्त्रीय नृत्य सादर करताना कु. भाग्यश्री जाधव....

महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी डॉ. सुनंदा मंडले, डॉ. रजनी ढाकणे, डॉ. आनंद लिंबाळकर व उपस्थित मान्यवर....

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण विभाग यांच्याकडून आयोजित पक्षीमित्र संमेलनाचे उद्घाटन करताना डॉ. व्यंकटेश केलम व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन करताना डॉ. तुकाराम रिठे, डॉ. शिवानंद भाजे, डॉ. अॅनी जॉन व डॉ. आर. के. चव्हाण...

गुणवंत विद्यार्थीनी

प्रथम क्रमांक

कु. वर्षाराणी वासेकर
बी. ए. भाग - १

प्रथम क्रमांक

कु. तेजस्विनी मंजरे
बी. ए. भाग - १

प्रथम क्रमांक

कु. शमला लक्ष्मपती
बी. ए. भाग - ३

प्रथम क्रमांक

कु. पूजा चंदलापुरे
बी. कॉम. भाग - १

प्रथम क्रमांक (विभागून)

कु. रोहिणी मंचल
बी. कॉम. भाग - १

प्रथम क्रमांक (विभागून)

कु. विजयलक्ष्मी सुती
बी. कॉम. भाग - ३

प्रथम क्रमांक

कु. कृतुजा कुडक्याल
बी. सी.ए. भाग-१

प्रथम क्रमांक

कु. कोकना चुधारम
बी. सी.ए. भाग-१

प्रथम क्रमांक

कु. वैष्णवी मद्दाल
बी. सी.ए. भाग-३

प्रथम क्रमांक

कु. सुती येलराट्टी
एम. कॉम. भाग - १

प्रथम क्रमांक (मराठी)

कु. स्वप्नाली गुजा
बी. ए. भाग - ३

प्रथम क्रमांक (हिंदी)

कु. शमला लक्ष्मपती
बी. ए. भाग - ३

प्रथम क्रमांक (इंग्रजी)

कु. काजल महेता
बी. ए. भाग - ३

प्रथम क्रमांक (इतिहास)

कु. शितल आसेकर
बी. ए. भाग - ३

प्रथम क्रमांक

कु. दिपीका कोंडा
बी.ए. भाग - २

प्रथम क्रमांक

कु. किरण स्वामी
बी.ए. भाग - २

कु. मंजुषा सकिनाल
बी. कॉम. भाग -३

कु. कृतिका कुसेकर
बी. ए. भाग - १

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सृजनरंग नियतकालिक स्पर्धा

प्रथम क्रमांक पारितोषक प्राप्त विद्यार्थीनी

बी. कॉम. भाग -१

कु. तुलसी येमुल
मराठी किनोटी लेख
प्रथम क्रमांक -२०२०-२१

बी. कॉम. भाग -२

कु. भावना आमंची
आर्थकारणावरील लेख
प्रथम क्रमांक २०२०-२१

बी. कॉम. भाग -१

कु. लावण्या चुधारम
इंग्रजी कविता
प्रथम क्रमांक - २०२०-२१

बी. ए. भाग -३

कु. वैशाली कोल्हे
आर्थकारणावरील लेख
प्रथम क्रमांक -२०१९-२०

बी. कॉम. भाग -२

कु. तेजस्विनी पाटील
व्यंगचित्र कलाप्रकारातील
प्रथम क्रमांक -२०१९-२०

गुणवंत प्राध्यापक

प्रा. डॉ. अॅनी जॉन

- वेमिली जर्नालिएन्स ऑफ इंडिया, शाखा सोलापूर यांच्याकडून जागतिक महिला दिनानिमित्त 'के. लक्ष्मीबाई वनिता कर्तृत्वशालिनी स्मृती पुरस्कार' प्राप्त.
- बी.ए.भाग-३ च्या Literary Mindscapes-I आणि Literary Mindscapes-II या पाठ्यपुस्तकांचे लेखन.
- बी.ए.भाग-३ साठी उपयुक्त Immortal Verses हा लेखनाचा ग्रंथ प्रकाशित.

प्रा. डॉ. रजनी दळवी

- श्री. विठ्ठलराव बोल्ली महिला सोलापूर यांच्याकडून 'श्री लक्ष्मी लक्ष्मण पुरस्कार' प्राप्त.
- मराठी साहित्य मंडळ, मोतीझरा जयपूर यांच्याकडून 'साहित्य विशारद' प्राप्त.

प्रा. डॉ. शिवानंद भांजे

- स्वायत्त विज्ञान संस्था विभाग व शिक्षक कर्मचारी एकत्रीकरण समितीतर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्राप्त.
- सोलापूर विद्यापीठ विज्ञान मंडळ (सदस्य) तसेच विद्यापीठ अभ्यासमंडळ सदस्य.

प्रा. डॉ. तुकाराम शिंदे

- सोलापूर सोशल फाउंडेशनकडून 'सोशल सोलापूरी' हा पुरस्कार प्राप्त.

प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे

- सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघटना (सदस्य) आजीवन कार्यकारिणी सदस्य.

प्रा. डॉ. कविता मुरुमकर

- 'उत्कर्षाचाय तुझा पाचाण' हा कविता संग्रह प्रकाशित.
- अनेक वा वाहकवीन वैशिष्ट्यांचे संपादन केले.
- 'उत्कर्षाचाय तुझा पाचाण' या कविता संग्रहास 'मराठी पुस्तकांकरा राष्ट्रीय पुरस्कार-२०२१' व पु.वा.भावे राज्यस्तरीय पुरस्कार द्वितीय मानांकन संच-५१२२ प्राप्त.

प्रा. स्वाती घाटुळे

- 'पेशवाईतील पत्रांची चाकिकरण' या पुस्तक प्रकाशन.
- आधुनिक भारतीय इतिहास व पुरालेखशास्त्र या विषयावर एम. ए. पदवी प्राप्त.

प्रा. भाग्यश्री पाटील

- सेट परीक्षा उत्तीर्ण

जिमखाना विभाग - यशस्वी विद्यार्थीनी

बी.कॉम. भाग -२

कु. सुरभिता लगलगाटी
राष्ट्रीय खेळाडू,
योगासन

बी.कॉम. भाग -२

कु. रिचलिता नरोने
राष्ट्रीय खेळाडू, आर्चरी
राज्यस्तरीय आर्चरी, रोप मेडल प्राप्त

बी.कॉम. भाग - १

कु. ऐश्वर्या सावंत
राज्यस्तरीय आर्चरी खेळाडू
गोल्ड मेडल प्राप्त

बी.कॉम. भाग - १ (बी)

कु. प्राजक्ता अक्कलकोट
राज्यस्तरीय फिल्ड
आर्चरी विजेते खेळाडू

बी.कॉम. भाग - १

कु. प्रणती राजनला
राज्यस्तरीय फिल्ड
आर्चरी विजेते खेळाडू

बी.कॉम. भाग - १ (बी)

कु. अंकिता गोरेट्टी
राज्यस्तरीय फिल्ड
आर्चरी विजेते खेळाडू

राज्यस्तरीय फिल्ड आर्चरी विजेते खेळाडू

बी.कॉम. भाग - १

कु. चित्रकला लकशेट्टी

बी.कॉम. भाग - १

कु. सोनाली निरोळे

बी.कॉम. भाग - १

कु. अंकिता चिलवेरी

बी.कॉम. भाग - १

कु. स्नेहा चौगुले

बी.कॉम. भाग - १

कु. प्रेमा मुंडासे

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित,

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

• महाविद्यालयीन विकास समिती •

२०२१-२२

अ.क्र.	नांव	पद
१.	श्री. काशिनाथ परशुराम गड्डम	अध्यक्ष
२.	श्री. दशरथ नारायण गोप	सदस्य
३.	प्रा. डॉ. श्री. तुकाराम नारायण शिंदे	सदस्य
४.	प्रा. डॉ. श्री. शिरीष नागनाथ भोसले	सदस्य
५.	प्रा. डॉ. सौ. रजनी जयंत दळवी	सदस्य
६.	प्रा. डॉ. श्री. पंचप्पा रामचंद्र वाघमारे	सदस्य
७.	श्री. व्यंकटेश मल्लेशम गाजूल	सदस्य
८.	प्रा. डॉ. श्रीनिवास व्यंकटपती कोंडी	सदस्य
९.	श्री. दिनेश भुमय्या यन्नम	सदस्य
१०.	सौ. मिनाक्षी दत्तात्रय मेडपल्ली	सदस्य
११.	श्री. पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी	सदस्य
१२.	प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे	सचिव

संपादकीय,

अंकातील दर्जेदार लेख यावरच अंकाचा दर्जा अवलंबून असतो. सालाबादप्रमाणेच 'पद्मप्रतिमा' या वार्षिक अंकाचा दर्जा राखण्यासाठी दर्जेदार साहित्याचा समावेश यंदाच्या अंकात केला आहे. शैक्षणिक वर्षे २०२१-२२ मधील सर्व वर्ग एकाचवेळी सुरु झाले नाहीत. पण जेव्हा ते सुरु झाले तेव्हा मात्र विद्यार्थीनींनी विविध विषयावर अंकासाठी लेखन केले. या लेखनामध्ये व्यक्तिचित्रे, माहितीपर लेख, भुलाखत, प्रवासवर्णन, व्यंगचित्रे, विनोद व कविता इ. चा समावेश आहे. अशा विविध प्रकारच्या साहित्यामुळे यंदाचा 'पद्मप्रतिमा' हा वार्षिक अंक नटलेला आहे. अंकाच्या उत्तम सजावटीसाठी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचे मार्गदर्शन बहुमोल ठरले. महाविद्यालयात विविध विभाग कार्यरत आहेत. या विविध विभागाकडून नेहमीच विद्यार्थीनींची जडणघडण व प्रबोधन व्हावे या हेतूने नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. याउपक्रमाचे फोटो व अहवालाचा समावेश अंकात करण्यात आला. आहे.

'पद्मप्रतिमा' या वार्षिक अंकासाठी विभागीय संपादिका डॉ. कविता मुरुमकर, डॉ. प्राजक्ता जोशी आणि डॉ. ॲनी जॉन यांनी विद्यार्थीनींकडून आलेल्या साहित्यांचे संपादन करणे याबाबत उत्तम सहकार्य केले.'पद्मप्रतिमा' वार्षिक अंकाच्या अनुषंगाने होणारे पत्रव्यवहार, विविध उपक्रमांच्या फोटोंचे संकलन व बातम्यांचे कात्रण याबाबत अधिक्षक श्री. व्यंकटेश माडूल, मुख्य लिपीक सौ. संजीवनी सादुल, वरिष्ठ लिपीक श्री. अनिल सन्गम, कनिष्ठ लिपीक श्री. सत्यनारायण गडेली, श्री. महेश घागरे, श्री. संतोष मालतुमकर, सौ. उमा कुडक्याल व रमाकांत म्हैसूर यांचे उत्तम सहकार्य लाभले. याबाबत सर्वांचे आभार आहे.

'पद्मप्रतिमा' अंकाची सजावट, आकर्षकता आणि छपाई वेळेत पूर्ण करणे याबाबत श्री. रामगोपाल म्याकल यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या प्रयत्नामुळेच यंदाच्या 'पद्मप्रतिमा' या वार्षिक अंकाची बांधणी व सजावट उत्तम झाली आहे.

- डॉ. टी. एन. शिंदे
कार्यकारी संपादक

मराठी विभाग

स्वप्नामध्ये रचिल्या ओळी
यमक मला नवं सापडले ।
अर्थ चालला अंधारीतुन
शब्द बिचारे धडपडले ।
प्रतिमा आल्या उंटावरुनी,
नजर तयांची पण वेडी ।
शब्द बिथरले त्यांना भ्याले
स्वप्नांची चढण्या माडी ।
थरथली भावना मुक्याने
तिला न त्यांनी सावरले ।
स्वप्नामध्ये रचिल्या ओळी
यमक मला नवं सापडले ।

- विंदा. करंदीकर...

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	लेखाचा प्रकार	विद्यार्थीनीचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
	गद्य विभाग				
१.	हसण्यासाठी जन्म आपला हाच तर आयुष्याचा प्रवास...	– ललित लेख	– कु. प्रियंका बिराजदार	– बी. कॉम. भाग–२	७
२.	मी अनुभवलेला लॉकडाऊन	– आत्मकथनात्मक लेख	– कु. मोनिका गाजूल	– बी. कॉम. भाग–२	८
३.	जगाला युध्द नको... युध्द हवा...!	– चिंतनपर लेख	– कु. पूजा बदलापूरे	– बी.कॉम. भाग – २	११
४.	अवयवदान	– माहितीपर लेख	– कु. लक्ष्मी यन्नम	– बी. ए. भाग– २	१२
५.	सराव थांबला.... साक्षात्कार हुकला....	– आत्मकथनात्मक लेख	– कु. पौर्णिमा धोरात	– एम. कॉम. भाग–१	१४
६.	शेतकऱ्यांनो, स्वत:ची ताकद ओळखा!	– वैचारिक लेख	– कु. पौर्णिमा धोरात	– एम. कॉम. भाग–१	१५
७.	प्रसिध्द साहित्यिक वसंत कानेटकर	– माहितीपर लेख	– कु. अरुणा घंडी	– बी. ए. भाग–३	१७
८.	महती श्रींची	– वैचारिक लेख	– कु. रायलिया चिटमिल	– बी. कॉम. भाग–२	१८
९.	वैश्विक शिक्षक : रणजितसिंह डिसले	– माहितीपर लेख	– कु. राजेश्वरी शावंतुल	– बी. ए. भाग – १	२०
१०.	प्रेम म्हणजे काय ?	– चिंतनपर लेख	– कु. सुनिता यनगंटी	– बी. कॉम. भाग – ३	२१
११.	अनाथांची माय सिंधुताई सपकाळ	– व्यक्तिचित्रपर लेख	– कु. सावित्री बिजगे	– बी. ए. भाग – ३	२२
१२.	प्रसिध्द शिल्पकार भगवान रामपुरे यांची मुलाखत	– मुलाखत	– कु. श्रुती कोल्हापुरे	– बी. ए. भाग – २	२३
१३.	गानसाम्राज्ञी लता मंगेशकर	– व्यक्तिचित्रपर लेख	– कु. श्रुती कोल्हापुरे	– बी. ए. भाग – २	२५
१४.	लोकशाहीचा चौथा स्तंभवृत्तपत्र	– माहितीपर लेख	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	२६
१५.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार	– माहितीपर लेख	– कु. वैष्णवी पुराणिक	– बी. कॉम. भाग – १	२७
१६.	ऊर्मिला पवार	– माहितीपर लेख	– कु. श्रुतिका गडगी	– बी. ए. भाग – १	२९
१७.	उगाच टेन्शन कशाला घ्यायचं	– वैचारिक लेख	– कु. अरुणा घंडी	– बी. ए. भाग – ३	३०
१८.	केशवसुत	– माहितीपर लेख	– कु. अंकिता दौलताबाद	– बी. ए. भाग – १	३१
१९.	आव्हानांचा सामना म्हणजेच जीवनाचा विकास !	– माहितीपर लेख	– कु. प्रियंका बिराजदार	– बी. कॉम. भाग – २	३२
२०.	सफर इंटरनेटची	– माहितीपर लेख	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	३३
२१.	कवी वसंत बापट एक प्रतिभावंत कवी	– माहितीपर लेख	– कु. श्रुती कोल्हापुरे	– बी. ए. भाग–२	३३
२२.	मुक्तिबोध	– माहितीपर लेख	– कु. आरती गुंडला	– बी. ए. भाग – १	३४
२३.	मी यशस्वी होणारच !	– आत्मकथनात्मक लेख	– कु. अनिता आवार	– बी. कॉम. भाग–३	३४
२४.	जीवन एक रंगभूमी	– माहितीपर लेख	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	३५
२५.	स्वप्ने नसती तर...	– माहितीपर लेख	– कु. दिपाली विटकर	– बी. ए. भाग – २	३५
२६.	चारोळी	– चारोळी	– कु. दिपाली विटकर	– बी. ए. भाग – २	१३
२७.	सुविचार	– सुविचार	– कु. दिपाली विटकर	– बी. ए. भाग – २	१३
२८.	एक सुंदर नाते	– संकलन	– कु. देवलक्ष्मी गोसकी	– बी. ए. भाग – १	१९
२९.	तीन गोष्टी	– वैचारिक	– कु. अनिता आवार	– बी. कॉम. भाग– ३	१९
	पद्य विभाग				
अ.क्र.	कवितेचे नाव	विद्यार्थीनीचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.	
१.	तिनेमार्तीतलं फक्त	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	३६	
२.	आई	– कु. किर्ती चव्हाण	– बी. कॉम. भाग – ३	३६	
३.	टुंटी - टुंटी	– कु. वेन्नला बुचानम	– बी. कॉम. भाग – २	३६	
४.	आईची आठवण	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग –१	३६	
५.	बाबा	– कु. वैष्णवी मिट्टा	– बी. कॉम. भाग – १	३६	
६.	मानस	– कु. अनिता आवार	– बी. कॉम. भाग – ३	३७	
७.	मन	– कु. शारदा म्याकल	– बी. कॉम. भाग – १	३७	
८.	मी कृष्णाला कळलो नाही	– कु. लता मिट्टा	– बी. कॉम. भाग – १	३७	
९.	नशिब	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	३७	
१०.	आई - बाबा	– कु. वैष्णवी मिट्टा	– बी. कॉम. भाग – १	३७	
११.	जीवन असंच तगायचं असतं...	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग –१	३८	
१२.	आई	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग –१	३८	
१३.	ज्ञानज्योती सावित्रीबाई	– कु. वर्षाराणी वानेकर	– बी.ए. भाग – २	३८	
१४.	जीवन	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	३८	
१४.	एकटेपणा	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	३८	
१५.	कृष्णासाठी सर जगायचं असतं	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	३८	
१६.	"जगून बघ"	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	३९	
१७.	आयुष्याचा प्रवास	– कु. वर्षाराणी वानेकर	– बी. ए. भाग – २	३९	
१८.	आयुष्य	– कु. दिपाली विटकर	– बी. ए. भाग – २	३९	
१९.	दु:ख	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	३९	
२०.	मैत्रीचे नाते	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	३९	
२१.	कृष्ण	– कु. कृष्णवेणी बोड्डी	– बी. कॉम. भाग – १	४०	
२२.	मैत्री	– कु. अर्चना बोल्दुल	– बी. कॉम. भाग – १	४०	
२३.	प्रेम	– कु. लक्ष्मी सपर्ती	– एम. कॉम. भाग – १	४०	
२४.	सांगू का आई	– कु. दिपाली विटकर	– बी. ए. भाग – १	४०	
२५.	माय सावित्री	– कु. वानिता नदाफ	– बी. ए. भाग – १	४०	
२६.	जीवन	– कु. विजयालक्ष्मी भोंगे	– बी. ए. भाग – १	४०	
२८.	बाबा	– कु. देवलक्ष्मी गोसकी	– बी. ए. भाग – १	४०	

– ललित लेख –

हसण्यासाठी जन्म आपला हाच तर आयुष्याचा प्रवास...

कु. प्रियंका बिराजदार
बी. कॉम. भाग-२

माणूस राग जितक्या सहजतेने व्यक्त करतो, तितक्याच सहजतेने प्रेम ही व्यक्त करु शकला असता तर जगायला खरं किती मजा आली असती कारण, माणसाच्या निम्या समस्या या व्यक्त केलेल्या रागामुळे आणि कधीच व्यक्त न केलेल्या प्रेमामुळे वाढतात. शब्द बोलताना शब्दाला धार नको तर आधार असला पाहिजे, कारण धार असलेले शब्द मन कापतात आणि आधार असलेले शब्द मन जिंकतात. आयुष्यातले निर्णय चुकतात. आणि आयुष्य चुकत जातं. प्रश्न कधीकधी कळत नाहीत आणि उत्तर मात्र चुकत जातं, सोडवताना वाटतं सुटत गेला गुंता पण प्रत्येक वेळी नवी गाठ बनत जाते. दाखवणाऱ्याला वाट माहित नसते. आणि चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवुन जातं. दिसतात तितक्या सोप्या गोष्टी नसतात पण अनुभव म्हणजे काय ते तेव्हांच कळतं. असे मित्र बनवा जे कधीच साथ सोडणार नाहीत. असेही प्रेम करा ज्यात स्वार्थ असणार नाही. असे हृदय बनवा की ज्यात रहस्य असणार नाही. आणि असा स्पर्श करा ज्यांनी जखम होणार नाही. आयुष्यात असे लोक जोडा की, वेळ येईल तेव्हा तुमची सावली आणि वेळेला तुमचा आरसा बनतील, कारण आरसा कधी खोटं बोलत नाही आणि सावली कधी साथ सोडत नाही.

व. पु. काळे म्हणतात कोणी कसं दिसावं यापेक्षा कोणी कसं असावं याला तर नक्कीच महत्व आहे. स्वप्न पूर्ण झालं नाही तर रडायचं नसतं आणि रंग उडाला म्हणून चित्र फाडायचं नसतं. फक्त लक्षात ठेवायचं असतं, सर्वच काही आपलं नसतं. आपल्या दुःखात कदाचित दुसऱ्याचं सुख असतं. छोट्याशा या आयुष्यात खूप काही हवं असतं पण पाहिजे तेच मिळत नसतं. असंख्य चांदण्या भरुन सुध्दा आपलं आभाळ मात्र रिकामं असतं हव्या असलेल्या सर्वच गोष्टी माणासाला मिळत नसतात, पण न मिळणाऱ्या गोष्टी माणसाला का हव्या असतात ? त्याचं उत्तर, सुरेश भट्ट यांनी सांगितले आहे. आयुष्य छान आहे, थोडं लहान आहे, रडतोस का रे वेड्या लढण्यात शान आहे. काट्यात ही फुलांची झुलती कमाल आहे. उचलून घे हवं ते दुनिया दुकान आहे जगणे निर्थक म्हणतो तो बेमान आहे.

सुखासाठी कधी – कधी हसावं लागतं तर कधी-कधी रडावं लागतं, कारण सुंदर धबधबा बनायला ही पाण्याला उंचावरुन पडावं लागतं, चारचौघात बसण्यापेक्षा कधी-कधी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन आठवणींना घेऊन बसावं लागतं तेव्हां आयुष्य जास्त सुंदर वाटतं. आपण कोणाला हवं याचा सर्वसाधारण मनुष्य ही विचार करतोच ना ? आकाशातले तारे कधीच मोजून संपत नाहीत. माणसाच्या गरजा कधीच पूर्ण होत नाहीत. शक्य तेवढे तारे मोजून समाधानी राहवं. यामुळे आयुष्य जास्त सुंदर वाटेल. आयुष्यातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद. गंमतीची गोष्ट म्हणजे असं की, मौल्यवान असून ही परमेश्वराने आपल्याला ती विनामुल्य दिलेली आहे. पण त्याहून ही गंमतीची गोष्ट अशी की, बऱ्याच लोकांना आयुष्य संपेपर्यंत त्याचा पत्ताच नसतो. उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा... मावळताना तो तुम्हाला खूप समाधान देऊन जाईल. आनंद हा फुलपाखरा सारखा असतो. त्याचा पाठलाग केला की दूर पळतो व आपण निश्चिंत बसलो की, अलगद आपल्या खांद्यावर येऊन बसतो. प्रश्न सुटण्यासारखा असेल तर काळजी करण्यासारखे काय! आणि तो सुटत नसेल तर काळजी करुन उपयोग काय ? पराभवाने माणूस संपत नाही प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. कठीण काळात सतत स्वतःला सांगा की, '' शर्यत अजून संपलेली नाही, कारण मी अजून जिंकलेलो नाही.''

'' छु ले आसमाँन जमीं की तलाश न कर, जी ले जिंदगी खूशी की तलाश न कर, बदल जाएगी तकदीर खुद ही मेरे दोस्त मुस्कुराना सीख ले, वजह की तलाश न कर मशहूर होना लेकीन कभी मगरुर मत होना, छु लो कदम कामीयाबी के लेकीन कभी अपनों से दूर मत होना. जिंदगी में खूब मिलेंगी दौलत और शौरत लेकीन अपने ही अपने होते हैं। ये बात कभी भूल मत जाना । ''

कु. पुनम पाटील
बी. कॉम. भाग-३

– आत्मकथनात्मक लेख –

मी अनुभवलेला लॉकडाऊन

कु.मोनिका गाजूल
बी. कॉम. भाग-२

संपूर्ण जगभरात कोरोना व्हायरसने थैमान घातलेले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढताना आपल्याला दिसत आहे. कोरोना व्हायरस या संकटाशी आपण सर्व जणच लढा देत आहोत. कोरोना विषाणूंची ही साखळी तोडण्यासाठी व कोरोना व्हायरसचा सामना करण्यासाठी जगभरात लॉकडाऊन लागू करण्यात आले होता.

आपल्या देशात कोरोनाने शिरकाव केल्यानंतर हळू-हळू रुग्णसंख्येत वाढ होताना दिसू लागली. कोरोनाची ही साखळी तोडणे व देशातील लोकांचे आरोग्य नीट राहण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला.

देशात कोरोना रुग्णांची वाढती संख्या पाहून आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी २२ मार्च रोजी 'जनता कर्फ्यू' करण्यात यावा असे आवाहन केले. आपल्या देशात २४ मार्च २०२० या दिवशी लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. सुरुवातीचा लॉकडाऊन हा २१ दिवसांसाठी करण्यात आला होता. कोरोनाचा वाढता धोका बघता हा लॉकडाऊन पुन्हा वाढवण्यात आला होता.

एखाद्या कोरोना संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आपण आलो तर हा विषाणु आपल्यावरही आक्रमण करु शकतो. कोरोना विषाणुंचा वाढता प्रसार थांबवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात होत्या. मनामध्ये अनेक प्रश्न घर करुन बसले होते. हे संकट कधी टळणार ? कोरोनामुळे कोणकोणत्या संकटांना आपल्याला सामोरे जावे लागेल ? लॉकडाऊन कधी संपणार ? असे अनेक प्रश्न मला पडलेले होते.

आजुबाजूला सर्वत्र एकच विषय कानावर पडत होता, तो म्हणजे कोरोना. मनामध्ये थोडीशी भीती निर्माण झाली होती. चीनच्या वुहान शहरापासून सुरु झालेला कोरोना व्हायरस जगातील अनेक देशांमध्ये पोहोचला होता.

कोरोना व्हायरस झपाट्याने वाढत होता. कोरोना व्हायरस आमच्या गावापर्यंत सुध्दा येऊन पोहोचेल का ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात घोळू लागले होते. माझ्या शहराचे नाव सोलापूर हे आहे. शहरात आम्ही सर्वजण लॉकडाऊनचे पालन व्यवस्थिपणे करत होतो. शहरातील शाळा, कॉलेज, बस, रेल्वे या सर्व गोष्टी बंद ठेवण्यात आल्या होत्या. लॉकडाऊन सुरु झाल्यानंतर शहरात अनेक उपाय योजना करण्यात आल्या. आम्ही सर्वजण या संकटाशी लढण्यासाठी सज्ज झालो.

सर्व प्रथम शहरात निर्जंतुकीकरण फवारणी करुन घेतली. प्रत्येक कुटुंबातील लोकांनी आपल्या कामासाठी बाहेर गेलेल्या मुलांना, शाळेसाठी बाहेर असलेल्या आपल्या मुलाबाळांना संपर्क साधून काळजी घेण्यासाठी सांगितले. सुरुवातीच्या काळात थोडीशी मज्जा केली परंतु हा वेळ अमुल्य आहे हे मला समजले.

लॉकडाऊन सुरु झाल्यामुळे शाळासुध्दा बंद ठेवण्यात आल्या होत्या.त्यामुळे भरपूर वेळ माझ्या जवळ उपलब्ध होता. या मिळालेल्या वेळेचा योग्य वापर कसा करता येईल याचा विचार मी करु लागले. मला शाळा व कॉलेज बंद असणार म्हणून शिक्षण घेणे थांबवून चालणारही नव्हते हे माझ्या लक्षात आले. मी या मिळालेल्या वेळेचा वापर मला अभ्यासात जे मुद्दे समजायला अडचण येत होती,ते मुद्दे समजावून घेण्याचा प्रयत्न करु लागले.

दूर कर हे संकट,
दयाळू पूर्ण कर माझी मनोकामना
जाऊ दे हा कोरोना...
देवा! प्लीज सुरु कर माझे कॉलेज,

कोरोना संकट कधी टळेल हे कोणी निश्चितपणे सांगू शकत नव्हते. टीव्ही वरील बातम्यांमधून मला कोरोना पासून सावध राहण्यासाठी आपण काय करु शकतो याची माहिती मिळत होती. आम्ही घरामध्ये रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त पदार्थांचा वापर जेवणात करु लागलो. लॉकडाऊनचे नियम पाळत आणि सर्वजण नियमितपणे मास्कचा वापर करत होतो.सॅनिटायझरचा वापर करु लागलो. एवढच नाही तर २ मीटरचे अंतर ठेवणे, गरज नसताना सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळणे, नेहमी बाहेरून आल्यानंतर व जेवताना २०-३० सेकंद हात साबणाने स्वच्छ धुणे, खोकताना किंवा शिंकताना नेहमी हात व रुमालाचा वापर करणे, हात न धुता नाकाला, तोंडाला, डोळ्याला व चेहऱ्यास हात लावणे टाळणे.

अशा प्रकारे आपण आपले व आपल्या कुटुंबाचे रक्षण करु लागला होतो. कोरोना काळात गावातील व शहरातील

लोकांच्या मदतीने या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी मी प्रयत्न करीत होते. माझ्या शहरातील अनुभवी लोक पोलीस,डॉक्टर त्यांची व त्यांच्या परिवाराची काळजी घेत ते देशासाठी न थकता रात्रंदिवस मेहनत करत होते. या सर्व लोकांच्या मेहनतीमुळेच आपण या कोरोनाच्या संकटापासून लांब राहू शकलो.

मी शाळा आणि कॉलेज सुरु होण्याची वाट पाहत होते. मला शिक्षण घेत असताना खूप अडचणी येत होत्या. कोरोना काळात मुलांचे आणि मुलींचे शिक्षण थांबू नये म्हणून शिक्षकांनी ऑनलाईन वर्ग सुरु केले. झूम, गुगल मीट व युट्युबच्या मदतीने शिक्षक व आम्ही सगळेजण संपर्क साधू लागलो. लॉकडाऊनमध्ये गोरगरीबांना तांदुळ, डाळ, चपाती इ. घरपोच सेवा सुरु केल्या. गावात व शहरात घरोघरी आरोग्य कर्मचारी येऊन आरोग्यविषयक काही गोष्टींची खात्री करु लागल्या. बोलताना ठराविक अंतर ठेवणे, गर्दी करु नये, मास्क वापरणे या गोष्टींचे पालन करण्यासाठी वारंवार सांगितले जात होते.

मी घरी राहून अभ्यास करणे, वर्तमानपत्र वाचणे, या गोष्टींना महत्व दिले. बातम्या पाहिल्यामुळे मला देशभरात घडत असलेल्या घडामोडींची माहिती मिळत होती. लॉकडाऊनमध्ये आम्ही कुटुंबातील सर्वजण खूप वेळ एकत्र राहू शकलो. या लॉकडाऊनमध्ये मी कॉलेज व कॉलेजच्या मैत्रिणीपासून लांब राहिले पण परिस्थिती पाहून पुन्हा एकदा कॉलेज उघडतील व मी माझ्या मैत्रिणींना भेटेन या विचारात मग्न राहत होते.

कोरोना विषाणूचा नवीन प्रकार ओमिक्रॉनच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत होती . या नवीन प्रकारच्या लक्षणाबद्दल बरीच चर्चा आणि अंदाज बांधले जात होते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने कोरोनाचा हा प्रकार चिंता वाढवणारा असा उल्लेख केला होता. विविध संस्थांनी कोरोनाच्या या प्रकारच्या संसर्ग आजाराबाबत सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. ओमिक्रॉन लक्षणांबद्दल शास्त्रज्ञ म्हणतात की याचा रोग प्रतिकारक शक्तीवर खूप परिणाम होत आहे. त्यामुळे ज्या लोकांना लसीचे दोन्ही डोस मिळाले आहेत. त्यांनी देखील सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. त्यामुळे तुम्ही यांच्या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करु नका. चला जाणून घेऊया. ओमीक्रॉनच्या. **लक्षणांविषयी :**

१) घश्यात खाज येणे :- दक्षिण आफ्रिकेतील डॉक्टर अँजेलिक कोएत्झी यांच्या मते ओमिक्रॉनचा संसर्ग झालेल्या रुग्णांना घसा खवखवण्या ऐवजी घसा खाजवल्यासारखी समस्या दिसू लागली आहे. या दोन्ही परिस्थिती काही प्रमाणात सारख्या असू शकतात.

२) थकवा :- पूर्वीच्या प्रकारांप्रमाणे ओमिक्रॉनामुळे थकवा किंवा अति थकवा येऊ शकतो. एखाद्या व्यक्तीला थकल्यासारखे वाटू शकते. कमी ऊर्जा अनुभवू शकते, विश्रांतीची तीव्र इच्छा असू शकते. यामुळे दैनंदिन कार्यक्रमांमध्ये व्यत्यय येऊ शकतो हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की थकवा इतर कारणांमुळे आणि आरोग्य समस्यांमुळे देखील उद्भवू शकतो. आपली स्थिती समजून घेण्यासाठी डॉक्टरांना नक्की भेटा.

३) सौम्य ताप :- कोरोना व्हायरसच्या सुरुवातीपासून सौम्य ते मध्यम ताप हे Covid-19 च्या नोंदवलेल्या लक्षणांपैकी एक आहे. परंतु ओमिक्रॉन मध्ये ताप सौम्य राहतो आणि अनेक दिवस टिकू शकतो.

४) कोरडा खोकला :- दक्षिण आफ्रिकेच्या आरोग्य विभागाच्या मते ओमायक्रॉनचा त्रास असलेल्या लोकांना कोरडा खोकला देखील होऊ शकतो. कोव्हीड १९ च्या लक्षणांमध्येही हे लक्षण दिसून आले होते. कोरडा खोकला तेव्हा होता जेव्हा तुमचा घसा कोरडा होतो. तुम्हाला संसर्गामुळे तुमच्या घशात काहीतरी अडकल्यासारखे वाटते.

५) रात्री घाम येणे :- दक्षिण आफ्रिकेच्या आरोग्य विभागाच्या डॉक्टर अँबेन पिट्झे यांच्या मते रात्रीचा घाम येणे ही देखील या आजाराचे लक्षण आह. यात रात्री खूप घाम येतो. सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे या आजाराने त्रस्त असलेला माणूस ए.सी. चालवून किंवा थंड जागी झोपला तरी त्याला घाम येतो.

कर्नाटक, गुजरातनंतर आता महाराष्ट्रातही ओमिक्रॉनचा रुग्ण आढळला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात हा रुग्ण राहत असून तो दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरातून दुबई आणि दिल्लीमार्गे मुंबईत आला आहे. महाराष्ट्राच्या आरोग्य खात्याने दिलेल्या माहितीनुसार २४ नोव्हेंबर २०२१ रोजी दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरामधून दुबई आणि दिल्लीमार्गे मुंबईमध्ये आलेल्या ३३ वर्षीय तरुणामध्ये ओमिक्रॉन हा व्हेरियंट सापडल्याने प्रयोगशाळा तपासणीतून सिध्द झाले आहे. या नवीन विषाणू प्रकारचा राज्यातील हा पहिला रुग्ण आहे.

हा तरुण कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील रहिवाशी असून त्याने कोणतीही कोव्हिड प्रतिबंधक लस घेतलेली नाही. २४ नोव्हेंबर २०२१ रोजी या प्रवाशाला सौम्य ताप आला. त्याला इतर कोणतीही लक्षणे आढळली नाहीत. त्यामुळे या रुग्णाचा आजार एकूण सौम्य स्वरुपाचा असून तो सध्या कल्याण-डोंबिवली येथील 'कोव्हिड केअर सेंटर' मध्ये उपचार घेत आहे. अशी माहिती आरोग्य खात्याकडून देण्यात आली आहे.

तसेच या रुग्णाच्या संपर्कात आलेल्या ३५ जणांचा शोध घेण्यात आला असून हे सर्वजण कोव्हिड निगेटिव्ह आढळले आहेत. याशिवाय या तरुणाने दिल्ली ते मुंबई हा प्रवास ज्या विमानाने केला त्या विमान प्रवासातील २५ जणांसह प्रवाशांची देखील तपासणी करण्यात आली आहे. यापैकी सर्वजण कोव्हिड निगेटिव्ह आढळलेले आहेत. याशिवाय संपर्कात आलेल्या आणखी काहीजणांचा शोध घेण्यात येत आहे. या दरम्यान झांबिया देशातून पुण्यात आलेल्या ६० वर्षीय पुरुषाच्या जनुकीय तपासणीचा अहवालही राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्थेकडून प्राप्त झाला असून या रुग्णामध्ये ओमिक्रॉन आढळेला नाही मात्र डेल्टा

सब्लिनिएज विषाणू आढळून आलेला आहे. आज (४ डिसेंबर) सकाळपर्यंत मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अति जोखमीच्या देशातून आलेल्या सर्व ३ हजार ८३९ प्रवाश्यांची **R.T.P.C.R.** तपासणी करण्यात आली असून इतर देशामधून आलेल्या १७ हजार १०७ प्रवाशांपैकी ३४४ प्रवाशांची तपासणी करण्यात आली आहे. मुंबई विमानतळावरील तपासणीत १ डिसेंबरपासून आता पर्यंत ८ प्रवासी कोव्हिड बाधित आढळले असून त्यांचे नमुने जनुकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. याशिवाय राज्यात १ नोव्हेंबरपासून आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे देखील क्षेत्रिय पातळीवर सर्वेक्षण सुरु आहे.

विषाणुमध्ये बदल होणे ही नैसर्गिक प्रक्रिया असून याबाबत जनतेने भीती न बाळगता आपल्या नेहमीच्या व्यवहारात कोव्हिड अनुरुप वर्तनाचा अंगीकार करावा. नागरिकांनी आपले लसीकरण पूर्ण करावे. मागील महिनाभरात जे प्रवासी आंतरराष्ट्रीय प्रवास करुन भारतात आले आहेत, त्यांनीही आपल्याबाबत स्थानिक आरोग्य विभागास अवगत करावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने सर्व जनतेला करण्यात आले आहे.

गुजरातमध्ये ओमिक्रॉनचा एक रुग्ण आढळला आहे. गुजरातमधील हा ओमिक्रॉनचा पहिलाच रुग्ण आढळला असून हा रुग्ण झिम्बांब्वेमधून परतला आहे. या रुग्णाची चाचणी करुन त्याचे नमुने पुण्याला पाठवण्यात आले आहेत. गुजरातचे आरोग्यमंत्री मनोज अग्रवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार ओमिक्रॉनची लागण झालेल्या रुग्णाला अलगीकरण कक्षात ठेवण्यात आले असून तो ज्या भागात राहतो तिथं कंटेन्मेंट झोन तयार करण्याचं काम सुरु आहे. जामनगर मधील या रुग्णांमुळे ओमिक्रॉनची भारतातील रुग्णांची संख्या तीनवर पोहोचली आहे. या आधी कर्नाटकातील बंगळुरुमध्ये ओमिक्रॉनचे दोन रुग्ण आढळळे होते. हे रुग्ण दक्षिण आफ्रिकेतून परतले होते.

महाराष्ट्रात विदेशातून आलेले ९ प्रवासी पॉझिटिव्ह निघाले आहेत. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत परदेशातून आलेले २५ प्रवासी कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार या प्रवाशांच्या संपर्कात असलेल्या ३ लोकांना कोरोनाची लागण झाली आहे. कोरोना पॉझिटिव्ह प्रवाशांना कोरोनाच्या कोणत्या व्हेरियंटचा संसर्ग झालाय हे शोधण्यासाठी जिनोम सिक्वेंसिंग करण्यात येणार आहे. यातील १२ नमुने पुण्याच्या रुग्णालयामध्ये तर १६ नमुने मुंबईच्या रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

मुंबई महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमाटे सांगतात '' २ डिसेंबरला एअरपोर्ट ४८५ लोकांची चाचणी करण्यात आली. यात ९ प्रवाशी कोरोना पॉझिटिव्ह असल्याचं आढळून आलं'' महाराष्ट्र सरकारने परदेशातून आलेल्या प्रवाशांची कोरोना तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. १ डिसेंबरपासून मुंबईत आलेल्या प्रवाशांची तपासणी सुरु करण्यात आली आहे. या तपासणीत आतापर्यंत ९ प्रवासी पॉझिटिव्ह सापडले आहेत. यातील एक प्रवासी दक्षिण आफ्रिका तर तीन प्रवासी लंडनवरुन आले होते.

या प्रवाशांना कोणत्याही प्रकारची लक्षणे आढळून आली नाहीत अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. म्हणून वारंवार हात साबणाने स्वच्छ धुवून घेणे आणि आपापले लसीकरण पूर्ण करुन घेणे. मास्कचा वारंवार उपयोग करणे. खोकताना किंवा शिंकताना नेहमी हात व रुमालाचा वापर करणे. नेहमी २ मीटरचे अंतर ठेवणे. या सर्व गोष्टींचे पालन केल्यास आपण कोरोनापासून दूर राहू शकतो.

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग-२



कु. पुनम पाटील
बी. कॉम. भाग-३

– चिंतनपर लेख –

जगाला युध्द नको... बुध्द हवा...!

कु. पूजा बदलापूरे
बी.कॉम. भाग – २

युध्द याचा अर्थ लढाई, वॉर, संग्राम, पण यातून काही चांगले निष्पन्न होणारच नसेल तर खटाटोप कशाला ? युध्द हा शब्द इतका भयानक, विनाशक, प्रलंयकारी व ज्वालाग्रही आहे की, त्याच्या उच्चारानेच अनेकांचे धाबे दणाणते. युध्द करणारा मनुष्य हा अत्यंत क्रोधी, रागीट, तापट अर्थातच दानवी प्रवृत्तीचा लोभी, अहंकारी आणि गर्विष्ठ स्वभावाचा असतो. त्याच्या एका शुल्लक व फालतू चूकीमुळे लाखो, करोडो, लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाल्यावाचून राहत नाही. त्यांच्या स्वार्थामुळे नाहक इतरांचे जीवन नष्ट होते. युध्द हे ज्वालाग्रही फॉस्फरसप्रमाणे असते. जसे हा ज्वालाग्रही फॉस्फरस आपल्या शेजारील वस्तू नष्ट करतो, जाळून उद्ध्वस्त करतो. त्याप्रमाणे एखाद्याच्या चुकीमुळे इतरांना त्याचे विनाशकारी परिणाम भोगावे लागतात.

युध्दामुळे कोणाचेच भले झाले नाही व होणारही नाही. याची अनेक उदाहरणे पौराणिक काळापासून आपल्या ऐकीवात आहेत. असे रामायणात दुष्ट, दानवी, स्वार्थी, लोभी, अहंकारी रावणाने सीतेचे अपहरण केले व युध्दाला प्रारंभ केला व शेवटी लयास गेला. त्याचप्रमाणे महाभारतातील कौरव अहंकार व गर्वाने मदमस्त झाले व स्वार्थी भावनेतून त्यांनी युध्द पुकारले व त्यामुळे सारा कुरुवंश नष्ट पावला. युध्द पुकारलेल्या मनुष्याची स्थिती शेवटी तेल ही गेले, तुप ही गेले आणि हाती धुपाटणे आले अशी बिकट व दयनीय होते. या युध्दाने कोणालाच काही हस्तगत होत नाही. हे सर्व जाणून देखील आजकाल सर्वांनाच युध्दाचे डोहाळे लागल्यासारखे वाटते. युध्द म्हणजे काही लुटूपुटूची लढाई नव्हे. युध्द म्हणजे सर्वनाश, परमेश्वराने दिलेली सुंदर देणगी असलेलं जीवन नष्ट करणारा शाप होय.

युध्दाने जीवित व वित्तहानी तर होतेच पण परमेश्वरांने बनवलेली सुंदर सृष्टी विनाश पावते पण कलियुगात तर जीवनापेक्षाही अर्थ आणि प्रतिष्ठा यालाच महत्व प्राप्त झाले आहे. आजकाल चूक एकाने करणे व परिणाम दुसऱ्याने भोगणे हे निश्चित होऊन गेले आहे. त्यामुळे कोण तो ओसामा बिन लादेन या एकट्या माणसाने अमेरिकेचे धाबे दणाणून सोडले होते पण ते त्याचे त्या काळापुरते धाडस ठरले.

युध्दात निष्पाप व बिचारी जनता उगाचाच अहंकारी, गर्विष्ठ, स्वार्थी माणसाच्या यज्ञकुंडात होरपळली जात आहे. आपल्या हव्यासापोटी माणूस मागे-पुढे पाहत नाही. या सर्वाला जबाबदार कोण असेल तर पाशवी, दानवी माणूसच हे सर्व पाहिल्यावर असे वाटते की,आता मनुष्य आणि प्राणी यात फरक तो कोणाता उरलाय ? परंतु परमेश्वरांने मनुष्याला विचार करण्याची शक्ती प्रदान केली आहे. पण तो त्याचा योग्य वापर करीत नाही. त्यामुळेच हे अरिष्ट आता ओढवलंय व त्याच्या या बेअकली वागण्याचे परिणाम सर्व जगाला भोगावे लागणार आहेत.

भारत हा शांतीप्रिय देश आहे. परंतु पाकिस्तानातील अतिरेकी ही शांती भंग करण्याचा प्रयत्न करीत आहेत. उदाहरण घ्यायचेच झाले तर भारताच्या समोर सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो काश्मीरचा. काश्मीरमध्ये आजकाल अतिरेकी घुसून भारतीयांना मृत्यूमुखी पाडत आहेत. तसेच अतिरेक्यांनी मुंबईत बॉम्बस्फोट घडवला, सूर्यमंदिरात गोळीबार केला. अशा अनेक घटना घडत आहेत. हे पाशवी कृत्य करणाऱ्यांना समजवायला आपल्याला फारच थोडा काळ लागेल, पण त्यातून आपल्याच बांधवाची हानी होणार याची जाणीव भारतीयांना आहे.

म्हणून हे सर्व पाहून म्हणावेसे वाटते की, जगाला युध्द नको बुध्द हवा... कारण युध्द हे आयुष्याची होळी करते व बुध्द हा आयुष्याचे सोने करतो. बुध्दांचे पंचशील म्हणजे सत्य, अंहिसा, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचार्य व्रत पालन यांचा उपदेश व्यक्तीला बरेच काही शिकवतो. या उपदेशाचे मनुष्याने जर पालन केले तर मनुष्य सुखी, समृध्द व प्रज्ञावंत होऊ शकतो. बुध्दांचा मार्ग हा भक्तीकडे नेणारा, चिरशांतीची प्राप्ती करुन देणारा व जीवन कृतार्थ करणारा आहे. त्यांच्या पंचशीलाचे पालन केल्याने मनुष्याचे जीवन सार्थ होते व त्याला सद्गती प्राप्त होते.

हिंसा होत नाही व निष्पाप लोकांचा प्राणही जात नाही. तसेच अस्तेय व अपरिग्रह म्हणजे दुसऱ्याचे काहीही न घेणे. याचा अर्थ त्यागमय जीवन व्यतीत करणे, हाव नसणे, कारण दुसऱ्याचे हिसकावले तर त्यातून क्रोध जागृत होतो. परंतु जर अस्तेय व अपरिग्रह तत्त्वाचे पालन केले तर जीवन सुखी व शांतीपूर्व बनते. ब्रह्मचर्याचे पालन केल्याने व्यक्ती शक्तीशाली व सामर्थ्यावान होते. त्याच्या हातून कोणतेही पाप घडत नाही. व तो जीवनात आपल्या कर्तृत्वाने यशाच्या शिखरावर सहज पोहोचतो व त्याचा सर्वांगिण विकास होतो. बुध्द जगाला पंचशीलाचे महत्व समजावून गेले. पण आज माणूस हे सर्व विसला आहे व मदमस्त हत्तीप्रमाणे स्वैरवर्तन करीत आहे. त्याला योग्य मार्ग दाखविण्यासाठी म्हणावे लागले की, " जगाला युध्द नको... बुध्द हवा.. "

– माहितीपर लेख –

अवयवदान

कु. लक्ष्मी यन्नम
बी. ए. भाग-२

Yes I donate Organ Donation

मृत्युला रोखण्याची ताकद तुमच्या श्रेष्ठ दानात आहे. माणूस विज्ञानाच्या सहाय्याने पक्षांप्रमाणे आकाशात उडायला शिकला आणि विज्ञानाच्या सहाय्याने माशांप्रमाणे पोहायला शिकला. पण माणूस म्हणून वागायला शिकला नाही याचीच मला खंत वाटते. कारण आपण आज २१ व्या शतकात राहतो जग एवढे पुढे गेले असून अजूनही आपल्या मनात अवयवदानाविषयी शंका, अंधश्रध्दा आहेत पण लक्षात ठेवा आपले अवयवदान ठरु शकते दुसऱ्याच्या आयुष्यातील एक आशेचा किरण...

आपल्या स्वार्थासाठी सगळेच विचार करतात पण दुसऱ्यासाठी जो विचार करतो त्यालाच खरा माणूस म्हणतात.

दरवर्षी सुमारे दीड लाख जणांना किडनीची गरज भासते परंतु फक्त पाच हजार जणांनाच किडनी मिळते. मृत्यू पश्चात आपले शरीर हे मातीतच जाणार आहे. जर आपल्याला अवयवरुपी जिवंत राहयचे असेल तर आपण सर्वांनी अवयवदान करायला हवे. मृत्युनंतर एक देह सात जणांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरु शकतो तर पस्तीस जणांच्या आयुष्यांचा दर्जा सुधारु शकतो. मात्र आपल्या समाजात अवयवदानाविषयी फारशी जागृती नाही आजे कित्येक रुग्ण अवयवदानामुळे होणाऱ्या प्रत्यारोपणांच्या प्रतिक्षेत आहेत. अवयवदान हे केवळ डोळे किंवा किडनी पुरते मर्यादित नसून शरीराचे सुमारे दहा अवयव आपण दान करु शकतो.

भारतात जवळ-जवळ १.२५ करोड लोक दृष्टीहीन आहेत पण ३० लाख व्यक्तींना प्रत्यारोपणद्वारा पण हे सुंदर जग बघता येत नाही.

१) अवयवदानाचे प्रकार :- लाईव्हडोनेशन :- एखादी व्यक्ती जिवंतपणी आपल्या नातेवाईकांसाठी आणि मित्रपरिवारांसाठी अवयवदान करु शकते. उदा. आई-वडील , मुलगा, बहीण, भाऊ मित्र.

जिवंतपणी दुसऱ्यासाठी अवयवदान करायचे असेल तर महाराष्ट्र शासनाची मदत घ्यावी लागते.

२) एखादा रुग्ण ब्रेन डेड म्हणून घोषित केल्यानंतर त्यांचे अवयव इतर रुग्णांमध्ये प्रत्योरोपित केले जातात. याला कॅडव्हर ट्रान्सप्लांट म्हणतात. मुत्र, यकृत, हृदयक्रिया बंद पडली तर नंतर त्वचा दान करु शकता येते. मात्र ब्रेनडेड रुग्णामध्ये हृदयक्रिया चालू असल्याने मुत्रपिंड, फुफ्फसे, यकृत, स्वादुपिंड, हृदय आतडी यासारख्या अवयवाबरोबर नंतर त्वचा, हृदयाची झडप, कानाचे ड्रम याचे देखील दान होऊ शकते.

प्रत्यक्षात ८० लाख मधून फक्त १५ हजार लोकांना अवयवदान करतात.

किती तासात अवयवदान प्रत्यारोपण आवश्यक आहे. डोळे - ६ महिने, फुफ्फुसे - ६ तास, त्वचा - ६ तास, किडणी - ६ तासाच्या, मेंदु - १० मिनिटांच्यानतंर, हृदय त्याच क्षणाला. किमान ३ वर्षे किंवा त्याहून अधिक वयांची व्यक्ती ही अवयवदान करु शकते. जी व्यक्ती ब्रेन डेड झाली आहे, त्या रुग्णांच्या नातेवाईकांनी जर परवानगी दिली तर याचे ही अवयवदान होऊ शकते. ज्या व्यक्तीचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाला आहे. त्या व्यक्तीचे अवयवदान होऊ शकते. आपल्या उभ्या आयुष्यात जिकंलेली मने, मिळवेलं प्रेम अमर राहण्यासाठी आपण अवयवदान करायला हवं.

''नेत्रदान से बडा कोई दान नहीं
जिसमें जीव निर्जीव होकर भी
दुसरों के काम आता हैं।''

अपघात झाल्यास, जळून वा पाण्यात बुडून मृत्यू झाल्यास, कर्करोग, एडस् असल्यास चाचणीमध्ये नाकारल्यास ही व्यक्ती अवयवदान करु शकत नाही.

अवयवदान हे एक जीवदान।

अवयवदानासाठी काही महत्वाच्या चाचण्या

१) रक्तगट तपासणी :- मानवी रक्ताचे ए. बी. एबी, ओ असे ४ रक्तगट असतात. रक्तगट चाचणीतून अवयव प्रत्यारोपणसंबंधी होणारे भविष्यातील धोके वेळीच अभ्यासण्यास मदत होते. २) करॉसमॅच :- संसर्गापासून वाचण्यासाठी शरीरातील काही ॲन्टीबॉडीज् तयार केल्या जातात. जर तुमच्या शरीरात किडनीच्या दात्याच्या विरुध्द ॲंटीबॉडीज् असतील तर प्रत्यारोपणानंतर किडनीवर परिणाम होऊ शकतो. ३) ह्युमन लयकोसाईड ॲन्टीजन्स् (एचएलए) याद्वारे टिशूंची चाचणी केली जाते. ४) सेरालॉजी :- एडस्, हेपटायटीस यासारख्या आजाराचे निदान केले जाते. अशा आजारात व्यक्ती अवयवदान करु शकत नाही.

organ donatiuon is the best donation blood donate, donate life.

अवयवदानाविषयी काही उपाय योजना

१) रॅली २) पथनाट्य ३) स्लाईड शो ४) पीपीटी प्रेझेंटेशन ५) वृत्तपत्र ६) सोशल मिडीया ७) फिल्म ९) नाटक (ड्रामा) १०) पोस्टर प्रेझेंटेशन ११) व्याख्यान १२) निंबध स्पर्धा १३) वक्तृत्व स्पर्धा

आपण सर्वांनी अवयवदानाविषयीचे गैरसमज दूर करुन एक पाऊल पुढे यायला हवे कदाचित मृत्यूपश्चात आपण ही काहींचे आयुष्य सुंदर करण्यास सहाय्य करु शकतो.

काही घोषवाक्य

१) नेत्रदान एक महान दान २) अवयवदान हे एक जीवनदान ३) save blood save we life ४) अवयवदान एक श्रेष्ठ दान ५) रक्तदान हेच जीवनदान ६) जाने से पहले किसी को देना हैं, जीवनदान तो करो रक्तदान ७) नेत्रदान करा दुनिया परत पहा. ८) दुसऱ्यांचा विचार करणे ही माणसांची क्वालिटी आहे ही क्वालिटी शोधण्याचा प्रयत्न आपण करायाला हवा. ९) जिंदगी न मिलेगी दोबारा.

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग-२

• चारोळी •

जीवनात सगळंच मिळत नाही
म्हणून प्रयत्न सोडायचा नसतो.
कुठल्यातरी वळणावर
आपली वाट पाहणारा असतो.

सरता सरता आयुष्य माझं
मी कधी माझा झालोच नाही
दुःख सोसले अफाट मी पण
सुखाचा साथी-कधी झालोच नाही.

जीवन कसे पक्ष्यासारखे असावे,
कुठे ही उडावे आणि कसे ही जगावे
आणि मरताना देखील कधी कुणावर
आपले ओझे न देता जावे.

जीवन कसे पक्ष्यासारखे असावे,
कुठे ही उडावे आणि कसे ही जगावे
आणि मरताना देखील कधी कुणावर
आपले ओझे न देता जावे.

छोट्याशा या आयुष्यामध्ये
खूप काही हवं असतं
असंख्य चांदण्या भरुन सुध्दा
आपलं आभाळ रिकामं असतं...

जीवन एक रहस्य आहे,
इथे सगळे लपवायचे असते
मनात कितीही दुःख असले तरी
दुसऱ्या पुढे हसायचे असते....

अनेक चेहरे
बदलताना पाहिले
आईला मात्र प्रत्येकवेळी
प्रेम करतानाच पाहिले

मनातील स्वप्ने
खूप मोठी असावी
ती पूर्ण न करण्यासाठी
कारणे मात्र कोणतीच नसावी.

जो पर्यंत तुम्ही एखाद्या क्षेत्रात
रिस्क घेत नाही,
तो पर्यंत तुम्ही परफेक्ट
होऊ शकत नाही.

कु. दिपाली विटकर
बी. ए. भाग - २

* सुविचार *

१) हरलो तरी चालेल परंतु मैदान
गाजवता आले पाहिजे

२) आयुष्य जर तुम्हाला मागे खेचत असेल तर
तुम्ही नक्कीच खूप पुढे जाणार आहात . .. कारण
धनुष्याचा बाण लांब जाण्यासाठी मागेच खेचावे लागते.

कु. दिपाली विटकर
बी. ए. भाग - २

– आत्मकथनात्मक लेख –

सराव थांबला.... साक्षात्कार हुकला....

कु. पौर्णिमा थोरात
एम. कॉम. भाग-१

आजुबाजूच्या घटना निराश करत असताना यश हुल देऊन दूर जात असताना कष्टाने रचलेले इमले डोळ्यादेखत जमीनदोस्त होत असतानादेखील ज्याच्या वागण्यातून सकारात्मकता झळकते त्याला लोक आज वेडा, स्वप्नाळू म्हणतात, पण उद्या त्याचेच एक यशस्वी व्यक्ती म्हणून उदाहरण देतात.

सकारात्मक बुध्दीची व्यक्ती एखाद्या घटनेला फक्त आपल्या भुमिकेपुरते, कर्तव्यापुरते महत्त्व देते, तिची बाजू घेत नाही. कारण प्रक्षेपित वस्तुस्थिती (प्रोजेक्टेड फॅक्ट) आणि सत्य(Truth) यातला फरक तिला माहित असतो. स्वतःच्या अनुभवातून आकलनशक्तीमधून एखाद्या निरीक्षणातून किंवा तीव्र जाणिवेतून तो फरक त्याला कळलेला असतो. पडद्यावरची हलती चित्रे बहुरंगी, बहुढंगी असतात, पण त्याचा स्त्रोत एकच प्रकाश असतो तो सतत लक्षात ठेवतो. खेळ सुरु असताना त्याच्या मनात उठणारे विविध भाव पाण्यात फुटतात, कारण आतील प्रकाशमय वातावरणाचा दाब त्यांना सहन होत नाही.

परिस्थितीने पाय तोडले तरी सरपटत, सरकत पुढे जाणारा तो, त्याचे हे पुढे जाणे म्हणजे इतरांसाठी आश्चर्य पण त्याच्यासाठी वैचारिक सरावाने निर्माण केलेली एक कष्टविरहित सवय असते. ध्येयाच्या अगदी जवळ असताना नशिबाचा साप डसून जरी तो पहिल्या पायरीवर आला तरी त्याला त्याची हीच सवय तारुन नेते. त्याला ठाम विश्वास असतो की कुठल्याही जखमेवरचे औषध आणि तो कुठल्याही रोगावरची लस केवळ एकच ' मनोबल'.

खरंच हेच तर पुस्तकात लिहिलंय, पुर्वजांनी सांगितलं संत, महात्म्यांनी अनुभवलंय आणि इतिहासाने सिध्द देखील केलयं पुर्वानुभवातून आपल्याला देखील याचा साक्षात्कार झालेलाच असतो पण जेव्हा प्रक्षेपित वस्तुस्थिती फणा काढून वर येते तेव्हां भीतीने आपल्याला या ज्ञानाचा विसर पडतो करणार तर काय ? दिवसागणिक चोवीस तास जर काय होत आहे हेच मनावर बिंबवलं जात असेल तर 'काम करु शकतो.' याचा विसर पडणारच .हो ना ?

आपण त्या देशाचे नागरिक आहोत जिथे ज्ञान, विज्ञान आणि आत्मज्ञानाचा अविष्कार झाला. इथल्या ज्ञानावर पुस्तकं लिहून देशविदेशातील लेखक मोठे झाले आणि ती वाचून जगात अनेक महान आणि मोठ्या व्यक्ती घडल्या.

आपण ज्या गोष्टीकडे जास्त लक्ष देतो जिचा पाठपुरावा करतो ती मोठी होत जाते. फक्त कार्य म्हणजे कर्म नव्हे तर विचार देखील कर्म आहे. 'प्रत्येक कर्म बीज आहे'. जसे बीज तशी फळे ही खरंतर भारत देशाची मुळ शिकवण ती आम्हा भारतीयांच्या वागण्या, बोलण्यात, व्यवहारात, सहज रुजायला हवी, दिसायला हवी ' यथा शिक्षक तथा विद्यार्थी ' मग भारत तर विश्वाचा शिक्षक आहे तो कसा असयाला हवा ? देश नागरिकांनी बनतो मग ते कसे असायला हवेत ?

इथले प्रत्येक घटक, संख्या, माध्यमे, व्यापार व्यवहार कसा असायला हवा ? असे म्हणतात की कुठलीही सत्ता, साधन-संपत्ती असलेल्या एका भारतीय साधुला जगज्जेता साम्राज्यावादी सिकंदराचे भय नव्हते. सिकंदरने जग जिंकले पण त्या साधुने सिकंदरला त्यांच्याशी बोलताना साधुच्या डोळ्यात भीतीचा लवलेश देखील नव्हता. त्या साधुच्या ज्ञानाने, विवेकाने त्या परप्रांतीय घुसखोर सिकंदराच्या अहंकारावर मात केली.

या काळात मनुष्य मुल्यांच्या आधारावर कमी तर भीती प्रसिध्दीचे,प्रसाराचे, प्रचाराचे आणि मुख्यतः व्यापाराचे माध्यम व्हावे ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. हे मानवी मुल्यांचे सर्वात मोठे अपयश आहे.

सावली गळे पायात सूर्यबिंब पडता माथी
ज्ञानाचा अभावच भीती। भीतीचा ऱ्हासच मुक्ती।

हे आत्मज्ञानी तत्त्वज्ञान आपल्याला कठीणतम परिस्थितीत तारून नेऊ शकते. फक्त आवश्यकता आहे ती निःस्वार्थ, निर्मळ, निःशंक सरावाची

सराव थांबला ... साक्षात्कार हुकला ... !

कु. स्वाती बसुदे
बी. कॉम. भाग-२

– वैचारिक लेख –

शेतकऱ्यांनो, स्वतःची ताकद ओळखा!

कु. पौर्णिमा थोरात
एम. कॉम. भाग-१

नमस्कार शेतकरी मित्रांनो!

साधारणपणे पाच – सहा हजार वर्षांपूर्वी निवृत्ती नावाच्या माऊलीने आपल्या भगिनीच्या साहाय्याने शाश्वत शेतीचा शोध लावला. मातृसत्ताकाच्या मायेने भारतीय शेती फोफावली. पहिला लोकप्रिय ज्ञात शेतकरी राजा होता. बळी राजा आणि त्यांच्या पुर्वजांनी व वारसदारांनी भारतीय संस्कृती घडवली – समृध्द केली. भारतभर जो मायेचा ओलावा आजही सर्वत्र दिसतो तो तुम्हा शेतकऱ्यांमुळे व तुम्ही सांभाळलेल्या निसर्ग – निगडीत संस्कृतीमुळे. काळाच्या ओघात (जना बळीराजा गंडावला गेला) शेतकरी नावाच्या वृक्षावर बांडगुळे चढली नि तोच वृक्ष म्हणून मिरवु लागली. झाडांचा रस ही बांडगुळे आजही कृतघ्नपणे शोषीत राहतात पण भावडया, आडमुठ्या विभक्त झालेल्या झाडांना बांडगुळाची करामत कळतच नाही. कळली तरी काही वळत नाही! उदाहरणच घ्या ना – तुम्ही द्राक्षे पिकवताना नि तीस – चाळीस रुपये किलोने ठोक विकता. मुंबईत ग्राहकाला ती सव्वाशे रुपयात मिळतात. तुम्ही पिकवलेल्या भाजीपाल्याची एका प्लेटची किंमत (शिजवल्यावर) फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये चारशे – पाचशे रुपये होते. म्हणजे हे असं झालं – आदिवासींच नृत्य परदेशी पाहुण्यांना दाखवून हजारो रुपये कमवायचे आणि आदिवासींच्या हातावर पाच – पन्नास चवण्ण्या टेकवायच्या किंवा छोट्या शहरातील चित्रकाराचं चित्र पाच – दहा हजार रुपयांत विकत घ्यायचं नि ते दिल्ली – न्युयॉर्क शहरातील दालनात दहा – पंधरा लाखांना विकायचं. शेतकरी मित्रांनो, बांडगुळ कळतायत ना तुम्हाला? मार्केट तुम्हाला कळत नाही आणि कळलं तरी वळत नाही.

तुमच्यातील किती जणांना प्रा. स्वामिनाथन साहेबांच किमान हमी भावाचे फॉर्मुले नीटपणे माहीत आहेत? त्यातील त्रुटी माहीत आहेत? तालुक्याला जाऊन बी.ए. – बी.काम सारख्या वांझोट्या पदव्या घेतलेल्या तुमच्या किती मुलांनी शास्त्रशुध्दपणे या फॉर्मुल्यांचा अभ्यास केलाय? सरकारला रस्ते– बांधणीसाठी अथवा एखाद्या मोठ्या कंपनीला तिच्या अवाढव्य प्रकल्पासाठी आपली जमीन विकताना योग्य मुल्य ठरविणे व दुरगामी फायदे मिळविण्यासाठीचा करार करणे, याचा व्यावसायिक पध्दतीने अभ्यास केलाय तुमच्यातील बहुतेकांनी? हां, हे करणे अवघड जाते कारण तुम्ही तुमची ताकदच ओळखत नाही. मराठा – कुणबी – ओबीसी – मागासवर्गीय – आदिवासी – मुस्लिम अशा कित्येक प्रकारांनी तुम्ही दुभंगलेले आहात. ज्यांना शेती कळते त्या बहुतेक नेत्यांनी वरवरच्या मलमपट्ट्या केल्या नि ज्यांचा शेतीचा व्यासंग नाही त्यांनी शेतीबद्दलचे नियम बनवले. शेतकऱ्यांची सामुहिक ताकद फक्त राजकारणासाठी वापरली गेली आणि एकटा शेतकरी अजुनही अंधारातच चाचपडतो आहे. सरकारी कर्मचारी सहाव्या – सातव्या आयोगाच्या शिफारसीनुसार मासिक लाखभर पगार मिळवू शकतो. छोट्या शेतकऱ्याला प्रचंड कष्ट करुन व अनिश्चितता झेलुनही एवढे पैसे वर्षाकाठी नीट सुटत नाहीत. बाकी निवृत्तीचे बक्कळ फायदे सरकारी कर्मचाऱ्यांना वेगळे मिळतातच. खासगी क्षेत्रातील संघटित कर्मचारी सुध्दा आज चांगले वेतन कमावतात. ही सगळी मंडळी एकत्र असतात, हट्टी आणि जागरुक असतात, व्यवहारी असतात. फायदे उपटताना हे लोक जात – धर्म – भाषा – प्रांत बाजुला ठेवतात.

यांच्या तुलनेत तुम्ही शेतकरी काम करता? भाऊबंदकी, जातीय अहंकार, अंधश्रध्दा, लग्नसोहळा यांचा खर्च, फालतु डिग्र्या, शहरी दिखाऊ चकमकाटाचा अवास्तव ओढा, शेतीच्या अर्थकारणाकडे दुर्लक्ष, राजकीय पुढाऱ्यांवर वारेमाप अवलंबून राहणे, दुरगामी उपायांऐवजी मलमपट्ट्या वापरत राहणे, भूलथापांना बळी पडणे इत्यादी गोष्टीत सारं आयुष्य संपून जातं. झाडाच्या फुल – पान – फळांवर उपाय करुन मुळांमधील विष जात नाही. अनुदाने, मनरेगा इत्यादी गोष्टी या गंभीर रोग्याला सलाईन सारख्या असतात. ज्यांना तब्येतीला बलदंड बनविण्यासाठी प्रत्येक स्नायुंवर काम करावं लागतं हे करताना सर्व स्नायुंचा एक संपूर्ण शरीर म्हणुनही विचार करावा लागतो. शेती आणि शेतकरी हे पुनः पुन्हा संकटात सापडत राहतात कारण शरीर बलदंड होत नाही व होऊ ही दिलं जात नाही. तुमचं असं झालंय की, नदीच्या पात्रात तुम्ही उभे आहात,तुम्हाला बुडूही दिलं जात नाही आणि बाहेरही येऊ दिलं जात नाही.

तुमच्यापैकी बहुतेक जण पंढरीच्या विठ्ठलाला भजता. तुमच्या या अस्सल भक्तीला माझा सलाम! परंतु मग हा विठ्ठल म्हणजे कृष्ण तुम्ही नीट जाणलाच नाहीत. त्याने गोकुळातील गोप्यांना सांगितलं होतं, कंसाला दही – दूध नाही पाठवायचं. पावसासाठी इंद्राची पुजा नाही करायची. जातपात नाही पाळायची. स्त्रियांचा नेहमीच आदर करायचा. अंधश्रध्दांना नाकारायचं. निसर्गाशी एकरुप व्हायचं. उत्तम शेती करायची अन्याय अजिबात सहन नाही करायचा. एकीचं बळ वापरायचं इत्यादी. कृष्णाची पहिली पत्नी रुक्मिणी ही क्षत्रिय होती. दुसरी पत्नी सत्यभामा ही वैश्य (वाणी) होती. तिसरी पत्नी जांबवंती ही

आदिवासी होती. कृष्णाने जातिव्यवस्था पूर्णपणे नाकारली होती. त्याचा शेतकरी असलेला यादव समाज हा संपन्न व शक्तिशाली होता. विठ्ठलाला भजायचं म्हणजे हुशार आणि चतुर कृष्णाला आठवायचं नि आपणही कृष्ण बनायचं. तुमच्यापैकी अनेक जण वारकरी आहात अरे, ढोंगावर आणि अन्यायावर वार करणारा! वारकऱ्यांच सोंग घेऊन तुमच्यात शिरलेल्या बोगस बाबा - बुवा - बापु - आचार्यांना ओळखा. दुफळी माजवणारी आणि अंधश्रध्दा पसरवणारी त्यांची भाषणे तपासा. मुळांना वेढणाऱ्या - नासवणाऱ्या विषाला काढून फेकून द्या.

कोरोनाच्या संपूर्ण कालखंडात तुमच्या शेतीमुळे भारताचा जीडीपी (ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न) तगला. बाकी सगळं कोसळू शकतं - नष्ट होऊ शकतं. शेती नष्ट होत नाही. हां ती दुर्बळ होऊ शकते - झाली आहे. कारण तुम्ही तुमची ताकद विसरता आहात. एकुलती एक काठी मोडली जाऊ शकते. काठ्यांची मोळी मोडता येत नाही. आता हे एखादं शेबडं पोरं सुध्दा सांगू शकेल. पाच पांडव एका वज्र मुठीसारखे एकत्र होते म्हणून तगले- जिंकले. तुम्हालाही हे सारं कळतं पण वळत नाही. तुम्ही पंढरीच्या वारीत सारे भेदाभेद विसरता पण गावी गेलात की येरे माझ्या मागल्या असं का होत असावं. याचा एकत्रितपणे - शांतपणे विचार केलाय? तुकोबा - ज्ञानोबांची आठवण बसता उठता काढता परंतु त्यांच्या एकीच्या विचारावर अंमल करत नाही.

तुमच्या आडमुठपणामुळे तुम्ही एकत्र येत नाही आहात. मग काय होतं? एक सामान्य सरकारी कर्मचारी तुम्हाला हिडीसपिडीस करु शकतो. बाजार समितीत तुम्ही विविध प्रकारे फसवले जाता. तिथला मोठा व्यापारी किराणावाल्यांना तुमचा माल विकतो आणि बक्कळ कमाई करतो. बाजार समितीच्या बाहेर तुम्ही आज धान्य विकू शकता परंतु कितीजणांना हे किफायतशीरपणे जमलंय? नदीचं पुरेसं पाणी तुमच्या वाट्याला येत नाही. दुधाची आणि उसाची किंमत चांगली भेटत नाही. आयात - निर्यातीवर तुमचं नियंत्रण नाही. भलभलती कीटकनाशके, महागडी बियाणे, रासायनिक खते इत्यादी गोष्टींनी शेतीचा आणि कमाईचा विचका करुन टाकलाय. मुलांना चांगलं उपयोगी शिक्षण नाही, आई - वडिलांना चांगला औषधोपचार नाही, बचत नाही, सण - उत्सवांचा आनंद नाही! - हे असं का तर पैसे नाहीत. पैसे का नाहीत कारण बाजारावर, कर्जाच्या अटींवर, पाण्याच्या वाटणीवर, बियाण्यावर तुमचं नियंत्रण नाही. नियंत्रण का नाही कारण एकी नाही. शेतकरी बांधवांनो पैशाला पर्याय नाही. शेतकऱ्यांची चेष्टामस्करी आणि अपमान करणारे कपटी लोक भारतात हजारो वर्षांपासून तुमच्यावरच अवलंबून राहिले आहेत. त्यांना हा माज कुठुन येतोय? - पैशातूनच येतो. यातले बरेच धनदांडगे बँकांची अब्जावधी रुपयांची कर्जे बुडवतात, इन्कम टॅक्स बुडवतात, अनुदाने खोट्या प्रकारे खातात आणि व्हॉट्सॲपवर (Whatsapp) देशभक्तीचे नारे लावतात. हेच लोक आणि यांचे चेले तुम्हाला योग्य बाजारभाव मिळू नये म्हणून विविध प्रकारचे अडथळे आणतात. शेतकऱ्यांनो, देशभक्त होण्याचा - असण्याचा पहिला मान तुमचा आणि कष्टकऱ्यांचा आहे!

मोठ्या कंपन्या, मोठे उद्योगपती विविध मार्गांनी कंत्राटी पध्दतीने तुमच्या शेतीवर नियंत्रण मिळवू शकतात. हे लोक लाखो भागधारकांना एकत्र आणून त्यांचं भांडवल वापरतात. कायद्यानेच यांच्या कंपन्यांची जोखीम मर्यादित असते. तुम्ही काय करताय? - आडमुठेपणा? - दुर्लक्ष? - भेदाभेद? - भाऊबंदकी? - वांझोट्या अंधश्रध्दा? - चुकीचे शेतकी निर्णय? - बंधुनों आणि भगिनींनो, तुम्हाला या दुष्टचक्रांतून बाहेर येण्याचा मार्ग आहे ना! शेतीची मालकी आपल्या ताब्यात ठेवून तीन टप्प्यांमधून तुम्ही बळकट - बळीराजे होऊ शकता. लक्षात ठेवा; आर्थिक संपन्नता - सामाजिक न्याय - सांस्कृतिक समृध्दी - शेतीसाठी वैज्ञानिक संशोधन इत्यादी सर्व गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत. आपण आर्थिक संपन्नतेचे तीन टप्पे समजावून घेऊयात. यासाठी एकी, स्वभावातील लवचिकता, अभ्यास, सामुदायिक कष्ट लागतील. महत्वाचं म्हणजे आधी आडमुठेपणा सोडून द्यायला हवा. इडापिडा टळो, बळीचं राज्य येवो असं नुसतं म्हणून ते येत नसतं. मित्रांनो, त्यासाठी एक मोठा विचार लागतो. एक मोठी सामुहिक योजना लागते आणि स्वतः वरचा विश्वास लागतो.

तुमच्याकडे पुरेसे पैसे आणि मुळांमधील ताकद आली की स्वार्थी - कपटी - शोषण करणारी बांडगुळे आपसुकच निघून जातील.



कु. पुनम पाटील
बी. कॉम. भाग-३

– माहितीपर लेख –

कु. अरुणा बंडी
बी. ए. भाग-३

प्रसिध्द साहित्यिक
वसंत कानेटकर

वसंत शंकर कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२२ ला महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील, भोरेगांव तालुक्यातील रहिमतपूर या गावी झाला. ते चार भावंडांपैकी दुसरे होते. प्रसिध्द कवी शंकर केशव कानेटकर हे त्यांचे वडील. ते 'गिरीश' या टोपणनावाने महाराष्ट्रात ओळखले जात. वसंतरावांच्या आई उमा शंकर कानेटकर ह्या बुधगांव संस्थानचे मुन्सफ गोविंद विनायक श्रीखंडे यांच्या कन्या होत. त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण पुणे व सांगली येथे झाले. इंग्रजी विषय घेऊन एम. ए. पदवी मिळविल्यानंतर नाशिक येथे हंसराज प्रागजी ठाकरसी महाविद्यालयात (एचपीटी) सुमारे २५ वर्षे त्यांनी अध्यापन केले.

कानेटकरांनी ४३ नाटके व ४ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची नाटके व्यावसायिकदृष्टया खूप यशस्वी झाली. कानेटकरांनी सुरुवातीला कथा कादंबरीपासूनच आपल्या लेखनाला सुरुवात केली. वयाच्या १८ व्या वर्षी 'जन्माचे गुलाम' ही त्यांची पहिली कथा प्रसिध्द झाली. त्यानंतर १९५० मध्ये 'घर' ही कादंबरी प्रकाशित झाली.त्यानंतर 'पंख', ' पोरका', ' तेथे चल राणी' अशा लिखित अनुवादित कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकृतीच्या लिखाणाने त्यांच्या कादंबरीने मराठी कादंबरीला एका वेगळ्या वळणावर नेण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांचा 'लावण्यमयी' हा कथासंग्रह ही खूपच गाजला. त्यानंतर त्यांनी नाट्यक्षेत्रात प्रवेश केला आणि ते त्या क्षेत्रात सर्वेसर्वा झाले. ३० वर्षांच्या काळात त्यांनी सुमारे चाळीस नाटकं आणि काही एकांकीका रंगभूमीच्या ओटीत घातल्या.

'वेड्याचं घर उन्हात' हे त्यांचे पहिले नाटक म्हणजे मनोविश्लेषणाचा एक नवीन प्रयोग होता. त्यानंतर ' देवांचं मनोराज्य', त्यांचे तिसरे नाटक 'प्रेमा तुझा रंग कसा?' ही एक हलकी फुलकी विनोदी, खेळकर सुखात्मिका होती. या नाटकास अभूतपूर्व व्यावसायिक यश मिळाले व आजही ते त्यांच्या सर्वात लोकप्रिय नाटकांपैकी एक म्हणून गणले जाते. त्यानंतर 'अश्रूंची झाली फुले', 'मला काही सांगायचंय', 'कस्तुरीमृग', ' वादळ माणसाळतयं'इत्यादी अनेक नाटके त्यांनी लिहिली आणि त्यांच्या नाटकांच्या व्यावसायिक यशाने संपूर्ण नाट्य व्यवसाय पुन्हाः बहरला. कलावैभव, नाट्यसंपदा, चंद्रलेखा अशा अनेक नाटक कंपन्यांना कानेटकरांच्या नाटकामुळे मोठ्या प्रमाणात यश मिळाले. अभिनेते श्रीराम लागू, काशिनाथ घाणेकर, वंदना गुप्ते असे अनेक कलाकार त्यांच्या नाटकांतून पुढे आले. भारतातील रंगभूमीच्या इतिहासातील महत्त्वाच्या, प्रतिभावंत आणि यशस्वी नाटककारांपैकी एक म्हणून त्यांची गणना होते. पारंपरिक मराठी नाट्यशैली समजल्या जाणाऱ्या ऐतिहासिक आणि संगीत नाटक अशा दोन शैली त्यांनी नव्या आधुनिक रुपात सादर करुन पुनरुज्जीवित केल्या.

कानेटकरांनी संगीत नाटकातदेखील क्रांती घडवून आणली. शेक्सपिअरच्या शोकांतिका, आधुनिक संवेदनशीलता आणि महाभारतातील पौराणिक कथा एकत्र करुन त्यांनी ' संगीत मत्स्यगंधा' हे नाटक लिहिले या नाटकात त्यांनी ' माय फेअर लेडी' नाटकाप्रमाणे पद्य आणि गद्य गीतांच्या मिश्रणाचा अनोखा प्रयोग यशस्वीरित्या केला. वसंत कानेटकर यांच्या कलाकृतींना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ' वेड्यांचे घर उन्हात' या त्यांच्या पहिल्या नाटकांने महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील बहुतांशी बक्षीसे जिंकली (१९५८) 'देवांचे मनोराज्य', प्रेमा, तुझा रंग कसा? आणि ' रायगडाला जेव्हां जाग येते' या नाटकाला 'बेस्ट इंडियन प्ले' पुरस्काराने सन्मानित केले. (१९६४) या पुरस्काराचा भाग म्हणून या नाटकाचे १४ भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले आणि आकाशवाणीच्या राष्ट्रीय कार्यक्रमातही सामील झाले.यामुळे अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वतःचे नाटक शिकवण्याचा मान कानेटकरांना मिळाला. १९७७ मध्ये त्यांना 'कस्तुरीमृग' या नाटकासाठी सर्वोत्कृष्ट नाटक व सर्वोत्कृष्ट नाटककार असे कलादर्पण पुरस्कार मिळाले. त्यांना संगीत नाटक अकादमीने सर्व भारतीय भाषांमधील सर्वोत्कृष्ट नाटकार म्हणून गौरविले आहे. (१९८४) त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र गौरव (१९९०) आणि भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (१९९२)

वसंत कानेटकरांचा सिंधुताई यांच्याशी विवाह झाला. या दांम्पत्यास चंद्रलेखा (कन्या) आणि प्रियदर्शन (पुत्र) ही दोन अपत्ये होतं. वसंत कानेटकर यांचे नाशिक येथे ३० जानेवारी २००१ रोजी निधन झाले.

– वैचारिक लेख –

महती स्त्रीची

कु. रावलिया चिटमिल
बी. कॉम. भाग-२

स्त्री ही या सृष्टीला भेटलेली एक अनमोल अशी भेट आहे की, ज्याचे मुल्य कधी कोणाला जाणवलेच नाही. पण या जगातील, समाजातील प्रत्येक जणांना जाणीव करुन देण्याचे प्रयत्न अनेकांनी केले आहेत, करत आहेत आणि करत राहणार. असे किती प्रयत्न केले तरी स्त्रीयांवर विविध ठिकाणी अनेक अत्याचार होतच आहेत. आणि ते अत्याचार सहन करीत आहेत. तर काहींनी त्या अत्याचारात प्राणही गमवले आहेत. म्हणून मी माझ्या या लेखनातून स्त्रियांचे महत्त्व सांगणार आहे.

स्त्री म्हणजे आई, मुलगी तर कुणाची पत्नी पण का हो! आपल्या देशात आपल्या आईवर, मुलीवर बहिणीवर अत्याचार होत आहेत. अरे स्त्री जर जन्माला आली नसती तर या सृष्टीची निर्मिती झालीच नसती हे कधी कळणार हो सर्वांना. स्त्रीचे महत्त्व कधी कळणार या जगाला कधी जाणून घेणार हे लोक आपण जर पाहिले तर प्रत्येक ठिकाणी स्त्रीचा अनाआदर करीत आहेत. काही ठराविक ठिकाणीच स्त्रियांचा आदर करतात. स्त्रियांना सन्मान देता त पण प्रत्येकजण या गोष्टी करीत नाहीत.

स्त्रीचे महत्त्व सांगताना मी अनेक उदाहरणे दिलेली आहेत. पण अजून माझ्या या लेखनात काही तरी कमी आहे. असे मला वाटते. कारण का? कारण स्त्रीयांच्या बाबतीत लोकांची विविध मते असतात आणि सगळ्यांची मते भिन्न असतात पण मला जसे वाटते की ९०% स्त्रिया एकसारख्याच असतात. त्यांच्या भावना एकसारख्या असतात. स्त्रिया कधी कोणाच्या भावनांना दुःखवत नाहीत. हेच महिलांच्या अंगी असणारी एक अत्यंत चांगली गोष्ट व गुण आहे. पण आजच्या २१ व्या शतकातसुध्दा स्त्रियांचे जीवन पुरुषांच्या अहंकाराच्या खाली दबून चालले आहे. तरी पण महिलांनी कधी त्यांच्या संयमांच्या सीमा पार केल्या नाहीत. स्त्रियांच्या संयमाला सीमाच नाहीत.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' असं जिच्याबद्दल म्हटलं जातं ती माझी आई, बहीण ज्यांचे स्मरण केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. झांशीची राणी, राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सर्व महान स्त्रिया आहेत. स्त्रियांवर अनादी काळापासून तर आजपर्यंत आतापर्यंत अत्याचार झाले आहेत. आणि होतच आहेत. आजसुध्दा स्त्रिया सुरक्षित नाहीत. आपल्या घरापासून ते अनेक ठिकाणी स्त्रियांवर अत्याचार होतच आहेत आणि पुरुषांच्या अहंकारांने तिला परंपरेच्या बेड्यामध्ये बंदिस्त केले आहे.

स्त्रीने सर्व क्षेत्रामध्ये भरारी मारली. पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांनी स्वतःची प्रगती केली. आज आपण पहिलं तर आपल्याला हे कळून येते की, प्रत्येक शाळेत पहिल्या दहामध्ये येणाऱ्या सर्व मुलीच असतात. त्यामुळे आधुनिक स्त्री २१ व्या युगातील स्त्री ही कुणापेक्षा ही कमी नाही हे इथे नमूद करावे असे वाटते.

रुढी-परंपरा यांचा पुरस्कार करण्याऱ्या समाजात स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले आहे. जसे हुंडा, सती, विधवांना मरण, यातना यात तिला जखडून टाकले आणि मग सुरु झाला स्त्री समानतेचा संघर्ष... समानतेच्या संघर्षात स्त्रीला मुक्त करण्यात आलं. ती घराबाहेर पडली. संविधानात स्त्री समानतेची तरतुद झाली. स्त्रियांना पन्नास टक्के आरक्षण मिळाले. स्त्रियां शिक्षण घ्यायला पुढे आल्या. त्यांनी आणि निवडणुका ही लढायाला सुरुवात केली. असे म्हणतात की घरातील एक स्त्री जर शिकलेली असेल तर घरातील प्रत्येक जणांना ती शिक्षणाचे महत्त्व सांगते. तरी पण काही लोक स्त्रियांना कमजोर समजतात. त्यांना असे वाटते स्त्रीया कमजोर असतात. हो खरचं आहे! त्या कमजोर कशासाठी असतात? त्यांच्या कुटुंबासाठी. ते पण शारीरिक कमजोरी नव्हे तर ती मनाची कमजोरी आहे त्यांची मनाची स्थिती कमजोर असेल ते पण फक्त आणि फक्त त्यांना कुटुंबाची काळजीच असते म्हणून.

स्त्री म्हटले तर मला सगळ्यात प्रथम आईची आठवण येते. कारण आई आपल्या मुलांसाठी खुप काही करत असते पण त्याची जाणीव त्यांच्या मुलांना दिसत नाही. कारण का आई नऊ महिने बाळाला तिच्या पोटात पाळते. जन्माला आल्यापासून मुले मोठी होईपर्यंत आईच त्यांची प्रत्येक गोष्टीबद्दल काळजी घेत असते. जसे आपल्या मुलाने काय खावे, कुठे जावे, कुठे जाऊ नये इ. सगळ्या गोष्टी फक्त आईलाच माहित असतात पण आज या २१ व्या युगात आईचा कोण सन्मान करतात? प्रत्येकजण त्यांच्याच मनमर्जी प्रमाणे वागत आहेत. आणि काही मुलं तर लग्नानंतर आई वडीलांना वृध्दाश्रमात पाठवतात तरी पण आई

आपल्या मुलांबद्दल बाईट विचार करीत नाही. ती फक्त आपला मुलाच्या सुखाचीच प्रार्थना करते. स्त्रियांबद्दल किती तरी सांगितलं तरी ते कमीच आहे. असे मला वाटते. पण आता पुढे मी काही वाक्य लिहिली आहेत ते फक्त स्त्रीचे महत्त्व सांगण्यासाठी .

नारी शक्ती अबला नाही
संघर्ष आमचा चालू राही
बरोबरीने साथ चला
स्त्रियांचाच आता काळ आला
महिलांना द्या सन्मान
देश बनेल महान
स्त्रियांना द्या इतका मान
वाढवा आपल्या देशाची शान
जबाबदारी संकट घे भारी
तक्रार करेना न हार मानणारी
स्त्री शक्ती रुप आहे
तेच आपले स्वरुप आहे.
नारी शक्ती जगात भारी
का समजता तिला बिचारी

स्त्री ही ईश्वरांने निर्माण केलेली महान शक्ती आहे.

एक सुंदर नाते

रोज आठवण यावी असं काही नाही
रोज भेट व्हावी असं काही नाही
एवढच कशाला रोज बोलणं व्हावं
असही काहीच नाही,
पण मी तुला विसरणार नाही
ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव
असणं ही झाली मैत्री शेवटी काय हो भेट नाही
झाल्या तरी गाठी बसणं महत्त्वाचं यांनी हे जाणलं
त्यांनी माणसातलं माणुसपण जाणलं....
अशा सगळ्या मित्रांना माझ्या शुभेच्छा
ही नाती टिकवा आणि आयुष्याचा आनंद द्या.....

संकलन
कु. देवलक्ष्मी गोसकी
बी. ए. भाग - १

• तीन गोष्टी •

तीन गोष्टींचे कधीच विस्मरण होऊ देऊ नये
कर्तव्य, कर्ज, उपकार
तीन गोष्टींची कधीही चोरी होत नाही.
ज्ञान, चारित्र्य, जिद्द
तीन गोष्टींपासून नेहमी दूर रहावे
व्यसन, जुगार, चोरी
तीन गोष्टींचा नेहमी आदर करावा
आई, वडिल, गुरु.
तीन गोष्टी इतरांना देत चला
दान, ज्ञान, मान
तीन गोष्टी भावाभावात शत्रुत्व निर्माण करतात.
संपत्ती, पत्नी, जमीन
तीन गोष्टी आयुष्यात एकदाच मिळतात
आई, बडील, तारुण्य
तीन गोष्टी अंगी असु द्याव्यात
नम्रता, सौंजन्य, सुस्वभाव
तीन गोष्टी सांगून येत नाहीत.
मृत्यू, आजार, वेळ
तीन गोष्टी निघून गेल्यावर परत येत नाहीत
शरीरातून प्राण, तोंडातून शब्द, धनुष्यातुन बाण...

कु. अनिता आवार
बी. कॉम. भाग - ३

आयुष्य

आयुष्यात काही नसेल तरी चालेल
परंतु आई- वडीलांचा आशीर्वाद सदैव
पाठीशी असावा आयुष्यात अशा व्यक्तीवर जास्त
विश्वास ठेवा जी व्यक्ती तुमच्या हसण्यामागील
दुःख रागवण्यामागील कारण समजेल.

कु. विजयलक्ष्मी भांगे
बी. ए. भाग -१

– माहितीपर लेख –

वैश्विक शिक्षक : रणजितसिंह डिसले

कु. राजेश्वरी शावंतुल
बी. ए. भाग – १

रणजितसिंह डिसले (जन्म – ५ ऑगस्ट १९८८) हे महाराष्ट्रातील एक शिक्षक आहेत. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील परितेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेत ते प्राथमिक शिक्षक म्हणून काम करतात. ते तळमळीने शिक्षणाच्या कार्यात स्वतःला झोकून देत पिढी घडवत आहेत.

रणजितसिंह डिसले हे मुळचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील आहेत. त्यांचे शालेय शिक्षण बार्शीतील सुलाखे विद्यालयामध्ये झाले २००९ पासून प्राथमिक शिक्षक म्हणुन ते काम करत आहेत. विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान आणि क्यु. आर. कोडच्या सहाय्याने शिकविण्यासाठी डिसले गुरुजी प्रसिध्द आहेत. त्यांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन शिकविण्याचे नवे तंत्र विकसित केले आहे. तसेच इतर शिक्षकांनाही टेक्नोसॅव्ही होण्यासाठी प्रेरित केले आहे. आयटीच्या प्रभावी वापरासाठी त्यांनी स्वतःची छोटीखानी प्रयोगशाळा उभारली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी लॉकडाऊनमध्येही तंत्रज्ञान आणि सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करुन विद्यार्थ्यांना शिकवले.

या शिक्षकाच्या जिद्दीची दखल सातासमुद्रापार घेतली होती. ३ डिसेंबर २०२० रोजी युनेस्को तसेच लंडनस्थित वार्की फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'ग्लोबल टिचर' प्राईज रणजितसिंह डिसले यांना जाहीर झाला होता. या पुरस्काराची रक्कम ५ मिलीयन अमेरिकन डॉलर्स म्हणजे ७ कोटी रुपयांहून अधिक आहे. हा पुरस्कार मिळवणारे डिसले हे पहिले भारतीय शिक्षक आहेत.या पुरस्कारासोबतच डिसले यांचा जगातील सर्वोत्तम शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला आहे. ७ कोटी या आकड्याने मात्र अवघ्या शिक्षकांची मान जगात उंच झाली आहे.

लंडनच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये झालेल्या समारंभात सुप्रसिध्द अभिनेते स्टीफन फ्राय यांनी घोषणा करताच शिक्षक डिसले यांच्यासह सोलापूरकरांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. याआधी डिसले यांना मायक्रोसॉफ्ट फाऊंडेशनचाही पुरस्कार मिळाला होता. क्यु.आर.कोडचा वापर करुन मुलांना पुस्तकातील कविता, धडे अधिक माहिती मिळवता येते. त्या त्यांच्या कल्पकतेला तो पुरस्कार मिळाला होता.

सोलापूरातील परितेवाडी या छोट्याशा गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत त्यांनी अध्यायन करताना डिसले सरांनी अनोखे उपक्रम राबवत यापूर्वी लक्ष वेधून घेतले होते. 'ग्लोबल टिचर' पारितोषिकाची निम्मी रक्कम उर्वरित स्पर्धकांना देण्याचा तसेच अन्य रक्कम शिक्षणासाठी वापरण्याचा त्यांचा निर्धार त्यांच्या वैश्विक दृष्टीकोणाचा परिचय देणारा आहे. आज सहजगत्या वापरल्या जाणाऱ्या क्लिक रिस्पॉन्स (क्यु. आर.) कोडचा शालेय शिक्षणासाठी वापर करण्याची कल्पना काही वर्षांपूर्वी डिसले सरांनी प्रत्यक्षात आणण्यास सुरुवात केली. स्काईप इन क्लासरुम या उपक्रमाद्वारे ते आपल्या विद्यार्थ्यांना भासमान/आभासी पद्धतीने जगाची सफर घडवून आणतात. विविध देशातील विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधणारा हा प्रयोगही बाखणला गेला आहे. तंत्रज्ञानाची गोडी शिक्षक पेशात आल्यानतंर कायम राखत त्यांनी तंत्रज्ञानाद्वारे परिणामकारक अध्यापन करणारे प्रयोग सुरु केले. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये डिसले सरांसारखे काही प्रयोगशील आणि तळमळीचे शिक्षक आहेत. त्यामुळेच राज्यात अनेक ठिकाणी 'गुणवत्तेची बेटे' निर्माण झाली आहेत. डिसले यांना मिळवलेल्या आंतरराष्ट्रीय पारितोषिकानंतर सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला.

युनेस्को आणि लंडनस्थित वार्की फाऊंडेशन यांच्या 'ग्लोबल टिचर' या सन्मानसह सुमारे सात कोटी रुपयांचे पारितोषिक मिळविणारे रणजितसिंह डिसले हे खऱ्या अर्थाने 'वैश्विक शिक्षक' आहेत.

कु. प्राची अवताडे
बी. ए., भाग-१

– चिंतनपर लेख –

प्रेम म्हणजे काय ?

कु. सुनिता यनगंटी
बी. कॉम. भाग – ३

आपण एखाद्यावर प्रेम करतो म्हणजे काय करतो ? आपण कधी त्याचा विचार करतो का ? बऱ्याचदा नाही. मग खाली दिलेली ही गोष्ट वाचा प्रेम म्हणजे काय याचा अर्थ कदाचित तुम्हाला कळेल. एकदा एका प्रेयसीने तिच्या प्रियकराला विचारलं सांग बरं तुला मी का आवडते ? अगं, मी अशी काही कारणं सांगू शकत नाही. पण, तु मला आवडतेस हे मात्र नक्की माहित आहे. अरे तू माझ्यावर प्रेम करतोस मग तुला माहिती नाही, तू का प्रेम करतोस ते ? तुला मी का आवडते, हेच माहिती नसेल तर तुला माझ्याविषयी वाटणाऱ्या भावनेला प्रेम तरी का म्हणायचे ?

प्रिये, अगं खरच, मला त्याचं कारण माहित नाहीये, पण तरीही माझं तुझ्यावर प्रेम आहे. आणि मी ते सिध्द करु शकतो. सिध्द काय कसंही करु शकतील रे । पण मला कारण हवं आहे. माझ्या मैत्रिणीचा बॉयफ्रेंड तिला का आवडतो ? यांची ठिक कारणे दिली होती. तुला एवढीही कारणं सुचत नाहीयेत ?

ठीक आहे. तुला कारणंच हवीत ना मग, हे बघ सांगतो मला तु आवडते कारण तु सुंदर आहेस, तुझा आवाज सुंदर आहे, तू अतिशय प्रेमळ आहेस, तू विचारी आहेस, तुझे हास्य मोहक आहे, एक गोष्ट सांगू का तुला! तुझी प्रत्येक हालचाल मला वेड लावते.

प्रेयसी प्रियकराच्या या स्पष्टीकरणावर खूप आनंदी झाली. दुर्देवाने काही दिवसांनतर त्या प्रेयसीला अपघात झाला. आणि ती कोमात गेली, प्रियकर तिला भेटायला गेला. पण कोमात असल्याने संवाद साधणे शक्य नव्हतं. अखेर तो एक पत्र तिच्या उशाशी ठेवून निघून गेला. त्या पत्राचा मजकुर असा होता.

प्रेमकथा महत्त्वाच्या नसतात, तर महत्त्वाची असते ती तुमच्यातील प्रेम करण्याची क्षमता.

प्रिये, तुझ्या गोड आवाजावर मी प्रेम करत होतो. पण आता तू बोलू शकतेस का? नाही. त्यामुळे मी तुझ्यावर प्रेम करु शकत नाही. तुझा काळजी घेण्याचा स्वभाव मला आवडायचा पण आता तू तो स्वभाव दाखवू शकत नाही. त्यामुळे मी तुझ्यावर प्रेम करु शकत नाही. तुझे मोहक हास्य नि तुझे विभ्रम मला चित्तवेदक वाटायचे. म्हणून मी तुझ्यावर प्रेम करायचो पण आता तू हसू शकतेस ? तुझे विभ्रम दाखवू शकतेस ? नाही. म्हणून मी तुझ्यावर प्रेम करु शकत नाही.

प्रेम करण्यासाठी कारणच हवी असतील तर आता याक्षणी तुझ्यावर प्रेम करण्यासाठी माझ्याकडे कारणच नाही. खरोखरच प्रेमाला कारणांची गरज असते ? नाही. नक्कीच नाही. म्हणूनच मी अजूनही तुझ्यावर तितकांच गाढ प्रेम करतो आहे.

थोडक्यात या गोष्टीचा निष्कर्ष असा,

खरे प्रेम कायम राहते. उडते ती वासना. प्रेमाचे बंध आयुष्यभरासाठी असतात. पण ते प्रेमात पडलेल्यांना पुढे नेतात. मागे खेचत नाहीत. बालीश प्रेम म्हणते, मला तुझी गरज आहे. म्हणून मी तुझ्यावर प्रेम करतो. परिपक्व झालेले प्रेम म्हणते मी प्रेम करतो म्हणून मला तुझी गरज आहे. तुमच्या आयुष्यात कुणी यावं हे तुमच्या कपाळावरची नशीबाची रेषा सांगते. पण तुमच्या आयुष्यात कुणी थांबायचं हे तुमचे हृदय ठरवते. आणि शेवटी ज्यांचा देवावर विश्वास असतो. ते भुतलावर असतात आणि देव मात्र स्वर्गात असतो. पण जे देवावर प्रेम करतात. ते त्यांच्यासमोर असतात.



कु. सुजाता कोंकती
बी. कॉम. भाग-१

– व्यक्तिचित्रपर लेख –

अनाथांची माय सिंधुताई सपकाळ

कु. सावित्री बिजगे
बी. ए. भाग – ३

जन्म आणि सुरुवातीचे जीवनः– सिंधुताई यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंपरी मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. ४/५ अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी (फाटलेल्या कापडाचा तुकडा) ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडेल याचा त्यावेळी कोणी विचार ही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. सपकाळ यांचे वयाच्या १२ व्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा २० वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. हे लग्न फार काळ टिकले नाही. आणि वयाच्या २०व्या वर्षी त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्यांने सोडून दिले.

सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करणाऱ्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना २०२१ मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

* पुरस्कार व गौरव :– सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यातले काही

* पद्मश्री पुरस्कार (२०२१)
* महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार (२०१२)
* पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुरस्कार (२०१२)
* महाराष्ट्र शासनाचा ' अहिल्यादेवी होळकर पुरस्कार' (२०१०)
* मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार (२०१३)
* आयटी प्रॉफिट ऑर्गनायझ्
* शिवलिला महिला गौरव पुरस्कार

अशा अनेक पुरस्काराने त्यांना सन्मामित करण्यात आले.

जीवनातील संघर्ष :– नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांची कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या पण आईनेही पाठ फिरवली. परभणी–नांदेड–मनमाड रेल्वे स्टेशनावर सिंधुताई भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टवलेले एखादे फळ हाती लागेल म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या एकदा जळगांव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरु झाले. सिंधुताई दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या पण तिथे त्यांनी कधी एकले खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनीच २१ वर्षाच्या ताईंना सरंक्षण दिले.

२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रॉमॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजूचे फुफ्फुस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनतर त्यांची प्रकृती बरी झाली होती. तथापि पाच दिवसापूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली. त्यामुळे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. आणि दि. ०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनिटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केअर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या सामाजिक कार्याचे करेल तितके कौतुक कमीच आहे. या सर्व सामाजिक कार्यामुळे 'अनाथांची माय' म्हणून सिंधूताई सपकाळ कायम स्मरणात राहतील.

----- मुलाखतकार -----

कु.श्रुती कोल्हापूरे
बी. ए. भाग - २

कु. श्रावणी सिंगराल
बी. ए. भाग - ३

कु. अरुणा बंडी
बी. ए. भाग - ३

– मुलाखत –

प्रसिध्द शिल्पकार भगवान रामपुरे यांची मुलाखत

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार प्रख्यात, नामांकित आणि सिध्दहस्त शिल्पकार म्हणून 'भगवान रामपुरे' आपणा सर्वांनाच परिचित आहेत.'स्टॉक एक्सचेंज'च्या प्रवेशद्वाराजवळील 'बिगबुल' चे शिल्पकार, गणेशमूर्ती, बुध्दमूर्ती, मिर्झा गालिब, विजय तेंडुलकर, स्वामी समर्थ, गुलजार व ओशो अशा अनेक शिल्पामधून आपल्याला जिवंत भासमान झाले आहे. अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार, देश-विदेशातील अनेक सर्वोच्च पुरस्कार आणि नुकताच कुसुमाग्रज फाऊंडेशनचा 'गोदावरी' पुरस्कार जाहीर झाला आहे. शिल्पकाराचे आयुष्य आणि त्याची जडणघडण आज आपण मुलाखतीमधून समजून घेणार आहोत.

प्रश्न :- नमस्कार सर! तुमची बालपणीची जडणघडण आणि या क्षेत्रातील प्रेरणा या विषयी सांगा..

भगवान रामपुरे :- मला शिल्पकलेची प्रेरणा ही माझ्या वडिलांपासून मिळाली. लहानपणापासून वडिलांसोबत मातीचे गणपती तयार करणे, त्यांना कामात मदत करणे हे सगळं करत असताना वडिलांकडून मी हळूहळू ही कला शिकत गेलो आणि वडिलांनी ही मला शेवटी सांगितले होते की, माझ्याकडे तुला देण्यासाठी या कलेशिवाय दुसरे काही संचित नाही म्हणून तू ही कला 'जप आणि वाढवं'

प्रश्न :- या शिल्पकलेसाठी तुम्ही कोणते विशेष प्रशिक्षण घेतले आहे का?

भगवान रामपुरे :- हो, जरी या कलेचा पारंपारिक वारसा मला वडिलांकडून मिळाला असला तरी सुध्दा मला यासाठीचे प्रशिक्षण 'जे.जे.स्कूल ऑफ आर्ट ' येथे घ्यावे लागले. दहावीनंतर पाच वर्षाचा तो कोर्स आहे. फाऊंडेशन नंतर चार वर्षाचा.या प्रशिक्षणाच्या कालावधीत मला शिल्पकलेच्या बाबतीत खूप काही शिकता आलं.

प्रश्न :- खरं तर तुम्हाला साहित्याची, नाट्य क्षेत्राची आवड होती. पण तुम्ही शिल्पकलेकडे कसे आलात. ?

भगवान रामपुरे :- कसं आहे, प्रत्येकाला अनेक गोल असतात पण माझे मोठे भाऊ त्यावेळेस मला म्हणाले होते की, '' सगळ्या गोष्टी येतात माणसाला, परंतु एकाच गोष्टीवर तुमची पूर्ण शक्ती केंद्रित करुन काम केल्यास त्यामध्ये आपण काहीतरी वेगळं आणि वैशिष्ट्यपूर्ण असं देऊ शकतो. ''

प्रश्न :- तुम्ही शिल्पकलेकडे एक करिअर म्हणून की छंद म्हणून पाहता ?

भगवान रामपुरे :- खूप चांगला प्रश्न आहे , कला हे करिअर होऊ शकत नाही, ' कला हे जगणं' आहे. कला ही एक सर्जनशील अभिव्यक्ती आहे. पण योगायोगाने पुढे त्याचा व्यवसाय होतो. व्यवसायात रुपांतर होतं पण आपण जर केवळ त्याकडे एक परिपूर्ण व्यवसाय म्हणून पाहिलं तर मात्र ही कला हळूहळू मरत जाते. त्या कलेतील निर्मितीची प्रक्रिया संपत जाते. त्यामुळे कलावंत हा फक्त काम करत राहतो. त्याचा व्यवहार मात्र आपोआप होत जातो. तुमच्याकडून उत्कृष्ट पध्दतीने निर्माण झालेली कलाकृती ही नंतर विकत घेतली जाते.

प्रश्न :- एकांत आणि कलावंत यांचं एक वेगळं नातं असतं. कोरोना काळात हा एकांत तुम्हाला मिळाला या काळात कसं काम केलं तुम्ही ?

भगवान रामपुरे :- कोरोना काळातच नाही तर मी कोणत्याही काळात एकांतातच असतो. मी जरी आता तुमच्याशी संवाद साधत असलो तरी मी अलिप्त असतो. वेगळा असतो. मी सोलापूरमध्ये जरी असलो तरी ते फक्त शरीराने असतो. मनाने मात्र मी पूर्णपणे या शिल्प कलेमध्ये एकाग्र झालेला असतो आणि कोणताही कलावंत हा एकांतातच घडतो. त्याचे सृजनत्व हे एकांतातच बहरते. यासाठी कोरोना काळातील एकांताची आवश्यकता मला भासली नाही.

प्रश्न :- या कलेसाठी विशेष कोणती साधना करावी लागते ?

भगवान रामपुरे :- मी मघाशी म्हटलं आहे की, कलावंतासाठी ती कला एक प्रकारची साधनाच असते. एकाग्र होऊन त्या कलेमध्ये समरस होणे ही एक प्रकारची साधनाच आहे.

प्रश्न :- तुम्ही आजवर अनेक शिल्प कोरली आहेत पण तुम्हाला भावलेलं असं एखादं शिल्प आणि त्याचे वेगळेपण सांगाल का?

भगवान रामपुरे :- कोणत्याही कलावंतासाठी त्याची कलाकृती

ही प्रिय असते. कारण त्या कलावंताच्या अंतरंगातून ती कला सृजन होऊन जन्माला आलेली असते. जसे आईला आपली सर्व मुले ही प्रिय असतात. ती त्यामध्ये कोणताही भेद करत नाही. अगदी कलाकारांचे देखील तसेच असते. त्यामुळे माझी सर्व शिल्पही मला तितकीच प्रिय असतात. त्यामध्ये आवड-नावड हा प्रकार नसतो.

प्रश्न : साहित्य हे जसे साहित्यिकाचे अपत्य असते. तसे शिल्पनिर्मिती हे एक अपत्य असते का? काय प्रक्रिया असते या निर्मितीची ?

भगवान रामपुरे :- कोणतीही कला ही एकच असते. मात्र अभिव्यक्त होण्याची माध्यमे वेगवेगळी असतात. कोणताही कलावंत हा विविध माध्यमातून स्वतःला अभिव्यक्त करीत असतो. साहित्यिक हा कथा, कविता, कादंबरी मधून स्वतःला व्यक्त करत असतो तर चित्रकार आपल्या चित्रांमधून स्वतःला अभिव्यक्त करत असतो. अगदी शिल्पकलेच्या बाबतीत तुम्ही म्हणाल तर तेही असेच असते. शिल्पकार हा वेगवेगळ्या शिल्पांमधून स्वतःला अभिव्यक्त करत असतो. मात्र यासाठीची माध्यमे मात्र प्रत्येक कलावंत वेगवेगळी वापरतो.

प्रश्न : या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये, शिल्पकलेबाबतीत या कलेच्या भविष्याविषयी तुम्ही काय सांगाल ?

भगवान रामपुरे :- प्रत्येक वीस-तीस वर्षानंतर नवीन काहीतरी आलेले असते, आणि ते कुठल्याही कलावंताला त्याच्याशी अपडेट व्हावंच लागतं. म्हणजे परंपरा ही छान होती आणि नवीन चांगलं नाही. नवीन सगळं वाईट आहे. असं काही नसतं. जे नवीन आहे ते कलावंताने स्वीकारले पाहिजे. खरं तर तंत्रज्ञान आणि परंपरा एकमेकांसाठी पूरक असतात. नव्या तंत्रज्ञानाने पारंपारिक कलेमध्ये भरच पडत असते. नव्या टेक्नॉलॉजीचा आपल्या कलेसाठी वापर करून कलावंतला अभिव्यक्त होता आले पाहिजे. पारंपारिकतेमध्ये जसे प्लस-मायनस असतात.. तसेच या तंत्रज्ञान युगातही असे प्लस-मायनस असतात. कलावंतासाठी अभिव्यक्त होणे महत्त्वाचे आहे.

प्रश्न - तुम्हाला आजपर्यंत अनेक पुरस्कार मानसन्मान मिळाले पण तुमच्यासाठी विशेष ठरलेला असा कोणता पुरस्कार आहे?

भगवान रामपुरे - पुरस्कार हा प्रकार कलावंतांसाठी एक सन्मान आहे. त्याच्यामध्ये आपण हा मोठा आहे. हा छोटा आहे असा भेद करु शकत नाही. तो कलावंतांला प्रेमाने दिलेला एक आदर आहे, आणि आदरामध्ये आपण तुलना करु शकत नाही. बरोबर ना? सगळे पुरस्कार मी तेवढ्याच आनंदाने स्वीकारतो. म्हणजे उदाहरण घ्यायचे असेल तर 'ऑस्कर' पुरस्कार मिळाला म्हणजे खूप मोठं झाला हा लोकांचा दृष्टिकोन आहे तो कलावंताचा नसतो. पुरस्कार हे रसिकांकडून कलावंताला मिळालेली प्रेमाची दाद असते. मग तो छोट्या संस्थेकडून असो किंवा मोठ्या संस्थेकडून मिळालेला असो त्यात मी मात्र आजवर कसलाही फरक केला नाही.

प्रश्न - या शिल्पकलेसाठी प्रोत्साहन म्हणून, शैक्षणिक आणि शासन स्तरावर काय करणे अपेक्षित आहे?

भगवान रामपुरे - फक्त शिल्पकलेसाठीच नाही तर, सर्व कलेच्या बाबतीत अत्यंत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

प्रश्न -या क्षेत्रात येणाऱ्या नवोदित शिल्पकारांना तुम्ही काय सांगाल?

भगवान रामपुरे - कलेशी प्रामाणिक राहणे, त्यामध्ये पूर्ण ताकदीने स्वतःला झोकून देणे, आणि ती कला आयुष्यभर जगणे महत्त्वाचे आहे. त्या कलेकडे एक व्यवसाय म्हणून न पाहता एक सर्जनशील, नवनिर्मिती म्हणून पहावे.

प्रश्न - एक कलेच्या क्षेत्रातील विद्यार्थिनी म्हणून जाता - जाता तुम्ही मार्गदर्शनपर काय सांगाल?

भगवान रामपुरे - खरं तर मी संदेश वगैरे कधी देत नसतो, पण एक कलेचे विद्यार्थी म्हणून मी एवढेच सांगेन की कोणतीही कला ही फक्त जगत राहणं, त्यामध्ये स्वतःला झोकून देणं आणि मग ती कला तुम्हाला जीवन शिकवेल, जगण्याचा अर्थ शिकवेल. हा तुमच्यासाठी संदेश नाही तर एक कलावंत म्हणून माझा स्वतःचा अनुभव आहे. जशी व्यक्ती असते तशी त्याची प्रवृत्ती असते त्या - त्या कलेत रमता आले पाहिजे. उदाहरणच घ्यायचे झाले तर तुम्हालाही कॉलेज सुटल्यानंतर खूप कामे असतात पण त्यातूनही आपल्याला स्वतःच्या कलेसाठी वेळ काढता आला पाहिजे. मी पहाटेच्या वेळी खूप एकाग्रतेने काम करतो. ती वेळ खूप शांत असते. या वेळेत कोणाचा फोन येत नाही किंवा कोणाचा आपल्याला त्रास होत नसतो म्हणून या वेळेची निवड मी करतो.

तुम्ही आम्हाला तुमचा अनमोल वेळ देऊन अगदी मनापासून स्वतःला व्यक्त केले. एक कलाकार म्हणून नव्हे तर माणूस म्हणून तुमच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आम्हाला या मुलाखतीमुळे माहिती झाले सर याबद्दल आम्ही महाविद्यालयाच्या वतीने आपले मनापासून आभार मानतो.

कु. पुनम पाटील
बी. कॉम. भाग-३

– व्यक्तिचित्रपर लेख –

गानसाम्राज्ञी लता मंगेशकर

कु. श्रृती कोल्हापुरे
बी. ए. भाग – २

गानकोकिळा, गानसाम्राज्ञी 'क्वीन ऑफ मेलोडी' अशा विविध उपाधिनी प्रसिध्द असणाऱ्या 'भारतरत्न' लता मंगेशकर या एक महान भारतीय गायिका आणि संगीतकार होत्या. तब्बल सात दशके चित्रपट संगीत क्षेत्रात अविश्वसनीय कारकीर्द घडविणाऱ्या लता दीदींचा राजकारण, कला-क्रीडा आणि गायन क्षेत्रातील लोकांवर खूप मोठा प्रभाव होता.

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्यप्रदेशमधील इंदूर या शहरात झाला. त्यांचे मुळगाव गोव्यातील मंगेशी हे होते. त्यांच्या आईचे नाव शुध्दमती (माई) आणि वडिलांचे नाव दिनानाथ मंगेशकर होते. ते एक शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते लतादीदी ह्या त्यांच्या आई-वडिलांचे ज्येष्ठ अपत्य. त्यांना आशा भोसले, उषा मंगेशकर मीना खडीलकर आणि हृदयनाथ मंगेशकर अशी एकूण चार भावंडे आहेत. लतादीदींना पहिल्यांदा संगीताचे धडे त्यांचे वडील मास्टर दीनानाथ यांच्याकडूनच मिळाले. तेच त्यांचे संगीत गुरु देखील होते. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून त्यांनी आपले वडील दीनानाथ यांच्या संगीत नाटकात बालकलाकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती.

लतादीदी अवघ्या तेरा वर्षाच्या असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरातील सर्वात मोठी मुलगी म्हणून त्यांच्यावर आई आणि भावंडाची जबाबदारी आली. सुरुवातीला अभिनय आणि संगीत नाटकांत नशीब आजमावत लतादीदींनी इ. स. १९४२ पासून खऱ्या अर्थाने पार्श्वगायन क्षेत्रात स्वतःची कारकिर्द सुरु केली. लतादीदी स्वतः गायिका असल्याने त्यांच्या सर्व भावंडांना त्यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. लतादीदींनी जवळ-जवळ प्रत्येक भारतीय भाषेत गाणी गायलेली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने हिंदी आणि मराठी गाण्यांचा समावेश होता. संगीत क्षेत्रातील अलौकिक स्वरांमुळे त्यांनी संपूर्ण जगाला मोहित केले. त्यांच्या आवाजाने गाणी अजरामर झाली. प्रत्येक दशकातील महान संगीतकारांसोबत त्यांनी काम केलेले होते. त्यांनी त्यांच्या ६० वर्षाच्या गायन कारकिर्दीत ५०,००० हून जास्त गाणी गाऊन रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

लतादीदीच्या गाण्यामध्ये माधुर्यता असल्यामुळे त्यांनी गायलेल्या सर्वोत्तम गाण्याची यादी अनेकांना करायची होती. तेव्हा त्या यादीत कोणती गाणी ठेवायची व कोणती गाणी सोडायची हा प्रश्न त्यांना पडला. त्यांनी गायलेली प्रत्येक गाणी वेगवेगळी आणि उत्कृष्ट होती. त्या भारतातील सर्वात लोकप्रिय व आदरणीय गायिका होत्या. 'स्वरांची साम्राज्ञी' 'स्वर कोकिळा' म्हणजेच भारतीयांची कोकीळा म्हणून त्या जगभरात प्रसिध्द आहेत.

लतादीदींनी १९६३ मध्ये गायलेले 'ए मेरे वतनके लोगो' हे नॉन फिल्मचे कवी प्रदीप यांनी लिहिलेलं व सी. रामचंद्र यांनी संगीतबध्द केलेलं देशभक्तीपर गीत त्यांच्या सर्व प्रसिध्द लोकप्रिय गाण्यांपैकी एक होते. लतादीदींनी भारताचे माजी पंतप्रधान पंडित पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या उपस्थितीत गायलं होतं. हे देशभक्तीपर गीत असून लताजींनी त्यांच्या आवाजातील या गीताला अशी काही स्वरांची जादू दिली की, देशाच्या वीर जवानांना श्रध्दांजली वाहताना पंडित जवाहरलाल नेहरु यांना अश्रु अनावर झाले.

लतादीदींच्या या ६० वर्षाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत वैजंयतीमाला, काजोल, माधुरी दिक्षित व २० दशकातील करिश्मा कपूर, प्रिती झिंटा यासारख्या नायिकांना आवाज दिला. त्यांनी शंकर जयकिशन, एस.डी. बर्मन, आर. डी. बर्मन तसेच लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या सारख्या प्रसिध्द संगीतकारांबरोबर तर मोहम्मद रफी, मुकेश आणि किशोर कुमार सारख्या दिग्गज गायकांबरोबर अनेक युगल गीतेही गायली. त्यांनी फक्त मोठ्या बॅनरच्या चित्रपटांसाठी गाणी स्वीकारली. त्यापैकी प्रामुख्याने राजश्री प्रोडॉक्शन आणि यशराज फिल्मस् यांचा उल्लेख करता येईल.

संगीतातील असामान्य कामगिरीमुळे लता मंगेशकर यांना भारत सरकारचे पद्मभूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न असे अत्यंत मानाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. तेसेच दादासाहेब फाळके पुरस्कार आणि ' बन टाईम अॅवार्ड फॉर लाईफ टाईम अचिव्हमेंट' या पुरस्कारांनी देखील त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. लतादीदी आयुष्यभर एकदम साध्या पेहरावात वावरल्या. तसेच त्या सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमात देखील नेहमी सहभागी असायच्या. त्यांनी सन २००१ मध्ये लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनद्वारे 'पुण्यात मास्टर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलची' स्थापना केली.

लतादीदींनी तब्बल सात दशके संगीत क्षेत्रात अतुल्य कामगिरी केलेली आहे. त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांसाठी त्या प्रेरणा स्रोत आणि आदर्शवत गायिका ठरलेल्या आहेत. प्रत्येक भारतीय नागरिकाला लतादीदींचा सार्थ अभिमान आहे. आशा या लतादीदींना कोव्हिडची लागण झाल्यामुळे त्यांचे सर्व अवयव निकामी झाले. २८ दिवस त्यांच्यावर उपचार चालू होते. परंतु दिनांक ०६ फेब्रुवारी २०२२ रोजी अशा या महान गानसाम्रज्ञीचे मुंबई येथील 'ब्रीच कँन्डी' या हॉस्पिटलमध्ये निधन झाले.

पण लतादीदी आजही त्यांच्या आवाजामुळे प्रत्येकांच्या मनात जिवंत आहेत. आणि अशाच भविष्यातही अजरामर असणार...!

– माहितीपर लेख –

लोकशाहीचा चौथा स्तंभ
वृत्तपत्र

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

संपूर्ण जगात दिवसभरामध्ये कितीतरी नवीन गोष्टी घडत असतात. जगातल्या कानाकोपऱ्यातील माहिती मिळवण्यासाठी आपल्याला एका साधनाची गरज आहे. यासाठी दूरदर्शन, रेडिओ यासारखी प्रसारमाध्यमे उपलब्ध आहेत. परंतु या सर्व साधनांपेक्षी महत्त्वाचे असलेले साधन म्हणजे वर्तमानपत्र होय. त्यामुळे आजच्या युगामध्ये वर्तमानपत्र ही काळाची गरज बनली आहे. बहुतांश जणांचा तर वृत्तपत्र वाचणे हा एक छंदच आहे. अशा लोकांना सकाळी वर्तमानपत्रे नाही वाचली तर चहा आणि नाश्त्याची चव सुध्दा येत नाही. वर्तमानपत्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. कारण वर्तमानपत्र हे असे माध्यम आहे. ज्यातून आपल्याला जगभरातील सर्व घडामोडी आणि बातम्यांची माहिती मिळते. वर्तमानपत्राद्वारे आपल्याला जगभरातील सर्व महत्त्वाच्या घटना व त्यामागील कारणे व त्यांचे परिणाम कळून येतात. जगातील कुठला देश कुठल्या पायरीपर्यंत विकास करत आहे. याचे ज्ञान वर्तमानपत्राद्वारे मिळते. वैद्यकिय अविष्कार, नवनवीन शोध, अपघात, राष्ट्रा-राष्ट्राचे परस्परातील संबंध आणि ताण-तणाव दंगली, संप, गुन्हे आणि मनोरंजन याविषयी वर्तमानपत्रात दिलेल्या माहितीमुळे वर्तमानपत्र वाचून आपल्याला वर्तमान जगात चाललेल्या हालचालीचे ज्ञान मिळते. त्याप्रमाणेच देशादेशातील राजकीय कार्यक्रमांच्या बातम्यांना स्वतःचे विशेष असे महत्त्व असते.

या व्यतिरिक्त वर्तमानपत्रांच्या माध्यमातून बाजारपेठेतील आणि व्यापारातील भाव, चढ-उतार त्यांची देखील माहिती मिळते. एवढेच नसून देशांतर्गत तसेच देशाबाहेरील संपूर्ण जगातील क्रीडा विषयी सुध्दा माहिती वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचत असते. त्यामुळे वृत्तपत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्राद्वारे आपल्याला जगभरातील विविध बातम्या व्यतिरीक्त वर्तमानपत्रातील मासिके आणि विशेष अंकामध्ये साहित्यिक माहिती देखील समाविष्ट असते. त्यामुळे जगभरातील सर्व साहित्यप्रेमी वर्तमानपत्राकडे विशेष आकर्षित होतात.

वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित कविता, कथा, नाटक, निबंध व्यंगचित्र इत्यादींच्या माध्यमातून वाचकांचे मनोरंजन होत असते. त्यासोबत यातून बुध्दीला चालना मिळवून ज्ञान वाढते. त्याप्रमाणेच वर्तमानपत्रे समाजसुधारकांची महत्त्वाची भूमिका बजावत असतात. वृत्तपत्राद्वारे नवनिर्मितीचे संदेश वाहक केले जाते. वृत्तपत्र हे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे यामागील आणखीन एक कारण म्हणजे वृत्तपत्रांतून संकटकालीन सेवा पुरवल्या जातात. वृत्तपत्राच्या संकटकालीन सेवामुळे वृत्तपत्रांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय किंवा प्रांतीय संकटांच्या वेळी वर्तमानपत्र अशा समस्या निवारण्याचे कारण बनतात. म्हणजेच देशांमध्ये विविध समस्या येतात जसे की- पूर, दुष्काळ, अपघात ग्रस्त, अनाथ बालक, गरीब पिडीत, उत्कृष्ट कामगिरी बजावणारे यांना वृत्तपत्रांच्या माध्यमांतून मदत निधी देऊन मानवतेची सेवा केली जाते. तसेच वृत्तपत्राच्या माध्यमातून राष्ट्रीय एकता, जागतिक शांतता आणि राष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करण्यामध्ये हातभार लागतो. त्यामुळे वृत्तपत्रे ही सरकार आणि जनता यांच्यामधील दुवा बनून लोकांच्या नागरी समस्या आणि हक्कांचे रक्षण करतात. त्यामुळे निपक्ष वर्तमानपत्र हे जनतेचे सर्वात मोठे सेवक आहे. वर्तमानपत्राचे आपल्या जीवनामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

वर्तमानपत्रे ही आपल्या दैनिक जीवनामध्ये एक महत्वाचा भाग आहे. आज वर्तमानपत्र देशातील महान शक्तीमध्ये मोजले जाते. म्हणूनच वर्तमानपत्राचा वापर व्यक्ती, समाज आणि देश यांच्या हितासाठी केला पाहिजे. वृत्तपत्राचे महत्व सर्वांनी जाणून घ्यायला पाहिजे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमांकडे पाहिले जाते. परंतु आज या मोबाईलच्या युगामध्ये वर्तमानपत्र वाचकांची संख्या मात्र घटताना दिसते आहे. ही गोष्ट वाचन संस्कृतीसाठी चिंतेची बाब आहे. १८३२ पासून बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पासून सुरु झालेली वृत्तपत्रांची परंपरा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक ज्ञानाचा दस्तऐवज ठरली आहे.

आजच्या तंत्रज्ञानयुगामध्ये मोबाईलच्या आक्रमणामुळे धोक्यात येऊ घातलेल्या वाचन संस्कृतीला, वर्तमानपत्रे पुन्हा एकदा वाचनाची साद घालतील, इतकी ताकद वृत्तपत्रांमध्ये आहे. आजच्या युगातही आपले अस्तित्व जिवंत ठेवणाऱ्या वर्तमानपत्राचा भविष्यकाळ सुवर्णकाळ ठरेल! यात शंका नाही.

– माहितीपर लेख –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

कु. वैष्णवी पुराणिक
बी. कॉम. भाग – १

नमन त्या पराक्रमाला ,नमन त्या देश प्रेमाला
नमन त्या ज्ञानदेवतेला, नमन त्या महापुरुषाला
नमन असे आपल्या ''बाबासाहेबांना !''

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वांगीण कार्यात त्यांच्या शैक्षणिक विचारांचा आणि कार्याचा अविस्मरणीय वाटा दिसून येतो. 'शिक्षण हे सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार आहे. हा मंत्र बाबासाहेबांनी सांगितला होता. ते स्वतः उच्च विद्याविभूषित होते. एम.ए.,पीएच.डी., बार ॲक्ट लॉ. बॅरिस्टर अशा उच्च पदव्या त्यांनी मिळवल्या होत्या. तत्कालीन समाजव्यवस्था जातीयतेने पोखरलेली होती. शिक्षणही सर्वांची मक्तेदारी असल्याने बहुजनांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. त्याही परिस्थितीत अस्पृश्यतेचे चटके सहन करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा ध्यास घेतला. त्यांचे जगणे हे प्रस्थापित व्यवस्थेने नाकारलेले होते. अशा व्यवस्थेच्या गर्तेतून बाहेर यायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे मर्म डॉ. बाबासाहेबांनी ओळखले होते. त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतून त्यांची शिक्षणविषयक भूमिका विकसित झालेली दिसून येते.

आपल्या विविध ग्रंथ संपदेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सातत्याने शैक्षणिक प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न चालविलेला होता. विद्यार्थी वर्गासाठी त्याचे विचार दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. विद्यार्थ्यांने जागृत व्हा... या लेखात डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या काळातील क्षण अन् क्षणाचे महत्त्व विशद केले असून विद्यार्थी जीवनात विद्यार्थी आपले कर्तव्य व जबाबदारी कशी पार पाडतात. यावर समाजाचे भवितव्य अवलंबून असते. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ठाम विश्वास होता.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानलालसे संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिहितात, जगात एवढे ज्ञान आहे की, एखाद्याने आयुष्यभर जरी शिक्षण घ्यायचे ठरविले तरी फार झाले तर ज्ञानसागराच्या पायथ्याशी गुडघाभर पाण्यात आपण पोहोचू शकू. शिक्षण घेत असताना विद्यार्थी वर्गाने दोन गोष्टी ध्यानात ठेवल्या पाहिजेत. बुध्दिमत्तेत आणि कार्यक्षमतेत आपण कमी पडणार नाही यांची दक्षता घेतली पाहिजे. तसेच व्यक्तिगत सुखापेक्षा आपला समाज स्वतंत्र, स्वावलंबी व सन्माननीय कसा होईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक विचारमंथनातून व्यक्त केले आहेत.

शिक्षण घेऊन तरुणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वतःसाठी न करता समाजासाठी केला पाहिजे यावर बाबासाहेबांचा भर होता. शिक्षणाने केवळ स्वतःची आर्थिक स्थिती सुधारली म्हणजे भागले अना संकुचित विचार न करता आपल्या समाजाचा सर्वांगीण उध्दार होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशा पध्दतीची समाज मुक्तीची जाणीव नवशिक्षिताना करु देण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर विसरत नाहीत. शिक्षण हे दुधारी तलवारीसारखे आहे. ती कशी चालवायची हे ती वापरणाऱ्यावर अवलंबून असते. शिक्षणाने चांगलेही करता येते आणि वाईटही करता येते हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिकलेल्या माणसापासून समाजाला खरा धोका असल्याची भीती व्यक्त केली होती.

कारण सुशिक्षित लोक इतरांना कसे फसवायचे ते अधिक जाणतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुशिक्षित लोकांना आपल्या शिक्षणाचा वापर समाजाच्या भल्यासाठी करा आणि समाज विकासाचे स्वप्न साकार करा असे आवाहन केलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण व्यवस्थेत चारित्र्य आणि विनय याला फार महत्त्व दिले. चारित्र्यहीन व विनयहीन सुशिक्षित माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरिब जनतेच्या हितास बाधा आणत असेल तर तोच समाजाला शाप ठरतो. म्हणून शिक्षण शाप की वरदान या प्रश्नाचे उत्तर त्या व्यक्तिच्या चारित्र्य अणि अभिनयात दडलेले असते असे डॉ. बाबासाहेब म्हणतात.

शिक्षणसंस्थेसंदर्भात आपली भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण संस्थेला एक पवित्र संस्था मानली आहे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्याचा जबाबदार घटक जेवढा शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. याची जाणीव ठेवून शिक्षणाचे उदात्त कार्ये सुरु ठेवले पाहिजे असे बाबासाहेब म्हणतात आणि त्यांची भूमिका पण ती होती. शिक्षकांसंदर्भात विचार मांडताना बाबासाहेब म्हणतात. 'शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदु हा शिक्षक वर्ग असतो.' तो राष्ट्राचा सारथी असतो. म्हणून बुध्दिमान उदात्त निःपक्षपाती थोर मनाचे शिक्षकच राष्ट्राचा स्वाभिमान उंचावत असतात. म्हणून शिक्षकाचे स्थान इतरांपेक्षा उच्च असते. त्याचे भान ठेवल्यास खऱ्या अर्थाने

शिक्षणाचा उद्देश सार्थक होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केलेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब म्हणतात...

''लक्षात ठेवा तलवारीच्या धारेपेक्षा लेखणीची धार कायम टिकणार आहे आणि सर्वात खतरनाक शस्त्र आहे. म्हणून तलवार हातात न घेता लेखणी हातात घेऊन अन्यायावर मात करा.'' '' बुध्दिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे '' सुशिक्षित तरुणांना शिक्षणाचे विचार मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात सुशिक्षित तरुणांनी कोणत्याही कुबड्या न घेता स्वावलंबी जीवन जगावे. स्वतःच्या बुध्दीवर विश्वास ठेवून तिचा उपयोग करावा सदसद्विवेकबुध्दीला शरण जावे. जगात ज्ञानापेक्षा पूजनीय असे काहीही नाही. तसेच कोणीही मनुष्य जन्मतःच मंदबुध्दीचा नसतो. तुम्हीच तुमच्या भाग्याचे शिल्पकार आहात. आपल्या या विविध लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांनाही शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. महिलांनो आपल्या मुलांना शिक्षण द्या. त्यांच्यात महत्त्वकांक्षा निर्माण करा. त्यांची लग्ने लवकर करण्याची घाई करु नका 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.' जो पीतो तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही. या विचाराची कास धरण्याचे आवाहन त्यांनी समाजाला केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयीचे उत्कट प्रेम त्यांची ज्ञान संपादन करण्याची जबरदस्त ज्ञानलालसा आणि त्यासाठी पडतील ते कष्ट सोसण्याची त्यांची तयारी अगदी विद्यार्थी दशेपासूनच होती. पावाच्या एक तुकड्यांवर व कॉफीच्या एका कपाच्या आधाराने अठरा अठरा तास अध्ययन करुन लंडन 'स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगप्रसिध्द संस्थेत अथक अभ्यास करुन डी. एस्सी.ही सर्वोच्च पदवी मिळणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले व्यक्ती होते. हे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले तर फार मोठे आदर्श व्यक्तिमत्व त्यांच्यापुढे उभे राहील यात शंका नाही.

आपल्या शैक्षणिक विचाराला मूर्तरुप देण्यासाठी व गोरगरीब मुलांना शिक्षणाची संधी या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. या संस्थेत प्राचार्य प्राध्यापकांच्या नेमणुका करताना त्यांनी गुणवत्तेला विशेष महत्त्व दिले. या संदर्भात बाबासाहेब म्हणतात. माझ्या राजकीय पक्षात मी कोणाचीही नियुक्ती करेन पण शिक्षण संस्थेत मात्र गुणी ज्ञानी आणि लायकी मंडळींनाच नेमणार. त्यावेळी जातीच्या प्रांतांचा किंवा धर्माचा विचार करणार नाही. औरंगाबाद येथे असताना कॉलेजच्या प्रगतीकडे त्यांचे विशेष लक्ष असायचे. विद्यार्थी प्राध्यापक काय वाचतात व कसे शिकवतात हे बाबासाहेब मुद्दाम पाहत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक तळमळ ही त्यांच्या चळवळीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. मुंबई विधीमंडळाचे सदस्य असताना प्राथमिक शिक्षण कायद्यावर १९३८ साली प्रखर टीका करताना ते म्हणतात 'चरखा हा शिक्षणासाठी माध्यम आहे पण त्याला मुलोउद्योगाचे प्रतिक म्हणून स्वीकारल्याने बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होईल. त्यांचा शैक्षणिक दर्जा खालावेल' अशी भीती व्यक्त करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यातून शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीची दरी रुंदावेल असे म्हटले होते.

१९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजुरपक्षाच्या वतीने निवडणूक जाहीरनाम्यात शैक्षणिक प्रश्नाबाबतचे धोरण मांडण्यात आले होते. पूर्ण आणि सक्तीचे शिक्षण व तांत्रिक शिक्षण यावर त्यांचा विशेष भर होता.

शैक्षणिकदृष्ट्या मागास समाजात सरकारी मदतीने शिष्यवृत्त्या देण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले होते. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक चिंतन केजी टु पीजी अशा सर्व शिक्षण प्रक्रियेबाबत होते. शिक्षण हाच मानवाच्या प्रगतीचा मुळ गाभा आहे असा ठाम विश्वास वारंवार व्यक्त करतानाच वंचित समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गरजा भागविणे ही सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहेत हे त्यांनी स्पष्ट केले होते.

आजच्या शिक्षण पध्दतीतील खाजगीकरण, विनाअनुदान, अल्पमानधन, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, चारित्र्यहिनता, वेठबिगारी, शिक्षण व शिक्षकांच्या बाबतीत असलेली सरकारची उदासीन धोरणे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.



कु. कृष्णावेणी बिंगी
बी. ए. भाग - १

– माहितीपर लेख –

ऊर्मिला पवार

कु. श्रृतिका गडगी
बी. ए. भाग – १

ऊर्मिला पवार यांचा जन्म ७ मे १९४५ रोजी झाला. उर्मिला पवार ह्या एक मराठी लेखिका आहेत. त्यांचे मूळ गाव तळकोकणात आहे. पवार यांचे वडील शिक्षक होते. पण त्यांच्या लहानपणीच ते वारल्यामुळे आईला आयदान करीत चारितार्थ चालवावा लागला. त्यांचे एम.ए. चे शिक्षण झाल्यावर त्यांनी लिहायला सुरुवात केली. 'सहावं बोट' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९८८ मध्ये प्रकाशित झाला. दलितांचा इतिहास व सद्यस्थितीचा अभ्यास तसेच बौध्द धर्मग्रंथांचा मराठी अनुवाद अशा प्रकारचे लेखनही उर्मिला पवार यांनी केले आहे.

एकांकिका, समीक्षा असे लेखनप्रकार हाताळणाऱ्या उर्मिला पवार यांच्या 'आयदान' या आत्मकथनाने मराठी साहित्यातील आत्मकथेला ऐतिहासिक वळण मिळाले. आज दलित आत्मकथनांच्या प्रवासाची चर्चा 'बलुतं ते आयदान' अशीच केली जाते. उर्मिला पवार यांच्या कथा, आत्मकथनाची इंग्रजी, स्वीडीश या भाषामध्येही भाषांतरे झाली आहेत. ज्येष्ठ कथा लेखिका, स्त्रीवादी विचारवंत, डॉ. आंबेडकरी संशोधक म्हणून उर्मिला पवार यांना ओळखले जाते.

उर्मिला पवार यांनी अत्यंत कष्टातून शिक्षण घेतले. सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी केली. 'चौथी भिंत' १९८९, 'हातचा एक' २००४ हे कथा संग्रह प्रकशित झाले आहेत. आम्हीही इतिहास घडवला 'डॉ.आंबेडकरी चळवळीतील स्त्रीयांचे योगदान' संशोधन, 'उदान (पाली भाषेतील ग्रंथाचा अनुवाद) दोन एकांकिका– 'एल्गार पावन्यात बसा व मुक्ती' १९९६, मॉरिशस–एक प्रवास' १९३४ इत्यादी. स्त्रीजीवनाचा सम्यक वेध घेणारे हे समग्र लेखन महत्त्वाचे आहे.

'हातचा एक' या कथेत स्त्रीमनाची विविध भावस्पंदने आलेली आहेत. या कथेतील काकी आपले सगळे आयुष्य नवरा, मुले, कुटुबांच्यासाठी घालवते. मात्र तिची काळजी कोणाला नसते. नवऱ्याल्या किडणी देणारी काकी बेवारशासारखी एकटीच दवाखान्यात पडून विचार करते. आयुष्यभर कळसुत्रीच्या बाहुलीप्रमाणे होणारी तिची अवहेलना तिला अस्वस्थ करते. दुसऱ्यांसाठी जीवन जगताना आपलेही आयुष्य जपले पाहिजे. आयुष्याचा हातचा एक जपायला हवा. असा विचार मांडणारी ही अतिशय भावस्पर्शी कथा आहे. स्त्रीजीवनाचा तिच्या मनाचा तळ शोधण्याचा यशस्वी प्रयत्न उर्मिला पवार यांनी येथे केलेला आहे. कालसुसंगत कथानक, मोजके घटना–प्रसंग, जिवंत व्यक्तिरेखा, चांगली वातावरण निर्मिती व प्रवाही भाषशैलीमुळे प्रस्तुत कथा, लक्षवेधी ठरते. भारतीय स्त्रीमनाचे दर्शन घडविण्यात यशस्वी ठरते.

'आयदान' या त्यांच्या आत्मचरित्राला राज्य सरकारचे व सामान्य रसिकांचे अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. लहानपणी त्यांनी जगलेले जीवन त्यांच्या सारख्याच हजारो स्वप्नाळू ग्रामीण कुमारिकांचे वास्तवदर्शी जीवन व त्यांची स्वप्ने महत्वाकांक्षा, भावविश्व व समाजाकडून असलेल्या रास्त अपेक्षा या आत्मचरित्रात उत्कटपणे उमटल्या आहेत. याखेरीज ग्रामीण संस्कृतीचे महत्त्वाचे पापुद्रे हळुवार उलगडणारी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली व प्रकाशित केलेली आहेत. मराठी साहित्यातील आत्मकथेला ऐतिहासिक वळण मिळाले. आज दलित आत्मकथनांच्या प्रवासाची चर्चा ' बलुतं ते आयदान' अशीच केली जाते.

उर्मिला पवार यांना अनेक पुरस्कारने सन्मानित करण्यात आले यामध्ये २००४ सालचा 'प्रियदर्शनी अकादमी पुरस्कार' नाशिकच्या समाज प्रबोधन संस्थेचा 'प्रबोधनमित्र' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

१३ व १४ जानेवारी २०१३ रोजी धुळे येथे आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या उर्मिला पवार अध्यक्षा होत्या.

उर्मिला पवार यांनी लिहिलेली पुस्तके :

* डॉ. बाबासाहेब जीवन कालपट – सहलेखिका ५ डिसेंबर २००३ ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
* आम्हीही इतिहास घडवला : आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान (संशोधन), (सहलेखिका मीनाक्षी मून), पहिली आवृत्ती १९८९ स्त्री उवाच, दुसरी आवृत्ती सुगावा प्रकाशन.
* आयदान (आत्मकथन) २००३ पहिली आवृत्ती, २ मुद्रणे प्रकाशित ग्रंथाली, मुंबई.

आयदान (हिंदी भाषांतर) वाणी प्रकाशन, नवी दिल्ली.
* कोकणातील दलितांचे रीतीरिवाज आणि लोकगीते.
* दलित लेखिका आणि त्यांचे साहित्य (वैचारिक)
* दोन एकांकिका - एलान पावन्यात बसा बसा व मुक्ती (१९९६) समता प्रकाशन, मुंबई.
* सहावें बोट (कथा संग्रह) १९८८ साहित्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई.
* हातचा एक (कथा संग्रह) जुलै २००४, अक्षर प्रकाशन, माहिम मुंबई.
* मॉरिशस-एक प्रवास (प्रवास वर्णन) १९९४, सुगंधा प्रकाशन, मुंबई.

जीवनपट :-

महाराष्ट्र राज्यातील कोकण ह्या प्रांतात उर्मिला पवार यांचा जन्म झाला. त्यांच्या महार समाजातील लोक परंपरेने बांबूच्या कामट्याची सुपे, रोवळ्या टोपल्या विणण्याचे काम (आयदानाचे काम) करीत होते.

उर्मिला पवार म्हणतात त्यानुसार २००२ साली त्यांनी अबब ! हत्ती नावाच्या दिवाळी अंकात एक बाग लिहिला होता. तो छापून आल्यावर बाईंना आणखीन लिहावसे वाटले. 'चौथी भिंत' या पुस्तकात १९८९ साली त्यांनी लिहिलेली 'गोष्ट शैशवाची' ही गोष्ट छापून आली. त्यानंतर त्या अधिकाधिक लिहू लागल्या.

उर्मिला पवारांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते. लग्नानंतर त्या जिद्दीने पुढे शिकल्या. त्यांनी आंबेडकरी चळवळीत भाग घेतला, संघटना बांधल्या. त्यांनी मराठी वाङमय ह्या विषयात पदव्युत्तर पदविका मिळवली.

उर्मिला पवार पुढे महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीला लागल्या. उर्मिला पवार ११-१२ वर्षे वयाच्या असताना त्यांचे कुटुंब बौध्द झाले.

उर्मिला पवार यांच्या 'आयदान' या आत्मकथनात्मक पुस्तकाचे सुषमा देशपांडे यांनी नाट्य रुपांतर केले आहे. या नाटकाचे ५० हून अधिक प्रयोग झाले आहेत.

मान सन्मान / पुरस्कार : -
* मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार
* आयदानला पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने दिलेला 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार' उर्मिला पवार यांनी नाकारला. कारण सांगताना 'वर्णवादाला मसापचा नकार नाहीये. अशा संस्थेकडून पुरस्कार घेणं योग्य नाही. असं वाटलं, म्हणून मी मसापचा पुरस्कार नाकारला... मसापच्या सरस्वती पूजन आणि पसायदानाला माझा विरोध आहे.
* जुलै २००४ मध्ये मिळालेला 'प्रियदर्शन अकादमी ' चा २५००० रुपयाचा पुरस्कार...
* धुळे येथील झालेल्या ९१ व्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. हे संमेलन १३ व १४ जानेवारी २०१३ या दोन दिवसात भरले होते.
* नाशिकच्या समाज प्रबोधन संस्थेच्या वतीने रविवार, दि. २४ फेब्रुवारी २०१३ रोजी सटाणा येथे कवी कैलास पगारे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेत उर्मिला पवार यांना समाज प्रबोधन संस्थेचा राज्यस्तरीय 'प्रबोधनमित्र' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

- वैचारिकपर लेख -

उगाच टेन्शन कशाला घ्यायचं

कोणासाठी, किती, काहीही करा काही उपयोग नाही,
आयुष्य बिनधास्त जगायचे... कुणाचे वाईट करायचे नाही...
कुणाचे वाईट चिंतायचे नाही, कुणाच्या मागे वाईट बोलायचे नाही..
फक्त स्वतःशी प्रामाणिक राहुन जगायचं, काही कमी पडत नाही.
आणि फरक तर अजिबात पडत नाही.., कुणासाठी वाईट वाटून
घ्यायचं नाही... लोकांची विविध रुपे असतात.. सकाळी गोड
बोलतात आणि रात्री कुणी काही डोक्यात भरवले की
तोंड पाडून बसतात, ज्याच्याशी तुमचा काही संबंध पण नसतो...
आजकाल लोक देवावर पण नाराज होतात, तर तुम्ही कोण ?
कुणी कितीही वाईट बोलो किंवा वाईट करण्याचा प्रयत्न करो...
आपण त्याच्याविषयी तसेच इतरांविषयी चांगलेच बोलायचे..
आणि चांगलेच वागायचे... बोलण्यात स्पष्ट वक्तेपणा ठेवायचा...
कुणाच्या आयुष्यात डोकावयचे नाही आणि कुणाविषयी मागे वाईट
चर्चा करायची नाही. फक्त स्वतःबरोबर दुसऱ्यांचे हीत चिंतायचे...
कुणाच्या पुढेपुढे करायचे नाही...
जिंदगी मस्तीत पण शिस्तीत जगायची...
थंड पाणी आणि गरम इस्त्री जसे कपड्यांवरच्या सुरकुत्या घालवतात,
तसेच शांत डोके आणि उबदार मन आयुष्यातील चिंता घालवतात.
नेहमी हसत रहा....
हा सुंदर जन्म पुन्हा नाही... !

कु. अरुणा बंडी
बी. ए. भाग - ३

– माहितीपर लेख –

केशवसुत

कु. अंकिता दौलताबाद
बी. ए. भाग – १

आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी त्यांचे पूर्ण नाव कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली मासिकांचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सुचनेवरुन 'केशवसुत' या टोपण नावाचा स्वीकार केला . जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुड ह्या गावी झाला. शिक्षण केड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी शिक्षण झाले. याकाळात त्यांचा विवाह झाला. मॅट्रिक नंतर मुंबईला १८८० पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या (१८८९) केल्या.पुढे१८९७मध्ये प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले. आरंभी भडगावच्या नगरपालिकेच्या शाळेत दुय्यम शिक्षकाची नोकरी केली. १९०४ मध्ये धारवाडच्या सरकारी शाळेत मराठीचे शिक्षक म्हणून बदली झाली. १९०५ साली हुबळीला गेले असताना प्लेगने त्यांचे निधन झाले. त्यामागून आठच दिवसांनी त्यांची पत्नीही मरण पावली.

केशवसुतांनी विद्यार्थीदशेतच काव्यलेखनास आरंभ केला; असला तरी त्यांचा मुख्य काव्यरचना काळ १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपूरात असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा काव्य सहवास त्यांना लाभला होता. हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या. या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृतचा आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभावशून्य ठरले. परंतु इंग्रजीतील स्वच्छंदतावादी मनोवृत्तीच्या वर्डस्वर्थ शेली आणि किट्स या सारख्या कवीचे काव्यमात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले. इंग्रजी अभ्यासक्रमातून व वि. मो. महाजनांनी विविधज्ञानाविस्तारातून प्रकाशित केलेल्या भाषांतरावरुन इंग्रजी स्वच्छंदतावादी काव्य त्यांस काहीसे परिचित झाले होते. त्या काव्याच्या चिंतन मननातून केशवसुतांनी आत्मलेखनात्मक स्फुट भावकविता लिहिली व मराठी कवितेला इंग्रजी काव्यातील आत्मविष्काराचे नवे व क्रांतीकारक वळण दिले. त्यांच्या काव्यात व्यक्तिगत स्नेहसंबंध, कवी व कवित्व, स्त्रीपुरुषांतील प्रेम, निसर्ग, सामाजिक, बंडखोरी व गुढ (साक्षात्कारी) आढळतो. एका दृष्टीने स्वच्छंदतावादी मनोवृत्तीचाच विविध रुपांनी झालेला हा आविष्कार आहे. ह्या मनोवृत्तीचा आविष्कार मराठी काव्यक्षेत्रात निश्चित क्रांतीकारक ठरला, म्हणूनच केशवसुतांच्या संख्येने अल्प असलेल्या प्रत्येक प्रकारच्या काव्यरचनेला नंतरच्या काळात स्वतंत्र परंपरा लाभू शकली.

नवीन काव्याबरोबरच काव्यविषयक नवा दृष्टीकोन व नवी अभिरुची निर्माण करण्याची जबाबदारी नव्या कवींवर पडते. केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी 'स्फूर्ति' १८९९, 'आम्ही कोण' आणि 'प्रतिभा' १९०४ या महत्त्वाच्या आहेत. व्यापक मानवी जीवनाच्या संदर्भात कवी व कवित्व यांच्या कार्याची आदर्शवादी भूमिका केशवसुतांनी मांडलेली असल्यामुळे त्या भूमिकेत चिरंतन प्रेरकता जाणवते. त्यांच्या निसर्गाविषयक कवितांवर वर्डस्वर्थ व एमर्सन यांच्या विचाराचा परिणाम झालेला दिसतो. सुरातील सौंदर्य काव्याला प्रेरक ठरतो व तीत मानवी जीवनातील विषमतेचा अभाव असल्याने निसर्गसहवास सुखद ठरतो. अशा दृष्टीने केशवसुत निसर्गाकडे बघतात. 'भृंग' १८९०, 'पुष्पाग्रत' १८९२, 'फुलपाखरु' १९०० या त्याच्या काही महत्त्वाच्या निसर्गकविता होत.

प्रेमविषयक, आत्मनिवेदन करणाऱ्या कविताही केशवसुतांनी लिहिल्या. क्रांतीकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिध्द कविता म्हणजे 'तुतारी' १९९३, 'नवा शिपाई' १९९७, व 'गोफण केली छान ' १९०५, या होत. त्यांच्या १९९८, सामाजिक विचारसरणीची मुख्य तत्वे स्वातंत्र्य, समता म्हणजे पृथ्वीला 'सुरलोकसाम्य' प्राप्त करुन देण्याचे एक महान खूप त्यांच्या कांतदर्शी प्रतिभेने पाहिले होते. असे निर्देश त्यांच्या काही कवितांतून आढळतो. गुढ अनुभती व तिची नाविण्यपूर्ण अभिव्यक्ति असलेली 'झपूर्झा' १८९३, ही त्यांची कविता विशेष गाजली. त्यांच्या अन्य गुढगूंजनात्मक कवितांत 'म्हातारी' १९०१, व 'हरपले श्रेय ' १९०५, यांचा समावेश होतो. शैलीच्या दृष्टीने केशवसुतांच्या काव्यात लालित्य कमी आहे. पण काहीशी गळट आणि रांगडी अभिव्यक्ती त्यांच्या काव्यप्रकृतीशी सुसंगत ठरते.

– माहितीपर लेख –

आव्हानांचा सामना म्हणजेच जीवनाचा विकास !

कु. प्रियंका बिराजदार
बी. कॉम. भाग - २

मित्रांनो, आमच्या घरात वरच्या मजल्यापासून ते खालपर्यंत ६५ शिड्या आहेत. ज्यात वळणाच्या रुपात पाच अडथळे आहेत. अनेकदा मनात विचार येतो की, ही वळणे किंवा अडथळे नसते तर किती सोपं झालं असतं चढ-उतार करणं सोपं आणि लवकर झालं असतं. काही दिवसांपूर्वीची गोष्ट आह. जसं शिड्यांवरुन माझी मैत्रिण उतरु लागली, अचानक तिचा पाय घसला आणि वेगाने आठ शिड्या पार करत सरळ पहिल्या वळणावर आली. जर समजा शिड्यामध्ये वळणं नसती तर सर्व ४५ शिड्यांवरुन घरंगळत, आदळत - आपटत थेट जमीनीवर येऊन थांबली असती. आणि तिची काय अवस्था झाली असती याचा विचार ही न केलेला बरा. शिड्यांची वळणं असोत किंवा रस्त्यावर तयार केलेले गतिरोधक असोत, चौकात लागलेले सिग्नल असोत किंवा वाहनांच्या तपासणीतील उभारलेले तपासणी नाके हे आपल्या जीवनात अडथळे निर्माण करतात, पण सोबतच आपल्याला नियंत्रित करण्यात सहाय्यक ठरत असतात.

जीवनात अडथळेही आवश्यक आहेत. जीवनात जर अडथळे किंवा गतिरोधक नसतील तर आपण अमर्याद वेगाने धावायला सुरुवात करु आणि अनेक विविध प्रकारच्या दुर्घटनांना बळी पडू. लाल सिग्नल आल्यावर थांबणे आवश्यक आहे, पण यामुळे आपण अव्यवस्था आणि ट्रॅफिक जाम पासून वाचू शकतो. गतिरोधक आपल्या अनियंत्रित गतीला नियंत्रित करतात आणि ते आपला दुर्घटना होण्यापासून बचाव करतात. तपासणी नाका आणि विविध प्रकारच्या तपासणी एजन्सी नसत्या तर आपली असंविधानिक व अनैतिक कामे करण्याच्या शक्यता वाढल्या असत्या. कोणते ना कोणते भौतिक गतिरोधक किंवा मानसिक दबावामुळेच आपण अपेक्षित नियमांचे पालन करून चांगले नागरिक झालो आहोत. तसं पाहता आपण जीवनात अनियंत्रित होऊन सतत पळत राहिलो तर आपण किती पळू शकणार आहोत ? तसं पाहता आपण जीवनात अनियंत्रित होऊन सतत पळत राहिलो तर आपण किती पळू ? तियो टॉलस्टॉयच्या गोष्टीतील एक प्रमुख पात्र अधिक जमीन मिळविण्याच्या नादात पूर्ण दिवस अनियंत्रित वेगाने पळू लागतो पण अखेर त्याला आपले प्राण गमवावे लागतात.

धावल्यानंतर थकवा येणं स्वाभाविक आहे. आता विश्रांती घ्यावी असे ठरवणेही गरजेचे आहे. काम करुन थकल्यानंतर योग्य वेळी विश्रांती घेतली तर आयुष्याभर धावू शकतो. आणि जीवनाच्या शर्यतीत खरोखर आगेकूच करु शकतो. यासाठी विश्रामस्वरुपी गतिरोधक आवश्यक आहे. जीवनात सतत काम करत रहाल, पैसेही कमवाल पण शारिरीक स्वास्थ, मानसिक सतर्कता व भावनात्मक संतुलनाकडे लक्ष न दिल्यास सतत तणाव आणि चिंतेने ग्रासलेले असाल तर अशा कमाईचा काहीही उपयोग होणार नाही ? जीवनात संतुलन राखणे गरजचे आहे. जीवनात विविध प्रकारचे अडथळे किंवा बाधा संतुलन मिळविण्याच्या संधी प्राप्त करुन देत असतात. हे अडथळे सांगत असतात की, जीवनात बाहेरील अडथळ्याशिवाय अंतर्गत अथवा मानसिक अडथळ्यांना दूर करणे किती महत्वाचे आहे.

आपण आयुष्यात किती धावलो त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे की, आपण किती अडथळे पार केले. अडथळेरहित जीवनापेक्षा आव्हानयुक्त जीवन चांगले आहे. कारण आव्हानाचा स्वीकार करण्यातच जीवनाचा वास्तविक विकास शक्य आहे.

आव्हानांशिवाय आपण कोणतीही नवी गोष्ट शिकू शकणार नाही. किंवा विषम परिस्थितीत त्याच्याशी झगडण्याचा संकल्प किंवा साहस आपण करु शकणार नाही. अडथळे आपल्या मागे वळून पाहण्यात आणि आत्मपरिक्षण किंवा पुनर्मुल्यांकन करण्याची संधी देत असतात. म्हणून जीवनात नेहमी प्रयत्न करा, तुम्हाला अडथळे येतात व तुमच्या प्रयत्नाने पुन्हा अडथळे जातील नक्कीच आव्हानांचा सामना करा म्हणजेच जीवनाचा वास्तविक विकास होईल.

– माहितीपर लेख –

सफर इंटरनेटची

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

इटंरनेट हे संगणकांच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्कचे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क आहे. (अनेक वर्तमानपत्रे व मासिकात इंटरनेटला 'आंतरजाल' हा शब्द वापरलेला आढळतो 'महाजाल' हे इलेक्ट्रॉनिक संपर्काच्या काही जागतिक प्रमाण अशा प्रोटोकॉल्स (इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीतील माहिती देवणा-घेवाणीची प्रमाण संवाद पध्दती) वर चालते इंटरनेट हे केवळ एकच एकसंघ असे नेटवर्क नसून ते अनेक लहान नेटवर्कनी बनलेले आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून अनेकविध प्रकारच्या माहितीची देवाण-घेवाण जोडलेल्या संगणकांना करता येते. काही सर्व सामान्य वापराची उदाहरणे म्हणजे इलेक्ट्रॉनिक पत्रे, (ई-मेल) वर्ल्डवाईड वेब पेजेस, लोकांशी गप्पा मारणे (चॅटिंग) इत्यादी

आपण आपल्या दैनंदिन जीवनात नियमितपणे इंटरनेट वापरतो. हे सामान्य लोकांसाठी आधुनिक विज्ञानाची भेट आहे. कल्पना आणि माहितीच्या देवाण-घेवाणीच्या क्षेत्रात जगभर क्रांती घडवून आणली आहे. हे माहितीचा जागतिक महामार्ग तयार करते आणि जवळ-जवळ सर्व देशांना व्यापते. हे उपलब्ध आहे. जलद, सोपे, स्वस्त आणि बहुविध रोजच्या मानवी जीवनाचे सर्व क्षेत्र इंटरनेटद्वारे जोडली आहेत. व्यवसायकर्ते इंटरनेटवरुन आपला व्यवसाय अतिशय वेगाने विकसित करु शकतात. बरेच व्यापारी ऑनलाईन त्यांची उत्पादने ऑनलाईन विकतात.

विद्यार्थी त्यांना आवश्यक शैक्षणिक माहिती मिळवू शकतात. आम्ही नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज करु शकतो. आपण इंटरनेटद्वारे प्रतिमा आणि व्हिडिओ सामायिक करु शकतो. इंटरनेटवर लक्ष ठेवायला आणि त्याचा वापर नियमित करायला कुठलीच केंद्रीय समिती नाही. प्रत्येक भागीदार जाळे (नेटवर्क) आपापले धोरण निश्चित करत असतो. आपल्या दैनंदिन आयुष्यात इंटरनेटचा वापर इंटरनेट संगणक नेटवर्कची एक जागतिक संस्था आहे. जेव्हा एखादा इंटरनेट वर असतो. तेव्हा त्या व्यक्तित्च्या समूहाचा एक भाग बनतो तो संगणकाचा वापर त्यांचे विचार आणि माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी करतो.

इंटरनेटचे फायदे :- १) ई-मेल आणि सोशल मिडिया अशा माध्यमांद्वारे आपण तत्काळ संदेश पाठवू आणि प्राप्त करु शकतो. जे संप्रेषण रिअल टाईम बनवते.

२) जलद व्यवहार :- इंटरनेटने ऑनलाईन व्यवहार सक्षम केले आहेत. जे पूर्ण होण्यास वेळ लागत नाही. ३) खरेदी सुलभ आणि सोयीस्कर बनवते. ४) इंटरनेट मनोरंजनासाठी सर्वात सोपा मार्ग आहे.

इंटरनेटचे तोटे :- १) कमी गोपनीयता - इंटरनेटमध्ये कमी गोपनीयतासह देखील आली आहे. २) सोशल मिडियाच्या आगमनानंतर लोक इंटरनेट व्यसनाधीन झाले आहेत. जसजसे लोक अधिकाधिक वेळ ऑनलाईन व्यतीत करतात. त्यामुळे वेळेचा अपव्यय होऊ शकतो. ३) इंटरनेटवर अवलंबून राहण्यामुळे उत्पादकता कमी झाली आहे. इंटरनेट प्रत्येकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे इंटरनेटचा व्यवस्थित वापर केला पाहिजे. याचा उपयोग विकासाठी केला पाहिजे हे युग तंत्रज्ञानाच्या विकासाचे आहे आणि इंटरनेट हे या युगाचा पाया आहे.

– माहितीपर लेख –

कवी वसंत बापट
एक प्रतिभावंत कवी

कु. श्रुती कोल्हापूरे
बी. ए. भाग-२

विश्वनाथ वामन बापट उर्फ वसंत बापट यांचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथे झाला. त्यांचे मुळ गाव हे रत्नागिरीतील गोपाळ गाव हे होते. नंतर ते पुण्यामध्ये स्थायिक झाले. वसंत बापट यांचा जन्म एका सुशिक्षित व सुसंस्कृत कुटुंबात झाला. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला वैशिष्ट्यपूर्ण आकार मिळाला.

कवी वसंत बापट यांचे बडील ब्रिटिश काळातील न्यायाधीश असल्यामुळे त्यांच्या नोकरीमुळे बापटांच्या शिक्षणाची सुरुवात बेळगाव मधून झाली व त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण एल.पी.कॉलेज,पुणे येथे पूर्ण झाले. वसंत बापट हे बी. ए. ला असताना १९४२ ची चळवळ सुरु झाली. ब्रिटिश विरोधी चलेजाव चळवळीत नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेल्या वसंत बापटांनी उडी मारली. त्यामुळे बापटांचे शिक्षण अर्धवट झाले व पुढे बापटांनी सोडून दिलेले शिक्षण संस्कृत व मराठी विषयात एम. ए. पदवी मिळवून पूर्ण केले. वसंत बापट हे मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

कवी वसंत बापट यांच्या जडणघडणीवर समाजाचा व राष्ट्राचा प्रभाव पडला होता. वसंत बापट आपल्या जडणघडणीत राष्ट्रीय सेवेचा सहभाग सांगतात. वसंत बापट यांना संस्कृत वाङ्मयाची गोडी लागली होती. ते नॅशनल कॉलेज (बांद्रे) आणि रामनारायण रुईया कॉलेज (माटुंगा) ह्या मुंबईमधील महाविद्यालयात ते मराठी व संस्कृत विषयाचे प्राध्यापक होते. पुढे संस्कृत हे त्यांच्या व्यासंगाचा विषय बनला. कवी वसंत बापट यांच्या प्रारंभीच्या काळात त्यांच्या कवितेवर कुसुमाग्रजांच्या काव्यांचा प्रभाव जाणवतो व हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. कवी हा एकांतप्रिय असतो. परंतु वसंत बापट समाजप्रिय व समाजात वावरणारे कवी होते.

वसंत बापट यांचा जीवनविषयक दृष्टिकोन त्यांच्या वाङ्मयीन भूमिका समजण्यासाठी सहाय्यक ठरतो. वसंत बापटांनी निसर्ग, प्रेम, राष्ट्र भक्ती, प्रवासाच्या कविता अशा अनेक विषयावर कविता लिहिल्या आहेत. एवढेच नाही तर त्यांनी साधना साप्ताहिकेचे संपादक म्हणून कार्य केले. कवी वसंत बापट यांचा साहित्य क्षेत्रात खूप मोलाचा वाटा आहे. त्यांनी गद्य व पद्य अशा दोन स्वरुपातून लेखन केले आहे. त्यांच्या काव्य लेखनाची सुरुवात बिजली ह्या १९५२ ला प्रकाशित झालेल्या संग्रहातून झाली. त्यानंतर सेतू (१९५७), अकरावी दिशा, सकीना, मानसी, प्रवासाच्या कविता, शिंग फुंकीले रणी, शूर मर्दाचा पोवाडा, मेघहृदय, तेजसी, राजसी, रसिया तसेच शततारका अशा निवडक कवितांचा संग्रह प्रकाशित झाला. त्या बरोबरच बापटांनी बालकविता व बालनाट्य स्वरुपाचे लेखन ही केलेले आहे. बालकवितेत चंगा - मंगा, अबडक - तबडक, आम्ही, फिरकी, गरगर गिरकी, फूलराणीच्या कविता असे सहा संग्रह प्रकाशित आहेत. या सर्वातून आपल्याला वसंत बापट यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व दिसून येते. स्वतंत्रोत्तर काळातील ते एक महत्वाचे कवी ठरले, आणि अशा ह्या अष्टपैलू - व्यक्तिमत्वाचे १७ सप्टेंबर २००२ रोजी पुणे येथे वयाच्या ८० वर्षी निधन झाले.

– माहितीपर लेख –

मुक्तिबोध

कु. आरती गुंडला
बी. ए. भाग - १

मुक्तिबोध शरदचंद्र माधव हे कवी, समीक्षक, कादंबरीकार होते. त्यांचा जन्म २१ जानेवारी १९२९ साली झाला. त्यांचे जन्मस्थळ इंदूर हे आहे. मार्क्सवादी जाणिवेचे मराठीतील एक प्रमुख साहित्यिक याचे शिक्षण एम. ए., एल एल. बी. पर्यंत झाले आणि नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयामध्ये त्यांनी अध्ययन केले. मार्क्सवादी वैचारिक आणि सैध्दांतिक अधिष्ठानावर ललित लेखन आणि समीक्षात्मक/वैचारिक लेखन करून शरदचंद्र मुक्तिबोधांनी मराठी साहित्यविश्वात स्वतःचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. 'नवी मळवाट' हे त्यांचे कवितेचे पहिले पुस्तक १९४९ मध्ये प्रकाशित झाले. पहिली 'क्षिप्रा' कादंबरी ही १९५४ मध्ये प्रकाशित झाली आणि पहिले समीक्षात्मक पुस्तक 'काही निबंध' १९६२ मध्ये प्रकाशित झाले. आपल्या लेखनाच्या पूर्वपर्वातच शरदचंद्र मुक्तिबोधांनी कविता, कादंबरी आणि समीक्षा या प्रांतात आपला अधिकार प्रस्थापित केला होता. ह्या तिन्ही बाङमयात मुक्तिबोध एकाच वेळी लेखन करीत. * ग्रंथ संपदा :- जन हे वोळतु जेथे (कादंबरी), नवी मळवाट (कवितासंग्रह), यांत्रिक (कवितासंग्रह), सत्याची जात (कविता संग्रह), सरहद्द (कादंबरी), सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य (समीक्षात्मक), मुक्तिबोधांची निवडक कविता (कवितासंग्रह), क्षिप्रा (कादंबरी), शरदचंद्र मुक्तिबोध यांच्या काव्याबद्दल मुलगामी चर्चा त्र्यं. वि. सरदेशमुखांनी त्यांच्या 'अंधारयात्रा' या पुस्तकात केली आहे. * पुरस्कार :- * '१९७९ सालची साहित्य अकादमी पुरस्कार सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमुल्य' या ग्रंथाबद्दल संपादक - तावरे, डॉ. स्नेहल २००७, वैदर्भी प्रतिभा,पुणे, स्नेह वर्धन प्रकाशन. * शरदचंद्र माधव मुक्तिबोध (१९२१-२१ नोव्हेंबर १९८४) हे एक मराठी कवी , कादंबरीकार आणि समीक्षक होते. नागपूर विद्यापीठातून १९४७ साली एम. ए. झाल्यावर ते महाराष्ट्र सरकारच्या भाषा संचालनालयात उपसंचालक म्हणून लागले. नोकरी पश्चात ते नागपूर महाविद्यालयात प्राध्यापक झाले. आणि तेथून १९७९ मध्ये सेवानिवृत्त झाले.

शरदचंद्र मोठे बंधू गजानन माधव मुक्तिबोध हेही हिंदीतले कवी आणि साहित्यिक होते. मुक्तिबोध हे कवी, कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून ओळखले जातात. आपल्या साहित्यातून नव्या जाणीवांना व्यक्त करण्याचा त्यांचा ध्यास होता. मानुषतेचे मुल्य त्यांनी जपले होते. मुक्तिबोधांची जीवननिष्ठा त्यांच्या साहित्यातूनही प्रतिबिंबीत झालेली प्रत्ययाला येते. वडिलांच्या अग्रहास्तव एम.ए. नंतर त्यांनी एलएल.बी. केले. सुजलापूर, उज्जैन, जबलपूर इ. ठिकाणी त्यांनी शिक्षक म्हणून काम केले आणि काही काळ वकिलीही केली. नागपूरच्या भाषाविभागात काही काळ सहाय्यक संचालक म्हणून काम केल्यानतंर नागपूर महाविद्यालयात ते मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. आणि याच संस्थेतून विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. दि. २ ऑक्टोबर १९८६ रोजी नागपूर या त्यांच्या कर्मभूमीतच दम्याच्या विकाराने त्यांचा मृत्यू झाला.

– आत्मकथनात्मक लेख –

मी यशस्वी होणारच !

कु. अनिता आवार
बी. कॉम. भाग-३

कोणतेही विचार मनात येणे फार सोपे आहे. पण त्याचे संकलन अवघड, लिहीणे त्यातूनही अवघड व त्याप्रमाणेच वागणे फारच अवघड असते. पण कोणतेही अवघड काम वेगळेपणाने केल्याशिवाय यश कसे मिळवणार ? यश कोणाला नको आहे ? एवढ्याशा आयुष्यात खूप काही हवं असतं '' सगळंच काही हवं असतं, पण पाहिजे ते मिळत नसतं. पाहिजे ते मिळालं तरी त्यातही कमी असतं.चांदण्यांन भरुन सुध्दा आभाळ सारं मोकळ असतं. एखादं नक्षत्र असच येतं सगळं आभाळ भरुन टाकतं.

यश ही अशीच गोष्ट आहे की ती प्रत्येकाला आपल्या आयुष्यात हवीहवीशी वाटते. अगदी मलासुध्दा पण ती प्रत्येकाच्या वाट्याला येतेच असे नाही. अर्थात ती दुर्मिळ आहे असे नाही. महात्मा गांधी, मदर तेरेसा, सचिन तेंडुलकर यांच्यासारखी माणसे यशस्वी झालेली आहेत ते आपल्या कर्तृत्वाने...कौटुंबिक पार्श्वभूमीवर यश अवलंबून असते तर सर्व यशस्वी व्यक्तिंची मुले यशस्वी झाली असती पण तसे होताना दिसत नाही. मी शुन्यातून वर आलो असे सांगणारे लोक यशस्वी झालेले दिसतात. तीच गोष्ट आर्थिक परिस्थितीची आहे. यश म्हणजेच केवळ 'श्रीमंती' नाही. यश प्राप्तीसाठी शिक्षण आवश्यक आहे. पण शिक्षण घेतल्याने यश आपोआप येते असे नाही. अगदी अशिक्षित तरीही जीवनात यशस्वी अशी असंख्य माणसे दिसतात. कौटुंबिक पार्श्वभूमी व उच्च शिक्षण नसतानाही या समाजात अनेक यशस्वी माणसे दिसतात तर परीक्षेत नेहमीच वरचा नबंर असणाऱ्या कित्येक हुशार विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात यशस्वी होण्याचे तंत्र गवसत नाही.

बोलणाऱ्यांची कारली खपतील पण न बोलणाऱ्यांची वांगी सुध्दा खपत नाहीत अशी एक म्हण आहे. याचा अर्थ असा की, जो उत्तम बोलतो तो यशस्वी होतो. असे असले तरी सर्वच 'उत्कृष्ट वक्ते' जीवनाच्या धक्काबुक्कीत यशस्वी होत नाहीत. असे म्हणता येईल की बरेच जण अयशस्वी होण्याची आखणी करतात असे नाही तर यशस्वी होण्याची करावी लागणारी 'आखणी व नियोजन' करण्यात अयशस्वी होतात.

माझ्या दृष्टीने मी मानते की यशासाठी सर्वप्रथम ध्येय पाहिजे तरच ते प्राप्त करण्याच्या मार्गावर चालून व्यक्ती यशस्वी होऊ शकते. यशस्वी होण्यासाठी जसे ध्येय पाहिजे तसे प्रयत्नही पाहिजे. अ प य श म्हणजे एखादी गोष्ट 'जवळजवळ' बरोबर करणे व यश म्हणजे ती गोष्ट १००% अचूक करण्याचे ध्येय बाळगणे व तशी स्वप्ने रंगविणे हे यशस्वी होण्यासाठी आवश्यक असते. हे सर्व करताना 'मी' यशस्वी होणारच' हा आत्मविश्वास हवाच. आपण पराभूत होणार अशी भावना बाळगून बसलो तर आपला पराभव निश्चित आहे. असे ठरविल्यासारखे होईल. आपण धाडस करायचे नाही असे ठरविले तर धाडसी पाऊल पडणारच नाही. तात्पर्य :- यशस्वी माणसे वेगळे काही करत नाहीत पण तीच गोष्ट ते वेगळ्या पध्दतीने करतात.

– माहितीपर लेख –

जीवन एक रंगभूमी

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

जीवन एक रंगमंच आहे. खरचं रंगमंचाची अजब तऱ्हा असते. रंगमंच हा सौदागर आहे. माणसाला खूप खोलवर लोभात पाडत असतो.जीवन एक रंगमंच आहे. इथे कितीतरी अभिनय आयुष्यात करावे लागत असतात. जीवन एक रहस्यमयी रंगमंच आहे. इथे दैनंदिनी दिवस उगवताच अभिनयाला सुरुवात होते जेव्हा झोप लागते तेव्हाच संपते. प्रत्येक व्यक्ती हा जीवन जगत असताना, आपल्या जीवनाच्या रंगमंचाचा नट असतो. आपल्या जीवन प्रवासात सहप्रवासी खूप मोठी भूमिका निभावत असतात. त्यांचे पडसाद आपल्या मनावर खोल उमटतात व संघर्षमय जीवनात ध्येयवादासाठी आपल्या स्वप्नांसाठी झटतांना अनेक वेळा रंगमंच साकार करावा लागत असतो. आपली माया कधी अभिनय करायला लावत असते. कधी समाजात वागताना अभिनय करायला लावते. अनेक व्यक्ती तितक्या क्लृप्त्या असतात. आपापल्या संसारात प्रत्येक व्यक्ती रंगमंचाचा बादशहा रंगमंचावर वावरत असतो.

नोकरीत आपल्या बॉसची मर्जी सांभाळणे. आप्त स्वकीयांचीही मनस्थिती ओळखून किंवा बाहेर मित्र मंडळीची. प्रतिष्ठित लोकांशी कसे बोलायचे कसे वागायचे याची कसरत करीत असताना वेळोवेळी अभिनय करीत असतो. जीवनात जगत असताना अनेक जबाबदाऱ्या असतात, कुणालाच वेळ नसतो. त्यात रुसवे फुगवेही असतात. एकत्र कुटुंब पध्दतीत आग्रह दुराग्रह या गोष्टींना समोर जायला रंगमंच गाजवावा लागत असतो. या अनमोल जीवन रंगमंचावरील आपण सारे कलाकार आहोत. आपण कसे जगले पाहिजे. तो अधिकार निसर्गातच आपल्या सर्वांना मिळाला आहे. आपापसातील सारे भेदभाव, रागलोभ, मत्सर विसरुन एक सुंदर वलय आपल्या भोवती निर्माण करुन आपल्या जीवनाला योग्य वातावरण देऊ शकतो. आणि सदृढ आत्मविश्वासाने जगण्याचा शंभर टक्के अट्टाहास करु शकतो आणि आपले जीवन सार्थकी लावू शकतो. मानव जन्म पुन्हा भेटणारा नाही. एवढे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून या अद्वितीय सुरेख मंचावर मनाचे राज्य हसत केले पाहिजे. आपण पृथ्वीवर भार होऊ नये. जीवनाशी नाउमेद किंवा उदास होऊ नये. प्रयत्नांती परमेश्वर देखील मिळतो. आपलं लक्ष्य नजरेसमोर ठेवून नीत्यकर्म करत राहायला पाहिजे. आपण निसर्गाकडून शिकवण घेऊ शकतो. जसा सूर्य नियमित उगवतो. रात्र आणि दिवस न चुकता होत असते. आकाशात असंख्य चांदण्या उगवतात.

मानवच काय प्राणीसुध्दा नियमात राहतात. पावसाळ्यात ढगांचा गडगडाट होतो, विजेचा लखलखाट होतो. पक्ष्यांचा किलबिलाट होतो. तसाच जीवनात सुखदुःखाचा बोलबाला असतो. न घाबरता या जीवन रंगमंचावर आपला ठसा निर्माण करण्यासाठी सारखे झटत रहावे व आनंदाने जीवनाच्या रंगमंचावर धाडसाने जगावे.

– माहितीपर लेख –

स्वप्ने नसती तर...

कु. दिपाली विटकर
बी. ए. भाग - २

'स्वप्ने नसती तर...' काय झालं असतं? असा प्रश्न मी माझ्या मैत्रिणीला विचारला, तर तीने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिलं की, 'तर मला गाढ झोप लागली असती' कारण ती नेहमी सांगत असते की मला रात्री स्वप्ने पडतात त्यामुळे माझी रात्री झोप होत नाही. प्रत्येकालाच रात्री स्वप्ने पडत असतात आणि ही स्वप्ने अशी स्वप्ने असतात की, ज्या स्वप्नात आपण पूर्णपणे रममाण झालेलो असतो. ते स्वप्न, दुसऱ्याच क्षणाला जाग आल्यावर जरासुध्दा आठवत नाही, जर काही आठवले तर त्याचा अर्थ लागत नाही. म्हणजे स्वप्न आणि जग यामध्ये अशीही एक अदृश्य रेषा असते.

स्वप्ने माणसाच्या जीवनाला अर्थ देतात. माणूस स्वप्न पाहतो आणि ते पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतो. काहींची स्वप्ने पूर्ण होतात तर काहींची अपूर्ण राहतात. प्रत्येकाची आपल्या जीवनातील स्वप्ने वेगळी असतात. त्याप्रमाणे प्रत्येकजण आपल्या जीवनात वाटचाल करत असतो. ज्यांची स्वप्ने पक्की असतात, त्यांना त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी कितीही अडथळे आले तरी त्यांना पार करुन ते आपण पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास नेतात; आणि तेव्हाच काहीतरी अनमोल साकार होते.

स्वप्ने नसती तर आज झालेला आपला विकास झालाच नसता. आज आपण विज्ञानाच्या जगामध्ये जगत असताना विविध साधनांचा दैनंदिन जीवनामध्ये वापर करतो. ही साधने बनवण्याची स्वप्ने ज्या लोकांनी पाहिली ती सत्यात उतरवली. म्हणूनच आपण ती साधने वापरु शकत आहोत. माणसाने पंख नसताना सुध्दा अवकाशात उडण्याचे स्वप्न पाहिले आणि त्याने विमानाचा शोध लावला. ही स्वप्नेच नसती तर आजपर्यंत लागलेले विविध शोध लागलेच नसते.

स्वप्ने नसती तर आपली जणू प्रगतीच झाली नसती. आपल्या जीवनाला अर्थच उरला नसता. स्वप्ने पाहण्यात आणि ती पूर्ण करण्यात काही वेगळाच आनंद असतो. आपण पाहिलेली स्वप्ने जेव्हा सत्यात साकार होतात तेव्हाचा तो क्षण अविस्मरणीय क्षण असतो. जर स्वप्ने नसती तर हे क्षण जगता आले नसते. म्हणून स्वप्नांचे आपल्या जीवनामध्ये एक महत्वाचे स्थान आहे.

कविता विभाग

सिनेमातीलं फक्त

दोन दोन मिनिटाला
वेगळा वेगळा ड्रेस
प्रत्येक शॉटला वेगळेच केस...
आपल्याला काही
हे शक्य नसते. कारण...
सिनेमातले फक्त
सिनेमातच असतं
सिनेमातलं पोरगं
पाय-या उतरत-उतरत
मोठं होतं.
पण आपल्या आयुष्याची
वर्ष मात्र मोजता मोजताच
सरतात. कारण...
सिनेमातलं फक्त
सिनेमातच असतं
मैं तुझे मार डालूंगा ।
मैं तेरा बदला लूंगा ।
असं आपण म्हणायचं
नसतं. कारण...
सिनेमातलं फक्त
सिनेमातच असतं.
अभिषेक असी मारतो कीक
जॉन करतो गाडी स्लिप
पण, आपण असं काही
करायचं नसतं
नाहीतर कुठलंतरी हाड
मोडून बसतं कारण...
सिनेमातलं फक्त सिनेमात असतं
म्हणूनच कधीही प्रत्यक्ष जीवनात
सिनेमाप्रमाणे वागायचे नसतं
वडिलाधा-याच्या मार्गदर्शनाखाली
चागलं तेच शिकायचं असतं
कारण सिनेमातलं फक्त
सिनेमात असतं.

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

आई

शिकवणारे जगात खूप असतात.
पण, खरी शिक्षण देणारी आई असते
सारेच जण समजवणारे असतात
पण अश्रू पुसणारी आई असते.

पाळणा हलविणारे खूप असतात
पण, अंगाई गाऊन निजवणारी
आई असते.
तिच्या सारखी जगी मूर्ती नाही.
आई, ती फक्त आई असते.

पंक्तीत वाढणारे खूप असतात
पण घास, भरवणारी आई असते
बोलवणारे खूप असतात, जगात
पण, जवळ घेणारी आई असते.

पाहणारे खूप असतात मंचावर
पण, कौतुक करणारी आई असते.
टाळ्या हजारो वाजवतात
पण, आशीर्वाद देणारी आई असते.

कु. प्रिती चव्हाण
बी. कॉम. भाग - ३

ट्वेंटी - ट्वेंटी

पहिला महापूर नंतर महामारी
हे ट्वेंटी - ट्वेंटी लय विषारी ।

कोरोना काय जास्त टिकणार नाय, पण
जग ट्वेंटी - ट्वेंटी ला विसरणार नाय ।

महापुरात सगळं वाहून गेलं
महामारीत सगळं राहून गेलं
ट्वेंटी - ट्वेंटी मात्र लक्षात राहील ।

महापूरात घराबाहेर पडलो
महामारीत घरातच राहिलो
या ट्वेंटी - ट्वेंटी कडून खूप काही शिकलो ।

या ट्वेंटी - ट्वेंटी च्या मॅच मध्ये
या संकटाच्या सीरिजमध्ये
डॉक्टर मॅन ऑफ द मॅच आणि
पोलीस मॅन ऑफ द सिरीज

कु. वेन्नला बुधारम
बी. कॉम. भाग - २

आईची आठवण

डोळ्याची पापणी होऊन
प्रकाश तू देत असतीस
माझ्या स्वप्नांना रंगांची
सारं तूच असतीस आई ।
माझ्या पाऊलात पाऊल घालून
माझ्या सोबत सावली बनून
चालत असतीस
कधी सोडून नको जाऊ
मला या नवख्या जगात ।
बहरात जीवन तुझ्यात साक्षीनं
येईल मोल आई म्हणून
पुन्हा पुन्हा स्मरण व्हावे
तुझे जीवनी गीत व्हावे...

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

बाबा

सगळे म्हणती आईची वेडी माया
तरी बाप असतो संपूर्ण कुटुंबाचा पाया
माया बाबांची असते नारळ खरे
राग आला जरी वर आतून प्रेमाचे झरे
कुटुंबासाठी बाबा राबतात दिनरात
देह झिजे त्याचा जळते जशी दिव्याची
वात ढाल बनूनी बाप उभा राहिला दारात
मी ना कोणाची उगाच येण्या घरात
माया बाबांची असते कस्तुरीपरी
दिसली नाही वरून जरी जाणावी
ती अंतरी येईल वृध्द पणी जेव्हा बाबांसाठी
व्हा तुम्ही त्यांच्या आधाराची एक काठी ।

कु. वैष्णवी मित्रा
बी. कॉम. भाग - १

मानस

ए. आर. बी. एम. चे महत्त्व जाणले
अन् सोलापूरच शिक्षणासाठी चांगले
असे म्हणावे लागले.

संस्काराची साथ ध्येयाची ओढ
मिळे परिश्रम व जिद्दीची जोड
कष्टाची किंमत न्यारी
मिळे मग समृध्दी भारी

कॉलेजची शिस्त न्यारी
मोबाईलशी वाकडे भारी
निरंतर अभ्यास धडे परी
स्वप्नांचे आकाशद्वार उघडे सारी

झेप ती विकासाकडे
होईल प्रगती सगळीकडे
जीवनाला अे.आर.बी.एम.ने
घडविले आयुष्याचे ध्येय गवसले

महत्त्व हे अे.आर.बी.एम.चे
ऋण ते फेडेन समाजाचे
पूर्ण होईल स्वप्न हे
समृध्दीपूर्ण राष्ट्राचे ।

कु. अनिता आयार
बी. कॉम. भाग - ३

मन

मन मनास उमगत नाही, आधार कसा शोधावा
स्वप्नातील पदर धुक्याचा, हातास कसा लागावा

मन थेंबांचे आकाश, लाटांनी सावरलेलं
मन नक्षत्राचे रान अवकाशी अवतरलेलं
मन गरगरते आवर्त, मन राजभूल, मन चकवा
मन मनास उमगत नाही, आधार कसा शोधावा

मन काळोखाची गुंफा, मन तेजाचे राऊळ
मन सैंतानाचा हात, मन देवाचे पाऊल
दुबळ्या गळक्या झोळीत हा सूर्य कसा झेलावा
मन मनास उमगत नाही. आधार कसा शोधावा

चेहरा - मोहरा याचा, कुणी कधी पहिला नाही.
मन अस्तित्वाचा सिंधु भासाविण दुसरा नाही
या ओळखी नात्याचा, कुणी कसा भरवसा द्यावा

मन मनास उमगत नाही, आधार कसा शोधावा
स्वप्नातील पदर धुक्याचा, हातात कसा लागावा...

संकलन
कु. श्रावंती म्याकल
बी. कॉम. भाग - १

मी कुणाला कळलो नाही

मित्र कोण आणि शत्रू कोण
गणित साधे कळले नाही...
नाही भेटला कोण असा
ज्याने मला छळले नाही...
सुगंध सारा वाटीत गेलो
मी कधीच दरवळलो नाही...
ऋतू नाही असा कोणता
ज्यात मी होरपळलो नाही...
केला सामना वादळाशी
त्याच्या पासून पळलो नाही...
सामोरा गेलो संकटांना
त्यांना पाहून पळलो नाही...
पचऊन टाकले दुःख सारे
कधीच मी हळहळलो नाही...
आले जीवनी सुख जरी
कधीच मी हुरळलो नाही...
कधी ना सोडली कास सत्याची
खोट्यात कधीच मळलो नाही...
रुसून राहिले माझ्या अगदी
जवळचेच पण
मी कुणाला कळलोच नाही...!
मी कुणाला कळलोच नाही...!

संकलन
कु. लता मिट्ठा
बी. कॉम. भाग - १

नशीब

जी माणसं हवीशी वाटतात,
ती कधीच भेटत नाहीत.
जी माणसं नकोशी वाटतात,
त्यांचा सहवास संपत नाही.
ज्यांकडे जावेसे वाटते,
त्याच्याकडे जायला जमत नाही.
ज्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते,
त्यांच्याकडे जावेच लागते.

जेव्हा जीवन नकोसे वाटते,
तेव्हा काळ संपत नाही.
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो,
तेव्हा काळ संपलेला असतो.
नाही हे असचं असतं
त्याच्याशी जपून वागावे लागते
येथे कोणाचेही चालत नाही
जिकडे नेईल तिकडे जावेच लागते.

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

आई

एकमेव स्त्री जी माझा चेहरा
बघायचा आधीपासून
माझ्यावर प्रेम करते...

बाबा

एकमेव माणूस जो
माझ्यावर स्वतः पेक्षाही
जास्त प्रेम करतो.

कु. वैष्णवी मिट्ठा
बी. कॉम. भाग - १

जीवन असंच जगायचं असतं...

थोड दुःख, थोड सुख झेलायचं असतं,
कळी सारखं सुंदर फुलात उमलायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं...
वाऱ्यासंगे भिरभिरायचं असतं,
उन्हासंगे तळपायचं असतं,
पावसासंगे बरसायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं...
अत्तरासंगे दरवळायचं असतं,
भुंग्यासोबत गुणगुणायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं...
फुलपाखरासंगे फिरायचं असतं,
सप्त रंगात डुबायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं...
भुतकाळासंगे आठवायचं असतं,
वर्तमानासंगे खुलायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं...
दुःखाला जवळ करुन भविष्यकाळ
घडवायचा असतो,
जीवन असंच जगायचं असतं...

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

आई

आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आई बरसी लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्व मोठे

जीवन हे शेत तर आई म्हणजे विहिर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामचं काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातील छत्री
आई तू थंडीतील शॉल
आता वावीत दुःखे खुशाल

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी

आई म्हणजे आरतीत वाजवावी अशी तय बद्द टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी...

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

ज्ञानज्योती सावित्रीबाई

धन्य तिचे उपकार
धन्य तिची माया
आजच्या स्त्रीमध्ये दिसे ग,
सावित्रीची छाया...
गोर-गरीब, दीन-दुबळ्यांचा
झाला जिने आधार
स्त्री -शिक्षणाचा पूर्वी
नव्हता महिलांना अधिकार

जिच्यामुळे शिकते आहे
आज प्रत्येक नारी तिची आहे
क्रांती ज्योती सवित्रीबाई
स्त्री शिक्षणाचा उचलला
जिने विडा सवित्रीबाई
क्रांतीज्योती म्हणूया तिला

करुनि वंदन तुजला
धन्य झालो आम्ही
भारत देशाचा अभिमान
आहे तूच माय माऊली
तूच माय माऊली...
धन्य तिचे उपकार
धन्य तिची माया
अशीच राहू दे आम्हांवर
सावित्रीची छाया...

कु. वर्षाराणी वासेकर
बी. ए. भाग - २

जीवन

जीवन नुसतं जगायं नसतं
त्याला फुलवायचं असतं
नुसतच हसायचं नसतं
थोडं रडायचंही असतं
सतत जिकायचं नसतं
तर कधी हरायचंही असतं
नुसतं सुख भोगायचं नसतं
दुःखाशीही नांत जोडायचं असतं
प्रेम केवळ घ्यायचं नसतं
अखेर शेवटी काही आठवायचं नसतं
काही विसरायचं असतं
स्वप्नातून सत्य शोधायचं असतं
स्वतःला विसरुन दुसऱ्यासाठी
जगायचं असतं.

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

एकटेपणा

आज मन रडत होते,
कुणाच्या तरी आठवणीत...
विचारले मनाला तर म्हणाले,
राहू दे मला एकटे आज तरी...

गालावरुन ओघळणारा एक एक अश्रू,
लपवत होते मी सगळ्यांपासून...
ओठावरले हसुसुध्दा,
देत होते साथ मनापासून...

आज मनाला हवा होता तो एकटेपणा,
कधीही न अनुभवलेला...
विरहाच्या आठवणीत,
चिंब होऊन भिजलेला...

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

कुणासाठी तर जगायचं असतं

किती क्षणांचे हे आयुष्य असतं
आज असतं तर उद्या नसतं
जगायचं असतं
कारण इथे कोणीच कोणाचं नसतं.

जाणारे दिवस जात असतात
येणारे दिवस येत असतात
जाणाऱ्यांना जपायचं असतं
येणाऱ्यांना घडवायचं असतं
आणि जीवनाचे गणित
सोडावायचे असतं.
म्हणूनच कधी कुणासाठी
तरी जगायचं असतं.

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

जगून बघ

जन्माला आला आहेस,
थोडं जगून बघ!
जीवनात दुःख खूप आहे,
थोडं सोसून बघ!
चिमुटभर दुःखाने कोसळू नकोस,
दुःखाचे पहाड चढून बघ!
यशाची चव चाखून बघ,
अपयश येतं, निरखून बघ!
डाव मांडणं सोपं असतं,
थोडं खेळून बघ!
घरटं बांधणं सोपं असतं,
थोडी मेहनत करुन बघ!
जगणं कठीण असतं, मरणं सोपं असतं,
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ!
जीवन - मरण एक कोड असतं,
जाता - जाता एवढं सोडवून बघ!

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

आयुष्याचा प्रवास

आयुष्याचा प्रवास झाला सुरु
थांब सखये, थोडा धीर धरु

सुखाच्या मागे दुःख जोडीला
दुःखाच्या वाटेवर फुले संगतीला

प्रत्येक संकटाला तोंड देण्याचा प्रयत्न केला,
यशाचा घास मिळविण्यासाठी धीर मात्र
तूच धरला

यश,अपयश नाण्यांचा बाजू आहेत दोन
जन्म -मृत्यूचे गणित मांडते काटकोन त्रिकोण

आयुष्याचा प्रवास झाला सुरु
थांब सखये थोडा धीर धरु

घड्याळाच्या काट्यांप्रमाणे धावते हे जीवन
माणुसकीच्या नात्यांत सुकते आहे वृंदावन

संसाराच्या वेलीत जीव माझा गुंतून गेला
वर्तमानाच्या आधीच काळ कसा पुढे सरकला

आयुष्याचा प्रवास झाला सुरु
थांब सखये, थोडा धीर धरु....

कु. वर्षाराणी वासेकर
बी. ए. भाग - २

आयुष्य

चांगल्या गोष्टी त्यांना
मिळतात जे वाट पाहतात...
अधिक चांगल्या गोष्टी त्यांना
मिळतात जे प्रयत्न करतात,
पण सर्वोत्तम गोष्टी त्यांनाच मिळतात
जे आपल्या प्रयत्नांवर अतूट विश्वास
ठेवतात आयुष्य अवघड आहे पण,
अशक्य नक्कीच नाही...

झेप

झेप घ्यायची असेल तर
आपल्या परिघाच्या बाहेर घ्या
म्हणजे तुम्ही खाली पडणार नाहीत
कारण, अवकाशात मुक्तपणे
विहार करण्याकरता
आधी पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या
परिघाबाहेर जावे लागते.

पेंज

पेंज लावायची असेल तर
ती फक्त स्वतः सोबतच लावा
कारण, जिंकलात तर स्वतःचा
आत्मविश्वास जिंकाल आणि
हरलात तर स्वतःचा अहंकार हराल...

ध्येय

गरुडासारखे उंच उडायचे असेल तर
कावळ्याची संगत सोडावी लागेल.
मनातील स्वप्ने
तेव्हांच सत्यात उतरतील
जेव्हां त्यावर मनापासून
कृती केल्या जातील. मनातील
भीतीही तेव्हांच नाहीशी होते.
जेव्हां आपल्या क्षमतांची
आपल्याला जाणीव असते.
स्वतःला ओळखून ध्येय ठरवावे,
ध्येय मोठेच असेल
तर स्वतःला बदलावे.

कु. दिपाली विटकर
बी. ए. भाग - २

दुःख

दुःख असतात सर्वांना
स्वतःचे दु-ख मोठे समजू नकोस
रडत असेल सर्व जरी
दुसऱ्या समोर स्वतःकधी रडून नकोस
जीवन असते सर्वाकडेच
स्वतःचे जीवन व्यर्थ कधी घालवू नकोस
अभिमान असतो सर्वांना
अपमान कधी बाळगू नकोस
मन असते सर्वांनाच
दुसऱ्याचे मन कधी दुखवू नकोस

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

मैत्रीचं नातं

पिंपळाच्या पानासारखा असायला हवं
कितीही जाळी झाली तरी
जीवनाच्या पुस्तकात
आयुष्य जपून ठेवायला हवं
मैत्रीचा हा धागा नीट जपावा लागतो
जो कोणी हा धागा नीट जपतो
तोच खरं जग जिंकतो.

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

कृष्ण

हे कृष्ण! क्षण - क्षण येतीया आठवण।
वाट पाहतेय मन ये सोडुनिया वृंदावन।

हे मन हारी! ये क्षणभरी।
हे मोर मुकुंदधारी दया कर जरा तरी।

हे नंद लाल! हे गोकुळ चा ग्वाल।
बनो माझा डाल वाट पाहतेय
बनुनिया भक्तिचा द्वारपाल।

ऐकव मुरलीची वाणी गीताची वाणी।
बनुनिया सखा या सार्थक।

हे नील कमला! कमल नयना।
कमल चरणा करु सदा नमना।

कु. कृष्णवेणी बोल्ली
बी. कॉम. भाग - १

मैत्री

मी पात्र आहे गंगेचे,
सागर तु होशील का?
पूर आला प्रीतीचा तर,
सामावून मला घेशील का?
शब्द तू अन् गीत तू,
रम्य माझी प्रीत तू,
फूल तू अन् गंध तू,
मज लागलेला छंद तू।
प्रेम मिळो अथवा न मिळो,
प्रेम सर्वावर असायला हवं,
क्षणभर का होईना, कुणीतरी
आपल्यावर रुसायला हवं।।
अर्थाला महत्त्व देवून
मैत्री करण्यात अर्थ नाही,
प्राणास मुकावे लागले तरी
मैत्रित ते व्यर्थ नाही.

कु. अर्चना बोध्दुल
बी. कॉम. भाग - १

प्रेम

कोणाचीतरी सतत आठवण येणं
म्हणजे प्रेम.दिवस - रात्र त्याचा
विचार करणं म्हणजे प्रेम.
येणार नाही हे माहित असुनही
त्याच्या फोनची
वाट पाहणं म्हणजे प्रेम.
त्याच्या एका नजरेसाठी व्याकुळ
होणं म्हणजे प्रेम.त्याच्या मिठीसाठी
आतुरणं म्हणजे प्रेम.त्याच्या बरोबर
स्वप्न रंगवणं म्हणजे प्रेम.
आयुष्यभर कोणासाठी तरी
थांबणं म्हणजे प्रेम.
आणि कोणाशिवाय तरी मरणं म्हणजे प्रेम.

कु. लक्ष्मी रापर्ती
एम. कॉम. भाग - १

सांगू का आई

सांगू का आई
माझा घसा का बसला ?
स्वप्नात किनई मी
बर्फ खूप खाल्ला

बर्फाच्या डोंगरावर
केली झिम्मड मस्ती
आईस्क्रिमच आईस्क्रिम
धम्माल नुसती

सांगू का आई
खरी गोष्ट तुला ?
मी नाही केला
हा बिछाना ओला.

तुझ्यासाठी बर्फ -गोळा
खिशात होता ठेवला
मला वाटतं तोच
इथे वितळून गेला...

कु. दिपाली घिटकर
बी. ए. भाग - १

माय सावित्री

अन्यायाला तडा देवून सामोरे तू जाताना
डगमगली नाहीस हे कार्य तू करताना

माझ्यासाठी सहन केला तू दगडाचामारा
आता नाही नं होणारा कोणत्या ही मुलीवर
अन्यायाचा मारा

तुच आई, तुच बाई, तुच गं पहिली माझी ताई
ओळखली तु माझी क्षमता म्हणून वाजवली
शिक्षणाची घंटा

धैर्याने तु आली पुढे खचली नाही
समाजापुढे तेवत ठेवू तुझे ते
अनमोल कार्य मीच लेक तुझी सावित्री माय

क्षितीजावर नव्हती एवढी आभाळाची छाया
त्यापेक्षा जास्त होती मुलीवर तुझी माया

करेन मी तुझ्या कार्याचे तुजलाग् सुफलाग्
तेवत ठेविण तुझ्या याकार्याचा दिवा सुर्या समान

कु. सानिया नदाफ
बी. ए. भाग - १

जीवन

कधी असं ही जगावं लागत
छोट्या हाश्याच्या पडद्याआड
खरं दुःख लपवावं लागत
कतृत्वाच्या नावा खाली
स्वतःला राबवावं लागत
इतरांना आनंदी ठेवण्यासाठी
डोळ्यात पाणी लपवावा लागत
तीव्र ईच्छा असुन देखील
नाही असं म्हणावं लागत
खुप प्रेम असुन देखील
नाही असं मनाव लागत
असं इतरांना हसवता हसवता कधी
खूप रडाव लागत
कधी असं ही जगाव लागत

कु. विजयलक्ष्मी भांगे
बी. ए. भाग - १

बाबा

माझे बाबा....
माझे सारे दुःख वाहुन नेणारे
परत अनंदाने पेटारे देणारे...
.... ते माझे बाबा
स्वतःच्या अंगावरील सदऱ्याला
भोक पडले असले तरी
प्रत्येक सणाला मला नविन
सदरा आणून
देणारे माझे बाबा....
किती व्यस्त का असेना पण
माझ्यासाठी त्यांचा अमूल्य
वेळ काढणारे
..... ते माझे बाब
प्रेम कधी दाखवत नाही पण ,
लपून सर्वात जास्त प्रेम करणारे
माझे बाबा....

कु. देवलक्ष्मी गोसकी
बी. ए. भाग - १

महाविद्यालयातील आरोग्यकेंद्राकडून जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. दिलीप कुमठेकर व उपस्थित डॉ. कौकांत देवेगावकर, प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे, माजी प्राचार्य डॉ. के. एन. जगताप, डॉ. आशा विलासीन बोरकर, डॉ. रजनी दळवी व आदी मान्यवर...

महाविद्यालयात जिल्हास्तरीय योग शिबीराचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे, डॉ. रजनी दळवी व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयातील- २०२१-२२ मधील नवीन पालक-शिक्षक कार्यकारिणी समवेत प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे...

महाविद्यालयातील आरोग्य केंद्राचे उद्घाटन करताना डॉ. सुरेखा कोतडिया, डॉ. रजनी दळवी, डॉ. शिवानंद भांजे व डॉ. पंचप्पा वाघमारे व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताह निमित्त इतिहास विभाग, रा. सी. पो., समाजकल्याण विभाग, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करताना मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे डॉ. संदेश घाग व उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे, डॉ. अॅनी जॉन, डॉ. आर.के. वडने, डॉ. शंकर राजे व डॉ. टी. एन. शिंदे...

म्युटी पार्क अभ्यासक्रमाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे, डॉ. शिवीश भोसले, डॉ. रजनी दळवी, डॉ.शिवानंद भांजे व डॉ. पंचप्पा वाघमारे...

महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यासक्रमाच्या सहली प्रसंगी भौतिक रोतीची माहिती घेताना विद्यार्थीनी....

महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यासक्रमाच्या सहली प्रसंगी भौतिक रोतीची माहिती घेताना विद्यार्थीनी....

महाविद्यालयात विवेकवर्धिनी केंद्राचे उद्घाटन करताना सौ. निशा भोसले, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयात मार्कंडेय महामुनी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वर्ग...

महाविद्यालयात शारिरीक शिक्षण विभाग व 'योग असोसिएशन, सोलापूर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे उद्घाटन करताना डॉ. नाजीर शेख व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयाचे देणगीदार श्री. रामचंद्रजी बुर्ला यांची पुण्यतिथी म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व उपस्थित प्राध्यापक व कर्मचारीवर्ग...

महाविद्यालयात अर्थ वाणिज्य मंडळाकडून आयोजित कार्यक्रमाप्रसंगी व्यवसायातील महिलांसाठीच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करताना महिला उद्योजिका सौ. चंद्रिका चव्हाण व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. विश्वनाथ घारे, डॉ. दिलीप भोसले, प्रा. रंजना कलशेट्टे व डॉ. रोहन राजे...

महाविद्यालयात पर्यावरण आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. महेंद्र घागरे व व्यासपीठावर उपस्थित डॉ. तुकाराम रिठे, डॉ. रोहन राजे व प्रा. सुरेखा बसगुल...

महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भित्ती पत्रकाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, मराठी विभागाच्या डॉ. कविता मुरूमकर व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थीनी....

महाविद्यालयातील जॉब प्लेसमेंट व करिअर गाईडन्स सुरू करून आयोजित पहिल्या सुत्रसंचन (कॅम्पस इंटरव्यू) प्रसंगी बोलताना....

महाविद्यालयातील रा. से. यो. विभागाच्या मौजे कर्देहळ्ळी येथील विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन करताना संस्थेचे उपाध्यक्ष – प्रा. श्री. श्रीनिवास कोंडी, प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे, डॉ.आर.के. चव्हाण व उपस्थित ग्रामस्थ...

महाविद्यालयातील रा. से. यो. विभागाच्या मौजे कर्देहळ्ळी येथील 'ग्राम विकासात युवकांची भूमिका' या विषयावर बोलताना डॉ. कौसल्य दंडे व व्यासपीठावर उपस्थितीत मान्यवर

महाविद्यालयातील रा. से. यो. विभागाच्या मौजे कर्देहळ्ळी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबीरा प्रसंगी 'जगणे आनंदाचे ' या विषयावर बोलताना श्री. भाऊसाहेब पौळ व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयातील रा. से. यो. विभागाच्या मौजे कर्देहळ्ळी येथे आयोजित ' राष्ट्राच्या विकासात महिलांचे योगदान' या विषयावर बोलताना प्रा. डॉ. सकिनाबी पाटील व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर...

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी आयोजित श्रमदान शिबीर प्रसंगी डॉ. शिवीराज मोरले, डॉ. आर. के. चव्हाण व उपस्थित ग्रामस्थ...

महाविद्यालयातील रा. से. यो. विभागाच्या मौजे कर्देहळ्ळी येथील विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेच्या सहसचिवा-सौ. संगिता इंदापुरे व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. राजेंद्र रोडगे व उपस्थित मान्यवर...

महाविद्यालयात लसवासवाजीचे वर्कशॉपच्या वेळेस समर्थ म्यॉटेशचे संचालक श्री. राजेंद्र माने, श्री. हर्षिष पटेल व प्रा. रजनी ढवळी व विद्यार्थीनी...

महाविद्यालयात आयोजित स्किल डेव्हलपमेंट वर्कशॉप प्रसंगी सराव करताना विद्यार्थीनी...

हिंदी विभाग

"तुम्हारे पाँव के नीचे कोई जमीन नही,
कमाल ये है कि फिर भी तुम्हें यकीन नही,
मैं बेपनाह अँधेरों को सुबह कैसे कहूँ,
मैं इन नजारों का अँधा तमाश बीन नहीं।"

- दुष्यंतकुमार

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नांव	लेखाचा प्रकार	विद्यार्थीनीचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
		गद्य विभाग			
१.	**किन्नर देश की यात्रा**	– प्रवासवर्णनपर लेख –	– कु. विद्या जिंदम	– बी. ए. भाग – ३	४३
२.	**राष्ट्रभाषा हिंदी**	– माहितीपर लेख –	– कु. विद्या जिंदम	– बी. ए. भाग – ३	४४
३.	**भारतीय संस्कृति**	– माहितीपर लेख –	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	४६
४.	**साक्षरता का महत्व**	– माहितीपर लेख –	– कु. विद्या जिंदम	– बी. ए. भाग – ३	४७
५.	**मेरी पर्वत यात्रा**	– प्रवासवर्णनपर लेख –	– कु. संध्या सरवदे	– बी. ए. भाग – ३	४८
६.	**अच्छे विचार**	– माहितीपर लेख –	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	४८
७.	**द बिग बुल**	– माहितीपर लेख –	– कु. अंजली बनसोडे	– बी. कॉम. भाग – ३	४९
८.	**दोस्ती शायरी**	– शायरी	– कु. मोनिका गाजूल	– बी. कॉम. भाग – २	४९
९.	**मेक इन इंडिया**	– माहितीपर लेख –	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५०
१०.	**समय का महत्व**	– माहितीपर लेख –	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५०

पद्य विभाग

अ.क्र.	कवितेचे नाव	विद्यार्थीनींचे नाव	वर्ग	पृष्ठ क्र.
१.	**कोशिश कर**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
२.	**हम भारतीय हैं**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
३.	**वो बचपन का जमाना था**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
४.	**डर के आगे जीत हैं**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
५.	**मेहनत रंग लाई**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
६.	**दिल के अल्फाज**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५१
७.	**कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५२
८.	**आत्मनिर्भर भारत**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५२
९.	**आँखों का महत्व**	– कु. मोनिका गाजूल	– बी. कॉम. भाग – २	५२
१०.	**प्रेरणादायक विचार**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	५२
११.	**विश्वास**	– कु. मोनिका गाजूल	– बी. कॉम. भाग – २	५२
१२.	**उम्र**	– कु. विजयलक्ष्मी भांगे	– बी. ए. भाग – १	४५
१३.	**शिक्षक शायरी**	– कु. विजयलक्ष्मी भांगे	– बी. ए. भाग – १	४५
१४.	**दोस्ती शायरी**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	४६
१५.	**मोटिवेशनल शायरी**	– कु. लक्ष्मी रापर्ती	– एम. कॉम. भाग – १	४७

– प्रवासवर्णनपर लेख –



किन्नर देश की यात्रा

कु. विद्या जिंदम
बी. ए. भाग – ३

'' यात्रा–साहित्य'' का भूगोल से घना संबंध हैं क्योंकि तीर्थटन या अन्य उद्देशीय यात्रा में यात्री एक स्थान से दुसरे स्थान जाता हैं। इसीलिए यात्री भौगोलिक जानकारी देने से वंचित नहीं रहता '' यात्रा–स्थल की भौगोलिक स्थिती क्या हैं इसकी जानकरारी यात्री स्वयं करा लेता हैं पुनः उसे यात्रा वर्ण मे भी देता हैं।

प्रारंभिक यात्रा – वृत्त भौगोलिक जानकारी से परिपूर्ण रहा करते थे। यात्रा एक स्थान से दुसरे स्थान जाना हैं। भूगोल की वह अंशतः परिगमा हैं। पहले के यात्रा लेखक वे यहाँ की यात्रा करते उसकी भौगोलिक संपूर्ण जानकारी देने का प्रामाणिक प्रयत्न करते। समुद्र तलहटी से उसकी उँचाई कितनी हैं, वहाँ का तापमान कैसा हैं, वहाँ की अबोहवा किस तरह की हैं? वहाँ की प्रमुख फसलें कौन सी हैं, उसका वहाँ के जनजीवन पर किस तरह प्रभाव पड़ा हैं? आदि किंतू आज के यात्रा वृत्तों मे इस तरह की जानकारी देना साहित्यिक गुणों में बाधा पहुँचाने के बराबर माना हैं। भौगोलिक जानकारी देने के लिए भूगोल की किताबे होती हैं। यात्रा – लेखक उन्हे पुनः अपनी रचना मे न दोहराए। साहित्यिक ग्रंथ इन्फरमेटिव नही होते वे सौंदर्य दृष्टि प्रदान करते हैं। अंतः आजकल के यात्रा ग्रंथों में भूगोल संबंधी उन्ही बातों का जिक्र किया जाता हैं जिससे लेखक अधिक प्रभावित होता हैं। जिन्हें लिखना अनिवार्य हैं। यात्रा – ग्रंथ पर्यटकों की मार्गदर्शक किताबे नहीं हैं, जो रेलवे अथवा बस स्थानकों के बुक स्टॉलों पर बेची जाती हैं।

यात्रा–लेखक किसी देश की यात्रा करता हैं इसके माने वहाँ की ऐतिहासिक परंपरा सामाजिक, सांस्कृतिक रीतीरस्मों का अध्ययन करता हैं। उस देश की संस्कृति, रीतीरस्मों से प्रभावित हो अपना प्रामाणिक मत अपनी रचना में लिख देता हैं। जैसे कुछ यात्रा ग्रंथों के उदाहरण दृष्टव्य हैं। जैसे राहुल सांस्कृत्यायन जी किन्नर देश में वहाँ के प्राकृतिक सौंदर्य के साथ प्रकृत जनजीवन के संगीत से प्रभावित हो लिखते हैं – किन्नर देश हिमालय का एक रमणीय भाग हैं, जो तिब्बत (भीट) की सीमा पर सतलुज की उपत्यका में ७० मैल लंबा और प्रायः उतना ही चौड़ा बसा हुआ हैं। निम्नतम भूमि ५००० फूट उच्चतम भूमि ११००० फूट से ऊपर हैं।

भूगोल लोगों की वेशभूषा, रीतीरस्म सामाजिक व्यवस्था के लिए कारण बनकर कैसे रह जाता हैं? इसका विचार यात्रा – लेखक स्वतंत्र्य रुप में करता हैं। किन्नर देश की स्त्रियों की वेशभूषा के संदर्भ में निम्नांकित विचार देखने लायक हैं।

यहाँ से हम असली किन्नर देश में प्रविष्ट हुए। स्त्रियाँ ऊर्ण सारी को उन्हीं साड़ी न मान लिजिए यह काफी लंबा – चौड़ा, पतला कम्बल होता हैं, जिसे स्त्रियाँ दाहिने कंधा खोले काँठे से इस प्रकार पहनती हैं। सिर को छोड़कर सारा शरीर ढँक जाता हैं। यहाँ से नीचे के लोगों को किन्नर कोची हैं। कोची स्त्रियाँ सिर पर रुमाल बाँधती हैं, किंन्नु किन्नरियाँ अपने पुरुषों की भाँति टोपि लगाती हैं, जिसके तीन भाग में उठे कनपटे जाड़ों में नीचे गिरकर कनटोप का काम देते हैं।

बसंतीश्री अबोध – पक्षियों को मुखरित कर देती हैं। जान पड़ता हैं, प्राकृतिक सुषमा, मधुर संगीत तथा मधुर कंठ का कोई नैसर्गिक संबंध हैं, तभी तो पहाड़िने किकिला कण्ठी होती हैं, और किन्नर कण्ठ की इतनी महिमा गायी गई हैं। हिमाचल की नारियाँ कोई भी काम बिना गीत के कर नहीं सकती। हृदय सिहराने वाली पहाड़ी जगह में खड़ी घास काट रही हैं, और उनकी गीत ध्वनी नदी के कलकल के साथ मिश्रित हो रही हैं। हरे खेतों मे निराई कट रही हैं और मधूर कण्ठ दिगंत को मुखरित कर रहा हैं। किन्नर में तो संगीत नारी का सांस बन गया हैं।

हिमानी प्रवाह के संदर्भ में प्रामाणिक भौगोलिक जानकारी देन में लेखक नहीं चुकता – हिमानी प्रवाह लाखो टन बर्फ का कारवा होता हैं, जो महादानव की भाँति जोर की गर्जना करते चलता हैं। उसके मार्ग में पेड़ चट – चट टूटते शिलाएँ तड़ – तड़ फुटती भीषण कांड सी दूर तक चुकना देती हैं। उससे भी जबरदस्त होता हैं हिमानी पात के आगे – आगे चलता झंझावात, जो मन दस मन की चीजों को फुंक से तिनके की भाँति उड़ता चलता हैं। मत किसी का घर किसी का गाँव हिमानी के मार्ग में पड़े। आम तौर से हिमानी के अपने मार्ग निश्चित होता हैं। यथार्थ बड़े – बड़े नाले और खड्डे, जिनके खोदने में हिमानी का भी काफी हाथ होता हैं। जिस साल हिमवृष्टि अधिक होती हैं, पहाड़ी से टूटे लाखों, करोड़ो टन के बर्फ का काफिला मनमाना रास्ता बना लेता हैं। कितनों ही पर भयानक आफत आ जाती हैं। यदि कही सोये में काफिला आ पड़ा, तो लोगों को भागने की भी फुर्सत नही मिलती।

यात्रा वर्णन ग्रामामिकता के साथ किया होता हैं, अंतः वह एकतरह से इतिहास हैं – हमारे देश में लिखित रुप में कितना इतिहास संकलित नहीं हैं उतना हमारे जीवन में हैं। इसलिए यात्रा – पर्यटन में इतिहास दर्शन भी होता हैं। यात्री जब अपने नगर निवास देश को छोड़ अन्य नगर देश की यात्रा करता हैं तो वहाँ के इतिहास, संस्कृति, सभ्यता, समाज व्यवस्था के साथ अपने यहाँ की तुलना करता हैं। जो उससे ग्रहणीय हैं उसकी चर्चा करता हैं। जो त्याज्य हैं, उसके बारे में संयमित, संतुलित शब्दों में असहमती प्रकट करता हैं।

– माहितीपर लेख –



राष्ट्रभाषा हिंदी

कु. विद्या जिंदम
बी. ए. भाग – ३

भाषा के द्वारा मनुष्य अपने विचारों को आदान – प्रदान करता हैं। अपनी बात को कहन के लिए और दुसरे की बात को समझने के लिए भाषा एक सशक्त साधन हैं। जब मनुष्य इस पृथ्वी पर आकर होश संभालता हैं तब उसके माता – पिता उसे अपनी भाषा में बोलना सिखाते हैं। इस तरह भाषा सिखाने का यह काम लगातार चलता रहता हैं। प्रत्येक राष्ट्र की अपनी अलग – अलग भाषाएँ होती हैं। लेकिन उनका राजकार्य जिस भाषा में होता हैं और जो जन संपर्ककी भाषा होती हैं उसे ही राष्ट्र – भाषा का दर्जा प्राप्त होता हैं। भारत के भी अनेक राज्य हैं। उन राज्यों की अपनी अलग – अलग भाषाएँ हैं। इस प्रकार भारत एक बहुभाषी राष्ट्र हैं। लेकिन उसकी अपनी एक राष्ट्रभाषा हैं – हिंदी १४ सितंबर १९४९ को हिंदी को यह गौरव प्राप्त हुआ। २६ जनवरी १९५० को भारत का अपना संविधान बना। हिंदी को राजभाषा का दर्जा दिया गया। यह माना कि धीरे – धीरे हिंदी अंग्रेजी का स्थान ले लेगी और अंग्रेजी पर हिंदी का प्रभुत्व होगा। आझादी के इतने वर्षो बाद भी हिंदी को जो गौरवपूर्ण स्थान प्राप्त होना चाहिए था, वह उसे नहीं मिला। अब प्रश्न यह उत्पन्न होता हैं कि हिंदी को उस का यह पद कैसे दिलाया जाए? कौन से ऐसे उपाय किए जाए जिससे हम अपने लक्ष्य तक पहुँच सकें।

गुमनामी के अंधेरे में था, पहचान बना दिया। दुनिया के गम से मुझे, अनजान बना दिया। उनकी ऐसी कृपा हुई, हिंदी ने मुझे एक अच्छा इंसान बना दिया। प्राचीन काल में मनुष्य जंगलों में निवास करता था। धीरे – धीरे उसने समाज में रहना प्रारंभ किया और सुरक्षा की दृष्टि से समूह में रहना उपयुक्त समझा जाने लगा। कालांतर में इन्ही समूहों से कबीलो का और फिर नगर राज्यों का विकास हुआ। राष्ट्रवाद की अवधारणा का विकास मध्यकाल से माना गया हैं। पश्चिमी विद्वान भारत में राष्ट्रवाद के उदय का कारण अंग्रेजी शासन को मानते हैं। किंतु यह तथ्य स्वीकार नहीं हैं। वस्तुतः भारत में राष्ट्रवाद की भावना उतनी ही प्राचीन हैं, जितना कि यहाँ का इतिहास चक्रवर्ती सम्राट बनकर संपूर्ण भारत पर शासन करना हमारे देश के प्राचीन कालीन राजाओं का सपना हुआ करता था। प्राचीन में संचार के साधनों का अभाव होने के कारण यद्यापि लंबे समय तक भारत कभी एक सत्ता के आधीन न रह सका किंतु यह भावना कभी मरी नहीं। अशोक समुद्रगुप्त जैसे शासकों ने लगभग संपूर्ण भारत को एक शासन के आधीन ला दिया था। मध्यकाल के बाद भी अकबर, अल्लाउद्दिन खिलजी और औरंगजेब जैसे बादशाह भी भारत में राजनीतिक एकता स्थापित करने में सफल हुए थे।

आज हम संयुक्त राष्ट्र संघ में हिंदी को उसका हक मिलने की प्रतिक्षा में बैठे हैं। लेकिन हमारे अपने देश की संसद में नेता क्या भाषण दे रहा हैं एक आम आदमी नहीं समझ पाता हैं। हिंदी विश्व में सर्वाधिक लोगों द्वारा बोली जाने वाली भाषा मंदारिन के बाद दुसरे स्थान पर हैं, फिर भी यह संयुक्त राष्ट्र संघ में उपेक्षित हैं, तो इसका कारण केवल यहीं हैं कि यह अपने घर में ही उपेक्षित हैं। जबकी अरबी और स्पेनिश जैसी भाषाओं को संयुक्त राष्ट्र संघ मे अधिकारिक भाषा का दर्जा प्राप्त हैं। भला हमे हमारी ही भाषा से क्या शत्रुता हैं? क्यो हमें हिंदी को बढ़ावा देने में संकोच होता हैं। क्यों हम हिंदी दिवस और हिंदी पखवाड़ा मनाकर अपने कर्तव्य की इतिश्री समझ लेते हैं। अपनी भाषा, संस्कृती पर किसी को भी गौरव का अनुभव होना चाहिए।

